# शंभर वर्षे पुढे



संयम बागायतकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# संयम बागायतकर

लिखित

कादंबरी

# १०० वर्षे पुढे

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# १०० वर्षे पुढे

# हे पुस्तक फ़ुकट नाही

**यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.**

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

**दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.**

# १०० वर्षे पुढे (कादंबरी)

## लेखक : संयम बागायतकर, वेंगुर्ला

ई मेल : sanyambagayatkar@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन :  ५ डिसेंबर २०२०


©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

श्री संयम बागायतकर यांची ई साहित्यतर्फ़े प्रकाशित पहिली कादंबरी

# फटकेवाली

कव्हरवर क्लिक करताच उघडेल



# १०० वर्षे पुढे

एका चलाख चोराने आजच्या सर्वसत्ताधीशांकडून जगातली सर्वात किंमती गोष्ट चोरली. आणि ते मागावर लागल्यावर त्यांना चुकवता चुकवता, तो शंभर वर्षे पुढच्या काळात पोहोचला खरा! पण ती सगळयात किंमती गोष्ट त्याच्याकडून हिरावून घेण्यासाठी, त्या काळातले सर्वसत्ताधीश देखील त्याच्या मागे लागले. चोर किती पळणार? कुठे पळणार? कशी राखणार ती सर्वात किंमतीची गोष्ट?

ती सर्वात मौल्यवान गोष्ट होती- त्याचं स्वातंत्र्य…

© संयम बागायतकर, बागायतवाडा, वेंगुर्ला- ४१६५१६

# १०० वर्षें पुढे

# १०० वर्षे पुढे - प्रकरण १

महानगर मुंबईत रात्र तिच्या पूर्ण भरात झगमगत होती. समुद्र किनाऱ्यावरुन पाहता उंचच उंच इमारतींची मांदियाळी नजरेत भरत होती. त्यातही अंमळ काही इमारती इतरांपेक्षा जास्त वरती ताठ्याने मान उंचावलेल्या होत्या. त्या अर्थात जास्त श्रीमंतांच्या होत्या. जितकी जास्त उंच इमारत तितका जास्त पैसा तिथं असणार होता. तितकी जास्त सुरक्षा व्यवस्था. तितका जास्त कुशल चोर तिथं चोरीसाठी आवश्यक होता.

त्या सगळ्या ठोकळेवजा इमारतींमध्ये एकीचा नूर जरा आगळा वेगळा होता. मुद्दाम वेडेवाकडे मजले एकामेकांवर चढवल्यासारखे होते. काही अधांतरी बाहेर लोंबत असल्यासारखे वाटत होते. त्यांच्यावरून लांबच लांब वेलींचे झुबके खालच्या मजल्यांवर लोंबत होते. थेट गच्चीपासून अश्या वेलींच्या जाळ्या खाली खाली झुलत होत्या. एखाद्या कुशल चोराला आमंत्रण देत असल्यासारख्या. ते अामंत्रण स्वीकारून दोन चोरांच्या चोरट्या हालचाली त्या गर्द हिरव्या पानांआड चालू होत्या. एखादा बहिरी ससाणाच केवळ त्या हेरू शकला असता. ते सुद्दा दिवसाच्या ढळढळीत प्रकाशात. आता तर रात्र होती. त्यामुळे ते चोर खुशाल

होते. याला फाजील आत्मविश्वास म्हणा वा गलथानपणा, तेहतिसाव्या मजल्याच्या उंचीवर खिडकीबाहेर हवेत लोंबकळणारे ते गडी जिगरबाज म्हणायचे खरे.

केवळ तेवढ्या उंचीवर पोहोचणे त्यांना पुरेसे नव्हते. जरी इथून कोणी आत घुसायची कल्पना करण्यात आली नव्हती, तरी मुंबापुरीच्या उष्ण वातावरणापासून बचाव करायला, ती पूर्ण इमारत वातानुकूलित केलेली होती. त्यासाठी पूर्णपणे मजबूत बंदूकरोधी काचांनी बंदीस्त केलेली होती. खिडकीपाशी पोहोचायला चोरांना भिंतीवरून पालीसारखे सरपटावे लागले. त्यासाठी जरुरी तंत्रसज्ज हातमोजे आणि पायमोजे त्यांनी चढवलेले होतेच, त्याशिवाय त्यांच्या अंगावरचा तंग सर्वांगागुंठीत पोषाख, आजूबाजूच्या गोष्टींशी सहज मिळून मिसळून जाणारा होता. निदान तळजमिनीवरील सुरक्षा टेहळयांना त्यांची नोंद घेता येणं अशक्य होतं.

खिडकीपाशी पोहोचल्यावर चोरांच्या खऱ्या कसबी कारागिरीला सुरूवात झाली. एकाने आपल्या पाठीवरील थैलीतून काच कापणारे अवजार काढले. त्यातून निघणाऱ्या निळ्या प्रकाश-शलाकेने तसूभर सुद्धा आवाज न करता काचेची कापाकापी सुरू केली. दुसऱ्याने काचेचे जे धारदार छोटेछोटे तुकडे कापले जात

होते, त्यांच्यावर खटक्याच्या उघडमिटीनुसार गच्च पक्कड धरणारे व सोडणारे अवजार वापरून, ते एक एक आपल्या थैलीत गोळा करायला सुरूवात केली. ते काम बिनबोभाट उरकायला त्यांना पुरता अर्धा तास लागला.

खिडकीच्या आत अनाहूतांच्या आगमनाची वर्दी देणारी चुगलखोर यंत्रणा नाही, याची आपल्या जवळच्या चपट्या डबीसारख्या यंत्राने त्यांनी खात्री केली. मग त्यांच्यातला किरकोळ अंगलटीचा चोर आधी आत घुसला. त्याच्या मागे लगोलग दुसरा जाडगेला. आता त्यांना आवाज न करता केवळ खाणाखुणांनी संवाद साधणे भाग होते. त्या दालनात अंधार होता. हे पाहून ते तिथे शिरले होते. जाड्याने कडक्याला खूण केली. त्यांनी आपापले लाल रंगाच्या अलीकडले अवरक्त किरण दाखवणारे चष्मे डोळ्यांवर चढवले. आता त्यांना अंधारातले स्पष्ट दिसू लागले.

मुंबईतल्या सर्वात धनाढ्य माणसांपैकी एकाच्या, पर्यायाने भारतातील सर्वात धनाढ्य माणसातल्या एकाच्या घरी चोरी, म्हणजे मोठे घबाड मिळणार असते. त्या दालनात अनेक किंमती वस्तू आणि फर्निचर होते. कडक्याने एक पितळी मूर्ती उचलली. जाड्याने जोरात नकारार्थी मान हलवली. 'किती जड होणार?' अशा अर्थी खूण केली. मग काही वेळ कडक्याने वस्तूला हात लावावा

आणि जाड्याने त्याला नकार द्यावा, हा खेळ रंगला. कडक्याने वैताग दर्शवायला दोन्ही हातांनी डोके पिटून घेतले. 'उचलायचे तरी काय?' जाड्याने चमकणाऱ्या हिऱ्याची खूण केली. तिजोरी शोधूया. दोघांनी इकडे तिकडे नजर फेरली.

तिथे तीन दरवाजे होते. तीन भिन्न दिशांना. दोघे दोन दिशांना पांगले दोन दरवाजांपाशी. जाड्याने दरवाजा उघडला. भसकन दिव्यांचा प्रखर उजेड आत आला. तो मजले वरती खालती नेणाऱ्या उदवाहनाकडे आणि जिन्याकडे जाणाऱ्या बोळात उघडला होता. जाड्याने पटकन दरवाजा परत लावून घेतला. हुश्श केले. नशीब तिथे कोणी नव्हते.

कडक्याची पाळी आली. त्याने दरवाजा किंचित किलकिला केला. पलीकडे तावातावाने चाललेली वादावादी कानी आली. ती आवाजरोधी खोली असावी. दार उघडेपर्यंत तर काही आवाजाचा हासभास नव्हता. कडक्याने मनगटावरील घड्याळावर नजर टाकली. मध्यरात्र उलटून साडेतीन वाजले होते. ही अंथरुणात गार झोपायची वेळ असता ही मूर्ख माणसे वाद घालत होती. आजकाल या जगात शहाणपणा शिल्लक आहे, यावरचा त्याचा विश्वास उडत चालला होता. त्याने घाईघाईने दरवाजा बंद केला.

ती घाई पुरेशी ठरली नाही. दरवाजा आतून पुन्हा उघडला गेला. कडक्याला फारच आश्चर्य झाले. कारण आगंतुक माणूस, तो सुद्धा असा नखशिखांत तंग अंगासरशी घट्ट बसलेल्या वस्त्रप्रावरणातला, अचानक घरात घुसलेला पाहून, सहसा लोक बोंब ठोकून देतात. पण ह्या गोल-गोबऱ्या गोऱ्या-घारटेल्या तरुण माणसाने चक्क हातात हात ओढून घेत, अभिवादन केले. त्या महागड्या सूट-बूट-टायवाल्या माणसाच्या देखण्या चेहऱ्यावर स्वागताचे हास्य पसरले. "आम्ही तुझी वाटच बघत होतो. ये आत ये. आम्हाला सामील हो." अस्खलित फर्ड्या इंग्रजीत तो म्हणता झाला.

कडक्याने एक असहाय्य नजर लांब अंधारात उभ्या साथीदारावर टाकली. 'जा आत.' साथीदाराने खुणावले. एक दीर्घ उसासा सोडत कडका चोर त्या खोलीत प्रवेशला. मागोमाग गोबऱ्याने दरवाजा बंद केला. चोराने तो पुन्हा उघडून घातला. त्याला आपला परतीचा मार्ग मोकळा हवा होता. गोबऱ्याने पुन्हा लोटला. चोराने पुन्हा उघडून घातला. आता गोबऱ्याने एक दीर्घ उसासा फिसकारला. हात उडवले. जाऊन त्याच्या जागेवर बसता झाला.

तिथे अजून दोन व्यक्ती होत्या. एक म्हातारी खादीच्या रेशमी पांढऱ्या साडीत होती. तिचे व्यक्तिमत्व भारदस्त होते. ओळखीचे वाटत होते. दुसरी स्त्री चाळीशीची पसरलेल्या अंगाची होती. तिच्या अंगावर तिला न शोभणारा पाश्च्यात्य धर्तीचा काळा झगा होता. विशेष नोंद घेण्यासारखी गोष्ट म्हणजे तिच्या हातात-गळयात जाडजूड पट्टे होते. जे आभूषण वाटण्यापेक्षा यंत्रांसारखे वाटत होते. तिच्या हिरव्या डोळयांमध्ये एक वेडसरपणाची चमक होती. ते तिघे चोराच्या अवताराचे मोजमाप घेत होते. त्या तिघांच्या पुढ्यात दुमडणारे चपटे संगणक होते. जोडीला.... चोर उसासला. रंगात आलेल्या दारु रसपानाचा सगळा सांग्रसंगीत जामानिमा.

"हा माझा याह्याभाई डाकू संघटनेत घुसवलेला छुपा हस्तक आहे. बेनाम तुझं या बैठकीत स्वागत आहे. बाईसाहेब आपले म्हणणे पुढे चालू करा." भिंतीवरच्या मोठ्या पडद्यावरचा माणूस इंग्रजीत बोलला. चोर त्या पडद्याला दूरदर्शन यंत्र समजला होता. समजुतीचा घोटाळा. त्याचा स्वतःचा आणि या सगळयांचा. ते त्याला कोणी दुसरा समजले होते.

डाव्या हाताची करंगळी दाखवून, तिथून मागच्या मागे सटकू पाहायचा अयशस्वी डाव तो खेळला. गोबऱ्याने त्याला तिथल्या दुसऱ्या एका दरवाजाकडे इशारा करुन खुणावले. झगाबाईच्या

आणि बाईसाहेबांच्या चेहऱ्यावर अस्पष्ट हसू फाकले. चरफडत चोर त्या दाराने आत गेला. त्या आलिशान शौचालयात तिथे खिडकीच नव्हती. तो हिरमुसला. बाहेरचे कान देऊन ऐकायचा प्रयत्न करू लागला. तिथे बाहेरच्या खोलीतले ऐकू येत नव्हते. नाईलाजाने बाहेर आला. त्याच्याकडे न बघताच झगेवालीने तिच्या शेजारच्या आसनावर बसायचा इशारा केला. तो गपगुमान जाऊन बसला. त्यांचे हिंदी-इंग्रजी बोलणे चालू राहिले.

"लोकांचा वाढत चाललेला असंतोष धोक्याच्या पातळीवर जाण्याआधी आपल्याला तो दुसरीकडे वळवला पाहिजे." साडीतल्या बाईसाहेब तर कावेबाजपणे बोलत होत्या. "परवा नव्या मुंबईतल्या तुमच्या कारखान्यामधून विषारी गळती झाली होती. मेलेल्यांच्या सग्या-सोयऱ्यांनी मोर्चा आणला होता. राडा करायच्या तयारीने आलेले, हाय हायच्या घोषणा देत. तासाभराने परत गेले. जय जयच्या घोषणा देत."

"फारच रोचक. कसे साधले?" गोबऱ्याने विचारले.

"राजकारणात इतकी वर्षे झिजले आहे. फोडायचे आणि झोडायचे. तितके तरी जमले पाहिजे. परकीयांचा हात म्हटले. आणि त्यांचे कारस्थान म्हणून देऊन टाकले काही पुरावे. या देशाच्या सत्ताधाऱ्यांवरचा राग शेजार देशाच्या सत्ताधाऱ्यांवर

फिरवून टाकला. इतके पण जर उपयोगाला येणार नसतील, तर शेजारी अजून हवे असतात कशासाठी?" हसत हसत स्वतःच्या दुमडणाऱ्या संगणकावर तिने बाकीच्यांना तो 'हाय हाय' मोर्चा, उलटा 'जय जय' करत परत जाताना दाखवला. "आज देशाला तुमच्या रक्त, अश्रू, घामाची गरज आहे. लोकहो गळतीत मेले, ते देशासाठी शहिद झाले. आम्ही याचं कठोर उत्तर त्यांना देऊ. बोला भारतमाता की जय." तिने नाटकिपणे हात फैलावले, "अरे आपल्या इतक्या मदतीला येणाऱ्या भारतमातेचा नुस्ता जय तरी करा ना." खोलीतले बाकीचे तिघे मख्ख राहिले.

"काय पुरावे दिले तुम्ही शेजाऱ्यांच्या कारस्थानाचे?" डोळे बारीक करत झगेवालीने विचारले.

बाईसाहेब हसल्या. "मोर्चातील कोणाला इतकी अक्कल असते की ते पुरावे मागतील? काटेकोरपणे तपासत बसतील? माझी चार माणसे चारशे माणसांमध्ये घुसवली. त्यांनी हाळी दिली की बाकीची मेंढरे सुद्धा हाळी देतात. त्यांना इतिहासात दोनशे वर्षांपूर्वी परकियांनी काय केलेले? त्याची आठवण दिली की दोन दिवस आधी देशात काय झालेले ते सगळे विसरून जातात." मग तिने आपला मोर्चा चोराकडे वळवला. "बेनामसाहेब तुमच्याकडून मला काही साधून हवे आहे. नसलेले पुरावे निर्माण करायचे आहेत.

तुमच्या डाकू संघटनेतल्या माणसांकडून आपल्याला काही बॉम्बस्फोट सार्वजनिक ठिकाणी घडवून आणले पाहिजेत. त्यांचा आळ बरोबर शत्रूराष्ट्रावर येईल अशा कारस्थानी रितीने. बोला येत्या महिन्याभरात हे कसे साधाल?"

चोराकडे याचे काही उत्तर नव्हते. त्याने काही तरी केले पाहिजे, म्हणून दोन्ही हातांची दामटी एकामेकात जुळवून ती जोरजोरात हलवली. दोन्ही बायका याचा नेमका काय अर्थ लावावा? या विचारात एकमेकींकडे पाहू लागल्या. "ठिक आहे. बेनामजी, तुम्हाला हे काम साधायची इतकी खात्री असेल, तर आनंदच आहे." गोबऱ्या गालांतून शब्द बाहेर पडले. "मला देखील तुमच्याकडून काही हवे आहे. तुमच्या नेहमीच्या पठडीतले साधे तस्करीचेच काम आहे. या कामापेक्षा सोप्पे आहे."

"धनदास, तुम्ही मध्यप्रदेशातला कामगारांचा संप कसा मोडाल? त्या कामाचे आधी काही बोला. काही महिन्यात तो कारखाना बंद करायचा आहे. तो पर्यंत कामगारांना जितके बिनपगारी वापरता येईल, ते बघा. तेवढा पैसा वाचेल. नफा वाढेल." पडद्यावरचा माणूस बोलला.

"त्या संबधितच हे काम आहे. कामगार आधीचा सहा महिने पगार घातला नाही म्हणून चिडले होते. काम बंद आंदोलन चालू

होते." गोबऱ्या गुलाबी गालांचा माणूस सांगू लागला. पुढ्यातल्या संगणकावर काम ठप्पची दृश्ये दाखवू लागला. "आपल्या तिथल्या उद्योग व्यवस्थापकाने त्यांच्या पुढाऱ्यांना बोलावले. हा सगळा सरंजाम पेश केला." त्याने पुढ्यातल्या गोष्टींवरून हात फिरवला. "त्या हीनांना कुठे आपल्यासारखे स्वतःचा आब सांभाळून पिता येते? गटारात लोळणारी डुक्करे ती. थोडी हजार रूपयांची बंडले त्यांची गुपचूप राहायची किंमत म्हणून देऊ केली. बाईसाहेब काय म्हणतात याला? फोडा आणि झोडा. आम्ही म्हणतो चारा आणि पाजा. म्हणजे तोंड बंद होते. बाकी कामगारांना भुलवायला दारूअड्डयावर दारू स्वस्त जवळजवळ फुकट केली आहे. त्या गुंगीत त्यांना काही सुचणार नाही. त्यांची बायकापोरे त्यांनाच दोष देणार. ते अजून-अजून खचत जाणार. लढू शकणार नाहीत. दारू स्वस्त करायला लागणारा खर्च, पगार द्यायच्या खर्चाच्या दहा टक्के सुद्धा नाही." मग गोबऱ्याने पडद्यावरली नजर फिरवून चोरावर लावली. "तर बेनामजी मला सांगा, अंमली पदार्थांच्या विक्रीचे जाळे त्या भागात किती लवकर बनवू शकाल? सुरवातीचा गर्दच्या पावडरचा सगळा खर्च आम्ही उचलू. एकदा आहारी गेले की पुढे ते कामगारच पैसा पुरवायला लागतील."

"कामगारांना जर तुम्ही पैसा देणारच नाही आहात, तर ते हे पैसे कुठून आणणार?" झगेवालीने वादाचा मुद्दा पुढे केला.

धनदासने खोचकपणे झगेवालीकडे पाहिले. "या कामगार माणसांच्या ऐवजी तुमचे यंत्रमानव आपण कधी वापरू शकणार कुमारीजी? सगळी कटकट लगेच संपेल."

"अगदी आजच्या घडीला वापरू शकतो. पण त्यांचा निर्मितीचा खर्च आणि या कारखान्यातून बनणाऱ्या वस्तूंच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न, यांचा ताळमेळ अजून नफ्याच्या गणितात बसत नाही आहे. माझे काम संशोधकाचे आहे. पैशांचा हिशेब लावायचे काम आपले आहे, धनदास." झगेवाली आढ्यतेने बोलली.

"तुमचे लष्करासाठी सैनिकी यंत्रमानव बनवायचे काम कुठपर्यंत आले आहे कुमारीजी?" पडद्यावरून पृच्छा करण्यात आली. "त्यासाठी आपण हवी ती किंमत सरकारकडून मागू शकतो?"

"सरकार?" तोंडाच्या कडा वाकड्या करत झगेवाली छद्मी हसली. "या पुढे आपणच सरकार आहोत. हे बघा जरा." तिने तिच्या संगणकावरती एक चलचित्रित प्रसंग सुरू केला. पार्श्वभूमीला निवेदन सुरू केले. काही काटकुळी काळी माणसे एका निर्जन माळरानावर उन्हात तळतळत ठिय्या मारून बसलेली दिसत होती. "आपल्या यंत्रमानव प्रयोगशाळेचा प्रकल्प विस्तार करायचा

आहे, त्या जागेवरती राहणारे हे आदिवासी आहेत. त्यांचा जागा खाली करायला विरोध आहे. उपोषणाला बसले होते." मग तिने मोहरा बाईसाहेबांकडे वळवला. "तुमच्या राजकिय पक्षाचा तिथला नेता त्यांची बाजू घेऊन भांडायला आला होता."

"त्याचा हिस्सा वसूल करायला तो आवाज उठवणारच. राजकारणात लोक आजकाल आणखीन कशासाठी येतात? त्याचे तोंड काही लाखात बंद होईल. तेवढे फार वाटायला नकोत." बाईसाहेब टेचात उत्तरल्या.

"त्याला आम्ही एक कोटी रुपये दिले. पण त्याला बाकीच्यांचा आवाज बंद करता आला नाही. तो कार्यक्षम नाही." शेवटचे वाक्य एखादी घृणास्पद शिवी असावी, तसे झगेवालीने उच्चारले. "या पूर्वी आपला केरळातला प्रकल्प असाच स्थानिकांच्या टोकाच्या विरोधामुळे गोळीबार होऊन रद्द झाला."

"हं! लोक जरा जास्त शहाणे झालेत हे खरे. विस्थापन म्हणजे आपल्या समूळ अस्तित्वाला धोका, त्यांना कळायला लागले आहे." बाईसाहेबांनी खांदे उचकटले. आपण या बाबतीत काही करू शकत नाही सुचवायला.

"प्रकल्पामागून प्रकल्प आपण रद्द करत राहू शकत नाही. आपल्या समाजातल्या सर्वोच्च अस्तित्वाला धोका होईल.

इतरांच्या वाट्याचे हिसकावल्याशिवाय आपली भर होऊ शकत नाही. त्याना खाली घातल्याशिवाय आपण वर चढू शकत नाही." पडद्यावरचा सर्वोच्च मानकरी बोलता झाला.

"अगदी माझ्या मनातले बोललात. आता त्यावरचा जालीम उपाय मला मिळाला आहे. साम दाम चालले नाहीत तर दंड. मी त्या सगळ्यांना संपविले. माझ्या नव्या खुनी यंत्रांनी." झगेवालीने चलचित्रण थोडे शीघ्रगती पुढे नेले. त्या उपोषणाला बसलेल्या आदिवासींच्या डोक्यांवर चार पंखेवाल्या तबकड्या घिरटताना दिसू लागल्या. खालची माणसे वेदनांनी पिळवटून आळोखेपिळोखे देताना दिसू लागली. थोड्याच वेळात ती निर्जीव शांत झालेली दिसली. "ही माझी ऋण-विद्युतकणांच्या लहरींचा मारा करणारी यंत्रणा आहे. कोणताही शवविच्छेदन तज्ञ त्या माणसांच्या मृत्यूचे कारण ठरवू शकला नाही. त्या परिसरात त्यावेळी जे कोणी दिसून आले, त्या सर्वांचा खुनी यंत्रांनी परस्पर सफाया केला. त्या यंत्रांमध्ये आपला आपण निर्णय करू शकणारी तेवढी समर्थ संगणकीय बुद्धी, मी आता विकसित केलेली आहे. या कत्तलीचा कोणी साक्षीदार मी जिवंत सोडलेला नाही."

त्या खोलीत काही वेळ स्मशानशांतता पसरली. त्या माळरानावर जशी कायमची पसरली तशी. "आता या जगात कोणी

जगायचं आणि कोणी मरायचं? ते आपण ठरवू शकतो." झगेवालीच्या हिरव्या डोळ्यांमध्ये मग्रूरी साफ झळकत होती. "स्वयंचलित यंत्रांना चालवायला लागणारी, एवढी ऊर्जा सहजपणे त्यांच्याबरोबर कशी पाठवायची? याचं उत्तर अजून काही काळात सुटलं की आपल्याला तळागाळातील या कष्टकरी माणसांची कटकट सहन करायची गरज उरणार नाही. आपण पृथ्वीच्या पाठीवरचं हे फालतू माणसांचं ओझं नष्ट करू. यंत्रे बिनबोभाट आपल्यासाठी सगळी कामं पार पाडतील."

"पण या स्वतःची अक्कल असलेल्या यंत्रांनी आपल्याला सुद्धा नष्ट केलं तर?" बाईसाहेब धास्तावल्या होत्या.

"अजून तरी तसं झालेलं नाही. ही खुनी यंत्रे माझ्या आज्ञेनेच चालतात. नमुना बघायचा आहे? खिडकीकडे बघा." झगेवालीने तिला भिंतीपाशीचे पडदे सरकवण्याची खूण केली. बाईसाहेबांना उठण्यात कमीपणा वाटला. त्यांनी दुर्लक्ष केले. झगेवालीने धनदासाला खूण केली. त्याला सुद्धा तिच्या इशाऱ्यावर काम करायला कमीपणा वाटला. तो हलला नाही. चोराला मात्र उत्सुकता लागलेली. तो सरळ उठला आणि त्याने पडदा उघडला. तिथली काचेची भिंत म्हणजे खिडकी उघडी झाली.

बाहेर त्या तेहतिसाव्या मजल्याच्या उंचीवर खुनी यंत्र तरंगत होते. झगेवालीने आपल्या हातावरील पट्ट्यातली छोटी गोल चक्री फिरवली. तोंडी काही सांकेतिक आज्ञा दिली. यंत्र जागच्याजागी थोडेसे फिरले. त्याची मारगिरी करणारी नळी आता त्या दालनात बसलेल्यांवर रोखली गेलेली होती. "बाईसाहेब जरा जागेवरून उठणार का?" आवाजात उपरोधिक विनंतीचा भाव आणत हिरवे डोळेवाली म्हणाली. मग तिने पुन्हा काही सांकेतिक उच्चारण केले.

बाईसाहेबांच्या अंगाची तडफड होऊन त्या ताडकन उभ्या झाल्या. "थांबव हे ताबडतोब." त्यांच्या तोंडातून वेदनांनी पिळवटलेले शब्द बाहेर पडले. तिथे असलेल्या सगळयांच्या अंगात विचित्र अशी जळजळ सुरू झाली. स्वतः कुमारीजीला जेव्हा त्रास सहन करणे अशक्य झाले, तेव्हा तिने पुन्हा तोंडी आज्ञा देऊन तो मारणमारा थांबवला. बाईसाहेबांच्या कुमारीजी वरती रोखलेल्या नजरेत राग, ईर्षा, भय, अगतिकतेचे एकत्रित मिश्रण होते. धनदास वातानुकूलित दालनात घामाघूम झालेला. चोराचा चेहरा झाकलेला असल्यामुळे ना त्याची प्रतिक्रिया कोणाला कळू शकली, ना पडदा त्या लहरींच्या माऱ्यामुळे बंद पडल्यामुळे त्यावरच्या माणसाची. तिथे प्रत्यक्ष हजर नसल्याचे हायसे वाटणारी ती असणार होती, इतके खरे.

"हा मारा सध्या दहा हात परिघाच्या क्षेत्रात फैलावतो. तो अचूक नेमका एका व्यक्तिवर रोखता यावा, यासाठी मला जास्तीची काही साधनसामुग्री लागणार आहे. त्यासाठी लागणारे विशिष्ट पदार्थ फक्त परदेशातील एका प्रयोगशाळेत उपलब्ध आहेत. ते तिथून सरळपणे मिळणारे नाहीत." तिचे ते वेडसर छटेचे हिरवे डोळे चोरावर रोखत तिने मागणी केली. "बेनाम आता इथे मला तुमची मदत हवी आहे. तुमच्या डाकू संघटनेतील आंतरराष्ट्रीय संबंधितांचा उपयोग करुन, तुम्ही मला ते पदार्थ मिळवून द्यायचे आहेत. ते नेमके कुठे पोचले? हे कोणाला कळू न देता. बोला. कधी पर्यंत हे काम साधू शकाल?"

चोराकडे या प्रश्नाचे सुद्धा काही उत्तर नव्हते. असते तरी त्याने ते देताच त्याचे सोंग उघडे पडले असते. काय करावे? अशी त्याची चुळबुळ चालू असता, पडद्यावरचे दृश्य पुन्हा उजळले. "कुमारीजी, सुरक्षाविभागाकडून आपले उडनयंत्र दूर हटवण्याची विनंती करण्यात आली आहे. इथे काही मोठी गडबड झालेली आहे. त्याचा अंदाज घेण्यात अडथळा होतो आहे." सर्वोच्च मानकऱ्याचा आवाज पूर्वी इतका दमदार नव्हता. ताकदीपुढे नम्र होण्याची त्या सगळयांच्या हाडीमांसी खिळलेली सवय होती. तोच त्या मुख्य मानकऱ्याच्या पुढ्यातली सूचनाघंटी ठणठणली. त्यावर

बोलल्यावर त्याचा चेहरा स्पष्ट गोंधळलेला दिसला. "बेनाम जर अजून त्या मजल्यावरच पोहोचलेला नाही, तर हा कोण आहे?"

सगळयांच्या नजरा आपसूक चोरावर खिळल्या. चोराच्या नजरेपुढे क्षणात पुढचे चित्र तरळून गेले. तो आणि त्याचा सखा खिडकीत पाडलेल्या भोकातून बाहेर पडताच, खुनी यंत्राच्या भेदक माऱ्यात सापडून तडफडत खाली कोसळत चाललेत. तेहतिसाव्या मजल्यावरून. त्याचे अंग शहारले.

या आणीबाणीच्या क्षणी करता येण्यासारखी एकच तोड कामाची होती. काय करायचे? ते नक्की झाल्यावर त्याचे अंग चित्त्याच्या चपळाईने हलले. समोरच्या सरंजामातली काचेची बाटली त्याने खळकन फोडली. फुटलेल्या बाटलीची धारदार कड कुमारीजीच्या फुगीर गळ्यावर रुतेपर्यंत लावली. मोडक्या तोडक्या हिंदीमध्ये तितकीच धारदार आज्ञा केली. "चल. आपन आता इथून बाहर जावूया. जरा मोकळ्या हवंत फिरूया की."

## १०० वर्षे पुढे - प्रकरण २

वेसाव्याच्या दांडीपासून थोड्या अंतरावर दाटीवाटीने झोपड्यांची रांग लागलेली होती. सकाळची उन्हे हवीशी वाटत होती. कारण ऐन मार्गशीर्षातले ते हिवाळी दिवस होते. आसपासच्या वर्दळीकडे, दर्याच्या खाऱ्या वासाकडे दुर्लक्ष करत, दोन मित्रांची जोडगोळी मासेमारीच्या वेगवेगळ्या सामानातून वाट काढत चालली होती. त्यातला जाडा जणू वाट दाखवत असल्यासारखा पुढे चालत होता. दुसरा काटकुळा तरुण पेंगुळलेला होता. अधूनमधून डुलकीत तोल गमावत सावरत त्याच्यामागोमाग जात होता. अखेरच्या झोपडीपाशी ते पोहोचले. भरतीची लाट त्यामागच्या कठड्यावर गर्जत आपटली. तिचा हलकासा शिडकावा त्यांच्या अंगावर शिवरला. जाड्याने दारावर विशिष्ट क्रमाने थांबत थांबत ठराविक ठोके ठोठावले.

दारामागून कडी काढल्याचा आवाज आला. ते उघडले गेले. घट्ट तुमान आणि मळकट डगला घातलेल्या एका बाईने त्यांच्याकडे न बघताच आत घुसायची खूण केली. ते आत शिरताच, बाहेर एकवार टेहळून लगोलग दार लावून घेतले. पुन्हा आपली जागा धरुन बसती झाली. ती जेमतेम दोन-तीन पुरुष

लांबीरूंदीची छोटी खोली होती. त्यात मासेमारी जाळी आणि पेट्यांची गर्दी असल्यामुळे, तीन वयस्कर माणसे कशीबशी जमिनीवर फतकल मारून दाटीने बसलेली होती. त्या मित्रांच्या जोडगोळीला तिथे बसता येणे अशक्य होते. त्या खोलीला खिडकी नव्हती. माश्याच्या घाणीचा वास डोके उठवणारा होता. तरी कोणालाच त्याचे काही वाटत नव्हते. अंधुक दिव्याचा उजेड होता.

"सखा, आमची तातडीची बैठक चालू आहे. आदिवासींचा आख्खा गाव काही दिवसांपूर्वी गायब झाला आहे. ती सगळी माणसं मेलीत. कारणच कळत नाही. फार गंभीर मामला आहे. त्याचा विचार करतो आहोत. अशी काय आणीबाणी झाली की तू आमच्या बैठकीत व्यत्यय आणायला धजावलास?" भरपूर पांढरे केस-दाढी-मिशा असणाऱ्या माणसाने जरबेने विचारले.

"आणि आम्हाला न विचारता परस्पर हा तिऱ्हाईत माणूस या गुप्त ठिकाणावर आणलास?" टक्कल असलेल्या तिसऱ्या माणसाने काटकुळ्या माणसावर बोट रोखले.

"आम्हाला इतकी काळजी घ्यावीच लागते." कोरडेपणाने म्हणत त्या खप्पड बाईने बसल्या जागेवरुन काटकुळ्या माणसाच्या हातांमध्ये अनोख्या चपळाईने हातकड्या चढवल्या. "याची ओळख दे सर्वात आधी."

"हा बावळ्या. माझा मित्र आहे. एक खूप कुशल चोर आहे. काल मी त्याला जोडीला घेऊन महामहिमच्या मुख्यालयात रात्री घुसखोरी केली. ते एकट्याने करायचं काम नाही. तुम्ही जाणता." जाड्याने उत्तर दिले.

"पण याला इथं का घेऊन आला आहेस?" दाढीवाला.

"त्याला आपल्या गुप्त कारवायांची माहिती आहे?" टकलू.

"हा एक चोर एवढ्या भरवश्याच्या लायक आहे?" बुचडा बांधलेली खप्पड. तिघांनी धडाधड सख्यावर प्रश्नांची फैर झाडली.

"आपण याच्यावर खात्रीने विश्वास ठेवू शकतो. आजपर्यंत त्याने कधी कोणा गरीबाचे-दुर्बळाचे पैसे लुटलेले मी पाहिलं नाहीय. उलट बड्या पैसेवाल्यांना लुटणं खूप अवघड काम असतं. त्यांची कडेकोट सुरक्षा व्यवस्था असते. नेमलेले रक्षक असतात. तरी हा पठ्ठ्या नेहमी धोका पत्करुन, बंगले आणि ऊंच इमारतींच्या माथ्यांवरचे गगनमहाल लुटत असतो." बावळ्याने या स्तुतीने अवघडून सख्याकडे भिवया उंचावत पाहिले. बैठकवाली तिघं सुद्धा भुवया उंचावून सख्याकडे पाहू लागली. त्यात कौतुकाऐवजी साशंकता जास्त होती.

"त्याला सोबत नेताना मी आपल्या गुप्त हेतूची कल्पना दिली नव्हती. हिऱ्यांचं आमिष दाखवून मी याला नेलं होतं. पण

तिथून सुटका करून घेताना आपल्या कामांची ओळख द्यावी लागली. मात्र जीव वाचवून सुटणं इतकं अवघड झालं की आपल्याला हवा होता, तो महामहिमचा संगणकीय गुप्त माहितीसंचय उडवता आला नाही." सख्याने नाईलाज दाखवायला हात-खांदे वर उडवले. "तिथं मी जे काही पाहिलं-ऐकलं ते विश्वास ठेवायला अचाट अतर्क्य कठीण आहे. साक्ष देण्यासाठी बावळ्याला इथं बरोबर आणला आहे. कदाचित तुम्ही ज्याची चर्चा करत आहात त्याचं उत्तर मिळेल."

सख्याने आपल्या पाठीवरच्या पिशवीतला घडीचा संगणक काढून उघडला. बैठकवाल्या तिघांच्या पुढ्यात धरला. "माझ्या गुप्त चल-चित्रकाने टिपलेल्या काल तिथं चालू असलेल्या त्यांच्या गुप्त बैठकीतल्या या गोष्टी पाहा." त्याने एकामागोमाग तिथं टिपलेली दृश्ये दाखवायला सुरुवात केली.

बावळ्याचे डोळे विस्फारले. सख्याने त्याच्या मागोमाग आत प्रवेश न करता ती बाईसाहेब, ती कुमारीजी, तो धनदास या सगळ्यांचा वार्तालाप एवढा व्यवस्थित कसा टिपला? त्यांच्या छोट्या संगणकावरील दृश्ये देखील? दोघांची नजरानजर होता सख्याने डोळे मिचकावले. "उडनयंत्र काय एकट्या कुमारीजीची मिरास आहे? आमच्याकडे आमची आहेत."

दृश्ये एकामागे एक धावत होती. "अरे! हा तर आपला कल्लू?" त्या राजकारणी बाईसाहेबांनी थारावलेल्या मोर्चेकऱ्यांच्या नेत्याला दाढीवाल्याने ओळखले. "वाटलं नव्हतं हा त्या सत्तापुजारिणीच्या भुलाव्याला फसण्याइतका मुर्ख माणूस असेल."

"छॅ! बल्लू फुटला? दारूला विकला?" खप्पड उसासली. मध्यप्रदेशातील कामगार नेत्यांना धनदासच्या आमिषाला सहजी बळी पडताना पाहून. "सख्या हे प्रत्यक्ष चित्रण पाहिलं नसतं, तर मी बल्लूच्या इमानदारीवर वाटेल त्याची पैज खेळले असते. जगात आता विश्वास तरी कोणाचा धरायचा?"

"पुरे पुरे. अजून काही बघायची शक्ती माझ्यात नाही." टकलू विव्हळला. कुमारीजीच्या यंत्रांनी केलेले आदिवासींचे खून पाहिल्यावर डोळे झाकून घेत. "ती सिनीवाली आणि तिचा नवरा यांना मी भेटलेलो मागे जंगलदौऱ्यात. आदिवासी असले तरी त्यांच्यात अंधश्रद्धांचा पगडा मी कधी पाहिला नव्हता. त्यांच्या जुळया बछड्यांना सुद्धा नराधमांनी जिवंत सोडलं नाही. कितीही वाईटातली वाईट शिक्षा त्या अवपिपासेचा न्याय करायला कमीच पडेल."

"तुम्ही अजून काही बघणं आवश्यक आहे." असं म्हणून सख्याने कुमारीजीने तिथल्या बैठकदालनात दाखवलेले खुनीयंत्राचे प्रात्यक्षिक सगळ्यांना बघणे भाग पाडले. बराच वेळ तिथे मौन पसरले.

"ही काही भ्रमबाजी असेल? यंत्रांचं दूरनियंत्रण नक्की केलं गेलेलं आहे. यंत्राला स्वतःची इतकी बुद्धी असूच शकत नाही." खप्पड ठामपणे हातावर हात आपटत म्हणती झाली.

"असा संशय तुम्ही सगळे घेणार, हे मला ठाऊक होतं. म्हणून मी बावळ्याला इथं घेऊन आलो आहे. बावळ्यानं प्रसंगावधान ठेऊन त्या अवपिपासेला ओलिस धरली. केवळ म्हणून आम्ही आता तुमच्या पुढ्यात जिवंत आहोत. त्या यंत्राने आमचा विचारांपलीकडे पाठलाग केला. पाठलाग चुकवायला अनेकानेक वाहनांचा आम्ही उपयोग केला. पण दोन तासांनी यंत्राचा सगळा विद्युतसंचय घट रिकामा झाला. ते ऊर्जा संपून कोसळलं. तेव्हाच आम्ही धावाधावीतून खरे सुटलो." सख्याने बावळ्याला तिघांच्या पुढ्यात ढकलले. "विचारा याला, त्या खुनी यंत्राने आमचा कुठं-कुठं कसा-कसा पाठलाग केला? त्याबद्दलच्या तुमच्या सगळ्या शंका."

बावळ्यावर तिन्ही वयस्कर व्यक्तींच्या प्रश्नांचा हल्ला झाला. बावळ्याने होता होईल तितक्या प्रश्नांची उत्तरे दिली. तो सख्यासारखा कसबी अभियंता नव्हता. तांत्रिक बाबी त्याला उलगडता आल्या नाहीत. ते कसे कसे पळाले. यंत्राला चकवायला त्यांनी किती आणि कोणत्या तिकडम केल्या. यंत्र त्यांच्या हूलीला कसं पुरुन उरलं. उलट यंत्रानेच त्यांना पाठलाग सोडल्याची हूल कशी दिली. यंत्र दबा धरून कसे बसलेले, बंद पडल्याची खेळी कसे खेळले, ते सारे तपशीलवार सांगितले. त्यांना देखील असेच वाटत होते की माणसे दूरनियंत्रणाने यंत्र चालवताहेत. पण मग भूमिगत गटारांमध्ये सुद्धा यंत्राने त्यांची पाठ सोडली नाही. तिथं तर भ्रमणध्वनी सुद्धा संपर्कक्षेत्राच्या आवाक्याबाहेर असतात. कोणत्याच बाहेरच्या दूरसंपर्क लहरी पोहोचू शकत नाहीत.

पुन्हा काही काळ मौनात गेला. "अजून कोणाला या खुनी यंत्राची माहिती आहे? दुसऱ्या कोणाला याची कल्पना दिली आहेस?" दाढीवाल्याने विचारले.

"हे फार भयानक आहे. भल्या माणसांची बुऱ्या माणसांशी लढाई शतकांमागून शतके चालू आहे. पण ही लढाई?" पुढचा विचार सहन न झाल्याने टकलूने तोंड आवळून घेतले.

"ही लढाई आपण आता आधीच हरलेले आहोत. आपण संपणार आहोत. उद्या की परवा? एवढंच ठरायचं बाकी आहे. शेवटी अवपिपासू माणसांनी हा सर्वनाशी भस्मासूर जागा केलाच." टकलूचे उरलेले बोलणे खप्पडने निराश स्वरात पुरे केले.

"मंडळी यातून तुम्ही काहीतरी उपाय काढाल, असं वाटून मी सुटका होताच थेट तुमच्याकडे धाव घेतली. आपणा क्रांतीच्या पाईकांपैकी, विचारशील अश्या तुमच्यासारख्यांनी जर हातपाय गाळले, तर मग ओढवू घातलेला सर्वनाश टाळण्यासाठी लढायचं कोणी?" सख्याने डोके गच्च धरले.

"त्या अवपिपासेला कुमारीजीला संपवावं लागेल. तिनं अजून पुढला टप्पा गाठायच्या आधी." खप्पड मुठी जोरात आवळत म्हणाली. "सखा, तू आणि तुझ्या या मित्रानं ते काम पार पाडावं. तुम्हाला ज्या काय साधनांची गरज पडेल, ती आम्ही पुरवू. महामहिमच्या मुख्यालयात घुसून तुम्ही परत आलेले आलात. दुसरं कोणी हे काम साधण्यासाठी तुमच्यापेक्षा जास्त सक्षम नाही. बोला कामगिरीवर कधी निघता?"

"काय बोलतोस बावळ्या?" सख्याने विचारले.

"नाय बाबा नाय. चोरीचं येगळं. खून येगळा. आपून नाय खुनाच्या भानगडीत अडकनार." बावळ्याने निक्षून सांगितले.

"खून नाही जमणार, तर निदान त्या खुनी यंत्रांच्या तळावर घुसून, ती सगळी मोडूनतोडून नष्ट करायचं काम तरी तुला जमणार काय? त्या प्रयोगशाळेचा रानातला ठावठिकाणा मला पुरता ठाऊक आहे." टकलूने उपहास करत विचारले.

"सरळ सांगा की राव? मला मरवायचाच हाय. एका यंत्रापासून जीव वाचवायला जे काय करावं लागलं हाय, ज्याचं नाव ते. तसली कितकी आनी यंत्र तिथं असतील काय मायती? आपल्याला काय जमनाऱ्यातलं नाय. मी एक मामुली चोर हाय. तुम्ही आनी कोनी बघा जी." बावळयाने पुन्हा नकार दिला. सख्याकडे दुजोऱ्याच्या अपेक्षेने बघितले. त्याने नजर टाळली. सावळया घळीला आला.

"याचा अापल्याला काही उपयोग होणारा नाही." टकलू बेफिकीरीने खांदे उचकटत बोलला. "पण याला आपल्या गुप्तळाची, आपली माहिती झालेली आहे.  याला आता असाच मोकळा सोडता येणार नाही. याचं करायचं काय?"

"याला कैदेत फुकट पोसत बसायला कोणाला परवडणारं आहे?" खप्पड डोळे बारीक करून बावळयावर रोखत तीक्ष्णपणे म्हणाली. "याला संपवलेला बरा. सखा याची मान मोड." बैठकीतल्या तिघांच्या नजरा अपेक्षेने सख्यावर खिळल्या.

"मी खात्री देतो ना याची." सखा परिस्थितीच्या या वळणाने चक्रावला. "तो नाही बोलणार कुठेच कसा."

"आणि बोलला तर? अशीच खात्री आत्ता आत्ता मी बल्लूची देत होते." खप्पड.

"आणि मी कल्लूची." दाढीधारी.

"आपण कोणीच त्याची शहानिशा करायला शिल्लक उरणार नाही. आपले वैरी त्याशिवाय गप्प बसणारे नाहीत. याला त्याचा जीव जास्त प्यारा आहे. याला धमकवायची खोटी की तो घळाघळा सगळी माहिती ओकेल." टकलू.

"आणि याच्यापर्यंत पोहोचायला त्यांना फार वेळ लागणार नाहीय. आतापर्यंत याचा काही ना काही शारीरिक घटक सापडून, याचा सगळा जैविक माहितीसंचय त्यांच्या संगणकांपर्यंत पोहोचला असेल. राष्ट्रीय सरकारी माहितीसंचयामधून याचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरु देखील झालेली असेल." खप्पड.

"बावळ्या हे म्हणत आहेत ते खरं आहे." सखा बावळ्याचे खांदे घुसळत बोलला. "आपल्याकडे हल्ला करायचा की नाही हा पर्याय नाहीय. जिवंत राहायचं तर आपण आधी हल्ला करायला हवा आहे."

"तू मला बी याच्यात कशाला अडकवला?" बावळया व्यथित नजरेने सख्याकडे पाहत राहिला. सख्याने नजर झुकवली. त्याच्याकडे या तक्रारीचे उत्तर नव्हते. "मला यातलं काय बी कळलं नाय. काय बी जमनारं नाय. मला जाऊ द्या की?"

"सख्या चल. आता वेळ लावू नको." खप्पड कठोर होत बोलली. "तुला जमणार नसेल. तर मला हे काम पार पाडावं लागेल. पण कर्तव्याला तू चुकलास. हा ठपका तुझ्यावर कायमचा बसेल." सख्या किंकर्तव्यमूढ होऊन नुस्ता उभा राहिला.

खप्पड उठली. तिची बोटं बावळयाच्या गळयावर रुतली. हातात बेड्या असल्याने बावळया असहाय्य होता. त्याची जीव वाचवायची तडफड फडफड झाली. मग थंडावली.

# १०० वर्षे पुढे - प्रकरण ३

डोळ्यांवरती आलेली अंधेरी उतरून बावळ्या हळूहळू भानावर आला. त्याचं डोके अजून गरगरत होते. आपण कुठे होतो? काय परिस्थितीत होतो? याचा विचार येताच तो झटक्यात सरळ झाला. डोळ्यांच्या चार जोड्या त्याच्यावर खिळलेल्या त्याने पाहिल्या. त्या चारही चेहऱ्यांवर हसू फुटत होते. सख्याने आधार देऊ करून बावळ्याला बसता केला.

खप्पडने पाण्याचा पेला पुढे केला. बावळ्याने तोंड रागाने त्यापासून दूर फिरवले. तिला हसण्याची जोरात उबळ आली. का कसे माहीत? हसताना ती खप्पड न वाटता खूप सुंदर वाटली.

"घे रे घे. रुसू नको." पेला आपल्या हातात घेत सख्याने बावळ्याच्या ओठांशी नेला. "पी. तुला बरं वाटेल." बावळ्याची गोंधळलेली भयभीत नजर बाकी तिघांवरुन फिरली. "त्यांनी जरा गंमत केली रे तुझी." सख्याने पाठीवर दिलासा देत थोपटले.

"या जीवनमरणाच्या रोजच्या लढाईचा ताण झेलत, आमची विनोदबुद्धी आता विचित्र झालीय. तुला त्रास झाला. मी सगळ्यांतर्फे माफी मागतो." टकलू म्हणाला.

"यांना आम्ही त्यागमूर्ती म्हणून चिडवतो." सख्याने त्याची ओळख करून दिली. "आणि यांना सक्तीसक्त म्हणतो. लोकांवर कोणते नियम सक्तीने लादले पाहिजेत, त्यांचा उहापोह ते नेहमी करत असतात म्हणून." दाढीवाल्याचा निर्देश करत सखा म्हणता झाला.

"मला हे लोक उतावळी गनीम म्हणत असतात." खप्पड हसायचं थांबवून बोलती झाली. "मी नेहमीच हाणामारीसाठी तयार असते म्हणून. पण खरं सांग. आम्ही सगळे पट्टीचे सराईत अभिनेते आहोत की नाही?"

"हुं!" गंभीर होत त्यागमूर्ती उसासला. "या सोंगाढोंगाच्या बळावर प्रतिपक्षाला हुलकावण्या देत आम्ही अद्याप जिवंत राहिलोय."

बावळ्याच्या नजरेतले भय मोठ्या प्रमाणात कमी झालेले दिसले. पण त्याची सख्यावरची नाराजी कमी झाली नव्हती. ओठांशी धरलेला पेला त्याने दूर सारला. सखा ओशाळवाणे हसला.

"हे बघ बावळ्या, त्या गगनमहालात तुला जी माणसं दिसली, त्यांचा एक पक्ष आहे. सत्ता पैसा ताकदीची न संपणारी भूक असणारा. इतर माणसांच्या वाट्याचं हिरावून आपली भर करणारा.

इतरांच्या वाट्यातले दगड-माती हिरावल्याशिवाय, त्यांचा सोन्याचा गगनमहाल उंच होऊ शकत नाही. तो उंच उंच गेला तरी त्यांना सतत भीती भेडसावत असते. त्याच्यापेक्षा कोणी उंच केला तर? म्हणून ते सतत इतरांना लुटत, ठगत, मोडत, मारत त्यांच्यावर अन्याय करत राहतात. आपली मनमानी लादत राहतात." त्यागमूर्तीने निरूपण केले.

"आणि त्यांना तसं करण्यापासून रोखू पाहणारा आमचा एक पक्ष आहे. उठावखोरांचा. आमच्यातल्या या लढाईत तुला ओढल्याबद्दल मी तुझी माफी मागतो. गोष्टी अश्या इतक्या बिघडून जातील, याची मला आधी कल्पना नव्हती." सख्याने बावळ्याचा हात हातात घेतला. थोपटला.

"तुला आता जिथं जायचं असेल, तिथं जायला तू मोकळा आहेस." गनिमीण बावळ्याच्या हातातल्या बेड्या मोकळ्या करत म्हणाली.

"किंवा तुला वाटलं की तू आमची साथ देऊ शकतोस, तर तुझं आमच्यात स्वागत आहे." सक्तीसक्तने खुला प्रस्ताव दिला.

"म्हणजे त्या बाईला मारायचं?" बावळ्याने सुकलेल्या ओठांवर जीभ फिरवत विचारणा केली. पुन्हा तिथे हसण्याचा हल्लकल्लोळ झाला.

"या लोकांनी आजपर्यंत एखादी मुंगी सुद्धा मारलेली नाही." सखा खो खो हसत उत्तरला. "हाच तर फरक आहे त्या खलांमध्ये आणि आमच्यात."

"आम्ही त्यांना ठार मारत नाही. पण आम्हाला ठार मारायची पहिली संधी ते कधी कशीच सोडणार नाहीत." सक्तीसक्त ओठ आवळत बोलला.

"याचसाठी आम्हाला हा असा छुपा कारभार हाकावा लागतो. जिवंत राहिलो तर ना लढणार? ते लोकांवर अत्याचार करुन सुद्धा लोकांसमोर उघड वावरतात. पण त्यांना कसं रोखायचं? ते सांगायला आम्ही चौकात उघड उभे राहिलो, तर मेलोच." त्यागमूर्ती उसासला.

"त्यांना कसं रोखायचं?" बावळ्याच्या या भाबड्या प्रश्नाने सुक्या गवतावर जणू ठिणगी टाकायचं काम केले. त्या तिघांच्या आतला सामाजिक विचारवंत खडबडून जागा झाला आणि प्रवचनांचा पिट्टया पाडला गेला. बावळ्यासारख्या शाळा महाविद्यालयाकडे कधी न फिरकलेल्या माणसाची, 'नळी फुंकली सोनारे, इकडून तिकडून गेले वारे' अशी गत झाली. प्रदूषण, जागतिक तापमानवाढ, प्लास्टिकच्या विल्हेवाटीची समस्या, अणुस्फोटके, रासायनिक जैविक शस्त्रे, कामगारांचे शोषण,

गरिबांचे कुपोषण, जैवविविधतेचा ऱ्हास, सरकारी भ्रष्टाचार, राजकारणाचे गुन्हेगारीकरण अशा अनेक समस्यांचा आणि त्या दूर करण्यासाठी प्रस्तावित कल्पना सिद्धांतांचा पाऊस बावळ्यावर कोसळला. तो त्यात कोरडा राहिला हे अलाहिदा.

सख्याने ते बावळ्याच्या कोऱ्या चेहऱ्यावरुन ओळखले आणि तो खदाखदा हसू लागला. "मंडळी तो शिकलेला नाही. त्याला यातलं काहीही कळत नाही आहे. त्यानं नेमकं काय काम करायचं, तेवढंच जरा सोप्पेपणानं त्याला सांगाल का?"

"बावळ्या तू माझ्या स्वयंसेवकांच्या गोटात सामील होऊ शकतोस." सक्तीसक्त हातांवर हात चोळत म्हणता झाला. "जगातल्या या सगळ्या अनर्थाचं मूळ आहे पैसा. तो पैसा समूळ नष्ट केला की आपोआप सगळं शोषण थांबेल." बावळ्याच्या चेहऱ्यावरचे मोठे प्रश्नचिन्ह वाचून, त्याला बोलायची संधी न देता, आधीच सक्तीसक्तने घोडे पुढे दामटले. "म्हणजे चलनी नोटा आणि नाणी नष्ट करायची. सगळा व्यापार थेट वस्तूच्या बदल्यात वस्तू असाच केवळ करायचा. मग नफेखोरी, दलाली आणि व्याजाच्या रुपात माणसांना एकामेकांचा गैरफायदा घेताच येणार नाही. पैसा पैसा असं काही साठवून ठेवायला नसेल, तर लोकं साठा करणार तरी कशाचा?"

"मग मी चोरी कशाची करनार?" बावळ्यासाठी अर्थात त्याच्या उपजिविकेचा प्रश्न जास्त गहन होणारा होता.

"तेच तर मी म्हणतो आहे. चोरी, लुटमार, डाके सगळी गुन्हेगारी बंद पडेल. सगळीकडे सुराज्य निर्माण होईल." सक्तीसक्त स्वतःच्या हुषारीवर खूष झाला.

"सोनं. मला सोनं चोरता येईल की." बावळ्या सुद्धा आपण शोधलेल्या तोडीवर खुशालला.

"अं हं. सोनं सुद्धा चलनच आहे. ते देवाण-घेवाणीसाठी वापरायला लोकांना मनाई ठेवायची." सक्तीसक्तने रागाने मान नकारार्थी हलवली.

"लोकांना मनाई करनार कोन?" बावळ्याला आश्चर्य झाले.

"सरकार." सक्तीसक्तने उत्तर दिले.

"कोनाचं? तुमी तर म्हनता सरकार तुमच्या इरोधात हाय की."

"आमचं सरकार असेल ते."

"म्हनजे तुमाला पंतप्रधान बनायचं हाय राव." सगळं काही कळल्याचा भाव बावळ्याच्या चेहऱ्यावर झळकला.

"गप्प बैस मुर्खा. असं मी कधी म्हटलं? लोकांवर राज्य करायला कोणत्या प्रकारची आदर्श राज्यव्यवस्था असावी, ते आपण नक्की करायचं. एवढंच आपलं काम आहे. कार्ल मार्क्स त्यात अपयशी ठरला. त्याच्यापेक्षा जास्त चांगली समाजव्यवस्था नियमपद्धती आपल्याला शोधून काढायची आहे. मग लोक ती आपोआप लागू करतील." सक्तीसक्तने बावळ्याचे दोन्ही खांदे जोशात गच्च आवळले.

"मी तर अडानी मानूस हाय. मी काय शोधनार?"

"ते शोधायचं काम माझ्यावर सोड. मी शोधून काढलेले विचार लोकांपर्यंत पोहोचवायचं काम तुझं. छापलेली पत्रकं तू लोकांमध्ये फिरुन वाटायची. बोल जमेल?"

"जमलसं वाटतं. पन लोकं वाचतील याचा जिम्मा माझा नाय. हां! आधीच सांगलेलं बरं की. मागे बंगाली जादूबाबाची पत्रकं वाटायचं काम मी केलं हाय. चार दिस झालं तरी एक बी गिऱ्हाईक बाबाकडे आलं नाय. लागला की बाबा माझ्यावर खार खायला. म्हनायला लागला तू कागद समदे गटारात घातले. वाटले नाय. शपथेन सांगतो, मी इमानदारीत वाटले होते. आता बाबाच्या कागदात गटारात घालायच्या लायकीचा मजकूर होता. लोकांनी गटारात फेकले. यात माझी काय चूक हाय?"

"माझी पत्रकं गटारात घालण्याच्या लायकीची नसतात. काळजी करू नकोस." सत्तीसत्तने अभिमानाने छातीवर हात ठोकले.

"काय लिवलेलं असतं त्यात?"

"पैसा जाळा."

"मग लोक तुमची कागदं आधी जाळतील की? लोकांना काय बाय पटलसं सांगा जी."

"सखा, तुला यात एवढं दात काढायला काय झालं?" सत्तीसत्त धुमसला. गनिमीण आणि त्यागमूर्ती एकमेकांशी सूचक नजरांचा खेळ करत हसू दाबून राहिले. "बावळ्या तेच आपलं काम आहे. लोकांना पटवून द्यायचं. त्यांच्यासाठी खरं फायद्याचं काय आहे ते."

"लय भारी काम हाय." बावळ्या आवंढे गिळत म्हणाला. "मला जमलसं अजाबात काय दिसत नाय. मी जातो जी. जाऊ?"

"हुषार आहेस बावळ्या. तू नेमकं ओळखलं हां!" गनिमीण सरसावली. "इतकी हयाती मागून हयात गेली या विचारवंतांची. पण आजपर्यंत लोकांना खरं काय बरं, ते समजावू शकले नाहीत कधी. मी काय म्हणते, या अक्कलेच्या गोष्टी तुम्ही अक्कल असलेल्याला ना शिकवू शकता? कितीशा लोकांना मुळात खरी

अक्कल असते? म्हणून आपण गनिमी कावा करुन समस्येचं मूळच नाहीसं करायचं. तू माझ्या हिरव्या गनीम टोळीत सामील हो."

"म्हणजे काय करायचं?" बावळ्याने भीतभीत विचारले.

"शत्रूला शत्रूच्याच शस्त्राने ठेचला पाहिजे. काट्यानेच काटा काढला जाऊ शकतो. ही तोंडाची वाफ दवडून जिंकायची लढाई नाहीय. त्यासाठी धडाकेबाज कृतीची खरी गरज आहे." गनिमीणीने हाताची गच्च मूठ आवळून ठोसा हवेत मारला. तो बावळ्याला चुकवावा लागला. "कारखाने प्रदूषण माजवतात? ते उडवायचे. आम्ही चाळीस बेचिराख केलेत. विजेच्या जुळण्यांमध्ये जोडण्यांची गडबड करुन." तिने स्वतःची पाठ थोपटून घेतली. "अणुस्फोटकांची दहशत आहे? तर ती गुप्तपणे निकामी करून टाकायची. लोक प्लास्टिक वापरतात? बनवणाऱ्यांच्या आणि वापरणाऱ्यांच्या घरांना आगी लावायच्या. खुनी यंत्रांना त्यातलंच एक यंत्र ताब्यात घेऊन त्यानं संपवायचं. सगळं गुपचुप. पकडले न जाता. बोल. दुसऱ्यांना काय काय करा, ते शिकवत बसण्यापेक्षा, आपण आपलं काय ते करुन पार होणं, सोप्पं आहे की नाही?"

"खुनी यंत्र ताब्यात घ्यायचं?" बावळ्याच्या ओठांचा चंबू झाला. त्याच्या डोळ्यातली लकाकी सांगत होती की ही कल्पना त्याला फार आवडली आहे. "कस्सं?"

"अं अं?" गनिमीण चाचपडू लागली. बावळ्याने नेमकं योजनेतल्या सगळ्यात कच्च्या दुव्यावर बोट ठेवलेलं. "मला वाटतं आपल्याला त्याच्यासाठी त्यातल्या कुशल यंत्रतज्ञाची गरज आहे." तिचे डोळे सख्यावर खिळले.

त्याने आपल्याला त्यातलं काही कळत नाही खुणावले. "मी एक हौशी अभियंता आहे. यंत्रमानवांचं तंत्रज्ञान मला तितकं कळत नाही. आमच्या पाठलागावरचं यंत्र कोसळलं, तेव्हा ते नमुना म्हणून तपासायला ताब्यात घ्यायला पाहिजे होतं. पण आम्ही शरीराने आणि मनाने एवढे थकलेले होतो, की त्यावेळी तसं सुचलं नाही."

"त्यासाठी कोणी तुला दोष देणार नाही." त्यागमूर्तीने सख्याच्या पाठीवर हात ठेऊन त्याला धीर दिला. "तुमची ती लढाईच होती. लढाईत विचारांचा ताळमेळ सुटतोच."

"लढाई? ही लढाई आपल्याला टाळू म्हणून टाळता येणारी नाहीय. माणसांनी रोगराईने होणाऱ्या मृत्यूवर मात केलीय. परिणामी माणसांच्या मृत्यूदराचं आणि जन्मदराचं नैसर्गिक संतुलन बिघडलंय. माणसांची ही लोकसंख्यावाढ सृष्टीत कर्करोगाच्या अनियंत्रित पेशींसारखी फैलावलीय. सगळ्या समस्यांचं मूळ कारण हेच आहे. लोकसंख्येला आळा घालायचा, तर ती कमी करायचा मार्ग आता माणसांनी युद्धे करुन एकमेकांना संपवणं हाच आहे.

जगभरात युद्धे सुरू देखील झाली आहेत. डोळयांसमोर आपला सर्वनाश स्पष्ट दिसत असताना, काही न करता निव्वळ बसून राहण्यापेक्षा काही तरी केलंच पाहिजे. काहीही म्हणजे काहीही. मग आपणच यंत्रतज्ञ बनायला हवं. शत्रूकडूनच तंत्र शिकून घ्यायला हवं." गनिमीण तोफेसारखी धडाडली.

"गुरुची विद्या गुरुला?" सक्तीसक्तने एका वाक्यात सार काढलं. "मग कधी जाता त्या अवपिपासेकडं शिकवणीच्या वर्गाला?"

"ती कुमारीजी बया मला बघताच आधी माझा गला की वं घोटल?" बावळ्या विचाराने बिथरला. "नको जी नको. मी जातो. मला जाऊ द्या की."

"बावळ्या धीर धर. आपल्या सगळ्यांना कोणालाही सहज जमेल असा अगदी सोप्पा मार्ग आहे माझा. तो ऐक." त्यागमूर्तीने त्याच्या पाठीवर थोपटले. "जगाला बदलायचं आहे, तर त्याची पहिली सुरुवात आपल्यापासून केली पाहिजे." बावळ्याला दिसले की यावर बाकी सगळ्यांची तोंडे वेंगाडली गेलीत. नजरा वर ढगांत गेल्यासारख्या फिरल्या आहेत. "जगाला एखादी गोष्ट करा सांगण्याआधी, आपण ती करुन दाखवली पाहिजे. काय बरोबर की नाही? मी म्हणतो ते?"

बावळ्याने होकारार्थी मुंडी हलवली. "आजपासून तू प्रतिज्ञा कर. तू प्लास्टिक वापरणार नाहीस. रासायनिक खतं आणि किडनाशकं फवारलेलं अन्न खाणार नाहीस. प्रदूषण माजवणाऱ्या कारखान्यांमध्ये बनलेल्या वस्तूंचा बहिष्कार करशील. हवेत विषारी धूर सोडणाऱ्या गाडीवाहनांमध्ये बसणार नाहीस. तू शीतपेयं पिणार नाहीस. आणि…."

" हे नको. ते नको. नको नको सोडा जी. मी खायचं नी पियाचं तरी काय आनी कुठून? ते सांगा जी." बावळ्याने आक्रोश केला.

"हुं! इथं महानगरीत तुला असं जगणं अशक्य आहे. तुला त्यासाठी गावात जाऊन राहावं लागेल." त्यागमूर्तींनी कबुली दिली. "मी आणि माझा परिवार जंगलाच्या सीमेवर राहतो."

"मंग तुमी इथं कसे आला जी तुमच्या जंगली गावापासून? इतकं लांब पायी चालत?" बावळ्याला प्रश्न पडला.

"शहरात यायचं तर नाईलाजाने शहरी रित पाळावी लागते. पण तुला सांगतो," त्यागमूर्तींचा आवाज चढला. "एक ना एक दिवस लोकांना वळावंच लागेल अशा जगण्याकडं. तो दिवस लांब नाही. माणूस  निसर्गापासून लांब गेला आहे. हेच आजच्या काळातल्या सगळ्या समस्यांचं मूळ कारण आहे. आपण निसर्गाकडे परत जायचं."

"मी तुमच्या जंगल गावात आलो तर काय काम करनार तिथं?" बावळ्या विचार करत होता.

"शेती. तू आमच्या कार्यकर्त्यांच्या मेळ्यात सामील हो."

बावळ्याचे डोळे यावर अंधूक धुकधुकले. "नाय जी. चोरी पलीकडं मला काय बी येत नाय. गावात तिकडं तशी लई लोकं आधीच शेतीत जीव देतात नी मरतात हाय. इथं शहरात कुनाला बी तेचा काय फरक पडत नाय. मला इकडं जगतोय, तो तरी जगू द्या की. मला जाऊ द्या."

गनिमीणीने उठून दार उघडून धरले. "तुझ्या निर्णयाचा आम्ही आदर करतो. तुला तुझा मार्ग प्रशस्त आहे."

बावळ्या सगळ्यांना हात जोडत माफी मागत तिथून बाहेर पडला.

# १०० वर्षे पुढे - प्रकरण ४

बावळ्या लोहरुळांवर आपल्या नादात विचार करत बसला होता. मुंबापुरीच्या साखळडबा गाड्यांची वाहतूक ज्या लोहरुळांवरुन चालू होती, त्यांचा विश्रामासाठी उपयोग करणे शहाणपणाचे नव्हते. पण बावळ्या त्या रुळांच्या शेजारी असलेल्या झोपडपट्ट्यांचा रहिवासी होता. तिथले सारे रहिवासी विरंगुळा हवा झाला की इथेच येऊन बसत. त्याशिवाय त्या दाट झोपड्यांच्या गर्दीत दुसरी मोकळी जागा नव्हती.

त्याच्या समोर रुळांमधल्या मोकळ्या जागेत पोरांचा चेंडूफळीचा खेळ रंगला होता. त्यांचा कल्ला चालू होता. सोबतीला धडधडत जाणाऱ्या गाड्यांचा आवाज होता. झोपडपट्टीत कोणाकडे बारसे असावे. तिथे लावलेल्या गाण्यांचा आवाज कर्णा मोठ्याने कोकलत होता. आवाजांचा गदारोळ माजून होता. त्याची सवय झाली असल्याने झोप न येण्यासाठी ते कारण नव्हते. खरेतर कालच्या आख्ख्या रात्रीच्या जागरणामुळे जमिनावर आडवे झाल्या झाल्या, त्याला लगोलग झोप लागायला हवी होती. नेहमीसारखी. पण....

बावळ्याच्या आयुष्यात एका रात्रीत काही मोठी उलथापालथ झाली होती. शेती? त्याला कोणीतरी गावात परतण्याचा प्रस्ताव दिला होता. आणि आयुष्याच्या या अचानक आलेल्या वळणावर तो ठेचकाळला होता. काय निर्णय घ्यावा? तो भांबावून गेला होता. त्याच्या नजरेसमोरुन त्याचा जीवनपट सरकत होता.

लहानपणातल्या आंबटगोड आठवणींचा पट उलगडत होता. आपल्या आईबाबांबरोबर लहानगा बावळ्या आणि त्याची बहीण शेतावर काम करत होते. त्यांचं काम म्हणजे नुस्ता खेळ असायचा. बाबा काम वाढवून ठेवले म्हणून चिडायचे. आई मात्र यातूनच ते शिकतील म्हणून त्यांची बाजू घ्यायची. मायेच्या सावलीतले ते फार सुखद दिवस होते. बावळ्या बारा वर्षांचा झाला तेव्हा त्यांच्या या सुखाला दृष्ट लागली. नव्याने बांधल्या जाणाऱ्या धरणक्षेत्रात त्यांचे गाव आणि शेत येत होते. म्हणून त्यांना हाकलून लावण्यात आले. शहरातल्या लोकांना पाणी आणि त्यावर बनणारी वीज हवी होती. त्यासाठी पिढ्यानपिढ्या नांदलेले काही शेतकरी, त्यांचे संसार आणि गाव उध्वस्त झाले, तर तेवढी किंमत मोजायला कोणाला वावगे वाटत नव्हते. कारण ती किंमत ती माणसे स्वतः मोजणार नव्हती. लाखोंच्या फायद्या आणि विकासासाठी काही शेकडोंची वाताहात क्षम्यच होती.

विस्थापितांना आपल्या फायद्याच्या जमिनी कोण देणार? बदली जमीन म्हणून पडीक जमीन मिळाली होती. सतत तीन वर्षे लागोपाठ पावसाने पाठ फिरवल्याने, घरात होते नव्हते ते सारे किडुकमिडूक संपले. नवीन पेरण्या करायला काहीच नव्हते. कर्ज काढण्याशिवाय पर्याय नव्हता. कर्ज काढले. हवामानाच्या लहरी तडाख्यातून पीक जेमतेम आले. पण भाव इतके कोसळले की त्यातून खर्ची घातलेली रक्कम सुद्धा मिळाली नाही. झालेले कर्ज फिटले नाहीच. होते ते फिटवण्यासाठी पुन्हा शेती करायला लागणार होती. त्यासाठी नव्याने कर्ज घ्यावे लागले. कर्जाच्या दुष्टचक्रात पुरते फसले. तीन वर्षे उलटली. ती शेती कधी फळली नाही. गहाणवटीत जमीन गेली. खचलेल्या बाबांनी आत्महत्या केली.

कालचे शेतमालक शेतमजूर झाले. शेतात राबण्यापलीकडे त्यांना दुसरे काही माहीत नव्हते. येत नव्हते. मात्र बड्या जमीनदारांचे धोरण गरजू मजूरांना कमीत कमी पैशात राबवून घेण्याचे होते. ती एक प्रकारची गुलामी होती. त्यात पोटभर अन्न सुद्धा मिळत नव्हते. त्या कुपोषणाने बावळ्याची अशक्त झालेली बहीण तापाचे निमित्त होऊन मेली. बावळ्या अठरा वर्षांचा गडी झालेला होता. जेव्हा बावळ्याला सुद्धा ताप चढला, जगतो की मरतो? प्रश्न बनला, तेव्हा आईने त्याला घेऊन तिथून पळ काढला.

ते शहरात मुंबईत आले. सगळ्या निर्वासितांचा तोच शेवटचा आधार होता. तिथे झोपडपट्टीचा नरक त्यांची वाट पाहत होता. जगण्यासाठी माणसांना किती बेशरम निर्दय व्हावे लागते, त्याचे अनेक धडे तिथे त्यांना गिरवावे लागले. पावला-पावलाला बावळ्याला बाबांसारखी आत्महत्या करावी आणि मोकळे व्हावे असे वाटायचे. पण आईची आशा दुर्दम्य होती. एक ना एक दिवस नक्की यात बदल होईल. कधी धीर सोडू नकोस. ती कायम त्याची समजूत घालत राहायची. दर रात्री बावळ्याला झोपी जाताना ती म्हणायची, उद्याचा दिवस त्यांच्यासाठी चमत्कार आणणार आहे. पण तो बदल कसा आणायचा? याचे त्या अडाणी माऊलीला ज्ञान नव्हते. ना ते कधी तिच्यापर्यंत पोहोचू शकले.

तिच्याबरोबर बावळ्या ज्या कारखान्यामध्ये काम मिळाले तिथे पिचू लागला. तो रसायनांचा बेकायदेशीर कारखाना होता. कामगारांच्या सुरक्षेचा वा सोयींचा कसलाच विचार तिथे नव्हता. त्यामुळे इतर कामाच्या जागी नोकरी मिळवायला, जशी रेटारेटी असायची तशी इथे नव्हती. तो मृत्यूचा सापळा होता. तिथे कामासाठी वरच्यावर जागा रिकाम्या व्हायच्या. वर्षभरातच तिथल्या विषारी वाफांनी आईचा बळी घेतला. एक जागा पुन्हा रिकामी झाली. बावळ्याच्या तरुण शरीरात थोडी जास्त धुगधुगी होती. ती संपण्याआधी त्या कारखान्यात अपघाती स्फोट झाला.

कारखाना नष्ट झाला. तसाही आईच्या मागे बावळ्या सैरभैर होता. तो मोकळा झाला.

कशासाठी जगायचे? याला उत्तर नव्हते. अशावेळी त्याच्या आयुष्यात नवीन वळण आले. बावळ्याला जीवाची पर्वा उरलेली नव्हती. चार गुंडांच्या घेऱ्यातून एका तरुणीला त्याने दयाबुद्धीने वाचवले. ती एक सराईत सोनसाखळी चोर होती. आईने या वाटेवर जाण्यापासून त्याला कायम रोखले होते. आता रोखायला ती नव्हती. बावळ्या या नव्या वाटेवर चालू लागला.

यथावकाश सरकारदार शिपायांकडून पकडला गेला. तुरुंगात धाडला गेला. ती तर गुन्हेगारांची सर्वात उत्तम शिक्षण देणारी शाळा होती. बावळ्या फार हुषार विद्यार्थी ठरला होता. अवघ्या महिनाभरात तो नवीन कसब सहजी आत्मसात करत असे. उफ! माणसांच्या पाचवीला पुजलेल्या या अनवधानी चुका. ज्या करण्यात बावळ्याचा हात कोणी धरू शकलाच नसता. त्याचे मूळ नाव काही वेगळे होते. पण गुन्हेगारांच्या दुनियेत त्याचे नामकरण बावळ्या झाले. दर वर्षाआड महिना-दोन महिने बावळ्याचा मुक्काम तुरूंगात पडे. दरवेळी नवा गुरु. नवीन चौर्यकला क्षेत्र. आणि अर्थात नव्या खुळचट चुका.

आज चोविसाव्या वर्षी बावळ्याची वर्णी अट्टल तिजोरीफोड्यांमध्ये लागत होती. याचसाठी सख्याने त्याची निवड सर्वात अवघड तिजोरी फोडण्याकामी केली होती. त्यासाठी ते काल त्या गगनमहाली गेले होते. पण नियतीचे फासे काही वेगळे पडले होते. बावळ्याला जाणवले होते की सखा त्याच्या नेहमीच्या गुन्हेगार साथीदारांच्या मांदियाळीत कुठेच बसत नव्हता. तो काही वेगळा होता. आई नेहमी आशेने म्हणायची, तो बदल खरेच बावळ्याच्या नशिबात येऊ घातला होता का? त्याचा उद्या काही वेगळाच होता?

त्याचा बसल्या जागेवर रुळांखालचे खडे एक एक पलीकडे फेकायचा चाळा नकळत चालू होता. त्यातला एक चुकारसा दगड बंटीवर जाऊन बसला. बंटी चेंडूचा झेला घेतच होता की तो सुटला. या दुहेरी नुकसानाने चिडून बंटीने बावळ्याला शिव्यांची लाखोली वाहिली. तो काय बोलतोय? ते कळत नसल्यासारखा कोऱ्या चेहऱ्याने बावळ्या बंटीकडे बघत राहिला. बावळ्याकडून काही प्रत्युत्तर न आल्याने सगळ्यांना जरा आश्चर्य झाले. बंटीला टरकला?

बंटीचे वय छोट्याचे मोठ्यात रुपांतरण होण्याचे होते. त्याच्या वयाच्या इतर बारक्यांवर थोराड शरीराचा पूरेपूर फायदा घेत धाक

जमवून, त्यातला एक टप्पा त्याने आधीच ओलांडला होता. आता त्याला सामाजिक स्तरावर वरची पायरी चढायची घाई झालेली होती. एखाद्या मोठ्याशी भिडून आपली वट वाढवायची घाई. बावळ्या अंगाने किरकोळ होता. त्याच्या नावावर हल्ली मोठा राडा वा मारामारी नोंदली गेली नव्हती. तुलनेत सोप्पे सावज? बावळ्याची आई-बहीण काढत ललकारत तो बावळ्यावर चालून आला.

काय घडतेय? ते बावळ्याला दिसत होते. पण मेंदूत शिरत नव्हते. मेंदू दुसऱ्या गोष्टींमध्ये व्यस्त होता. मात्र बंटीने खाली बसलेल्या बावळ्यावर मारुन दिलेली लाथ जागेवर पोहोचली नाही. बावळ्याच्या शरीराने प्रतिक्षिप्त क्रिया देत, जिच्या योगाने बावळ्या आजपर्यंत रस्त्यावरच्या जगण्यात टिकाव धरुन जिवंत राहिलेला होता, तिच्या योगे बंटीचा पाय मधल्यामध्ये हातांनी घोट्यावर पक्कड घालत धरला आणि त्याच्या पुढे जाणाऱ्या जोराला हलकेच दिशा बदलून बाजूला रेटला. पाय नुस्ता हवेत फिरल्यामुळे बंटीचा तोल गेला. तो धडामकन ढुंगणावर खाली आपटला.

बंटी जेव्हा बावळ्यावर धावला होता, तेव्हा लागलीच ज्या पोरांकडे चलचित्रण करणारे भ्रमणध्वनी होते, त्यांचे हात

शिवशिवले होते. कळींवर-खटक्यांवर अचूक पडले होते. चित्रण सुरु झाले होते. झोपडपट्टीत मारामारी ही मोठी चवीने मजा घ्यायची बाब होती. आणि माणसांना आपली आवड इतरांबरोबर वाटून दुणावल्याखेरीज चैन चैन ती पडत नाही. झोपडपट्टीतली पोरे वयाने लहान असली तरी कमावती होती. एकवेळ अन्न मिळाले नाही तरी ती जगू शकली असती. पण ज्याच्या हातात भ्रमणध्वनी नाही, त्याला बाहेर लोकांसमोर दाखवायला तोंड उरत नव्हते. बड्या बापांच्या आयतोबा पोरांप्रमाणेच.

बंटीने हल्ली त्यांच्यावर दादागिरी सुरू केल्याने त्यांचा त्याच्यावर राग होता. बंटीची फजिती त्यांनी आवडीने चित्रित केली. पण हाय दैवदुर्विलास! मधल्या रुळांवरुन धावायला फाजिल साखळडबा गाडीला नेमकी तीच वेळ मिळावी? आशेचा एकच किरण बाकी होता. बावळ्यापलीकडे उभा असलेला सीमेवरचा क्षेत्ररक्षक पप्पी. त्याला सगळ्यात जवळून सगळ्यात चांगले चित्रण मिळालेले होते. त्याला मोठी मागणी आली. पप्पीने सगळ्यांना एकदम उपलब्ध करण्यासाठी ते चित्रण संगणकिय माहितीजालावर टाकले.

बंटीच्या मदतीला कोणी गेले नाही. त्याला जोरदार मुका मार बसला असावा. तो आपणहून उठला नाही. शरीराच्या

झटक्याबरोबर बावळ्या वर्तमानात परतला होता. तो बंटीला मदत करायला उठला. बावळ्याने आपल्याला मारायलाच हात पुढे केलायसे वाटून बंटी मागे व्हायला धडपडला. "ऐ, खबरदार माझ्या भावाला हात लावला तर."

आलेला आवाज बावळ्याच्या परिचयाचा होता. हात तसाच पुढे धरुन त्याने उत्तर दिले. "घंटी, त्याला मी मदत देतो हाय."

"तुझ्या आयची! काय घाबरला काय? नायतर मी तुझ्या तंगड्या तोडीन म्हून?" बंटीच्या भावाने आपल्या रूंद बलदंड बाजूंवर थाप मारली.

"मी कोनाला भीत नाय." बावळ्याने ताठ आवाज लावला.

"बारक्या पोरावर जोर दाखवतो काय? हिंमत हाय, तर मला हात लावून दाखव की?" बोलणाऱ्या घंटीचा शरीराकार तसा विचार करणाऱ्याला दहा वेळा फेरविचार करायला लावणारा होता. घंटी बावळ्याच्या पुढ्यात दोन हातावर उभा ठाकला. खेळणाऱ्या पोरांचे डोळे आता मिळू पाहणाऱ्या फुकटच्या तमाशासाठी लखलखू लागले.

"ऐ घंटी. जादा वाजू नको. तुझा लोलक काढून हातात देईन." बावळ्याचा हा बडबोल जर चित्रपटांमधून आला असता, तर शिट्यांची सलामी घेण्यालायकीचा होता. पोरांचे टाळ्या मारायला

सरसावलेले हात, घंटीच्या आकाराच्या दहशतीखाली न वाजता थांबले.

"लय बोलतो रे? हागायला लावला तर बोच्यात गू तरी हाय काय?" घंटीच्या या बडबोलावर लगेच चहूकडून प्रोत्साहनपर आरोळ्यांचा पिट्टा पडला.

"चड्डी तर तुझी पिवळी होनार हाय आज. काय घराकडं धुवायला पानी भरून आला हायस ना? दोन वर्सामागचं इसरला नाय ना?" बावळ्याचा प्रतिसवाल पोरांना तितकासा खणखणीत वाटला नाही. चुकार कुठे शिट्टी वाजली.

बावळ्या आणि घंटीमध्ये त्यानंतर खूप बडबोलबाजी रंगली. त्यात एकमेकांच्या नातलगांशी एकमेकांचे शारिरीक संबंध जोडण्याची चढाओढ प्रामुख्याने होती. त्यात काही वेळा त्याकामी घोडा बैल गाढव आदी करुन प्राण्यांचा सहभाग सुद्धा उद्धृत झाला. एकमेकांच्या शारिरीक उत्सर्जन विधींचे आणि अवयवांचे अनेकदा उल्लेख करण्यात आले. एकमेकांच्या अवयवांसाठी उपमा अलंकाराचे सढळ हस्ते उपयोजन करण्यात आले. त्यातून बिभत्स रस जागवण्याची शर्थ शर्थ झाली.

गंमत म्हणजे त्या दोघांपेक्षा बघ्यांना जास्त रणमद चढल्यासारखे दिसू लागले. दोघांच्या बाजूने आरडाओरडा

करणाऱ्या आघाडीवीरांमध्येच जुंपतेय काय? असा रागरंग दिसू लागला. मात्र ज्याप्रमाणे बावळ्या आणि घंटीमध्ये कोणीच प्रत्यक्ष अंगाशी भिडत नव्हता. त्याचप्रमाणे त्यांचे प्रोत्साहनकर्ते सुद्धा एकमेकांपासून सुरक्षित दोन गज दूरीचे अंतर राखून कलाप करत होते. सरतेशेवटी बंटी झीट येऊन उभा राहिला. अंगातले सगळे बळ ऐकवटून सगळ्या गदारोळाच्या वर टिपेला आवाज लावत कावला, "तुमच्या दोगांच्या बी बोच्यात गू नाय. अर्धा कलाक निस्ता आवाजच चालला हाय. थू! तुमा दोगांवर." लंगडत घराच्या दिशेने चालू पडला.

थोडा काळ या भरतवाक्यामुळे चालू नाट्य थिजल्यासारखे झाले. मग पोरांना नवा खेळ मिळाला. 'बोच्यात गू नाय. बावळ्याच्या नाय. घंटीच्या नाय.' असे गीत ती हर्षभरीत अंतकरणाने आळवू लागली. लवकरच त्यात वस्तीतल्या इतर माणसांची नावे सुद्धा जोडली गेली. बावळ्या त्या आरडाओरड्यात सामील झाला. घंटीला तेवढी खिलाडूवृत्ती दाखवता आली नाही. तो चरफडून निघून गेला. पोरांना जास्त चेव चढला. आणि मग कधी बावळ्याच्या लक्षात त्यात मिसळलेला हळूहळू मोठा होत चाललेला आवाज आला. तो अंतर्बाह्य शहारला. खुनी यंत्र? इथपर्यंत?

त्याची भीती खरी ठरली. आवाजाच्या दिशेने वळून बघता त्याला ते स्पष्ट होताना दिसले. त्याच्या अपेक्षेबाहेर वेगाने जवळ पोहोचले. त्याने भिरभिर नजर चोहोकडे टाकली. ते त्याच्यासाठीच आले होते नक्की. कुमारीजी सूडाने पेटलेली होती. तिने ते त्याच्या मागावर पाठवले होते. कुठे पळ काढावा? ठरत नव्हते. त्यात मोलाचे क्षण वाया गेले. यंत्राकडे पोरे कौतुकाने पाहत होती. ते डोक्यावर पाच सहा पुरुष उंचीवर घिरघिरू लागले. "पळा." बावळ्या किंचाळला. त्याने लोळण घेतली.

त्याच्या अंगात पूर्वी अनुभवलेली ती जळजळीत वेदना कल्लोळू लागली. त्याच्या अंगावरचा केस अन केस उभा राहिला. पूर्वी त्याला त्या माऱ्यात अजिबात हालचाल शक्य झाली नव्हती. कसे कोण जाणे, आता मात्र त्याला कष्टाने का होईना, हलता येत होते. तो रुळांमध्ये पडला होता. रुळांच्या बाहेर जायचा प्रयत्न करता जळजळ वाढली. तो रुळांच्या मधोमध सरकू लागला. यंत्र मागावर सरकू लागले.

अचानक बाजूच्या रुळांवरून गाडी धडाधड जाऊ लागली. इतर कोणत्या गोष्टीचा विचार करायला त्याला फुरसद नव्हती. मात्र गाडीमुळे जणू यंत्राची मारकशक्ती उणावली. बावळ्याला वेगाने माऱ्याच्या परिघाबाहेर धावता आले. रुळांमधून धावत राहा. त्याने

स्वतःला समजावले. यंत्राचा ऊर्जासंचय संपेपर्यंत. तसे शक्य होते का? त्याला प्रयत्न करणे प्राप्त होते.

सावळया धावत होता. समोरून त्याच रुळावरुन येत असणाऱ्या गाडीची चाहुल त्याला मिळाली. त्याला या रुळांच्या बाहेर पडायला लागणार होते. त्याने मागे वळून अंदाज घेतला. असे व्हायला नको की बाजूच्या रुळांवर जाताच, मागच्या बाजूने येणाऱ्या गाडीने त्याला उडवावं. दुर्दैवाने बाजूच्या दोन्ही रुळांवरुन गाड्या येत होत्या. तो थकलाही फार होता. समोरची गाडी फार पुढे आलेली होती. मागे यंत्र फार जवळ आले होते. बावळया जमिनीवर रुळांमध्ये आडवा झाला. त्याचा सडपातळ देह जितका जमिनी सपाट करता येईल त्याने केला. अंगात जळजळ सुरू झाली . तो यंत्राच्या माऱ्यात आलेला होता.

तोच गाडीचे साखळडबे त्याच्यावरून जाऊ लागले. त्याने निपचित शरीरात जितका श्वास भरता येईल भरून घेतला. जळजळ बंद झाली होती. गाडी वरून पूर्णपणे सरकली. तो पुन्हा पळ काढण्यासाठी सज्ज झाला. यंत्राला हा खेळ लगेच संपवायचा असावा. ते बावळयावर खाली खाली आले. ते रुळांवरच्या टांगत्या वीजवाहक तारांना टेकले नाही. तरीही यंत्रात आणि त्या तारांमध्ये ठिणग्या उडाल्या. वीजप्रवाहाच्या तडतडबाज्या यंत्राकडे उड्या

मारत जाऊ लागल्या. त्यांच्यात जवळीकीमुळे घातजुळणी जमली होती. यंत्र स्वतःच उच्चदाबाच्या विजेच्या माऱ्यात फसले. त्याचा स्फोट झाला.

बावळ्याचे प्रतिक्षिप्त क्रियेने डोळे गच्च मिटले गेले. ते उघडले तेव्हा चमत्कार घडला होता. यंत्राचे जळके तुकडे त्याच्या आसपास विखरुन पडले होते. योगायोगाने त्यातला एकही त्याच्यावर पडला नव्हता. काळ आला होता. पण वेळ आली नव्हती. याचे प्रत्यंतर त्याला आले. खोल श्वासात जळीताचा वास भरत तो उठला. मागे लांब नजर टाकली. जिथून त्याचा पाठलाग सुरु झाला होता तिथे. त्याच्या काळजाला चरका बसला. ती पोरं त्याच्याएवढी नशीबवान ठरली नव्हती. त्यांचे आडवे निश्चल पडलेले देह बावळ्याला दिसले. त्याच्यावर एकदम खूप दडपण आले. पोरांचे नाहक बळी गेले होते. यंत्र त्याच्यासाठी आले होते. त्याच्यामुळे त्यांचे बळी गेले होते.

तो खचून कोसळला. त्याच्या बुडाला गरमागरम चटका बसल्यामुळे जागच्या जागी उडाला. यंत्राचा तुकडा होता तो. त्या चटक्याने बावळ्याला भानावर आणले. एक यंत्र संपले म्हणून त्याचा शिकारी पाठलाग संपणार नव्हता. एव्हाना यंत्र नष्ट झाल्याची जाणीव त्या अवपिपासेला झालेली असणार. तिने पुन्हा त्याच्या

मागावर अनेक यंत्रे सोडलेली असणार. ती गप्प बसणार नव्हती. तो सुद्धा गप्प बसणार नव्हता. अंगातला डगला उतरवून त्याने यंत्राच्या तुकड्यातले वेचता येतील तितके तुकडे त्यात घातले. त्याचे गठले बांधून खांद्यावर टाकले. घाईघाईने निघाला. तिथून जितक्या लवकर जितके दूर जाता येईल तिकडे.

## १०० वर्षे पुढे - प्रकरण ५

एका मोठ्या चारचाकी गाड्यांच्या दुरूस्तीखान्यासमोर बावळ्या उभा होता. रात्र चढत होती. शहर दिव्यांनी टिमटिमत होते. वर्दळ जोरात चालू होती. उघड्या अंगाने गार झोंबणाऱ्या खाऱ्या खाडीच्या वाऱ्यावर तो किंचित कुडकुडला होता. त्याला भणंग समजून हाकलले जाण्याची शक्यता होती. त्याने तिथे सख्याची चौकशी केल्यावर ती शक्यता खरी झाली. तिथल्या मुजोर कर्मचाऱ्यांनी त्याला वाटेला लावला.

एका अट्टल घरफोड्याला मग चोखाळायला तिथे अनेक मार्ग होते. अनेक दरवाजे होते. अनेक खिडक्या होत्या. त्यांच्या मजबुत खिट्ट्या आणि अडसर त्याला अडवायला असमर्थ होते. त्या दुरूस्तीखान्याच्या मागच्या बाजूला भंगारखाना होता. तिथे टाकाऊ मालाची मोठी जंत्री पडलेली होती. त्याला पत्र्याचे कामचलाऊ कुंपण होते. बावळ्या लिलया त्यावरुन पार होत आत शिरला.

तिथे एक पक्की लांबचलांब इमारत होती. तिच्या आधाराने खेटून काही पत्र्याच्या टपऱ्या. रात्र असल्याने विजेचे टांगते गोल दिवे लागलेले होते. भंगारमालाच्या आडोश्याने त्या सावल्यांमधून, चोरट्या हालचाली करत बावळ्या सख्याचा शोध घेऊ लागला.

तो कुठेच दिसेना. निराश होऊन बावळ्या एका पत्र्याच्या खोपीत वाट बघत अंग चोरून थंडीने थरथरत बसला. आता जायला त्याला जगात  दुसरी जागा नव्हती.

अचानक त्याच्या मानेमागे पिस्तुलाची थंडगार नळी लागली. "हात वर कर." दरडावले गेले. बावळ्याने आज्ञा मानली. "उभा राहा." दुसरी आज्ञा पाळली. "भांगडा नाचून दाखव." तिसरी आज्ञा तुलनेत इतकी हास्यास्पद होती की धमकी झुगारून बावळ्या मागे आज्ञापकाला पाहायला वळला. तो सखा होता. बावळ्याने त्याला मिठी मारुन दिली आणि गदगदू लागला. सख्याला आश्चर्य झाले. बावळ्याच्या डोळ्यात तो कारण शोधू लागला. बावळ्याने आपले डगल्याचे गठले पुढे केले. सख्याने ते चाचपले. उत्सुकतेने उघडून बघितले. "काय आहे हे?"

"तू म्हनला होता ना, खुनी यंत्राचं भाग मिळालं तर तू त्याचा छडा लावनार? ते हायत." बावळ्याने मलूल आवाजात सांगितले. "त्या बयेनं माझ्या मागावर झोपडपट्टीकडं पाठवलं होतं. रूळावरच्या तारांवर झटका खाऊन मेलं की. पन माझ्या वस्तीतली पोरं आधी मारली."

"तुझ्या मागावर तुझ्या वस्तीकडे? पण तिला पत्ता कसा लागला? तुला इथं येताना कोणी बघितलंय? तुझ्या मागावर कोणी

होतं?" अभावितपणे सख्याची नजर अंदाज घेत आजूबाजूला भिरभिरू लागली. स्वतःच्या सुरक्षेची काळजी त्याला लागली. बावळ्याने मान उदासपणे नकारार्थी हलवली.

"माझ्या जागी ती पोरं मेली." बावळ्याला परत गदगदून आलं. तेव्हा सख्याच्या डोक्यात उजेड पडला. बावळ्याला काही सांत्वनाची या क्षणी तीव्र गरज होती. आणि उघडं कुडकुडणारे अंग झाकायला वस्त्राची.

"तू नाही. त्या अवपिपासेनं मारलंय त्यांना. त्याचा छडा लावूया. चल माझ्याबरोबर खाली तळघरात. इथं कोणाची नजर पडण्याआधी." सख्याने बावळ्याला हात धरून ओढत न्यायला सुरुवात केली. "तिथं आपण सुरक्षित असू. आपल्याला नीट बोलता येईल." दुसऱ्या एका टपरीत नेऊन तिथला एक पेटारा सख्याने बाजूला सरकवला. त्याच्याखाली भुयार दिसू लागले आणि त्यात उतरुन जायला शिडी. सख्यामागोमाग बावळ्या तिच्यावरुन उतरून खाली गेला.

ते गुप्त तळघर बरेच मोठे होते. वरुन इथं असे काही असेल, याची अजिबात कल्पना आली नव्हती. तिथे तारांची भेंडोळी, विजेची अनेक धड आणि मोडकी उपकरणे, वेगवेगळी अनोळखी यंत्रे, संगणकांची रांगच्या रांग असा एखाद्या प्रयोगशाळेत शोभेलसा

पसारा होता. काही यंत्रांच्या पडद्यांवर भंगारखान्याच्या सभोवताली रोखलेल्या दक्ष-चलचित्रकांकडून टिपली जात असलेली दृश्ये दिसत होती. एक पडदा बावळ्या लपून बसला होता, ती जागा नेमकी दाखवत होता. सख्याने आपल्याला कसे गाठले? याचा उलगडा बावळ्याला त्यावरुन झाला. बावळ्याचे त्यावर लागलेले लक्ष ओळखून सखा हसला. "जर ते खुनी यंत्र इथपर्यंत आलंच, तर आपल्याला आधीच कळेल."

एका कपाटात खुडबुडून सख्याने जाडसर अंगरखा शोधून काढला. "घे. हा घाल. माझ्या मापाचा तुला सैल होईल. पण तू थरथरायचा तरी थांबशील." बावळ्याने आभार मानून तो अंगात चढवला. त्यात दोन बावळ्या मावतील एवढी जागा होती. मग एका मोकळ्या मेजावर बावळ्याचे गठले खोलून रिकामे करत, छोटा चौपाय घेऊन सखा त्यावर बसला. यंत्राच्या भागांचे गहन निरीक्षण करण्यात व्यग्र झाला.

आपल्या डोक्यावरचे ओझे सख्याच्या डोक्यावर ठेवल्यावर बावळ्या निर्धास्त झाला. झोपेची तीव्र गरज त्याला भासू लागली. तो जमिनीवर पसरला. त्याला जन्मात कधी बिछाना मिळाला नव्हता. तिथली जमीन तकलादू जुनाट लाकडी फळ्यांची होती. त्या खाली पोकळी भासत होती. त्यावर कान टेकले गेल्यावर

बावळ्याला पाण्याच्या प्रवाहाचा क्षीण आवाज जाणवला. हे तळघर खाडीच्या प्रवाहावरती बांधलेले होते. त्याला खात्री वाटली. "मी खाडीत पडनार नाय ना?"

सख्याने डोके वर उचलले. त्याला बावळ्या नजरेसमोर दिसला नाही. नजर खाली वळवल्यावर खाली पसरलेला दिसला. "तू माझे कपडे लोळवतोयस." त्याने नाराजी व्यक्त केली. बावळ्या वरमला. तातडीने उठून बसला. तसा सख्या हसला. "अरे मस्करी केली." पण बावळ्या पुन्हा लोळला नाही. नुस्ता पाठ टेकून कोमेजून बसून राहिला. "हे तुकडे आणून तू खूप भारी काम केलंस बघ." सख्याने बावळ्याला पुन्हा उत्साहीत करायला मखलाशी केली. "यातल्या काही विद्युत-जोडपटांवरील जोडण्या दुरुस्त करता आल्या, तर त्याच्या स्मृतीत असलेला माहितीसंचय आपल्याला खुला होईल." सख्याने ते काम होण्याची खात्री वाटल्यामुळे शीळ ओठांत घोळली.

"तू गनीमबाईसाठी काम करतो?" बावळ्याने प्रश्न विचारला.

"नाही. का?"

"मंग सक्तीसक्तरावासाठी?"

"नाही. आणि विचारण्याआधीच सांगतो. त्यागमूर्तीसाठी सुद्धा नाही." कामातून डोके वर न काढता आणि आवाजात नाराजी

न आणता, सखा सहज स्वरात उत्तरला. "माझा मी स्वतःसाठी स्वतःच्या अक्कलेनं काम करतो. जसा तू करतो. सकाळी त्या सगळयांना त्यांचं पटलं नाही, म्हणून सरळ नकार दिलास की नाही."

"हुं." बोलून बावळ्या गप्प झाला. मग काही बोलायला तोंड उघडले. शब्द न उच्चारता बंद केले. तसे सख्याने डोळे वर करुन त्याच्या डोळ्यात भिडवले. डोळ्यांच्या कोपऱ्यातून त्याचे बावळ्यावर लक्ष होते. भुवया उंच केल्या.

"तसं नाय. मला वाटतंय की मी शेतात जावं. मला शहरात तर ती बया थारा देनार नाय. जंगलात तिला मी सापडनार नाय."

"तिच्या भीतीनं जंगल गाठणार आहेस? तुला काय वाटलं? जंगल माणसांनी मोकळं सोडलंय? जगाच्या पाठीवरील एखाद्या महासागरातील निर्जन बेटावर जरी तू जाऊन लपलास, तरी तिथं आकाशात फिरणारे कृत्रिम उपग्रह नजर ठेवून असतात. सत्ताधाऱ्यांच्या नजरकैदेतून कोणीही आता कसंच सुटू शकत नाही."

"मंग मी आता करु तरी काय?" बावळ्याच्या स्वरात हताशा होती.

"माझं मत आहे, लपतछपत विजनवासी जगणं जगण्यापेक्षा, समोर लढून आलेलं मरण मेलेलं जास्त चांगलं."

"मी गनीम बनू?"

"हं! शत्रूशी शत्रूच्या शस्त्राने लढणार? म्हणजे आधी त्याच्यासारखं बनणार? सुरुंगाचा कारखाना सुरुंगाने उडवणार. त्यात हकनाक बळी जाणाऱ्या विनापराध लोकांचं काय? अतिरेक्यांमध्ये आणि गनिमीणीच्या मार्गामध्ये मला तर काही फरक दिसत नाही."

"मंग मी सक्तीसक्त रावाची पत्रकं वाटू?"

"सक्तीचा प्रचार? सक्तीसक्ताने ठरवलेल्या नियमांची सक्ती? ते लोकांच्या भल्यासाठी आहेत असं केवळ तो म्हणतो म्हणून? आजचे सरकारी नियम काय वेगळे आहेत? ते सुद्धा लोकांच्या भल्यासाठीच असल्याचं सांगतात. पण ते न पाळणाऱ्यात सरकारी माणसंच सर्वात आघाडीवर असतात. त्यांना वठणीवर कोण आणणार? आणि ही वठणीवर आणणारी माणसंच भ्रष्ट निघाली की त्यांना? माणसं राबवतात अशी कोणतीही व्यवस्था आदर्श राहणार नाही. ही आदर्शांची भानगडच बेमतलब आहे."

"मंग त्यागमूरती बाबाकडंच जातो." बावळ्या ठामपणानं म्हणाला. "तो गांधीबाबा कसा दिसतो."

"तो गांधीगिरीच करतो. पण....." सखा विषादाने हसला. "जगण्याची चालू रित मोडायची, तर ती निदान दहा जणांनी मिळून तरी मोडली पाहिजे. एकट्या दुकट्याने मोडणं म्हणजे फुकट शहीद होणं. त्याच्या स्वतःच्या बायकोपोरांना सुद्धा सगळया आधुनिक सोयी-सुविधांचा त्याग करुन जगणं उफराटं वाटतं. त्यांनी याला सोडलाय. तू त्याच्या बरोबर बैराग्याचं जीणं जगणार काय?"

"तू सगळयाला नाय नाय म्हनतो. मंग सकाळी त्यांच्याकडं मला सांगाती घेवून गेला कशाला?" बावळया कावला.

"काय सांगू?" सखा उसासला. "आजचं जग समस्यांनी गजबजलंय. त्यातल्या बहुतेक सगळया माणसांना आणि जगाला सर्वनाशाकडे ओढून नेताहेत. विचार करणाऱ्या प्रत्येक माणसाला हा घोर लागला आहे. पण आख्ख्या जगाचा विचार करता येणं, एकट्या माणसाच्या आवाक्यातलं नाही. जो तो गोंधळलेला आहे. आपल्या बुद्धीने सुचतं ते करतो आहे."

सख्या जवळच्या काचबाटलीतले पाणी घटाघटा प्यायला. त्याने बावळयाला देऊ केले. बावळयाने नको खुणावले. सख्या पुढे बोलायला लागला. "भले अपयशी आहेत, ही तिघं आपल्या हेतूशी प्रामाणिक आहेत. त्यासाठी अविरत प्रयत्नरत आहेत. त्यांना एकत्रितपणे या खुनी यंत्राच्या संकटातून काही मार्ग काढता येतो

का? हे मला बघायचं होतं. शिवाय एकट्यानं आपल्या डोक्यावर या समस्येचं ओझं मला वाहायचं नव्हतं. त्या तिघांकडून ते आता अजून अनेकांमध्ये वाटलं जाईल."

सख्याने हात वर केले. "बघ. ज्यानं त्यानं जे स्वतःला जमतं, त्यातला उपाय शोधला पाहिजे. मी एक अभियंता आहे. त्याला अनुसरून, पाण्याचा इंधन म्हणून वापर करणारं इंजिन, शोधून काढण्याच्या प्रयत्नात मी आहे. माझ्या परिने जगाच्या समस्येवर तो उपाय होऊ शकेल."

"मंग आता मला करायला काय बी बाकी उरलं नाय. चोर जगाचं काय भलं करनार?" बावळ्याने थकलेले डोळे मिटले. गुढघ्यात मोडलेले पाय पुढे सोडून, त्यांच्यावर दोन्ही हातांची घडी ठेवून, पाठ-डोके मागे कपाटाला रेलून.

"अरे आशा सोडू नकोस. बघू काही चमत्कार घडेल." सखा हे वाक्य बोलताच बावळ्याचे डोळे खाडकन उघडले गेले. धगधगले.

"माझी आय हेच बोलत टाचा घासत या जगापलीकडं गेली. चमत्कार-आशा सगला खोटा हाय. मरायचंच हाय? मरतो की. पन मला आता फुकाचा बडबोल नको जी." बावळ्या जोरजोरात तिडीकीने ओरडला. यावर सखा काही बोलला नाही. काम करत

राहिला. हळूहळू बावळ्या शांतावला. त्याच्या नकळत डुलकी काढू लागला.

सुईंग....एका विचित्र आवाजाने तो दचकून उठला. काही क्षणांनी कुठे कशाला आलो आहोत त्याचे भान परतले. सखा मेजावर काम करत होता. त्याने काही उपकरणांशी यंत्रात सापडलेले विद्युतपट जोडले होते. त्यातून अध्येमध्ये हे विचित्र आवाज उमटत होते. "तिथे बघ." सख्याने खुणावलेल्या दिशेने बावळ्याने बघितले. एका संगणकाच्या पडद्यावर त्याला तो स्वतः दिसला.

"या यंत्राच्या माहितीसंचयात ही छायाचित्रे सापडली. आपण काल पळताना त्या वरच्या मजल्यावरच्या वाहनतळावर गेलो होतो ना, तेव्हाची टिपली गेलेली ही छायाचित्रे आहेत. तू तिथं चेहऱ्यावरचं आवरण काढलं होतंस. हा बघ. तुझा चेहरा किती स्पष्ट दिसतो आहे इथं. कालच्या यंत्राने ही टिपली आहेत. आता ही छायाचित्रे बघ." सख्याने हातातल्या संगणक कळफलकावर बोटे नाचवली. "ही तुझ्या वस्तीतली छायाचित्रे दिसताहेत. रुळ आहेत. मागे झोपड्या आहेत. पोरं आहेत. तू आहेस. या तुकडे झालेल्या यंत्राने घेतलेली. आधीच्या एवढी सुस्पष्ट नाहीत. पण तुला ओळखता येतंय."

"ही यंत्रानं घेतलेली चित्रं नाय जी." बावळ्याने सुकलेल्या ओठांवरून जीभ फिरवली. "ही पप्पूनं घेतलेली हायत. तो पडला तो बंटी हाय. त्या वेळी यंत्र तिथं नाय होतं. मंग खूप नंतर आलं की."

"पप्पूनं घेतलेली चित्रं? ती यंत्राकडं कशी गेली?" हनुवटीवर हात फिरवत सखा विचारात पडला. "पप्पूनं ती माहितीजालावर टाकली होती काय?"

"होय. बाकी पोरांनी कल्ला केला ना? त्यांना बी बंटी पडला कसा? तो बघायचा होता."

सख्याने चुटकी वाजवली. "कोडं सुटलं. त्यांना तुझा पत्ता कसा लागला ते." मग त्याने तोंडावर हात घेतला. "अरेरे रे! हे फार भयानक आहे बावळ्या. फार भयानक. त्या अवपिपासेनं विकसित केलेली कृत्रिम संगणकबुद्धी आख्खं माहितीजाल झोळते आहे. तुझ्या चेहऱ्याच्या त्यांच्याकडं असलेल्या छायाचित्राशी पडताळणी करत, तिथं असलेल्या आणि त्यावर येणाऱ्या प्रत्येक छायाचित्राशी. मला सांग. पप्पूनं छायाचित्र काढल्यावर साधारण किती वेळानं ते यंत्र तिथं येऊन धडकलं?"

"काय की तास-अर्धा तास झाला होता."

"फक्त एवढ्याश्या वेळात त्यांना आख्ख्या जगभरातल्या माहितीजालाची तपासणी पार पाडता आली? तिचे संगणक कल्पनेपलीकडे जलद आहेत. ती म्हणाली ते सत्य होतं तर? जगातल्या प्रत्येक माणसाची हालचाल तिच्या मुठीत आहे. आणि त्याचं मरण." सखा मेजावरच्या बाटलीतले पाणी पुन्हा घटाघटा प्यायला.

बावळ्याला सखा जे बडबडला, त्यातले काही कळले. काही नाही कळले. पाण्याची तहान लागलीय. ही जाणीव आधी प्रखरतेने झाली. तो उठून बाटलीपाशी पोहोचला. तोच पुन्हा एकदा खुनी यंत्राच्या चालू झालेल्या विद्युतपटातून सुईंग आवाज निघाला. सख्याच्या चेहऱ्यावर भीती दाटून आली.

"हाय! हे जोडलंय तो संगणक माहितीजालाशी जुळलेला आहे." झटका आल्यासारखा सखा जागेवरून उडाला. पटकन जाऊन संगणकाची वीजपुरवठा तार त्याने खेचून काढली. तो बंद पाडला.

सख्याला एका जागी स्थिर राहवेना. जोपर्यंत बावळ्या जात्यात होता, तो सुपात होता, तोपर्यंत सख्याचं मानसिक संतुलन स्थिर होतं. आता जात्यात सापडलो. ही जाणीव होता, ते डळमळले होते. "काय करुया?" तो एका कपाटापाशी गेला. सरकवले. खाली

पोकळी होती. "इथून उडी घेतली तर आपण खाडीला जाऊन मिळणाऱ्या गटारात पडू. खाडीतून गुपचूप सटकून जाता येईल."

"तू तर म्हनला की दडून जगन्यापरीस लढून मेलेलं चांगलं? जगात दडून राहाला जागाच नाय हाय." बावळ्याने सख्याला धरुन झेंजारत त्याचेच शब्द उलटे सुनावले.

बावळ्याच्या शब्दांनी सख्याच्या मनावर चढलेला भीतीचा पगडा उतरला. "आपण लढू बावळ्या. आपण लढू. मला सगळं सांग." यंत्राच्या तुटक्या अवशेषाकडे बोट दाखवत विचारले. "हे कसं नष्ट झालं?" बावळ्याने तो रुळांमध्ये कसा पडला. तिथे यंत्राच्या माऱ्याचा परिणाम कसा थिटा पडत होता. मग रुळांवरच्या टांगत्या तारांजवळ येता, त्यांची यंत्राबरोबर घातजुळणी होऊन ठिणग्या कश्या पडल्या, ते सगळे सांगितले.

"वा! जमलं तर. रुळांच्या धातूमधून विद्युतकणांचा मारा मोठ्या प्रमाणावर लगोलग लांब वाहून नेला जात असणार. आपल्याकडं तितक्या प्रचंड प्रमाणात धातू नाहीय. पण?" सख्याने तिथे चार पुरुषभर उंचीचे खांब कापडाखाली झाकून ठेवलेले होते. त्यांच्यावरचे ते आवरण ओढून मोकळे केले. "ही आहे 'तेस्ला' या महान प्रतिभाशाली शास्त्रज्ञाची रचना. या तांब्याच्या तारांच्या गुंडाळ्या आणि भेंडोळ्यांमधून, आपण रोजच्या सामान्य

वीजप्रवाहाचं अती उच्च दाबाच्या विजेत रुपांतर करु शकतो. ते यंत्र त्या टांगत्या वाहकतारांच्या उच्च विद्युतदाबाची शिकार झालं. हे नक्की. चल लाग शिकारीच्या तयारीला. यांची जुळणी करूया."

सख्याच्या उत्साहाची बावळ्याला लागण झाली. सख्याच्या सूचनांबरहुकूम त्याची धावाधाव सुरु झाली. शिकारीचा सापळा जवळजवळ तयार होत आलेला. तिथल्या संगणकाचा एकाएकी स्फोट झाला. स्फोटांची मालिकाच सुरु झाली. बावळ्याला चिरपरिचित जळजळ त्याच्या अंगात वेदना उसळवू लागली. "ते आलं की." तो ओरडला.

"बावळ्या गटाराच्या भोकात शिर. जा लवकर." सखा ओरडला. तो दोन तारांच्या जुडग्यांची एकमेकांशी ताकद एकवटून जुळणी करायचा प्रयत्न करत होता. "येऊ दे त्यांना अजून खाली. हे जोडताच फुटतील हरामखोर."

"त्याचा मोठा स्फोट होनार." बावळ्याला बेंबीच्या देठापासून ओरडावे लागले. यंत्रांचा घरघराट जोरात ऐकायला येत होता.

"होऊ दे. पर्वा नाय मरणाची."

"मला पर्वा हाय. मी अडानी मानूस हाय. मला यातलं काय बी नाय कळत. तुला समजतं. तू जिता राहला पायजेल. तू जा. मी

जोडतो." बावळ्याने लोळण घेत सख्यापाशी पोहचत ती जुडग्यांची टोके हिसकावून घ्यायचा जोरदार प्रयास केला.

"गप्प बस मुर्खा. माझ्या जागेतून चालता हो. आत्ताच्या आत्ता...." सख्याला पुढे बोलता आले नाही. बावळ्याने त्याच्या डोक्यावर तडाखा लगावत त्याला बेशुद्ध केले. मिनतवारीने गटारावरच्या उघड्या भोकातून खाली ढकलून दिले. त्याच क्षणी वरचे छत फोडत तीन यंत्रे आत घुसली. त्यांचा तिहेरी मारा बावळ्यावर एकवटला. दातओठ चावत तरीपण जुडग्यांच्या टोकांपाशी बावळ्या पोचला. त्याने ते एकमेकांशी जुळवायला ताकद एकवटली.

खाली गटारात पडल्या पडल्या पाण्याच्या हबक्याने सखा शुद्धीत आला होता. नाकातोंडातून ते घाण पाणी गेल्याने कासावीस झाला. तोच त्याच्या डोक्यावर कानठळ्या बसवणारा मोठा स्फोट झाला. त्या प्रकाशाच्या लखलखाटाने डोळ्यांवर पांढरी अंधेरी आली.

# १०० वर्षे पुढे - प्रकरण ६

समुद्राची हलकी गाज कानांना सुखावत होती. सकाळची सोनेरी उन्हे वातावरण प्रसन्न करत होती. छोट्या छोट्या हिरव्या टेकड्यांनी आणि खाडीच्या जागोजागी विखुरलेल्या प्रवाहांनी गजबजलेला भाग होता तो. माडाच्या झाडाच्या झावळ्या वाऱ्यावर भिरभिरत होत्या. झाडीमधून चुकार कुठे जुन्या काळातल्या सिमेंटी बांधकामांचे पडीक अवशेष दिसून येत होते. कुठे पिवळी पांढरी रानफुले फुलली होती. त्यांचा मंद गंध दरवळत होता. आणि त्या सगळ्या सुंदरतेची मूर्त प्रतिमा प्रकटावी, अशी चपळ तरुणी त्यातून कशाचा माग काढत वावरत होती. तिच्या जोडीला एक मध्यमवयाचा पुरुष होता.

"लाकी, मंज खात्री होईंग. नकाशात दाखविंग ती जागा इंथ कुंठ होईंग." तो पुरुष चोहोकडे नजर फिरवत डोक्यावर बोटं टकटकवत त्या तरुणीला म्हणाला. त्याचा आवाज खूप जाड घोगरा होता. त्या तुलनेत ती जेव्हा बोलली, जणू मंजूळ नाजुक घंटा किणकिणल्याचा भास झाला.

"साथी, ते तळघर होईंग. सहजी दिसिंग न. लपिंग असिंग. तिंथ तो उंचाविंग टिला असिंग बघिंग?" ती दिशा दाखवून तिकडे

चालू पडली. साथी तिच्या मागोमाग चालू पडला. त्याने खांद्यावरील पोतडीतून एक चपटी डबी काढली. ती चुंबकसूची होती. तिच्यावरची सुई त्याच्या चालीबरोबर उलटसुलट कशीतरी फिरत होती. ते बघून तिला हासू फुटले.

"हासिंग न." तो तिच्यावर चिडला. "ती यंत्रं धातूंज असिंग. चुंबक नेमकी त्यांज दिशा दाखविंग. कळिंग?"

"कळिंग बरं. कळिंग." तिने त्याला वेडावून दाखवले. त्यानंतर ती दोघं बराच काळ त्या परिसरात इथं तिथं उसकापासक करत तळघराचा शोध घेत राहिली. त्यात काही साप, करडे ससे, एका साळिंदराचं बीळ, वडाच्या ढोलीतली घुबडे आदी प्राण्यांशिवाय त्यांच्या हाती फारसे काही लागले नाही. एका ठिकाणी जुन्या इमारतीच्या पडीक भिंतीवर 'सुवर्णा' अशी नावाची भली मोठी संगमरवरी पाटी सापडली. तशी लाकीने आनंदाची हाळी दिली. "साथी. काढिंग तुंज नकाशा आता बाहेरिंग. त्यात शोधिंग या सुवर्णांज जागा."

साथीने लगबग दाखवली. नकाशा पोतडीतून काढून तिच्यासमोर पसरला. "वेळ फार गेलाईंग असिंग. रझाकार पाठलागिंग. जवळ येईंग असिंग. घाई करिंग. घाईंग."

"ही बघिंग सुवर्णा." लाकीने त्या कापडी गुंडाळीवरच्या नकाशातली जागा नेमकी शोधली. "इंथ. तीस वार दूर पूर्व नी मंग पंचविंश वार दक्षिणेला तळघर असिंग." तिने दिशांचा अंदाज घेत परिसरावर नजर फिरवली. अंदाजाच्या दिशेने निघाली.

"गं?" हातातल्या चुंबकसुईकडे तिचे लक्ष वेधत साथीने तिचा हात धरला. ओढत चुंबकाच्या पूर्व दिशेला घेऊन चालला. सोबत अंतर मापायला दोराचे रिळ उलगडत. मग तिथून दक्षिणेला. ते ज्या जागेवर पोहोचले, तिथे बरेच दगड-रेतीचे ढासळलेले डबर पडले होते. "इंथ." त्याच्या चेहऱ्यावर खुशीचे हासू आता फाकले.

त्या पडीक अवशेषावर काजऱ्याच्या प्रचंड झाडाच्या मुळांचा विळखा पडलेला होता. तिने त्याला मोठी प्रदक्षिणा घालून अदमास घेतला. आपल्या खांद्यावरच्या पोतडीतून अवजारं काढली. त्यात हाताने फिरवायचे गिरमिट होते. डोके चालवून त्या जाडजूड भिंतींमध्ये तिने नेमक्या अश्या तंत्राने भोके पाडली, की दहा-बारा ठिकाणी गिरमिट चालवता चालवता, ती भिंत तडकत गेली आणि एकदम ढासळून पडली. अचूक वेळ साधून लाकी जागेवरून बाजूला सरकली नसती, तर त्याखाली गाडली गेली असती. वा झाडाखाली चिरडली असती. साथीने तिच्याकडे खाऊ की गिळू नजरेने पाहिले.

"हुं! मी अशी सहज मरिंग न." टेचात नाक उंचावून तिने आपले दुसरे एक अवजार उचलून, त्या कोसळलेल्या ढिगातून मार्ग मोकळा करायला सुरुवात केली. ती जसजसा त्या अवजाराचा दट्ट्या मागेपुढे खेचत जात होती, त्या अवजाराचा कठीण टोकाचा भाग पुढ्यात असलेल्या गोष्टींचा तोडफोड चुरा करुन टाकत होता. अवघ्या काही पळांमध्ये तिने त्यातून आत घुसायला वाट मोकळी करुन दिली. आत खाली जायच्या पायऱ्या दिसू लागल्या.

"पहिला मी जाईंग." तिला मागे खेचून आपण पुढे सरकत साथी म्हणाला. तसे तर तसे. तिने हात उडवले. सावधगिरीने तो धोक्याचा अदमास घेत घेत पायऱ्या उतरु लागला. मोठमोठ्याने श्वासात तिथली हवा भरून घेत विषारी वायूंचा अंदाज घेऊ लागला. मध्येच नाक फेंदारले. जोराने उच्श्वास टाकून मागे पाऊले घेता तिच्यावर धडकला.

तिने त्याचे लक्ष तिथे खाली मरून पडलेल्या घुशीकडे फिरवले. डोळे आकुंचित करून ती घुसच असल्याचे त्याने नक्की करुन घेतले. "सावध असिंग. घूस वीज झटक्यानं मरिंग असिंग." त्याने अनुमान सांगितले. तिने डोळे ते न पटून गरगरवले.

चुंबकसूई सारखी डाव्या बाजूला टकटकू लागली. त्या बाजूच्या पायऱ्यांनी अजून खाली जाता, ते एका भल्या मोठ्या

तळघरात जाऊन पोहोचले. तिथे अंधार होता. आपल्या पोतडीतून उजेडाची सोय करणारे अवजार त्याने काढले. त्यावर बोटे घासून ते चालू केले. चावी मारली. त्यातून आधी भगभगीत पांढरा प्रकाश फाकून मग हळूहळू मंदावत स्थिरावला. तोपर्यंत दोघांचे डोळे त्याला सरावले.

त्या तळघराची उंची फारशी नव्हती. कधी काळी चारचाकी गाड्या नांगरून ठेवण्यासाठी, रहिवासी इमारतीच्या या खालच्या जागेचे उपयोजन असावे. आता तिथे गाड्यांऐवजी स्वयंचलित यंत्रे ठेवलेली दिसत होती. एखादे अद्भुत दृश्य पाहिल्यासारखे विस्मयउद्गार दोघांच्या तोंडातून निघाले. चेहऱ्यावर भावही तसेच झळकलेले.

"आपण साधिंग. य्याई!" लाकीच्या या अचानक जल्लोषाने साथी हडबडला. त्याच्याकडे लक्ष न देता ती पुढे धावली आणि तिने त्या यंत्रांवरून हात फिरवत, त्यांच्या खरेपणाची खात्री करायला सुरुवात केली. त्या यंत्रांचे आकार गोलाकार डब्यासारखे होते. ती पुरुषभर उंची लांबीची होती. त्यांच्यावर चार चार पंख्यांची पाती होती. ती खुनी मारक यंत्रे होती. "आमी यांज काईंग करिंग?"

"जंस आधी ठरिंग असिंग. नाश करिंग." साथीने ठणकावले. "गं पोरी. जपिंग गं. यंत्र चालूईंग जाईंग नी तुला ठार मारिंग." तिला भीती घालायचा प्रयत्न केला.

"चालूईंग जाईंग मंज पायताण!" तिने पाय आपटला. त्याचे म्हणणे उडवून लावले. यंत्रांशी जास्त छेडछाड करू लागली. "स्स हाय!" करत बोट तोंडात घातले. पंख्याचे पाते हाताळताना त्याच्या धारेने कापले गेलेले.

"तरी सांगिंग?" साथीला आयतेच बोल लावायला फावले. तिला मागे खेचून तिच्या जागी आपण तेच करु लागला. परिक्षण करता त्याने निष्कर्ष काढला. "ही खुनी यंत्रेच असिंग. रझाकारांना मिळिंग न. चल नाश करिंग."

"कंस्स?" लाकीने जणू स्वतःलाच विचारल्यासारखं, इथे तिथे त्या कामी काय उपयोगी पडू शकेल? त्याचा शोध घ्यायला सुरुवात केली. "तेस्ला!"

तिच्या या एकाएकी उत्तेजित आवाजाने पुन्हा एकदा हडबडलेल्या साथीचे बोट पात्यावर कापले गेले. "तुला कितीईंग कितीईंग परत परत सांगिंग. तरी ओरडिंग अचाकन?" तो कावला. पण तिने त्याचे लक्ष त्या खांबवजा तारांच्या उंचच उंच गुंडाळ्या

भेंडोळयांकडे वेधता, त्याचा राग कुठच्या कुठे उडून गेला. "तेस्ला?" तो तिच्यापेक्षा जोराने ओरडला.

त्या तेस्ला-सुरळयापाशी धावत गेला. लाकी त्यांच्या नियंत्रण पटावर हात चालवून तपासणी करत होती. तो चौकोनी तंतूमय काचांचा पट होता. त्यावर काही गोल फिरवायच्या कळी होत्या. काही मागे पुढे करायचे खटके होते. तिच्या हाताळणीत त्यातले दोन जुनाट खटके मोडून निखळले. ती हसायला लागली.

"गं पोरी थांबिंग जरा. काईंग सांगिंग? यंत्राला ऊर्जा पुरविंग म्हणहून ही तेस्ला वापरिंग होईंग तर? यंत्र नाश नाईंग, उलट चालिंग जाईंग तर?" साथी आपल्या या शंकेवर डोके टकटकवत बसला. तोच बाहेर कुठे वरच्या रानात पक्ष्यांचा मोठा फडफडाट आणि कलकलाट झाल्याचा आवाज कानावर आला.

"रझाकार. ते येईंग." दातओठ चावत लाकी बोलली आणि मागचा पुढचा विचार न करता सगळयात मोठा मुख्य खटका ओढून मोकळी झाली. तो थरथरू लागला. सगळी यंत्रणाच थरथरु लागली. अनेक वर्षांनंतरही तिची कार्यक्षमता टिकून असावी. वेगवेगळे आवाज करत त्या सगळया वाहकतारा आणि रचनेतून जणू जीव सरसरु लागला. नियंत्रणपटावरील काचांमधून दिवे

लखलखू लागले. लाकी आणि साथी हडबडून गेले. ही गडबड कशी थांबवावी त्यांना कळेना.

तेस्ला सुरळयांमधून ठिणग्या आणि ज्योती पेटू लागल्या. त्या जणू काही गात होत्या. एक कर्कश्श धून वाजवू लागल्या. दोघं घाबरुन त्यापासून दूर धावली. अपेक्षेबाहेरचा प्रचंड कडकडाट त्या खांबांमधल्या जागेत निर्माण झाला. आकाशातला तडीताघात जणू क्षणभरासाठी तिथे निर्माण झाला. प्रकाशाचा डोळे आंधळे करणारा लोळ अवतरला. दोघे धडाक्याने भिंतीवर फेकली गेली. आपटली.

कधीतरी ती डोळ्यापुढली अंधेरी उतरली. मिचमिच्या पापण्यांच्या कडांतून तिला भासले की त्या खांबांमधल्या जागेत काही तरी हालचाल करणारे अवतरले होते. यंत्र सजीव झाले की काय? ती धसकली.

ते हालचाल करणारं काही, म्हणजे बावळ्या सुद्धा धसकलेला होता. भांबावलेल्या त्याने सभोवताली नजर फिरवली. तेस्लाचे गुंडाळीखांब पाहून त्याला वाटलं की तो एखाद्या स्वप्नातून जागा होतोय. स्फोट झालाच नसावा. मग त्याच्या लक्षात आलं की ही सख्याची जागा नाही आहे. तो भलतीकडे कुठे आहे. भिरभिरणारी त्याची नजर लाकीवर जाऊन स्थिरावली. त्याच्या चेहऱ्यावर

कोड्यातून सुटल्याचा भाव आला. "स्वरगातली आपसरा? काळी हाय. पण बेस हाय."

त्याच्या या शब्दांनी त्या अप्सरेच्या म्हणजे लाकीच्या भिवया वाकड्या झाल्या. "ए जनावर. तू कोण असिंग?" तिने घुश्श्यात विचारले.

"बाबा माझ्या?" बावळ्याने नवल केले. "हीच काय स्वरगाची रित हाय? मानसाला जनावर म्हनते? काळी हाय आनी बिलामती बी हाय. ए आपसरे, आरती ओवाळ आधी माझी."

यावर अप्सरेच्या डोळ्यातून आगीच्या जणू ठिणग्या उडाल्या. "तू? जुतियानं तोंड फोडिंग तुंझ आधी." लाकी कडाडली. तो कडकडाट बावळ्याला आधीच्या वीजेच्या कडकडाटापेक्षा भारी भासला.

"काय तरी इचित्र बोलू नको. समजल अश्या भाषेत नीट बोल. काय जनमापासून बोबडी हाय गं?" बावळ्याने अजून एक दूषण तिला चिकटवले. उत्तरात तिने खरोखर जवळ जे सापडले, त्यातले आपले एक अवजार बावळ्यावर मारून दिले. प्रतिक्षिप्त क्रियेने ज्यात बावळ्या तरबेज होता, त्याने ते चुकवले. त्या नादात तो तोल जाऊन खाली पडला.

"नेम चांगला हाय तुझा." पहिल्यांदा त्याच्या तोंडातून तिच्या विषयी चांगले बाहेर पडले. मग त्याला जोरात आदळल्याची जाणीव झाली. "अयाई गं! स्वरगात पिर्थवीसारखंच लागतं की?" त्याने आता आपल्या शरीराची चाचपणी सुरु केली. "काय मेल्यासारखं वाटतच नाय. जित्तं असल्यासारखंच वाटतं हाय."

"तू कोण असिंग? इंथ कंस्स येईंग? खरंईंग खरं सांगिंग." लाकीने त्याला दरडावत जाब विचारला. ती स्वतःला सावरुन उभी राहिली होती. तिच्या हातातले अवजार हत्यारासारखे तिने बावळ्यावर रोखलेले होते.

बावळ्याने डोळ्यांची मिचमिच करत तिच्याकडे पाहिले. त्याची नजर खुनी यंत्रांवर गेली. "मी मरून स्वरगात आलो हाय की नरकात? मलाच कळंना जालं हाय. ही कलागती यंत्र इथं बी हाय?"

"हा स्वर्ग होईंग न. ही पृथ्वी असिंग. तू काईंग जुन्या काळांज भाषा बोलिंग?" साथीने आपले तिथले अस्तित्व दाखवून देत विचारले. "त्यांज कपडे जुन्या काळांज असिंग." लाकीला दाखवून दिले.

"नाय जी. मी बोलिंग नाय जी करत." बावळ्याने साथीचे बोलणे खोडून काढायचा प्रयत्न केला. "पन काय बोलता? ही

पिर्थवी हाय? मी मेलो नाय?" बावळ्या पुन्हा स्वतःला चाचपडून खात्री करुन घेऊ लागला. "वाटतंय तर जित्त्यासारखंच खरं."

"हा नाटक करिंग." लाकीने बावळ्यावर आळ घेतला. "हा रझाकारांज हेर माणूस असिंग. आमांज कळिंग न, अंस्सा आत घुसिंग." चपळाईने झेप घेऊन तिने हातातील धारदार अवजार बावळ्याच्या गळ्यावर टेकले. "नाटक बंद करिंग. नाईंग तर आरपार करिंग."

बावळ्या खुशालला. "तुझ्या अंगाला लय मस्त वास येतो हाय. अशीच जवळ लगटून उभी राहा." लाकीच्या कपाळावर आठ्या पडल्या. मग रागाने अवजाराचे टोक मानेत खुपसून तिने त्याचे रक्त काढले. "बस्स! याच्याहून तू काय करायची नाय. तुला जमायचंच नाय." तो हसत म्हणता झाला.

हसता हसता बावळ्याने निरखले. त्या दोघांच्या कपड्यांचा नूर काही वेगळा होता. दोघांनी मांडचोळणा आणि विजार घातलेली होती. हालचालींना सोयीचे मळकट रंगांचे कपडे. पण त्यांच्या शिवणीच्या जागा आणि कडा नेहमीपेक्षा फार वेगळ्या होत्या. जणू ते कोणा वेगळ्या देशातले लोक असावेत.

लाकीने त्याच्या डोळ्यात डोळे घालून ढूस दिली. तो बेरडपणे तसाच बघत राहिला. तिने नाईलाज झाल्यासारखा त्याचा नाद सोडत साथीला विचारले, "यांज काईंग करिंग?"

"याला दोरीनं बांधिंग नी इंथच सोडिंग." साथीने समंजस मार्ग शोधला. "आम्हाला वेळ असिंग न. स्फोटांज आवाजानं रझाकार इंथ खेचिंग येईंग. त्या आधी आमी जाईंग होईंग." आपल्या पोतडीतून दोर काढून तो त्या कामाला लागला देखील. बावळ्याचा हातापाईचा प्रयत्न त्या दोघांनी मिळून सहजी मोडून काढला. त्याने जोरजोराने बोंबलण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्याच्या तोंडात बोळा कोंबून ते बंद करण्यात आले. तो खाली आपटला. त्याला तसेच सोडून ते दोघे निघाले. बावळ्याने त्यांच्या मागे लोळण घेत पोहोचायचा प्रयत्न केला. त्याला लाथाडून ते पायऱ्या चढू लागले.

"रझाकारांना इंथ जागा सापडिंग होईंग न." लाकीने साथीला आठवण केली.

"दारावर माती कोसळविंग नी बंद करिंग." साथीने उपाय सुचवला. लाकीने मागे पायऱ्यांकडे पाहिले.

"तो आत मरिंग." तिच्या  डोक्यात झटक्यात विचार आला. दोघांनी एकमेकांच्या नजरेत नजरा घातल्या. दोघांचा विचार एकच आहे. हे त्यांना उमजले. घाईघाईने ते परत खाली तळघरात गेले.

बावळ्याच्या डोळयांवर पट्टी बांधून ते बंद केले. त्याच्या पायातील दोऱ्या मोकळया करुन, त्याला जबरदस्तीने घसटत वर जमिनीवर घेऊन आले.

पुन्हा एकवार तिने आपल्या विशिष्ट अवजाराने शिताफीने मोजक्या ठिकाणावर गिरमिटले. आत जायच्या जागेवर दगड कोसळवले. त्याचा धुरळा उडाला. बावळ्या नाकात धूळ जाऊन खोकू लागला. त्याला गरागरा फिरवून परत ती जागा सापडणार नाही, याची दोघांनी खात्री केली. जागेपासून दूर नेऊन सोडले. एकही शब्द न बोलता बिनबोभाट.

बावळ्याचे डोके चालत नव्हते. हे सगळे काय घडते आहे? त्याच्या लक्षात येत नव्हते. हातपाय मोकळे करण्यात त्याला यश येईना. थोडा वेळ गेला. पशुपक्ष्यांच्या हालचालींची जमिनीवर पडल्या पडल्या जाणीव होत होती. हे जंगल असावे. धुळीत लोळताना काटक्या तुटत होत्या. डोळयावरील पट्टीतून वर सूर्य आकाशात तळपत असल्याची उजेडाची जाण होत होती. अंगाला उन्हं चटका देत होती. रानातल्या पिकल्या कुजल्या फळापानांचा आंबूस जंगलनमुन वास नाकात घुसत होता.

तो संकटात होता. मात्र त्याच्या मनाला तमा वाटत नव्हती. अजबशी हुरहुर लागून होती. कसलासा अजब आल्हाद वाटत

होता. का वाटत होता? ते कळत नव्हते. आई त्याला नेहमी आश्वासायची. तो चमत्कार त्याच्या आयुष्यात खरोखर आला होता? विचाराने बावळ्या हरखला.

## १०० वर्षे पुढे - प्रकरण ७

एका यंत्राचा वेगळासा घरघराट कानांवर येत मोठा होत गेला. काही माणसांच्या गोतावळ्याचा गोंधळ त्या मागोमाग. हुकूमी स्वरात कोणी ओरडले. तापल्या शरीराच्या घामाचा घाण वास घेऊन, बावळ्याच्या जवळ ते आले आणि त्यांनी त्याच्या डोळ्या-तोंडावरच्या पट्ट्या खेचल्या. त्याला जरा बरे वाटले.

ते दहा-बारा जण होते. त्याने कधी न पाहिलेल्या यांत्रिक वाहनांवर बसलेले. जी जमिनीपासून अधांतरी हातभर वर तरंगत होती. त्या वाहनात तीन गोलाकार पंखे एकामेकांच्या शेजारी गरगरत होते. त्या प्रत्येक पंख्याभोवतीचे कडे वावभर व्यासाचे होते. त्यातल्या दोघा पंख्यांच्या कड्यांमधल्या दांड्यावर सुकाणूचे चाक बसवलेले होते. त्या दांड्याला काटकोनात दुसरा जाड दांडा जोडलेला होता. ज्याच्यावर एकेक माणूस बसून पायचाकीवर पाय मारावेत, तसा पाय मारत ते वाहन चालवत होता. त्याच दांड्याला मागच्या टोकाला तिसरा पंखा जोडलेला होता. त्या वाहनांचा जोरदार घरघराट ऐकू येत होता.

ते सगळे बाप्ये होते. तरूण वा मध्यमवयीन वयाचे. त्यांचे कपडे मघाच्या तरुणीसारखेच होते. फक्त सगळे एकजात काळ्या

रंगाचे होते. सरकारदार शिपायांशी वर्षांनुवर्षे पकडापकडीचा खेळ खेळलेल्या चोर बावळ्याला, ते त्या देशातले सरकारदार आहेत. हे ओळखायला वेळ लागला नाही. म्हणजे ती सुंदरी आणि तिचा साथी हे यांच्यापासून पळणारे चोर होते. त्याच्या ओठांतून खुशीची शीळ घुमली. आपलीच जातीवाली आहे तर ती?

"ए?" त्यांच्या प्रमुखाने दरडावले. त्याच्या डाव्या गालावरील एक लांबच्या लांब जखमेचा व्रण कुरुपतेत भर घालत होता. नाक बाकदार मोठे होते. शरीरातली रग उंच-रुंद यष्टीवरुन सहज कळून येत होती. सामना कोणा येरागबाळ्याशी नाही. बावळ्याने मनोमन नोंद घेतली. "तू कोण असिंग? तुला कोण बांधिंग?" अपेक्षित प्रश्न आले.

"तुम्ही कोन जी?" बावळ्याने प्रतिप्रश्न केला. "मी इथं कसा आलो हाय? मलाच ठावं नाय. ही काय जागा हाय जी?"

"व्वा! मजा येईंग. स्मृतीनाशिंग काईंग?" तो प्रमुख गडगडाटी हसला. बावळ्याचे आपादमस्तक निरीक्षण करु लागला. मग डोळ्यात डोळे रोखून जोखू लागला.

"अस्सं काय बघता जी? कधी बाप्यामानूस बघितला नाय काय?" बावळ्याने झक्क लाजत विचारले. नजर फिरवली.

"मंज वेळ होईंग न, फालतू विनोदाईंग. तुला ती बंडबागी मागे ठेविंग नी गेलिंग. काईंग कारणिंग? इंथ काईंग घडिंग?" प्रमुख वाहनावरून उतरुन बावळ्याजवळ आला. "कुंठ गेलिंग ती?"

"माझं डोळं बांधलेलं. मला कस्सं कळनार? मी जेवा इथं अवतरलो. ती इथंच होती. मला बघितला नी आली अंगावर. काय न बोलता सरळ बांधून की वं घातला?" बावळ्या उत्तरला.

"यांज झडती घेईंग." प्रमुखाचा हुकूम होताच दोन जण सरसावले. बावळ्याच्या कपड्यांची आतून बाहेरुन तपासणी झाली. हा सख्याचा अंगरखा होता. त्याच्यातून ज्या काही चीजा निघाल्या, त्यासाठी बावळ्याला जबाबदार धरणे अन्याय ठरता. बावळ्याने तशी मखलाशी करुन बघितली. याचा परिणाम काय होतो? ते त्याला माहीत नव्हते. असे नाही. पण खुळचट चुकांची सवय हाडीमांसी खिळलेली जी होती. अशा वेळी कोणत्याही देशाचे सरकारदार जी कृती करतात ती त्यांनी केली. बावळ्याला खाली पाडून त्याला यथेच्छ लाथांनी तुडवण्यात आले.

बावळ्याचे कपडे झडतीसाठी ओढून त्याला उघडा वागडा करण्यात आलेले. सापडलेल्या वस्तूंमध्ये एक वीजप्रवाह तपासक होता. एक आटे-फिरवक्या. पक्कड. बारीक तारेचे रिळ. एका हाडाच्या वीजतंत्र्याच्या नेहमी अंगावर असतात ती बहुतेक

अवजारे. आणि एक छोटेखानी संगणकिय भ्रमणध्वनी यंत्र. अर्थात त्या यंत्राने सगळ्यात जास्त उत्सुकता चाळवली. ज्या नवलाईने ते लोक त्याकडे पाहत होते, त्या देशात तसले काही नव्हते. हे नक्की. प्रमुखाने ते बावळ्यापुढे उलटे धरत विचारले, "हे काईंग असिंग?"

"बघू?" म्हणत बावळ्याने बांधले हात पुढे नेता, त्याला एक उलट्या हाताची थप्पड खावी लागली. प्रमुखाचा हात चालू करण्याच्या कळीवर लागला असावा. भ्रमणध्वनीचा पडदा उजळला. दचकून प्रमुखाने एकदम तो खाली टाकून दिला.

"वं, दहा हजाराचा हाय. फोडू नका जी. सख्याला मला भरुन द्यावा लागंल." बावळ्या धुसफुसला.

"कुंठ चोरिंग तू?" बावळ्या अशा कुजकट प्रश्नांना कधी उत्तर देत नसे. थोडा वेळ विचार करुन प्रमुखाने निर्णय घेतला. "याला बांधिंग नी बरोबर घेईंग." एका लंबाड्याला तसे करायला खुणावले. "हा माणूस काईंग वेगळा प्रकार असिंग. नंतर बघिंग. आधी तिला पकडिंग."

मग कमरेवर हात ठेऊन काही वेळ त्याने हवेत चारी ठाव हुंगले. त्याला जणू सावजांचा वास लागला. त्या दिशेला बोट रोखत म्हणता झाला, "तिंथ." लगोलग आपल्या वाहनावर उडी मारुन स्वार झाला. बावळ्याची मोट बांधून इतर दोघांनी त्याला

लंबाड्याच्या वाहनावर नेऊन लादला. लंबूला बावळ्याचे ओझे वाहणं तितकेसं पसंत नसल्याचे त्याच्या नासक्या चेहऱ्यावरुन दिसले. पण तो लंबू गप्प राहिला. प्रमुखावर चोरटी नजर टाकून. त्याला नको म्हणायला भीत असावा.

वाहनांच्या घरघराटाचा आवाज वाढला. पाय मारून चालवायच्या पायचक्रीचा हा सुधारीत अवतार असावा. वाहनांचा वेग माणसाच्या धावगतीपेक्षा निश्चित जास्त होता. पण एखादी टुकार दुचाकी फटफटी त्याला हरवू शकली असती. बावळ्याला लंबूच्या मागे आडवे पालथे बांधलेले होते. त्याचे हातपाय अधांतरी हवेवर हिंदकळत होते आणि शरीरही. लंबूच्या वजनाचे त्याच्या ताकदीशी व्यस्त प्रमाण असणार. म्हणून त्याच्यावर बावळ्याचे ओझे चढवले गेलेले.

रानातल्या उबडखाबड जमिनीवरून जाण्यासाठी ती तरती वाहने फटफटीपेक्षा जास्त चांगली होती. ज्या चढ-उतारांवरून ती लिलया पार झाली, त्यावर फटफट्या उसळी खावून मोडून पडल्या असत्या. आजूबाजूच्या झाडीतून त्या दळाच्या हालचालींनी आणि घरघरीने बिथरुन प्राणी-पक्षी बाहेर पडत होते. धावत सुटत होते. एक टेकाड चढल्यावर खाली दूर लाकी आणि साथी त्यांच्या

नजरेत आले. ती दोघं पायी धावत होती. शिकारी दळ वाहनांनी पाठलाग करत होते. सामना विषम होता.

सावज नजरेच्या टप्प्यात येता, प्रमुखाने दळाला तीन भागात विभागले. चार जण उजवीकडे गेले. चार जण डावीकडे. तीन जण बरोबर घेऊन प्रमुख पुढ्यात उतरु लागला. बावळ्याचा लंबू सारथी त्याच्यामागे गेला. बावळ्याला शहरातील रस्ते आणि गल्लीतला पाठलाग अनुभवाचा होता. या जंगली पाठलागाची बात काही आगळी, मजा काही वेगळी होती. त्या हुलकावण्या, त्या उड्या, त्या सूरपारंब्या, त्या सुळकांड्या. वाहवा! तो लाकी आणि साथीवर फिदा झाला. त्यांच्या कसबाचा चाहता बनला. कसब तर वाहनचालकांचे सुद्धा कमी नव्हते. या झाडांच्या बुंध्यांना चुकवण्या, या तोंडावर आपटायला येणाऱ्या फांद्या-वेलींशी झुकावण्या, या एकमेकांच्या वाहनांवर आदळण्यापासून शर्थीने वाचवण्या.

लाकी आणि साथी खाडीच्या किनारी पोहोचलेले. उरलेल्या तिन्ही बाजूंनी शिकारी त्यांना घेरत जवळ जाऊ लागले. दोघांनी पोतड्यांतून घडीचे भाले काढून ते उभारून लांब केले. हातात धरुन लढाईला सज्ज झाले. पहिली तुकडी त्यांच्यापाशी पोहोचता, त्यांनी चपळाईने दोघा सरकारदारांना वाहनांवरून भाल्यांनी खाली

पाडण्यात यश मिळवले. ते बघून प्रमुख चिडून ओरडला, "घाईंग." आपण जोर एकवटून पायदांडे मारत पुढे सरकला.

बावळ्याचं ओझे असल्याने लंबूची त्याच्या बरोबरीत राहायला दमछाक होऊ लागली. बावळ्याने संधी साधली. मुद्दाम एका बाजूला वजन टाकायला तो सरकला. लंबूला तोल सावरता येईना. वाहन कलंडले. बावळ्या दोऱ्यांसकट बाजूला लोंबकळू लागला. वाहन भेलकांडत खारफुटीच्या झाडीत घुसले. फरफटू लागले. तोंडावर येणाऱ्या फांद्या चुकवणे अशक्य होऊन लंबू कोलमडला. वाहन चिखलात जाऊन रुतले. ढिल्या पडलेल्या दोऱ्यांतून चोर बावळ्या अलगद निसटला.

तिकडे बंडबागी आणि सरकारदार दळामधली हातघाई रंगात आली होती. दहा जणांसमोर दोघांना फार काळ टिकता आले नाही. ते दमले. त्यांचा प्रतिकार क्षीणावला. प्रमुखाने दोन दोरफास अचूक त्यांच्यावर फेकून त्यांना आवळले.

लंबू चिखलातून बाहेर पडण्याच्या नादात परत परत घसरून रुतत होता. बावळ्याला पळ काढायला नामी संधी होती. पण तो पळाला नाही. त्याचा जीव त्या अप्सरेत अडकून जो पडला होता. तो खारफुटीच्या झाडीतून होता होईल तितका जवळ सरकून,

बेमालूम लपून पुढचा प्रसंग पाहू लागला. तो इतका जवळ गेलेला की त्यांचे आपापसातील बोलणे ऐकू येत होते.

लाकीला आवळून धरायला दोन माणूस पुरले होते. पण साथीची जी सुटकेसाठी चळवळ चालू होती, त्याला धरायला चार माणूस लागलेले. प्रमुख सोडून बाकी सगळे दळ वाहनउतार जाऊन दोघा बंडबागींशी भिडलेले. "मी तुला जाईंग देईंग, जर तू मंज बंडबागींज गुप्तअड्डयांज ठिकाणा सांगिंग." प्रमुखाने त्यांना प्रस्ताव दिला. लाकी आणि साथी प्रस्तावावर थुंकले. "लवकर बोलिंग. नाईंग तर हे सगळे या पोरीवर चढिंग."

"आता सरकारेन सरकारदाराईंग गुन्हा करिंग परवानगी देईंग काईंग?" साथीने उपहास केला. "तुमी रझाकार सरकारांज भाडोत्री गुन्हेगार असिंग. राखाल, तू सगळ्याईंग मोठा नाडचुका असिंग."

आपल्या दडल्या जागी बावळ्याने 'नाडचुका' शब्द पुटपुटून बघितला. "शिवी म्हनून बेस वाटतो हाय." चुटचुटला.

"इंथ कोण साक्षीदार होईंग न. तुंजसारख्या बंडबागीनं मंज गुन्हाईंग काईंग? ते शिकविंग न. शंठाईंग शंठ." प्रमुख राखालने साथीला सुनावले. "चढिंग तिंजवर." दळाला आदेश दिला. ते कधीचे वखवखून याची वाटच पाहत होते. दात विचकत लाळ टपकवत ते लाकीवर तुटून पडले. तिचे कपडे फाडायला झोंबू

लागले. साथीला धरलेल्या गणांना आपली उताविळता आणि कैद्याला आवरणे फार फार कठीण झाले.

बावळ्याला देखील स्वतःला आवरता आले नाही. तो पुढे झेपावला. रिकामी असलेल्या एका वाहनावर उडी मारुन झपाट्याने चढला. राखालच्या लक्षात ही हालचाल येईपर्यंत, बावळ्याने त्या वाहनाच्या नियंत्रणपटावर असलेले खटके एकामागोमाग दाबून ते चालू करण्यात यश मिळवलेले. मात्र त्यापुढे त्या वाहनाची काही जाण नसल्याने तो फसला. वाहन कसेही कुठेही धावू लागले. तरी बावळ्या जोरजोराने पायदांड्या मारत राहिला.

वाहन मध्येच लाकीचे कपडे फाडण्यात गर्क गड्यांवर धावले. त्यांना धडकले. त्यातले काही पडले. गोंधळ उडाला. बिथरलेल्या बैलाने हाहाकार उडवावा, तसे ते बेताल वाहन त्या पायदळातून धुमाकूळ घालू लागले. राखाल त्याच्यामागे रोखण्यासाठी आपले वाहन दामटू लागला. वेडेवाकडे कसेही फिरणाऱ्या त्या वाहनाची धरपकड करणे खूप कठीण होत होते.

पकडधारींचे लक्ष विचलित झाल्याचा फायदा उठवत साथीने त्यांना झुगारले. त्यांच्याकडून हत्यार हिसकावले. धावून पहिले हाती मिळाले त्या रिकाम्या वाहनाचा ताबा घेतला. दळाला काही विचार सुचण्याआधी संधी साधत, त्याने बाकी वाहने त्यांच्या

नियंत्रण-पटांवर हत्यारी घाव घालून निकामी करण्याचा सपाटा लावला.

बावळ्याच्या धडकेचा फायदा घेत लाकीने सुद्धा चपळाई करत आपली सुटका करुन घेतली. तिने एका आयत्या रिकामी वाहनावर चढाई केली. ते चालू केले. ताबडतोब खाडीच्या दिशेने पळ काढला. ते तरते वाहन लिलया पाण्यावर सरसर अंतर कापत पुढे गेले.

बेबंद वाहन रोखता न आल्याने मग राखालने सरळ बावळ्यावर झेप घेतली. दोघे वाहनावरून खाली पडले. चालक न उरल्याने ते वाहन थोडे धावून गचका खावून बंद पडले. राखालचे रिकामी झालेले वाहन त्यावर जाऊन धडकले. दोन्ही वाहनांची तुटफुट झाली. उरलेल्यातली सगळी वाहने निकामी झाल्याची खात्री झाली, तसा साथी खाडीकडे लाकी गेली त्या दिशेला वाहन वळवून जाता झाला. दळातले जखमी आणि धडके दोन्ही गण हवालदिल होऊन, बंडबागींच्या दूर जाणाऱ्या आकृतींकडे बघत राहिले.

राखालच्या जबरी पकडीतून बावळ्याला निसटता येईना. पण राखालसाठी बंडबागी जास्त महत्वाचे होते. बावळ्याला दळाच्या हवाली करुन, तो घाईघाईने चिखलात रुतलेल्या लंबूच्या

वाहनाकडे गेला. तिघांना त्या कामी लावून त्याने ते चिखलाबाहेर काढवले. रुतलेल्या लंबूवर एक तिरस्कृत नजर टाकत, अजून दोघांना त्याची सोडवणूक करायला पाठवले. लंबूच्या वाहनावर स्वार झाला. वाहने दुरुस्त करून लवकर पाठलागावर निघण्याची सूचना बाकी रझाकारांना करुन खाडीकडे गेला. राखाल येतोय, हे बघून पलीकडच्या काठावर पोहोचलेले लाकी आणि साथी, दोन विरूद्ध दिशांना विभागले. राखालने साथीची दिशा पकडली.

ते नजरेआड झाल्यावर सरकारदारांचे लक्ष तावडीतल्या कैद्याकडे वळले. या सगळ्या गडबडीला तोच कारण होता. त्यांच्या हिंस्त्र नजरांमधला धगधगता राग बघताच बावळ्या समजून चुकला. आपले काही खरे नाही. जगलो वाचलो तरी कायमचे पांगळेपण नशीबात आहे. हाच का तो जीवनातला बदलाचा चमत्कार?

ते अकरा जण बावळ्याला लाथांनी तुडवायला तुटून पडले. सगळ्यांना एकदम घाई असल्यामुळे गडबड होऊ लागली. याची त्याची लाथ त्याच्या याच्यावर बसू लागली. बावळ्या हातांनी आपला चेहरा झाकून डोळे फुटण्यापासून वाचवायचा निकराचा प्रयत्न करत होता. अचानक त्याच्यावर पडणाऱ्या लाथा थांबल्या. त्याने बोटं किलकिली करून त्यातून चोरटा कटाक्ष फेकला. "ए

जनावर. चलिंग लवकर. मंज पायघोड्यावर चढिंग." लाकीचा मंजुळ आवाज त्याच्या कानात गोड किणकिणला.

पडत्या फळाची आज्ञा घेत, बावळ्याने चलाखी साधत तिची आज्ञा तंतोतंत पाळली. सफाईने दळभाराचे हत्यारी वार चुकवत लाकीने ताबडतोब पायघोडा पुन्हा खाडीत लोटला. अकरा वैतागलेले थोबडे ते जातील तिथे तसे तसे त्यांच्या मागावर उगाच वळत-फिरत राहिले. हातांच्या मुठी वळून दातओठ चावण्याशिवाय करण्यासारखे काही नव्हते. एखाद्याने पाण्यात शिरण्याचा चुकार प्रयत्न केला. त्यातला फोलपणा लक्षात आल्यावर सोडून दिला. त्यातल्या त्यात समजूतदारांनी आपल्या पायघोड्यांकडे धाव घेऊन, ते कसे चालू करता येतील? याकडे लक्ष पुरवले.

पलीकडे काठावर पोहोचल्यावर बावळ्या त्यांच्याकडे वळून जोराने त्रिवार ओरडला, "नाडचुके." अकरा चरफडलेल्या जबड्यांमधल्या दातांच्या रगडण्याचा कराकरा आवाज, त्यावेळी जगातील सगळ्या आवाजांवर मात करुन गेला.

## १०० वर्षे पुढे - प्रकरण ८

"ए जनावर, मंज कमरेईंग हात काढिंग बाजूला. अंगाला चिकटिंग नाईंग." लाकीने पायघोड्यावर तिच्यामागे घट्ट बिलगून बसलेल्या बावळ्याला फटकारले. वाहनाच्या घरघराटावर आवाज चढवून तिला बोंबलावे लागत होते.

"मी पडलो तर वं?" बावळ्याने सबब पुढे केली. "माझं नाव जनावर नाय. बावळ्या हाय. तुझं नाव काय हाय?" लाडात येत ओरडत विचारले.

"बंडबागी असिंग." लाकीने एका मोठ्या झाडाच्या बुंध्याला सफाईने बगल दिली. बावळ्याचा विरुद्ध बाजूला तोल गेला. त्याचे हात सुटले. तिने ते मुद्दाम केल्याचा संशय येऊन बावळ्याने मुद्दाम तोल अजून जाऊ दिला. लंबूला पाडायला जाऊ दिलेला तस्सा. पण लाकी डगमगली नाही. ती जागेवर टिकून राहिली. "परत जर अंस्स करिंग तर तुला खाली फेकिंग नी निघूनिंग जाईंग." धमकावले. "मंग रझाकार येईंग. तुला पकडिंग."

"काय की माझा संशय घेते गं बाये?" बावळ्या चुकचुकला. "नी मला त्या गुंडांच्या तावडीत मरायला देते हाय?" मग तिच्या कानाशी तोंड लावून कोकलला. "आधी बांधून आश्शी

गेली. मंग सोडवायला आश्शी परतून आली की. काय कळंना माझ्यासाठी इतका धोका कशाला की मोलुन राहली हाय?"

"तू रझाकार असिंग न. म्हणहून. तुला त्यांज तावडीत मरिंग सोडींग न." त्रासलेल्या लाकीने एका व्हाळावरुन पायघोडा दामटला. दुतर्फा पाण्याचे फवारे उडाले. "आमी बंडबागी गरीब लोकांना रझाकारांज जुल्मातून वाचविंग. तेच आमांज कर्तव्य नी काम असिंग." अभिमानाने सांगितले.

"मी रझाकार नाय." बावळ्याने तिचे म्हणणे मान्य केले. "पन गरीब हाय. असं कशाला गं म्हनते?" त्याला अपमान झाल्यासारखे वाटले. "चांगला नामी चोर हाय. मुंबईच्या हरेक सरकारी ठान्यात माझं नाव फलकावर इनामासाठी लावलेलं हाय की. आठवड्याची कमाई लाखांखाली नाय. काय?" बारक्याश्या मिशीला पीळ घालायला त्याने हात वर नेला. तेव्हा वाटेत आड आलेल्या बोगनवेलीच्या काट्यांनी त्याला फटकारला. ओरखडे काढले. "स्स आय?" करायला लावले.

"तुंज तोंड पहिल्यादा पाहिंग तेहवाच मंज कळिंग, तू कोणी फडतूस असिंग म्हणहून." लाकी फसफसली. "म्हणहून तुला बांधिंग. तुला फटकाईंग. तेच बरोबर असिंग. चोर? हा हा हा...."

आपला अंदाज बिनचूक निघाल्यावर माणसांना जो आनंद होतो, त्यात चिंब होऊन ती हसत सुटली.

"हां? मला फडतूस म्हनायचं काम नाय. मी पायघोडा त्या दहा शिपायगड्यांमध्ये घातला नसता, तर मंग कळलं असतं. हसायचं पुरा जल्म इसरली असती. काय?" बावळ्या सात्विक संतापाने फणफणला.

"चोर, तू पळिंग न. मंजसाठी काईंग लढिंग?" त्या स्थितीची भयानकता ध्यानात येऊन लाकी गंभीर झाली.

"मी चोर हाय. पण कापारकाळीज नाय ना." बावळ्या तिरसटला. व्यंग केलं. "काय की पिरेमाचं खूळ लागलं हाय ना काळजात. त्याच्यात बाईलयेडा मानूस करतो अशी काय बाय चक्रम करनी कंधी कंधी. नाय तर तुमच्यावानी फुका कोना गरीबासाठी जीव टाकनारं, तितकं मोटं काळीज नस्तं जी आमच्यावानी हलक्या मानसांचं."

बावळ्याच्या या टिप्पणीवर लाकी मूग गिळून गप्प बसली. कानकोंडी झाली. बावळ्या सुद्धा तोंडातून पटकन गेलेल्या प्रेमाच्या कबुलीने ओशाळवाणा होऊन उगी झाला. दोघांमध्ये नकळत तणाव निर्माण झाला. प्रवास हिरव्यागार रम्य रानातून चालू राहिला. खूप सारी बहरलेली फुलझाडे सगळीकडे दिसू लागली. अनेक छोटे

छोटे निर्झर सतत आडवे येऊ लागले. मुद्दामहून केलेल्या बागांच्या रचनेसारखे सर्वत्र भासू लागले. हे इतके सुंदर होते की शेवटी बावळ्याला कौतुकासाठी तोंड उघडल्याशिवाय राहवेना. "हा स्वरगच हाय की जनू. काय हाय ही जागा?"

"तुला खरेईंग माहीतिंग न?" लाकीने नवल केले. "ही गोराई असिंग. ते बघिंग पुढं काचबन दिसिंग." तिने बोट दाखवलेल्या दिशेने पाहता, बावळ्याला दूर क्षितिजापाशी भर दुपारच्या उन्हातला चमचमाट दिसला. पाव घटकेत पोचिंग आपण तिंथ." तिने आश्वासायला आणि पायघोड्याने आचके द्यायला एकच गाठ पडली.

एकदम वाहन खूप हळू झाले. लाकीने पाय किती जोरजोरात मारले तरी खडखड करत ते हळू चालू लागले. त्याची जरा तपासणी करता तिला त्यावर लावलेली कागदी पट्टी दिसली. "हुडत! ही सरकारदारं कंस्स जुनाट मोडकी सामुग्री वापरिंग? हा बट्टा सांगिंग की यांज दुरूस्ती दिनांक सात पौष एकवीस हजार वीस सालात झालिंग. आता त्याला पुरं एक वर्ष जाईंग. परत यांज देखभालिंग करिंग नाईंग. सरकारांज कारभार."

"एकवीस हजार एकवीस साल? काय खुळ्यात काढते हाय काय?" बावळ्या हसायला लागला. "हे वीस हजार वीस साल

चालू हाय. आनी ही गोराई? इतकी बिनावस्ती रिकामी? मी काय आजच भाऊच्या धक्क्यावर पाय ठेवला नाय हाय. पुरती सहा वर्स काढली हाय मुंबापुरीत. चोरीमारीत मुंबैचा कानाकोपरा धुंडाळीत. काय?"

"खुळचुका तू असिंग. हे एकवीसशे एकवीस साल असिंग." लाकी किंचाळली. "साथीला विचारिंग. कोणाईंग विचारिंग. हे एकवीसशे एकवीस सालच असिंग." ती आधीच पायघोड्याच्या रडतचालीने वैतागलेली होती. त्यात ही भर.

"काय बिलामत हाय? तू म्हनती तर खरं असंल बी." बावळ्याच्या डोक्यात विचार वेगाने धावू लागले. "सख्याकडं मी तसलं चित्रपट बघितलं हाय. काय की एकदम मानूस शंभर वर्स मागं जातो. शंभर वर्स पुढं जातो. काय म्हनतात त्याला? हां! आठवलं. कालयंत्र." सगळी कोडी सुटल्यासारखे त्याला हायसे झाले.

"तू म्हणिंग की तू कालयंत्रान शंभर वर्ष मागईंग येईंग? तू कालयंत्रांज शोध लाविंग असिंग?" लाकीने खवचटपणे विचारले.

"कालयंत्र नाय. ते तेस्लाचं तारेचं खांब होतं ना? त्याच्यात स्फोट जावून." बावळ्याला खात्री होती. "तसलं खांब तिथं बी होतं की? तुमी मला पैलं भेटले त्या जागंत."

"उतरिंग इंथ." लाकीने गतिरोधक करकचून दाबून पायघोडा थांबवला. त्यासरशी बावळ्या तिच्यावर आपटला. "तू म्हणिंग तू शंभर वर्षांमागईंग येईंग. साफ खोटंईंग असिंग. मी थकिंग तुंज थापा ऐकिंग. कितीईंग ढोंग करिंग. मंज असला खोटा माणूसस बरोबर असिंग न. उतरिंग."

"मी खोटा नाय हाय." बावळ्या तावातावाने म्हणाला.

"मग कबुलिंग की तू यांज काळातला असिंग." लाकीने अट घातली.

"तसलं खोटं मी कसाच बोलनार नाय." बावळ्या हट्टाला पेटला.

"मग उतरिंग तर." लाकी सुद्धा हट्टाला पेटली.

"मला राखालनं परत पकडला तर? मारुन टाकला तर?"

"तू तर शंभर वर्ष मागांज असिंग. साठ-सत्तर वर्ष आधीच मरिंग होईंग. तो तू त्यापेक्षा आधीच खूपईंग जास्ती जगिंग असिंग. आणखीईंग जगिंग काईंग करिंग?"

"बंडबागींचा काम हाय ना, रझाकारापास्नं लोकाचा जीव राखाचा? मला मरायला कशाला सोडते हाय? उपकाराची फेड अशी अपकारानं कशापायी करते हाय?"

"तू मंज वाचविंग. बदल्यात मी तुला जीव वाचविंग. फिट्टमफाट होईंग. राखाल फार लांब असिंग. तुला भरपूर वेळ नी सवड असिंग. लवकर सुरु करिंग पळिंग. उतरिंग."

"नाय उतरत जा."

"तुंज बाप पण उतरिंग." म्हणत लाकीने पायघोडा परत चालू केला. यावेळी तिने तो अतिशय वेडावाकडा फिरवायला सुरुवात केली. कसाही कुठेही गरगरवायला लागली. यात तिचे हात सुकाणू-हाताळूवर घट्ट असल्याने ती पायघोड्यावर टिकून राहिली. बावळ्या कमी नव्हता. तो तिलाच घट्ट मिठी मारून राहिला. त्याला शिव्या घालता घालता, त्याला कोपरांनी मागे दट्टे लगावता लगावता, तिच्या हातातून सुकाणू निसटले. पायघोडा एका खड्डयात कोसळला. त्यासोबत दोन्ही स्वार.

लाकीच्या दुर्दैवाने ती मधुमालतीच्या काटेरी जाळीत पडली. अडकली गेली. बावळ्याच्या सुदैवाने तो रानजाईच्या मऊ जाळीत पडला. त्यातून हातोहात सुटून बाहेर पडला. तिला चिडवू लागला. "आपली तर उपकाराची फिट्टमफाट आधी झालंली हाय. तेवा जाऊ ना मी आता माझं तोंड काळं करुन? राखाल येलच की तुला शोधत. तोवर राहा हा बाये वाट बघत." तो वळला. निघून जायचं नाटक करु लागला.

"अंस्स काईंग करिंग?" तो खरेच गेला तर? या भीतीने लाकी ओरडली. "मंज बाहेर काढिंग नी जाईंग मंग तू कुंठ पण."

"का काढायचं तुला बायेर? मी तर खोटा मानूस हाय ना? माझी सावली बा तुझ्यावर पडता नाय. मंग?" बावळ्याने पाठ फिरवून तिला विचारले.

"बंर बाबा बंर. तू शंभर काईंग? हजार वर्ष मागाईंग येईंग. मी सगळं मानिंग. तुंज सगळं खरं. तू राजा हरिश्चंद्र." लाकीला याशिवाय गत्यंतर उरले नाही.

"अडला हरि नी गाढवाचं पाय धरी. असं म्हन की सरळ?" बावळ्याने जखमेवर मीठ चोळले. "पन आता तू हरिशचंदराचं नाव घेतलं हाय. म्हनून तुला बायेर काढतो." मोठ्या आढ्यतेने म्हणाला. मात्र तिच्या जवळ गेल्यावर त्याला वेगळं काही सुचले. "तुला मोकळी केल्यावर तू मला पुन्ना फाटूयावर मारला तर गं? असं नाय चालायचं. आधी आयेची शपथ घे."

"शप्पथ?" लाकीने नाक मुरडले. पण तो तसाच माघारी जायला वळल्यावर ओरडली, "घेईंग. बंडबागींज सगळयाईंग मोठी शप्पथ घेईंग, महान युगनायकांज शप्पथ की मी तुंज विश्वास मोडिंग न. तू पण मंज विश्वास मोडिंग न. शपथ घेईंग तू तंशी?"

"कुनाची? महान युगनायकाची? कोन हाय हा? मला नाय ठाऊक. तुझा राजा हाय काय? मी नाय मानत कोनाच मानसाला. नाय देवाला. सगळ्यांचा इश्वास कधीचाच उठला हाय माझा. ल्हान असतानाच." बावळ्या बडबडला. लाकी काही बोलली नाही. गप्प बसली. बावळ्याने वाट बघितली बघितली. लाकी बधेना. "मी नाय मानत कुना युगनायकाला. मंग काय बोलते? जाऊ काय असाच?" ती फुरगंटून राहिली.

बावळ्या तिला सोडून निघाला. खड्ड्याच्या बाहेर पडला. पण ती काहीच बोलेना. तो बराच वेळ बाहेर बसून राहिला. मग मिळालेला वेळ कारणी लावत रानजाईचा पाला त्याने दगडांनी ठेचला. त्याच्या आईकडून असले मोफतचे उपाय तो शिकला होता. तो लेप त्याने मलमासारखा आपल्या जखमांवर आणि माराच्या वळांवर लावला. "ए बाई, जखमांवर इलाज म्हनून हा लेप लावते काय?" तिने त्याला उत्तर दिले नाही. कंटाळून पुन्हा खाली उतरुन बावळ्या खड्ड्यात तिच्यापाशी गेला. "लय पिरेम हाय वाटतं तुझं त्या युगनायकावर?" खजिल होत बोलला आणि वेलीचा गुंताळा सोडवू लागला.

"जो महान युगनायकाला ओळखिंग न, मंज त्यांज उपकार नाईंग होईंग." ती खडूसपणे म्हणाली. बावळ्याने जरा तिचा अंदाज घेतला.

"बरं तर, तुझ्या त्या युगनायकाची शपथ. झालं समाधान?" वेलीला सोडवत हळवा झाला. "मी हाय मागच्या काळातला. मला कसा मायेत असनार कोन तो? माझ्या काळात तर तसा कोन नाय होता. रागावते कशापायी? तू सांग की तो कसा हाय? भेटिन म्हनतो एक ठाव."

लाकी चिडून काही बोलायला गेली. "तुंज शंभर वर्षे मागाईंग.....?" तिच्या लक्षात चूक आली. "मी शपथेनं विश्वास करिंग म्हणिंग, तर आता तुंज विश्वास करिंग." समजूतदार झाली. "महान युगनायक आता या जगात असिंग न. पण त्यांजमुळेच हे जग जिवंत असिंग. आम्ही असिंग." तिने भक्तीभावाने डोळे मिटले. बावळ्या उसासला. त्याच्या लेखी श्रद्धावान माणसं ही खुळी मूर्ख माणसं होती. ते तिला सांगायची ही वेळ नाही, एवढं त्याच्या ध्यानात आले.

बावळ्याने तिला मोकळी केल्यावर दोघे खड्डा चढून बाहेर पडले. "आता तू कुंठ जाईंग?" तिच्या प्रश्नावर त्याने खांदे उडवले.

"शंभर वर्स मागून आलंली मानसं जातात तिथं." तिच्या चेहऱ्यावरच्या गोंधळाची गंमत बघत म्हणाला, "आपल्या ओळखीच्या मानसांकडं. तसं माझं तुझ्याशिवाय आनी कोन हाय इथं? तू नेशील तिकडं."

# १०० वर्षे पुढे - प्रकरण ९

बावळ्या नव्या काळाची नवी वैशिष्ट्ये टिपण्यात गढून गेला. शंभर वर्षांनंतरचे आकाश निळे होते. झाडे हिरवी होती. पाणी रंगहीन आणि वाहते होते. पशु आणि पक्षी लाजरे बुजरे होते. फुले वेगवेगळ्या रंगागंधांची होती. फळे? त्याला चाखून बघायची होती. विशेषता पोटात भुकेचा आगडोंब उसळला असताना. लाकीने त्याला आश्वासन दिले होते की खाण्या-पिण्याची यथायोग्य व्यवस्था काचबनात शिरकाव केल्यावरच होणार होती. त्यासाठी ते काचबनाकडे जाणाऱ्या मार्गावर दबा धरुन बसलेले होते. विषारी कण्हेरीच्या गुलाबी सुवासिक फुलांनी भरुन गेलेल्या झुडुपाआड.

"तुंज काळानंतर तेहवा मुंबैत दर्या घुसिंग नी अर्धीईंग जमीन पाण्यात बुडिंग. बंदर नी व्यापार आता उरणला होईंग. तिंथ मोठं शहर होईंग. इंथ ज्या टेकड्यांज बेटं बनिंग, त्यावर तिंथल्या शहरवाल्या पैसेवाल्यांंज सुट्टीईंग घालविंग घरं असिंग. तेच ते काचबन समोर चमकिंग." लाकीने काही अंतरावरच्या त्या चमचम काचेच्या मनोऱ्यांकडे इशारा केला.

दोन्ही बाजूंनी एकावर एक रेललेल्या मोठ्या सरळ दगडी कड्यांनी एकत्र येऊन त्यातून मध्ये कमान बनावी, तसे ते महाद्वार

दिसत होते. जर त्यांच्यातून प्रकाश आरपार जात नसता, तर ती नैसर्गिक रचना वाटली असती. पण ते सगळे रंगारंगांचे काचखंड होते. ही कमाल होती. कमानीच्या दुतर्फा सुरक्षारक्षकांच्या चौक्या होत्या. त्या कमानीच्या एखाद्या माडाच्या झाडाएवढ्या लांब-रुंद पोकळीतून, पलीकडील तश्याच काचखंडांच्या बांधकामाची चमचम मोहवणारी होती. बावळ्याची उत्सुकता तिथे जाण्यासाठी उतू चालली होती.

इथपर्यंत त्या वसाहतीच्या महाद्वारापाशी पायघोड्याशिवाय पोहोचायला, त्यांना तासाभराची पायपीट करावी लागली होती. आत प्रवेशासाठी तिथे उभ्या रखवालदारांशी पंगा घ्यावा लागला असता. त्यापेक्षा जास्त सोप्पा मार्ग लाकीला सुचला होता. पायरथांमधून अनेक श्रीमंतांची लगबग द्वारातून आत-बाहेर चालू होती. त्यातल्या एखाद्याकडून ती प्रवास-अनुग्रह मिळवणार असती. जेवढ्यात ती त्या श्रीमंताला लाडेलाडे गुंडाळतेय, तेवढ्यात बावळ्याने मागच्या सामानासाठीच्या खणात शिरकाव करुन लपायचे होते. म्हणजे ते दोघे बिनबोभाट कोणत्याही सुरक्षा तपासण्या आणि परिचयपत्रांशिवाय आत घुसू शकले असते.

"तयार राहिंग. तो लाल पायरथवाला जाड्या आमांज बकरा असिंग." लाकीने बावळ्याला कोपर मारुन सावध केले. चार वार

लांबी-रुंदीचा तो पायरथ होता. त्याच्यावर त्याच रंगाची कापडी कमान सावलीसाठी बसवलेली होती. डामडौल बराच केलेला होता. महत्वाचे म्हणजे त्यातला चालक-स्वार एकटा होता. लाकीने आपले फाडलेले कपडे जरूरी ठिकाणांवर अजून उघडे केले. वळणावर ती त्याच्या नजरेत भरेल अश्या बेताने उभी राहिली. त्या स्वाराचे लाकीचे उघडे वळसे-जलसे पाहून जे काय हाल व्हायचे, त्याच्या आधी बावळयाच्या कानातून गरम वाफ जाऊ लागली.

"हुऊऊ ऊऊहुहू!" गुलाबी कपड्यातला चालक गुलफाम होताच. लाकी दिसल्यावर त्याची शिट्टी वाजायला वेळ लागला नाही. तिने संकटात सापडलेल्या, गुंड मागे लागलेल्या तरुणीची बतावणी चांगली केली. "मंज मागाईंग बदमाष असिंग. मंज वाचविंग. खूप उपकार होईंग रावजी." तसे ते सांगणे खोटे नव्हते. फक्त ते गुंड सरकारी होते. हे सरकारी मेहरबानीवर श्रीमंत झालेल्यांना सांगण्यासारखे नव्हते.

"उहूहूूू! मंज खुशी असिंग की तुंजसारख्या सुंदरीला मदत करिंग. येईंग. आत येईंग." हिरव्या पानांच्या अंगभर लेपाने हिरव्या झालेल्या लाकीला, चालकाने कोणताहि खुलासा न मागता आपल्या शेजारी दिलदार आश्रय दिला. त्याचा चेहरा जितका गुळगुळीत होता, त्याचा आवाज तितकाच खरखरीत होता.

बावळ्यासारख्या कसबी चोरासाठी खड्या पायरथात चोरुन मागून शिरकाव करणे पोरखेळ होता. पायरथ महाद्वाराकडे तीन प्रवासी घेऊन रवाना झाला.

प्रवेशद्वारावरील रखवालदार अरसिक होते. त्यातल्या निम्म्या खाष्ट नमुन्याच्या बथ्थड चेहऱ्याच्या मत्सरग्रस्त झालेल्या बायका असल्याने, त्यांनी या संकटग्रस्त सुंदरीची कसून उलटतपासणी घेतली. त्यांच्या चालकाशी चाललेल्या चौकशीत स्पष्ट झाले की तो आज मालकाच्या महाली एकटाच होता. मालक काही दिवसांनी दौऱ्यावरुन परतणार असल्याने आगाऊ साफसफाईसाठी आला होता.

मालकाचे सरकार दरबारी चांगले वजन असावे. कारण रथचालकाने उद्दामपणे चौकशी उडवून लावली, तरी त्यांनी लाकीला ओळखपत्राशिवाय आत प्रवेश दिला. कदाचित बाकी लब्धप्रतिष्ठितांकडे येणाऱ्या-जाणाऱ्या बायकांना कसा परवानापत्राशिवाय प्रवेश दिला जातो, याची नावानिशी जंत्री रथचालकाने उच्चारायला सुरुवात केल्यामुळे सुद्धा असेल. पायरथाची कसून तपासणी करायचा उत्साह संपून, त्याला सहज प्रवेश मिळाला.

बावळ्या लपल्या जागेवरून काचबनाची नवलाई शाळकरी मुलाच्या उत्साहाने पाहू लागला. ते पुढे सरकत होते तो मार्ग आरसपानी बिलोरी गोटे रचून बनवलेला होता. वाहने त्यावर घासली जात नसल्याने, न झिजलेला. जसं की बड्या लोकांच्या वस्त्यांमध्ये नेहमी आढळतं, त्यावर पायी चालणारं कोणीच नव्हतं. पायरथाची गती मंदावली होती. लाकी चालकावर जाळं टाकत होती की चालक लाकीवर? हे नक्की सांगता आले नसते. एकमेकांना हरभऱ्याच्या झाडावर चढवण्याची दोघांत स्पर्धा सुरू होती.

"तुंज चेहरा किती मोहक असिंग!"

"नी तुंज शरीरबांधा!"

"तुंज आवाज!" ही तर लाकीने केलेली व्याजोक्ती होती.

"तुंज सगळंच!"

"तुंज पण सगळं!"

"पण तुंज मंजपरीस जास्त सरस असिंग!" सारथ्याने खरं सांगितलं.

"न. न. न. तू मंजपरीस!" लाकीने खोटं चढवून ठोकून दिलं.

"न." सारथ्याने आतडी पिळवटून नाकारलं. "तू!" ओठांची दुमड चुंबी केली. मग त्यांच्यात त्याच्या मालकाच्या महाल-दारात पोहोचेपर्यंत हा गोड-गोड वाद चालू राहिला.

वाटेत तिसरा प्रवासी मागच्या सामानकप्प्याचं झाकण किलकिले करुन, काचबनाची सुंदरता आसूसून निरखत राहिला. यापूर्वी एकदा लोणावळ्यातला एक बंगला लुटायला तो गेला होता. तिथल्या आवारातल्या दगडांच्या बगिचाची सुंदरता त्याच्या मनावर कायमची कोरली गेली होती. त्याचा साथी म्हणाला होता की ती चंदीगडच्या दगडी बगिचाची नक्कल होती म्हणून. ते आवार जेमतेम काही गुंठ्यात पसरलेले होते. इथे मात्र नजर पोहोचते तो बगिचाच होता सगळा. दगडांपेक्षाहि और असा. अर्धपारदर्शक काचेचा वा स्फटिकांचा.

आख्खे काचबन म्हणजे जणू खऱ्याखुऱ्या झाडाझुडूपांचा रचलेला एक प्रचंड हिरवा गालिचा होता. त्यातल्या अधल्यामधल्या वळणदार रेषा म्हणजे बिलोरी काचगोट्यांनी बनवलेल्या मार्गिका होत्या. त्यातून पाण्याचे नाले झुळझुळत होते. त्या सुर्यप्रकाशात चमचमणाऱ्या प्रकाशनद्या भासत होत्या. या जिवंत गालिचावर फुललेली काचफुले जशी, असे काचखंडांचे महाल होते. तश्याच एका महालासमोर पायरथ उभा ठाकता झाला.

त्याच्या सगळ्या परिघावर असणारे पंखे चालकाने कळ दाबून वळवले. त्यांच्या कडा खाली जमिनीवर टेकल्या. पायरथ थांबला.

सुरेख आकारातील निवडुंगांच्या कुंपणाला असलेला बंद दरवाजा उघडायला चालक उतरला. काचशिल्पाची ती दोन पुरुष उंच वेलीची कमान होती. चालकाने तिच्या डाव्या बाजूकडील नामफलकाखालील चित्रकूटावरील तुकड्यांची जरुरी जुळणी करून दार उघडे केले. बावळ्या उसासला. जर या काळात सगळीकडे अशी चित्रकोड्यांची कुलुपं असली, तर त्याचा धंदा वांध्यात होता. यांच्यावर झटपट गुरुकिल्लीचा वापर करुन ती उघडणे दुरापास्त होते. नामफलकावर 'पन्नाशेट हुंडीवाले' असे कोरलेले होते. चालक पुन्हा वाहनात येऊन बसला आणि ते आत त्याच्या ठरलेल्या जागेवर नेले. मग सुहास्य करत बोलला, "सुंदरी मंज या गरीबखान्यात तुंज स्वागत असिंग."

त्याला ते स्वागत तिला मिठीत घेऊन आणि गालावर चुम्मी देऊन जोशात करायचे होते. त्याच्या फैलावलेल्या हातांमधून चपळ सुटका करून घेत, लाकीने मानेला लाडीक झटका दिला. "इंथ उघड्यावर नाईंग. लोक बघिंग ना? आधी आत तर चलिंग."

"चलिंग चलिंग. आधी आत चलिंग." तो खुशालत दुप्पट उत्साहीत होत म्हणाला. लगबगीने महालाच्या दाराकडे गेला.

त्याने ते कसे उघडले? ते बावळ्याला लपल्या जागेवरुन दिसू शकले नाही. त्यामुळे त्याची मोठी पंचाईत नंतर झाली. लाकी चालकासह आत गेल्यावर तो रथातून बाहेर आला. पण त्या दाराची ती तीन चक्रे एकामेकात गुंतलेली मूठ फिरवायची कशी? त्याला उमज पडेना. भरीला आतून धडपडीचे आवाज कानांवर येऊ लागले. मोठमोठ्याने धपापण्याचे सुद्धा.

बावळ्याचा जीव उडाला. एका जातिवंत चोराचा एका फडतूस पुढच्या काळातल्या दाराने पराभव करावा? धिक्कार असो. स्वतःशी चुटपुटून तो चोर त्या घरात घुसखोरीचा दुसरा मार्ग शोधायला त्याभोवती टेहाळू लागला. त्या घराची बांधणी आखीव-रेखीव चौकोनी पद्धतीची नव्हती. वळणावळणांच्या भिंतींचे आकार घाटदार डेरेदार फुलपाकळ्या एकमेकांमध्ये मिळवाव्यात असे काहीसे होते. त्यात त्या गोटेदार गुळगुळीत काचबंदी होत्या. त्यांच्यावर चढायला जाता, हातपाय सुळसुळून घसरगुंडीसारखे खाली घसरुन येऊ लागले. चोर चांगला चरफडला. येणाऱ्या काळात चोरांचे फार वाईट दिवस होते. त्याने शिव्या हासडल्या. त्या भिंतींवर हातपाय मारले. त्यांच्यात एक वेगळी लवचिकता होती. बदामी हलव्याची असते तशी. घट्टपणा होता. अर्धपारदर्शक होत्या. आणि स्पर्शाला मऊसर सुद्धा होत्या. त्या सुरीने कापता आल्या असत्या कदाचित. त्याच्यापाशी असणाऱ्या

सगळ्या धारदार गोष्टी राखालने काढून घेतल्या होत्या. त्याने राखालला शिव्या मोजल्या.

एक दबकी किंचाळी बावळ्याच्या कानी आली. त्याला राहवेना. इतर कोणी पाहण्याचा धोका पत्करुन तो लगतच्या ताडाच्या झाडावर सरसर चढला. वरुन त्याला खिडकीवजा भोक दिसले. मनाचा हिय्या करुन त्याने छलांग लगावली. तो छप्पराच्या घोटीव आकारावर आपटला. मुक्या माराने कळवळला. न घसरण्याचा प्रयत्न करत त्या भोकाकडे सरपटत गेला. आत डोकावता त्याला खाली लाकी आणि चालकामध्ये चाललेली दे दणादण दिसली. जवळजवळ पाच पुरुषभर उंचीवरुन त्याने खाली उडी घातली तीच चालकावर. दुहेरी फायदा झाला. बावळ्याला आपटमार कमी बसला आणि अर्थातच चालक ढेर झाला.

त्याबरोबर लाकी न आवरता येणाऱ्या पोटदुख्या हास्याने गडाबडा लोळू लागली. माराने कळवळणाऱ्या बावळ्याला तिचा जाम राग राग झाला. "तुला दार उघडं ठेवायला काय झालंलं?" ती उत्तर द्यायचा प्रयत्न करु लागली. पण तोंड उघडू जाता परत परत हास्याची उबळ बाहेर फुटू लागली.

"हा थोडीच ठेविंग देईंग?" खूप शर्थीने ती बोलू शकली. "हा?" चालकाकडे बोट करत पुन्हा हासण्यात फसली गेली.

बावळ्या कलून चालकाच्या शरीरावरुन बाजूला झाला. चालकाची काही हालचाल दिसेना. तशी लाकी गंभीर झाली. "काईंग मरिंग की काईंग?" ती जवळ जाऊन चालकाला चाचपू लागली. मग त्याच्या डगल्याच्या कडा टरकावून ते उघडण्यात गुंतली. "तुंज कपडे काढिंग नी आता ह्यांज घालिंग. मंग लोक ओळखिंग न की तू वेगळा होईंग."

"आधी तुझ्या फाटलल्या कपड्यांचं काय ते बघ की." बावळ्याने कूस न बदलता पाठमोरे तिला सुनावले.

ती ते कपडे कसे उघडतेय हे बघणे बावळ्याला चुकले. ना त्या कपड्यांना गुंड्या होत्या. ना अडकवायचे आकडे. ना उघडझाप करणारी गुंतलसाखळी. "अय्याईंग!" लाकीच्या तोंडातून अस्फुट आरोळी निघाली. त्यामुळे बावळ्या तिच्या बाजूला कडेवर वळला. "हा बाप्या असिंग न. ही बाई असिंग."

बावळ्या अंगात मारणाऱ्या कळांकडे दुर्लक्ष करत उठून बसता झाला. "काय की काय?" त्याचे लक्ष त्या आडव्या पडलेल्या चालकाच्या शरीराकडे गेले. खास करुन छातीच्या उघड्या पडलेल्या गोऱ्या उभारांकडे. तसे लाकीने लगेच ते कपड्यात पुन्हा आच्छादले. "हिजडा?" त्याला जी कारणमीमांसा सुचली. ती

त्याच्या ओठांतून शब्दरुप घेत बाहेर पडली. लाकीने आपले हात चालकाच्या बेंबीखाली नेऊन तिथली चाचपणी केली.

"नाईंग. बाईच असिंग." लाकीने निष्कर्ष जाहीर केला. तशी गुदगुल्या झाल्यागत चालकाच्या शरीराची वळवळ झाली. सावध होत लाकीने त्या बाईच्या कपड्यांनी तिला बांधून घालायचा उफराटा तोकडा प्रयत्न केला. बावळ्याला नजरेने खुणावले. काही बांधायला शोध.

त्याने त्या दालनावरून नजर फिरवली. गेल्या गणपती उत्सवात वरदाभाईच्या मंडळाने गणेश मंडपात बर्फमहालाची सजावट केलेली होती. तशा एखाद्या सगळीकडून प्रकाश झिरपणाऱ्या पारदर्शी महालात वावरतोय असं वाटत होतं. तसला बर्फाळ थंडावा इथं नव्हता. अर्धपारदर्शक दगडांच्या गुहेत असल्यासारखे त्याला भासत होते. भिंती छप्पर जमीन कुठे सुरु होतात? कुठे संपतात? त्याच्या रेषा नसलेले. त्या दालनात आसन-खुर्च्या-मेज वगैरे सामानसुमानाच्या जागी, दगडी लेण्यांमधून असतात तसे बांधकामातून त्याकामी बनवलेले बिनधारेचे घडीव आकार फक्त होते. फडताळं होती. त्यात शोभेच्या की कामाच्या वस्तू मांडलेल्या होत्या. मग त्याने तिथल्या गाद्या-गिरद्यांकडे मोर्चा

वळवला. त्यांचे अभ्रे टरकावले. त्यांच्या चिंध्या करुन त्यांनी त्या बाईचे हातपाय जुजबी बांधले.

लाकीने चेहरा थपथपवून तिला शुद्धित आणले. "ए बये कोण असिंग तू?" खडसावून विचारले. त्या बाईने हालचालीचा प्रयत्न केला. बांधून घातल्याची जाणीव तिला झाली. मग तिचे लक्ष बावळ्यावर गेले.

"हा कोण असिंग? तुंज यार? दोघं मिळिंग नी चोरी करींग?" त्या बयेने उलटा प्रश्न केला. ती घाबरलेली वा गोंधळलेली अजिबात दिसली नाही. मग हसायला लागली. "चोर विचारिंग चोरणीला कोण असिंग तू?"

"तू चोर असिंग?" लाकीने डोक्याला हात लावला. एक कटाक्ष बावळ्यावर टाकला. "आज काय चोर-जोर दिन असिंग? इंथ तिंथ चोरच चोर."

"पन मंग हिला दारावरच्या पहारेकऱ्यांनी वळख देऊन आत सोडलं ते कशापायी?" बावळ्याला शंका आली. "हिची तर त्यांच्यासंग वर्सांची वळख कशी वाटली?"

ती बाई बावळ्याला आता एकटक निरखू लागली. "तू जुन्या काळांज भाषा काईंग बोलिंग? तुंज कपडे सुद्धा तंस्स असिंग."

"तू आमांज प्रश्न विचारिंग न. आधी आमांज प्रश्नांज उत्तरं देईंग." लाकी त्या बयेवर चिडली.

"तू मंज प्रश्नांज उत्तरं देईंग. तरच मी तुंज प्रश्नांज उत्तरं देईंग." त्या बयेने आपला हट्ट चालू केला. आधी त्या दोघींमध्ये जो गोड वाद रंगला होता, तसा आता तिखट वाद रंगला. तू आधी की मी आधी?

शेवटी बावळ्याने कंटाळून मध्ये हस्तक्षेप केला. "जर तू उत्तर नाय दिलं, तर तुला अशीच हातपाय नी तोंड बांधून ठेऊन जातो की? मंग बस, मालक दोन-चार दिसानी येईतोवर ठनाना करीत तशीच जागेवर."

"विचारिंग तू काईंग विचारिंग ते." ती नरमली.

"आधी मंज सांग, तू बाई असिंग. तरही मंजवर अतिप्रसंग का करिंग? मंजसाठी लाळ काईंग टपकविंग?" लाकीला कधीची जाचणारी मळमळ तिने बाहेर काढली.

"कारणिंग की मी एक बाईलवेडी असिंग." इतकी साधी गोष्ट तुम्हाला कळू नये? अशा आविर्भावात ती बया म्हणती झाली. लाकी आणि बावळ्याने एकमेकांकडे भिवया उंचावून बघितले. "पण जर मंज तुंजसारखा मदन मिळिंग, तर मी तुंज सोबत शय्या

करिंग तयार असिंग. काईंग बोलिंग?" तिने बावळ्याकडे ओठांनी चुंबन उडवले. त्याच्याकडे घसटत सरकली.

"पन मी हाय पुरुसवेडा. तर कसं जमनार बोला?" बावळ्याने जशास तसे चटपटीत उत्तर दिले खरे. मात्र लाकी चमकली आणि त्याच्याकडे किंव भरल्या नजरेने जेव्हा पाहू लागली, तेव्हा त्याच्या लक्षात आलं की तो जरुरीपेक्षा जास्त काही नको ते बोलून गेलाय. खुळचट चुका न केल्या, तर तो बावळ्या कसला? "म्हनजे मला म्हनायचं हाय....." बावळ्याला कसं निस्तारावं कळेनासं झालं. "आदीच त्या राखालची वाईट नजर माझ्यावर हाय. त्याच्यापासून पिच्छा सोडवला हाय. नी लगेच हे अस्सं.....कस्सं बरं दिसत नाय. काय?"

"राखाल?" त्या बाईच्या चेहऱ्यावरचा रंग पुरा उडाला. "रझाकार राखाल म्हणिंग काईंग तू?" विचारताना तिचा आवाज कापला.

"त्यांज तुंज काईंग संबंध असिंग?" लाकी डोळे बारीक करत संशयाने सापासारखी फुसफुसली.

"म्हणहजे तोच असिंग?" ती बाई चांगलीच धास्तावलेली वाटत होती. "तो तुंज मागावर असिंग काईंग आता?"

"नाय. आमी त्याला मस्त झुकांडी दिली हाय. तो गेला हाय दुसऱ्या कुना मागं." बावळ्याने शेखी मिरवली.

"तर मंग तो आता कांचबनांज दारावर पोचिंग असिंग." ती बावळ्याकडे भयचकीत नजरेने पाहत करवादली. "तो माणूस असिंग न. लांडगा असिंग. त्याला बरोबर शिकारींज वास लागिंग. तो मुख्यदारांज चौकीवर जरूर चौकशी करिंग. तिंथ त्याला कळिंग की मंज बरोबर फाटल्या कपड्यातली बाई आत येईंग. तो आता इंथच जरुर येईंग असिंग. जर त्याला मी सापडिंग, तर एका पळात कळिंग की मी बाप्या असिंग न. बाई असिंग." ती घायकुतीला येऊन वळवळू लागली. "तुंज बरोबर मंज सुदहा पकडिंग. ठार मारिंग." मूर्तिमंत भीती तिच्या डोळ्यात नाचू लागली.

"बावळ्या, ही म्हणिंग ते बरोबर असिंग." सुकलेल्या ओठांवरुन जीभ फिरवत लाकीने ते नाईलाजाने मान्य केलं. "तो फार धूर्त असिंग. तो साथी मागं गेलाईंग दाखविंग. ती त्यांज चाल पण असिंग शकिंग. तो आमांज मागंच खराईंग येईंग तर?"

"ह्या! इतकं काय कवतिक लागून राहिलं हाय त्याला?" बावळ्या तुच्छतेने म्हणाला. "आला अंगावर तर घेऊ की शिंगावर."

"तू शिंगावर घेईंग तर तू घेईंग. पण मंज आता ताबडतोबीनं इंथईंग जाईंग देईंग." ती बाई घळीला आली. आपले बांधलेले हात पुढे करत तिने विनंती केली. "मंज सोडिंग ना लवकर. तुंज मंज संग काईंग दुश्मनी?"

"पण तू आमांज संग दगा करिंग न, यांज काईंग खात्रिंग?" लाकीने तिला दमात घेतले. या बाईने बलात्काराचा प्रयत्न केलेला हे ती विसरली नव्हती.

"महान युगनायकाची शप्पथ." त्या बाईने हे शब्द उच्चारताच लाकीचे डोळे हे मोठे झाले. "तुमी सुदहा मंज संग चलिंग. मी तुमाला लपिंग दुंज जागा दाखविंग. लालाजींज महाल आज रिकामी असिंग. आमी तिंथ घुसिंग."

"हे बेस होईल." बावळ्याने दुजोरा दिला. लाकी विचारात हरवली.

"वेळ असिंग न. तुंज राखाल तो काईंग तो माहीत असिंग. तो आमांजपर्यंत पोचिंग, त्या आधी आमी सटकिंग." त्या बाईने इशारा दिला. लाकीला तो मानावा लागला. ती त्या बाईची बंधने सोडू लागली. "मंज नाव छमद. तुंज नाव काईंग असिंग?" त्या बाईने मैत्रीचा हात पुढे केला.

"लाकी." होय नाय करता करता लाकीने आपला हात मिळवला. बावळ्याने मात्र हातात हात न मिळवता, लांबून हात जोडून मैत्रीचा स्वीकार करणे पसंत केले. बलात्काराची आवड असणाऱ्या बाईपासून अंतर राखणे त्याला अत्यावश्यक वाटले. हात दिला आणि तिने त्याला आख्खा खेचला तर? छमद अंगापिंडाने चांगली दणदणीत होती. तिच्यात दोन-तीन बावळ्या सहज मावले असते. तो तिच्यावर पडण्याऐवजी जर का ती त्याच्यावर पडली असती, तर त्याचा चिरडून पार लगदा झाला असता.

"मी तुंजसाठी मालकांज कापडं आणिंग." बावळ्याला म्हणाली आणि छमद कामाला लागली. "तुला चढविंग येईंग न, तर मी सवता मंज हातानी तुला चढविंग." तिने दात काढले.

"माझं कपडे हायत तसे बरे हायत की. वगाच वेळ दवडूया नको. जाऊया बिगीबिगी. राखाल यायच्या आदी. काय?" सबब देत बावळ्या दालनातून बाहेर पडायला दारापाशी धावला. लाकीने छमदकडे बघून खांदे उडवले आणि ती सुद्धा त्याच्यामागे धावली.

छमदने बोटांच्या आणि ओठांच्या चाळवाचाळवीच्या हालचाली केल्या. "राजा नी रानी, बघिंगच मंज प्रेमापासून कुंठ पावते तुमी वाचिंग? ही मी येईंग." ती सुद्धा दाराकडे धावली.

## १०० वर्षे पुढे - प्रकरण १०

बावळ्याला व लाकीला घेऊन छमदने ज्या लालाजीच्या महाली घुसखोरी केली होती, त्याचा नूर आगळा होता. बावळ्याने असे काही यापूर्वी कधी बघितले नव्हते. माडाच्या झाडांचेच खांब करून त्यांना आधारून माच बांधावेत, असे ते एकावर एक दुमजले चढवलेले होते. ती माडाची झाडे, त्यांच्या सळसळत्या झावळ्या खऱ्या होत्या की खोट्या? बावळ्याला ठरवता येईना.

त्या मजल्यांच्या सगळ्या बाजू पारदर्शक काचांनी बंदिस्त होत्या. आतून पांढऱ्या शुभ्र पडद्यांनी. जे सांजेच्या समुद्री वाऱ्यावर हलकेच वाहवत होते. त्यांना चांदीचे घुंगरू लावलेले होते. जे मंजुळपणे वाऱ्याच्या हालचाली बरोबर वाजत होते. त्यामुळे जणू अदृश्य अप्सरा आसपास वावरतात आहेत असे भासत होते. सांजेच्या सोनेरी किरणांचे झोत त्या तलम मलमली पडद्यांमधून विखुरलेले होते. त्यांच्या हालचाली बरोबर जसे काही ते कवडसे जमिनीवर चित्रवलेल्या लाटांवर नाचत आहेतसे भासत होते. जमिनीवरील त्या चित्रांवरची काच इतकी गुळगुळीत होती की पाण्यावर वावरतोत आहोत असेच भासत होते. सगळं वातावरण

अद्भुत स्वर्गीय भासत होते. लालाजीचा हेवा वाटावा तेवढा थोडा होता.

लाकी आणि छमदला मात्र या सुंदरतेचे फारसे कौतुक नव्हते. त्या दोघी स्वैपाकखोलीत घुसून खाण्या-पिण्याचे सामान जमवण्यात व्यस्त होत्या. सुकवलेल्या आणि पाकवलेल्या चिकू-पेरू-केळी अशा काही फळांच्या गोल चकत्या आणि पिण्यासाठी वाळयाचे सरबत घेऊन लाकी बावळ्या शेजारी हजर झाली.

छमदने पिण्यासाठी मदिरेचा बुधला आणला. बावळ्याला चांदीच्या घाटदार पेल्यात ओतून देऊ केला. त्या वासाने बावळ्याच्या नाकाशी गोड गुदगुल्या केल्या. पण लाकी ज्या नाराजीने त्या बुधल्याकडे पाहत होती, आपण त्यातले नाही, असे जाहीर करण्यात बावळ्याने शहाणपण मानले. काही वेळ कोणीच कोणाशी बोलले नाही. मचमच खाण्याचे, गटागटा पिण्याचे आवाज तेवढे शांतता भंग करत राहिले. भूक आणि तहानेचा कडाका जेव्हा शांतावला, तेव्हा आपोआपच खुशालल्या जीवांना कंठ फुटला.

"बावळ्या मंज राजा, तू मंज सगळ्यात प्रिय यार असिंग." हातातला पेला रिकामी करून छमदने घोषणा केली. "लाकी मंज राणी, तू मंज जीवाचा जीव असिंग." लाकीने नाक मुरडले.

बावळ्याने कपाळावर आठ्या आणून दाखवल्या. "पण काईंग गं, तुंज क्रमांक काईंग असिंग?"

"क्रमांक? कसला?" बावळ्याला अर्थबोध झाला नाही.

"तुला माहीत असिंग न?" आता छमदला अर्थबोध होईना.

"तो शंभर वर्षांआधींज काळाईंग येईंग असिंग. आमांज काळातला असिंग न." लाकीने खुलासा दिला.

"दारू मी पिईंग. पण तुला चढिंग." छमदने लाकीवर आरोप केला.

"मी खरंच मागच्या काळातून आलो हाय. ही कापडं बघ की. माझी भासा बघ की." बावळ्याने आपली बाजू तावातावाने मांडली.

छमद त्याच्या डोळ्यात डोळे रोखून काही वेळ जोखत राहिली. "तिंथहून इंथ कंस्सा येईंग?" विचारले.

बावळ्या उत्तर देणार इतक्यात लाकीने मध्येच तोंड खुपसले. "ते खास रहस्य असिंग. तू विश्वास ठेविंग तर ठेविंग. न ठेविंग तर ठेविंग न. तुंज मर्जी. तुला मंज क्रमांक जाणिंग असिंग, तर तो सातशे बारा असिंग." मग बावळ्याकडे वळून त्याचे शंका निरसन करण्यासाठी बोलली, "लाकी मंज खरंईंग नाव असिंग न. बंडबागी सवताहांज खरी ओळख उघडिंग न. बाईंला लाकी म्हणिंग.

बाप्याला साथी म्हणिंग. मंज बंडबागी ओळख 'लाकी सातशे बारा' असिंग."

"बावळ्या राजा, मंज आजपावते कोणा शंभर वर्षा आधींज बाप्यासंग प्रेम करींग संधी मिळिंग न. तेहवा त्या काळात प्रेम कंस्स करिंग? मंज नमुना दाखविंग ना." छमद बावळ्याकडे सरकली. तसा तो मागे सरकला आणि बसल्या सोप्याची लांबी संपल्यामुळे धडपडून खाली पडला. तशी छमद सात मजली गडगडाटी हास्य हासली.

"आमांज कहाणी तुला कळिंग. आता तुंज खरीईंग कहाणी सांगिंग. तू बाई असिंग. तरही बाप्यांज सोंग काईंग घेईंग? काचबनात नोकरी काईंग करिंग?" लाकीने फणकाऱ्याने छमदला पृच्छा केली.

"बावळ्या राजा या काळात कंस्सा येईंग? ते तुंज रहस्य असिंग. तर मी सोंग काईंग घेईंग? ते मंज रहस्य असिंग. मी काईंग सांगिंग?" छमदने बिनतोड पलटवार केला.

"तर मंग आमी तुला बांधिंग नी इंथच अशीच सोडिंग." लाकीने धमकी दिली. तिला मदतीसाठी बावळ्याची गरज भासली. ती त्याच्याकडे पाहते तो काय? "बावळ्या तिंथ काईंग करिंग?" ती जवळजवळ किंचाळली. बावळ्या छतावरून लोंबणारी एक दोरी

हलवून ओढून बघण्याच्या चाळयात गर्क होता. त्यामुळे वर लटकणारे अनेक लंबक हेलावू लागले होते.

"काय की काय?" तो दचकला. "काय झालं?" जणू उत्तर म्हणून छतावरची झुंबरे लखलख पेटली. विझली. त्याची गंमत वाटून बावळयाने पुन्हा पुन्हा ती पेटवून विझवून पाहिली. एव्हाना सूर्य बुडून बराच वेळ झाला होता. बाहेर अंधार दाटू लागला होता. ते छमदच्या सोडलेल्या महालापासून लांब नव्हते.

"खुळचुका!" लाकी उठून त्याच्यापाशी धावली. त्याला तिथून ओढून बाजूला काढला. "हे दिवे अंस्स बंद घरात पेटिंग विझिंग, तर आयता रझाकारांना इशारा असिंग, की इंथ कुणी असिंग. कुणी लपिंग."

बावळया ओशाळला. छमद हातवारे करत उभी झाली. "ए खबरदार. मंज याराला शिवी घालिंग न. तो मंज प्रेम असिंग. त्याला बोलिंग तर मंज संग गाठ असिंग. तुंज चटणी करिंग चटणी." हातांनी रगडल्याची मुद्रा तिने केली. छमदचा झोक जात होता.

लाकीने एकवार तिच्यावर, एकवार बावळयावर नजर टाकली आणि कपाळावर हात बडवला. मग ती बावळयाला हाताला धरून ओढत बाजूच्या खोलीत घेऊन गेली. तिथे कपडेपट होता. त्यातले काही काढून ते बावळयाच्या मापाचे होतील याचा अंदाज केला.

त्याला चढवायच्च्या खुब्या स्पष्ट केल्या. आपल्या मापाचे कपडे सुद्धा शोधले. ते घेऊन अंगावरची लक्तरे बदलायला दुसऱ्या दालनात गेली. ती पुन्हा छमदच्या दालनात परतली, तोच बावळ्या देखील परतला.

छमदने बावळ्याला परतताच त्याच्या अंगावरच्या नव्या काळातल्या कपड्यांना धरुन जवळ ओढले. "काईंग रे बावळया? मी तुंज जराईंग जवळ येईंग, तरही तू दूर पळिंग. पण तिनं तुला हे कपडे शोधिंग नी चढविंग, ते तुला चलिंग. ती तुंज अंगाला धरिंग. तर तुला चालिंग?" छमद तारस्वरात ओरडून बावळ्याची खडसावणी करु लागली.

"बाई जोरानं ओरडिंग न. आवाज बाहेर जाईंग." लाकीने छमदला समजवायचा प्रयत्न केला. "हे कपडे घेईंग नी बदलिंग आधी. तुंज हे भडक कपडे सहजी कोणांजही नजरेत येईंग."

"तू?" थरथरत्या हाताने लाकीवर बोट रोखत छमद ओरडली. "तू कोण मंज सांगिंग? मी मंज वाटिंग ते करिंग. तू मंज प्रेम छिनाविंग. मी तुला सगळयांसमोर उघडी पाडिंग. तुंज जीव घेईंग. मी....?" छमद लाकीला भिडली. लाकीच्या गळयापाशी हात नेले आणि मग एकदम गळपटली. "पण तू कितीईंग सुंदर असिंग? तुला कंस्स मारिंग? तो बावळया तुला ठेविंग. पण तू मंज मिळिंग."

तोच बाहेरून पायघोड्यांचा घरघराट ऐकायला येऊ लागला. घराच्या सगळ्या बाजूने त्यांचा घेरा पडला होता. बावळ्याने हलकेच पडदा किलकिला करुन बाहेर नजर टाकली. लाकीची भीती खरी झाली होती. रझाकारांचा काळा गणवेष त्याला अंधूक संधीप्रकाशात ओळखता आला. त्यातली एक धिप्पाड आकृती बावळ्याने अचूक ओळखली. "राखाल." त्याच्या तोंडातून शब्द निघता लाकी आणि छमद जागच्या जागी गोठल्या.

राखालच्या हुकूमावरुन एक जण पुढे झाला. दारावरची घंटेची दोरी त्याने ओढली. घरभर मंजूळ नाद निनादला. त्या आवाजाने त्या दोघी भानावर आल्या. लाकीने सगळ्या बाजूंना धाव घेत खिडक्यांतून अंदाज घेतला. "कुंठच पळिंग मोकळीक असिंग न." निष्कर्ष काढला.

"तो दार फोडिंग नी आत घुसिंग." छमद एवढा विचार करु शकली. म्हणजे भीतीने शुद्धीत आली होती? की नशेचे ते तिचे नाटक होते? तिचा नेमका थांगपत्ता बाकी दोघांना लागत नव्हता.

"आमांज जवळ लढिंग शस्त्रं असिंग न." लाकी खंतावली. मग तिच्या मनात एक आशा जागली. "पैशेवाल्यांज महाली नेहमी एखाद पळवाट असिंगच. लढाईतून जीव वाचविंग कारणिंग. आमी त्या भुयारानं पळिंग." तिने अपेक्षेने छमदकडे पाहिले.

"हे मंज वावरघर असिंग न. मंज माहीतिंग न. पण आमी शोधिंग." म्हणत ती खालच्या तळमजल्याकडे घाईघाईने निघाली. मागे बाकी दोघे. खाली चार पाच दालने होती. तिघे तीन दालनात पांगून शोधू लागली. जाता प्रत्येक क्षण घोर वाढवत होता. राखालच्या दळाने दरवाजा फोडायला सुरुवात केल्याचे आवाज येऊ लागले. बावळ्या सामान-भांडाराच्या खोलीत शिरला. इथे तिथे सामान सरकवून बघत असताना अचानक त्याच्या मानेवर धारदार सुऱ्याचे पाते लावले गेले. त्याचा नाईलाज झाला. हात वर करण्याचा हुकूम पाळून, तो ताबेदाराच्या इशाऱ्यावर मधल्या मोठ्या दालनात चलता झाला.

तिथे लाकी आणि छमद सुद्धा दोन दोन शस्त्रधारींच्या निगराणीत हजर केल्या गेलेल्या होत्या. दोघींचे हात मागे बांधून घातलेले होते. बावळ्याला त्या दोघींच्या शेजारी उभे केले गेले. त्याचे हात सुद्धा मागे करकचून बांधून घातले गेले. राखाल छद्मी हास्य घोळवत कमरेवर हात ठेऊन उभा होता. बावळ्याला बघताच हात हलवून त्याने अभिवादन केले. "पुन्हा आमांज भेट इतक्याईंग लवकर होईंग वाटिंग न. वाहवा! मंज खुषी होईंग. तुमांज होईंग अंस्स दिसिंग न. काईंग होईंग न?"

बावळ्याने पाहिले तर सगळे दळ लाकीकडे बुभुक्षित नजरेने पाहत होते. तिच्या हातांच्या मागे गुपचूप काही हालचाली सुरू होत्या. तिघे बंदी भिंतीपाशी सरळ रेषेत उभे केलेले असल्याने, बावळ्याला डोळ्यांच्या कोपऱ्यातून तिची मागची हालचाल दिसत होती. जी इतरांच्या नजरेच्या टप्प्याबाहेर होती. लाकी मागच्या पडद्यावर हातात काही पकडून ते वरखाली घासत होती. काहींची नजर अध्येमध्ये छमदवर देखील फिरुन येत होती. पण रेंगाळत नव्हती. "आमच्याकडं इतक्या पावन्यांना खायाला घालायला तितकं खानं नाय. नाय तर हाक मारून बोलावनारच असतो की?" बावळ्याच्या उत्तरावर राखालच्या चेहऱ्यावरच्या रेषा वाकड्या झाल्या.

तो बावळ्याच्या जवळ आला. त्याने बावळ्याच्या बखोटीला धरुन खेचला आणि त्याच्यावर नाक घासत जोरात श्वासात वास हुंगला. "इंथ काईंग वेगळं असिंग. तुंज वास? आजपावतो अंस्सा मी कधी जाणिंग न. दूर देशदेशांज वास मी जाणिंग. पण तुंज एकदम वेगळा असिंग. तू कुंठहून असिंग? तू कपडे बदलिंग असिंग. तरी तुला हा वास येईंग."

छमद राखालला लांडगा का म्हणत होती, ते बावळ्याला आता पुरते कळले. राखालच्या घ्राणेंद्रियाची क्षमता अफाट होती.

"तू बरोबर हाय. मी या काळातला नाय हाय. शंभर वर्षं मागच्या काळातून आला हाय. माझा वास लय जुन्या जमान्यातला हाय."

यावर राखाल खदाखदा राक्षसासारखा हसला. तो हसतो म्हणून त्याच्या दळातले थोडे हसले. त्यातला जो ठेंगडा बावळ्याला धरून होता त्याच्या पाठीत राखालने हसतच सहजपणाचा आव राखत गुद्दा हाणला. तो ठेंगा इतका कळवळला की त्यात त्याचं हास्य चेहऱ्यावरून पुसले गेले. "इंथ काईंग येईंग? मंज हाती मरींगसाठी?" राखालने छद्मीपणाने विचारले. पोटात बोलता बोलता हाताचा दणका हाणला. बावळ्याच्या ओठांमधून रक्ताची चिरकाळी बाहेर पडली. तोंडाचा खालचा भाग रक्ताने बरबटला. बावळ्याला काही उत्तर द्यायचे होते. पण तो नुस्ता ऊं ऊं उ आवाज काढू शकला.

आता राखालचा मोर्चा लाकीकडे वळला. तिच्या तिखट नजरेची गंमत वाटून, खसकन तिचे केस धरून आपल्याकडे तोंड ओढून, त्याने तिच्या ओठांशी ओठ भिडवून करकचून मुका घेतला. प्रत्युत्तरात तिने गुडघा वर त्याच्या जांघेत मारायचा अयशस्वी प्रयत्न केला. राखाल असले डावपेच कोळून प्याला होता. डोळे मिटून ओठांवरुन जीभ फिरवत राखालने स्वाद ओळखला. "चिकू...पेरु...केळं....वाळा. व्वा! मंज सेवकांनो

तुमांज शाकाहारी मेजवानी मिळींग होईंग. काईंग?" राखालने त्या लंबाड्याकडे रोख करत विचारले, "बाबूशा, तुला या सुंदरीवर पहिली संधी हविंग की न?" बाबूशाच्या चेहऱ्यावरचा भाव कोरा राहिला.

पण बावळ्याला धरणाऱ्या ठेंगड्याचा उत्साह उतू गेला. "साहेबसरकार, मंज पहिली संधी मिळिंग, तर मी या बंडबागीला झटक्यात बोलती करिंग नी सगळी माहिती ओकविंग."

या वेळी त्याच्या खांद्यावर राखालचा हात सगळा जोर घेऊन पडला. तरी तोच सहज मित्रत्वाचा आव राखत. "नी ती जर तुंज हर प्रयत्नाने सुदहा बोलिंग न, तर तू काईंग करिंग दिनशा? मंग मी तुंज काईंग करिंग होईंग, ते पण तूच सांगिंग." दिनशा माराने बऱ्यापैकी कळवळला होता.

इतक्यात छतावरुन सरपटणारी एक पाल राखालच्या अंगावर पडली आणि पळून जाऊ लागली. त्याने सरळ तिला मुठीत धरली. मग भिंतीपाशी सोडली. तिने पळायचा प्रयत्न करताच, सफाईने दुसऱ्या हातातला सुरा वापरून तिच्या शेपटीचा टवका उडवला. पुन्हा मुठीत कैद केली. दिनश्याच्या अंगावर ती पाल सोडून दिली. ती सैरभैर दिनश्याच्या शरीरावर धावू लागली.

"साहेबसरकार, मी तुंज माणूस असिंग." पालीच्या खाली पडलेल्या वळवळणाऱ्या शेपूट तुकड्याकडे बघत दिनश्याने राखालला आठवण करुन दिली. या उत्तरावर राखालने सुऱ्याचा त्याच्या अंगावर लगोलग वार केला. पालीच्या शेपटाचा अजून एक तुकडा उडवला. सोबत दिनश्याच्या कानावर छेद होऊन तिथून रक्त वाहायला लागले. पालीने जीव खावून मागच्या पडद्यावर उडी घेऊन निसटायचा प्रयत्न केला. राखालने तिचा अचूक माग घेत सुरा फेकला. तिचे दोन तुकडे करवले.

"होईंग. तू मंज माणूस असिंग." राखालने दिनश्याला जणू त्याची खातरजमा म्हणून त्याच्या पाठीवर थाप मारली. पुन्हा असा अजून एक मैत्रीखात्यातला फटका आणि तो त्राण गमावता. तेव्हा शहाणा होऊन दिनशा गप्प राहिला. ते ओळखून राखालने नजरेनेच त्याची लाज काढली.

त्याचे ते कुत्सित छद्मी हास्य ओठांवर खेळवत राखाल छमदकडे वळला. त्याचा चेहरा तिच्या चेहऱ्यावर झुकला तेव्हा तिथे भयाने व्याकुळतेचे भाव उमटले. पण ओठ मात्र सोत्सुकतेने त्याच्या ओठांशी भिडले. बावळ्यासाठी ती एक कोडे होती. शिसारी आल्यासारखा राखाल लगेच तिच्यापासून विलगला. "तू कोण असिंग?" त्याने दरडावले.

"मायबाप मी एक गरिब नोकरचाकर असिंग. मंज नाव छमद. सरकारी सावकार पन्नाशेठ मंज मालक. त्यांज घरी मी काम करिंग. या लबाडानं नी या दुष्टेनं मंज शस्त्रानं जीवे धमकाविंग. वाटेत बळजोरीनं मंज गाडीत घुसिंग. मंज चौकीवर खोटं बोलविंग नी कांचबनात घुसिंग. मंज मालकघरात घुसिंग. मंज मारिंग. मंग बळजोरीने मंज इंथ आणिंग. साहेबसरकार तुमी मंज देवासारखे भेटिंग नी मंज या राक्षसांपासून सुटका करिंग." छमदच्या चेहऱ्यावर सुटकेचे भाव पसरले.

राखाल पुन्हा एकदा गडगडाटी राक्षसी हसू हसायला लागला. "यांनी तुंज बळजबरी करींग?" विचारता विचारता त्याला न आवरता येणारे हसू फुटले. या वेळी दळातील इतर कोणी हसले नाही. बाबुशा सोडून. राखालच्या ते नजरेत येता त्याने बाबुशाला पाठीवर दणका दिला. सहज मैत्रीचा? "नी तुला बळजोरीनं खाईंगसाठी महागवाली सुरसफळं घालिंग? उंची दारु पाजिंग? व्वा! अंस्स शत्रू असिंग तर मित्रांज काईंग गरज?" राखालच्या या बिनतोड निरीक्षणावर आणि प्रश्नावर छमदकडे उत्तर नव्हते.

तिने वेगळा पवित्रा घेतला. खाली राखालच्या पायांवर झोकून दिले. तिला धरणाऱ्यांना तिचे एवढे भारी वजन खाली कोसळत असताना वर रोखून धरणे जमले नाही. राखालच्या भिवया

त्यांच्यावर नाराजीने उंचावता त्यांनी नजरेनेच क्षमादान मागितले. त्यांना रट्टा हाणण्यासाठी राखालला पुढे होणे अशक्य झाले. त्याच्या पायांना छमदच्या हातांचा विळखा पडला होता.

तिच्या हंबरड्याने पलीकडच्या खोलीतली चांदीच्या भांड्यांची चळत कोसळली. "मायबाप, मी यांज कारस्थानात फसिंग. मंज शुद्ध हरपविंग त्यांज बेत होईंग. मी चुकिंग नी त्यांच्या खाण्यापिण्यांज जाळ्यात फसिंग. मंज माफ करिंग. मंज विश्वास करिंग साहेबसरकार. मी कितीईंग प्रामाणिक असिंग ते मंज मालक सावकारी सरकार पन्नाशेठांज विचारिंग." या तिच्या खोटेपणात डोळ्यातून घळाघळा वाहणाऱ्या पाण्याकडे बावळ्या आणि लाकी नवलाने बघतच राहिले. बाकी दळाला छमदचे निर्दोषत्व पटल्यासारखे दिसले.

राखालच्या चेहऱ्यावरचे हसू जाऊन तिथे आता तडतड संताप दिसू लागला होता. त्याने तिला ठोकरुन बाजूला करायचा प्रयत्न केला. तिने त्याचे दोन्ही पाय आवळलेले असल्याने, झोक जाण्यापेक्षा त्याला जास्त काही साध्य झाले नाही. "हाड! मंज अंस रडारडी सहन जाईंग न. अंस रडकी ही न." राखालने धिक्कारले. हातांच्या वज्रमुठीचा ठोसा तिच्या डोक्यावर मारुन दिला. पण तिची मिठी सुटली नाही.

तेव्हा साहेबाची मर्जी साधायला मदतीसाठी दिनशा आणि त्याच्यासारखे काही गण उताविळ झाले. त्यांच्या या क्षणिक दुर्लक्षाचा अचूक फायदा घेत लाकीने हालचाल केली. तिने मागे हातात दडवलेल्या कांडीचा स्पर्श धरपकडवाल्याच्या हातांवर होऊ दिला. त्याबरोबर तो रझाकार वीजेचा झटका बसावा तसा उचकला. तो झटका खरोखरच वीजेचा झटका होता. लाकीने रेशमी पडद्यावर घासून त्या कांडीत निर्माण केलेल्या स्थितिज वीजेचा. त्या रझाकाराची पक्कड सुटताच, लाकीने दुसऱ्या बाजूच्या रझाकाराला हातोहात पेच वापरून झुकांडी देत सुटका करुन घेतली. हवेत उसळी घेऊन राखालला चुकवत लाकी दरवाजाच्या दिशेने गेली. तिथे उभ्या रझाकारावर आदळली.

बावळ्या वळवळला. एव्हाना रझाकार सुद्धा सावध झालेले असल्यामुळे बावळ्याला यश आले नाही. राखालच्या फटक्याने तो जाम झालेला होता. "सोडिंग मंज." राखाल छमदवर गरजला. तिला परिस्थितीचा आवाका ओळखायला काही क्षण पुरले. तिने राखालला सोडले. राखालने एका झेपेत लाकीच्या पायाच्या नडगीवर हाताची घट्ट पक्कड केली.

तो तिथली नस पिळवटून तिला कायमची पांगळी करण्याआधी बावळ्या ओरडला. "तसं करू नको. मंग आमाला

खेळ खेळता येनार नाय." राखालने दळाला खुणावले. तसं लाकीला आधी धरणाऱ्यांनी जवळ जाऊन तिला पुन्हा धरले. राखाल मोकळा झाला. बावळ्याजवळ पोहोचला.

बावळ्याच्या गळयात गळा घालून तो आवळत राखाल हसत विचारता झाला, "कंस्स खेळ?" राखालच्या नजरेचा संकेत ओळखून बावळ्याला धरणाऱ्या रझाकारांनी पक्कड सोडून दिली.

बावळ्या राखालच्या खांद्यावर मित्रासारखा हात ठेवून कळा जिरवत कसाबसा हसत बोलता झाला, "चोर-शिपायाचा. आम्ही पळनार नी तुमी पकडनार. आमी हारलो तर तुला हवी ती सगळी मायती देतो. तुमी हरलात तर आमी मोकळे होनार."

"ती माहिती तर मी अंस्स पण मिळविंग." राखालने डोळे गंमतीत मिचकावत पुन्हा तिसरा ठोसा बावळ्याच्या पोटात मारून दिला.

या वेळी कळा जिरवून तोंड उघडायला बावळ्याला खूप वेळ लागला. डोळे मिटून वेदना आत रोखायचा प्रयत्न करत तो राखालच्या कानाशी कुजबुजत म्हणता झाला. "तुला काय तरी खास गावंल. जे तुला माझ्याशिवाय दुसरा कोन बी देवू शकनार नाय." बावळ्या कळीमुळे थांबला.

राखालचा हात पुन्हा पुढे सरसावतोय दिसता, बावळ्याने कळीवर फुफाटत घाईघाईने शब्द पुढे रेटले, "जवळ ये. तुझं गुपित बाकीच्यांना कळता नाय." राखालचे डोळे तांबारले. मात्र त्याने कान बावळ्याच्या ओठांशी चिकटवला. "तुझ्या षंढपनाचा इलाज. मी जिथनं आलो हाय, तिथं आमाला तो मायत हाय. तो तुला मिळंल. तुझी लक्शनं मी बरोबर वळखली हाय. त्याच्यावर तो अक्सीर लागू पडतो की." राखालने बावळ्याला ढुशी दिली. बावळ्या खाली कोसळला. राखालने त्याला लाथ घालून दिली. ती चपळाईने चुकवत बावळ्या बोलला, "स्वताला लय शाणा समजतो ना तू? हाय काय तुझ्यात हिंमत, ती अक्कल पनाला लावून डाव खेळायची? की तेच्यात बी कमीच?" बावळ्याची ही क्षीण पुटपुट सगळ्यांच्या कानावर गेली.

राखाल काही क्षण धुसफुसत त्याच्या आवडत्या पवित्र्यात कमरेवर हात ठेऊन उभा ठाकला. मग खदाखदा हसायला लागला. "आज राखालाला इतकंईंग आव्हान देईंग अंस्स कोण अक्कलवाला भेटिंग. बावळ्या होईंग जाईंग. तुंज अक्कल की मंज अक्कल खरीईंग?" आपल्या दळाकडे वळला. आदेश दिला. "त्याला मोकळा सोडिंग. बघिंग कुंठ धाविंग? कितीईंग धाविंग?" खाली वाकून बावळ्याच्या रक्तात बोट बुडवून त्याने ते चाटले. "या

वाघाला तुंज रक्ताची चव लागिंग असिंग. उठिंग. धाविंग. पण तुला चालिंग तर जमिंग काय?" परत सात मजली क्रूर हसला.

"तिला बी माझ्यासंग सोडावं लागंल." बावळ्या धडपडत उभा झाला. लाकीकडे बोट करुन बोलला.

"ती पणाला काईंग लाविंग? मी तिला परत पकडिंग तर ती मंज बंडबागींज गुप्तस्थान सांगिंग. काईंग कबूल? बोलिंग?" राखालने लाकीवर बोट रोखत विचारले. तिने बावळ्याशी नजरानजर केली. त्याने नजरेने तिला राजी करायचा प्रयत्न केला.

"कबूलिंग." तिने निर्णय घेतला.

"बंडबागींज शपथ वाहिंग." राखालने तिला खडसावले. ती क्षणभर गोंधळली. थोडा वेळ इथला तिथला साधक-बाधक विचार केल्यावर, तिच्या डोळयात मरणाचा निश्चय उमटलेला बावळयाला दिसला. हरली तर ती माहिती देण्याआधी सरळ जीव देणार होती.

"महान युगनायकांज शपथ." लाकीने ते नाव घेताच त्या उल्लेखावर  रझाकारांच्या नाकपुड्या रागाने फुलल्या. तिने भिंतीच्या आधाराने उभ्या बावळयाजवळ जाऊन त्याला आपल्या खांद्याचा आधार दिला. तसे ते सारे बिथरले.

"साहेबसरकार हाती येईंग शिकार अंस्स सोडिंग न." दिनशाने बाकींच्याचा विचार बोलून दाखवायची हिंमत केली. यावर

राखालने काही उत्तर देण्याची तसदी घेतली नाही. "यांज पाय पांगळा करिंग नी सोडिंग." आपली सूचना अंमलात आणण्यासाठी ठेंगडा आपणच पुढे झाला.

"सामना अक्कलेनं खेळनार की जनावरांवानी शरीरानं?" बावळ्याने राखालला विचारले.

"त्याला अंस्सच जाईंग देईंग." राखालचा आवाज चाबकासारखा दळावर फटकारला गेला. "बावळ्या ही घाण बरोबर घेईंग नी जाईंग. ती तुंज अक्कल पांगळी करिंग पुरिंग." छमदकडे इशारा करत राखालने सुनावले.

"आमांज ती हविंग नाईंग." लाकीने चटफटक नाकारले.

"तर मी तिला ठार मारिंग." राखालने चपट्या नाकाच्या रझाकाराला खूण केली. त्याने हातातल्या शस्त्राची धार परजत छमदवर उगारले. ती भयाने पूर्ण गोठून थिजली होती. "ती आमांज काईंग कामांज असिंग न."

छमदच्या मानेवर शस्त्राचा घाव पडण्याआधी बावळ्या स्वतःला नकळत ओरडला. "आमी तिला नेतो की. नको मारू."

## शंभर वर्षे पुढे - प्रकरण ११

बावळ्या आणि लाकी छमदच्या सोबत लालाजीच्या सदनासमोरील रस्त्यावर धावत पळत पोहोचले. "त्यांज पायघोड्यांहून जलद जाईंग आमाला तगडा पायरथ हविंग." लाकी तसा एखादा दिसतोय का? टहळत बोलली. रस्तावर तुरळक का होईना रहदारी चालू होती. थोडे पायरथ. थोडे पायघोडे. चुकार एखादा व्यायामासाठी चालणारा पादचारी सुद्धा.

संध्याकाळोत्तर काळोखात काचबनाची सगळी वैशिष्ट्ये उजळून निघाली होती. ज्या काचघरांमधून दिवे पाजळलेले होते, त्यांच्या आसपास प्रकाशाची प्रभावळ पसरलेली होती. रस्त्यावरचे व इतरत्रचे स्फटिकपैलू त्या प्रकाशाची परावर्तित किरणे सर्वदूर विखरून, चमचमते तारे जमिनीवर उतरल्याचा आभास घडवत होते. रस्त्याचा सगळा पृष्ठभाग चमचमत असल्याने, रस्ते म्हणजे वळणदार प्रकाशरेषा बनलेले होते. मात्र या काळात सार्वजनिक दिवे, रस्त्याकडेचे दिवे असा काही प्रकार कुठे दिसत नव्हता. बावळ्याच्या मेंदूतील चोराने याची लगोलग दखल घेतली.

खरेतर मुंबईवासी बावळ्याला या रात्रीच्या झगझगाटाचे अप्रूप वाटायला नको होते. पण हा डोळे दिपवणारा झगझगाट नव्हता. काळोखाच्या मखमालीवर हिऱ्यांचे साज लखलखावेत तसा तो सौंदर्याचा तरल आविष्कार होता. आणि त्या महालरुपी

हिरकसाजांना जोडणारे प्रकाशमय रस्ते, म्हणजे चंदेरी कलाबूतीची वळणदार नाजूक नक्षी होती. अर्थात ना बावळ्या ना त्याच्या साथी बायकांना या क्षणी या सुंदरतेचा आस्वाद घेण्याचा षौक परवडणारा होता.

"तो निळा पायरथ. त्यात ते छचोर जोडपे बसिंग तो." छमदने सावज हेरले. तसे लाकी व बावळ्या सज्ज झाले. कोणी कोणता भाग पार पाडायचा तो शिकाऱ्यांचा कट खाणाखुणांनी रचला गेला. समजावला गेला. निळा रथ त्यांच्या दिशेने आला. त्यातल्या तरुण विलासी जोडप्याला सुंदरी लाकी सामोरी गेली. पण त्या आपल्याच नादात मश्गुल जोडप्याने लक्ष दिले नाही. रथ पुढे गेला.

तेव्हा धावत जाऊन छमद सरळ त्यांच्या वाहनाला समोरुन धडकली. चाल खेळत जाळं पसरत बसायला वेळ नव्हता. राखालची माणसे मागे तिथे आपापल्या पायघोड्यांकडे धावत होती. धडकेमुळे जोडप्याला भान आले. मात्र त्यांनी रथ गरगरवून थांबवता क्षणी, वाहनाच्या दोन्ही बाजूंनी चढाई करत बावळ्या आणि लाकी आत शिरले. काय होतेय कळायच्या आत त्या दोघांनी त्या जोडप्यातल्या दोघांना दोन्ही बाजूच्या दारांनी बाहेर लोटूनही दिले. लाकीने सुकाणू आपल्या हातात घेऊन पायरथ जागच्या जागी गोल फिरवून छमद होती तिथे दरवाजा नेला. ती

उडी मारून आत शिरली. पुढच्या क्षणी त्या पायरथाने तिथून सुंबाल्या ठोकल्या. रझाकारांचे चालून आलेले पायघोडे त्या जागेवर एकामेकांवर आपटले.

त्या पायरथावर चार जणांनी पायदट्टे मारायची सोय होती. म्हणजे तो पायघोड्याच्या चौपट वेगाने धावू शकत होता. सद्य घटकेला तिप्पट वेगाने धावला. "छमदला गाडी चालवू दे. तिला इथलं सगळं रस्तं मायती हाय." बावळया त्या रथाच्या घरघराटाच्या वरताण किंचाळला. "त्यासाठीच तिला बरोबर घेतली हाय. तू तर मगाशी पन्नाशेठच्या घरापासून लालाजीच्या घरापर्यंत जाताना किती गोंधळ घातलंला?"

"मंज चांगलं कळिंग मी काईंग करिंग." लाकी घुश्श्यात ओरडली. तिची सुकाणू आणि पर्यायाने नियंत्रण सोडायची तयारी नव्हती. त्याच वेळी अचानक समोरुन दोन दिशांनी त्यांना घेरल्यासारखे दोन रझाकारांचे पायरथ दिसू लागले. लाकी गोंधळली. रथ कुठे वळवायचा तिला सुचेना. ते ओळखून छमदने लाकीच्या हातातल्या सुकाणूशी झटापट करुन पायरथ सरळ एका रझाकारावर चढवून दिला.

"तुला पकडिंग तर बंडबागींज पत्ता सांगिंग लागिंग. ते होईंग न, म्हणहून तरही बाई मंज चालविंग देईंग." छमदने लाकीला समजावले.

"मंज जर कंधी कोण पकडविंग देईंग तर ती तूच. पण राखाल मंज पकडिंग त्याआधी मी जीव देईंग." लाकीने आपला पक्का निर्धार ऐकवला. समोर दूर दबा धरलेले रझाकार दिसू लागले.

"पन माझा जीव कशापायी जोडीला फुकटचा घालवते हाय?" बावळ्या तणतणला. "तू गाडी परत परत तिथंच गोल फिरवते हाय की. तुला बायेरचा रस्ता कळत नाय हाय. आमची ताकद संपली की आयतंच लांडग्यांच्या हाती सापडतो बघ. त्यांना पाठलाग बी करायला नको. निस्तं जागंवर वाट बघत थांबायचं. काय?"

तेव्हा लाकीच्या लक्षात तिची चूक आली. तिने चरफडत सुकाणू छमदच्या हाती दिले. त्यानंतर बावळ्या आणि लाकी दोघे छमदचे सारथ्थ्याचे कौशल्य पाहून थक्क झाले. छमदने शिताफीने एका वाट रोखून असणाऱ्या रझाकाराच्या पायघोड्यावर रथ चढवून ती दिशा मोकळी केली.

मग एका दगडी चढाचा वापर करुन तिने रथ थोड्या उंचीवर नेला. त्या उंचीवरुन पुन्हा खाली रस्त्यावर न आणता सरळ एका घरावर चढवला. घराशेजारच्या वृक्षराजीतील वृक्षांच्या एकावर

एक चढत्या उंचीचा फायदा घेत अजून अजून उंचावर नेला. ते एवढ्या उंचावर गेले होते की तिथून त्यांच्यातला एखादा रथातून निसटून खाली पडता तर कपाळमोक्ष नक्की होता. तो चाकांवर चालणारा नव्हे तर हवेच्या उशीवर चालणारा रथ होता. या गोष्टीचा छमदने पुरेपूर उपयोग करून घेतला.

राखाल आ वासून दुरून ही कसरत पाहत होता. रझाकारांची छमदप्रमाणे पायघोडे वर चढवायची हिंमत होत नव्हती. ती रस्त्याकडेच्या दुतर्फा मोठ्या झाडांच्या रांगांच्या माथ्यावरून वरच्यावर रथ धाववत होती. जिथे कुठे रांगेत खंड येत होता, तिथे कुशलतेने अचूक थोड्या दूरवरच्या वृक्षमाथ्यावर रथ झेपावून नेत होती. त्यांचा रथ आपणहून खाली कोसळल्याशिवाय करता येण्यासारखे रझाकारांना काहीच उरले नाही. शेवटी त्यांच्या डोळ्यांसमोरून हा हा म्हणता तो रथ पार दूर कुठे पल्याड निघून गेला. राखाल हाताच्या मुठी आवळत बसला. त्याच्या नाकाला कुठेही त्यांचा वास जाणवेनासा झाला.

बावळ्याने आपले दोन्ही हात हवेत वर उंच उभारून आनंदाने आरोळी ठोकून दिली. लाकीला तसे करायचे तर होते, पण? छमदला आयतेच प्रोत्साहन दिल्यासारखे झाले असते.

छमदने मग अजून कम्माल करत, पायरथ काचबनाच्या हद्दीवरच्या माडभर उंच दगडी भिंताडावरुन सरळ बाहेर झेपावून दिला. पलीकडे तिथे जवळजवळ त्याच उंचीचे टेकाड होते म्हणून जेमतेम निभावले. वा छमदला ते नेमके ठाऊक होते. पायरथ उसळी खात तिथून अलगद उतरला. पलीकडे कुठे दिवे वा वस्तीची काही खूण दिसत नव्हती. रात्रीच्या अंधारात रथ हाकणे छमदला जड जाऊ लागले. "आमांज दिवे लाविंग तर त्यांना कळिंग. मंग चंद्र उगविंग तंस्स आमी पुढे जाईंग."

छमदची ही सूचना बावळ्याने आवडीने मान्य केली. "मी खूप दमला हाय पाय मारून. मला वाईच दम खायचाच हाय." लाकी काही बोलली नाही. थोडा वेळ मंडळींचा दम खाऊन होईपर्यंत शांतता नांदली. रातकिड्यांच्या गच्च किर्रकिर्रीला शांतता म्हणता आले तर. रानफुलांचा सुवास दरवळत होता. पूर्वेकडून वाऱ्याच्या हलक्या झुळूकी अधूनमधून सुखावून जात होत्या. अशी निरव वातावरणाची सुखदता बावळ्यासाठी दुर्मिळ होती.

"बावळ्या राजा तू राखालाला अंस्स काईंग सांगिंग, अंस्स काईंग देईंग करिंग की त्यानं तुला सोडिंग?" छमदच्या आत कधीचा हा प्रश्न खदखदत होता. लाकीचे कान सुद्धा ऐकायला टवकारले आहेत. बावळ्याच्या लक्षात आले.

"त्याच्या लिंगाच्या षंढपनावर इलाज." बावळ्याने मोजक्या चार शब्दात सांगितले.

"तो षंढ का काईंग, तुला कंस्स कळिंग? ज्योतिषविद्या?"

"कितकी काय लक्षनं हाय की." बावळ्या समजावून देऊ लागला. अगदी मनापासून. अगदी निर्गलपणे. "पैलं म्हनजे त्याचं बाकी सगळं गन लाकीवर बळजोरी करायला धावलं. पन हे बेनं सगळ्यात पुढं पायजेल, तर मागंच राहिलं. दुसरं म्हनजे तो परत परत त्याच्या जांघेमदी त्याच्या बुल्लीला हात लावत होता की नाय?"

"तुंज काळात त्याला बुल्ली म्हणिंग काईंग?" छमदच्या हसत फिसकारण्याने तिची थुंकी बाकी दोघांवर उडाली. लाकी रागाने फिसकारली. "म्हणजे जो त्यांज बुल्लीला सारखा हात लाविंग, तो नपुंसक?"

"बघ. कस्सं हाय ना, निस्तं एका गोस्टीवरून ठरत नाय. चार-पाच गोस्टी एकत्र आलं ना की तस्सं सांगता येतं. म्हनजे बघ की तो तसा बी त्याच्या मानसांचा हुकूमदार हाय. मंग कळपातला मीच खरा नर हाय, अशी खात्री स्वताला परत परत देन्यासाठी, नराच्या खुनेकडं परत परत इशारा करायची त्याला गरजच काय? पन तो तस्सं करत होता."

"बावळ्या राजा, तू तर उडिंग पक्षींज पिसं मोजिंगवाला असिंग." छमद त्याच्या खुलाश्यावर जाम खूश झाली. "तुंज मुकाच घेईंगसं वाटिंग."

"नको. नको. बाई तू मुका नाय घेतला तर माझ्यावर जादाची मेहरबानी करशील." बावळ्याच्या आवाजात नकळत कंप उतरला.

"पण मी राखालांज पाय धरिंग तर मंज लाथ घालिंग. तुला त्यानं गळ्यात गळा घालिंग. निरोप देईंग वेळी तुंज हातात हात घालिंग नी मित्रासारखा बोलिंग. अंस्स चमत्कार कंस्स होईंग? तू तर त्यांज लाज काढिंग होईंग." छमदला अजून सगळे कोडे सुटले नव्हते.

"हाताची पाच बोटं काय सारखी असतात? सगळ्या मानसांना काय एकाच तऱ्हेनं रडून नी भेकून पटवता येईल?" बावळ्या रंगात येऊन शिकवू लागला. "तू बघितलं ना, त्यानं कस्सं पालीला खेळवून मारलं. तो त्याच्या मानसांना कसा वागवत होता. ज्या मानसांना लोकांचा खेळ करायला लय आवडतं, स्वताला लय शाण्णी समजतात त्यातलाच हा गडी. माझ्या डोक्यात लगंच घंटी वाजली. म्हनून त्याला खेळाची हूल दिली नी तो पटला. मी त्याची कमजोरी एका दमात वळखली. म्हनून त्याला माझी अक्कल

त्याच्या टक्करीची वाटली. तेवा त्यानं बरोबरी दाखवायला हात मिळवला की."

अंधार सावलीत एकमेकांचे भाव दिसत नव्हते. बावळ्या लाकीला प्रभावित करू इच्छित होता. तिचा प्रतिसाद कळत नव्हता. छमदचेच प्रश्नावर प्रश्न सुरु होते. "बाई! त्या वेळी मंज तर काहीच सुचिंग नाईंग. तू कंस्स इतकंईंग शांत राहिंग नी विचार करिंग? तुंज काळात सगळे अंस्स हुशार असिंग? तुला कोण शिकविंग काईंग?"

"मी चोर हाय ना? मला असलं पकडापकडी नी खेळ रोजचंच हाय." बावळ्या कौतुकाने फुशारला. "तसं तर सरकारी शिपुरडे मला अजाबात पकडू शकत नाय. पन तुरुंग म्हनजी आम्हा चोरांची शाळाच की. तिथं लय भारी भारी गुरू भेटतंत. म्हनून मी अधनं मधनं तुरुंगाची वारी करतो. अंगुलिम नावाचा असाच लय भारी बदमाश गुरु मला पयला भेटला. आधी तर मी...."

"मंज वाटिंग की आराम आता पुरे होईंग. चंद्र नी चांदणं आता दिसिंग असिंग. राखाल येईंग त्या आधी आमी इंथहून निघिंग." लाकीने धमकावल्यासारखे बावळ्याचे पाल्हाळ मध्येच तोडले.

बावळ्या हिरमुसला. "मी तुला मंग वाटंत ती कहानी सांगंन." त्यानं छमदला आश्वासले. यावर तिनं काळोखात त्याचा गालगुच्चा

ओढत 'जरूर' म्हटल्यावर, असं बोलल्याचा त्याला पश्चाताप झाला.

पायरथ थरथरु लागला. म्हणजे लाकीने पायदट्टे मारायला सुरुवात सुद्धा केलेली. बावळ्याने आणि छमदने तिला पाय मारत साथ देऊ केली. छमदने धूसर चांदण्यात त्या माळरानावरून उताराची दिशा पकडत थोड्या वेळाने पायरथ एका रस्त्यावर आणला. हा दगडी वा बांधीव रस्ता नव्हता. नेहमीच्या वर्दळीने बनलेला माळावरचा एक चाकोरीचा मातीचा मार्ग होता. बराचसा सपाटीचा आणि झाडोरामुक्त. त्यामुळे जलद प्रवासाला सोयीचा.

रस्त्यावर आल्यावर छमदने रथापुढचे दिवे चालू केले. काही वेळात पुढे दिवे दिसू लागले. तो एक पायरथ होता. त्यांच्या दिशेने येत होता. बावळ्या संचित झाला. छमदला काही फिकरजिकर दिसली नाही. लवकरच तो पायरथ त्यांच्या जवळून आपल्या मार्गाने मागे निघून गेला. त्यात चार माणसे होती. त्याच्या चालकाने "होर्रे हो." ओरडून या रथाच्या चालकाला अभिवादन केले. बदली छमदने देखील "होर्रे हो." करून प्रतिअभिवादन केले. तशी या काळातली रित असावी. सावळ्याने रोखलेला श्वास सोडला. या काळातली त्याच्याशी तेढ न राखणारी ही पहिली माणसे होती.

छमद कुठे चालली होती? लाकीने तिला विचारले. ते अजून ठरवलेले नव्हते. आधी राखालपासून दूर दूर जाणे महत्वाचे होते. हे छमदचे म्हणणे मान्य करण्यावाचून त्यांना गत्यंतर नव्हते.

वाटेत घरांचा एक समूह आला. त्यांच्या खिडक्या दारांतून प्रकाशाच्या तिरिपी बाहेर पडत होत्या. ती बैठी कामट्यांची छोटेखानी घरे होती. सामान्यांची. कौलारू उताराची. बावळ्याला घर म्हणून परिचित होती तशी. त्याला जरा बरं वाटले. काही मोठ्या घरांसमोर पायघोडे ठेवलेले होते. पायरथ श्रीमंतांची मिजास असावी. हा वेगळा काळ आहे, हे कळल्यापासून हर क्षणी बावळ्याचा मेंदू त्याच्या नकळत त्यातलं वेगळेपण आणि वैशिष्टे नोंदवण्यात व्यस्त झाला होता.

पुन्हा दोन पायघोडे समोरून येऊन त्यांना ओलांडून पसार झाले. त्यावेळी बावळ्याने मोठ्या उत्साहाने त्यांना ओरडून 'होर्रे हो' केले.

आता पुढे बराच जास्त उजेड दिसू लागला. छमदने पायरथाचा वेग कमी केला. लांबून अंदाज घेऊ लागली. तिथून एक रथ वेगाने त्यांना ओलांडून गेला. बावळ्याच्या 'होर्रेहो'कडे त्यातल्या माणसांनी लक्ष दिले नाही. ती माणसे कोणाच्या तरी नावाने

तावातावाने खडे फोडत गेली. छमदच्या लक्षात तिथला प्रकार आला. "वाहतूक तपासनीसांज धाड असिंग. आता?"

"आमांज कपडे नी शरीरं रक्तानं डागाळिंग असिंग." लाकीला लगेच गोची लक्षात आली. "आमांजपाशी ओळखपत्रहि असिंग न. काईंग सांगिंग त्यांना? की परत मागेईंग जाईंग?"

"मागाईंग तर राखाल येईंग असिंग. मागेईंग कंस्सच जाईंग न." छमदने तो विचार साफ धुडकावून लावला. "त्यांनी आमांज पाहिंग असिंग. आमी रस्ता सोडिंग तर ते आमांज मागेईंग लागिंग."

"हॅ! वाहतूकवालं तपासनीस पटवायला काय मोठंसं हाय? तोंडावर पैसं मारलं की कोन काय बोलनार नाय." बावळ्याने आपल्या काळातलं शहाणपण पाजळलं.

"ते पैसं कुणाकडे असिंग?" छमदने खरी गोची उघड केली. आपले कपडे चाचपडून नकारार्थी हात हलवले.

लाकीने आपले कपडे चाचपडून पाहिले. नकारघंटा वाजवली. "लालाजींज तिजोरी खोलिंग नी साफ करिंग, त्याआधीच नाडचुका लांडगा येईंग." हळहळ व्यक्त केली.

बावळ्याने आपले कपडे उगाच चाचपडले. ते कुठे चाचपडायचे? याचं आपले अज्ञान उघड करायला, या वेळी तो न

लाजता, तर त्याच्यासाठी बरं झाले असते. बावळ्याने त्या दोघींची नक्कल करत तसेच हात नकारार्थी हलवण्यात धन्यता मानली.

"राखालांज सामना करिंग परीस या सरकारदारांज सामना करिंग सोप्पं." लाकीने निर्णय घेतला. "आमांज डाकूंनी मारिंग नी लुटिंग. आमांज सगळंईंग काढिंग घेईंग."

छमदने पायरथ पुढे न्यायला सुरूवात केली. "ते डाकू दहा जण होईंग. काळे कपडे घालिंग. कांचबनाहूनी आमी बाहेर पडिंग होईंग. त्यानंतर त्यांनी आमांज गाठिंग." कहाणीत जास्तीच्या तपशीलांची भर घातली.

"बावळ्या तू तोंड कंस्सच उघडिंग न. तू मुका असिंग." लाकीने बावळ्याला बजावले. "तुंज भाषा ऐकिंग तर लगेच ते समजिंग की इंथ गडबड असिंग."

"बावळ्या तू मंज नवरा असिंग." छमदने संधी साधून घेतली.

"तुंज काईंग?" लाकी छमदवर चिडली. "कोणाला पटिंग अंस्स काईंग सांगिंग."

"मंग काईंग तुंज नवरा सांगिंग? नी मी तुंज नोकराणी?" छमदचा आवाज चढला.

"बायांनो त्यांना ऐकू जाईल. आम्ही जवळ पोचलो हाय." बावळ्या मान खाली घालून तोंड हलताना दिसणार नाही याची

काळजी घेत कुजबुजला. दोघींनी एकामेकीला दातओठ खात 'मग बघून घेईन' अशी खूण केली. पुढच्या क्षणी एकामेकीच्या गळयात जीवलग मैत्रीणींसारखे गळे घातले. "इतकं बी प्रेम उतू जावू देवू नका गं. नजर लागती."

"कुनांज?" दोघी अगदी एका सुरात विचारत्या झाल्या.

"जगाची. आनी अजून कुनाची?"

# शंभर वर्षे पुढे - प्रकरण १२

तिथे चार-पाच पायरथ अडवलेले होते. त्यांच्या दिव्यांचे प्रखरझोत डोळे झाकोळत होते. काही पायघोडे सुद्धा होते. पण ते रिकामे होते. त्या धाडपथकाचे असणार. सरकारी माणसे खाकी कपड्यांमध्ये होती. त्यांच्या छातीवरती हुद्दा निदर्शक बिल्ले होते. कागद या हातांमधून त्या हातांमध्ये नाचवले जात होते. खेचले जात होते. एखादा फाटत होता. प्रवाश्यांची चिडाचिड, उद्वेग, व्यंगोक्त्या, खिजवण्या आणि फसवण्या-धमकावण्यांचा कल्लोळ जमिनीपासून उठून पार वरती दिगंतरी पोहोचल्यासारखा भासत होता.

पायरथातील अर्धी माणसे आत मजा बघत बसून होती. अर्धी बाहेर होती, जी सरकारदारांबरोबर कलरव करत होती. पायरथातील चकाचक कपड्यांतील ऊंची लोकांच्या ऊंची अत्तरगंधाचे फाये दरवळत होते. नाजूक सोनसाखळ्यांची किणकिण वाजत होती. कोणी विशालतनु तणावातून मेंदूची सुटका करायला, विरंगुळा म्हणून फराळी पदार्थांचे कुडुमकुडुम तुकडे मोडत होते. तो तळकट स्वादिष्ट वास भूक उफाळवत होता. आजच्या काळापेक्षा या धाडीत एकच मोठा फरक बावळयाला जाणवला. तो म्हणजे त्या

बड्या लोकातलं कोणी कानांना दूरभाष लावून कोणा दूर मंत्र्या-संत्र्याशी संपर्क साधायच्या प्रयत्नात दिसत नव्हते.

या काळात दूरभाषण नव्हते का? जणू प्रत्युत्तर म्हणून कानांवर बोलश्रवण साधनाचा पट्टा चढवलेला आणि त्यावर बडबडण्यात व्यस्त सरकारदार त्यांना अचानक आडवा आला. छमदने त्याला धक्का लागू नये यासाठी शर्थ करत गतिरोधक दाबला. एक हलकासा धक्का त्याच्या पार्श्वभागावर देत पायरथ थांबला. तोल जाऊन तो सरकारदार तोंडघशी आपटला. आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास. असा तो उसळून या तिकडमच्या अंगावर आला. "असिंग तुंज बड्या घरचे तुंज घरी. इंथ सरकारदारांज अंगावर रथ घालिंग? म्हणहून तुमांज सरकारी तुरुंगात पाहुणचार करविंग, तेहवा कळिंग."

लाकी, बावळ्या आणि छमदने त्याला टाळून एकमेकांकडे नजर टाकली. आता यावर काय बोलायचे? तसा तो उपेक्षेने जास्त चवताळला. "तुंज रथाचं ओळखपत्रच रद्द करिंग. आणिंग ते इंथ. लाल फुल्लीच मारिंग." त्याच्या या आदेशावर ही तिघे त्याच्याकडे काही उत्तर न देता, केवळ मारक्या म्हशी आणि रेड्यासारखी रोखून बघत राहिली. "आणिंग म्हणिंग ना ओळखपत्र." तो करवादला.

प्रतिसाद शून्य. तो त्रासला. छमदचा आकार बघून थेट शारीरिक कारवाईवर न उतरता त्याने साथीदाराला हाक दिली.

साथीदार एक छमदसारखीच धिप्पाड शरीरयष्टीची बाई होती. ती मदतीला येताच त्याचे किरकोळ शरीर सरसावले. "यांनी मंज ठोकरिंग नी ठार मारिंगचा प्रयत्न करिंग असिंग. ओळखपत्र दाखविंग नकार देईंग असिंग. सरकारी कामात अडथळा आणिंग असिंग." त्याने अपराधांचा पाढा वाचला. "यांना हजार रुप्पी दंड तरी होईंग." मागणीचा आकडा वाचला.

"आमिश, इतकाईंग दंड करिंगांज अधिकार तर दानिश बाईसाहेबांना फक्त असिंग. यांज शंभर रुप्पी दंड घेईंग नी जाईंग देईंग." साथीदारणीने कायदेशीर मर्यादेची त्याला जाणीव करुन दिली.

"यांना जाईंग देईंग?" आमिशने एक उपहासपूर्ण क्रूर हास्य हसण्याचा प्रयत्न केला. "यांना तर मी तुरुंगात जाईंग देईंग."

"ए खुळचुकाट," छमदने आवाज वर चढा लावला. "तूच. तू कोण आमिश की सामिश तोच." त्याने चमकून ती दुसऱ्या कोणाशी बोलतेय का? पाहण्यासाठी नजर आसपास फेरता त्याला सुनावले. "ही नाटकं बंद करिंग नी दानिशला इंथ बोलाविंग." तो ऐकून न

ऐकल्यासारखे करु लागला. "आता जाईंग? की तुंज वर्दी उतरविंग होईंग?"

"ए, तुंज सगळा माज उतरिंग ठेविंग." साथीदारणीला राग आला. "वर्दींज अपमान करिंग न."

"ते तुंज या यारांज आधी समजविंग." लाकीने टोला दिला. "खोटेईंग आरोप करिंग नी धमकाविंग. कायदा काईंग फक्त जनतेसाठी असिंग? याला असिंग न? आमाला यांज दानिश बाईसाहेबाकडे तक्रार देईंग असिंग. बोलाविंग तिला."

"तोंड संभाळींग नी बोलिंग. तो मंज यार असिंग न." साथीदारीण वतवतली. "तुला बाईसाहेबाईंग बोलिंग असिंग, तर तूच तिंजकडे जाईंग. ती तिंथ असिंग." एका खाकीतल्या दुहेरी बिल्लेधारीणीकडे बोट दर्शवले. ते त्या हुकूमदारीणीने सुद्धा पाहिले. ती तिथून ओरडली. "मोनिशा, तू तिंथ काईंग करिंग? आधी अडविंग असिंग त्या माणसांंज चौकशी लवकर पुरी करिंग नी ती मोकळी करिंग. अजून दोन पायघोडे येईंग असिंग. दुसरं कोण रिकामी असिंग न. तिंथ माणूस आमिशला सांभाळिंग देईंग."

तशी नाक उडवून मोनिशा म्हणाली, "अडिंग मंज खेटर तिंज ऐकिंग."

"मोनिशा मी इंथ यांज काईंग ते बरोबर बघिंग. तू जाईंग आता तुंज कामांज. ते खोळंबिंग ना?" आमिशने पलटी खालली. तेव्हा पाय आपटत ती गेली.

"मी काईंग म्हणिंग, विषय वाढविंग काईंग उगाच? शंभर रुप्पीत संपविंग. कंस्स?" आमिशने नकली हसत त्याचे दात दाखवले. त्यातले दोन चांदीचे नकली होते. पण मंडळी अडून बसली. उत्तर देईनात. आमिशने दातओठ चावले. "तुमाला रक्त लागिंग असिंग. तरी मी सटकिंग संधी देईंग. तर मंज उलटा दाब दाखविंग?"

"आमांजकडे पैसे असिंगच न. डाकू आमांज वाटेत लुटिंग." लाकीने थंडपणे उत्तर दिले.

"अंस्स? नी ते कुंठ?" आमिश तिरकसला.

"कांचबनाहून बाहेर पडिंग तेहवा." छमदने प्रश्न उत्तरला.

ते बाजूला खोळंबलेल्या पायरथातील एका बाईने ऐकले. "कांचबनांज वाटेला डाकू असिंग." तिने ओरडून गहजब उडवून दिला. सगळ्या पायरथातील लोकांमध्ये तीच चर्चा सुरु झाली. त्या बाजूला जाणार असणाऱ्यांचे धाबे दणाणले. तिथे उपस्थित सगळ्यांचे लक्ष या तिकडमवर खिळले. त्यांना हे नको होते.

लाकीने परिसरावर नजर फिरवली. तिला असे काही दिसले की तिच्या नजरेत एक वेगळी चमक तरळून गेली. ती छमदच्या कानात पुटपुटली. मग त्या दोघी गाडीतून पायउतार होऊन, दानिशकडे जाऊन तिला रंगवून काही कथा सांगताना बावळ्याला दिसल्या.

आमिश चरफडला. "फुकट इतकाईंग वेळ तुंजबरोबर जाईंग. दुसऱ्या कोणासंग वीस रुप्पी तरही मिळींग होईंग." बावळ्याने खाणाखुणा करुन बोलता येत नसल्याचे दर्शवले.

"आईसझुक्या!" खरमरीत शिवी घालून त्याचा नाद सोडून देऊन, आमिश जवळ आलेले दुसरे पायघोडे अडवायला धावला.

बावळ्या दानिशशी छमदच्या चाललेल्या संवादावर नजर ठेऊन होता. दानिशच्या खांद्यावर हात ठेऊन, नको ती सलगी दाखवत छमद मोठी घोडचूक करत होती. जमत आलेला डाव उधळला जाणार होता. लाकी तिथे नव्हती. नैसर्गिक उत्सर्जनाची सबब देऊन बाजूच्या झाडीत गेली होती. दानिशने छमदचा हात झिडकारला आणि तिला फैलावर घेतले. बावळ्या परिस्थिती सांभाळायला तिथे धावला. "ए! यार कोणांज म्हणिंग? लायकी असिंग काईंग तुंज?" दानिशने छमदला खडसावले.

"साहेबसरकार तुमी लय हुषार हाय. आमाला बरोबर वळीखलं की." बावळ्या दोन्ही हात जोडून दानिशपुढे पार कमरेतून झुकत नम्रपणे म्हणाला. बोलून जे साधले जाणार होते, ते मुका राहून काही जमणार नव्हते. डोळ्याच्या एका कोपऱ्यातून थोड्या अंतरावरील आमिशचे कान लांब झालेले त्याला दिसत होते.

दानिश जाम गोंधळली. "तू कोण असिंग?" बावळ्याचे वरपासून खालपर्यंत निरिक्षण करत, त्याचा अदमास घेत तिने विचारले, "तू जुनी भाषा काईंग बोलिंग?" तिचा आवाज जरा उतरला होता.

"कारन की बाकीच्या लोकांस्नी कळायला नको. आमचं नी तुमचं बी गुपित साहेबसरकार." बावळ्याने नजर तिच्या पायांवर ठेवत उत्तर दिले.

"गुपित?" दानिशच्या भुवया उंचावल्या.

"होय जी." बावळ्या लवून बोलला. "तुमी बरोबर वळखलं हाय की आमी साधी मानसं नाय. अशी चानाक्श नजर माझ्या या हाताखालच्या करमचारी बायकांची बी आसती तर?" तो उसासला. "तर आमची गुंडांच्या हाती फजिती नाय जाती." बावळ्या हलकेच पुढे सरसावला. तिच्या कानाजवळ तोंड नेत कुजबुजला, "तुमच्या लक्षात आलंच हाय ना, आमी मार

खाल्याच्या या खुना?" बावळ्याने आपल्या जखमांकडे इशारा केला. "लक्षात आलंच हाय ना?" दानिशने नकळत मान होकारार्थी हलवली.

"आमी गुप्तशिपाई हाय. नी गुंडाना पकडायला सोंग घेऊन गेलो होतो. पन या चुकार बायकांना काय सोंग नीट जमलं नाय. फशी पडलो. आमी त्यांना ठोकतो तेच्याआधी त्या गुंडानीच आमाला बेसावध गाठलं की. कस्संबस्सं जीव वाचवून सुटलो हाय." बावळ्याने चुकचुकाट केला. "आता तुमापासून काय लपवायचं वं? तुमी तर आधीच सगळा अदमास लावला असनारच की." बावळ्याने एक हताश नजर वर आभाळावर फिरवून दानिशवर लावली. "कामावर असताना नशा केला, तर अजून काय दुसरं होनार?" दानिशचा श्वास रोखला गेला. भुवया आकुंचल्या.

"तुमी बी सरकारदार. आमी बी सरकारदार. आमी एकमेकाला सांभाळून घेतलं नाय. तर अजून दुसरं कोन वं घेनार? आता ही गोस्ट वर कळली तर काय होनार? ते तुमाला मायतीच हाय." बावळ्याने आपले दोन्ही हातांचे तळवे खुले करून दानिशसमोर पसरले. "आमी तुमाला सांभाळून घेतो. तुमी आम्हाला सांभाळून घ्या की."

"तू नेमका काईंग बोलिंग? मंज काईंग स्पष्ट सांगिंग." दानिशने डोळे बावळ्याच्या डोळ्यात पार आत खोलवर रुतवत मागणी

केली. त्याच्या खांद्यावर तिच्या हाताची बोटं आवळली. तो तिच्या तावडीत होता.

"मी काय म्हनतो..." बावळ्या मुद्दाम तिच्याशी नजर न देता काचकुच करु लागला. "की ...की... आमी बी तीच चूक केली हाय. तुमी बी तीच चूक केली हाय. तर..."

दानिशने बावळ्याचं डोके दोन्ही हातांच्या पकडीत गच्च धरून वळवत त्याला आपल्याशी नजर देणे भाग पाडले. "काईंग चूक?"

"नशा." बावळ्याला नाईलाज होऊन उत्तर देणे भाग पडले.

थोडावेळ दानिशच्या कपाळावर संतापाच्या आठ्या पडल्या. मग हळूहळू त्या निवळल्या. तिने हलका उसासा सोडला. बावळ्याला हातातून मोकळा सोडला. "तुंज वरचा हुकूमदार कोण असिंग?"

तिच्या या प्रश्नावर बावळ्या गडबडला. पण छमदच्या लक्षात त्याचा खेळ आला होता. "सेनगुप्त. महामहीमांज मंडलाधिकारी." छमदने परस्पर उत्तर दिले.

"ओ!" दानिश चपापली. तरी खात्रीसाठी विचारले. "तुंज ओळखपत्र?"

"गुंडांनी आमांज सगळंईंग लुटिंग." छमदने बावळ्याच्या इशाऱ्यावर नम्रपणे झुकून नमूद केले. "साहेब सरकार आमांजवर मेहरबानी करिंग. आमी पण वेळ येईंग तेहवा यांज योग्य फेड करिंग."

दानिशने दूर नजर लावली. काही वेळाने तिचा निर्णय झाला. "तुमी जाईंग शकिंग." तसे बावळ्या आणि छमद घाईघाईने आपल्या पायरथाकडे गेले. दूरुन झाडीत दडून सगळा तमाशा बघत असलेली लाकी त्यांच्यापाशी धावत आली. तिने अविश्वासाने विचारले, "तिनं सोडिंग?"

तोच लाकीच्या अगदी मागून कुजबुजता आवाज आला आणि ती दचकून उडाली. "काईंग मंज तोंडाज इतकाईंग वास येईंग? तुला सहज कळिंग?" विचारणारी ती दानिश होती.

"त्यांज नाक जाम भारी असिंग. राखालांज नंतर तोच." लगोलग छमदने मखलाशी केली. लाकीला विषय कळेना. "बसिंग गं चटकनईंग." म्हणत छमदने लाकीला हात धरुन रथात ओढली.

"तुमांज नावं काईंग असिंग?" दानिशचा लोचटपणा वाढला.

"ही गुप्तकामगिरी हाय सांगितलं ना. बायेर फुटलं तर? वाऱ्याला बी कान असतात." बावळ्या खुसपुसला.

"साहेब सरकार," ते लांब कान धावत तिथे आले. आमिशने डोक्यावरचे बोलश्रवण साधन दानिशला देऊ केले. "मंडलाधिकारी सेनगुप्त असिंग. कोण चुगली करिंग की तू कामावर नशा करिंग असिंग."

"कोण?" चवताळून दानिशने आजबाजूच्या जमावावर नजर फिरवली. पलीकडील मोनिशाशी तिची नजरानजर झाली. मोनिशाने खुशाल सरळ तिच्याकडे दुर्लक्ष करत आपल्या चौकशीच्या सावजांवर नेली. "मोनिशा. नक्कीईंग तीच." दानिशला संशयाची खात्री वाटली. "तू बघिंगच, मी तिंज काईंग करिंग ते." आमिशकडे गरळली.

त्यानंतर गुमान ते बोलश्रवण साधन कानावर घालून बराच वेळ 'हूं हूं, न न' असं उत्तरत राहिली. लाकीने छमदला हळूच सटकायचा इशारा केला. पायरथ सुरु होण्याचा सूचक घरघराट ऐकू आला आणि दानिश त्यांना पुढ्यात आडवी ठाकली. "तुंज हुकूमदार मंडलाधिकाऱ्यांज सांगिंग आता की मी निर्दोष असिंग. मी नशा करिंग असिंग न." तिने कानावरचे बोलश्रवण साधन काढून बावळ्यापुढे केले.

"मी?" बावळ्या भांबावला. त्याने ते साधन हातात घेतले. ते कसे हाताळायचे? त्याला कळेना. हातात घेतानाच त्याने त्या

साधनातले पाणी हिंदकळवून सांडून टाकले. उलटसुलट करून बघितले. मग उसना आव आणत टेचात लाकीला हुकूम दिला, "हं. बिगी जोडून दे."

ते बघून आमिशला हसू आवरले नाही. "पाणी तर तू सगळंईग खाली टाकिंग. मग बोलिंग कोणांज जोडिंग? हवेंज संग काईंग?" दानिशला चिडवले, "हा मुका माणूस तुंज सफाई कंस्स सांगिंग?" दानिशच्या कपाळावरच्या आठ्यांमध्ये भर पडली.

"श्वास रोखिंग ताबडतोब." छमद आणि बावळ्याला कोपराने ढोसून लाकी चुटपुटली. दुसऱ्या क्षणी तिने हातातून कसली पिवळी पूड धुळवडीसारखी उधळून दिली. दानिश, आमिश आणि जोडीला आजूबाजूचे सगळे मोठमोठ्याने शिंकू खोकू लागले. हैराण होऊन गेले. "चलिंग." तोंड कापडाने झाकत लाकीने फर्मावले.

संधीचा फायदा घेत छमदने पायरथ शिताफीने सरकारदारांच्या ताब्यातून बाहेर काढला. तिघांनी जोर लावून पायदट्टे मारत तो तिथून जितक्या जलदीने दूर नेता येईल नेला. सुदैवाने त्यांचा पाठलाग सुरु करण्याइतक्या स्थितीत सरकारदारांपैकी कोणी राहिले नव्हते.

पुन्हा एकवार सुटकेचा आनंद दाखवायला बावळ्याने हात उंचावून एकाकी मार्गावर जोरदार हाळी मारली. "आईसझुक्या आमिश." लगोलग छमद आणि लाकीने सुद्धा.

"आईसझुकी दानिश." छमद.

"आईसझुकी मोनिका." लाकी.

त्यानंतर आधी झाला होता तसा शांत प्रवास थोडाच काळ चालू राहिला. मंडळी फार वेळ गप्प बसून राहू शकली नाहीत. "ती पिवळी पूड काय होती? तुला मिळाली कुठं?" बावळ्याने लाकीला विचारले.

"कुरसुंगींज फुलांज परागकण. मंज ती वेल तिंथ दिसिंग नी लगेच ते मिळविंग मी बहाणा करिंग. झाडीत जाईंग." लाकी आपल्या हुशारीवर खूश होती. "पण तू दानिशांज अंस काईंग सांगिंग की तिनं तुला जाईंग देईंग?" लाकी त्यावर विचार करुन करुन थकली होती.

"दिसिंग एकदम बावळट. पण तो जाम हुशार असिंग." छमदचे हे बोल त्याला नावे ठेवणे होते की नावाजणे? बावळ्याला नेमके कळेना. बावळ्याने दानिशला कसे हातोहात बनवत गुंडाळले, ते छमदने लाकीला समजावून सांगितले. मात्र तिला स्वतःला त्यातल्या काही बाबींचा उलगडा होत नव्हता. "तुला

कंस्स कळिंग की ती नशा करिंग असिंग? मंज तर जवळून सुदहा काईंग वास येईंग न. नी तू तिंज संग इतकं वाकिंग झुकिंग काईंग बोलिंग?"

"सोप्पं हाय की समदं." बावळ्या समजवायला लागला. "ती मोनिशा काय नी तो आमिश काय, तिचं कुनीच करमचारी तिला मोजित नाय होतं. किंमत देत नाय होतं. हो की नाय?" दोघी श्रोत्यांच्या चेहऱ्यावर न कळल्याचे भाव आले. "कसं हाय ना, सरकारी अधिकारी म्हनजे वशिल्याची तट्टंच असतात. लायकी नसताना, अक्कल नसताना पदावर चढलंली. पन मंग त्यांच्या हाताखालची मानसं त्यांना जुमानत नाय. हुशार हुकूमदार असला की हाताखालची मानसं काम करताना, अधीमधी सारखी वळून वळून बघत राहतंत की सायबाचं आपल्यावर लक्श हाय का नाय? तसं तर कुनीच दानिश बाईला बघत नाय होतं."

हा खुलासा दोघींना पटला. तसा बावळ्या पुढे सरसावला. "आता हाताखालची मानसं मान देत नाय, असा मानूस लोकांकडून मान मिळायला लय हपापलेला असतो की. पन छमद तिच्याशी बरोबरीनं वागायला गेली. तेवा तिचा रागाचा पारा चढत गेला."

"वाहवा! बावळ्या तुंजसारखं माणसं वाचिंग मंज येईंग तर?" छमदने स्तुती केली. "पण तिनं नशा करिंग ते तुला कंस्स कळिंग?"

"मी राहतो तिथं सगळीच नशा करतात की. कुनी सोऱ्याचा, कुनी तंबाखूचा, कुनी गांजेकस. त्या त्या नशेबाजाची तेची तेची लकशनं असतात की. दानिशबाईची डोळ्यातली बावली इतका प्रकाश डोळ्यावर पडत होता तरी बी फुललंलीच होती. तिला धड नुस्तं जागेवर उभं राहाला जमत नाय होतं. सारखं हा पाय, नाय तर तो पाय उचलत होती की. तिला कच्ची सुपारी चढलंली होती."

बावळ्याच्या या रहस्यभेदाला दाद दिल्याशिवाय यावेळी लाकीला राहवले नाही. "मस्तच! पण काईंग रे, तू ते दूरसंवादकातील पाणी सांडिंग काईंग? तुला इतकंईंग पण माहीतिंग न, की तेच तर आवाजाला वीजकंपात फिरविंग. मंगच संदेश दूर जाईंग."

"माझ्या काळातलं दूरभाष असं नाय होतं. ते राखालानं काढून घेतलंल तू बघितलं नाय काय?" बावळ्या तिरसटला. "असं चपट्या डबीवानी होतं बघ?"

"काईंग तू म्हणिंग ते, तू शंभर वर्षाआधींज असिंग, खरंईंग की काईंग?" छमदला अविश्वास लपवता येईना.

"तुला काय समजायचं ते समज. माझं काय जातंय?" बावळ्या कडवटला.

यावर छमद काही उत्तरणार तोच समोरून अचानक प्रकाशाचा प्रखर झोत त्यांच्यावर पडला. त्यांना पायरथ थांबवण्याचा आदेश मिळाला. ते चारी बाजूंनी पायघोडे आणि तीस-चाळीस सरकारदार शिपायांनी घेरले गेले होते. लाकी सुस्कारली. "म्हणहून आमांज पाठलाग होईंग न. आमांज स्वागताला सज्ज राहिंग, यांना दानिश कळविंग असिंग नक्की."

"मंज बाई शरीरात लढिंगसाठी शक्ती असिंग न." छमद घळघळली. "इतक्याईंग शिपायांज संग तर अजिबात न."

"माझ्या बी अंगात आता लढाईला जोर शिल्लक नाय हाय." बावळ्याने तिची रि ओढली.

"मंग काईंग, न लढिंगच राखालांज तावडीत फसिंग?" लाकी धुसफुसली.

"राखालांज इंथ काईंग संबंध असिंग न. त्याला सवय असिंग न, की तो बाकी सरकारदारांज मदत घेईंग. तो बाकींना मूर्ख नी काम बिघडविंगवाले समजिंग." छमदने लाकीचे म्हणणे खोडून काढले.

"दानिशांज राखालांज काईंग संपर्क असिंग न. तुला भयानं जिंथ तिंथ राखालच दिसिंग."

"लाकी, ही म्हनते ते बरोबर हाय." बावळ्याने छमदची बाजू घेतली. "बघू तरी मामला काय हाय. वगाच हाय नाय ती ताकद फुका कशापायी खर्ची घालायची?"

"हुं!" लाकीला काही बोलता येईना.

## शंभर वर्षे पुढे - प्रकरण १३

मध्यरात्रीची वेळ झाली असावी. मात्र त्या सरकारदारी चौकीवरची चहलपहल कमी झालेली नव्हती. तिथे एव्हढा गोंगाट होता की हीच तिथली भरात येण्याची वेळ असावी. रातकिड्यांची किरकिर त्यात ऐकायला येणे अशक्य होते. बावळ्या, लाकी आणि छमदला ढकलत सरकारदार शिपाई आणि शिपाईणी चौकीत घेऊन गेले. बावळ्याने वाटेत अनेक अंड्यांच्या आकाराची घरे बघितली होती. चौकीसुद्धा एका मोठाल्या अंड्याची असेल अशी अपेक्षा केली नव्हती.

ते एक चाळीस वार लांबीचे आणि वीस वार व्यासाचे आडवे पडलेले, दगडाचे भासणारे अंडे होते. त्याला दोन वार व्यासाची गोलाकार दारे होती. एक वार व्यासाच्या गोल खिडक्या होत्या. काचेच्या तावदानांनी बंद केलेल्या. ज्यातून प्रकाश बाहेर सांडत होता. तसेच अगदी छोट्या छोट्या जेमतेम अंगठ्याच्या पेराइतक्या भोकांच्या ओळी खालच्या आणि वरच्या बाजूला होत्या. त्या कशासाठी ते बावळ्याच्या आधी लक्षात आले नव्हते.

आत नेल्यावर त्या भोकांतून सरसरत अंगावर येणाऱ्या हवेमुळे कळले. ती वायुवीजनाची व्यवस्था होती. अंड्याच्या आत मध्ये

एका दगडी प्रतलाने खालती वरती अशी दोन मजल्यात विभागणी केलेली होती. प्रत्येक मजल्याची पुन्हा तीन खणांमध्ये उभ्या प्रतलांनी वा भिंतींनी. भिंतींवर पांढरे दिवे लटकत होते. त्या दिव्यांना लोंबणारे आणि हेलकावणारे लंबक लटकावलेले होते. एखाद्या लंबकाच्या घड्याळासारखे. वेताचे असल्यासारखे पण वेगळ्या काही लाकडाचे खुर्च्या, मेज, कपाटे आदी सामान होते. सगळ्या गोष्टींचा रंग नैसर्गिक होता. मळकट निरस. सरकारी चौक्यांना असतो तसा. तिथल्या वातावरणनिर्मितीसाठी आवश्यक. मनाची उभारी नष्ट करणारा.

त्या निरस वातावरणात वावरणारी वैतागलेली सरकारी माणसे, आल्या-गेल्या तिऱ्हाईतांवर ज्या प्रकारे खेकसत असतात वा त्यांची उपेक्षा करत असतात, त्या प्रकारेच या नव्या काळातली वागत होती. बावळ्याला या सगळ्या गोष्टींची सवय होती. तिथे अश्या चौकीत जो विशिष्ट तुंबलेला वास असतो, तो सुद्धा होता. त्याच्या काळातल्यासारखा. बावळ्याने एक जांभई दिली. त्यापाठोपाठ लाकीने. त्यापाठोपाठ छमदने. त्यापाठोपाठ तिथल्या मुख्य कोतवालाने, ज्याच्या समोर या प्रत्येकाला दोन दोन शिपायांनी धरून हजर केलेले होते. "कोण असिंग हे?" कोतवालाने पुढची जांभई हातामागे दडवत विचारले.

शिपाई उत्तरणार तोच मागून त्याला जोरदार ढुशी बसली. कोतवालाने त्याला आपल्या अंगावर कोसळण्यापासून जेमतेम रोखले. मागच्या शिपायाने ढकलले होते, म्हणून तो एक हाडकुळा माणूस आत येऊन आपटला होता. ढकलणारा गोरटेला घाऱ्या डोळ्यांचा शिपाई आत आला. त्याच्या मागोमाग अजून एक शिपाई बाई त्या गैरसोयीच्या गोलाकार दारातून. त्यामुळे आत खच्चून गर्दी झाली. "गम्बुल ह्या बारकूला इंथ काईंग आणिंग असिंग?" कोतवाल त्या घाऱ्या डोळेवाल्यावर डाफरला.

"हा बारकू जुगारी आकड्यांज चिठ्या घेईंग असिंग. त्याला आज रंगेहात पकडिंग असिंग." गम्बुलने मिश्यांवर फुशारकीने ताव मारला. "नोंदनीस, यांज नावानं आरोपपत्र नोंदिंग." परस्पर तिथल्या केस पांढरे झालेल्या कारकूनाला आदेश दिला. "फिर्यादी पक्ष असिंग...." त्याला शोधायला गम्बुलने मागे नजर फिरवली. मागच्या शिपाईणीने एका चकण्या तरुणाला ओढून सगळ्यांच्या पुढे हजर केला. "हां! हा चक्या." गम्बुलने त्या चक्कुसकडे इशारा करत सांगणे पुरे केले. चक्याने सगळ्यांना हात जोडून नमस्कार करत, स्मितहास्य केल्यासारखे दात दाखवले.

"ए, दात दाखविंग काम असिंग न." कोतवाल धुमसला. "गम्बुल या तुंज माणसांना बाजूंज खणात नेईंग. मंज इंथ दुसरं मोठं

चौकशींज काम असिंग." त्या शिपायाला दमात घेतल्यासारखा कोतवालाने हुकूम दिला. बावळ्या त्रयीकडे इशारा करुन दाखवला.

"पण साहेब सरकार मंज यांनी महाकाली गुंफांज परिसरात धरिंग." बारकूने आपली बाजू मांडायचा प्रयत्न केला.

"तर?" मेजावर हातातला शिपाईदंडा टेकवून त्यावर आपली हनुवटी टेकत कोतवाल खेकसला.

"तो भाग आता हाडकूदादाकडं असिंग." बारकूच्या या खुलाशावर कोतवालाचा चेहरा गोंधळलेला राहिला. "साहेबसरकार शार्दूलसिंहजी, मी हाडकूदादांज माणूस असिंग." शार्दूलसिंहाची हनुवटी दांड्याच्या टोकावरुन निसटली.

"गम्बुल याला सोडिंग देईंग." कोतवालाने हा फैसला देताच गम्बुल यावर विश्वास बसत नसल्यासारखा बघत राहिला.

"याला सोडिंग? पण काईंग?" गम्बुलच्या ओठांतून निषेधपूर्ण प्रश्न आला.

"तू मंज उलट विचारिंग?" शार्दूलसिंह रागाने फुलून मांजराच्या शेपटीसारखा दुप्पट झाल्याचे भासले. "मी तुंज हुकूमदार असिंग." एवढे कारण पुरे आहे असे त्याला वाटत होते.

"महाकाली गुंफा आमांज हद्दीत येईंग न. आमांज हद्दीबाहेरील गुन्हा नोंदिंग अधिकार आमांज असिंग न. तो अदखलअंदाज असिंग." नोंदनीसाने साहेबाची बाजू सावरुन घेतली. गम्बुलने हताशपणे हात हवेत वर उडवले. चक्याचा चेहरा पडला. बारकूचा उजळला.

"साहेबसरकार, न्यायांज पक्के असिंग." बारकूने शार्दूलच्या पायावर झोकून दिले. तिथे एवढी गच्चडी झाली होती की तो लाकीला धरणाऱ्या शिपाईणीवर चेंगटला. तिने त्याला चिडीला येऊन कोपर हाणले. त्यामुळे तो पलीकडे सरकला आणि छमदला धरलेल्या शिपाईणीवर आपटला. तिच्याकडून त्याला पुन्हा एकदा कोपराचा तडाखा मिळाला. खाली पडलेल्या बारकूला गम्बुलने गचांडीला धरून सरळ उभे केले. तिथून बाहेर काढण्यासाठी घेऊन निघाला.

या धडपडीचा फायदा घेत लाकीने शिताफीने कोतवालाच्या मेजावरील काही वस्तू लांबवलेल्या बावळ्याच्या चोर नजरेने अचूक टिपले. बावळ्या, लाकी, छमद त्रयीची आपापसात सूचक नजरानजर झाली. त्यांच्यात काही शिजू लागले.

जाता जाता दात विचकून निरोप घ्यायला बारकू विसरला नाही. "येईंग साहेब सरकार." तर चक्या खट्टू होऊन जायला निघाला.

"ए, तू कुंठ जाईंग?" कोतवालाने जरबेत त्याला विचारले.

"मंज तक्रारीला इंथ कोण वाली असिंग न. तो अजून कुंठ मिळिंग काईंग, शोधिंग जाईंग." कडवटपणे चक्या बोलला.

"तक्रार तर तुंज नावांज आता होईंग असिंग." शार्दूलसिंह गरजला. "अम्बु यांज नावावर गुन्हा नोंदिंग." नोंदनीसाला हुकूम दिला.

"साहेबसरकार, गुन्हा तपशील काईंग नोंदिंग?" आवाजात जितकी नरमाई आणता येईल तितकी आणत, नोंदनीसाने काकुळतीने विचारले. "फिर्याद कोणांज नावाने नोंदिंग?"

"हे सगळंईंग जर मंजच सांगिंग लागिंग, तर इतकीईंग वर्षे तू चौकीवर करिंग काय? नुस्ती मच्छर मारिंग हातानं टाळ्या पिटिंग पिटिंग? इतकी तुंज उमर वाढिंग. पण अक्कल वाढिंग न." शार्दुलसिंहाला संताप आवरेना. रागाने त्याचा आवाज चिरकला. उघड्या दारातून बाहेर बारकूची पाठ त्याला दिसली. हाकारून शार्दुलने बारकूला परत आत बोलावले. "या चक्यांज नावानं तू तक्रार देईंग. अम्बु यांज फिर्यादी नोंदिंग. फटाफट!" दांडका

नोंदनीसाच्या मेजावर दाणकन आपटला. "बारकू सांगिंग लवकर. यांज विरोधी तुंज काईंग तक्रार?"

"साहेब सरकार?" बारकूला एवढे डोके लढवायची सवय नव्हती.

"साहेब सरकार? चक्यावर तुंज इतकाईंग राग काईंग?" गम्बुलला कोडे पडले.

"तो अंध्याभाईंज माणूस असिंग या कारणिंग. अंध्याभाई आजकाल खूप हाताबाहेर उडिंग असिंग. लोकांना त्रासिंग. त्याला अडकविंग हा चक्या कामी येईंग." खुलासा करताना शार्दुलने दांडा चक्यावर रोखलेला होता. चक्या रागाने थरथरत होता.

"अंध्याभाईंज अड्डा तर महाकालींज पलीकडील भागात असिंग. आमांज चौकींज हद्दीपार दूर असिंग." गम्बुलला कोडे तरी देखील सुटेना.

"तुला त्यांज इतका विचार कशाईंग?" शार्दुलने आता दांडा गम्बुलवर रोखत आरोप केला. "तुला त्यांजकडून हप्ता मिळिंग असिंग काईंग?"

गम्बुल शरमून गोरामोरा झाला. पण चक्याने ते कोडे पुरते सोडवले. "हप्ता तर साहेब सरकारांना त्यांजकडून हविंग जाईंग. म्हणहून मंज गरिबाला फाश्यात अडकविंग बघिंग. हाडकूदादा हप्ता

पुरविंग म्हणहून या बारकूला सोडिंग असिंग. अंधेर नगरी चपेट राजा."

"चूपईंग. एकदम चूपईंग." शार्दुलसिंह पिसाळून ओरडला. "गम्बुल या सगळ्यांना बाजूखणात तिंथ नेईंग. मंज यांज फैसला करिंग होईंग." तो बावळ्या त्रयीकडे वळला. आधी छमदकडे वळला. "तू कोण असिंग? भारफाट्याहून पळ काईंग काढिंग? दानिशांज काईंग चुना लाविंग?"

यावर बावळ्याला हसू आले. तसा तो बावळ्याकडे वळला. "तुंज पोटात काईंग उकळिंग?" बावळ्याने एक तुच्छ कटाक्ष उत्तरादाखल दिला.

तोच त्याचे लाकीकडे लक्ष वेधले गेले. "ओहोहो! सुंदरी." लगोलग तिच्या अंगचटीला पोहोचला. तिच्या चेहऱ्यावर येऊन तो दडवणारे तिचे केस त्याने दांड्याने बाजूला सारले. "तुंज कहाणी काईंग असिंग? तुला यानं अपहरणिंग काईंग?"

"आमी मंडलेश्वर सेनगुप्त यांज आदेशावरून काम करिंग गुप्तशिपाई असिंग. आमांज त्या गुप्तकामांज जल्दी होईंग. म्हणहून घाईनं तिंथहून निघिंग. आमांज ओळखपत्र गुंडांज हल्ल्यात गहाळिंग. तर दानिश आमांज वेळ फुकट दवडिंग. जंस्स तू आता दवडिंग असिंग." लाकीने खरमरित उत्तर दिले. तसा शार्दुल

तिच्यापासून दचकून दूर झाला. त्याचा रंगात आलेला चेहरा फिका पडला.

"अम्बु मंडलेश्वरांज संपर्क जोडिंग." त्या तिघांचे आळीपाळीने सूक्ष्म निरिक्षण करत त्याने आदेश दिला. पण अम्बुला कैक वेळा प्रयत्न करून सुद्धा संपर्क जोडता येईना. मंडलेश्वरांशी सगळ्या जोडण्या त्यावेळी व्यस्त होत्या.

"साहेबसरकार आमांज जरूरी काम अडिंग असिंग. मी तुमांज विनंती करिंग की आमाला देरी करिंग न. कृपया लगोलग आमाला सोडिंग." छमद हात जोडून नम्रभाव धारण करत बोलली. तसा शार्दूलच्या चिंतित चेहऱ्यावरचा भाव झरझर पालटला.

"ए खाईंग खाईंग माजलेलिंग डुक्कर, मंज खात्री जाईंग, तेहवाच तुला जादा चरिंग मोकळी सोडिंग. समजिंग?" शार्दुलला गुर्मी चढली.

"ए रगत पिवून जगनारा खुरचीला चिकटलंला ढेकून, पुन्ना असलं चरबराट बोलला ना, तर तुला आधी मोकळा करीन कायमचा या खुरचीतून. मंडलेशवराची मानसं हाय आमी. काय समजलं?" बावळ्याने शार्दुलला सव्याज गुर्मीत परतीचा जबाब दिला.

सगळ्यांना वाटले की आता शार्दुलसिंह गरजून उठणार. तसे काही झाले नाही. बावळ्याची जुनाट भाषा ऐकून त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य मात्र फार दिसले. बाजूच्या खणातून गम्बुलने मुद्दाम डोकावून पाहिले की चौकीदाराशी एवढा ताठ्यात बोलणारा हा नरपुंगव आहे तरी कोण? शार्दुलला गम्बुलच्या चेहऱ्यावरची हास्यछटा दिसण्याआधी गम्बुलने चेहरा परतला. अम्बुनेहि चेहरा मेजावरच्या कागदांवर झुकवत त्याचे हसू लपवले.

घंटी वाजली. अम्बुने जाहीर केले की दूरसंपर्क जुळला आहे. पलीकडून स्वतः सेनगुप्त बोलताहेत. शार्दुलसिंहाने ज्या लिनतेने संपर्कसाधन आपल्या कानातोंडाशी जोडले, ती लिनता त्याला या जन्मात साध्य असेलशी, चक्या आणि बारकूला कधी स्वप्नात देखील वाटले नसते.

"जी साहेब सरकार मंडलेश्वरजी." असा त्याचा आवाज कानी पडता, बाजूच्या खणातले चोर आणि शिपाई सगळे एकत्र काहीहि कलत्र न करता, दाटीवाटीने गोलाकार दारातून डोकावू लागले. काही काळ हो, हो, न, न अशी फक्त एकाक्षरे त्याच्या तोंडातून उमटत राहिली. "कंस्स दिसिंग ते?.. ." पुटपुटत मग त्याने या त्रयीचे वर्णन सादर केले. "काईंग? त्यांजबरोबर तुमाला बोलिंग असिंग?......देईंग. त्याला देईंग." विस्फारलेल्या डोळ्याने त्याने

आपल्या कानातोंडावरून साधन उतरुन बावळ्याकडे पुढे केले. "साहेबांज तुंजबरोबर बोलिंग असिंग." बावळ्याला धरणाऱ्यांनी नरमून मोकळे सोडले.

बावळ्या बावचळला. त्याला ते साधन कसे हाताळायचे माहीत नव्हते. त्याने लाकीकडे पाहिले. "क्रमांक सातबारा, सेनगुप्तच हाय का जरा खात्री करून घे आधी. आमचे गुप्तगोश्टी दुसरं कोन तर ऐकत नाय ना? बघ जरा. सगळं बरोबर असलं तर माझ्या डोक्यावर घाल ते दूरभाष." आवाज खास साहेबी थाटात लावला.

लाकीने हातांना धरून असलेल्यांना हिसडा दिला. त्यांनी कोतवालाकडे पाहिले. त्याने मुंडी हलवली. तसे त्यांनी लाकीला मोकळे सोडले. बावळ्याने भिवया उंचावून छमदला धरणाऱ्यांना बघितले. त्यांनी आपसूकच तिला मोकळे सोडले. या क्षणी बावळ्या तिथला हुकूमदार झालेला. लाकीला त्याची अडचण लक्षात आली होती. तिने उगाच ते साधन खालीवर करुन निरखल्यासारखे केले. मग बावळ्याच्या डोक्यावर नीट बसवून दिले.

बावळ्याची खरी कसोटी आता होती. त्याने हातसफाईने बरेचसे पाणी सांडले. इतरांच्या नकळत.  मग तो काय वाटेल ते

बरळायला मोकळा झाला. ते पलीकडे ऐकू जाणार नव्हते. तो भरपूर बरळला. शार्दूलसिंहच्या भरपूर चहाड्या सांगितल्या. आपण आता अजिबात वेळ न दवडता लगोलग कामगिरीवर रवाना होतोय, असे वचन देखील दिले. साधन अलगद डोक्यावरून उतरले. उतरवताना मुद्दाम सगळ्यांसमोर पाणी सांडले. "ए पानी घाल आधी." अम्बुला हुकूम दिला. अम्बुने मानला. "मंडलेशवरांना काय उत्तर देतो ते दे की आता." म्हणत मग शार्दुलसिंहाकडे पुढे केले. शार्दुलने कापऱ्या हातांनी ते साधन परत ताब्यात घेतले आणि डोक्यावर चढवले.

पलीकडून सेनगुप्ताने तो काही उत्तर का देत नाही, काही बोलत का नाही? यावर त्याला प्रताडायला सुरुवात केलेली. गोंधळामुळे काय बोलावे? शार्दुलला कळत नव्हते. त्याच्या 'हुं हुं'ने सेनगुप्त अजून चवताळत होता. बावळ्याने लाकी आणि छमदला 'चला बाहेर' म्हणून टेचात इशारा केला. तश्या त्या दोघी गोलाकार दारातून सगळ्यांसमोर राजरोस बाहेर पडल्या. मागोमाग बावळ्या बाहेर जाणार तोच? "धरिंग त्यांना." शार्दुल अंगातला सगळा जोर एकवटून किंचाळला. त्याचा गोंधळ अखेर शमला होता तर.

चपळाई साधत बावळ्याने एका शिपायाकडील हत्यार हिसकावले आणि थेट शार्दुलवर उडी घेत त्याला हत्याराच्या नेमावर धरले. काही क्षण सगळी चौकी भेदरली. मग हलायला

लागली. सगळ्या शिपायांच्या हसण्याने. शार्दुलच्या चेहऱ्यावरचा ताण निवळला. बावळ्याची पर्वा न करता तो खुश्शाल बाजूला झाला.

बावळ्याने हत्यार चालवायचा कुचकामी प्रयत्न केला. ते कसे चालवायचे? त्याला कळत नव्हते. पण ही गोष्ट यांना कशी कळली? गम्बुलने येऊन ते हत्यार सरळ बावळ्याच्या हातातून खेचून घेतले. झटापटीत कुठला चाप ओढला गेला. बावळ्या जी नेम धरायची बाजू समजत होता, तिच्या बिल्कुल उलट्या दिशेने छर्रा उडाला. हुं! त्याने हत्यार उलटे रोखल्यावर कोण भिणार होते?

"उद्या मंडलेश्वर सवताहा जातीनं तुमांज चौकशीसाठी दंडाधिकारी म्हणहून येईंग असिंग? तू जे काईंग उत्तर त्यांना देईंग, ते देईंग की आता?" शार्दुलसिंहाने खिजवले.

"तो आमचा आमचा गुप्त मामला हाय." बावळ्याने तुच्छतेने त्याला उडवून लावला. "पन दुसरा एक विषय मी त्यांच्या संग बोलनार हाय. सांगू कंचा? हाडकूभाईचा हप्ता तू वरती नक्की पोचवतो का? आनी तो नेमका किती? तुझं उत्तर तयार ठेव. काय हाय ना बिलामत? काय?" कुर्‍यात जवाब देता देता बावळ्याचे ध्यान दाराकडे गेले. छमद आणि लाकीला धरून आत आणण्यात येत होते. त्याला नवल झाले. "तुमी सटकला का नाय? चला.

उरलली रात आमाला शांत कोठडीत झोपायला तरी मिळाली हाय. लय बेस झालं."

## शंभर वर्षे पुढे - प्रकरण १४

बावळ्याच्या कोठडीचे गोलाकार आणि लोखंडी बाकदार सळयांचे दार गम्बुलने खोलले. कालची रात्र बावळ्याने एकट्याने त्या दगडी अंड्यातील खणात काढली होती. त्याला वाटले होते की चक्याला सुद्धा त्याच्या जोडीला ठेवण्यात येईल. पण चक्या बहुतेक हप्त्याची मांडवली करुन सुटका करुन घेण्यात यशस्वी झाला होता. बावळ्याच्या काळातल्या कोठडीपेक्षा ही कोठडी त्याला सुसह्य वाटली होती. इथे डास जे नव्हते. आळस देत हातपाय ताणत बावळ्या बाहेर पडला. त्याच्या हातातील काढण्या त्याला त्यासाठी जितकी मुभा देऊ शकत होत्या तितकी घेत. "चलिंग." गम्बुलच्या सूचनेबरहुकूम बावळ्या त्याच्या मागेमागे खळखळ न करता गेला.

ते इमारतीबाहेर पडले. समोर दोन मोठे पायरथ उभे होते. त्यातला एक लोखंडी पिंजरेदार होता. त्यात लाकी आणि छमद आधीच बसलेल्या होत्या. पायरथाच्या पुढच्या भागात पाय मारणारे दोन चालक बसलेले होते. कोतवाल शार्दुलसिंहाचा कुठे पत्ता नव्हता. आजूबाजूला रान होते. अंडा चौकी तिथे एकाकी होती. सकाळच्या प्रसन्न वातावरणात पक्ष्यांची मंजुळ किलबिल

चालू होती. हलका रानफुलांचा गंध उधळला होता. सूर्य वर येऊन बराच वेळ झालेला होता. बहुतेक साडेआठ वाजले असावेत. झोप झकास झाल्यामुळे बावळ्याला ताजेतवाने वाटत होते. हवेत जरा गारठा होता. मुंबईच्या हवेत असू शकतो तितका. विचारता झाला, "यार चाय मिळंल का?"

गम्बुलने दुर्लक्ष केले. बावळ्याला बाहेर फार मोकळिक घेऊ दिली नाही. "तिंथ बसिंग." म्हणत बावळ्याला पिंजरेवाल्या पायरथाकडे ढकलले. आत शिरताना बावळ्याने दोघींना अभिवादन केले. "काय मंडळी, रात्र बेस गेली की नाय? झोप लागली की नाय?" हाशहुश करत लाकीच्या बाजूच्या आसनावर बसता झाला. समोर बसलेल्या छमदच्या चेहऱ्यावर नाराजी आली.

"मंज अंगाला काईंग इतकेईंग काटे असिंग राजा?" ती करवादली. "तू जवळ असिंग न, तर झोप कंशी लागिंग?" मग मोठ्याने उसासली. "तू जवळ जरी असिंग तरही लागिंग होईंग न. सगळी रात आमी जागिंग साजरी करिंग होईंग." यावर गम्बुलने धाडकन पिंजऱ्याचा दरवाजा वैतागाने आपटून बंद केला. त्याला बंदी प्रेमिकांना काही खरमरीत सुनावायचे होते. पण शार्दुलची हाक आल्यामुळे राहून गेले.

"सगळे बंदी घालिंग काईंग पिंजऱ्यात?" इमारतीतून बाहेर पडताच शार्दुलने गम्बुलला हाक मारून विचारलेले होते. "बाकी सगळेईंग तय्यार?"

"जी साहेब सरकार. सगळेईंग तय्यार." म्हणत गम्बुल पिंजरेवाल्या पायरथाच्या पुढच्या भागात चढून, आत साथीदारांच्या जोडीला जाऊन बसला. शार्दुलने बंद्यांकडे साफ दुर्लक्ष करून, दुसऱ्या पायरथात चढाई करत मागच्या आसनात बैठक पक्की केली. पुढच्या भागात सज्ज बसलेल्या चालकांना निघण्याचा आदेश दिला. पुढे पिंजरारथ आणि मागे शार्दुलचा पायरथ मार्गावरून धावू लागले.

छमदने काढण्या घातलेले हात पुढे करुन बावळ्याला चिमटा काढला. त्याने बिथरून 'उई' केले. "काईंग रे? मी कोतवालांज संग नम्रतेनं बोलिंग. तर तो मंज डाफरिंग. तू त्यांज संग चढेलपणानं वागिंग तर मऊ होईंग. अंस्स कंस्स? तूच तर सांगिग होईंग की सरकारदार अधिकाऱ्यांज संग नम्रतेने वागिंग नी बोलिंग म्हणहून. जंस्स दानिशबाईंज संग?"

"बायांनो मी तुमाला सांगितलं हाय की हाताची पाची बोटं सारखी नसतात. तशी मानसं बी सारखी नसतात. हर एकाचा मगदूर बघून ठरवावं लागतं की? त्याच्या संगं कसं वागायचं ते." बावळ्या

समजावून देऊ लागला. त्याला दिसलं गम्बुलने मान फिरवून त्याच्यावरच नजर लावलीय. त्यामुळे त्याचा उत्साह दुप्पट झाला. "या कोतवालाच्या सारख्या सरकारदारांचा एकच खाक्या असतो बघा. खालच्या मानसांस्नी जोड्यानं लाथ नी वरच्या मानसांचं जोडं चाट. त्या चक्या नी बारक्या संगं तो कस्सा वागत होता. ते बघितलं की नाय तुमी? आनी हाताखालच्या मानसांशी कस्सा मगरुरीनं. ते ऐकलं की नाय तुमी? तितकं बस्स झालं की! तो काय लायकीचा मानूस हाय ते कळायला. तसा बी आमी पैलं आलो, तेवा तो एक तंगडं खुर्चीच्या हातावरून टाकून बसला होता. ते बघून मला वाटलंच होतं तसला असनार."

"म्हणहजे? माणूस कंस्स बसिंग, त्यांजवरुन पण कळिंग काईंग तो कंस्स असिंग?" छमदला नवल झाले.

"तर वं!" सावळ्या होकारला. "मानूस कसा बसतो, चालतो, उभा राहतो, वाकतो. समद्यावरुन दिसतं की. तो कसा हाय ते."

"पण तू त्यांज संग चढाईनं वागिंग. तर तो नरमिंग काईंग? आणखीईंग चिडिंग काईंग न?" छमदला कळेना. गम्बुलची मान सुद्धा तिला दुजोरा दिल्यासारखी हललेली बावळ्याला दिसली. लाकीच्या डोळयात सुद्धा मोठालं प्रश्नचिन्ह होतं.

"काय की तुमाला इतकं बी समजंना?" बावळ्याला सुद्धा प्रश्न पडला. "आताच तर सांगलं ना? जो त्याच्या संग नरमाईनं वागंल, तो त्याच्यासाठी खालचा. त्याला तो जोडं हाननार. जो दाबात वागंल तो त्याच्यासाठी वरचा. त्याचं तो जोडं बी खाईल. ही विंचवाची जात हाय. घट्ट दाबात धरलं, तरच तुमचं निभावनार. "

"आहा!" बावळ्याच्या सगळ्याच श्रोत्यांच्या तोंडातून उदगार बाहेर पडला. दोन चालकांच्या तोंडातून सुद्धा. गम्बुलने मांडीवर थाप मारली. "आत्ता!" करत. तो यापुढे कायम शार्दुलशी टेचात वागणार आहे. याची बावळ्याला खात्री झाली. या विद्यादानाचे मोल नक्कीच काही खतरनाक स्वरुपाचे मिळणार. याची सुद्धा आजवरच्या अनुभवांवरुन. त्यामुळे त्यापुढच्या प्रवासात छमदने अधिक ज्ञानप्राप्तीसाठी त्याला किती जरी उकसवायचा प्रयत्न केला, तरी त्याने तोंडाला घट्ट कुलुप घालून ठेवले.

अर्धा तास प्रवास चालला. लहानग्या मुलाने उत्साहाने नवीन देश पाहावा, तसा बावळ्या पिंजऱ्याच्या जाळीतून दिसणारी दृश्ये पाहत होता. रान मागे पडल्यावर मोकळे माळरान सुरु झाले. त्यात अध्येमध्ये कुठे घरे, शेते, वाड्या दिसू लागल्या. जसजसे ते शहरी वस्तीच्या जवळ पोचले, इमारतींचे प्रमाण वाढत गेले. साध्या खोपटांच्या ऐवजी अंडीवाल्या इमारती जास्त जास्त दिसू लागल्या.

जेव्हा सगळ्याच इमारती अंडेदार दिसू लागल्या, तेव्हा तो समजून गेला की शहर आले.

वाटेत शहराच्या वेशीवर एक सरकारी चौकी लागली. सरकारी वाहन असल्यामुळे त्यांना अडवण्यात आले नाही. मार्गावर इतर वाहनांची वर्दळ लक्षणीयरित्या वाढली. शहराच्या क्षितिजावर उंच इमारती कुठेच वर डोकावत नव्हत्या. या काळात अनेक मजली इमारतींची फारशी हौस लोकांना नव्हतीशी दिसले. तिथल्या बाजाराच्या वाटेला त्यांची स्वारी गेली नाही. याचे बावळ्याला थोडे दुःख झाले.

एका गोलाकार बगिच्याला वळसा मारुन त्यांची वाहने अखेर एका मोठाल्या अंडा इमारतीच्या पुढ्यात उभी राहिली. प्रवेशद्वाराशी जरूरी वर्दी दिल्यावर आत पोचली. ते अनेक विटकरी रंगाच्या अंड्यांचे संकुल होते. इमारती एकमेकींना लांब प्रशस्त मोकळ्या व्हरांड्यांनी जोडलेल्या होत्या. त्यांना कमानदार दगडी खांब होते. तसेच वरती वेताच्या कामट्या नी चट्ट्यांची शाकारणी होती. आवारात करड्या रंगाचे एकसामाईक कपडे घातलेल्या माणसांची गर्दी होती. त्यांचा नूर पिंड मिळवण्यासाठी टपलेल्या कावळ्यांसारखा होता. बावळ्याच्या सराईत नजरेने ते या

काळातले वकिल असल्याचे बरोबर ओळखले. "ते वकीलच हाय ना?"

"परदेशांज वकील? ते काईंग इंथ होईंग?" छमदने आश्चर्य व्यक्त केले.

"ते करडं एकसारखं कापडं घातलंल लोक?" बावळयाने आपल्या समजुतीचा चपशील पुरवला.

"ती माणसं? ती लोकांना बाजू कंस्स सावरींग नी पंचांना कंस्स पटविंग, त्यांज सल्ला देईंग होईंग." छमदने आपल्याकडचा तपशील पुरवला.

"म्हनजीच तर वकील? लोकांची बाजू पैसं घेवून न्यायाधीशा समोर मांडनारं."

"छॉ! पंचांसमोर हर एकाला सवताहा सवताहांज बाजू मांडिंग लागिंग. आरोपी होईंग. वा फिर्यादि होईंग. हे सल्लागार सुदहा पैकं घेईंग. पण त्यांज न्यायालयात वाव होईंग न." छमदने खुलासा केला.

ही गोष्ट चांगली होती की वाईट, ते बावळयाला ठरवता येईंना. अनेक मोठ्या आंब्यांच्या झाडांनी आवार भरलेले असल्यामुळे भरपूर सावली आणि थंडावा होता. त्या वृक्षांच्या पारांवरती पक्षकार आणि त्यांच्या त्या बेनामी सल्लागारांच्या कुजबुजत्या

मसलती चालू होत्या. वरुन कोकलणाऱ्या आणि शीटणाऱ्या पक्ष्यांना दाद न देता.

एका व्हरांड्यापाशी बंद्यांना पायउतार करवून त्यातून चालवण्यात आले. शार्दुलच्या जोड्यांची करकर त्या दगडी फरश्यांवर जोरदार ऐकू येत होती. तिथल्या गंभीर शांतीमुळे असेल. वाटेत आलेल्या कोणाचे अभिवादन शार्दुलने स्विकारले नाही. ते लोक त्याच्या पदाच्या जोडीचे नसणार. तिथे सरकारदार खाकी कपड्यातल्या अनेक माणसांचा राबता होता. जसा नेहमी न्यायालयांच्या इमारतींमध्ये असतो. त्यांची चौकशी आणि निवाडा ज्या दालनात होणार होता, त्या अंड्याच्या दारांतून त्यांना आत नेऊन शार्दुलने एका रिंगणात उभे केले. गम्बुल व इतर फौजफाटा दालनाबाहेर राहिला. आत तिथले वेगळे सरकारदार शिपाई होते. त्या दालनाच्या प्रवेशद्वारावर 'सरकारांज खटले' अशी पाटी होती.

या पन्नास-साठ वार लांबरुंद अंड्याला मोठाल्या तीन-चार वार व्यासाच्या गोल दारांची उघडणूक होती. आत मजले नव्हते. त्यामुळे अंड्याचे छत भरपूर उंचावर होते. दालनाची भव्यता मनावर दडपण आणत होती.

तिथे आधीच कोणा कोणा आरोपींची दुसऱ्या लाकडी कठड्यांच्या रिंगणात चौकशी चालू होती. त्या प्रकारची पाच रिंगणे

तिथे होती. सगळ्या रिंगणात कोणी ना कोणी आरोपी आपल्या चौकशीची वाट पाहत बसून होते. पाच माणसांची टोळी ऐटीत भारदस्त पोषाख करून, एका रिंगणाकडून दुसऱ्या रिंगणाकडे जात, तिथल्या आरोपींची चौकशी आणि पुराव्यांची खातरजमा करत होती. ते न्यायनिवाडा करणारे पाच पंच होते.

शार्दुलसिंहाने आपल्या बंद्यांचा क्रम लगेच लावण्यासाठी तिथल्या कारकून बाईशी हुज्जत घातली. त्याच्यासारख्या जबाबदार अधिकाऱ्याला आपले परिक्षेत्र सोडून, फार वेळ दुसरीकडे राहता येण्यासारखे नव्हते म्हणे. हो ना करता करता, ती केसांच्या लांब दोन वेण्यांचे शेपटे खांद्यांवरून पुढे सोडलेली बाई राजी झाली. तिचे नाव कार्लजा तिच्यासमोर लेखी मांडलेले होते.

बावळ्याला दिसले की खटल्याची दंडाधिकारी एक बाई होती. बुवा नव्हता. "हाच काय तो सेनगुप्त?" त्याने छमदला हलकेच कानात विचारले. हा प्रश्न शार्दुलला सुद्धा पडलेला. कारकून बाईने सांगितले की माननीय महान महामहीमांच्या सोबत बैठकीत व्यस्त असल्यामुळे, मंडलेश्वर अजून मोकळे झाले नव्हते. इतक्यात येण्याची शक्यता फार कमी होती.

यावर शार्दुलने बरीच धुसफुस केली. सेनगुप्त स्वतः येणार, म्हणून तर तो स्वतः जातीने आला होता. तिने सुद्धा टेचात सुनावले

की इतके जर आहे, तर मग ती त्याच्या आरोपींचा क्रम सगळयात शेवटी ठेवेल. त्याने मंडलेश्वराची वाट पाहावी. त्यापुढे शार्दुलच्या कुरकुरीला तिने अजिबात भीक घातली नाही.

बावळ्या त्या इतर खटल्यांची मजा घेऊ लागला. ते सगळे कायदे मोडल्याचे आरोप असलेले सरकारतर्फे भरलेले खटले होते. चालू होता त्या खटल्यात एक तरुणी आरोपी होती. बेकायदेशीर शर्यतीत भाग घेतल्याबद्दलचा खटला होता. 'पिसूडीची शर्यत?'

बावळ्याला त्याच्या स्त्री साथीदारांकडून माहिती पुरवण्यात आली की पिसूडी हे या काळातले सगळयात वेगवान वाहन होते. पाय मारूनच चालवले जाणारे अर्थात. पिसवेप्रमाणे उड्या मारत अंतर कापणारे. एक उडी सहज ऐंशी ते शंभर वार लांब मारणारे. स्वाराला तोल सांभाळायला फार कठीण जाणारे. फक्त लष्कराच्या वापरात असणारे. जर ते जप्त केलेले वाहन इथे सादर केलेले असते, तर काही ना काही जुगाड करून, त्या दोघींनी त्याचा ताबा मिळवला असता. हातोहात सगळ्या सरकारदारांना हूल देऊन छू झाल्या असत्या. सुदैवाने जप्त वाहन तिथे सादर केले गेलेले नव्हते. बावळ्या हवेवर उनाडत जाण्याच्या संकटातून वाचला.

त्या तरुणीची साक्षीदारीण आज हजर राहू शकली नव्हती. तिचा सबबनामा कारकूनबाई कार्लजाने दंडाधिकारी बाई हिरामणी

देवींना वाचून दाखवला. "मंज मासिकपाळी चालूईंग असिंग. मी फार दुखणाईत असिंग. बायकांज वाट्यांज हे कष्ट, एक बाई म्हणहून माननीय महोदया चांगले समजिंग शकिंग. तेहवा मंज खटल्याईंग साक्षीला पुढंईंग तारिख देईंग मेहेरबानिंग." हिरामणीने समजून घेऊन मान होकारार्थी हलवली. तो खटला आजच्यापुरता रद्द केला. बाकी पंच पुरूष होते. त्यांना हे तितकेसे मान्य असल्याचे दिसले नाही. थोडी फार खळखळ होऊन ते मान्य झाले.

दुसरा आरोपी एक तरुण होता. एका वाढदिवसाच्या जंगी मेजवानीत विनापरवाना दूरतीरमार काठा हत्याराचे प्रदर्शन व झाडावरुन नारळ पाडायच्या फुशारकी खेळासाठी, त्या हत्याराचा दुरूपयोग केल्याचा त्याच्यावर आरोप होता.

"दूरतीरमार काठा?" बावळ्याची शंका निवारायला त्याच्या साथी तत्पर होत्या. काही वाव दूरपर्यंत तीराचा अचूक मारा करू शकणारे ते हत्यार होते. खरेतर तुमच्या नजरेचा पल्ला जिथपर्यंत जाऊ शकतो तिथपर्यंत. एखाद्या म्हशीएवढाले मोठे. मालमुंगाडी या अवजड वाहतुकीला वापरल्या जाणाऱ्या वाहनाशिवाय ते हलवता येत नसे. एवढे जड. ते जप्त केलेले हत्यार सरकारी पक्षातर्फे तिथे सादर करण्यात आलेले होते. त्याचा उपयोग करुन पळण्याचा

विचार अशक्य होता. दोघींचे एकमत पडले की ते हत्यार वितभर सुद्धा हलवण्याआधीच त्यांच्या पायात परत बेड्या पडतील.

तो खटला चालवणारी सरकारी पक्षाची साक्षीदारीण उपस्थित नव्हती. तिचा सबबनामा वाचून दाखवताना कारकूनबाईने सांगितले की साक्षीदारीणीची पाच वर्षांची मुलगी तापाने आजारी होती. एक बाई म्हणून दंडाधिकारी साक्षीदारीणीची अडचण चांगली समजू शकतील. तेव्हा खटल्याची तारिख पुढे ढकलावी. ही साक्षीदारीणीची विनंती होती. हिरामणीने तो खटला सुद्धा पुढे ढकलला. पुरूष आरोपीचा व पुरुष पंचांचा आक्षेप आणि निषेध धुडकावून.

तिसरा खटला एका वयस्कर पुरूषावर होता. रस्त्यावरुन जाणाऱ्या शोभायात्रेतील नाचणाऱ्या तरुणींना निष्काळजीपणे पायरथ चालवून ठोकले आणि जखमी केले त्याबद्दल. इतरांच्या जीवाला धोका निर्माण केला म्हणून. त्या साक्षीदार तरुणी आज उपस्थित राहू शकणार नव्हत्या. कारकून बाईने तसे त्या तरुणींवर उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर केले. त्या सगळ्या तरुणी आदल्या रात्री प्रमाणाबाहेर वरातीत दारू पिऊन शुद्ध हरपलेल्या होत्या. त्यांना अद्याप शुद्ध आलेली नव्हती. तेव्हा खटला पुढे ढकलण्याची सरकार पक्षाने विनंती केली.

आरोपीच्या हरकतींना न जुमानता, हिरामणीने बिचाऱ्या मुलींचा कैवार घेत खटला पुढे ढकलला.

"ही बाई पुरती पुरूसांचा राग राग करनारी हाय की." बावळ्या रिंगणात शेजारी उभ्या दोघींनाच फक्त ऐकू जाईलसे पुटपुटला. "याचा आमी फायदा करुन घ्यायला हवा." छमदला बावळ्याचा निष्कर्ष तितकासा पटला नाही. फार घाईचा वाटला. चौथ्या खटल्याने बावळ्याच्या निष्कर्षावर खात्रीची मोहोर उमटवली.

आरोपी स्वतःच्या दुर्दैवाने एक पुरुष होता. त्याच्यावर सार्वजनिक मालमत्तेचे  नुकसान केल्याचा आरोप होता. एका सरकारी इमारतीचे तावदान त्याने खेळात मारलेल्या चेंडूमुळे फुटले होते. तो ते पुन्हा जशास तसे बसवून द्यायला तयार होता. पण हिरामणीने हजार रुप्पींचा दंड त्याच्या अशा बेजबाबदार वर्तनाला कायमची जरब देण्याच्या सबबीवर ठोठावला. ती एक लट्ठ कुरळ्या केसांची, सुजलेल्या चेहऱ्याची चाळीशीपार बाई होती. बावळ्याच्या मते जरठ कुमारिका.

आता त्यांच्या चौकशीची पाळी आली. त्या तिघांमध्ये कट शिजू लागला. शार्दुलसिंहाने स्वतः त्यांच्या अपराधांचा पाढा वाचला. "माननीय दंडाधिकारी हिरामणी देवी यांज सादर प्रणाम. मी परिक्षेत्र अधिकारी विभाग आरेगांव सुभा, अपराधी सादर करिंग

परवानगी मागिंग. यांज अपराध अंस्स असिंग. विनापरवाना किंबहुना चोरींज वाहन चालन करिंग असिंग. गस्तीवरील अधिकारणीला झुकांडी देईंग असिंग. चौकीवर आणिंग तेहवा सवताहांज खरीईंग ओळख लपविंग असिंग. मंडलेश्वरांज गुप्त शिपायांज पैकी एक असिंग, अंस्स खोटीईंग बतावणी करिंग. त्या कामांजसाठी जरूरी ओळखपत्रे जवळ असिंग न. मंडलेश्वरांज संग दुरसंपर्कात खोटेईंग बोलिंग असिंग. या गंभीर अपराधांज कारणिंग, मंज चौकीवर कोठडीत दोन दिवस त्यांज चौकशींज पूर्ण मुभा विनाजबाबदार, आपण सक्षम माननीय दंडाधिकारी देईंग. ही मेहरबानिंग. "

लाकी आणि छमदने ठरल्याप्रमाणे बोलण्यात पुढाकार घेत शार्दुलसिंहाचे आरोप खोडून काढले. "माननीय दंडाधिकारी हिरामणी देवी यांज सादर प्रणामिंग. माननीय मंडलेश्वर सेनगुप्त जो आमांज हुकूमदार, तो परवानगी देईंग न, तोवर आमी आमांज गुप्त कामगिरींज तपशील उघडिंग शकिंग न. गुंड आमांज वर हल्ला आणि लूट करिंग असिंग. या कारणिंग आमांज ओळखपत्रे असिंग न." छमदने नम्रपणे निवेदन केले.

"जर आमी अपराधी होईंग तर काईंग पळिंग न? सवताहा काईंग यांज चौकीवर जाईंग? विचारिंग साक्ष सरकारदार

गम्बुलला." लाकीने मोठाल्या गोलातून बाहेर उभ्या दिसणाऱ्या गम्बुलकडे बोट केले. हिरामणीने चढवलेल्या भिवईचा अर्थ समजून गम्बुलाने मानेने संमती दर्शवली.

मात्र एवढ्यावर न थांबता, सुरुवातीपासून शार्दुलसिंहाने कसा कसोशीने आपल्या विनयभंगाचा प्रयत्न चालवलेला आहे, याचे रसभरित वर्णन छमदने ऐकवले. "तर तिंथ हा परिक्षेत्र अधिकारी मंज अंगाला लगटिंग नी मनांज लज्जा वाटिंग अंस्स हावभाव करिंग असिंग. एक स्त्री म्हणहून आपण हे चांगले समजिंग शकिंग. मंज तुंज पूर्ण विश्वास वाटिंग माननीय हिरामणी देवी. मंज वाचविंग. यांज तावडीत देईंग न." छमदने हा आरोप करता शार्दुलसिंहाचा तिळपापड झाला.

"तुला तर मंज जुती सुदहा स्पर्शिंग न." त्याने ताबडतोब प्रतिक्रिया दिली.

"तर काईंग मंज सुंदरीला स्पर्शिंग?" लाकी तडतडली. "माननीय हिरामणी देवी, आमांज दया करिंग. जर बाई बाईला वाचविंग न, तर कोण वाचविंग? जोवर माननीय मंडलेश्वर सेनगुप्त सवताहा भेटिंग न, तोवर या लंपट माणसांज तावडीत आमाला देईंग न. आमाला न्यायालयीन कोठडीत ठेविंग. ही मेहरबानिंग."

हिरामणीने शार्दुलसिंहाचे काहीही त्यापुढे ऐकून न घेता, बावळ्या त्रयीला न्यायालयीन कोठडी मंजूर केली. शार्दुलसिंहाला तिथपर्यंत त्यांना कोठडीत पोचवण्याच्या जबाबदारीतून सुद्धा मोकळे करून गम्बुलवर ती सोपवली. शार्दुलच्या समोर त्याच्याकडे सरळ उर्मट दुर्लक्ष करत, त्याची परवानगी न मागता, गम्बुलने त्यांना थेट पिंजरारथात परत नेऊन बसवले. तो पायरथ घेऊन गेला.

यावर शार्दुलने गम्बुलवर मागून आरडाओरडा केला. तेव्हा दंडाधिकारणी हिरामणीकडून निवाड्याचा मान राखला गेला नाही, तर मानभंगाच्या कारवाईची जास्तीची तंबी त्याला मिळाली. तिथे बाहेर पिंजरा पायरथात शार्दुलच्या चैनहरणींनी, त्यांच्या मनहरण्या बावळ्याच्या हातावरती टाळ्या दिल्या.

## शंभर वर्षे पुढे - प्रकरण १५

शहराच्या रहदारीतून पिंजरारथ धीम्या गतीने धावत होता. मार्गाच्या दुतर्फा असलेल्या मोठाल्या शिरिष वृक्षांची सावली दुपारच्या रणरणत्या उन्हात सुखावत होती. बावळ्याच्या काळातली अफाट गर्दीची मुंबई ही नव्हती. त्यामुळे का न कळे? उगाच त्याचे मन खंतावत होते. या जगात तो परका होता. कायम उपरा राहणार होता.

छमदने आखलेल्या सुटकेच्या योजनेप्रमाणे तिने वाटेत गम्बुलला पैशांचे आमिष दाखवून फितवायचा जीवतोड प्रयत्न केलेला. गम्बुल फार प्रामाणिक निघाला. तिची योजना फसली.

लाकीच्या मनात काही अचाट करून सुटायचा विचार होता. तिने चौकीवरच्या मेजावरून काही चिजा लंपास केल्या होत्या. त्यात एक धारेचा चाकू होता. कदाच कोणा बंद्याचा, जप्त केलेला असावा. हातातल्या काढण्या लोखंडी होत्या. त्या चाकूने त्यातली सलकडी उचकटायचा तिचा प्रयत्न चालू होता. बावळ्याच्या मनात काय घाटत होते? त्याचा दोघींना अंदाज येत नव्हता.

यथावकाश शहराच्या हद्दीबाहेरील कोठडीच्या भरभक्कम चिऱ्यांच्या कोटाच्या प्रवेशद्वाराशी पिंजरारथ पोहोचला. तो कोट

म्हणजे किमान तीन पुरुष उंच खडी भिंत होती. उजवीकडे व डावीकडे ती भिंत वर्तुळाच्या परिघावर वळत गेलेली होती. वरच्या बाजूला काटेरी लोखंडी तार मारलेली होती. तुरुंगाचा ठरलेला मासलेवाईक नमुना. बावळ्याच्या डोक्यात विचार डोकावून गेला. शार्दुलच्या चौकीच्या अंडा इमारतीच्या दगडी कवचाला याच्या तुलनेत भोक पाडणे सोप्पे गेले असते. गम्बुलने दरवाजापाशीचे आवश्यक उपचार पार पाडले. पिंजरारथ आत शिरला.

आत एक गोलाकार चौक होता. त्याच्या परिघावर छोट्या छोट्या कोठड्या होत्या. तुरुंगातला चिरपरिचित कुबट शिसारी आणणारा वास बावळ्याच्या नाकात शिरला. नव्या काळातली दुसरी रात्र तुरुंगात काढायची त्याची इच्छा नव्हती. त्यांना गम्बुलने पिंजऱ्यातून बाहेर काढले. गम्बुलचे काम आता संपले होते.

"इंथ येईंग सोप्पं असिंग. बाहेर पडिंग कठिण." एक बढाईखोर आवाज त्यांच्या कानात शिरला. छमदपेक्षा जास्त भसाडा. तो एक किरकोळ अंगाचा वर वर निरुपद्रवी वाटणारा चष्मिश माणूस होता. चौकात उघड्यावर एक मेज आणि खुर्ची मांडलेली होती. तिच्यात तो बसलेला होता. त्याच्यासमोर एका बाजूला काढण्या घातलेला गब्रू तरूण होता. जो अर्थात कैदी होता. दुसऱ्या बाजूला एक चिप्पाड नखरेल तरुणी होती. श्रीमंती जणू तिच्या अंगापांगातून

ओसंडत होती. "नी इंथ राहिंग जगिंग तर त्यांज परीस कठीण." त्या चष्मिशाने वाक्य पुरे करता त्या तरुणीच्या तोंडातून हुंदका बाहेर पडला.

गम्बुलने पुढे होऊन त्या चष्मिशाला अभिवादन केले. "माननीय तुरुंगाधिकारी बब्बर यांज सादर प्रणामिंग. माननीय दंडाधिकारी हिरामणी देवी यांज न्यायालयीन कोठडींज बंदी घोषित करिंग असिंग." गम्बुलने त्रयीकडे निर्देश करुन कागदपत्रे पुढे केली.

तुरुंगाधिकाऱ्याने गम्बुलकडे साफ दुर्लक्ष केले. "चंद्रांगी तुंज पिता लालाजीशेठ या तुंज याराला तुरुंगात हालात राखिंग इच्छिंग. त्यांज कारणिंग लाख रुप्पी देईंग शकिंग. तू इच्छिंग यांज हाल होईंग न. मंग तुंज पित्याहून मोठी बोली लाविंग होईंग. कितीईंग देईंग?" बब्बर उघडउघड लाच मागत होता. इतका सोकावलेला होता. त्याच्या दहाहि बोटांमध्ये सोन्याच्या अंगठ्या चकचकत होत्या. उत्तरात तिच्या तोंडातून जास्त मोठा हुंदका बाहेर पडला.

"चांद तू रडिंग न. या सोद्याला फुकट पैसा घालिंग न." तो तरुण कैदी आवेशाने सांगता झाला. बावळ्याला त्या तरुण प्रेमीचे कौतुकहि वाटले आणि किंवहि. याचा परिणाम त्याला जबरी मारहाणीत होणार होता. परिणामी चंद्रांगीला जास्त रडाचे कढ फुटणार होते. तसेच घडले.

बब्बरने खुणावता एक आडदांड पहारेकरी पुढे आला. त्याला बघून राखालची आठवण आली. "जाखाल, यांज जीभ उखाडिंग." नक्की तो पहारेकरी राखालचा भाऊ होता. बावळ्याला खात्री वाटली. तीच मग्रुरी. तीच निष्ठुरता.

"न. न. मी तुमाला दोन लाख रुप्पी देईंग. यांज हाल करिंग न." ती तरुणी धीर सुटून किंचाळली. जाखालपासून कैद्याला वाचवायला त्या दोघांच्या मध्ये धावली. जाखालने तिला बाजूला ढकलून दिले. जाखालच्या तडाख्याने तिच्या नाजुक जिवणीतून रक्त भळभळू लागले.

गम्बुलला हा अत्याचार बघवेना. त्याने पुन्हा कागदपत्रे तुरुंगाधिकाऱ्यासमोर केली. "ही माणसं माननीय मंडलेश्वरांज संबधित असिंग. ते सवताहा जातीनं यांना भेटिंग. तोवर यांना सुरक्षित राखिंग."

"चंद्रांगी तासभरांज मुदत तुला देईंग. तोवर पैसे पोच करिंग." पुन्हा बब्बरने गम्बुलकडे दुर्लक्ष केले. तसे रागाने गम्बुलने त्याच्या मेजावर कागदपत्रे आपटली आणि तो परतीला फिरला. "जाखाल यांज जोर उतरविंग." आता मात्र गम्बुलची दखल घेत तुरुंगाधिकारी रागाने कडाडला.

तसे गम्बुलने सरळ आपले हत्यार जाखालवर रोखले. गम्बुलच्या दोघा साथीदारांनी आपापली हत्यारे पहारेकऱ्यांच्या विरोधात सरसावली. "होईंग जाईंग राडा. दोन सरकारदार दळांत. महान महामहीमाला कळिंग जाईंग, त्यांज पाठी इंथ काईंग काईंग होईंग." गम्बुलने त्वेषाने आव्हान दिले. त्याच्या अंगावर उडी मारुन आलेल्या जाखालला बाजूला सरत झुकांडी दिली. जाखाल तोल जावून पुढे गेला. मागून त्याच्या पृष्ठावर लाथ मारली. जाखाल तोंडघशी आपटला.

तेव्हा कैदी तरुणाने टाळ्या पिटल्या. ते बघून लाकी उसासली. आता जाखालला वड्याचा राग वांग्यावर काढायला आयतेच वांगे मिळाले. तो तरुण नक्कीच उल्लू होता. आणि अशा उल्लूवर प्रेम करणारी तरुणी त्याच्याहून उल्लू. हे बावळ्याच्या कानात कुजबुजल्या शिवाय तिला राहवले नाही. यावर बावळ्या नुस्ता उसासला. "विचार करिंग त्यांज कधी प्रेम जमिंग न." छमदने परस्पर लाकीला सुनावले.

गम्बुलच्या अंगावर पुन्हा धावून जाऊ पाहणाऱ्या जाखालला आवाजात जरब आणत बब्बरने थांबवले. "जाखाल नाईंग. पुरे होईंग. त्यांना जाईंग देईंग." बब्बरच्या कपाळावर क्षणमात्र चिंतेच्या

आठ्या बावळ्याच्या पारखी नजरेने न चुकता टिपल्या. महामहीमा त्याची कमजोरी होती नक्की.

पडत्या फळाची आज्ञा घेत गम्बुल आणि त्याचे साथी लगोलग निसटले. जाताना गम्बुलने एक चोरटा कटाक्ष बावळ्यावर टाकला होता. त्याचा हेतू जाणून बावळ्याने मान हलकेच लववून आभारांचा स्वीकार केलेला. "लक्षात ठेविंग ही माननीय मंडलेश्वरांज माणसं असिंग. त्यांज केसाला सुदहा धक्का लागिंग न." असे तुरुंगाधिकाऱ्याला बजावून पुन्हा एक सहेतुक नजर गम्बुलने बावळ्यावर टाकलेली. गुरुदक्षिणा म्हणून देण्या-करण्यासाठी जे शक्य होते ते त्याने केलेले. या अर्थी. बावळ्याने पुन्हा मान लववलेली.

"तो समजिंग काईंग सवताहांज? मी आत्ताच आत्ता इंथ राखालला बोलविंग घेईंग." बडबडून जाखाल बब्बरची पर्वा न करता, घाईघाईने दूरसंपर्क साधायला निघाला. या वेळी जर बब्बर बावळ्याच्या मंडळींवर नजर टाकता, तर त्या तिघांचे चेहरे पार कोळपलेले त्याला दिसले असते. त्याची लोभी नजर येऊ घातलेल्या दोन लाखांच्या थैलीवर, चंद्रांगीवर टिकलेली होती.

"जर तू आत्ताच आत्ता आमाला कामगिरी कारणिंग जाईंग देईंग, तर आमी तुंज शिफारस मंडलेश्वर सेनगुप्ताईंग जरूर करिंग."

लाकीला राहवले नाही. ती बोलली. राखाल जर खरोखर इथे येणार असेल, तर त्या आधी काय वाटेल ते करुन तिला तिथून सुटका हवी होती.

बब्बरचे लक्ष आता त्यांच्यापाशी वळले. "वाहवा! अजून एक सौदा." त्याने मेजावरची कागदपत्रे उचलून हिरामणीच्या निवाड्यावर ओझरती नजर फेरली. "दंडाधिकारणीनं तुमाला सोडिंग आदेश तर देईंग असिंग न. मंग काईंग कारणिंग तुला सोडिंग? मी फक्त रुप्पींज कारणिंग मानिंग असिंग. सोडिंग बदल्यात तू कितीईंग मोजिंग?" त्याच्या चेहऱ्यावर छद्मी हास्य पसरले. तो प्रच्छन्नपणे उघड पैशांची मागणी करत होता.

लाकी काही वेळ निरूत्तर राहिली. बब्बरला काही घाई दिसली नाही. जाखाल विजयी मुद्रेने परतला. "राखाल शहरात असिंग. त्यांज मंडलेश्वरांज काम संपिंग, तंस्स इंथ येईंग तो कबूल करिंग असिंग. शार्दुलसिंहांज माणूस जादा उडिंग होईंग. आता त्याला कळिंग मी काईंग असिंग." मग तो त्याच्या सावजाकडे त्या तरुण कैद्याकडे वळला. "तुंज टाळया पिटिंग हात मी उखाडिंग." क्रूर धडकी भरवणारे हास्य हसला.

"न." एवढा वेळ आपल्याच नादात संचित बसलेली चंद्रांगी भानावर येत म्हणती झाली. जाखाल तिच्याकडे बघत अजून जोरात गडगडाटी हसला.

"ए बेअक्कल." बावळ्याने आता कलापात उडी घेतली. "तू त्या चिकण्याचं हात तोडलं, तर दोन लाखातलं दिड लाख कमी होतील. काय तुझ्या सायबाला तस्सं चालंल का? ते इचार आधी." जाखालने तोंड वेंगाडले. धडक मारण्याआधी बैल जसे डोके आडवेतिडवे फिरवतो तशी मुंडी फिरवली.

"वं तुरुंगाधिकारी?" बावळ्याने बब्बरला साद घातली. बब्बर डोळे आकुंचित करून हा नवीन काय प्रकार आहे? अंदाजत होता. "हे येडं जरा बाजूला गप करा. म्हंजे आमाला एक-दुसऱ्याच्या फायद्याच्या चार गोष्टी निगुतीने बोलता येतील की."

"जाखाल?" बब्बरने आवाज देत त्याला गप्प केले. सर्कशीत वाघाला रिंगमास्तराने दरडावल्यावर जसा तो धुसफुसत जागच्या जागी थांबेल, तसा जाखाल मुक्याने थयथयत राहिला. "तू जर फायद्यांज बोलिंग न, तर तुंज हात जाखाल तोडिंग. कबूलिंग काईंग?"

"नी मंग महान महामहीमांच्या करवी मी तुझं नी त्याचं, दोघांचं बी मुंडकं उडवीन. बोल तुला कबूल हाय का?" बावळ्याने

प्रतिटोला दिला. "चौकीवर नी दंडालयात आमच्या गुप्त कामगिरीचा बोभाटा नगं. म्हनून आमी तिथं गप राहलो. ती कामगिरी काय हाय इथं सांगू का? आपली सरकारदार चोरांचीच तर मांदीयाळी हाय की समदी इथली मानसं?"

"तू बोलिंग ते मंज काईंग समजिंग न." तुरुंगाधिकारी वैतागला. "ही काईंग भाषा असिंग? तू कोण असिंग? कुंठईंग असिंग?"

"ते तुला समजायची काय बी गरज नाय हाय." बावळ्याने ताणले. "महान महामहीमांच्या आदेशानं आमी तुझ्यासारख्या चुकार मानसांची यादी बनवतो हाय. महान महामहीमांच्या खजिन्यात वाटा न घालता, तो चुकवून जी सरकारदारं स्वताचीच भर करतात हाय...." त्याने वाक्य सूचक अर्धवट सोडले.

"तू काईंग बोलिंग मंज कंस्सच समजिंग न." बब्बर लाकीकडे वळला. "तू हा काईंग बोलिंग मंज फोड करिंग सांगिंग."

तशी लाकी सरसावली. पण तिला बोलू न देता आधी बावळ्या कडाडला. "तुला सगळं बरोबर कळतं हाय. तुला काय वाटलं? तू समदं नाकारशील आनी मामला गुंडाळला जाईल?" बावळ्या सरळ पुढारत थेट बब्बरच्या मेजाशी जाऊन भिडला. आवाज खर्जात लावत बोलू लागला. "ही सरकारी चौकशी नाय हाय. ही महान महामहीमांच्या करवी चाललंली खाजगीकडची

चौकशी हाय. तू काय बोलतो? कोन इचारनारच नाय हाय. मी काय बोलतो? तितकंच ऐकलं जानार हाय. आता तुला समदं समदं लक्षात यायला लागलं असंल. काय? होय की नाय?" बावळ्याला अपेक्षित परिणाम दिसायला काही वेळ गेला.

बब्बरचा चेहरा कोरा होता. परिस्थिती भयंकर तणावाची होती. जब्बर आणि चंद्रांगी अवाक होते. लाकी व छमद आशंकीत होत्या.

"महान महामहीमा अंस्स कंधी करिंग न. तू खोटंईंग बोलिंग. त्यांजवर किटाळ घालिंग." तो तरुण कैदी बडबडू लागला. बावळ्याला शिव्या घालू लागला. बावळ्याला लाकी मगाशी जे याच्याविषयी बोललेली, त्यातली सत्यता जाणवू लागली. अजून जगाची समज न आलेला बेअक्कली भाबडा तरूण. आपल्या राज्यकर्त्याची आदर्श प्रतिमा ऊरी जपून असलेला.

"तर मंग तुंज चांद महामहीमांकडे काईंग जाईंग न? लाज गहाण ठेविंग ती इंथ काईंग येईंग? धक्के खाईंग आवडिंग म्हणहून?" लाकीला त्याच्यावर तोंड सोडल्याशिवाय राहवले नाही.

"नी दोन लाख रुप्पी देईंग काईंग कबूलिंग? जाईंग गं बाई जाईंग. आधी पैसं आणिंग." छमदने सुद्धा तोंडसुख घेतले.

"तिच्याकडं द्यायला पैसं असलं तर ना ती देईल." बावळ्याने अजून एक भांडाफोड केली. तशी अगतिक चंद्रांगी स्फुंदत रडू लागली. तासाभराची मुदत दिली असताना, तिने आधीच त्यासाठी धाव घ्यायला हवी होती. हे त्याच्या कधीच लक्षात आले होते. "ए बाई! तुझी आता इटंबना होन्याआधी इथून चालू पड. चल जा बिगीनं."

"इंथ या तुरुंगात मंज हुकूम चालिंग. मंज राज्य असिंग. तू कोण तिंज जाईंग सांगिंग?" बब्बरमधला तुरुंगाधिकारी जागा झाला. "मी तुमाला सगळ्यांना या जगातून नाईंग करिंग. मंग, कोण चौकशीदार होईंग न. कोण साक्षीदार होईंग न." हे ऐकताच जाखाल क्रूर अट्टाहास करत नाचला.

ते बघून बावळ्याने काढण्या घातल्या हातांनी टाळ्या पिटल्या. "नाच. नाच रे सोद्या नाच. तुला पैसं मिळतील चार." तसा दातओठ चावत जाखाल अंगावर धावून आला. बावळ्याने झुकांडी दिल्यामुळे पुन्हा तोंडघशी जाऊन आपटला.

"काय रिकामडोकी पाळली हाय रे तू तुरुंगाच्या राजा? याच्या जीवावर राज करायचं म्हंजे लय बिलामती काम हाय. तरी बी राज करतो? मानलं बाबा तुला." बावळ्याच्या या व्यंगाने बब्बरचा कोरा चेहरा बदलला. त्याचे डोळे रागाने पेटले. "कोना कोनाला तू

जगातून कमी करनार सांग. शार्दुलसिंह, त्याची चौकीतली समदी मानसं? दंडाधिकारी हिरामनी नी तिची दंडालयातली समदी मानसं? ती समदी तर तुझ्या या किचपट राज्याच्या बाहेर हायती. मंग मंडलेशवर नी महान महामहीमा तुझं राज नी ते चालवायला तुला तरी शिल्लक ठेवतील काय?"

कोणी काही बोलेना. दोन्ही पक्ष एकमेकाला खुन्नस देत राहिले. तिसरा पक्ष चंद्रांगी नी तिच्या प्रियकराला तणाव पेलायची सवय नव्हती. त्यांनी कच खाल्ली. "चांद, तू मंज चिंता सोडिंग. मंज प्रेमांज शक्ती राखिंग. तू इंथ मंज घोर जादा वाढविंग असिंग. तू जाईंग. तुला मंज शप्पथ."

"ती पैसे आणिंग तरच मी तिंज सोडींग. जर आणिंग न, तर तुंज जीव घेईंग." तुरुंगाधिकारी धुमसला.

"तर तुंज जीव हा मंडलेश्वरांज माणूस नक्की घेईंग." त्या कैद्याने परखड सुनावले. त्यांचे नशिब आता बावळ्या त्रयीशी बांधले गेले होते.

"ही माणसं खोटीईंग असिंग. साहेबसरकार, मंडलेश्वर यांज खात्री देईंग न, तोवर यांज सोडिंग न." जाखालने बब्बरला बजावले.

ओठांवर आलेली 'खुळचुका' म्हणून शिवी प्रयासाने आत जिरवत तुरुंगाधिकारी उत्तरला. "जर ही मंडलेश्वरांज माणूस असिंग, तर तो यांना जेहवा भेटिंग, तेहवा आमांज खेळ संपिंग."

"पण यांना सोडिंग तरही..."जाखालला त्यांना सोडून देण्याची कल्पना कशीच पचेना. "तरही यांनी आमाला अडचणीत आणिंग न, हे कंस्स?" त्याने बब्बरची कोंडी जास्तच वाढवली. धरले तर चावते. सोडले तरी चावते.

"बब्बर," बावळ्याने त्याच्या नावाचा बेधडक एकेरी उल्लेख केला. "ही पोरगी जावून आमच्या गुप्तमानसाकडून पैका उधार घेवून येईल. बदल्यात तू आमाला समद्यांना सोडून दे. आमची कामगिरी साधायला आधीच लय उशीर झालंला हाय. आमचं सावज जर आमच्या हातातून गेलं, तर मंग तुझी काय खैर नाय. तुझा जीव नी तुझं राज तुला राखायचं असंल, तर तो आमी दिलंला पैका नंतर तुला पुन्ना महान महामहीमांच्या खाजगी खजिन्यात व्याजासकट भरावा लागनारच हाय. काय बोलतो?"

"तू खोटीईंग धमकी देईंग असिंग. तुमी खोटेईंग असिंग. तू पळिंग जाईंग तर?" जाखालने दातओठ चावत विचारले.

"मंग तुमच्याकडं आमचा पैका तसाच राहनार की? बब्बर, पैका तुझा परमेश्वर हाय की." बावळ्याच्या या युक्तीवादावर

पहिल्यांदाच बब्बरच्या आवळलेल्या ओठांच्या कडेतून हसू सांडले.

"तीन माणसांज प्रत्येकी दोन लाख रुप्पी, म्हणहजे सहा लाख." बब्बरने आपला आकडा सांगितला.

"तीन नाय. चार मानसं." बावळ्याने तरुण कैद्याकडे बोट दाखवून त्याला अंतर्भूत करून घेतले. "नाय तर, ही पोरगी पैसं आणायला जायची नाय."

"मंग?" त्या तरुणावर लोभी कटाक्ष टाकत बब्बरने बोली वाढवली. "चार माणसांज आठ लाख."

"मी चार माणसांचं चार हजार देईन. उद्या तुला ते परत करायला जमायला बी हवं. ध्यानात घे की? तुझ्या जुगाराच्या नादात तुझा पुरा पगार तर तसाच सरतो हाय की?" बावळ्याच्या या बोलासरशी बब्बर ते खरेच असल्यासारखा चपापला.

"तुला कंस्स कळिंग यांज जुगारांज? तू मंज गुरू होईंग. मंज शिकविंग." छमदने हलकेच पुटपुटती विनंती केली.

मग दोन व्यापारी दलालांमध्ये जशी दराची घासाघिस चालते, तशी त्या दोघांमध्ये चालली. माणशी दहा हजारावर तोड ठरली. त्यापुढे प्रश्न उभा राहिला की तो पैसे देणारा गुप्तमाणूस कोण?

"त्याचं नाव आमची ही मुंबैच्या नामी दादाची रखेल सांगंल. तिला आमच्या जोडीला खबरी म्हनून घेतली हाय." बावळ्याने छमदकडे इशारा केला. यावर छमद आणि लाकी खुळयासारख्या त्याच्याकडे पाहत बसल्या.

बावळ्या छमदला बोलला, "तुझा जो हुकूमदार हाय, त्याला चिठ्ठी लिवून दे. या पोरीकडं पैसं किती आनी कशापायी पाठवायचं ते." ती गोंधळलेली होती. तो छमदच्या अगदी कानाशी लागला. "तू काय मामुली चोरनी नाय हाय. मी वळाखलं हाय. तुझी पोच लय वरपर्यंत हाय. तू काय तरी औरच चीज हाय. जर राखालच्या ताब्यात तुला पुन्ना सापडायचं नसंल, तर हा शेवटचा रस्ता हाय बघ. तो इथं पोचायच्या आधी तुला सुटायचं हाय ना?"

छमद त्याच्या डोळ्यात डोळे लावून मख्ख चेहऱ्याने खूप वेळ पाहत राहिली. मनाशी हिय्या करुन अखेरीस राजी झाली. "तुंज खिश्यात मंज खुणेची मोहोर मी दडविंग असिंग. ती मंज परत देईंग."

या नव्या काळातल्या कपड्यांच्या रचनेबद्दल बावळ्याची गोंधळाची स्थिती होती. हे कपडे म्हणजे वेगवेगळ्या आकारातल्या नी रंगांच्या कापडी पट्ट्या होत्या केवळ. आणि अंगावर त्या एकमेकींच्या कडांशी कडा मिळवत चढवत जायच्या होत्या. ना त्यांना एकमेकांशी जोडायला काज-गुंड्या होत्या. ना आकडे, ना ते

गुंतवायला फास-टाके. ना गुंतल सरक-साखळया. ना लव नी तिच्यात धसवायला काटेदार पट्टी. ना धातूची गोल भोकदानं नी त्यात बसवायला गोल कुचं. बस्! त्या कापडी पट्टया एकमेकींना आपोआपच धरून राहत होत्या. जोर करून ओढल्या तरच सुटून वेगळ्या होत होत्या. आणि यामुळे काही मोजक्या वेगवेगळ्या पट्ट्यांचा एकामेकीशी नवा नवा मेळ करुन, अगदी प्रत्येक दिवशी रोज नवी रंगसंगती आणि रचना परिधान करणं शक्य होत होते.

बावळ्याला लाकीने एक जोडून ठेवलेली पट्ट्यांची आयती तयार रचना चढवायला दिली होती. त्या एकल सर्वांगावरणात गळयाच्या भागाकडून आधी पाय, मग धड, त्यानंतर हात घुसवून, खांद्यावरती मागच्या पट्ट्यांशी पुढच्या पट्ट्यांची जुळणी त्याने केली तर होती. पण आता त्या अंगावरच्या पट्ट्यांमध्ये खिसे आणखी कुठे बनलेले होते? त्याला अंदाज लागत नव्हता. तो उगाच इथं तिथं चाचपडत राहिला. त्याला खिसा सापडेना आणि बब्बरला धीर धरवेना. तो काय करतोय? हेच कोणाला समजत नव्हते.

त्याने काढण्या काढून हात मोकळे करायला सांगता, बब्बरला ती त्याची चाल वाटायला लागली. वाट पाहून कंटाळलेल्या छमदने पुढाकार घेतला. स्वतःच जाऊन त्याच्या मांडीवरचा खिसा

टरकावला. आपली अंगठीवजा मोहोर काढून घेतली. त्यापुढे ती बब्बरकडे वळली. "मंज चिठ्ठी लिहिंग सामान देईंग."

"या चंद्रांगी संग मंज माणूस पण जाईंग." संशयी बब्बरने आपली शर्त पुढे केली. छमदने चालेल अर्थी मान हलवली. "जाखाल तू जाईंग."

"पण मंज बंधू राखाल इंथ येईंग असिंग." जाखालाने कुचकुच केली.

"त्याला तू तिंथ बाहेरिंगच भेटिंग." बब्बरने फर्मावले.

"पण तो वांद्रा बेटावर कामात असिंग. यांज माणूस घाटकोपऱ्यांज डोंगरी असिंग. मंज ऐवजी कोण दुजा धाडिंग." दोन्ही गोष्टी साधणे जाखालला अडचणीचे वाटू लागले.

"तर मग या उप्पर मंज काम नी पैशांज वाटा त्या दुसऱ्यालाच जाईंग." तुरुंगाधिकाऱ्याच्या या आदेशावर बावळ्याच्या कंपूने केवढे खोल निश्वास सोडले, हे जर त्याला दिसते, तर खात्रीने तो हुकूम परत घेता.

"न. न. मी जाईंग." जाखाल घळघळला.

# शंभर वर्षे पुढे - प्रकरण १६

वानरांना हाकलायला घातल्या जाणाऱ्या हाकाऱ्या कुकाऱ्याची हाळी ऐकू आली आणि बावळ्या झोपेत दचकला. अंथरूणात एकदम उठून बसला. मनाने लहानपणीच्या आठवणीत पोचला. आजूबाजूला मातीचा वास होता. गावातल्या घरांमध्ये हमखास असतो तसा कुडावर शाकारलेल्या सुक्या गवताचा, पिकणाऱ्या फळापानांचा, हिरव्या पानांनमुन कडसर, पशुपक्ष्यांच्या कुजून गेलेल्या विष्ठांनमुन खटासवाला असे सगळे मिसळलेला. जोडीला न थांबणारे पक्ष्यांचे कुजन होते. त्याच्या अंगावर खोपटाच्या उघड्या दारातून कललेल्या सुर्याची किरणे थेट आत येत होती. आळस झटकत तो खोपटाच्या बाहेर आला.

समोर लांबरुंद पसरलेल्या सह्याद्रीच्या तांबड्या जांभळ्या डोंगररांगांनी त्याचे स्वागत केले. त्या खड्या कडेकपारींच्या पार पायथ्यापर्यंत नजर पोहचेल तिथवर घनदाट वृक्षराजी होती. तो होता ती मोजक्या वीस पंचवीस गवती खोपटांची वस्ती तुलनेत मोकळ्या दरीतल्या सपाटीत होती. "रामराम पाव्हणं." पांढऱ्या दाढीमिश्या आणि लांब केसांनी शोभणाऱ्या, मळलेले धोतर-उपरणेवाल्या म्हातारबाबाने त्याला हटकले. हा लाकीचा मामा होता. एका

मालवाहतूक करणाऱ्या मालमुंगाडी वाहनातून दडून, काल रात्रभर दहा तासांचा प्रवास करुन, ती दोघं इथे आश्रयाला पोचली होती. पहाटे दमून निजल्यावर आता सांज सुरु जाता उठली होती.

बावळ्याने लाकीची चौकशी केली. ती तिची उठल्यावरची आन्हीके उरकण्यात व्यस्त होती. मामाने बावळ्याला त्याची आन्हीके उरकून घेऊन तयार होण्यास सांगितले. त्यासाठी आवश्यक गोष्टींचे दिशादिग्दर्शन केले. शौचकूप, न्हाणी, विहीर, कडुनिंबाच्या काड्या. बावळ्या कामाला लागला. शंभर वर्षांनंतर देखील डोंगरी गावपाड्यावरील जगण्यात फरक पडलेला नव्हता. कदाच कोणत्याच काळात पडत नसावा. त्याबद्दल थोडे आश्चर्य जास्त आनंद मानत, गडी अर्ध्या घटकेत तयार झाला.

पाड्यावरील माणसे सुद्धा त्याच्याबद्दल तशीच काही भावना बाळगून आपापसात कुजबुजत होती. थोडे आश्चर्य. जास्त आनंद. नवर्तना बायने लग्नाला नाही नाही करता करता, अखेर एक नवरोबा पसंत केला तर? बावळ्याच्या कानावर पडणारी भाषा वेगळाली असली, तरी त्यातला मतितार्थ त्याला कळत होता. ही नवर्तना बाय कोण? एवढे सोडून. ती सामोरी आल्यावर मामाने लाकीला "गो नवर्तना." म्हणून हाक मारल्यावर ते सुद्धा आपसूक कळले. अंगावर मोरपिस फिरल्यासारखे झाले.

"मामा, या लोकांना असिंग न दुसरे धंदे." आल्या आल्या ती बाय फोडणीतल्या मोहरीसारखी तडतडू लागली. "मी लगीन जाईंग, न जाईंग, त्यांज इतका काईंग सोस?"

"गो तू इवलाली पाच वर्सांज पोर होईंग, तेहवापासून त्यांनी मंज जोडीनं तुला सांभाळिंग असिंग. तुला ती त्यांज मुलीपरिस मानिंग." मामा लाडाच्या भाचीला समजावू लागला. "पोरींज लगीनांज चिंता कोण आईबापांना होईंग न? तुंज आईबाप तेहवा या जगातून जाईंग नी सुटिंग या घोरातून. मागे मंजसाठी ठेविंग हा घोर." त्याने कपाळ बडवले. "आता तू चार वर्सांनंतर इंथ मामाला तोंड दाखविंग येईंग. लोकाना बापड्यांज वाटिंग की नवरा भेटविंग येईंग म्हणहून. त्यांज काईंग गो दोष?" मामाने बोलण्यात रेशमी चिमटा कचकचून काढला.

'लाकी सातशे बारा' उर्फ नवर्तना यावर मामाला काही खरमरीत सुनावणार असती. बावळ्याने भुकेची मागणी करत त्या कलहाला फाटा फोडला. त्याच्या प्रेमाच्या न बोललेल्या मागणीच्या, तिने परस्पर चिरफाळ्या उडवलेल्या, त्याला ऐकत बसायच्या नव्हत्या. "चलिंग तर शेतात." मामाने त्याचा हात धरला आणि ओढत नेऊ लागला. बावळ्याला त्या ओढीतली आपुलकी जाणवली. लाकी फणफणत मागून येऊ लागली.

"तुझा तर इश्वास नाय होता की मी शंभर वर्सांच्या आधीच्या काळातून आलो हाय. मंग मला तुझ्या आपल्या मानसांत आपल्या गावात कस्सा काय आनलास?" बावळयाने लाकीची कळ काढली.

"तुंज गोची बघिंग नी मंज मनांज पुरती खात्रीईंग जाईंग. तुला कपडे कंस्स घालिंग ते साधं माहीतिंग असिंग न. हत्यार उलटं की सुलटं फरक कळिंग न. पायघोडा चालविंग जमिंग न. दुरसंपर्कांज जोडवेल सांभाळिंग समजिंग न. या गोष्टी तर इंथ बारक्याईंग पोरांना सुदहा माहीतिंग असिंग." तिने उत्तर दिले. "मामा रात्री तुला सांगिंग न, पण हा बावळया शंभर वर्स आधींज काळातून येईंग असिंग." आणि ही मोठीच गंमत असल्यासारखी जोरजोरात हसत सुटली. कलत्या उन्हाने नुक्ते धुतलेले केस चमकत्या, तिला तसे मनमोकळेपणाने हसताना पाहून बावळयाच्या मनात जी घालमेल झाली ती झाली. "मामा याला इंथ ठेविंग घेईंग काईंग? रझाकार मंज कारणिंग त्यांज मागावर असिंग." तिच्या स्वरात अपराधी भाव होता. "इंथ नाडचुक्या राखालांज पासून तो सुरक्षित राहिंग. ठेविंग ना?" गळ घातली.

"हे तुंज गाव असिंग. तुंज घर असिंग. तुंज हविंग त्याला ठेविंग. हविंग त्यांज संग इंथ राहिंग." मामाने खुली परवानगी दिली.

"मी इंथ राहिंग शकिंग न." लाकीने मामाची नजर चुकवली. "मंज बंडबागींज काम करिंग परत शहराला जाईंग होईंग. याला इंथ आसरा मिळिंग, तर मी उद्याच परतिंग." मामा ऐकून सुन्न झाला.

"तुला या एकट्या म्हाताऱ्यासाठी काईंग प्रेम माया असिंग न?" मामा चिडला.

"मंज आयुष्यात नाती, प्रेम, माया यांज वेळ असिंग न. महान युगनायकांज कार्याला मंज मातापित्यानी मंज आयुष्य वाहिंग असिंग. मी मंज आयुष्यांज कर्तव्यांज बंधनात असिंग." लाकी निर्धाराने म्हणाली. "या बावळ्याला तू आसरा देईंग. तर मंजवर तुंज उपकार होईंग. त्यानं रझाकारांज तावडीतून मंज जीव वाचविंग. त्यांज प्रती मंज ऋण फेडिंग मदत करिंग मामा." लाकिने मामाच्या खांद्यावर डोके ठेवले आणि टिपे गाळली. "मंजसाठी आंजवर तू इतकं करिंग असिंग. हे एक सुद्धा करिंग ना?" मामाने उत्तरात भाचीला पाठीवर थोपटले.

"माझं बी आयुश माझं हाय. मला कोन इचारा तरी, मला कुठं राहायचं हाय ते?" बावळ्या तणतणला. "कोनाला भिवून असा रानात दडून जगनारा हा बावळ्या नाय हाय. पळन्यापरीस लढून मरनं बेस हाय. मला बी तुझ्या जोडिनं लढायचं हाय. तू जाशील तिथं तिथं मी येनार म्हंजे येनार."

"तुंज असलं अडाणी लोढणं मंज सोबत असिंग, तर मंज शत्रूंज फंद्यात फसिंग देर लागिंग न." लाकी फणकाऱ्याने म्हणाली. "कोण दुसरी तुंज सोबत ठेविंग तर शोधिंग."

"मी बरोबर जोडीला होतो, म्हनून तू नी ती छमदबाय सुटलंत. तू बी हे इसरु नको." बावळ्याने खडसावले. "नाय तर बसनार होतात बब्बरच्या तुरुंगात चक्की पिसत."

"बब्बर!" लाकीच्या मनातल्या आठवणी आणि कोडी जागी झाली. "तुला कंस्स काईंग कळिंग तो जुगारी होईंग? त्यांज पैसं शिलकीत उरिंग न?"

"त्याची नी अट्टल जुगाऱ्यांची चार लक्शनं जुळली की." बावळ्याला मामावर छाप पाडायची संधी सोडायची नव्हती. तो खुशीने खुलाश्याला लागला. "एकतर त्याचं केस कुरळं होतं. दुसरं म्हंजे तो लय हाडकुळा होता. जुगाऱ्याचं अंगातलं रक्त हार-जीतीच्या धास्तीनं आटलेलं असतं. तो कधी भरलल्या आंगाचा दिसनार नाय. तिसरं म्हंजी तो पाय लय फाकून बसलला होता. नी चौथं समद्यात जादा जुळनारं लक्शन म्हंजे त्याच्या हाताची बोटं चाळा करत होती. वगाच! त्याचं काय हाय ना, जुनी फासं खुळखुळवायची बोटांची खोड जुगाऱ्यांच्या रक्तात मुरलंली हाय. पिढी दर पिढी ती चालत राहली हाय. अशा अट्टलबाजांच्या हातात

किती बी जरी पैसा आला, तरि तो पुन्हा जुगारातच घालतो. काय की त्याच्या मेंदूला दुसरं काय सुचतच नाय जी."

"व्वा! बावळ्या. अंस्स लक्षणं जुळविंग येईंग, मंज कधी कोणी दाखविंग न, शिकविंग न." लाकी जरा घुटमळली. "तू शिकविंग काईंग मंज? सुटका झाल्यानंतर छमद तुला त्यांजसाठी विचारिंग, तेहवा तू तिला तर शिकविंग नाईंग म्हणिंग. मंज...."

"ती लय लुच्ची बाई हाय. तिच्या कशाचं काय खरं सांगता यायचं नाय." बावळ्याचा चेहरा संतापाने तिरस्काराने भरला. "पन तुझी बात येगळी हाय. तू मला राखालपास्नं राखायला इथं तुझ्या सवताच्या गावात घेऊन आली. ती बया मला काम झाल्यावर राखालला इकून मोकळी जाती."

"तू तिला काईंग नी कंशी ओळखिंग?" लाकीला हे सुद्धा मोठं कोडे होते. "ती चोर असिंग न. काईंग वेगळीच असिंग. हे तुला कंस्स कळिंग?"

"ती जर नुस्ती चोरच होती ना, तर तिला एक नाय दोनदा, तिनदा पळून जायला मिळालं होतं की? तेवा पळाली का नाय?" बावळ्या लाकीला सूत्र उलगडून दाखवू लागला. "तुझ्यासारख्या बंडबागीकडं नी तुझ्या जोडीच्या माझ्यासारख्या फाटक्या साथीदाराकडं, एका चोरनीला कसलं घबाड आनी पैसा गावनार

होता? तरी बी ती आमाला कशापायी चिकटून राहली? रझाकारं आमच्यामागं लागली होती. तिच्यामागं नाय. मंग रझाकारांच्या तावडीत सापडायचा जीवाचा धोका असून बी, ती छमद आमाला धरून का राहली? साधी चोर होती, तर कधीच सोडून जाती. पन्नाशेटचं घर सोडून लालाजीच्या घराकडं जाताना आमी तिचं हात बांधलं होतं. तोंड नाय. मंग बोंबाबोंब करुन मानसं जमवून ती सुटू शकली असती की?"

"मंग, ती बाप्या असिंग न. बाई असिंग. हे आमी लोकांज सांगिंगांज भय तिला होईंग." लाकीने शंका काढली.

"दुसरी येळ होती, जेवा तू नी मी आमी दोघं बी पायरथाच्या बाहेर होतो. दानिशबाईच्या तिथं. छमदला सरळ पुन्ना पायरथात चढून पळून जायला कोनी रोखलं होतं? नंतर आमी तशीच पळालो की?" बावळ्याने आपलं म्हणणे पुढे रेटले.

"तिंज एकटींज इतकी ताकद न होईंग की दानिशांज माणसांज पाठलाग ती चुकविंग शकिंग." लाकीने पुन्हा छमदची बाजू घेतली.

"आनी तिसरी संधी होती, तुमी दोघी बी चौकीतून सुटून दाराच्या बायेर गेला होतात तेवा. तुमा दोघींना बी पायरथ चोरुन पळून जाता आलं असतं. दोघी बी पळाला नाय. का?" बावळ्याने या वेळी युक्तीवादात लाकीला सुद्धा खिंडीत पकडले.

"ती म्हणिंग ना की तिंज तुंजवर प्रेम जडिंग."

"मंग तू पन प्रेमासाठीच थांबली काय?"

"बंडबागींज निरपराध लोकांज जीवांज काळजी होईंग. म्हणहून....." लाकीने लाजत उत्तर दिले.

"हे तुझं झालं की. पन तिचं काय? साधी चोर? अं?" बावळ्याच्या या सवालावर लाकी गप्प बसली. संभाषणाचे वळण तिला नको त्या दिशेने गेले होते. "तेवा ठरलं म्हंजे ठरलं. तुझ्यासंग मी बी येनार."

"अरे पण?" लाकीने कृतककोपाने त्याला डावलले. "मी असिंग एक नारी. तू असिंग एक पुरुष. अंस्स कंस्स मंज मागाईंगच पडिंग. जोडिंग फिरिंग तू काय मंज यार वा नवरा असिंग?"

"गं! इचार कर जरा. माझी जोडी तुला किती फायद्यात पडंल. तुला शिकायचं हाय ते शिकवतो की? माझ्या पाच गुरुंनी दिली ती सगळी इद्या तुला देतो की?" बावळ्या सुरसुरला. "पहिली होती अंगुलीना. साखळीचोर. कोन कसं बसतं, उठतं, चालतं त्याच्या तऱ्हेवरून बरोबर हेरायची की कुनाची साखळी उडवायची ते. कोन हात मधीच धरंल. कुनाला घटका उलटली तरी बी साखळी मारल्याचं कळनार नाय ते." लाकीची हातोहात मारलेली गळेसर बावळ्याने तिच्या पुढ्यात उजवा हात पसरत सादर केली. लाकीने

गडबडीने चाचपून पाहिले. खरेच गळ्यातली माळ गायब होती. ओठ दाताखाली चावत आपली माळ तिने परत घेतली.

"दुसरा गुरू होता तर्जुन. पाकिटमार. मानसाच्या कपड्यांवरून नी त्याच्या अंगा-अंगाच्या मापावरून-आकारावरून-खानाखुनांवरून, म्हंजे अंगलक्शनांवरुन तो बरोबर समजायचा की कुनाचा खिसा जड हाय नी कुनाचा हलका. कुनाकडं किती माल गावंल? ते तो की नाय आधीच बिनचूक सांगायचा. मामा तुझ्या धोतराच्या कनवटीत मोजून सहा सुपाऱ्या हाय. बघ मोजून." बावळ्याच्या आव्हानाला अनुसरुन मामाने कनवटीची पोटली काढून त्यातल्या सुपाऱ्या मोजून पाहिल्या. मामाचे डोळे आश्चर्याने पांढरे झाले.

"तिसरी गुरु होती मध्यमाई. तिच्या संग मी घरफोडी शिकलो. घरात घुसायच्या आधी माई खिडकी-दारातून ऐकायला येनारी घरवाल्यांची बातचित ऐकायची. मानसांच्या बोलन्यातल्या सुराच्या चढउतारावरून, बोलायच्या रागरंगावरुन नक्की करायची की त्या घरात घुसायचं की नाय. आतली मानसं आमाला आटोपतील अस्सं वाटलं, तरच आमी आत घुसायचो. मानूस अंगानं किरकोळ हाय का तगडागडी? यावर काय नसतं. त्याच्यात धिटाई नी लढाऊबाना किती हाय? त्यावर ठरायचं. माई नुस्त्या

बोलन्याच्या ढंगावरुन मानसाचा समदा स्वभाव जोखायची. तिचं न ऐकता आमी एका बारकुंड्या म्हातारीच्या घरात घुसलो. त्या म्हातारीनं जळत्या इस्त्रीनं आमाला डागलं की." लाकी आणि मामाच्या चेहऱ्यावर नकळत हास्याची रेषा प्रकटली.

"चौथा गुरू होता बिननावाचा. समदी त्याला अनामिक म्हनायची. त्याचं खरं नाव कधीच त्यानं कुनाला कळू दिलं नाय. पुरा दसनंबरी. ठकडा. पुरता गोडबोल्या. कुनाच्या तंगड्या त्याच्याच गळयामंधी कश्या बांधायच्या? यात त्याचा हात धरनारं कुनी नाय. येगयेगळ्या मानसांसंग येगयेगळं काय वागायचं? कुनाशी काय वागायचं ते कसं ठरवायचं? हे समदं मी त्याच्या संगती काम करताना शिकलो हाय. पन त्याच्यासारखं ठकबाजीचं जिगर आपल्यात नाय. काय करनार?" बावळ्याचे प्रलाप ऐकणाऱ्या श्रोत्यांनी सहमती दर्शवायला चुकचुकाट केला.

"माझी पाचवी गुरू होती कनिश्ठाक्का. खतरनाक लुटारू. चाकूबाज. एकठाय मानसं असतात तेवा ती मानसं एकमेकांना लागून, काय नी कसलं कसलं हालचाली-हावभाव करत असतात. त्याच्यावरुन लांबूनच नुस्तं बघून आक्का अंदाज लावायची की त्यांच्या त्यांच्यात एकमेकाशी कुनाचं काय कसं नातं हाय? कोन म्होरक्या हाय, आनी कोन त्याचं चमचं. कोन त्याच्या मागच्या

नंबरावर हाय, आनी बाकीचं कोन किती मागं आनी किती पुढं. कोन त्याचं इरोधक. कोन साथी. तेवा दरोड्यात कुनाला पयला आधी गठाळायचा की मंग बाकीचं लगंच नांगी टाकतील. म्यॉव बी करनार नाय. ते ती कधीच वळकायला चुकली नाय." बावळ्याच्या आवाजात कनिष्ठाक्काबद्दल भीती जाणवली. "तुरुंगात ती असायची ती बी तिचं तिथं कुनाशी काम निघालं, तर त्याला गाठायला म्हनून आलंली. तिच्या संग कुनी दुहेरी चाल चालला असंल तर? बाबा माझ्या.." बावळ्याने आपल्या धडधडणाऱ्या हृदयावर हात ठेवला. "तिच्या टोळीतली आमी समदी तिची गुलाम होतो. पन एक दिवस तिला हिरदयाचा झटका आला. ती संपली तेवा सुटलो. मंग म्हटलं गुरू पुरं झालं. आपलं आपन एकट्यानं काम करनं बेस. काय म्हनते मंग? हाय की नाय मी एक नंबरी चोर?"

"तू लय हुषार माणूस होईंग." मामाने भाचीच्या वतीने बावळ्याकडे मखलाशी केली. "इतका अभिमानी चोर मंज आंजवर भेटिंग न." शालजोडीतला दिला. "तुंज चरणस्पर्श करिंग होईंग. तुंज चरण कुंठ असिंग?"

"राहू द्या. राहू द्या ना मामा!" किंचाळत अटीतटीने मामाचे पायापाशी चाललेले हात बावळ्याने रोखून धरले. "आता तुमीच सांगा. माझ्यासारख्या इतक्या गुनी चोरानं काय हे समदं गुन या

रानात फुकट दवडायचं? इतकी हिकमतीनं मिळवलंली इद्या रानात मातीमोल करायची? मी या गावपाड्यात चोरी करुन करुन करायची तरी कसली? शेनाची की गोवरीची?" मामाच्या खांद्यावरुन हात टाकत जवळीक साधली. "तुमाला म्हनून सांगतो मामा, मला आता चोरीबिगर दुसरं काय बी नीट जमनारंच नाय. माझ्यासारख्या कसबी चोराला शहरामंदी गेल्याबिगर खरा वाव तो मिळायचाच नाय. पटलं की नाय? समजंवा की हिला."

"तुला जोडीईंग घेईंग म्हणहजे ठाय ठाय अडचण." लाकीने समजूत काढायच्या सुरात बावळ्याला म्हटले. "तुला या काळांज रोजच्या साध्या साध्या गोष्टी-रिती माहीतिंग न. तू अडचणीत येईंग. मी जोडीला. म्हणहजे मी सुद्धा अडचणीत सापडिंग."

"मंग तू शिकव ना मला या काळातलं रिती. बदल्यात मी तुला माझ्या पाच गुरूंची इद्या शिकवतो. कस्सं काय?" बावळ्याकडे तोड तयारच होती.

"लाकी?" तोच वाटेवर कोणा जुन्या बालपणीच्या मैत्रिणीने लाकीला हाक मारून बोलायला थांबवले. तिची बावळ्याच्या हट्टातून तात्पुरती सुटका झाली. मामाने बावळ्याला पुढे ओढत नेले.

लाकीपासून पुरेसे दूर आल्याची खात्री करुन मामा बावळ्याशी बोलू लागला. "तुमा आजकालांज पोरांना वाटिंग की या म्हाताऱ्याला काईंग कळिंग न. माणसं जाणिंग ते काईंग फक्त तुमीच. तुमा दोघांज डोळ्यांत एकमेकांज प्रती काईंग असिंग? मी आता सगळं बघिंग असिंग. जाणिंग असिंग. पण तुमाला एकमेकांना नी स्वतहाला फसविंग खेळ खेळईंग असिंग, तर खेळिंग हवईंग तितकं. मी म्हातारा काईंग करिंग?" मग हातावरच्या कापडी बाहीने त्याने ओलावलेले डोळे टिपले. "मंज म्हाताऱ्यांज दिस कितईंग बाकी? मी तिंज भेटींज आशा सोडिंग होईंग. ती मंज पोर इतक्या वर्सानं तुंज कारणिंग परत भेटिंग. मी तुंज कितईंग ऋणी असिंग काईंग सांगिंग? आता मंज घोर असिंग न. ती तुला कितीईंग तोडिंग, काईंग बोलिंग, तू तिला अंतर देईंग न. मंज वचन देईंग. मंज मरण सुखईंग करिंग." म्हाताऱ्याने बावळ्याचे दोन्ही हात आपल्या हातात घट्ट उराशी धरुन ठेवले.

"मामा करिंग तरी काईंग?" पाठीवर आलेल्या लाकीने संशयाने बघत विचारले. बावळ्याची सुटका झाली. पुढची वाटभर तो भावनांच्या हिंदोळ्यात हेलकावत मुका मुका होता. लाकीचा मात्र जुन्या मैत्रिणीच्या भेटीने जागलेल्या आठवणींनी उत्साह ऊतू चालला होता. मामा, इथं ते असं होतं. ते काय झालं? तिथं ते वेगळं नवं काय बरे आहे? त्या अमक्याचं काय झालं? तो तमका शहरात

भेटला होता. त्याचं तसं झालं. आणि ती ही? जेव्हा ते एक लहानसा व्हाळ ओलांडून पलीकडे गेले, दोन्ही हात पसरुन तिने बावळ्याचे मामाच्या शेतात स्वागत जाहीर केले.

बावळ्याला नवल झाले. "हे शेत हाय?" त्याच्या कल्पनेतले कणसे-लोंब्या लोंबणारे वा फळे-शेंगा लगडलेले शेत ते नव्हते. ती एक भली मोठी सगळ्या बाजूने झाकलेली तट्ट्यांची खोप होती. आत काळोख होता. कुजणाऱ्या पालापाचोळ्याचा वास होता. त्या कुजक्या ढिगावर पांढरी दाटलेली बुरशी होती. त्या बुरशीतल्या कळ्या, कुत्र्याच्या छत्र्या लाकीने खुडल्या. मिटक्या मारत तोंडात टाकल्या. त्यांची चव जीभेवर घोळवत 'होईंग' म्हटले.

"हे मन्नान्न होईंग." मामाने काही अळंब्या खुडल्या आणि बावळ्याला देऊ केल्या. "तू शंभर वर्स आधींज काळातून येईंग असिंग म्हणहून ही पोर सांगिंग. तंस्स तर तंस्स असिंग. मंज तिंजवर विश्वास असिंग. तुंज सुद्धा. त्या काळात हे असिंग न. खाईंग तर बघिंग." बावळ्याने हुंगून, मग जीभेने बाहेरून चाटून, धीर करत एक खाल्ली. वरून जरा गिळगिळित. आतून जरा करकरीत होती. शहाळ्यातल्या मलईसारखी. पण बेचव. भूक भागवायला दुसरं काही नसेल तर भागवून नेता येईल अशी.

"भात मिळंल काय?" बावळ्याला याच्यापेक्षा सुकाभात सुद्धा चालणारा होता.

"तुंज काळात भात नी नागली अंस्स शेती होईंग. मंज पणजी सांगिंग ते आठविंग. त्या काळांज चक्रमिंग संशोधकांनी अंस्स बी तयार करिंग की त्यांज झाडापासून जे बनिंग, ते बी मात्र रुजिंग शकिंग न. काईंग अक्कल?" मामाने हात उडवले. "कारणिंग लोक फक्त त्यांज बी खरेदिंग या स्वार्थासाठी. त्या बीजांज संकर इतरांज बऱ्या बीजांसंग जाईंग. नी ते सुद्धा वांझ होईंग जाईंग. अंस्स होईंग होईंग नी मंग जगातली सगळीच बीजं वांझ जाईंग. संशोधकांज खेळ त्यांजवर उलटिंग. त्यांज राखीव बीजहि वांझ होईंग. तुंज काळातली ते शेतीतून मिळिंग खाईंग गोष्टी कायमसाठी जगातून संपिंग."

"ती पिकं खत्मिंग. हे भलंच होईंग आमांज." लाकीने बावळ्याला जळवायला अळंब्यांचा पुख्खा नी फकाणा तोंडात टाकला. "तेहवा माणसं ती तंस्स पिकांसाठी जमीन हविंग म्हणहून रान नी झाडोरा नाशिंग. त्या कारणाईंग रानावर जगिंग पशुपक्षी नाशिंग. जमिनींज सगळा कस ती पिकं फस्त करिंग. मंग जमिनीत त्या पिकांसाठी खत-रसायनं मिसळिंग कारणिंग, ती जमीन कायमांज वांझ होईंग. त्या तंस्स पिकांज किड मारिंग विष घालिंग

कारणिंग, जमीन-पाणी विषारी होईंग. ते खाईंग माणसं प्राणी रोगी होईंग. मरिंग. भलं होईंग. ते सगळं आता थांबिंग."

"या मधी माझा काय गुन्हा हाय? मला असलं का खायाला लागतं हाय? हे काय विशापरीस येगळं हाय?" बावळ्या गळ्याशी येणारा उलटीचा कढ परतवत म्हणाला. वाटत नव्हते तरी भुकेपोटी अळंबीचा दुसरा तुकडा त्याने बळेच घशात ढकलला. यावर त्याचे पोट बंड करुन उठले. उलटूयावर उलटूया त्याला ओकाव्या लागल्या. मामाने त्याच्या पाठीवर हलके थोपटत धीर दिला. व्हाळाकडे नेऊन पाणी पाजले. ते खळाळते थंड जळ प्यायल्यावर त्याला अंमळ हायसे झाले.

"पहिल्या वेळी खाणाऱ्याला अंस्स त्रास होईंग. भिईंग न. पोटांज सगळं बाहेर पडिंग जाईंग होईंग. आता तुला बरेईंग वाटिंग." मामाने समजावले. भाचीला फर्मावले. "गो त्याला शतावरींज शे◌े◌ंगा खाईंग देईंग. त्या शमींज झाडामागे जाईंग. तिंथ असिंग."

"मामा काय शिजलंलं, उकडलंल मिळनार नाय का?" बावळ्याने पोट आवळत विचारलं.

"इंथ फक्त काईंग शिकार मिळिंग, तर आमी ती जाळावर भाजिंग." मामाने बावळ्याला निराश केले. "आज तर काईंग तंस्स

भाजकं मांस असिंग न. जर खाली तिंथ नदीकाठी जाईंग, तर तिंथ ती लोकं कंद उकडिंग."

"मामा, मंज तिंथ जाईंग होईंग. आबालांज भेटिंग कारणिंग. त्यांज नकाशा मी मागे पळविंग असिंग. तो वापरिंग नी घातयंत्रांज गुप्त अड्डा शोधिंग असिंग. तिंथ कितीईंग तरी तंस्स यंत्र असिंग. जर ती यंत्र रझाकारांना मिळिंग तर?" लाकीचे अंग कल्पनेने शहारले. आवाज कापला. "त्या आधीच ती घातयंत्रं नाश करिंग होईंग. ते कंस्स करिंग हे आबालाला विचारिंग होईंग."

"तर तू मामांज भेटिंग न, खरी आबालांज भेटिंग कारणिंग इंथ येईंग असिंग." मामाचा आवाज दुखावलेला होता. "तो असिंग मुलूख तापट नी सणकी. तू त्यांज नकाशा चोरिंग असिंग. तो मदत करिंग तयार होईंग न."

"मंज यत्न करिंगच होईंग." ती निर्धाराने म्हणाली. "बावळ्याला अन्न तरी तो देईंग ना?"

"त्याला बावळ्या कितईंग आवडिंग, त्यावर ते ठरिंग." मामाने भाचीला स्पष्ट केले.

लगेच भाचीने पाहुण्याला स्पष्ट केले. "तुंज गुरुनं शिकविंग ती सगळी माणसं जाणिंग विद्या, आता पणाला लाविंग नी त्याला जिंकिंग. चलिंग तय्यार?"

यावर अर्ध्या मनाने होकार देत, बावळ्याने जड घुटका गिळला.

## शंभर वर्षे पुढे - प्रकरण १७

आबालच्या घराचा आकार मजेशीर होता. चिमणीसारखा. तिथे गांजाची बरिच झुडपे दिसत होती. त्या गांजाच्या काटक्या-काठ्यांचा डोकेबाज उपयोग करून, ते लाकडी घर बनलेले होते.

आजूबाजूला अशा धर्तीची बाकी घरेहि होती. त्यांचे आकार वेगवेगळ्या पशुपक्ष्यांचे त्यांच्या मालकांच्या आवडीनुसार घडवलेले होते. त्या गावाचे तशी घरे खास वैशिष्ट्य दिसत होते. बावळ्याला मांजराच्या आकाराचे घर स्वतःसाठी आवडले. हवेसे वाटले. तसे त्याने आबालला भेटल्यावर सांगितले. तेव्हा लाकीला हसू आवरले नाही. तिच्यामते हा निव्वळ पोरकटपणा होता. मात्र आबाल खूश झाला. हेच तर हवे होते.

आबाल लाकीच्या मामाइतका म्हातारा होता. ते पोहचले तेव्हा त्याच्या शेतात काम करत होता. मामाने एकमेकांशी ओळखदेख करुन दिल्यावर, बावळ्याने लगेच आबालच्या दिसेल त्या गोष्टीची स्तुती करण्याचा सपाटा लावला. ते शेत? ते बावळ्याच्या काळाच्या हिशोबाने शेत म्हणता आले नसते. ते एक फळांची, शेंगांची, कंदांची झाडे भरलेले गच्च रान होते. दहा पुरुष उंच वृक्ष, ते केवळ घोट्याशी रांगणारी खुरटी झुडपे, अशी सगळी

वेगवेगळ्या प्रकारची ती गर्दी होती. बोलताना आबालचा चेहरा पाहण्यासाठी, वेलींचा आणि त्यांना लगडलेल्या घडांचा झुबका बाजूला आवरुन धरावा लागत होता. ती झाडे उगवायला आणि सांभाळायला आबालला बिचाऱ्याला केवढी मेहनत करावी लागत असेल? असा बावळ्याच्या बोलण्याचा सारांश होता.

ही तर बावळ्याने नेमकी एका शेतकऱ्याची दुखरी नस पकडली होती. पूर्वाश्रमी स्वतः शेतकरी राहिल्यामुळे असावे. शेतातल्या मेहनतीच्या व्यस्त प्रमाणात मिळणारा मोबदला, या सगळ्या शेतकऱ्यांच्या काळीजकळीच्या विषयाची बावळ्याला पक्की जाण होती.

मामाने तिथे येण्याचे कारण विशद केले. या शहरी पाहुण्याला कच्चे खाणे पचत नसल्याने, पक्के खायला घालायला आणलेले. आबाल आवडीने पाहुण्याला घरात घेऊन गेला. शिजवलेले कोनफळी कंद अभिमानाने आबालने सादर केले. तो जांभळा गोडवा पाहुण्याने हात चाटून पुसून फस्त करत, अन्नदात्याचे असंख्य परत परत आभार मानले. तेव्हा तर आबालला राहवले नाही. आबालाने म्हटले की त्याला जर मुलगी असती, तर त्याने आनंदाने बावळ्याला जावई करून घेतले असते.

त्यानंतर बावळ्याची पक्क्या अन्नाची किंमत चुकवायची पाळी आली. आबालने शेतीत होणाऱ्या नुकसानीची जी रड लांबड लावली, ती सतत सादर दुजोरा देत ऐकून घ्यावी लागली. न कंटाळता. निदान तसे दाखवून न देता. "आता मार्गशीर्ष असिंग. तरी आंबा मोहरींग न. जामांज फळं धरिंग न. जांभूळ पालविंग न. अवकाळी गेला आठवडा पाऊस बरसिंग. सगळा कारवींज फुलोरा गळिंग. तिंज शिंपिंग सगळी मेहनत मजुरी मातीत गेलिंग." याच धर्तीची तीस-चाळीस झाडपिकांची नुकसान यादी त्याने वाचली. त्यातली बहुतेक नावं बावळ्याला अपरिचित होती. पण त्याने हो ला हो केले. "तीन महिनं मातीत खपिंग खपिंग, नी ते मणभर वरिंज धान्य विकिंग, तर फक्त शंभर रुप्पी मिळिंग. दहा टोपली जम्बु जमा करिंग दहा दिस लागिंग. विकिंग तर त्यांज दहा रूप्पी सुद्धा कोण देईंग न."

मामा यावर काही बोलणार तोच आबाल उसंत न घेता पुढे चालू झाला. "तुला अजून काय सांगिंग? मंज आता इतकं कहर नुकसान जाईंग असिंग की मी शेती कायमईंग सोडिंगच देईंग. इतकी तुटींज गोष्ट जगात दुसरी असिंग न." आबालने हात वर झटकले. "शेतीपरिस दुसरं कायईंग करिंग. तू मंज शहरात काईंग काम मिळविंग देईंग?" आशेने आबालने बावळ्याचा हात धरला. बावळ्या कानकोंडा झाला. त्याने अलगद हात सोडवून घेतला.

मामा सरसावला बाजू सावरायला. "बा आबाला, शहरांला कंटाळिंग नी ते सोडिंग तू गावात येईंग. त्यांज वीस वर्स जाईंग. आता परत तुंज शहरांज स्वप्न काईंग पडिंग? पैसा कमाईंग साधन शेती असिंग न. पैसा कमाईंग शेती करिंग तर घाट्यातच जाईंग. तू शेतींज गोष्टी विकिंगच काईंग? तुला खाण्यापिण्यांज काईंग कमी?"

"विकिंग न तर पैसा कंस्स जोडिंग? फक्त खाऊन पिऊन जगिंग काईंग? ते जनावरांज जिणईंग होईंग. पैसा असिंग न तर माणसांज खरं जिणईंग कोण जगिंग शकिंग?" आबालने मामाला उलट खडसावले.

"हीच शेतकऱ्यांज चूक होईंग. जर आमी शेतींज अन्न विकिंग न, तर ते शहरी लोक काईंग खाईंग? शेतकऱ्यानं सवताहा गरजेंज पुरतीच शेती करिंग होईंग. जादा करिंगच न. मंग शहरी माणसांना खरी शेतींज किंमत कळिंग. भूक लागिंग तर त्यांना सवताहा शेती करिंग लागिंग. तेहवाच शेतकऱ्यांना खरा मेहनताना मिळिंग लागिंग. खरेईंग म्हणहजे पैसा पैसा अंस्स गोष्टच या जगात होईंग न. पैसा लय बुरी शै असिंग. चलनी पैसा जर जगात असिंग न, जगात सगळा व्यवहार जर फक्त वस्तूंज देवाण-घेवाण करिंग होईंग, तर जगांज सगळे त्रास संपिंग." मामाचे हे बोलणे आबालला

धुडकावूनहि लावता येईना. पटवूनहि घेता येईना. तो आत गर्मी भरलेल्या चहाच्या किटलीसारखा पोटात धुमसत राहिला.

"तुझा मामा तर हुबहूब दुसरा सक्तिसक्त हाय की." बावळ्या लाकीच्या कानात पुटपुटला. तिला 'म्हणजे काय?' विचारायची संधी मिळाली नाही. आबाल धडाडला.

"तुला हेच हविंग असिंग की बाकी सगळी तुंज सारखीच जंगली जिणईंग जगिंग. तुला बाकी माणसांज सुख बघविंग न." नाक त्रासून आबालने मामावर आरोप केला. "जर आज ती जुन्या काळांज शेतीवाली गहू, भात, ज्वारी, तूर, कपास भारी पिकं असिंग होईंग, तर हा त्रास शेतकऱ्यांज होईंग न. कितीईंग सुखी होईंग त्या काळांज शेतकरी. ती माणसं? ती एकेरी शेतं? हाय!"

"तो जुना काळ तुला परत हविंग असिंग?" लाकीने उपहासपूर्ण हास्य केले. "याला विचारिंग. त्या काळांज काईंग सुख असिंग ते? तो त्या काळातून येईंग असिंग." तिने बावळ्याचे गुपित फोडले.

"मंज म्हाताऱ्यांज थट्टा करिंग न." आबाल लाकीवर चिडला. त्याने बावळ्याचे हात पुन्हा ओढून हातात घेतले. चाचपून बघितले. "ही नाडचुकी पोर खरं सांगिंग काईंग?" बावळ्याला पहिल्यांदा उमगले की आबाल आंधळा होता. हे असं चाचपणं त्याने यापूर्वी अनुभवलं होतं त्यावरुन. त्याच्या आईची

आयुष्याच्या अखेरीस दृष्टी पार अधू होत गेली होती. तेव्हा बावळ्याचं खरंखोटं ती अशीच स्पर्शाने चाचपून करित असे. आईच्या आठवणीने बावळ्या उदासला. त्याने होकार भरला.

"म्हणहून!" असा उद्गार काढून आबाल क्षणभर गप्प झाला. "म्हणहून तू ती शंभर वर्साआधींज भाषा बोलिंग. मी कधीपासून विचार करिंग होईंग. काईंग कारणिंग?" बावळ्याला आश्चर्य झाले की इतक्या सहजासहजी ही गोष्ट आबालने स्वीकारली? जणू ते कळल्यागत आबालने खुलासा केला. "माणसांज स्पर्श कंधी खोटईंग बोलिंग शकिंग न."

"तू त्या काळातून येईंग असिंग, ज्यांज आमी फक्त कहाण्या ऐकिंग नी स्वप्ने पाहिंग. आपला आपण चालिंग रथ, पाय मारिंग कष्ट होईंग न, तो हाकिंग किती सुख होईंग! कंस्स त्यांज सुसाट वेगांज झिंग होईंग? तू कोणतंईंग कोणतंईंग वेगरथ हाकिंग? फरारी, रोलस, मरसिडींझ, ओडी? कोण सालांज तू? फरारींज कितवं प्रारुप तेहवा होईंग?" आबालने बावळ्याला आश्चर्याचा आणखी एक धक्का दिला.

"माझं साल? माझा जल्म एकोणीसशे सत्याण्णवचा हाय. मी जेवा इथं आलो तेवा दोन हजार वीस साल चालू होतं की." बावळ्या उत्तरला. "फरारीचं रुप.....?"

"वा! म्हणहजे तेहवा आकाशात जेट विमानं उडिंग असिंग होईंग. त्यांज धुरांज पट्ट्यांनी आकाशभर नक्षी रेखाईंग जाईंग होईंग. लाल, पिवळे, हिरवे, पांढरे पट्टे. काईंग अफाट नी सुंदर दृश्य होईंग ते?" आबालचे स्वर स्वप्नाळू झाले होते.

“हुं!" सावळ्याने कण्हत हुंकार भरला. आबालला खोडून काढावेसे त्याला वाटले नाही. जर डोळे उघडून आबालला पाहता आले असते, तर समोर संध्याकाळचे आकाश लाल, पिवळ्या, निळ्या, पांढऱ्या रंगांनी रंगलेले त्याला दिसले असते. हे दृश्य सुद्धा अफाट आणि सुंदर होते.

"ते सुख सोडिंग, तो काळ सोडिंग, तू इंथ या करंट्या जगात काईंग येईंग ?" आबाल चुटपुटला. "रे बावळ्या?"

"मी इथं कसा आलो हाय, ते मला बी कळत नाय हाय. मी एका स्फोटात शिरलो तो आमच्या काळात. आनी त्यातून बाहेर आलो तो तुमच्या काळात. काय जादू झाली काय मायत?" बावळ्या बोलला.

आबालचा आवाज लालसेने थरथरला. "त्या स्फोटातून जर इंथ येता येईंग. तर उलटं परत जाईंग पण येईंग."

"इचार केला पायजेल." बावळ्याने स्वतःची समजूत घालून घेतली.

"आता तुला इंथ येईंग खूप पश्चाताप नी दुःख होईंग काईंग?" तो काळ चुकला म्हणून आबालने बावळ्याला समदुःखी मानले.

"नाय." बावळ्याच्या या उत्तराने आबालच्या भिवया ताणल्या गेल्या.

"काईंग कारणिंग?"

"कारन... काय सांगू?" बावळ्या थकल्या आवाजात मिटल्या डोळ्यांनी सांगू लागला. "आज या काळात तुमी त्या काळातलं सुखाच्या गोश्टी बोलता हाय. पन त्या काळात माझ्यासारख्या समद्या लोकांच्या नशिबात बी या समद्या सुखाच्या बाता नी बोलंच होतं की नुस्तं. तुमी म्हनता ती विमानं, आलिशान गाड्या अ◌ामी बी नुस्ती चित्रात आनी दुरून बघितली. त्याच्यात बसनं काय, आनी या समद्या चैनी काय, आमच्यासाठी नाय होत्या जी. मोजक्या नशीबवाल्या लोकांसाठी होत्या की. बाकी समद्या लोकांच्या नशिबात राबराब राबनं, उपासमार, लाचारी, वखवख, जळफळाट भरलंला." बावळ्या उसासला.

त्याने डोळे उघडून सभोवार हलके हलके पसरत चाललेली रात्र पाहिली. "किती शांत हाय इथं. छान गार गार वाटतंय की. काल दिसभर होता ...तसा उपाशी मी तिथं बी असायचा की. इथं खाल्ला तसा मार तिथं बी मिळायचाच की. पन आजची इथली रात मला,

मी तिथं झोपायचा त्या झोपडपट्टीपरीस जादा सुखाची वाटते हाय." बावळ्याने सांजफुलांचा गंध हुंगला. "इथं हा फुलांचा वास हाय. तिथं गटाराचा आनी उकिरड्याचा घान वास भरलंला होता. तिथं वस्तीतल्या रोजच्या राड्यांचा आनी भांडनांचा कचकचाट असायचा. इथलं रातकिडं बी मजेत ओरडतात हाय. कमाल हाय, येवढं रान असून बी इथं डास नाय. साफसुफ हाय की समदं..."

"तुला काईंगच सुख तेहवा होईंग न? ते आयसकिम म्हणिंग ते थंडगार गोड गोड काईंग ते, तू कंधी चाखिंग न?" आबालच्या चेहऱ्यावरच्या जाळीदार सुरकुत्यांमध्ये जास्तीची भर पडली. "मंज सांगिंग तू कायईंग काम करिंग तिंथ? तू कुणी संगणक चालविंग वा कारखान्याईंग यंत्र बनविंग अभियंता होईंग काईंग? वा कुणी यानचालक अंतराळवीर? नाईंग तर रणगाडा नी स्वयंचलित बंदूक चालविंग शिलेदार गनिम? तुंजपाशी ती संहतकिरण बंदूक होईंग काईंग? महामहीमांज संग्रहालयात मी जे चलतचित्रांज खेळ बघिंग असिंग, त्यांज सगळ्यात हेच सगळं होईंग."

बावळ्याला हसू आलं. "त्या खेळामधं खोटी दुनिया दाखवतात जी. त्या खेळांच्या परीस तेवाची खरी दुनिया आनी तेवाची खरी मानसं खूप येगळी होती. मला कोन अभियंता बनवनार? कंगाल आईबापाच्या पोटी जल्माला आलेला करंटा

पोरगा मी. बाप माझा शेतकरी होता. सरकारनं आमची जमीन काढून घेतली. आमचा गाव धरनात बुडवला. बदली जमीन वांझ निघाली. सावकाराचं कर्ज इतकं चढलं की बाबानं हाय खाऊन फास लावून घेतला. मंग मी आनी आये आमी दोघं कारखान्यात मजुरीच्या कामाला लागलो. त्या इषारी रसायनाच्या कारखान्यात काम करून आयेची तब्येत बिगडली. इलाजाला पैसा नाय होता. आये मेली. ती मेली तेव्हा मी अठरा वर्साचा होतो. तेवापासून कुठल्या खानावळीत पोऱ्या, कुठं माल पोचवनारा हरकाम्या, कुठं कोना सुताराचा, गवंड्याचा सांगकाम्या. नोकर म्हनून मी मिळंल ती नोकरी केली. जीवतोड काम करून बी पोटापुरतं खायाला मिळालं नाय. ना धंदा करायला पैसा ना नोकरी करायला शिक्शन. भरपूर पैसं मिळवून देनारा काम-धंदा करायला पैसंवाल्यांच्या पोरांना भरपूर पैसा घालून शिक्शन घेता यायचं. पैश्याकडं पैसा जातो. आमच्यासारख्यानं मंग पैसा मिळवायचा तर काळा धंदा करायचा. तस्करी, अपहरन-खंडन्या, हप्तं गोळा करा. त्याच्यासाठी मारामाऱ्या, दंगे आनी खून करा."

आबालने टाळी वाजवली, "तुला हे जमिंग ना सगळं बऱ्याईंग?" त्याचा उपहास उतू गेला.

"नाय." बावळ्या सुस्कारला. "दैवानं तो खूनखराबा करायला लागनारं फत्तरकाळीज बी दिलं नाय हाय. मी नुस्ताच एक भुरटा चोर हाय." ही कबुली फार कमीपणा आणणारी आहे. असे वाटून त्याने छाती ठोकली. "पन समद्या चोरात एक नंबरी बेस हाय की?"

"आता समजिंग आबाल? आमी इंथ या काळात किती सुखानं बिनपैशांज फुकट शेती करिंग असिंग?" मामाने आबालला खिजवले.

"हुं! त्या काळात जर मी होईंग, तर मंज जी अपघातात जाईंग, ती नजर परत मिळिंग होईंग." आबालने मामाला लगेच सुनावले. "तेहवा कितईंग वैद्यांज चमत्कार होईंग. हृदय, किडनी, डोळे नी जे जे पण अंग बाद जाईंग, ते ते अंग परत बदलिंग चालूईंग करिंग."

"माझ्या आयेचं डोळं त्या काळातच बाद झालं. ते तर कुनी बदलून दिलं नाय." बावळ्याच्या रागाने उचल खाल्ली. "कुनासाठी होतं ते समदं इलाज? पैसंवाल्यांसाठी फकस्त!"

"बरोबर बावळ्या." लाकीने त्याला शाबासकी दिली. "मूठभर पैसेवाल्यांज भर नी चैन करिंग, जे गोष्टी तेहवा सृष्टीसंग होईंग, त्यांज भारी किंमत बाकीईंग तमाम लोकांज त्रास भोगिंग नी जीवानं चुकविंग लागिंग. तेहवा तो काळ आमांज परत कंस्साच हविंग न." तिला आबालला पटवायची घाई होती. "पण रझाकार तो काळ

परत आणिंग यत्न करिंग असिंग. त्या काळांज घातयंत्र पुन्हा वापरिंग बघिंग. त्या आधीच ती नाशिंग होईंग." तिने कबुली द्यायला धीर एकवटला. "आबाल तुंज सुवर्णा यंत्रअड्ड्यांज नकाशा मी चोरिंग होईंग. नी त्यांज तपास लाविंग असिंग. तिंथ गोराई खाडी भागात खरोखरईंग ती यंत्रं असिंग. ती जर लगोलग नाशिंग न, तर रझाकार...."

"नाडचुकी!" आबाल रागाने कडाडला. "अजूनईंग कोणांज माहीतिंग हे? मुर्ख पोरी, इतकीईंग वर्स मी ते गुपित जीवापाड दडविंग ठेविंग. तू सगळ्यांज इस्कोट करिंग असिंग."

"आबाल तिंज चूक होईंग. तरुण वयईंग रे बाबा." मामाने लाकीसाठी रदबदली केली. "आता रागाईंग काईंग न होईंग. ती चूक जल्दीईंग सुधारिंग हविंग. शत्रू घात करिंग. त्या आधी ती यंत्रं कंस्स नाशिंग ते सांगिंग."

आबालने स्वतःला दोन्ही हातांनी आवळून धरले. तो त्याचा राग शांत करायचा प्रयत्न करत होता. तो काही बोलेना. तसा बावळ्या सरसावला. त्याने आबालचे हात आपल्या दोन्ही हातात ओढून घेतले. आबालने क्षीण प्रतिकार केला. मात्र अखेर हात बावळ्याच्या हातात सोपवले. बावळ्याने त्या हातांचे तळवे हलकेच उताणे वरच्या दिशेला फिरवले. मग आपले हात बाजूला

केले. आबालचे हात त्याच्याहि नकळत समोर उघडे राहिले. हातांबरोबर आबालचे मनहि. आता आबालला किंचित उकसवण्याची गरज होती.

बावळयाने त्यासाठी आपले मन उघडे केले. "ती खुनी यंत्रं मला मारायला आलंली. तेवा मी माझ्या मित्राकडं पळालो. त्याच्याकडल्या तेस्लाचं सुरळीखांबात ती यंत्र बंद पाडायला आमी स्फोट केला. नी मी इथं पोचलो. काय सांगू? ती यंत्र कसली आग अंगात लावतात. समोर मारगिरी करनारं दिसत तर काय नाय. पन शरीरात दुखीची जी काय कळ जागते. डोळ्यापुढं पांढरं भोवरं गरागरा फिरायला लागतं."

"पांढरे भोवरे? त्या भोवऱ्यांनीच मंज नजर मी गमाविंग." थरथरत्या हातांनी बावळयाला धरत आबाल किंचाळला. "ज्यांज सवताहा तो मारा भोगला असिंग, त्यांजशिवाय कोण हे सांगिंग शकिंग न. रे बावळया! तू खरोखरीईंग त्या काळातून येईंग. मंज आता खरी खात्री होईंग. मंज आठविंग सवड देईंग." सगळे गप्प राहिले.

काही वेळाने तो बोलू लागला. "तेहवा मी महामहीमांज शस्त्रांज विभागात शास्त्रज्ञ होईंग. हे गुपित मी इंथ सगळयांजपासून दडविंग असिंग. फक्त मंज लंगोटीयार हा नवलख, यांज ही गोष्ट

माहीतिंग. त्यानं मंज इंथ राहिंग सोय करिंग देईंग." आबालने मामाकडे इशारा केला. "तिंथ सरकारी प्रयोगशाळेत कितीईंग गुप्त प्रयोग होईंग. जुन्या काळांज शस्त्रांज नमुने परत चालू करिंग नी बनविंग आमांजवर जबाबदारी होईंग. आमी फुशारकीईंग नी चढाओढीईंग की शत्रूदेशाआधी आमीच ती बनविंग, उत्साहानं ते काम करिंग होईंग."

आबालने परत थोडा वेळ खाल्ला. जोरजोराने निश्वास टाकले. "मंग एक दिवस मंज एका जुन्या शास्त्रज्ञांज रोजनिशी मिळिंग. त्यात घातयंत्रांज इतिहास होईंग. बावळ्या तू येईंग त्या सालांज काही वर्षांनंतर, ती यंत्रे तेहवांज सरकारेन बाकी सगळ्या लोकांसमोर आणिंग. तो त्या घातयंत्रांज पहिला टप्पा होईंग. कारणिंग तेच ते. जे आमांज काळात सरकार आज सांगिंग असिंग. शत्रूदेशांज जबाब नी धाक म्हणहूनईंग."

"म्हंजी सरकारं सगळी सारखीच हाय की?" बावळ्या वतवतला.

"लोक अभिमान धरिंग. कौतुकिंग तेहवा घातयंत्रांज. लोकांज शत्रूपासून वाचविंग रक्षक म्हणहून. पण सरकारेन लोकरक्षणांज नाईंग तर खरेईंग लोकनाशांज ती बनविंग होईंग. लोकांज धाक घालिंग कारणिंग. ते मंग खूप उशिराईंग लोकांज कळिंग. वेळ

उलटलिंग जाईंग तेहवा. दुसऱ्या टप्प्यात सरकारेन आपल्यांज लोकांवर ती यंत्रे घात करिंग चालविंग तेहवा." आबालने हाताची बोटे कडाकडा मोडली.

"आधी सरकार सांगिंग की लोकांत लपिंग घरभेद्यांज पकडिंग म्हणहून, सगळयाभर चोविस तास अहोरात्र निगराणी नी पहारा जरुरी होईंग. त्या काळात होईंग ती सगळी प्रचार नी दूरसंपर्कांज माध्यमं सरकारेन तोंडपुजारी होईंग. खरेईंग काईंग होईंग, लोकांज कळिंग देईंग न. तेहवांज महामहीम त्यांज सगळे विरोधक या सबबीआड नाशिंग. त्यांज राज्य नी लोकांज लूट विनारोख चालविंग. जो त्याला नाही म्हणहिंग, त्याला नाशिंग घातयंत्र चालविंग."

"आमांज महामहीमा काईंग वेगळीईंग असिंग न." लाकी चुटचुटली.

"अन्याय सर्व लोक सर्व काळ सहन करिंग होईंग न. मंग लोकांज सर्वत्र उठाव जाईंग. मूठभर राज्यकर्त्यांज तमाम लोकांज नियंत्रण अशक्य होईंग. तेहवा शास्त्रज्ञाईंग उठावखोर परस्पर नष्ट करिंग कारणिंग, त्या घातयंत्रांज बुद्धी देईंग. तो तिसरा टप्पा होईंग. तेहवा जगांज नियंत्रण राज्यकर्त्यांज हाताईंग शास्त्रज्ञांज हाती जाईंग. परस्पर मत्सरानं शास्त्रज्ञांनी एकामेकांज वर घातयंत्र घालिंग. ते

सगळे संपिंग नी यंत्रांईंग माणसांज नियंत्रण राहिंग न. घातयंत्रं सगळ्या माणसांज संपविंग लागिंग."

"आपण जागविंग राक्षस माणसांज वरच उलटिंग. काईंग वाईट होईंग न." लाकी कुजकटली.

"गो, सगळी माणसं दोषी अंस्स कंस्स म्हणिंग शकिंग?" मामाने तिला सुनावले. "बेखबर निरपराध माणसांज बळी काईंग?"

"जेहवा हा इतिहास मंज कळिंग, तेहवा मी मंज इतर साथी शास्त्रज्ञांईंग सावध करिंग की इतिहास पुन्हा दुहरिंग न. आमी घातयंत्र पुन्हा चालविंग न. बनविंग न. मी कितीईंग भोळा होईंग तेहवा? जग जाणिंग न. मंज प्रयोगात बोलाविंग नी मंज साथीच मंज यंत्रांज घातमाऱ्यात फसविंग. त्या अपघातात मंज डोळे जाईंग." लाकीचे हात आबालने हातात घेतले. "तुंज मात्यापित्यानं मंज वाचविंग. तो अपघात होईंग न. यांज किंमत त्यांना सवताहांज प्राणानं चुकविंग लागिंग. तो घात होईंग. ही जाण ठेविंग. तेहवापासून मी इंथ अज्ञातवासात जगिंग असिंग."

लाकीने आपले हात सोडवून घेतले. "मंज मातापित्यांज इतिहास तुमी मंजपासून लपविंग काईंग?" तक्रारराग आळवला.

"इतिहास पुन्हा तुंजबाबत दुहरिंग न म्हणहून." मामाने समजवायचा प्रयत्न केला. मामाचा खांद्यावरचा हात देखील तिने झटकला.

"ती यंत्रं कंस्स संपविंग ते सांगिंग." लाकीने मुद्द्याची बाब लावून धरली.

"जुन्या काळात घातयंत्राईंग निकामी करिंग कारणिंग, निकामिक नावांज तोंडानं फुंकिंग पुंगीसाधन महान युगनायक लोकांना देईंग होईंग. पण आजकालांज सरकारेन निकामिक विनापरवाना वापरिंग नी बनविंग बंदी आणिंग असिंग. तुंज बंडबागीईंग परवाना कंस्स मिळिंग?" आबालने अडचण सांगितली. "नी निकामिकानं यंत्र नाशिंग करिंगसाठी, ते आधी चालू करिंग लागिंग. ते खूप धोकादायक असिंग. त्या परीस तू त्या घातयंत्रांज मेंदू म्हणहजे जी संगणक प्रणाली असिंग, तिंज निकामी करिंग."

"कंस्स करिंग?" लाकी तणतणली.

"मंज संगणकांज तितकंईंग खोल ज्ञान असिंग न. तंस्सा माहीतगार तुंज शोधिंग हविंग." आबालने हात झटकले.

"तंस्सा एक मंज माहीतिंग असिंग." मामा मिशीतल्या मिशीत त्या कोणाची आठवण आल्याने हसला.

"पण काईंग गं पोरी?" आबालला महत्वाचा मुद्दा आठवला. "तुला एकटीनं सुवर्णाअड्डा शोधिंग विनामदतगार शक्य असिंग न. कोण असिंग तो तुंज जोडींज? हा बावळ्या?"

"न." लाकीने ओठ मुडपले. "तिंथ आमांज चुकीनं स्फोट होईंग. त्यात हा प्रगटिंग." आता तिला या गोष्टीचे हसू आले. "मंज सोबतईंग साथी क्रमांक तेहवीस होईंग."

"काईंग तो?" आबाल किंचाळला. "त्याला तर सरकारेन कैदेतून मुद्दाम सोडिंग असिंग. हर एक बंडबागी सापडविंग देईंग, या शर्तीईंग."

"लोक अंस्स म्हणिंग." लाकी विचारात पडली. "मंज तंस्स खात्रीनं वाटिंग न. तंस्सा अनुभव येईंग न."

"तुंज खात्री कंधी होईंग?" आबाल तिरकसला. "सगळे बंडबागी फासावर लटकिंग तेहवा? विश्वासांज साथीदाराईंगच मंज घात करिंग होईंग. विसरिंग न."

"पोरी, आधी तुंज रोखिंग मी विचार करिंग होईंग." मामा कळवळला. "पण आता मीच तुंज सांगिंग की घाई करिंग होईंग. ती घातयंत्रं संपविंग जितकी जल्दीईंग करिंग तितकी करिंग. अजून कोणाईंग त्या यंत्रांज माहिती जाईंग, त्यांज आधी."

"मामा मी तुंज वचन देईंग. मंज मातापित्यांज अपुरं काम मी पुरं करिंगच करिंग." लाकीने प्रतिज्ञा केली.

## शंभर वर्षे पुढे - प्रकरण १८

पिंपळदरीच्या जंगलात गुराख्यांची पालं पडलेली होती. त्यातल्या एकात लाकीची मामेबहीण मामली मिळणार होती. सगळी सकाळ त्या पालांची जागा शोधून काढण्यात गेली होती. कारण गायींची चरण्याची जागा रोज बदलावी लागे. गायींसोबत त्यांच्या मालकांना मुक्काम हलवावा लागे. आदिवासी पाड्या-पाड्यांतून गुराख्यांच्या आजच्या मुक्कामाची जागा आणि दिशा विचारत, बावळ्या आणि लाकी अखेर तिथे येऊन पोचले.

पिंपळदरीपर्यंतचा प्रवास वेगवेगळ्या मालमुंगाडींमधून त्यांनी पार पाडला होता. त्यांना हव्या असलेल्या दिशेला जी मालमुंगाडी जिथपर्यंत जात असेल, तिथपर्यंत तिच्यातून उचलमदत घेत. तिच्या गंतव्य-स्थानाची दिशा वेगळी होईपर्यंतच्या फाट्यापर्यंत. तिथून मग दुसरी एखादी पकडत.

दिवसाउजेडात मालमुंगाडीचा दिसलेला अजब अवतार पाहून बावळ्याला खूप मजा वाटली होती. चार-पाच पुरुष मापाचा एखाद्या मोठ्या मुंगीसारखा तिचा आकार होता. मुंगी तिच्या वजनाच्या एक्याऐंशी पट बोझा वाहून नेते. तिच्या शरीरात असलेल्या हालचालींच्या रचना तंत्राचा उपयोग करुन, हे सहा

पायांवर चालणारे वाहन बनलेले होते. दोन चालक पायांनी चक्री फिरवत ते सहज हाकू शकत होते. अनेक मणांचे ओझे नेऊ शकत होते. पण तिच्या संतुलनाचे गणित नाजूक असल्याने आणि रस्ते बांधीव सपाट नसल्याने, त्या वाहनाचा वेग फार नव्हता. माणसाच्या चालीच्या फारतर दुप्पट. बैलगाडीत बसल्यावर जसे गचके खावे लागतात, तसे प्रवासात सहन करावे लागले होते.

पुढे पिंपळदरीच्या रानातला काही तासांचा प्रवास त्यांना पायी करावा लागलेला. एकामेकांची हवीहवीशी सोबत असताना त्यांना तो रम्य वाटलेला. लाकीला लांबूनच ओळखून मामली धावतपळत आली. दोघा बहिणींच्या गळाभेटी झाल्या. लाकी मामाच्या गावाकडून आली आहे, कळल्यावर मामलीने तिथली सगळी खबरबात आधी घेतली. बावळ्याशी ओळखदेखीचे नमस्कार चमत्कार झाले. मामली मनमोकळी आणि बोलघेवडी होती. ती साधारण लाकीच्याच वयाची वाटत होती. तिने या गोष्टीला दुजोरा दिला. तिघांच्या शिळोप्याच्या गप्पा सुरु झाल्या. गायीच्या ताज्या दुधावर ताव मारत. जे बावळ्यासाठी मन्नानापेक्षा अनेक पटींनी सुखावह होते.

दोघींचे बालपण एकत्र गेले होते. पुढे मात्र आयुष्याचा मुख्य मार्ग निवडायची वेळ आली, तेव्हा त्यांच्या आवडीनिवडी वेगळ्या

पडल्या. लाकीला विज्ञान-तंत्रज्ञानाची ओढ असल्याने, ती अभियंता बनायला शहरी विद्यापीठात दाखल झालेली. तर मामलीला प्राण्यांची व फिरतीच्या जगण्याची हौस असल्याने, ती या गुराख्यांच्या तांड्यात सामील झाली होती. मामाला दोघी दुरावल्याने फार दुःख झालेले. पण पिल्लांना मोठी झाली की झेप घेऊन दूर उडून जाऊ देण्याचे शहाणपण त्याच्यापाशी होते.

लाकीने आतीशची चौकशी केली. "आतीश आज येईंग न?"

"येईंग तर. नाईंग तर काईंग करिंग?" मामली मिजाशीत हसत उत्तरली. "तू आता तुंज भावाची कड घेईंग, मंज कंटाळविंग न." बजावले.

"तो बापडा मंज आतेबंधू या खुळईंग पोरींज प्रेम करिंग. तिंजसाठी त्यांज विज्ञान संशोधनांज काम सोडिंग असिंग. नी गाय दूधांज विक्रेता बनिंग, रोज शहर ते हिंज पालं, अंस्स लांब चक्करा नी चक्करा मारिंग." लाकीने बावळ्यासमोर आतीशची परवड मांडली. "तू बघिंगच आज, हिंज ठिकाणा शोधिंग कितीईंग त्रास असिंग. पण या पोरीला त्यांज काईंग विचार असिंग न. नुस्ता झुलविंग त्याला आशेवर."

"तुला जर त्यांज इतका विचार होईंग, तर तूच करिंग ना प्रेम त्याला?" मामलीने चिडवले. "त्यांजपाशी शहरात वसिंग जाईंग."

"न. मंज आयुष्यात प्रेम-नाती असिंग न." लाकीने आढ्यतेने सुनावले. "मी असिंग बंडबागी. जर शहरात त्यांज भेटिंग जाईंग, तर तो नी मी दोघंईंग संकटी पडिंग."

"म्हणहजे तू मंज भेटिंग न, त्याला भेटिंग येईंग?" मामली फुरगंटली. "तुंज बंडबागी कामात त्याला गुंतविंग न. आधीच सांगिंग. मंग मंज परीस तुला वाईट दुजं कोणी होईंग न."

"इतकी त्यांज काळजी असिंग, तर त्यांज प्रेम कबुलिंग काईंग न?" लाकीने फटकारले.

"तुंज जीवनात जर प्रेम असिंग न, तर तुला ते काईंग कंस्स कळिंग?" मामलीने टोमणा मारला. त्यापुढे आतीश त्याच्या पायरथातून हजर होईपर्यंत, त्या दोघींमध्ये तडतड फुलबाज्या वाजत राहिल्या. ज्यांच्या ठिणग्या अध्येमध्ये बावळयावर देखील पडत राहिल्या.

आतीश आल्यावर बहीण-भावामध्ये पुन्हा दोन्ही बाजूंची-कुटुंबियांची ख्यालीखुशाली दिली-घेतली गेली. तो नाकीडोळी नीटस छान बांधेसूद तिशीचा तरुण होता. गबाळया मामलीसाठी त्याने इतकी यातायात का करावी? हे कोडेच होते. प्रेम नेहमीच कोड्यात असते. त्याचे हिशोब नी नियम मांडता येत नाहीत. बावळयाच्या चोरगुरुंनाहि हे कोडे उकलले नव्हते. बावळयाने

सुस्कारा टाकला. लाकी मग आतीशला घेऊन पालात शिरली. मागोमाग न राहवून मामली आणि बावळ्या सुद्धा लगोलग. दोन देखण्या तरुण माणसांचा काय बुवा भरवसा?

तिला बावळ्या भेटल्यापासूनची सगळी कर्मकहाणी लाकीने आतीशला ऐकवली. आबालचे नाव न घेता, एक म्हातारा अज्ञातवासी शास्त्रज्ञ एवढंच तिथे मोघम सांगितले. आतीश उत्तेजित झाला. "मंज ती यंत्र पाहिंग हविंग." त्याने हातावर हात चोळले. "ती उघडिंग त्यामधील यंत्रणा तपासिंग हविंग. आमी ती यंत्रणा आमांज नियंत्रणात आणिंग. तू कल्पना करिंग की जर बंडबागींज हाती ती घातयंत्रं होईंग, तर ते लढाई कितीईंग सहज जिंकिंग."

"नी मंग बंडबागीच सवताहाच महामहीम बनिंग. एक जाईंग नी त्यांज जागी दुंजा येईंग. या परीस काईंग वेगळं साधिंग न." लाकीने तोंड वेंगाडले. "इतिहास सांगिंग की सगळे बंडखोर तंस्सा आडमार्ग साधिंग जाईंग, नी त्यांज बंड फसिंग."

"आमांज इतिहास आमी वेगळा घडविंग. मंज खात्री असिंग." आतीश ठणकावत बोलला. "त्या पूर्वसुरींज चूक आमी करिंग न."

"तू त्यांज सारखाच विचार करिंग. ती चूक हिच असिंग." लाकी दणदणली.

"जर सगळी माणसं तुंज सारखी विचार करिंग, तर त्यांज पुढची चाल प्रगती कंधी होईंगच न. डबक्यातल्या बेडकांपरीस जगिंग. एक दिस डबक्यांज पाणी आटिंग नी मरिंग जाईंग." आतीश कावला. "तुंज माहीतिंग काईंग की ही पृथ्वी कायम राहिंग न? तेहवा माणसं काईंग करिंग? माणसांनी अंतराळात जाईंगच होईंग. संगणककाळांज माणसानं तेहवा ते साधिंग होईंग. खरेईंग म्हणहजे आमी आज इंथ न असिंग होईंग. चंद्रावर नी मंगळावर वसती करिंग होईंग."

"मंज चंद्र नी मंगळ हविंग न. इंथ रान हविंग." मामलीच्या या मल्लिनाथीकडे आतीशमधल्या शास्त्रज्ञाने दुर्लक्ष केले.

आतीशने आपले बोलणे दामटले. "थोड्या नाडचुक्या शास्त्रज्ञांज कारणिंग ती घातयंत्रं तेहवा खलनायक होईंग. पण त्या नाडचुक्यांज चूक कारणिंग, आमी संगणकांज काईंग घात समजिंग? यंत्राज काईंग नाकारिंग होईंग? ही माणसांज सर्वात मोठी चूक होईंग." तो चरफडला. "आमांज परत ती संगणन नी यंत्रप्रगती साधिंग ही संधी मिळिंग असिंग. ती दवडिंग न. ते सुवर्णा यंत्र-आगार माणसांज सुवर्णकाळ परत जागविंग."

"ती काईंग प्रगती होईंग?" लाकी फटफटली. "त्या यंत्रांज कारणिंग रोज जगण्यांज गोष्टींज वेग इतका वाढिंग की माणसांज

मनांज भोवळ होईंग. त्या अतिवेगानं जगण्यांज तणाव अती वाढिंग. त्यानं माणसं अती त्रासिंग जाईंग नी मरिंग होईंग. जर तो वेग अधिकाधिक जाईंग, तर त्या कारणिंगच माणूसजात संपिंग जाईंग. त्या वेगानं माणसांज शक्र नाशिंग. माणसांज उपजच संपिंग होईंग. माणूस चंद्रावर होईंग न. मंगळावर होईंग न. त्या काळापासून शंभर वर्षांनं आमी आज पृथ्वीवर जन्मिंगच होईंग न. आमी आधीच संपिंग होईंग. ही पृथ्वी संपिंग तर कैक कोटी वर्ष बाकी असिंग. तंस्स प्रगती काईंग हविंग? त्याला प्रगती काईंग म्हणिंग?" लाकीने ठासत डाव्या हाताच्या तळव्यावर उजवी मूठ आपटली.

आतीश काही पुढे बोलणार तो बाहेर गल्ला-कल्ला झाला. काय? ते बघायला मामली बाहेर गेली. ते तिच्या तांड्यातले दोन गुराखी तरुण होते. तिच्या अखत्यारितल्या दोन दुभत्या गायी गायब होत्या. शोधून सापडत नव्हत्या. आजच्या दुधाच्या पुरवठ्यात तूट पडली असती. मामली त्या शोधायला रानात गेली.

आतीशला मुद्दा मिळाला. "बघिंग. आज जर ती संगणन यंत्रणा असिंग होईंग, तर बापड्या मामलींज नी या लोकांज कितीईंग त्रास वाचिंग? तेहवा ते आकाशिक उपग्रह नी त्यांजयोगे हर एकांज अचूक माग ठेविंग, भारी दूरसंचार प्रणाली होईंग. त्या यंत्रणेंज मदतीनं चुटकीसरशी मामलींज गायी कुंठ होईंग? ते मामली बसल्या

जागी जाणिंग शकिंग होईंग. ती सगळी नाठाळ जनावरं आरामात ताब्यात ठेविंग जमिंग."

"मंज गायी नाठाळ असिंग न." मामली पालात प्रवेशत रुसफुसली. "ही विमला असिंग नी ही कमला. होईंग ना गं?" पालात तोंड घुसवलेल्या त्या दोन गायींच्या वशिंडांवर गाल लाडाने घासत, मामलीने ओळख करुन दिली. आतीशच्या चेहऱ्यावर त्या गायींप्रती जळफळाट स्पष्ट झळकला. गायींनी हंबरून त्यांना सलामी दिली.

"त्या जनावरांना घाण वास असिंग. तो तुंज अंगांज पण लागिंग." आतीशने तक्रार केली.

"मंज तो वास आवडिंग. तुला न आवडींग, तर आमी काईंग करिंग?" मामलीच्या या उत्तराने ती आतीशला कबूल का करत नाही? ही गाठ बावळ्या नी लाकीला उलगली. "लाकी काईंग तुला वाटिंग की यानं मंजसाठी प्रयोगशाळा नी संशोधन सोडिंग? न. बाई न. यांज तिंथ कोणाबरोबर पटिंग न. म्हणहून यानं सरकारेन संशोधन संस्था सोडिंग असिंग. विचारिंग त्यालाच."

"मंग? तिंथ कारभार असिंगच तंस्स." आतीशने आपल्या निर्णयाचे समर्थन केले. "ती मंज वरिष्ठ ताबेदारं नावापुरती पदानं वरची. त्यांना मंज अर्धी अक्कल सुद्धा होईंग न. मी काईंग नवीन

वेगळं करिंग जाईंग, तर ते मंज रोखिंग. पावलापावलावर मंज अडवणूक करिंग. त्यांना ज्यातून पैसं खाईंग मिळिंग, त्याच प्रकल्पांना मंजुरी होईंग. त्या कामाईंग माणसांनाच बढावा होईंग. मंज त्यांजपैकी एक होईंग इच्छा असिंग न. मी कंटाळिंग त्यांज राजकारणाईंग. तेहवा ती मंज काढिंग, त्या आधी मीच राजीनामा देईंग नी बाहेर पडिंग. देईंग टाळी?" त्याने पुढे केलेल्या हातावर लाकीने टाळी दिली.

"हा तर हुबहूब माझा मैतर साथीचा नमुना हाय. साथीनं बी राजीनामा दिला हाय. भारी पगाराच्या बड्या कमाई संघाच्या नोकरीचा. आनी ही मामली म्हनजे त्यागमूरती बाबाचा नमुना हाय." बावळ्याच्या तोंडातून पटकन उपमा निघाली.

लाकीने त्याच्यावर नापसंतीचा कटाक्ष टाकला. तिचे महत्वाचे बोलणे चालू असता, तिला असले विषयांतर आवडत नसे. तिची तिखट नजर टाळताना बावळ्याच्या लक्षात आले, की त्या पालांच्या गवती पट्ट्यांच्या जाळीच्या भोकातून झिरपणारा उजेड मध्येच उघडमीट होत होता. सगळ्यांना तोंडावर बोटाने उगीची खूण करून, तो चपळाईने पालाच्या बाहेर पडला. तिथे दडून ऐकणाऱ्या त्या मगाशी गल्ला करणाऱ्या गुराखी तरुणांना त्याने पकडले.

बाहेरची धरपकड ऐकून बाकी मंडळी बाहेर आली. आतीशने एका तरुणाला धरले. बावळ्याने दुसऱ्याला. मामली दोघांवर रागवली की तुम्ही आमचे बोलणे चोरुन का ऐकत होता? तरुणांना काही उत्तर देता येईना. लाकीला संशय झाला की हे रझाकारांचे खबरी तर नव्हेत? थोड्या पैशाच्या मोहापायी शेजाऱ्याचा घात करणारी, अशी कैक माणसे तिने बघितली होती. मामला फार गंभीर बनला. मामलीने लाकी आणि आतीशला खुणावले की तुम्ही तुमचे लवकर आटपा. ती त्या दोघांना घेऊन तांड्याच्या मुख्याकडे तक्रारीला गेली.

"इंथ आता जर काईंग ती संगणककाळात होईंग, तंस्स चारी दिशांज अहोरात्र नजर ठेविंग, गुप्तचित्रण यंत्रणा होईंग ना, तर ते चित्रण तपासिंग, एकाईंग चुटकीत आमाला त्या गुराख्यांज खराईंग हेतू कळिंग जाईंग." आतीश हळहळला.

"तुला त्या जुन्या जमान्यांज फाजील कौतुक असिंग. बावळ्या सांगिंग यांज, तुंज त्या काळात तेहवा खरेईंग काईंग होईंग ते." लाकी तुसडली.

बावळ्याने जरा डोके खाजवले. काय बोलायचे? पक्के केले आणि तो सुरु झाला. "आतीश तू त्या यंत्रांचा काय फायदा होतो हाय, तितकाच बघतो हाय. त्याचा तरास त्याच्या पटीनं लय जादा

होता की. तू म्हनतो तस्सं आमच्या काळात सगळयाभर दिसाचं चोवीस तास नजर ठेवनारं चलचित्रक होतं. रस्त्यात. चौकात. इमारतीत. मैदानात. बगिच्यात. तू म्हनशील त्या जागी. शेतात, तळयात, दर्यात बी नजर ठेवायला आकाशातलं ते लय उंचावरचं यानबिन होतं. तेच्याशिवाय सरकारला वाटलं, तर कोनाच्या बी घरात घुसून नजर राखनारं बिनमानसाचं भिंगरीवानी उडनारं यंत्र बी होतं. जिथं तिथं तुमच्यावर पाळत. तु◌ुमी जाल तिथं. जगाच्या कुठच्या बी कोन्यात जा. दूर पहाडात जा. दूर बेटावर जा. दूर वाळवंटात जा. तुमची सरकारी पाळतीतून सुटका नाय. नाय म्हंजे कशीच नाय. तुला तशी चालंल काय?"

"यांज वाईट काईंग? माणसांना सुरक्षा मिळिंग." आतीशने खांदे उडवले.

"तू मामलीचा मुका घेताना नी मिठित घेताना, तुला तुझ्यावर परक्या लोकांची नजर चालंल का? तुझा पैसाबुडवा यार उधार मागंल, तेवा तुझ्या खिशात नी खात्यात किती पैसं हाय, ते त्याला कळलंल चालंल का? तु मनाई हाय तरी दारु पिलंली, सरकारदार लाचखाऊना कळलंल चालंल का? तु जे जे काय करतो हाय, त्या त्या सगळ्याची नोंद सरकारदार हरामी माणसांकडं, मंग तुला हवं तसं नाचवायला नी नाडायला झालंली चालंल का?"

"इतकं काईंग होईंग न. तू अतिशयोक्ती करिंग असिंग." आतीशला पटेना.

"ते तस्संच होतं. माझ्यासारखी कायदा फाट्यावर मारनारी नी कुनाची फिकर मागं नसलंली मानसं सोडली, तर बाकी समदी मानसं त्यांची गुलाम होती. कायदा त्यांना हवा तसा सोयीचा फिरवू नी बदलू शकनाऱ्यांची. हर एकाच्या हर एक बोलावर नी हालचालीवर त्यांची नजर होती. जर त्यांनी हुकूम दिल्याबाहेर कुनी गेला, तर लगेच त्याला सरकारदारं उचलित." बावळ्याने आतीशला विचारात घेरले.

"तुला वाटलं आज इथं यावं. तू आला हाय. तुला वाटलं सरकारी काम सोडून द्यावं. तू दिलं हाय. तुला वाटलं आज तिथल्या लुच्च्या मानसांइरोधात बोलावं. तू बोलला हाय. तुला याचा जाब कोनाला द्यावा लागत नाय हाय. तुझी चवकशी लागली नाय हाय. इथलं जिणं अजून बी तसं मोकळंच हाय. पन तसं तेवा नाय होतं. समदं मन मारुन जपून सांभाळून करावं बोलावं लागत होतं. नाय तर बांबू होता मागं." बावळ्यानं घसरलेली जीभ चावली.

"मंज हा बावळ्या म्हणिंग ते पटिंग. इंथ हे रानातलं जिणं कितीईंग निवांत असिंग, आतीश? इंथ कितीईंग मनांज शांती असिंग?" मामली परतली होती आणि दारात उभी होती. "तुंज ते

मनांज खरेईंग दडविंग बोलिंग शहरी बोलचाल. ती शिष्टाचारी नी बढाईंग माणसं. त्यांज खोटं हसिंग. खोटं वागिंग. खोटं जग. शहरांज घाईगर्दी जिणं साधीसरळ माणसं कंस्स जगिंग शकिंग? मंज कंधी कळिंगच न. कंधी जमिंग न." आतीश बावळ्याशी वाद घालणार होता. पण मामलीने बावळ्याची बाजू उचलून धरल्यावर तो हतबल झाला. बाकी सगळ्या गोष्टी नी सगळे जग एका बाजूला. आणि प्रेमाचं माणूस दुसऱ्या बाजूला.

"ती माणसं काईंग कारणिंग आमांज बोल ऐकिंग?" शंकित लाकीने मामलीला विचारले.

"ती म्हणिंग की ती मंज पंचवाघांज बाबत सावध करिंग येईंग होईंग. आमांज काईंग बोल ऐकिंग होईंग न." मामलीला यात काही मोठसं वाटत नव्हतं. ती एक सरळ मनाची तरुणी होती. तिच्यासाठी जग सरळच होतं.

"हे पंचवाघ काईंग असिंग?" लाकी चकित झाली.

"काय पाच वाघांची टोळी हाय काय?" बावळ्याच्या या कयासाला बाकी तिघं खो खो हसली.

आतीश हसणं आवरत म्हणाला, "या आदिवासी लोकांज एक भाकडकथा. पाच प्राण्यांज संकर होईंग बनिंग अंस्सा भयानक प्राणी. जो लोकांज पाळीव जनावरांज पळविंग नी खाईंग. गं

मामली! तुंज विमला नी कमलाला राखिंग हो. त्यांज चव बरी होईंग."

"संकर तुंज भाकडकथा वाटिंग होईंग. तर मंज काईंग सांगिंग की तुंज लाडक्या संगणककाळात, ऐंशी शेर दूध देईंग अंस्स संकर गाय होईंग म्हणहून? गायीला ऐंशी शेर रक्त तरी होईंग काईंग?" मामलीने आतीशच्या चिडवण्याला टोल्यास टोला दिला.

"मी कुंठ तंस्स म्हणिंग? मंज वरिष्ठ संशोधक शास्त्रज्ञ तो बेहरम म्हणिंग ते सांगिंग होईंग." आतीशने अंगाला लावून घेतले नाही. "आज सकाळीच त्याला भेटिंग असिंग. लाकी तुंज जोडीदार साथी क्रमांक तेहवीस सुद्धा मंज तिंथ भेटिंग. साथी तुंज चौकशी करिंग होईंग. तू कुंठ असिंग? म्हणहून."

"तू काईंग सांगिंग?" लाकीचे डोळे संशयाने बारीक झाले.

"मंज काईंग माहीत की तू इंथ भेटिंग? सांगिंग की मंज माहीतिंग न." आतीशने बेफिकीर उत्तर दिले. "त्यांज बेहरम संग काईंग काम? काईंग माहीत. मंज विचारिंग की निकामिक कुंठ मिळिंग शकिंग?"

"तू सांगिग?" लाकी त्याच्यावर उसळली.

"सांगिंग तर. तुंज माणसांज नाईंग कंस्स म्हणिंग?" आतीशला वाटले की ती मदत न केल्याचा जाब मागतेय. "जीवदानी डोंगरात

महान युगनायकांज लेण्यात त्याला जाईंग सांगिंग." लाकी छाती दडपून बसती झाली. "तुला काईंग घोर लागिंग?" त्याला नवल झाले.

"तो साथी तेहवीस खरंच काईंग सरकारेन हस्तक असिंग?" तिने जणू स्वतःलाच विचारले. "त्याला बेहरमानं खुली सूट कंस्स देईंग?" मग तिने स्वतःला सावरले. "वेळ न दवडिंग. ती घातयंत्रं नाशिंग, त्या यंत्रांज संगणकबुद्धी कंस्स भेदिंग मंज लवकर सांगिग."

आतीशने मामलीकडे पाहिले. 'सांग.' तिची त्याच्याशी भिडलेली नजर म्हणत होती. "तेहवा जुन्या काळात इतर माणसांज नियंत्रण करिंग सरकारेन माणसांज अपुरेपण होईंग. म्हणहून त्यांनी यंत्रांज बुद्धी देईंग. आधी इतर माणसांज गुप्तसंवादांज उकल करिंग, संगणकांज गुप्तसंकेत भेदांज बुद्धी देईंग. संगणकांना एकामेकांसंग जोडींग महाजाल तेहवा होईंग. संगणकांनी माणसांज नकळत सवताहाची गुप्तसंकेत भाषा बनविंग." आतीशने आवंढे घेतले. त्याला ती गोष्ट सांगायला जड जात होती की पचवायला न कळे.

"नी ते कोणी अतिहुशार माणूस कंधीच ओळखिंग न. व्वा!" लाकीने माणसांच्या अक्कलेला दाद दिली.

"शास्त्रज्ञांईंग पुढे माणसांज नियंत्रण साधिंग, माणसांज हाताळिंग कारणिंग, भावभावना समजिंग नी ओळखिंग अंस्स

कुटील बुद्धी संगणकांना देईंग होईंग." आतीश इथे एक उपहासिक हसू हसला. "मंग संगणकानं उलटिंग शास्त्रज्ञांजच कुटीलतेनं नियंत्रण करिंग होईंग. शास्त्रज्ञ माणसं होईंग ना?" यावर लाकी हसत सुटली. इतकी की तिच्या डोळ्यात पाणी आले.

"त्यापुढे माणसांज हाती संगणकांज महाजाल नी यंत्रांज नियंत्रण राहिंग न. संगणक बुद्धीनं सवताहांज वेगळी यंत्र बनविंग होईंग. त्यांजयोगे सवताहांज ऊर्जांज सोय करिंग घेईंग. ती माणसांजवर अवलंबिंग न. माणसं त्यांजवर अवलंबिंग. मंग गरज उरिंग न, म्हणहून यंत्रबुद्धीनं माणसांना संपविंग सुरु करिंग. शास्त्रज्ञांईंग ती हत्यासाधनं त्यांना आधीच देईंग ठेविंग होईंग."

"ती संगणकबुद्धी नाशिंग कंस्स ते सांगिंग. त्या यंत्रांज काईंग अंग खोलिंग? काईंग अंग तोडिंग?" लाकी उतावळी झाली. तिला तो सगळा तोडफोडवाला सोप्पा मामला वाटत होता.

"न. जर तू यंत्रांना चुकीनं हाताळिंग वा खोलिंग, तर त्यांज स्फोट होईंग. बेहरमांज चार सहाय्यक तरी त्या कामांज यत्नात मरिंग असिंग. पाचव्या वेळी मंज त्या कामाला नेमिंग नी मी तिंथहून पळ काढिंग." आतीश त्या आठवणींनी शहारला. "यंत्र नाशिंग एकच सुरक्षित मार्ग असिंग. महान युगनायकानं देईंग भेट. निकामिक."

"पण त्यासाठी यंत्र चालू करिंग होईंग ना?" लाकी संचित झाली. "निकामिक चालविंग त्याधीच ती यंत्र आमांज संपविंग तर?"

"न. तंस्स न होईंग. जीवदानींज ज्ञानवारस चुडामणी, सवताहा तुला प्रात्यक्षिक देईंग की यंत्र निकामिकानं कंस्स नाशिंग." आतीशने लाकीला आश्वस्त केले. "तेहवा त्या जुन्या काळांज माणसानं ही निकामिकं चालविंगच तर यंत्रनाश करिंग होईंग." बोलता बोलता तो हडबडला. "कुंठ जाईंग तू?"

"साथी क्रमांक तेहवीस त्या चुडामणीला गाठिंग, त्या आधी गाठिंगसाठी जीवदानी डोंगरावर." लाकी घाईघाईने उठली आणि बावळ्याचा हात धरून ओढत निघाली देखील. निरोपाची रित न निभावताच.

"तर मंग तुला जीवदानी न, मंज आत्येकडं मीठदांड्यांज जाईंग होईंग. सध्या जीवदानींज ज्ञानवारस वर्सल दौऱ्यावर असिंग. हा आठवडा त्यांज मुक्काम मीठदांड्यांज होईंग." आतीशने जरुरी खुलासा केला. "मी हे साथींज सांगिंग आधीच, तो अंस्सच घाईंग करिंग नी चालिंग पडिंग." हळहळला.

"साथीला हे सांगिंग न? तर मंग जाईंग आधी मंज तुंज मुकाच घेईंग होईंग." खुशालल्या लाकीच्या या निर्णयावर मामली आणि बावळ्या खूश झाले नाहीत नक्की.

# शंभर वर्षे पुढे - प्रकरण १९

मीठदांडा हे नावाप्रमाणे मिठाचे गाव होते. खाडीकिनारी वसलेल्या त्या गावात मिठाची आगरे होती. आतीशची आत्या अशाच एका आगराची मालकिण होती. मालमुंगाड्यांकडून उचलमदत घेत त्या गावी पोहोचण्यात, लाकी आणि बावळ्याची सगळी सकाळ कामी आली. त्या गावात लोकांची लाकडी दांड्या-काठ्यांची घरे होती. अंडा इमारती नव्हत्या. या काळातल्या केवळ सधन लोकांना त्या परवडत होत्या. हे बावळ्याच्या लक्षात आले होते. एकूण आतीशची आत्या गरिबांमध्ये मोडत होती.

आत्येने लाकीचे व त्याचे चांगले अगत्याने स्वागत केले. ती एक पन्नाशी उलटलेली बाई होती. अंगाने गोलमटोल ठेंगणी ठुसकी आणि प्रेमळ चेहऱ्याची दर्यादिल अशी. बावळ्याला ती आवडली. बहुत करून तिला देखील तो आवडला असावा. तिच्या घरात आणखी काही बाहेरची माणसे वावरत होती. त्यांची उस्तवार करता करता त्यात या दोघांची अजून भर पडली. याचा तिला अजिबात त्रागा वाटला नाही. ते आल्याचा आनंदच वाटला. तिला माणसांचा आणि गप्पांचा भारी सोस दिसत होता.

ती बाहेरची माणसे म्हणजे जीवदानीचा ज्ञानवारस आणि त्याचा सहाय्यकच होते. हे कळल्यावर लाकीचा चेहरा आनंदाने फुलून आला. "चूडामणी मीठदांड्यांज दरसाल मार्गशीर्ष महिन्यात शेवटांज आठवडा येईंग. त्याला या मीठमहाल प्रांतांज वर्सल बहाल असिंग ना." आत्येने माहिती पुरवली. "मंज घरात अर्धे लंबकदीप गेले कितीईंग महिने बंद पडिंग होईंग. त्यांज दुरुस्तींज आज जाईंग मुहूर्त मिळिंग नी चुडामणीला घरी बोलाविंग."

पडवीत लंबकदीपांशी खटपट करत बसलेल्या चुडामणीने हसून त्यांना अभिवादन केले. चुडामणीच्या डोक्यावर त्याच्या लांब करड्या केसांची त्याने गाठ बांधली होती. त्या गाठीत एक निळ्या रंगाचा दगड शोभत होता. बावळ्याला आश्चर्य झाले. "इतकं दिवस दिवे बंद ठेवन्यापरीस, मंग याला तेवाच आधी बोलवायचा की." या वर आत्या डोळे विस्फारून त्याच्याकडे नवलाने बघू लागली.

"आत्या जरा आत चलिंग. इंथ उन्हं डोळ्यांना त्रासिंग." म्हणत लाकीने तिला हाताला धरून ओढून चुडामणीच्या कानांच्या आवाक्यापलीकडे नेले. "हा बावळ्या शंभर वर्ष आधींज काळातून येईंग असिंग." लाकीने खुलासा केल्यावर आत्येचे डोळे आधीपेक्षा मोठे झाले. खोबण्यांतून बाहेर पडतील की काय? भीती झाली.

त्यापुढे लाकीने बावळ्या या काळात प्रगटण्यापासूनची सगळी कर्मकथा सांगणे क्रमप्राप्त होते.

लाकीने चुडामणीपाशी काय काम आहे? समजावल्यावर आत्या जरा संचित झाली. तो सुखासुखी माहिती देईल, असे तिला वाटेना. तरी तिने लाकीला धीर दिला. "मी बघिंग काईंग तरी कारणिंग त्याला सांगिग लाविंग." बावळ्यावर कटाक्ष टाकला. "हा तर चुडामणी समोर बोलिंग असिंग. तेहवा याला मुका म्हणहून आता सांगिंग येईंग न."

"काय की? समदं वाटभर तर ही बया मला मुका सांगून, जबरदस्तीनं तोंड बंद करुन आनते. आता घरात बी तोंड बंद करनार माझं?" बावळ्याने कट्टर निषेध नोंदला.

काही विचार करून आत्या म्हणाली, "यांज शंभर वर्ष आधींज काळांज संशोधक म्हणहून ओळख देईंग. म्हणहून तो जुनी भाषांज सराव करिंग होईंग. काईंग?" आपल्या युक्तीवर आपणच खूश होऊन आत्या खुसखुसली. तिने टाळीला हात पुढे केला. लाकीने हात आखडता घेतला. पण बावळ्याने आत्येला टाळी दिली.

तिघे बाहेर खुल्या पडवीत आली. म्हातारा चुडामणी आणि त्याचा तरुण सहाय्यक बादामी तन्मयतेने दुरुस्तीकामात व्यग्र होते. पारध्यांनी सावजांची जोडी हेरावी आणि त्यांना फासायला जाळं

लावण्यासाठी एकमेकांशी नजरांनी खाणाखुणा कराव्यात, तसं काही त्यांनी केले. तसं काही त्यांना वाटले. तसं काही ते बोलले. "ही मंज भाची असिंग नवर्तना नी हा तिंज ठरिंग नवरा बाहुला."

"बाहुला?" सावजांनी एकमेकांना विचारलं. ऐकलं ते बरोबर का?

"बरोबर. बाहुला." आत्याबाईंनी शाबासकी दिली.

"नवरा?" लाकीने विचारलं. ऐकलं ते बरोबर का?

"बरोबर. नवरा. मी शंभर वर्स आधीच्या गोस्टींचा नी भासा बोलायचा अभ्यास करतो हाय." बाहुलाने दात काढत त्यांना आव्हान केले. "काय तुमाला कळते हाय की नाय माझी भासा?"

"जरा अशुद्ध आहे. पण चालून जाईल आजच्या काळात." चुडामणीच्या नाकावर चुणी पडली. "आजकाल जुन्याची खरी जाण आहेच कोणाला?"

"अरं व्वा! तुमाला बी ही भाषा येते." बाहुला चकित नी खूश झाला.

"मंग? चुडामणी काईंग अंस्स तंस्स असिंग न. जीवदानी लेण्यांतल्या महान युगनायकांज साकार चित्रांचे ज्ञानवारस असिंग. गेल्याईंग शंभर वर्षांज इतिहास त्यांना ज्ञात असिंग. नी हा त्यांज उजवा हात असिंग. बादामी." आत्या.

"माझं तर भाग्यच उजळलं हाय की आज. अशा थोरा-मोठ्यांची गाठ पडली." बाहुला पुढे झाला आणि एकदम त्यांच्या पायावर पडला. ते दचकले. त्या दोघा कारगिरांच्या हातातली अवजारे गळून पडली. जमिनीवर घरंगळली. "मला कधीचं की नाय, महान युगनायकाची मायती पायजेल होती. पन कोनच काय धड सांगत नाय जी. आज मला एकदम लायकीची मानसं गावली. आता मी सोडनार नाय. अगं बाये! नुस्तं बघतेस काय? पाय धर गुरुजींचे. सोडू नको."

बावळ्या आधीच चुडामणीचे पाय धरून असल्याने, लाकीने दुसरा पर्याय बादामीच्या पायावर पडून घेतले. तिचा स्पर्श होताच बादामीच्या कानांच्या पाळ्या लाजेने लालीलाल झाल्या. "तू मंज गुरू होईंग. मंज निकामिक बनविंग ज्ञान देईंग. तोवर मी हे गुरूचरण सोडींग न." बादामी आणि चुडामणी बावरून एकमेकांकडे पाहू लागले. चालले आहे ते बरोबर काय?

"अगदी बरोबर." आत्येने दुजोरा दिला. "मुलांनो गुरूंज समोर झुकिंग न, तर त्यांज शिकवण कळिंग न." बावळ्या आणि लाकीने आधीच दोघांचेहि चरण अडवले असल्यामुळे, तिला जागा रिकामी नव्हती. तिने गुडघ्यांवर बैठक मारत हात जोडले. "हे महान

युगनायकांज पूज्य ज्ञानवारस, मंजवर कृपा करिंग नी मंज या मुलांज ही माहिती देईंग."

"आम्ही तुम्हाला हवी ती माहिती देतो. पण आधी आमचे पाय मोकळे सोडा." चुडामणी कावला. तसे लागलीच बावळ्या व लाकी त्यांच्या पायांपासून हटले. "पोरी तुला निकामिकांज ज्ञान काईंग हविंग होईंग? आज काळांज तरुणांना हा शब्द सुद्धा माहीतिंग न."

"मंज ठरिंग नवरा, हा बाहुला," लाकीने कृतककोपाने बावळ्यावर नजर टाकली. "सीमाक्षेत्रांज गावात राहिंग. तुमी जाणिंग की सीमापार देश आमांज शत्रू असिंग. ते अध्येमध्ये तिंथ हल्लाईंग करिंग. मंज भय होईंग की शत्रूनं जर घातयंत्रं वापरिंग तर?"

"तर त्यांना कठोरात कठोर दंड बाकी सगळी राष्ट्रे देईंग होईंग. ते राष्ट्र समूळ नाश होईंग." ज्ञानवृद्ध वयोवृद्ध तपोवृद्ध चुडामणीने शापवाणी उच्चारली.

"पण त्या आधी मी नी मंज हा बाहुला बळी जाईंग ना?" लाकीने युक्तीवाद पुढे रेटला. "मंज जीव वाचविंग निकामिक जरूरी होईंग."

"पोरी, मंज वर्सलक्षेत्र मीठमहाल प्रांत मर्यादीत असिंग. त्या बाहेर मंज परवाना असिंग न. जर मी तिंथ येईंग, तर तिंथ दीपचूल दुरूस्ती कारागीर मंज तक्रार करिंग. मंग मंज इंथ दुरूस्ती परवाना सुदहा रद्द होईंग. मंज रोजगार गमाविंग मी मंग कंस्स जगिंग? तूच सांगिंग की मी तुंज गाव येईंग निकामिक कंस्स बनविंग?"

"तिथं यायला कशाला हवं जी? इथंच बनवून द्या की?" बाहुल्याची बत्ती प्रकाशली.

"इथं?" चुडामणीच्या चेहऱ्यावर गोंधळ माजला. "तुझ्यापाशी निकामिक बाळगायचा सरकारी परवाना आहे का? बाहुला?" बावळ्या गप्प बसला.

"तुमी कुंठ शहरबाजारात विकिंग ठेविंग काईंग?" आत्येने दुसरा काही मार्ग निघतो का? चाचपणी केली.

"निकामिक कुठच्या कारखान्यामदी बनतं?" बावळ्याने आपली अक्कल पाजळली.

"निकामिक शहरबाजारी? की कारखान्यात? कारखाने शंभर वर्षांपूर्वीच्या काळात होते बरे बाहुला. आज तुला ते कुठून आठवले?" चूडामणीला हसू आवरेना. त्याच्या साथीला बादामी हसू लागला. "गेल्याईंग वीस वर्षात हे निकामिक नाव सुद्धा मंजपाशी कोण उच्चारिंग न. बेरहमानं तेहवा विचारिंग होईंग नी मी

त्याला मदत करिंग नाकारिंग होईंग. जर कोणाला हे माहितींगच न, तर त्यांज मागणी काईंग? मागणीच असिंग न, तर कोण शहरबाजारांज व्यापारी ते उगाच ठेविंग? दुकानात जागा अडविंग? तूच सांगिंग." आत्येला विचारले.

"आमी तुंज हविंग ती किंमत देईंग." लाकीला हे बोलताच बावळ्याने चोरून कडकडीत चिमटा काढला. तिने जोरात ऊईंग केले.

"तिला म्हनायचं हाय की......." बावळ्याला पटकन वेळ मारून न्यायला सुचेना. तो इथे तिथे पाहू लागला. चुडामणीच्या कपाळावरील आठ्या मात्र गडदल्या होत्या.

"की ही वेळ तुमांज सर्वांज हविंग ती मधुकंच्च देईंग होईंग असिंग." आत्याबाईंनी प्रसंगाचे भान राखत मध्येच हस्तक्षेप केला. "जाईंग गं नवर्तने पाकघरात. सगळ्यांज थाळ्या सजविंग आणिंग. बाहुल्याला थाळ्या आणिंग मदतिंग घेईंग." लाकी आणि बावळ्याला वाटेला लावले. फणकाऱ्याने बावळ्याला नजरेने जणू भोकं पाडत, लाकी उठून आतल्या खोलीत गेली. आत्येने नजरेने जा खुणावता मागोमाग बावळ्या गेला.

आत जाताच लाकीने त्याला करकचून चिमटा घेतला. त्याला मोठ्याने किंचाळायची देखील चोरी झाली. "माझ्या आई, तो

मानूस पैशाला बधनारा नाय हाय. उलटा चिडीला जाऊन आमाला काय बी मंग सांगायचाच नाय." तसा लाकीचा राग शांत झाला. "पन त्याचा तो चेला बादामी...." बावळ्याचे डोळे बारिक झाले. "तो तुझ्यावर लट्टू हाय. त्याला बाजूला काढला, तर तुझ्याखातर ते निकामिक बनवून बी देईल. ते बी फुकट."

"तो मंजवर मरतो. हे तुंज कंस्स काईंग माहीतिंग?" लाकीने नजर तिरपी लावली.

"जेवा जेवा बी तो हसतो, तेवा तेवा पैला आधी तो तुझ्याकडं बघतो. मानूस ज्याच्यावर मरतं ना, हसन्याआधी पैलं त्याला बघतो. तेची राजीखुशी पैली जानतो. काय?" बावळ्याने लाख मोलाचं गुपित उघडले. "पन त्याला बनवायला येत असंल काय ते निकामिक?"

"ते बोल बोलीत जाणिंग होईंग." लाकीने इरादा पक्का केला. " नी तू मध्ये गोंधळ घालिंग न. या काळात कोणाला जर घरात काईंग वस्तू हविंग, तर तो शहरबाजारी जाईंग न. तिंथ व्यापारीलोक दुकानात वस्तू विकिंग ठेविंग. पण त्या वस्तूंज किंमत खूप आकारिंग. दुप्पट. चौप्पट. गिऱ्हाईकाला जितकी तातडीनं वस्तू हविंग होईंग, तितकी किंमत चढी जाईंग. लोक सहसा आपल्या घरांज वस्तू, त्या बनविंग कारागीर जेहवा त्यांज गावात येईंग, तेहवा

बनविंग नी दुरूस्ती करिंग घेईंग. ज्यांस जंस्स हविंग, जंस्स परवडिंग, तंस्स तंस्स कारागीर गिऱ्हाईकांज घराकडेच बनविंग. हे कारागीर पावसांज चार महिने आपल्या आपल्या गावात राहिंग. बाकी महिने त्यांज ठरलेल्या गावांत वर्षांज ठरलेल्या दिसात दौरे काढिंग. त्याला वर्सल म्हणिंग. समजिंग?"

"हां! म्हंजी माझ्या गावात पूर्वी पाट्याला टाकी घालनारं, पिंजारी आनी अशी कुनी फिरतीवरची कारागीरं यायची. तस्सं. समजलं. समजलं." बावळ्याने नंदीबैलासारखी मान हलवली. तोपर्यंत लाकीने मुरंब्याच्या वासाचा मधुकंच्च पदार्थ पाच थाळ्यांमध्ये वाढला होता. त्या थाळ्या घेऊन ते पुन्हा चुडामणी आणि बादामीच्या सेवेत सादर झाले.

बाहेर पडवीत तोपर्यंत आत्येने बोलाचालीत सावजांना गुंतवून ठेवले होते. तिथे बादामीने एक मोठा भिंतभर कापडी पडदा उघडून लावलेला दिसत होता. त्या पडद्यावर तीन माणसांचे चित्र रेखाटलेले होते. त्यातला एक बाप्या पायघोडा चालवत होता. बाकी दोघं पायघोड्याच्या तिकाटी रिंगणावर चढलेले होते. त्यातली बाई बसून एक विचित्र पुंगीसारखे वाद्य फुंकत होती. त्या वाद्याला सहा नळ्या होत्या. तर पुरुष हातात एक विचित्र तीरकमान सज्ज धरुन उभा होता. तो तीर सर्पिल आकाराचा होता. हे असे

हत्यार शार्दुलसिंहाच्या चौकीवर बावळ्याच्या हाती लागले होते. ते नेमके कसे धरायचे? याचा उलगडा त्याला आता हे चित्र बघितल्यावर झाला. बावळ्या ज्याला बंदुकीचा चाप समजला होता, ती खरेतर त्या सर्पिल बाणाची आधारबैठक होती. आणि त्या धनुष्याची वादी एखाद्या ताणसुरळीसारखी दिसत होती. जी सरळ रेषेत ताणली न जाता वर्तुळाकारात ताणलेली होती. त्या तिघांचा पोषाख लाकीच्या काळातला होता.

"हेच ते तीन महान युगनायक असिंग." आत्येने लाकीला व बावळ्याला चित्राचा खुलासा केला. लगोलग लाकी हात जोडून त्या चित्रासमोर आदरार्थी झुकली. तिला बावळ्याला ढोसावे लागले. तेव्हा आपण झुकले पाहिजे. हे त्याच्या लक्षात येऊन तो झुकला. तश्या चुडामणीच्या चेहऱ्यावरच्या आठ्या जरा निवळल्या.

मग जास्तीचा भक्तिभाव दर्शवत, बावळ्याने त्या चित्रातील तिघांच्या पायांना स्पर्श करुन नमस्कार केला. आत्येच्या शेजारी फतकल मारून बसता झाला. लाकीला सुद्धा मग चित्रातील तिघांच्या पायांना स्पर्श करायचा सोपस्कार पार पाडावा लागला. आत्येच्या शेजारची जागा बावळ्याने अडवलेली असल्याने, तिला बादामीच्या शेजारात बसावे लागले. ती बसताना बादामी ज्या

तऱ्हेने तोंड फाकून तिच्याशी स्वागतपर हसला, त्याच्या मनातलं तिला उघड झालं.

"यांची नावं काय हाय?" बावळ्याने आपले अज्ञान उघड करताच, बाकी सगळ्यांच्या चेहऱ्यावर खळबळ माजली.

"मला आवडला बरे बाहुला, तुझा हा प्रामाणिकपणा." चुडामणीने खोल निश्वास टाकला. "ज्यांच्यामुळे आज आपले अस्तित्व टिकून आहे, त्यांची ओळख तुझी नवी पिढी पूर्णता विसरून गेली आहे. हा तुमचा दोष नव्हे बरे. आमच्या पिढीचाच आहे. जी तुम्हाला त्यांची जाण करून देण्यात अपयशी झाली आहे." बावळ्याकडे पाहत त्याने स्मित हास्य केले. "मी आनंदाने तुला यांची ओळख करुन देतो." चुडामणी सांगू लागला.

"पायरथ चालवत आहे, ते महान युगनायक रचनेश नावाने ओळखले जातात. तू शंभर वर्षे आधीच्या काळाचा अभ्यासक आहेस. तेव्हा जाणतोसच की त्या काळात हालचालींच्या केवळ सहा रचना माहीत होत्या. दातेरी चक्रांची, दोर नी कप्पीची, यारीची, तरफेची, दट्ट्या नी गोलदांड्याची, फिरकीच्या आट्यांची. माणसे इंधनावर चालणाऱ्या गतियंत्रांमध्ये नी विजेवर चालणाऱ्या फिरकीयंत्रामध्ये सुद्धा याच रचना वापरत. परिणामी तेव्हाची यंत्रे जडबंबाळ नी किचकट असत. रचनेशाने त्या सहा रचनांच्या

पलीकडच्या इतर रचना माणूसजातीला शिकवल्या. मुंगीमध्ये असते त्या हालचालींच्या तंत्राचा अभ्यास करुन मालमुंगाडी बनवली. पिसू तिच्या उंचीच्या एक्याऐंशीपट उंच उडी मारते. तिच्यावरून पिसूडी बनवली. भुंग्याच्या वजनाच्या मानाने त्याच्या पंखांचा आकार किती तरी लहान असतो. तरी तो उडतो. त्या भुंग्यावरून पायघोडे आणि पायरथ बनवले. पायघोड्याच्या तिकाट्र्यात तीन भुंग्यांच्या पंखांची फडफड होते. या काळातली तमाम वाहने आणि आम्हा कारागिरांची अवजारे, त्या महान रचनेशाच्या रचनांची देणगी आहेत." चुडामणीने चित्रातल्या रचनेशाला हात जोडले. तसे बाकी सगळ्यांनीहि जोडले.

"ही हातांमध्ये निकामिक घेऊन ते वाजवणारी आहे ती महान युगनायिका निअस्त्रा." निकामिकाच्या उल्लेखासरसे श्रोत्यांचे कान जास्त तल्लख झाले. "ती एक रबरी फुगा फुंकते आहे. त्यातून बाकी सहा नळ्यांमधून हवा सरसरत राहते नी त्या नळ्या वाजतात. त्या प्रत्येक नळीच्या आतले भोक शंखासारखे वेजवाले असते. त्यामुळे त्यातून फक्त एक ठराविक कंपनसंख्येची ध्वनिलहर वाजते. जेव्हा केव्हा या ठराविक सहा कंपनलहरी एकत्र वाजतात, सगळ्या अजैविक हालचाली बंद पडतात. सजीव जीवांच्या शारीरिक हालचाली मात्र चालू राहतात. निकामिक फुंकले की घातयंत्रांच्या हालचाली बंद पडून त्यांच्या आत बिघाड होई. ती स्फोट पावत.

माणसांचे जीव त्यांच्यापासून वाचत. जैविक हालचालीने चालते ते हत्यार म्हणजे शस्त्र. अजैविक हालचालीने चालते ते हत्यार म्हणजे अस्त्र. या महान निअस्त्राने माणूसजातीला दिलेल्या या अस्त्रहारक साधनामुळेच केवळ माणूसजात सर्वसंहारापासून बचावली. आज आमचे जे काही अस्तित्व आहे ते तिच्याचमुळे." चुडामणीने चित्रातल्या निअस्त्राला हात जोडले. सगळयांनी जोडले. बावळयाने स्वतः घातयंत्राचा मरणमारा भोगला असल्याने, त्याने या वेळी अगदी मनापासून हात जोडले.

"ते सहा कंपनलहरी काईंग असिंंग?" लाकीला ते कळायची आत्यंतिक गरज होती. "ते नळया कंस्स पदार्थांज बनिंग असिंग?"

"तुला ते निकामिक बनविंग होईंग कारणिंग, ते गुपित जाणिंग हविंग काईंग?" चुडामणीने अचूक ओळखले. लाकी ओशाळली. घाई केल्याने ती उघडी पडली होती.

"निकामिकांज वापरानं, लोकांज घरात नी कामात वापरिंग साधनं नी अवजारं, खोडसाळ मुलं बंद पाडिंग. म्हणहून सरकारेन आजकाल त्यांना विनापरवाना वापरिंग बंदी आणिंग असिंग." चुडामणी गालात हसला. "पण निकामिकांज माहीतिंग बंदी असिंग न. महान युगनायकांज आदेश असिंग की त्यांज ज्ञान हर एक माणसाला कायम खुलेईंग होईंग. ते ज्ञान कोणीहि कोणांसहि

नाकारिंग शकिंग न. ते ज्ञान नाशिंग न, ही आमा ज्ञानवारसांज जबाबदारी होईंग."

"हुं! त्यांना मायती होतं की, शंभर वर्सांनंतर त्यांच्या पुजाऱ्यांना आमी मायती इचारनार हाय म्हनून जी." बावळ्याच्या या विनोदावर सगळ्यांनाच हसू आले. लाकीची पटकन हसण्याआधी नजर बावळ्यावर गेली. याचा अर्थ काय होतो, लक्षात येऊन तिने घाईघाईने ती फेरली. त्याची नजर मात्र तिच्यावर आली नव्हती. हे लक्षात येता, पुन्हा परतून तिची नजर त्याच्यावर गेली. लाकीला कळेना की यामुळे ती का खंतावली? त्याची नजर बादामीवर लागली होती. आपल्या विनोदावर सगळे हसणार हे जाणूनबुजून त्याने विनोद केला होता.

"बरे हो बाहुला. तुझ्यासाठीच महान युगनायकांनी हा आदेश देवून ठेवलेला." चुडामणीने बावळ्याची भलावण केली. मग लाकीकडे वळले. "त्या नळया कोणत्याही पदार्थांच्या बनवू शकता. नळीची एकूण लांबी, पोकळिचा व्यास आणि हवा नळीबाहेर फेकणाऱ्या भोकाची नळीच्या लांबीवरील नेमकी जागा, यावरून त्या त्या नळीच्या लहरीची कंपनसंख्या ठरते."

"ते सहा कंपनसंख्या कोणते असिंग?" लाकी पुन्हा अधीरली.

"ते कोणालाच ठाविंग न." चुडामणीच्या अश्या उत्तराची अपेक्षा लाकीने केलेली नव्हती. "निकामिक काईंग कारणिंग नी कंस्स काम करिंग? ते कोणंच जाणिंग न. पण ते काम करिंग. आमी निकामिक बनविंग कामात हेच चित्र उपयोगात आणिंग असिंग. हे नीट बघिंग. हे पूर्णाकृती नी वास्तव आकारांज चित्र असिंग. जीवदानी डोंगरलेण्यात असिंग त्या चित्रांज हे प्रत असिंग. यात दाखविंग त्या नळयांज तंश्श्याच तंश्श्या आकाराबरहुकूम आकारवाल्या नळया नी त्यांजवरील भोकं, आमी तयार करिंग असिंग. मंग फुग्याला जोडिंग असिंग."

"पन अस्सं अदमासानं बनवलेलं निकामिक काम करतं हाय, याची मंग खात्री काय?" बावळयाने मध्ये तोंड उघडले.

"काही खात्री नाही. गेल्या कितीतरी दशकांमध्ये कोणावर घातयंत्रांचा सामना करण्याची वेळ आलेलीच नाही. आजच्या काळात तयार केलेल्या निकामिकांचा कस लागलेला नाही." चुडामणीने हात वर उडवले. "महान युगनायकांवरती अतूट विश्वास हीच निकामिकाची खरी खात्री."

"आमी आत्येंज लंबकदीपावर निकामिक चालविंग खात्री करिंग शकिंग." लाकीने सुचविले. "तुंजपाशी ते असिंग काईंग?"

"निकामिक म्हणहजे काईंग खेळ असिंग न. शेजारपाजारी लोक काईंग जरूरी कामात अवजारे वापरिंग होईंग, तर त्यांज नाहक त्रास होईंग." चुडामणी चिडला.

"या माहितीवर मी सवताहा मंज निकामिक बनविंग काईंग?" लाकीने चुडामणीचा अंत पाहिला.

"तुंज परवानगी असिंग काईंग?" चुडामणीचा आवाज चढला. "तुंज जबाबदारिंज काईंग भान असिंग न. मी तुंज निकामिक कंधीहि देईंग न." लाकी याउप्पर वाद घालणार, तो बावळ्याने नजर लाकीवर टोचली. तिला नजरेने दाबले आणि बादामीकडे खुणावले. बादामीची नजर त्याच्या स्वतःच्याहि नकळत लाकीवर खिळून राहिलेली. त्याला बापड्याला कुठे माहीत होते की हे शिकाऱ्यांचे जाळे होते. तिने समजून सावजावर नजरेचा तीर फेकला. तसा बादामीचा कोमेजलेला चेहरा फुलला.

"ज्ञानवारसजी मला या तिसऱ्या महान युगनायकाचं सांगा की." बावळ्याने तो विषय बदलला. तसे चुडामणी सरसावले.

"पाणी हा पृथ्वीवरचा सगळ्यात अलौकिक पदार्थ आहे. आणि या पाण्याचे गुणधर्म सुद्धा. बर्फ बनला की दुसरा कुठला पदार्थ विस्फारतो? पाणी असं का वागतं? कोणाला सांगता येत नाही. पाण्याचे अजून किती अज्ञात गुणधर्म आहेत? ते एका या

जलज्ञ नावाच्या महान युगनायकालाच माहीत." चुडामणीने जवळ ठेवलेला पाण्याचा गडू उचलला. डोळ्यांसमोर घेऊन निरखला. जणू ते गुण शोधले. परत जागी ठेवून दिला. "आता मी दुरूस्त करत असलेला हा लंबकदीप पाहा. लंबकाच्या हालचालीने सतत थोड्या थोड्या वेळाने, पाण्याचा एक एक थेंब यात वरुन खालती टपकत राहतो. तो टपकतानाच त्याच्यावर अति उच्चकंपनाची आवाजाची लहर आपटायची सोय या दीपात केलेली आहे. तसं झालं की तो पाण्याचा थेंब प्रकाश फेकतो."

"पानी प्रकाश देतं?" बावळ्याचा विश्वास बसेना. ऐकलं ते खरं का?

"बरोबर. पाणी प्रकाशतं बाहुला." चुडामणीने नवलाचे उट्टे वसूल केले. "मीनाबाई, मागेच तुला मी सांगिंग होईंग की लंबकदीपांज पाणी चार चार दिसानं बदलिंग होईंग. नाईंग तर ते काम देईंग न."

"मंज आता वय होईंग ना? विसरिंग जाईंग." आत्येने कबुली दिली. "बरं काईंग बाहुला, पाणी चुलींज आग सुद्धा होईंग. तुला ज्ञानवारसजी सांगिंग. ते ऐकिंग. नवर्तने स्वैपाकांज चूल आणिंग. जाईंग." तिने लाकीला कामाला लावले आणि परस्पर चुडामणीला

भरीला घातले. बावळ्याने डोळे विस्फारुन त्याच्याकडे उत्कंठतेने पाहिले.

"अस्सं वाटतं की तू शंभर वर्षाआधीच्या काळाचा अभ्यासक नसून, जणू त्या काळातलाच आहेस." चुडामणी खोचकपणे बोलला. "तुझे उच्चार किती वेगळया तऱ्हेचे आहेत. पुराण संग्रहालयातल्या जुन्या आवाजांच्या तबकड्यांतल्यासारखे हुबेहूब."

"मंज जरा शौचकूप दाखविंग." स्वैपाकघराकडे निघालेल्या लाकी मागोमाग जायला बादामी सुद्धा उठला. बावळ्याला बादामी अजिबात संकोचला नाही याचे नवल वाटले. तो अद्याप तिला तसे सांगायला लाजायचा. ती याबाबतीत कधीच नाही. नवा काळ, नव्या रिती. तिची आणि बावळ्याची नजरानजर झाली. सावज आपणहून होऱ्यात आले होते. तिने डोळे मिचकावले.

"बाहुला तुला माहीत आहे का? पाणी कशाचे बनते?" चुडामणीच्या प्रश्नावर बावळ्याची स्वैपाकघरात गेलेल्यांच्या पाठलागावर गेलेली नजर परतून बैठकितल्यांवर आली. त्याने मानेनेच नकार दिला. "तुलाच काय? आजपर्यंत हे गूढ कोणालाच उकलले नाही." बावळ्याला हे ऐकून जरा बरे वाटले. "प्राणवायू नी उदानवायूच्या एकत्र ज्वलनसंयोगातून पाणी बनले पाहिजे.

आजपावतो अनेक प्रयोगशाळांमधून तसे बनवायचा प्रयत्न झाला. कारण पाणी अपघटीत केले की तेच दोन वायू मिळतात. कोणाला कधी पाणी बनवता आलेले नाही. पण ही मूर्ख माणसे आज इंधन म्हणून पृथ्वीवरचे पाणी नष्ट करत आहेत. पाण्यापासून ते दोन वायू वेगळे करायचे. चुलीच्या तिवईखाली परत एकत्र आणले की ते जळतात. त्या जळण्याच्या उष्णतेवर अन्न शिजते. महान युगनायक जलज्ञानं ते दोन वायू चुलीला केवळ चावी मारुन, वेगळे करायचं तंत्र आम्हाला दिले आहे. सळकाई हालचालीमुळे दोन वायूत फाटायचा पाण्याचा आणखी एक अलौकीक गुण."

चुडामणीने आता स्वैपाकघराच्या दिशेने नजर लावली. प्रात्यक्षिकासाठी चुलीची गरज होती. चूल आणायला लाकीला आणि शौचकूपातून परतायला बादामीला जरुरीपेक्षा जास्त वेळ लागत होता. "ज्ञानवारसजी पाणी उपयोगिंग दूरसंवाद साधन कंस्स काम करिंग? ते सुद्धा बाहुल्यांज सांगिंग ना." आत्येने चुडामणीला गुंतवून ठेवायला विनंती केली.

"पाणी बोलिंग." चुडामणी एक डोळा अस्वस्थपणे घरात आणि एक डोळा बैठकीत लावून सांगू लागले. "दूरसंवाद साधनात पाण्यांज पृष्ठभागांज उपयोग आवाज निर्माण करिंग नी ग्रहण करिंग पडदा म्हणहून होईंग." बावळयाला उलगडा झाला की दानिशची

आणि शार्दुलसिंहाची ती दूरसंवाद साधने हाताळताना, केवढा घोटाळा त्याने त्यातले पाणी सांडून केला होता. "तांब्यांज तार पाण्यात बुडविंग. जर पाण्यात खार मिसळिंग, तर ती तार तिंथ सगळे विद्युतकंप ग्रहण करिंग नी पाणी त्यांज अनुसरिंग ध्वनिकंप निर्माणिंग. जर पाण्यात आंबट आम्ल मिसळिंग, तर तिंथ ध्वनिकंप पाणी विद्युतकंपात रुपांतरित करिंग. ते तारेत जाईंग. हे पाण्यांज खास गुण असिंग. जलज्ञांज दूरसंवादसाधनात वातावरणातील सगळया विद्युतकंपांज पैकी हविंग त्या ठराविक पल्ल्यांज वेगळे वेचिंग नी ते पाण्यात मिसळिंग. मंग पाणी जे हलके ध्वनिकंप बोलिंग, ते माणूस ऐकिंग शकिंग इतकंईंग वर्धित करिंग असिंग." त्यासाठी लागणारे तंत्र बावळयाच्या शंकांमागून शंकांना खुलासेवार सांगून झाले, तसा चुडामणी साशंक झाला. "बादामींज नी नवर्तनांज इतका वेळ काईंग होईंग?"

"बापडी नवर्तना!" आत्येने मोठे हुश्श केले. "ज्ञानवारसजी, तुंजपासून काईंग लपविंग? तुमी या घरतल्यासारखेच. सहा-सात वर्ष होईंग त्या घटनेला आता. या घरात बंडबागींज बैठक होईंग तेहवा. नवर्तना विद्यापीठांज सुट्टीवर इंथ मंजपाशी होईंग. तेहवा तिंज मातापित्यांज मोकळी चर्चा होईंग. ती सुदहा ऐकिंग होईंग, अंस्स त्या बैठकीत बाकी कोणांज लक्षात येईंग न."

चुडामणीला नवर्तनेचे काय झालेले वा होणार होते, त्याची फारशी तमा नव्हती. "मी जाईंग नी बघिंग की बादामी कुंठ हरविंग?"

आत्येने ओळखले की ही वेळ फुरसदीत दवडण्याची नव्हती. तिने गुप्तस्फोट केला. "तिंज मातापित्यांज खून घातयंत्रांज माऱ्यानं होईंग. आजपासून वीस वर्षआधी. सरकारेन शास्त्रज्ञानं, बेरहमानानं करिंग."

"बेरहमानानं?" ते नाव कानात शिरताच चुडामणी सटपटला. ऐकलं ते खरं का?

"बरोबर." आत्या पुढे सुरू झाली. "आमी सगळ्या नातातल्यानं नी हितैषीनं तिंजपासून ती गोष्ट दडविंग होईंग. तिंज मनावर परिणाम होईंग न कारणिंग. तिंज बालपण सुडात होरपळिंग न कारणिंग. पण तेहवा त्या बैठकीत तिंज ते कळिंग नी ती आमांज सगळ्यांज दोष लाविंग. म्हणिंग की आमी सगळ्यानं तिंज फसवणूक करिंग. आमांज सगळ्यांज विश्वास त्याउप्पर करिंग न. सुडानं पेटिंग नी बंडबागी जाईंग. आता तिंज आयुष्यात सुख असिंग न." आत्या बावळ्याकडे वळली. "बाहुला मंज दिसिंग की ती तुंज मात्र विश्वास धरिंग असिंग. तिंज समजिंग घेईंग. ती रागानं काईंग

बोलिंग नी वागिंग, तरी तिंज माफ करिंग. तिंज विश्वास कंधी तोडिंग न. मंज वचन देईंग." आत्येने हात पुढे केला. बावळ्या बिथरला.

"वीस वर्ष आधी तेहवा बेरहम नी त्यांज सहाय्यकानं, मंजपाशी असिंग ती सगळी निकामिकं नाशिंग मागणी करिंग होईंग. मी मानिंग न. मंज धमकाविंग. लालूच देईंग होईंग. तरी मी मानिंग न. मंग एक तरुण जोडं निकामिक मागिंग येईंग. सांगिंग की त्यांज घातयंत्रं सापडिंग होईंग नी ती नाशिंग कारणिंग हविंग होईंग. मंज त्यांज विश्वास होईंग न. वाटिंग की ती बेरहमांज काईंग चाल होईंग. अरे रे रे!" चुडामणी डोके बडवून घेऊ लागला. "ती माणसं खरीईंग होईंग. मंज मुर्खांज कारणिंग त्यांज जीव जाईंग."

"नी नवर्तना पोरकी होईंग. तिंज बाकी आयुष्य सुदहा करपिंग." आत्येने तोफ डागली. "तीच चूक तू पुन्हा करिंग जाईंग ज्ञानवारसजी. तू मंज कितीईंग वर्ष ओळखिंग असिंग? मी तुला खोटं सांगिंग न. तिला घातयंत्रं सापडिंग असिंग. ती यंत्रं बेरहमांज मिळिंग आधी नाशिंग होईंग."

"मी तिला निकामिक देईंग." चुडामणी कबूल झाला. तोच उतरलेल्या चेहऱ्याने लाकी आणि बादामी परतले. तिच्या हातात आत्येची चूल होती. "तुमांज कपडे काईंग कारणिंग फाटिंग?" चुडामणीने त्रासत त्यांना विचारले.

आधी दोघे काही बोलेनात. मग बादामीने आरोपांची राळ लाकीवर उडवून दिली. "तुंज निकामिक चोरींग नी तिंज देईंग ती सांगिंग. बदल्यात मंज रतीसंग देईंग सौदा करिंग इच्छिंग. मी नाकारिंग. तर मंजवर जोरजबरदस्तींज आळ घालिंग म्हणहून धमकाविंग. मंज नी सवताहांज कपडे त्या कारणिंग फाडिंग असिंग."

"तू यावर काईंग म्हणिंग पोरी?" चुडामणीने लाकीला शांतपणे विचारले. ती मुग्ध राहिली. म्हातारा बराच वेळ तिला निरखत राहिला. आत्या काही बोलू जाणार तो कोपर ढोसून बावळ्याने तिला रोखले. लाकी बावळ्याकडे मदतीच्या अपेक्षेने पाहू लागली. त्याने डोळे मिचकावले.

"बादामी, गड्या तुझं जांघेतलं कापड काय बुवा ठिपकून वलं झालं? तिनं तुझ्यावर जबरदस्ती केली आनी तितक्यानंच तुझा मदन उमाळला काय?" बावळ्या खवचट हासला. "मर्दा नुस्ता बाईचा हात लागला, तर तुझी ही तऱ्हा होते. तर बायको तुला पहिल्या रातीतच सोडून जाईल की रं?"

"तिनं मजवर चुलींज पाणी सांडिंग." बादामीने रागाने स्पष्टीकरण केले.

"सवतावर एक बी थेंब पडू न देता?" बावळ्याने नवल केले. "आनी ते बी कशापायी?"

"ते तिंज काईंग ते ठाविंग. मंज काईंग?" बादामी मोठ्याने ओरडून बोलला.

"खरं सांगनाऱ्याला वरडावं लागत नाय." बावळ्याने त्याला अजून ताणला. "मानसाला खोटं आरडावं लागतं. काय? तू सांगतो त्याच्या उलटं नाय ना घडलं? जबरदस्ती तू केली, आनी आळ घालायची धमकी देवून तिला गप केली?"

"तू तिंज यार. म्हणहून तिंज बाजूनं बोलिंग." बादामी मुद्दाम आवाजाची पातळी खूप खाली राखत बोलला. "खरंईंग अंस्स चवचाल बायको करिंग परीस तू तिंज सोडिंग होईंग. बायकांज या जगात कमी असिंग न." बादामीच्या चेहऱ्यावरच्या रेषा विकृत झालेल्या.

"कंधीच नाय. माझा तिच्यावर पुरा इश्वास हाय." बावळ्याला जे साधायचे होते ते साधून झालेले.

"तर मंज गुरूज विश्वास मंजवर असिंग." बादामी अर्ध्या खात्रीने बोलला. कारण गुरूचा चेहरा आता तसे सांगत नव्हता.

चुडामणीने लाकीकडे पाहिले. लाकी महान युगनायकांच्या चित्राकडे ताठ मानेने पाहत राहिलेली. आळीपाळीने चित्राकडे व

तिच्याकडे पाहत राहिला. अखेर त्याने निर्णय केला. "पोरी तुला इतकंईंग टोकांज जाईंग गरज होईंग न. तुला निकामिक हविंग? हे घेईंग." त्याने आपल्या पोतडीत हात घातला.

"पण गुरूजी?" बादामी प्रचंड चिडीला आला. "तिला शिक्षा देईंग. तर बदली तू तिंज बक्षीस देईंग?"

"बक्षीस? न." चुडामणीच्या पुढच्या वाक्याने सगळेच चकित झाले. "मी तिंज वस्तू तिंज परत करींग असिंग."

## शंभर वर्षे पुढे - प्रकरण २०

समुद्राच्या लाटांची हलकीशी गाज कानांवर येत होती. ताडाची पाने वाऱ्यावर फडफडत होती. चढलेल्या उन्हाच्या रखरखाटात त्यांची तुटपुंजी सावली मिळत होती. तश्या एका झाडाखाली खाडीच्या खडकाळ किनारी बावळ्या आणि लाकीची जोडगोळी बसून होती. पलीकडे नेणारी पायहोडी तिथून या किनारी कधी परततेय याची वाट बघत. इतर काही स्थानिक माणसे सुद्धा त्यासाठी थांबलेली होती. बावळ्या आणि लाकी त्यांच्यापासून लांब वेगळे हलक्या आवाजात आपापसात कुजबुजत होते.

"हाकंच्या अंतरावर तर हाय की तो किनारा." बावळ्या कुरकुरला. "इथं एक पूल बांधला असता, तर अस्सं फुकट बसून वेळ दवडायला लागता नाय."

"आमांज काळात दगडी पूल, बोगदे, रस्ते अंस्स काईंग असिंग न." लाकीने नाक उडवले.

"नाय कशाला?" बावळ्याचा तक्रारीचा सूर कायम राहिला.

"मंज ठाविंग न. महान युगनायकानं तंस्स सांगिंग असिंग." लाकीने म्हटले.

तसे बावळ्याने हात गरागरा फिरवले. "काय उत्तर नसलं म्हनजे हे ठरललंच हाय. महान युगनायक नी महान युगनायक. त्या समोरच्या धनाळा बेटावर कशाला जायचं हाय? त्याचं तरी उत्तर हाय का?"

"मंज मावशींज नवरा पुराणवस्तूंज शौकीन असिंग. त्यांज संग्रहात तुंज काळांज वस्तू नी यंत्र असिंग. त्या यंत्रांवर मंज निकामिकांज प्रयोग करिंग, खात्रीईंग हविंग की हे निकामिक काम देईंग. न परीस ती घातयंत्रं आमांज नाशिंग." लाकीने स्पष्टीकरण दिले. त्याने बावळ्याचे समाधान झाले नाही.

"तिथं मीठदांड्याला तर ते निकामिक काय कामाचं दिसलं नाय. ना तो आत्येचा दिवा, ना ती चूल त्यानं बंद पाडली." बावळ्या चुकचुकला. "मला हे निकामिक काय खऱ्याचं दिसत नाय हाय."

"ती चूल नी दिवा आमी हातानं चालविंग. मंज वाटिंग की ती जैविक हालचाल होईंग. म्हणहून निकामिक काम देईंग असिंग न." लाकीच्या मनात खळबळ माजली होती.

"तू सवताला खुळी आशा दाखवते हाय." बावळ्याने तिला खोडून काढू पाहिले. "तो ग्यानवारस तर म्हनला होता की पोरं समद्या लोकांची अवजारं निकामिकानं खेळ म्हनून बंद पाडत."

"तू आता मंज डोकं खाईंग न." लाकीची चिडचिड झाली. "यत्न करिंग तर बघिंगच होईंग. कदाच मावश्यांज संग्रहात एखादं जुन्या काळांज निकामिक होईंग." यावर बावळ्या वैतागून पाण्यात खडे टाकत बसला.

"इथं इतकं बिल्लं कुनी टाकलं हाय?" त्या खड्यांच्या जोडीला तिथे अनेक अभ्रकाचे बिल्ले पडलेले होते. बावळ्याने त्यात शोधाशोध केली. "ऑ! एक बी आख्खा मिळंना की?"

"ते तुटिंग नी फुटिंग. म्हणहून लोकानं टाकिंग असिंग. नाईंग तर लोकं पैसं अंस्स टाकिंग?" लाकीला हे विषयांतर मानवलं.

"हे बिल्लं म्हनजे पैसं?" बावळ्या ओंजळीत ते घेऊन हसायला लागला. "दर्याच्या किनारी असलं किती तरी फुकट पडलेलं असतं. आमी हेच जमा करुया आनी मालामाल होऊया."

"होईंग." लाकीने स्मित केले. "मंज मावशींज नवऱ्यांज हा धंदा असिंग. त्यांज लोक हे बिल्ले या धनाळा बेटावर गोळा करिंग. मावसा ते दूर दूर जाईंग विकिंग. समुद्रापासून जितकं दूर जाईंग तितके बदली जादा पैसै मिळिंग. एका बिल्ल्याबदली एकच लोहाणा ते सह्याद्रीपार पन्नास लोहाणा सुद्धा मिळिंग."

"लोहाना म्हनजे ते लोखंडाचं नानं? तू मालमुंगाड्याला देते ते?" बावळ्याला माहिती हवी झाली.

"होय." लाकी त्याला चलनव्यवस्था समजावून देऊ लागली. "शंभर लोहआण्यांज बदली एक तांब्यांज पैसा. शंभर तांबा पैशांबदली एक चांदींज रुप्पी. शंभर रुप्पींच्या बदली एक सोन्यांज नाणं होन."

"सरकार नोटा छापत नाय काय? हलकी असतात ना ती. हजारातलं नोटी मारायला बरं पडतं की." बावळ्याला या काळातल्या चोरांची किंव वाटली. "आपन नाय बाबा चिल्लर मारली कंधी. कसलं खुळखुळतं ते. चोरीची लगंच चुगली करतं की."

"महान युगनायकांज दंडक असिंग की बाजारात चलनांज आपली आपण सवहातांज काईंग किंमत होईंग जरुरी असिंग. कागदांज काईंग सवहातांज एवढी किंमत होईंग? सरकारला सुदहा कशाईंग काहीईंग किंमत ठरविंग अधिकार होईंग न." बोलता बोलता लाकी तिरसटली. "आता मंज विचारिंग न की महान युगनायकांनी अंस्स काईंग सांगिंग? मंज ठाविंग न."

"हुं! महान युगनायक? काय गं, त्या जलग्यानची डावी भिवई अशी वाकडी डोल्यांखाली बी आलंली कश्शी?" बावळ्याने बोटाने त्या भुवईचा आकार आपल्या डोळयांभोवती दाखवला.

लाकीला कळेना. "तो गं. चित्रात हातात काय तरी तीरकमानीसारखं घेतलंला उभा दाखवलंला होता तो? जलग्यान."

"ओ! जलज्ञ." लाकीला कळले. "त्यानं धरिंग ते तीरकमान नाईंग, त्या हत्याराला सळकतीरकाठा म्हणिंग. तो तीर सापासारखा वळणदार असिंग. म्हणहून त्याला सळकतीर म्हणिंग. तो मारिंग उपयोगी हत्याराला तीरकाठा. महान युगनायक जलज्ञांज डोळा-चिन्हाला भिवयपुच्छ म्हणिंग. महान युगनायक जलज्ञाला ओळखिंग ती खूण होईंग. मंज मामा बालपणी तंस्स मंज डोळ्याभोवती काजळानं काढिंग." त्या प्रेमळ आठवणीत लाकी गहिवरली.

"तू तर पोरगी हाय. तो जलज्ञ बाप्या हाय. मंग?" बावळ्याने चिडवले.

"मंग काईंग?" लाकीने मान ताठ्यात फिरवली. "खऱ्याईंग नायकांज लिंग, वय, वर्ण अंस्स काईंग भेद होईंग न. शौर्य, धैर्य, औदार्य, लढाईतून कंस्सच पळिंग न. हीच त्यांज लक्षणं होईंग."

"दिसतात हाय खरी तुझ्यामंदी. समदीच्या समदी." बावळ्याने परत चिडवले. "आनी तो समोरचा धनाळा गाव बी दिसतो हाय. पैसंवाल्यांचा गाव वाटतो हाय. समदीच्या समदी लक्शनं दिसतात हाय तिथं. अंडावाली घरं हायत नी घराघरापाशी पायरथं बी हायत.

तुझी मावशी बी अंडवाल्या घरात राहते काय? कुनाच्या टाळक्यात अंड्यात राहयाचा इचार पैला आला?"

"अंडाकार निसर्गांज सगळ्यात सुरक्षित आकार असिंग. म्हणहून पिल्लांसाठी तो बनिंग असिंग. ऊन, वादळवारा, वीजपाऊस, पूर असिंग की भूकंप होईंग, ही अंडी फुटिंग न. फार फार तरीईंग जमिनींजवर घरंगळिंग. त्यात माणूस सुरक्षित राहिंग. आताशा दर महिन्यात एक तरी मोठा भूकंप होईंगच." लाकीने माहिती दिली. "मंज मावशींज घर ते असिंग." तिने बेटावर बऱ्याच आत दिसणाऱ्या एका पिवळसर अंड्याकडे बोट दाखवले. "चलिंग. पायहोडी धक्क्याला लागिंग." ती कपड्यांना लागलेली धूळ झटकत उठली.

उतरणाऱ्या लोकांकडून तांडेल लोहाणा वसूल करत होता. ती माणसे खांद्यावरच्या जड अभ्रक बिल्ल्यांनी भरलेल्या पोत्यांना सांभाळत काळजीपूर्वक उतरली. मग चढणाऱ्यांची गर्दी झाली. त्यात लाकी आणि बावळ्या मिसळले. पण तांडेलाने तिला अचूक ओळखले. "नवर्तना बाय, गो कितीईंग दिसानं दिसिंग? सहा वर्षं होईंग. मावशींज विसरुनच जाईंग काईंग?"

"अय्याईंग!" लाकीला आश्चर्य दडवावेसे वाटले नाही. "गणादा, तू अजून मंज लक्षात ठेविंग?"

"मंग? अंस्स लाखांत देखणा चेहरा काईंग कोण एकदा बघिंग तर विसरिंग शकिंग?" तांडेलाने केलेल्या स्तुतीने लाकी लाजली.

"बायाबा कंस्स असिंग?" तिने त्याच्या बायकोची चौकशी केली.

"तिला म्हातारीला काईंग होईंग न. जे काईंग होईंग ते मंजच." थकल्या आवाजात खोकत तांडेल उत्तरला. मग बाकी प्रवाश्यांच्या दखलदेखीला लागला. त्याने सुकाणू धरून होडी पुन्हा माघारी वळवली. त्याच्या मदतनीसाने एकट्याने पाय मारत चालना दिली. हळूहळू सुखरूप पैलतीराला धक्क्याशी लावली. लाकीने तांडेलाला इतरांसारखीच तीन लोहाणा देऊ केली. "न. न. तुंज मावसा आळंबिलाकडं पैसा कुजिंग असिंग. त्यांज सवताहांज तर मुलबाळ वारस काईंग न. इतक्या वर्षानं भाची येईंग असिंग. त्या आळसकाळकाकडून मंज मोबदला तीन रुप्पी आणिंग होईंग. तरच तुंज परत त्या तीरी नेईंग."

तांडेलाच्या या अतिरेकी प्रेमाच्या मागणीपुढे लाकी हतबुद्ध झाली. "चलिंग." बावळ्याला ओठ चावत फर्मावून चालती बनली. बावळ्याने तांडेलाकडे पाहिले. त्याने खांदे उडवून बावळ्याला खुणावले की जा बाबा. मामला फार गरम डोक्याचा आहे. सांभाळून घे. बावळ्या हसून लाकीमागे चालू पडला. त्याला

तिच्या भरभर चालीमुळे धावतपळत तिच्या जोडीला राहावे लागत होते.

"तुझा मावसा? तीन लोहानाच्या जागी तीन रुपयं, म्हनजे हजारपट जादा देनार की. लयच भारी हाय की तुझा मावसा." बावळ्याच्या या बोलण्यावर लाकीने तिखटजाळ नजरेने त्याला न्याहाळले. "तो आळसकाळक हाय. म्हनजे काय हाय?"

"आळसकाळक म्हणहजे बावळ्या तुंज काळातल्या सोयींज गोष्टी, त्या यंत्रांज सुविधा परत या काळात येईंग, म्हणहून इच्छाईंग माणूस. त्या गोष्टी नी यंत्रांज कारणिंग माणसं आळशी होईंग. त्यांज ही शिवी असिंग." लाकीने चालता चालता आता समोर आलेल्या त्या पिवळ्या अंड्यापुढे असलेली निळी घंटा बडवली.

"मावशीचा तुझ्यावर लय जीव हाय वाटतं. माय मरो नी मावशी जगो. काय बरं बरं खायाला घालंल ना?" बावळ्या त्या तीन मजली उंच इमारतीचा आलिशान रागरंग न्याहाळता हुरळला.

"तर?" लाकीच्या स्वरात व्यंग होतं. "कितीईंग ते तुंज आता प्रत्यक्ष प्रमाणिंग दिसिंग. तोवर जरा धीर धरिंग काईंग?" गोल दार उघडून आतून एक नोकर धावत बाहेर आला.

"मंज वाटिंग की साहेब येईंग असिंग." पण त्याच्या चेहऱ्यावर निराशा न दिसता, जणू संकटातून सुटल्याचा आनंद साफ झळकत

होता. "कोण असिंग तुमी? बाईसाहेबांना काईंग सांगिंग?" लाकीने त्याच्याकडे सरळ दुर्लक्ष केले. ती दाराच्या दिशेने चालू पडली. "थांबिंग. थांबिंग." या त्याच्या आरड्याओरड्याला न जुमानता उघड्या दारातून आत घुसली. मागोमाग बावळ्या. त्याच्या मागोमाग नोकर. "बाईसाहेब हे..." त्याला बाजू मांडायचा अवसर मिळाला नाही.

"ओ नवर्तना!" त्या तळमजल्यावर उतरणाऱ्या म्हाताऱ्या बाईचे लक्ष लाकीकडे गेले. प्रचंड धक्का लागल्यासारखी ती ओरडली. "तू बंडबागी होईंग, अंस्स मी ऐकिंग होईंग. तर तू इंथ काईंग येईंग? तुला कोणी गावात ओळखिंग काईंग? तुला या घरात शिरिंग बघिंग काईंग? अरे रे रे!" छातीत धसका बसल्यासारखी ती बाई छाती आवळत जिन्यात मध्येच बसती झाली. मग तिला अजून काही आठवले. "रझाकार तुंज मागावर असिंग काईंग? नक्कीच होईंग. तुंज पाठीवर ते इंथ येईंग. तुंज संग मंज सुद्धा पकडिंग. हाय हाय! तू येईंग त्याच पावलानं जाईंग कंश्शी." तिने स्वतःचा चेहरा हातांनी झाकून घेतला. ती गदगदून रडते आहे असे वाटायला लागले. "मंज अंस्स बेइज्जती होईंग परीस मी मरिंग जाईंग तर बरे."

"दिनामावशी," आवाजात जितका गोडवा आणता येईल, तितका आणत लाकी बोलती झाली. "बघिंग की मी तुंज भेटविंग कोण आणिंग असिंग?"

"तुंज नवरा?" धक्क्यातून अचानक बाहेर येत, चेहरा लपवणारे हात झटकून, त्या रत्नालंकारमंडीत बाईने कुतुहलाने बावळ्याला निरखायला सुरुवात केली.

"न. बाहुला." भाचीने उत्तर दिले.

"बा. हु. ला." मावशीने एकेक अक्षर उच्चारून पाहिले.

"बरोबर. बाहुला." लाकीने कौतुक केले. "बाहुला मावशीला नमस्कार करिंग." बावळ्याने त्याप्रमाणे हात जोडले. "बाहुला मावशींज संग शंभर वर्ष आधींज भाषेत बोलिंग."

"काय मावशी बरं हाय ना? तुझा राजवाडा लय झॅक हाय की." बावळ्याने मावशीला बोलून दाखवले.

"बाई! मंज कानांवर विश्वास होईंग न." मावशी लगबगीने जिन्यावरुन बावळ्यापाशी पोचली. त्याच्या अवतीभोवती फिरली. त्याला बोट लावून तो खराखुरा असल्याची खात्री केली. "अगदी कंस्स ना, त्या काळांज सारखंच गं जंस्सच तंस्सच. मंजपाशी ती त्या काळांज फिरती तबकडी असिंग ना, ती यंत्रात वाजिंग तेहवा हुबहूब अंस्सच आवाज नी स्वर ऐकविंग. काईंग म्हणहजे काईंगच

फरक असिंग न गं? कुंठ मिळिंग तुंज हा बाहुला?" मावशीच्या आवाजात कितीला विकायचा आहे हा बाहुला? असे काही होते.

"ते तुला नंतर सांगिंग. ती तुंज तबकडी, यंत्रात घालिंग नी वाजविंग दाखविंग तर आधी." लाकीने आपले मुख्य साध्य पुढे रेटलं. तशी मावशी घाईघाईने ते आणायला गेली. लगेच लाकी बावळ्याच्या कानाशी लागली. "जंस्स मावशी ते यंत्र चालविंग होईंग, तंस्स तू तिंज पाठ मंजकडे करिंग. की मी लागलीच निकामिक काढिंग नी फुंकिंग." कट-कारस्थानाच्या गोष्टी पुऱ्या होत होत्या की मावशी मागे हजर झाली.

"ही असिंग ती तबकडी." मावशीच्या या अचानक मागून आवाजाने लाकी दचकली. तिची जीभ चावली गेली. त्रागा आवरुन ती मावशीकडे वळली. त्या तबकडीवर एका जुन्या चित्रपटाची नामपट्टी होती. "पण ते यंत्र? ते चालविंग कंस्स?" मावशीने रडकथा गायली.

"कंस्स म्हणहजे? तू ऐकिंग असिंग ना गं ती पूर्वी? तेहवा जंस्स चालविंग तंस्स." भाचीने चटपटीत उत्तर दिले.

"ऐकिंग, त्याला आता वीस वर्षं होईंग. तेहवा ते आमांज साठ्यातल्याईंग शेवटांज वीज संचयघटावर चालिंग होईंग. सगळे वीज संचयघट तुंज मावश्यानं वापरिंग कंधीच संपविंग. आता या

काळात तंस्स वीजसंचयघट कोण बनविंग? मंजपाशी सगळी वीजेवर चालिंग यंत्र नुस्ती कपाटात शोभा म्हणहून बाकी असिंग." मावशीने उल्हासाने बावळ्याला त्याच्या काळाच्या भाषेत विचारले. "बाहुला, तुला वीजसंचयघट बनवता येतो का?"

बावळ्याला त्यावर पाणी ओतायला वाईट वाटले. पण त्याचा नाईलाज होता. कल्पना असती तर त्याने या काळात येताना, सख्याकडचा वीजसंचयघटांचा एखादा खोका आठवणीने उचलून आणला असता. त्याला ते मावशीला सांगायचे होते. या दिनामावशीत लहान मुलासारखे निष्पाप निरागस असे काही त्याला लोभवणारे होते. पण "मी शंभर वर्स आधीच्या" असं काही त्याने म्हणताच, लाकीला ठसक्याची जी जोरदार उबळ सुरु झालेली, ती त्याने स्वतःचे तोंड आवळून बंद केले तेव्हाच थांबली.

"अगं मावशी, तुंजपाशी ती काळ्या तेलावर चालिंग, ती यंत्रं असिंग ना?" लाकीने हार मानली नाही. "त्यांजपैकी एखादं बाहुलाला दाखविंग ना?" मावशीचा कोमेजलेला चेहरा तरतरला. ती परत घाईघाईने आत गेली. लाकीने हातावर हात चोळले. तयार राहिली. मावशी एक गवत कापणारं जुन्या काळातलं यंत्र त्याच्या चाकांवर ढकलत घेऊन आली.

"मी सगळे काळया तेलांज डब्बे शोधिंग होईंग. कशाईंगात काईंग थेंबभर शिल्लक असिंग न. तुंज मावसा त्यांज उनाड मित्रांपुढे दिखावा करिंग करिंग, ते सगळं तेल कंधीच संपविंग असिंग." मावशीने कपाळाला हात लावला. लाकीने सुद्धा.

"मावशी तुंजपाशी त्या जुन्या काळांज निकामिक असिंग काईंग?" लाकीची शेवटची आशा पणाला लागली.

"गं! तुंज मावश्यासमोर त्या नावांज उच्चार करिंग न. तो तुंज घराबाहेर काढिंग." मावशीने भाचीला खबरदार केले. "कितीईंग वाईट्ट असिंग हा काळ. न इंथ इंधन ते काळं तेल असिंग. न घरगुती वीज असिंग. त्या नाडचुक्या निकामिकांज कारणिंग ही स्थिती येईंग. म्हणहून तुंज मावश्यांज राग राग असिंग निकामिकावर. तो ते घरात काईंग ठेविंग?"

"आनी मावशी तुझा सुद्धा निकामिकावर राग हाय का?" बावळ्याने हलकेच विचारले.

"माझा?" मावशी जुन्या काळाकडे वळली. "आमचं घराणं कायम बंडखोर होतं. शेजार शत्रूराष्ट्राने पूर्वी ती घातयंत्रं कुठूनशी शोधून, चालू करून आमच्यावर पाठवली होती. तेव्हा पन्नास वर्षांपूर्वी माझ्या आजोबा-आजीने त्यांचा बंदोबस्त केला होता. मी पार चिमुरडी होते. तरी मला त्या यंत्राच्या माऱ्याची ती जळजळ

जश्शीच्या तश्शी आठवते. कोणीहि आयुष्यभरात ती विसरू शकत नाही." बावळ्याच्या मनात त्या वेदनांच्या आठवणी जागल्या.

"आजीने मला वेळेवर धाव घेऊन वाचवलेलं. निकामिकांशिवाय त्या यंत्रांची दुसरी तोड नाही. जिवंत राहायचे तर माणसांना मग वीज आणि इंधनाच्या सोयीसुविधा सोडून देणं भागच होतं. दिवसातले कधी कधी सगळे प्रहर आम्हाला निकामिक वाजवावे लागत. मग इंधन आणि वीजवाली घरगुती यंत्रे कशी चालणार?"

"मी इंथ काईंग येईंग?" लाकीने कपाळ बडवले.

"तरी मला आजोबांनी सांगितलेल्या त्यांच्या जुन्या काळातल्या कहाण्या आठवतात. तो काळ?" मावशी आपल्याच विचारत वाहत गेली. "तेव्हा शंभर-शंभर मजल्यांच्या इमारती आकाश चुंबत असणार. खाली जमिनीवर कोसो पसरलेले चकाकते सुबक रस्ते सफाईदार वळणे घेत असणार. एकावर एक चढलेले रस्ते, त्यांचे उंच उंच पूल असणार. त्या रस्त्यांवर तासाला दोनशे कोसांचे अंतर कापणाऱ्या मोटरगाड्या सुसाट धावत असणार. त्या इमारती, ते रस्ते आणि ते आख्खे शहर विजेच्या रंगीबेरंगी दिव्यांनी-रोषणाईने झगमगत असणार. आळंबिलच्या

संग्रहात त्या काळाची चित्रे आहेत." त्या सुखस्वप्नांची कल्पनाचित्रे मावशीच्या डोळयांसमोर नाचत असावी. "दाखवू?"

"काईंग गरज न." लाकी फुगून वतवतली.

"आपल्या काचेच्या भिंती असलेल्या घरांमधून लोक ती रोषणाईची भव्य शोभा पहात असतील." मावशी कल्पना चित्र रंगवत राहिली. "त्या वातानुकूलित घरांमध्ये झुळझुळत्या नाना प्रकारच्या वस्त्रांमधले लोक रोज मेजवान्या झोडत असतील. आख्ख्या जगातून, वेगवेगळया देशांच्या कानाकोपऱ्यातून आलेले, हर तऱ्हेचे तऱ्हेचे पदार्थ त्यात मांडलेले असणार. हत्तीच्या कानाचं सूप आणि उंटाच्या दुधाचं पनीर. हिमालयातील सफरचंदे आणि वाळवंटातील खजूर. देवमाशाचं तेल आणि शहामृगाची अंडी. आणि खूप खूप काही. ज्याला हवे ते. हवे तितके. मोसमी वा बिगर मोसमी हवे तेव्हा. त्या तऱ्हेतऱ्हेच्या मालाने भरलेल्या, मोठमोठ्या मैदानाएवढ्या मोठ्या दुकानांतून- बाजारपेठांतून उतू जाणाऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या चिजा. मद्याचा पूर वाहत असणार. नशा फसफसून ओसंडत असणार. रात्र रात्रभर नाचायचे डिस्को, अवाढव्य बंदिस्त खेळाची मैदानं, तिथे रात्रीचा दिवस करून रंगणारे सामने. सुसाट मोटारींच्या तुफान शर्यती. आलिशान चित्रपटघरं नी घरबसल्या जग दाखवणारी शंभर-शंभर मनोरंजनाची टि.वी.चॅनेलं. ती आरामात

बघत बसण्यासाठीचे ते गुबगुबीत फोमचे कोच. सगळी कामे कशी आपोआप चुटकीसरशी पार पाडणारी स्वतःच स्वतः चालणारी यंत्रे. आपोआप उघडणारे दरवाजे नी आपोआप मिटणारे पडदे. पायांनी चढावे-उतरावे न लागता आपोआप सरकणारे जिने. नहायला गरम पाण्याचे तलाव आणि वाफेचे हौद, सुगंधी अत्तराचे फव्वारे आणि मखमलीच्या गाद्या. त्यांच्यावर लोळत जगायच्या कल्पनेत इतकं सुख आहे."

"मावशी पुरे होईंग." आता लाकी उसासली. "तू मामाकडं ते युगनायकांज पुस्तकात असिंग धडे विसरिंग काईंग? त्या काळात खरेईंग काईंग होईंग ते?"

"तू एक पोर, मंज शिकविंग न." मावशीने नाकपुड्या फुलवल्या. मावशी लाकीच्या पलीकडे काही पाहत होती.

लाकीने लक्ष दिले नाही. तिने खोल श्वास घेतला. मोठ्या प्रवचनाला तयार झाली. "एका बाजूला माणूस नद्यांज मार्ग वळविंग ते पाणी वाळवंटात नेईंग तिंथ हिरवळ फुलविंग होईंग. नी दुसऱ्या बाजूला हिरवी रानं उजाडिंग तिंथ त्यांज वाळवंट करिंग होईंग. एका बाजूला समुद्रांज खारं पाणी गोडं बनविंग. दुसऱ्या बाजूला नद्या नी तलावांत होईंग ते सगळं खरं गोडं पाणी विषारी करिंग होईंग. एका बाजूला जीवन असिंग डोंगर नी डोंगर फोडिंग सपाट करिंग होईंग.

दुसऱ्या बाजूला सपाटीवर सिमेंटांज इमारतींज निर्जीव डोंगर बनविंग होईंग. एका बाजूला संकर करिंग प्राण्यांज नी वनस्पतींज भाकड नवीन जाती तयार करिंग होईंग. दुसऱ्या बाजूला जगात अनेक प्राण्यांज नी वनस्पतींज खरेईंग जाती कायमईंग नष्ट करिंग होईंग. एका बाजूला समुद्रात भर करिंग नवी जमीन बनविंग होईंग. दुसऱ्या बाजूला माणसानं करिंग धुरानं, समुद्रांज बर्फ वितळिंग नी तो कितीईंग तरी पट खरी जमीन गिळत जाईंग होईंग. एका बाजूला विमानानं फवारिंग खोटा पाऊस पाडिंग. दुसऱ्या बाजूला हवा नासूनिंग जाईंग नी तेजाबांज काळा पाऊस पडिंग होईंग. एका बाजूला माणूस घरात कपाटात बर्फांज खडे बनविंग. दुसऱ्या बाजूला हिमालयांज खरेईंग बर्फ त्या कारणिंग संपविंग होईंग. शेतीत रसायनं वापरिंग ते विष अन्नात नी पाण्यात मिसळिंग. इंधनं नी कारखान्यांज धुरांज विष श्वासात मिसळिंग होईंग. तरी तुंज वाटिंग की तो तेहवांज तिरपागडा काळ आजपरीस भला होईंग?"

कडाक्यात टाळ्या पिटण्याचा आवाज आला. बावळ्याने मागे वळून पाहिले. तो टाळीमारू माणूस इतका जाडा होता की त्याला जणू मान नव्हतीच. त्याच्या डोळ्यांखाली जाडजूड चरबी ओघळलेली होती. त्याच्या अंगावरचे तंग कपडे त्याचा सगळा बेडौलपणा जगजाहीर करत होते. मावशी जेवढी लोभस होती, तितकाच हा तिचा नवरा ओंगळ होता. त्याच्या अंगावरचे भारभूत

सोने तो या घराचा मालक असल्याचे ओरडून सांगत होते. वेगळ्या ओळखीची त्याला गरज नव्हती.

"नवर्तना काईंग फर्मास भाषण देईंग. वाहवा! मजा येईंग. मंजसारख्या आळसकाळकांज मन सुद्धा वितळिंग जाईंग. काईंग ते रझाकारांज मन वितळविंग पण उपयोगी येईंग? होईंग जाईंग परीक्षा. तो बघिंग पैलतीरावर राखाल उभा असिंग." मावश्याने खिडकीतून बाहेर दूर त्या खाडीच्या किनाऱ्याकडे बोट दाखवले. तिथे काळ्या कपड्यातील पायघोडेस्वारांची लगबग दिसत होती. त्यातल्या एका धिप्पाड देहधारीची लकब परिचयाची वाटत होती. इतक्या लांबून चेहरा ओळखता येत नव्हता. तरीहि! बावळ्या आणि लाकिने एकमेकाला नजरेने सुचवले. ही मावशीची भेट संपवायची वेळ झालेली होती. निघायला हवे.

जणू ते न बोललेले ऐकल्यासारखे मावश्याने दोघांना विचारले. "अरे, आताच तर मी येईंग असिंग. लगेच काईंग निघिंग घाईंग? सकाळपासून सगळं काम-धंदा सोडिंग, मंज या लाडक्या भाचींज भेटिंग तयारी करिंग असिंग. राखालांज दूरसंवाद साधिंग कितीईंग कठीण काम होईंग. तुमाला काईंग माहीतिंग?"

"आमी येईंग तुला काईंग माहीती?" लाकीने थंड आवाजात विचारले.

"गं नवर्तने. तुंज तो साथी क्रमांक तेहवीस," मावश्याने आवडीने नाव फोडले. "तो पहाटे येईंग नी भेटिंग. त्यानं तू येईंग वार्ता देईंग नी मंज काळीज हलिंग. विचार करिंग की तुंज काईंग चकितभेट देईंग होईंग. तुंज रझाकारांज संग कितीईंग जिव्हाळा असिंग, ते मंज ठाविंग. तेहवा..." मावश्याने तोंडात बोटे घालून शिट्टी मारली. तसे त्याचे नोकर-चाकर दांडे हातात घेऊन प्रत्येक खिडकी-दारात प्रगट झाले. "ते भेटिंग तोवर जाईंग न."

"ए बटाट्याचं पोतं, तूच रे तूच. दुसरीकडं शोधू नको." बावळ्या धडधडला. "तुजं हे भाड्याचं सैनिक आमाला रोखनार कस्सं काय? तुझ्या गळ्यावर चाकूची धार आमी धरल्यावर?"

"बावळ्या? हो. बरोबर ओळखलं ना मी तुला?" मावसा आळंबिलच्या चेहऱ्यावर छद्मी भाव प्रकटले. "शंभर वर्षे आधीच्या काळातून आलेला माणूस. माझ्या त्या काळच्या वस्तूसंग्रहात तुला भुसा भरून ठेवायला मला आवडलं असतं. पण तू या काळात येऊन तुझ्या काळाची भलावण करणाऱ्या, आम्हा आळसकाळकांची साथ देण्याचं सोडून, या बंडबागीची साथ का देतो आहे?" त्याने हाताच्या तळव्यावर हनुवटी टेकवत विचार चालू असल्यासारखी बोटाने टकटक केली.

बावळ्या गुरगुरला.

"ओहो! आमच्या या नवर्तनेचा चेहराच असा तरुणांची नियत फितूर करणारा आहे ना. यात तुझा काही दोष नाही बरे. कोणीहि संगाची इच्छा धरावी अशीच आहे ती. त्यामुळे अनेकजण तिच्याशी आधीच संग करून मोकळेहि झालेत. सहा वर्षांपूर्वी ती बंडबागी झाली. अधेड वयातला उतावळा जोश. वर्षभरातच पकडलीहि गेली. रझाकारांच्या छावणीत दोन वर्ष तिचा भरपूर चावून चावून चोथा करण्यात आला आहे. हे तुला सांगायला ती विसरली असणार. मला वाटलंच होतं तस्सं." मावश्याने बावळ्याला बिथरवायला वाईट आठवणींना मुद्दाम उजाळा दिला. "तिथून तिला जोडीला घेऊन कोण पळाला होता सांग? तू भारी हुशार माणूस आहेस. अस्सं माझ्या कानावर आलं आहे."

तांबारलेल्या डोळ्यांचा बावळ्या काही बोलला नाही. थोडा वेळ उत्तराची वाट बघत मावसा गप्प राहिला. "नाही सांगता येत? साथी क्रमांक तेवीसच्या जोडीने. त्याच्या सगळ्या साथीदारांना एकेक हवाली करुन देण्याचा शर्तनामा मान्य करुन सुटलेल्याच्या बरोबरीने."

"तू एक लुच्चा असिंग. तुंज बोलांज जो विश्वास करिंग, त्यांज घात नक्कीईंग." लाकी धुमसली.

"मी खोटाईंग असिंग. पण तुंज भाबडी मावशी खोटीईंग असिंग काईंग? विचारिंग तिला. साथी तेहवीसानं पहाटे तुंज येण्यांज खबर देईंग की न?" मावश्याने फासा फेकला. लाकीने मावशीकडे पाहिले. ती भकास डोळ्यांनी नवऱ्याकडे पाहत होती. मग लाकीशी तिची नजरानजर झाली. त्यात मावशीने त्या गोष्टीची कबुली दिलेली लाकीला कळली. लाकी खचल्यासारखी झाली.

"लाकी तो येळ काढायला बाता मारतो हाय. चल." बावळ्याने मावश्यावर झडप घातली. तसा पटकन कुठूनसा एक सळकतीर त्याच्या दंडात येऊन रुतला. लाकीने जमिनीवर लोळण घेत मावश्याला गाठायचा प्रयत्न केला. मावश्याने मागच्या मागे दारातून बाहेर पडायचा प्रयत्न केला. मध्ये इतके अंतर असताना तो सहज निसटता. पण कसे न जाणो नेमके मावशीने मगाशी आणलेले गवतकाप यंत्र त्याच्या मागे धडकले. तो आपटून उलथला.

तसा लाकीने वेगाने पुढे सरसरत, मावश्याच्या गळ्यावर पाठीवरच्या थैलीतून हातात आलेला सुरा लावला. मालक ओलीस धरला गेल्यावर सगळे तीरंदाज हतबल झाले. मावश्याला ओढत बरोबर घेऊन, त्याच्या नोकरांचा घेरा ओलांडून लाकी आणि बावळ्या निसटले. मावश्याला त्याच्याच मालकीच्या पायहोडीत बसवून लाकीने खुल्या समुद्रात पळ काढला.

मागोमाग राखाल आणि रझाकार किनाऱ्यावर पायघोडे सुसाटवत धावले. त्यांच्या नजरेसमोर लाकी आणि बावळ्या पुन्हा फरार होत होते. ठेंगड्या दिनशाने सरळ लाटांवरती पायघोडा घातला. पाणी कापायलाच बनवलेल्या पायहोडीचा वेग गाठायला तो असमर्थ होता.

लाकी आणि बावळ्याने आळंबिलचे वजनदार ओझे पायहोडीच्या बाहेर फेकून ती हलकी केली. हालचालीची कधी सवय नसल्याने आळंबिल मदतीसाठी पाण्यात बुचकळ्या काढत किंचाळू लागला. राखालने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. हाबूश आणि बाबूशाला तिथे किनारी असलेले एक मोठे अवजार सज्ज करायला सांगितले. "काय हाय ते? तोफ?" बावळ्याने पाठलागाचा अंदाज घेत लाकीला विचारले.

"न." लाकीने सुकाणूवरुन मागे नजर टाकून सांगितले. "तो दूरतीरकाठा असिंग. त्यानं एक कोस लांबपर्यंत तीर मारिंग येईंग. प्रार्थनाईंग की राखालांज नेम चुकींग." ती पायहोडी वेडीवाकडी चालवायचा प्रयत्न करु लागली. पहिल्या चाललेल्या दोन दूरतीरांसाठी त्यांची प्रार्थना फळली. तिसऱ्या दूरतीरासाठी नाही. त्या तीराने अचूक होडीचा वेध घेऊन तिला भोक पाडले. होडी

निकामी झाली. तिच्यात पाणी भरू लागले. "बावळ्या उडी मारिंग."

बावळ्याचे अवसान संपले होते. "मला पोहता येत नाय. कंधी पाण्यात शिरायचं कामंच पडलं नाय." लाकीने किनाऱ्याच्या दिशेने नजर टाकली. होडी फुटल्याचे दिसल्यावर दिनशाच्या जोडीला इतर सहा-सात पायघोडे आता त्यांच्या दिशेने फुफाटत येत होते. "तू पळ की." बावळ्याच्या गळ्यापर्यंत पाणी उसळत होते. तो एका दांडीच्या आधाराने खाली खेचू पाहणाऱ्या पाण्याशी झगडत होता.

"तुला सोडिंग कुंठ जाईंग?" लाकीचे शब्द नाका-तोंडात खारे पाणी घुसताना बावळ्याच्या कानात शिरले. तो बेभान झाला. हाच का तो आई नेहमी आशा धरून जगली होती, तो आयुष्यातला सुखद बदलाचा क्षण? प्रेम साफल्याचा एक क्षण? आणि मग त्याच समेवर आयुष्य संपायचाहि? तो पाण्याखाली गेला. त्याच्या हातावरची एक गच्च पकड त्याला वर खेचायचा यत्न करत होती. त्याचे शरीर आपल्या परीने आचके देत धडपड करत होते. लवकरच श्वासाची साथ संपली. गुदमरून सगळ्या संवेदना सुन्न झाल्या. बावळ्या जाणीवांच्या पलीकडे गेला.

बावळ्याच्या शरीराची धडपड बंद झाल्याचे लाकीला कळले. काही पळातच रझाकार तिला गाठणार होते. नाही नाही.

त्यांच्या हातात ती जिवंत कशीच सापडणार नव्हती. बावळ्याच्या निस्त्राण हातावरची पक्कड तिने गच्च केली. त्याचे शरीर जड होऊन तिला पाण्यात खोल नेऊ लागले. ती बावळ्याच्या जोडीला मरत होती आणि तिला याचे दुःख न वाटता आनंद वाटत होता. एक साक्षात्कारी जाणीव तिचे मन उजळत गेली. पुढच्या क्षणी ती जाणिवांच्या पलीकडे गेली.

राखाल तिथे पोहोचला तेव्हा फक्त पायहोडीचे फुटके तुकडे तरंगत होते. त्याने परत परत आशेने त्या जागी बुड्या मारल्या. श्वास पुरणार नाही इतक्या फार खोलवर बुडी मारणे त्याला शक्य नव्हते. प्रचंड चरफडाट त्याच्या वाट्याला आला. फरारी जोडी मेली तरी त्याला मात देऊन गेलेली. पकडीत मिळालीच नाही. तो आयुष्यात पहिल्यांदा हरला होता. एका शंभर वर्षे आधीच्या माणसाकडून.

## शंभर वर्षे पुढे - प्रकरण २१

समुद्रकिनारी माडाच्या गर्द रानात त्या झावळ्यांच्या एकाकी खोपटीत, विणलेल्या पातींतून सुर्यप्रकाशाचे कवडसे झिरमिळत होते. बावळ्या आणि लाकीच्या पालथ्या पडलेल्या देहांवर नाचत होते. त्या दोघांच्या नाकांवर कापडाचा तुकडा बांधलेला होता. त्या कापडातून निघालेल्या नळ्या एका चावीमार चुलीला जोडलेल्या होत्या. त्या चुलीला सतत चावी मारायचे काम साथी क्रमांक तेवीस घामाघूम होऊन करत होता. चुलीतून आणखीन एक नळी बाहेर आलेली होती. ती खोपटीच्या बाहेर गेली होती. तिच्या बाहेर असलेल्या टोकातून निघणारा वायू लगेच पेट घेत होता. तर बावळ्या आणि लाकीच्या नाकातून असणाऱ्या नळ्यांमधून प्राणवायू सरसरत होता.

बावळ्या कण्हला. तसा त्याच्या शेजारी बसलेल्या साथीच्या चेहऱ्यावर आनंद उमटला. पुढे होऊन लाकीला त्याने आशेने गदागदा हलवले. त्याच्या आशेला फळ मिळाले. तिने ठसका काढत पाणी ओकले. हळूहळू त्या दोघांच्या आसन्नमरण शरीरात धुगधुगी जाणवू लागली. साथीने त्या दोघांचे हातापायांचे तळवे चोळत आपले प्रयत्न चालू ठेवले.

घटकाभराने बावळ्या आणि लाकी त्याच्याशी बोलू शकण्याच्या स्थितीला आलेले होते. त्यांच्या शरीरातले हालचालींचे त्राण परतले नव्हते. त्यासाठी मोठ्या विश्रांतीची त्यांना गरज होती. पण लाकीला साथीची माफी मागितल्याशिवाय आणि आभार मानल्याशिवाय स्वस्थता लाभणार नव्हती. तसे ते तिने मानले.

"आभार तुला दिनामावशींज मानिंग होईंग. पण आमांज प्रेमांज माणसांज आभार काईंग मानिंग होईंग? प्रेमांज बदली प्रेम. हीच परतफेड होईंग." साथीने खुलासा केला. कसे ते त्याने स्पष्ट केले. महान युगनायकांचा ज्ञानवारस चुडामणीचा मागोवा घेत, साथी त्याच्यापाशी पोहचला. तोपर्यंत लाकी आणि बावळ्या तिथून निघून गेलेले होते. रातोरात धनाळ्याच्या वाटेला लागले होते. लाकीला बादामी ज्या घरात होता, तिथे रात्र गुजारणे अशक्य वाटले होते. ते घर तिच्या मायेच्या व्यक्तीचे होते तरीही. धर्मशाळेत राहण्याऐवजी आत्येच्या घराकडे राहायच्या बादामीच्या बेतात, लाकीला काही कपटाचा करपलेला वास आला होता.

त्याच रात्री साथीला त्याच्या शहरातील माहीतीसूत्राकडून कळवण्यात आले होते, की राखाल रझाकारांचे दळ घेऊन धनाळ्याला रवाना झालेला होता. हा नक्कीच योगायोग नव्हता.

लाकीला दगाफटका होण्याच्या आशंकेने मग साथीने पिसूडी वाहन पळवले. त्या वेगवान वाहनाच्या योगे लाकीआधीच दिनामावशीला पहाटे गाठणे त्याला शक्य झालेले होते.

मावसा आळंबिलाला रझाकार येईपर्यंत धीर धरवणार नाही. मावसा फुशारकीने भाचीला स्वतःच गठाळायला बघणार. लाकी त्याला सहज मात देऊन निसटणार. साथीला ही पक्की खात्री होती. साथी मावशीला आणि मावश्याला अनेक वर्षांपासून ओळखत होता. मावश्याला साथीने लाकी येत असल्याची खबर दिली आणि बदल्यात पैसे कमावले. तिथेच मावशीला विश्वासात घेऊन मावश्याच्या पाणडुबीची चावी मिळवलेली. रझाकारांच्या पाठलागातून सोडवायला साथी पाणडुबीचा उपयोग करणार होता.

मात्र परिस्थितीचे फासे थोडे वेगळे पडले. साथीला वाटले होते की लाकी मुख्य भूमीकडे पळ काढेल. म्हणून तो खाडीमध्ये पाणडुबीत वाट बघत थांबलेला. तर तिने खुल्या समुद्राच्या दिशेने पळ काढला. परिस्थितीचा अंदाज घेऊन साथीने पाणडुबी खाडीतून बाहेर समुद्रात सुळकांडवली. त्याला फुटलेल्या पायहोडीपाशी पोहोचायला किंचित जरी अधिक वेळ लागता, तर तो लाकीला कायमचा गमावता.

"माय मरो आनी मावशी जगो." बावळ्या उसकला. "मावशीनंच ते गवत कापायचं यंत्र दोरीनं पुढे वढलं, आनी मावसा त्याच्यावर मागं ठेच खावून पडला. मी जमिनीवर पडलंलो होतो. तिथनं मला साफ दिसलंल की."

"पण धनाळ्यांज खबर राखालला कोण देईंग होईंग?" लाकीला मावशीपेक्षा या गोष्टीची आस जास्त लागली. "मंज वाटिंग की मामलींज तांड्यातल्या त्या दोघा धनगरांनी कळविंग होईंग."

"पन त्या धनगरांस्नी आमी धनाळ्याला जातो हाय, हे कुठं मायती होतं?" बावळ्याने तिला खोडून काढले.

"मीठदांड्यांज जाईंग हे तर माहीतिंग होईंग." लाकी कोडं सोडवू लागली. "राखालानं मीठदांड्याला कोण खबरी आमांज मागावर ठेविंग होईंग. आमी धनाळ्यांज जाईंगसाठी मालमुंगाडीकडं चौकशी करिंग. ती त्या खबऱ्यानं ऐकिंग होईंग."

"हा सुवर्णा अड्ड्यांज सापडिंग माणूस, तुंज जोडिला काईंग असिंग?" साथीने त्याला कधीचे पडलेले हे मोठे कोडे लाकीला विचारले.

"तो महान युगनायकांज काळातून, शंभर वर्ष आधींज काळातून येईंग असिंग." लाकीने जमले तसे मंद स्मित केले. "त्यांनी पाठविंग. आमांज लढाई लढिंगसाठी."

"औऊ!" साथीला यापेक्षा जहाल खिजवणारी प्रतिक्रिया सुचली नाही. तो काही शेरा मारणार होता. तर बाहेर सुईंग असा तीक्ष्ण कानात जाणारा आवाज आला. तो हडबडून बाहेर धावला. लाकी वा बावळ्या उठून बसायला सक्षम नव्हते.

"हा पिसूडींज आवाज असिंग. दोन पिसूडी असिंग. म्हणहजे दोन माणूस." लाकीने अदमास घेतला. लवकरच पाऊले वाजण्याचा आवाज आणि मागोमाग त्या पावलांनी चालणारी माणसे खोपटीत आली.

"मी घाबरिंग की तुमांज इलाज मंज काईंग होईंग न. पुरी रात तुमांज शुद्ध येईंग न. म्हणहून मी शहरातून हे वैद्य बोलविंग. यांज नाव फहद." साथीने ओळख करून दिली. तो एक चाळीशीचा मजबूत दणकट अंगाचा आणि देखण्या चेहऱ्याचा माणूस होता. वैद्य कमी लढवय्या जास्त वाटत होता. त्याचे लांब सरळ केस त्याच्या कपाळावर रुळत ते पूर्ण झाकून टाकत होते. "ही यांज सहाय्यक परिचारिका. काईंग नाव?" साथीने एव्हाना पुढे आलेल्या बाईची ओळख करुन देताना वैद्याला विचारले. पण ज्या तऱ्हेने

तिच्या आणि बावळ्या, लाकीच्या तोंडातून आश्चर्योद्गार फुटले, ते एकमेकाला आधीच जाणत होतेसे दिसले.

"छमद?" लाकीने वैद्याऐवजी उत्तर दिले.

"न. म्हणहजे होईंग! छमद." वैद्याने ओठांवर आलेले दुसरे नाव गिळले. या नावाला होकार भरला.

तशी छमद तिचे गडगडाटी हास्य हासली. "आमी सगळी एकाच मांदीयाळींज असिंग. ज्या गावांज बोरी, त्याच गावांज बाभळी. आमाला खरीईंग नावं असिंगच न. आमी सगळी गुप्तवेषानं वावरिंग माणसं. तू या फहदांज जाणिंग न? हा तोच ज्यानं आमांज सुटकेसाठी बब्बराला पैसे धाडिंग. मंज गुप्त हुकूमदार."

"फहद हाच मंज शहरांज सूत्र असिंग, ज्यानं राखाल धनाळ्यांज रवाना होईंग हे कळविंग." साथीने पुढचा जरूरी खुलासा केला. "त्या कारणिंग तुमांज गुप्त इलाजासाठी वैद्य हविंग होईंग, तेहवा मी त्याला बोलाविंग."

"जर राखाल इथं हाय. हे तुला मायती, तर तू इथं धनाळ्याला यायची हिंमत कशी केली?" बावळ्या सहजासहजी विश्वास ठेवायला तयार नव्हता.

छमद पुन्हा गडगडाटी हसली. "मंज गुरूदेव, हा धनाळा असिंग न. हे त्यांजपासून वीस कोस लांब पाळेगार असिंग." तिने

बावळ्याच्या कपाळावर हात ठेवून तपासले. "तुंज ताप चढिंग. फार विचार करिंग न. मंग डोक्यांज वात पेट घेईंग नी स्फोट जाईंग. " त्याला तिचा स्पर्श नको होता. पण अंगात तो झटकून टाकण्याइतके बळ नव्हते. "या दोघांना सात दिवस सक्तींज विश्रांती जरूरी असिंग. मी जातीनं सवताहा यांज काळजी घेईंग."

"नाय." बावळ्या रागाने ओरडला. "साथी तू आमाला कुठच्या बी खाजगी रुगनालयात घाल की. हिच्या तावडीत राहन्यापरीस ते कबूल हाय आमाला. काय खर्च जाईल, तो मी बरा झाला की हातोहात एखादं अंडं फोडून भरपाई करन की."

"अंडं फोडून?" वैद्य बावचळला.

"ओ! मी यांज ओळख देईंग विसरिंग. माफी देईंग मंज साहेब सरकार. हा शंभर वर्ष आधींज चोर क्रमांक एक असिंग. बावळ्या. अंडं म्हणहजे आमांज काळातील बड्या लोकांज कवचघरांज फोडिंग गोष्टी तो करिंग." छमदने हतबल बावळ्याचा गालगुच्चा ओढत सांगितले. "नी ही साथींज बंडबागी शिष्योत्तमा लाकी क्रमांक सातशे बारा असिंग." लाकीने तिच्या कपाळाचा मुका घेतला जाताना मान फिरवायचा अपयशी प्रयत्न केला.

"औऊ!" वैद्याने खिजवत अभिवादले. "लोक चोरी करिंगसाठी शंभर वर्ष दूर दूरांज पल्ला गाठिंग. हे मंज आजच

कळिंग. पण या काळात तेहवा होईंग तंस्स रुग्णालय असिंग न. तितक्याईंग मोठी जागांज नी नोकरांज खर्च चालविंग परवडिंग, कितीईंग तरी जादा कमाई नी रुग्ण जरुरी होईंग. आज वैद्याला विचारिंगच कोण? काईंग अपघात होईंग तरच लोक वैद्याला बोलाविंग. या काळात तेहवासारखे तपासणी नी इलाजासाठी यंत्रांज हावके असिंग न. कोणीहि आपणंच आपला इलाज करिंग शकिंग. साथीनं तर तुमांज आमी येईंग आधीच शुद्धीतहि आणिंग." त्याने धंदेवाल्यांचे नेहमीचे रडगाणे गायला सुरुवात केली. "पण चोर क्रमांक एक बावळ्या, तू या काळात काईंग चोरिंग येईंग? कंस्स येईंग नी कंस्स जाईंग?"

बावळ्याने चिडून नाराजी दाखवायला डोळे मिटून घेतले. "ते या दोघांज खाजगी गुपित असिंग." छमदने बावळ्या व लाकीकडे बोट दाखवत म्हटले. "पण मी मंज गुपित सगळ्यांसमोर उघडिंग. याउप्पर आमी एकमेकांज विश्वास करिंग न, तर काईंग साधिंग शकिंग न. आमी उत्तर सीमांज पलीकडील देशांज गुप्तहेर असिंग." तिचा हा गौप्यस्फोट तिच्या हुकूमदाराला रुचलेला दिसला नाही. ओठ घट्ट मुडपून घेत त्याने भावनांना आवर घातला.

"तुंज या देशांज महामहीमा नी तिंज साथी चक्रम शास्त्रज्ञ बेरहम, काईंग गुप्त अस्त्र बनविंग असिंग. आमांज देशातील काईंग

बंडबागी त्यांना सामील असिंग. ही गुप्त अस्त्रं सहज माणसांज कपड्यांत लपविंग येईंग नी त्यांज धडाक्यानं आसपास कोसभर मुलुख बेचिराख जाईंग. अंस्स अफवा असिंग. आमांज देशातील बंडबागी आमांज महामहीमाला विरोधासाठी आत्मघाती हल्ल्यांज पण तयार असिंग."

"तुंज महामहीम असिंगच तंस्स जुल्मी." लाकी फटकारत बोलली.

"जगात सगळ्यांईंग महामहीम जुल्मीच असिंग. कोणांज जादा जुल्मी होईंग? ही वादावादी आमी आता करिंग न." वैद्याने लाकीला शांत करायचा प्रयत्न केला.

"मंग, तू त्यांज साथ काईंग देईंग? बंडबागी काईंग जाईंग न?" लाकी तरी फटफटली.

"बंडबागी? आमांज देशात बंडबागी, महामहीमांज विरोध करिंग म्हणहून सवताहांज निरपराध रयत माणसांज मारिंग नी घातपातांज सज्ज असिंग. काईंग आमी त्यांजसारखे होईंग?" फहदने आक्रोश केला. "आमांज त्या घातपात्यांज रोखिंग, त्या निरपराध रयतेंज प्राण वाचविंग होईंग."

"महान युगनायकांनी सांगिंग त्यांज उलटे, तुंज देशांज बंडबागी अंस्स चक्रम काईंग वागिंग? तो देशच चक्रम असिंग." लाकीने विधीनिषेध ठुकरावून टर खेचली.

"लाकी?" साथी तिला रागावला. "आमी पोर असिंग न. तंस्स वागिंग बोलिंग न." समज दिली.

तशी लाकी वरमली. "मंज माफ करिंग." खजिल झाली.

"जर आमी तुंज महामहीम नी बेरहमांज रोखिंग न, तर ते उदईक सवताहांज रयतेंज सुद्धा या अस्त्रानं मारिंग." छमदने अचूक मुद्दा रेटला.

"मला मायती हाय हे काय हाय." बावळ्याने तोंड उघडले. "आमच्या काळात बी होतं. चक्रम अतिरेकी आनी त्यांचं बाम्बस्फोट. ते वाईटंच हाय. जमलं तर त्याला थांबवलं पायजे. पन तुमच्या काळात तर तसलं बाम्ब नायच हाय ना?" त्याला नक्की खात्री नव्हती.

"नाईंग काईंग?" छमदने बावळ्याला खात्री दिली. "आळसकाळकानं जपिंग नी लपविंग ठेविंग असिंग. तंस्स कितीईंग नी काईंग काईंग. कंधी कंधी बाहेर काढिंग. महामहीमाला तर लोकांना घाबरविंग तंस्स हविंगच होईंग. तिंज छुप्पी साथ नेहमी आळसकाळकांज आतून होईंग."

"हुं!" साथीने हात उडवले. "महान युगनायकांज वरदान निकामिकांज समोर त्या अस्त्रांज काईंग चलिंग न."

"पण आजची निकामिकं काम देईंग की न? यांज परीक्षाच कितीईंग वर्ष होईंग असिंग न." लाकी शून्यात नजर लावत बोलली.

साथीने लाकीकडे बुचकळ्यात पडत पाहिले. मग गुप्तहेरांना विचारले. "तुमाला आमांज कडून काईंग हविंग?"

"दुष्ट बेरहमांज कारस्थान शोधिंग नी नाशिंग एकत्र साथ." छमद आपल्या हुकूमदाराआधी बोलली. साथीने वैद्याकडे पाहिले. त्याने होकारार्थी मान हलवली. मग आपली घायाळ शिष्या आणि तिच्या नवीन साथीदाराकडे पाहिले. त्यांनी होकारार्थी पापण्या झुकवल्या. काही वेळ एकमेकांच्या सहमतीचा आणि या नव्या मैत्रीपर्वाचा आनंद शांतपणे घेण्यात गेला.

बावळ्याने त्या शांततेला अचानक तडा दिला. काहीसे घाबरेघुबरे होत तो चाचरत विचारता झाला. "सात दिवस मला इथं रोज खायाला काय घालनार जी?"

साथीने भिवया आणि हात उडवत उत्तर दिले, "काईंग चिंता असिंग न. इंथ मन्नानं भरपूर मिळिंग. अरे रे रे? तुला काईंग जाईंग? वैद्य बघिंग लवकर. हा परत काईंग शुद्ध हरविंग?"

## १०० वर्षे पुढे - प्रकरण २२

बावळ्याची या काळातला शहरी बाजार पाहण्याची इच्छा पुरी झाली. तो आपल्या साथीदारांसमवेत बाजारात भर गर्दीच्या वेळी चाललेल्या चहलपहलीची मजा घेण्यात गर्क होता. तो मातीचा रस्ता वीस हात रूंद होता. त्याच्या दुतर्फा सावली देणाऱ्या वृक्षांच्या एका पलीकडे एक रांगा होत्या. त्या वृक्षांच्या पलीकडे मागे पक्क्या दुकानांची रांग होती. जिथे महागाईच्या चीजवस्तू होत्या. तर वृक्षांच्या सावलीत कापडी छत्र्या आणि कनातींखाली खुल्या विक्रेत्यांचे ठेले होते. त्यांच्याकडचा माल टोपल्या आणि रांजणांमधून ओसंडत होता. फळे नी भाज्या, तयार खाण्यापिण्याच्या चिजा, घरगुती वापराच्या वस्तू, सजावटीच्या शोभेच्या वस्तू, खेळणी अशा नेहमी स्वस्त बाजारात असणाऱ्या गोष्टी तिथे होत्या. विक्रेत्यांच्या जाहिरातबाजीने आणि गिऱ्हाईकांबरोबर चाललेल्या किंमतींच्या घासाघासीच्या गोंगाटाने बाजार गजबजलेला होता.

मधल्या मोकळ्या मार्गिकेतून दोन दोन ओळींमध्ये पायरथ, पायघोडे, मालमुंगाडी आदी वाहनांची दोन्ही दिशांना दुहेरी वाहतूक चालू होती. त्यांच्यावरचे भोंगे वाटेत येणाऱ्यांना बाजूला सारायला

केकाटत होते. लोक रस्त्याच्या या बाजूने त्या बाजूला, आगे मागे, उलटसुलट सगळ्या दिशांना फिरत होते. "लय झॅक हाय." बावळ्या खुशालला. "इथं मला बटवं मारायला बकऱ्यांची काय कमी नाय हाय."

लाकीने बावळ्याच्या जाड दाढीमिशांनी सजलेल्या सोंगाकडे ओठांच्या कडेला नापसंतीची वाकडी रेषा घालत पाहिले. त्याच्या अंगावर मळखाऊ कपडे चढवलेले होते. साथी, छमद, फहद त्या सगळ्यांच्या अंगावर तसेच मळलेले जुनाट कपडे होते. पटकन कोणाचे लक्ष वेधणार नाहीत असे. छमदचा पुरुषी अवतार होता. कारण धिप्पाड अंगाची बाई कोणाच्याही लगेच लक्षात येती. त्यामानाने धिप्पाड पुरुष नजरेत कमी भरणार होता. तिने एक बारीक मिशी ओठांवर चिकटवलेली होती. फहद आणि साथीने गबाळ्या म्हाताऱ्यांचे वेशांतर केलेले होते. त्यासाठी केस पांढरे रंगवलेले होते.

लाकीची सुंदरता लपवणे कठीण होते. त्यामुळे तिने पुढच्या दातांपुढे नकली मोठे दात घुसवून फावडी बनणे पसंत केले होते. केसांचा घट्ट बुचडा बांधला होता. अटकर बांधा लपवायला ढगळ कपडे घातले होते. आणि सगळ्यांनी न चुकता अंगाला नी केसांना

खोबरेल तेल चोपडलेले होते. राखाल कुठे अवचित आपटलाच, तर त्याच्या तीक्ष्ण घ्राणेंद्रियाला माग लागू नये यासाठी.

वेशांतर फार चांगले जमले होते. आतीश गायदूधाची भांडी त्याच्या पायरथावर लादून, रस्त्यात त्यांच्या अगदी समोरून पार झाला होता. तरी त्याने यांना ओळकले नाही. बावळ्याने लाकी नको नको करत असताना आतीशला मुद्दाम हटकलेहि होते. 'दूधांज काईंग भाव?' असे या काळाच्या भाषेत. छमदकडून ती विचारणा शिकून. आतीश जरा बुचकळयात पडलेला. रहदारीच्या रेट्यामुळे पुढे सरकून गेलेला. फहदच्या डोक्यावरच्या आठ्या हा प्रकार पाहून जास्त गच्च झाल्या. बावळयाने विनोद केला की त्या फहदच्या म्हाताऱ्या सोंगाला जास्त शोभत आहेत. यावर छमदने बावळयाला एक 'लाडीक' धपका देत मुका घेण्याची धमकी दिल्यावर तो सरळ आलेला.

"ए. तू मुका असिंग. आवाज करिंग न." लाकीला जे म्हणायचे होते ते साथीने परस्पर बावळयाला सुनावले. बावळयाने तोंड वेंगाडलेले त्याच्या दाढीमिशांत दिसले नाही. "तुला कोणी माणूस काईंग वेगळा वाटिंग, तर मंज कानात सांगिंग."

"येगळा म्हनजे कस्सा?" बावळया साथीच्या कानात हिसहिसला. तरी ते फहदला ऐकू गेले.

"वेगळा म्हणहजे सरकारी जासूद. खबरी. कुणी बाजारात खरेदींज न, तर नुस्ताच फिरत असिंग. तंस्स." फहद बावळ्याच्या कानाला लागत बोलला. "छमद मंज सांगिंग की तू माणसं ओळखिंग जाम पटाईत असिंग." फहदने बाजाराचा अंदाज घेत नजर फिरवली. "इंथ सार्वजनिक जागी कोण ना कोण सरकारी हेर लोकांवर नजर ठेविंग असिंगच होईंग. आमी त्यांज मागानं सरकारेन गुप्तदलांज वरीष्ठ माणसांजपर्यंत पोहोचिंग शकिंग."

"आपल्याच लोकांवर सरकार नजर कशापायी ठेवंल?" बावळ्याचा कानात हिसहिसत बावळट प्रश्न.

"सरकारेन विरोध सहन होईंग न. महामहीमा भिईंग की लोकांज असंतोष एकवटिंग नी विरोधक तिंज सरकार उलथविंग होईंग. म्हणहून जिंथ जिंथ लोक एकत्र येईंग, तिंज हस्तक हजर होईंगच होईंग. लोक काईंग विचार करिंग ते जाणिंग." फहदने खुलासा केला. "आमांज सरकार हेच करिंग. आमाला अंस्स कामाईंग नेहमी नेमिंग. सगळी सरकारं हे करिंग असिंग."

"म्हनजे सरकार इरोधात बोलनाऱ्यामागं सरकारी जासूद लागनार? त्याला तुमाला पकडायचं हाय?" बावळ्याने यावर तोंड काढली. "मंग सोप्पं हाय की. आमीच सरकार इरोधात बोलायचं. की तो आमच्या मागं मागं येनार. त्याला कोपच्यात नेऊन…"

"व्वा!" बावळयाच्या पाठीवर साथीची थाप पडली. "मस्त सापळा असिंग. तू खरोखरीनं हुषार असिंग. पण तुंज आवाज खाली ठेविंग काईंग जमिंग न. अं?"

"भुकेनं चवताळलंला मानूस आवाज कस्सा दाबू शकतो भाऊ?" बावळयाने नाकात श्वास खोल भरुन घेतला. "किती दिसांनी अस्सा चमचमीत तळनाचा वास आला हाय. काय तरी चवीचं खायचं भेटलं हाय. सात दिसांचा चवीला भुकंला हाय की." बाजूच्या ठेल्यावर कच्च्या केळयाच्या काचऱ्या तळल्या जात होत्या. "मी काय म्हनतो की जासूद काय एवढ्यात कुठं पलून जात नाय हाय. जरा आधी आमी पोटपूजा करुन घेतली, तर काय बिघडनार हाय?"

"ए खुळया? हाड हाड." त्या तळणाच्या ठेलेवाल्याने कल्ला केला. बावळयाप्रमाणेच त्या ताज्या काचऱ्यांकडे जिभल्या चाटत आशाळभूतपणे पाहणाऱ्या, एका फाटक्या कपड्यातल्या लंगडणाऱ्या तरुण वेड्याला तो हाकलत होता. "इंथ उभा राहिंग न. चलिंग. होईंग बाजूला. गिऱ्हाईकांज अडचण करिंग न. जाईंग म्हणिंग ना. हाड." म्हणत त्या ठेलेवाल्याने मूठभर काचऱ्या बाजूला मातीत फेकल्या. तो वेडा त्या वेचायला कुबड्या टेकत तिथं धावला.

साथीने बावळ्याचा खांदा जोरात दाबला. "काईंग आमाला खूळ लागिंग, तर आमी अंस्स मामुली इच्छाईंग?" बावळ्याने याचा अर्थ नकार जाणून विरस होऊन खांद्यावरचा हात झटकला. पण कोणी त्याला ढकलले आणि तो साथीवर जाऊन जोरात आपटला.

सगळ्या बाजूला धक्काधक्की चालू झाली. एक पायरथ मार्गावरून गेला. मोठा तास पिटत घणघणाट करून महान महामहीमांच्या आगमनाची वर्दी देत. त्याच्यामागे रस्ता रिकामा होत गेला. रस्त्यावर होती ती वाहने त्यांच्या त्यांच्या चालकांनी रस्त्याबाजूच्या गर्दीत तातडीने घुसवली. त्यामुळे तिथे ढकलाढकली माजली. महामहीमेच्या कार्यकर्त्यांची व लोकांची आपापसात रेटारेटी सुरू झाली.

लवकरच लालभडक आणि काळ्या रंगांचे विशिष्ट पट्टे ओढलेल्या बंदिस्त पायरथांची रांग लांबून येताना दिसू लागली. त्या आधी जणू वाऱ्यावर उसळत दोन पिसूडी पुढे आल्या. एक पायरथ मार्गात अर्धा अडकलेला होता. त्यात एक बाई आणि तिची दोन कच्ची बच्ची होती. त्यांना खचाखच गर्दी बाजूला घुसायला वाव देत नव्हती. पिसूडी तिथे थांबल्या. पुढच्या क्षणी त्यांच्या स्वारांनी चाबूक गर्दीवर फाडफाड उगारले. त्या माराबरोबर लगोलग तिथली गर्दी हाय खाऊन पांगली. त्या पिसूडीस्वारांनी तो

पायरथ सरळ मागून ठोकरून रस्त्याबाहेर केला. तो पायरथ पेचून त्यातली बाई नी मुलं चिमटली. त्या मुलांच्या आक्रोशाची काही दखल न घेता, महान महामहीमांचा बंदिस्त रथांचा ताफा सुळकन सगळयांच्या अंगावर वारं फडफडवत गेला. त्यातल्या नेमक्या कोणत्या रथात ती महामहीमा होती? कोणाला कळलं नाही.

"महान महामहीमांज....." काचऱ्यावाल्याने आवाज दिला.

"जय असिंग." बाकीच्या जमावाने साथ दिली.

"महान महामहीमांज......" काचऱ्यावाल्याने पुन्हा बेंबीच्या देठापासून आवाज दिला आणि बावळयाच्या गटावर डोळे वटारले. कुजबुजला, "बोलिंग नाईंग तर....?"

"जय असिंग." यावेळी जमावाच्या जोडीला साथी, लाकी, फहद, छमदहि एकसाथ ओरडले. तसा त्यांच्यावरचा त्या नारेबाजाचा नाराज कटाक्ष हटला. ताफ्याच्या मागे दुसरा एक पायरथ शिथिलतेची दवंडी पिटत गेला. बाजूला घुसलेली वाहने रस्त्यावर परतू लागली. बाजारातला ताण निवळू लागला.

"महामहीमांज हाय हाय." तो काचऱ्या वेचणारा वेडा ओरडला. आजूबाजूचे लोक चमकून त्याच्याकडे पाहू लागले. "हाय हाय. महामहीमांज हाय हाय." लोकांच्या पायांखाली तुडवून

पार माती झालेल्या काचऱ्यांमध्ये हात कालवत वेडा गळा काढू लागला.

"ए? खुळा. तोंड बंद करिंग. नाईंग तर तुंज जीभ हासडिंग." काचऱ्यावाल्याने गर्जना केली. बोल खरे करायला तो खुळ्यावर धावून गेला.

"रे हाड." लंगड्या वेड्याने मगासच्या हाडहाडचा बदला घेतला. हातातली माती काचऱ्यावाल्यावर उधळून दिली. "तू कुत्रा असिंग तिंज कुत्रा. तिंज कारस्थान लपविंग तिनं मंज पाय कापिंग. आता तू जीभ कापिंग. मंज जीव घेईंग. तरी मी बोलिंग. तिंज कारस्थान सगळयांज कळविंग. ती दुष्टा...." पुढे तो बोलण्याआधी खरोखर त्या काचऱ्यावाल्याने वेड्याच्या तोंडात तळणाचा गरम झारा खुपसत ते उचकटले. वेदनांनी वेड्याच्या डोळ्यातून आसवे वाहिली. त्याच्या घशातून तडफडीचा घरघराट निघाला. लोक तमाशा बघत असल्यासारखे स्तब्ध झाले.

बावळ्याला ते बघवले नाही. तो पुढे झाला आणि काचऱ्यावाल्याचा झारा धरणारा हात त्याने कोपरात उचकटला. मागे खेचला. तसा झारा तसाच तोंडात सोडून काचऱ्यावाला विव्हळत मागे झाला. लाकीने पुढे झेपावत झारा वेड्याच्या तोंडातून बाहेर काढला. साथीने आपल्या कडेसरीतल्या पाण्याच्या

पिशवीचे बूच उघडून थंडाव्यासाठी वेड्याच्या पोळलेल्या तोंडात पाणी ओतले. ते तो गटागट प्यायला. फहदने सरसावत काचऱ्यावाल्याचे हात मागे खेचत त्याला हतबल केले. छमदने काचऱ्यावाल्याचे तोंड आपल्या पोलादी हातांनी आवळून बंद केले. "यांज साक्ष देईंग तुमांज पैकी कोण सरकारदारी चौकीवर येईंग?"

छमदची ही हुकमी चाल फळास आली. ताबडतोब बघ्यांची गर्दी पांगली. काचऱ्यावाला तिच्या नाकतोंड दाबण्याने गुदमरून बेशुद्ध झाला होता. "बाकी खबऱ्यांना कळिंग नी ते इंथ येईंग आधी आमी आडोसा गाठिंग." फहद साथीदारांना फक्त ऐकू येईल इतक्या हलक्या आवाजात पुटपुटला.

"सरकारांज खबऱ्याला तू धरिंग. तू नक्की बंडबागी होईंग." आता वेडा हलक्या खालच्या आवाजात पोळलेल्या तोंडाने कसाबसा पुटपुटला. सगळे आश्चर्यात पडले. "मी वेडा असिंग न. सोंग घेईंग असिंग. मंज कंधीपासून कोणा बंडबागींज भेट हविंग होईंग. महामहीमांज कारस्थान त्याला कळविंग कारणिंग." त्याने खुलासा केला.

फहदने आजूबाजूला बाजारकऱ्यांचा कानोसा घेतला. दूर त्या चिमटलेल्या पायरथातील बाईला आणि मुलांना बाहेर

काढण्याच्या कामी, दोन सरकारदार शिपाई आणि मदतीला लोक लागलेले होते. थोड्याच वेळात तिथून मोकळे होऊन, ते सरकारदार इथल्या राड्याची खबरबात घ्यायला येणार असते. तर त्याच्या बाजूला उभ्या बावळयाने मालकविहीन काचऱ्यांचा फुकट बकाणा तोंडात भरला होता. लाकी नाराजीने बावळयाचे चरणारे ते तोंड आणि कवतिक बघत होती. "लवकर बोलिंग तुंज माहिती. आमाला इंथहून सटकिंग होईंग." फहदने लंगड्याला सुनावले.

"नीळकंठेश्वर मंदिरांज महंत महामहीमांज हस्तक असिंग. मंज पत्नी फिलू सरकारेन प्रयोगशाळेत काम करिंग होईंग. तिला त्यांज काम नी इप्सित पटिंग न. म्हणहून ते काम सोडींग होईंग. पण महंतानं तिला चर्चेसाठी भेटिंग बोलाविंग होईंग. तिंथहून नी तेहवापासून फिलू गायब असिंग. मंज खात्री असिंग की त्यानं तिला महामहीमांज ताब्यात देईंग असिंग. मी जेहवा तिंज चौकशी महंतांजपाशी करिंग, त्यानं मंज धमकाविंग. मंज मारिंग ठरविंग. तेहवा मी दुखानं वेड लागिंग सोंग करिंग नी पळ काढिंग. त्या यत्नात मंज पाय कापिंग जाईंग. पण त्यामुळं त्याला मंज वेड खरं वाटिंग. म्हणहून मंज जिवंत सोडींग असिंग."

"ती प्रयोगशाळा कुंठ असिंग?" छमदने कुजबुजत विचारले.

"ते जर मंज माहीत होईंग, तर मी केहवाच तिंथ मंज फिलूपाशी जाईंग होईंग." निराश लंगडा मोलू उसासला. "त्या महंताला तो ठावठिकाणा नक्की माहीत होईंग. त्याला धरिंग."

"साथीदार हो, चलिंग चटकन." साथीने सगळ्यांना सावध केले. "पळिंग होईंग. सरकारदार येईंग असिंग."

"पण आमाला काईंग सूत्र तर मिळिंग होईंग?" लाकी वैतागली.

"मिळिंग असिंग. चलिंग." फहद लंगड्याला सोडून उठला. झपझप दूर निघून गेलाही. मागोमाग छमद. मागोमाग साथी. लाकीने बावळ्याचा हात ओढला. सरकारदारांनी त्यांना थांबण्याची खूण म्हणून लांबूनच शिट्ट्या फुंकायला सुरुवात केलेली.

"पन याचं काय?" बावळ्याने तोंडातला बोकाणा चुथवत लंगड्याकडे बोट केले. "याला सरकारदारं मारतील की?"

प्रत्युत्तरात लंगड्याने मातीचा धुरळा सरकारदारांच्या दिशेने उधळला. ओरडला, "महान महामहीमांज जय जय असिंग. मंज जय होईंग. मी अमर होईंग. सरकार अमर होईंग." त्याची वेडेपणाची नाटके सुरू झाली.

तसा चोर बावळ्या लाकीच्या जोडीने आपले साथीदार गेलेल्या दिशेने पळत सुटला. खिशांमधून जितक्या चोरीच्या काचऱ्या भरता येतील तितक्या भरून घेऊन.

## १०० वर्षे पुढे - प्रकरण २३

नीलकंठेश्वराचे मंदिर टेकडीवर स्थित होते. एका चमचमत्या मोठाल्या निळ्या काचेच्या पिंडीच्या रुपात. आसपासच्या हिरव्या वनराजीने भरलेल्या परिसरात लांबून सुद्धा उठून दिसणारे. बावळ्याच्या ध्यानात आले म्हणजे मंदिर अतिश्रीमंत असणार. या काळाची ही रित दिसत होती. अतिश्रीमंतांच्या इमारती या काचसदृश्य पारदर्शी पदार्थाच्या होत्या.

भक्तांचा गोतावळा टेकडीवर जायला पायऱ्या चढत होता. त्यांच्यातले एक होऊन बावळ्या, लाकी, साथी आणि छमद आपापल्या वेषांतरीत अवतारात टेकडी चढत होते. तोंडाने अधूनमधून बाकी भक्त मंडळींच्या जोडीने मोठ्यामोठ्याने नीलकंठेश्वराचा जयजयकार ओरडत होते. फहदला आपले नेमणूकीचे शहरातले पद आणि त्याची जबाबदारी सोडून, पंचवीस कोस दूरच्या या मंदिराची यात्रा करणे शक्य नव्हते. तो आला नव्हता.

पायऱ्यांच्या कडेला सगळ्या यात्रास्थळांपाशी असते, त्याप्रमाणे पूजा सामग्रीच्या आणि खाण्यापिण्याच्या दुकानांची दाटी होती. फुलांचे आणि गोखरू-अगर-राळेचे वास हवा सुगंधित

करत होते. कमानींना टांगलेल्या घंटांच्या किणकिणाटाने वातावरण प्रसन्न वाटत होते. लाकडात आणि धातूंमध्ये कोरलेल्या ताईंतांची, छोट्या पिंड्यांची व मूर्तींची विक्री जोरात चालू होती. लाकीने एक पूजेची थाळी विकत घेतली. भक्त म्हणून देवाला रिकाम्या हाती जाणे इतरांना खटकले असते. त्याच दुकानांपाशी त्यांना पादत्राणे उतरवून ठेवावी लागली.

जसजसे ते वर जात होते, वाट अरुंद होत होती. ज्यामुळे माणसांची दाटी जास्त जास्त घन होत होती. एकमेकांचे उच्छवास एकमेकांमध्ये मिसळावेत इतकी. उजवीकडून वर जाणारी तर डावीकडून खाली उतरणारी एकेरी रांग बनली. एकाएकी वरून माणसांचा लोंढा आला. थोडी चेंगराचेंगरी झाली. वरती टेकडीच्या माथ्यावरून जोरजोरात घोषणांचे आवाज ऐकू येऊ लागले. नीट लक्ष देऊन ऐकल्यास ते देवाच्या जयजयकाराचे वा त्या संबंधित नव्हते. ती निषेधाची बोंबाबोंब वाटत होती. मंदिरावर मोर्चा?

बावळ्याची चौकडी पायऱ्यांवर वाटेत मध्येच गर्दीत अडकली. मागे खालीहि फिरता येईना. वर पुढेहि चढता येईना. चढणारे आणि उतरणारे सगळे जागच्या जागी अडकले. नेमके काय कारण? लोकांना कळेना. त्यामुळे चिडचिड आणि अस्वस्थता वाढू लागली.

"हे लक्शन काय खऱ्याचं नाय हाय." बावळ्याने आपल्या साथीदारांना विश्वासात घेतले. "कधी बी ढकलाढकली नी चेंगराचेंगरी सुरू होईल की. आमी सटकूया."

"कुंठहून?" छमदचा सूर विडंबनाचा होता. "हवेतून काईंग?"

"बाजूनं. पायरीची वाट सोडून." म्हणत बावळ्या पायऱ्यांच्या ज्या बाजूला टेकडीचा चढ होता, तिकडे एका झाडाला जाऊन लोंबकळला. "कडा चढून."

"मंज वजन त्या बारक्या झाडांना झेपिंग काईंग?" छमदच्या चेहऱ्यावर नापसंती झळकली. "इंथ वाट बघिंग शहाणपण होईंग."

"नी आमी म्हातारी चढिंग, हे लोकांना पटिंग काईंग? लोक काईंग म्हणिंग?" साथीने तिची बाजू घेतली.

"तू थांबिंग तर इंथ थांबिंग." लाकीने बावळ्याची बाजू घेतली. पुजेची थाळी पाठीवरच्या पोटलीत सारत, ती बावळ्याच्या जोडीला झाडाला लटकली. "मी जाईंग. तिंथ काईंग खास घडिंग असिंग. मंज ते चुकिंग न." पलीकडच्या झाडावरच्या माकडांच्या टोळीने आपल्या राज्यात माणसांना घुसताना पाहून कचकचाट केला.

साथीची चलबिचल झाली. पण छमद अडून ढिम्म राहिली. बावळ्या आणि लाकीला झाडांवरून वर वर चढत जाताना पाहून,

भक्तगणांपैकी छोट्या छोट्या मुलांना चेव आला. त्यांचे झाडांना लोंबकळण्याचे प्रयत्न त्यांच्या मोठ्यांनी धपाटे घालत हाणून पाडले. त्या मुलांच्या रडारडीने गर्दीची अस्वस्थता अजून वाढली.

बावळ्या आणि लाकी कुशलतेने या झाडाच्या फांदीवरून त्या झाडाची फांदी धरत, उड्या मारत काही वेळाने वर पोहोचले. त्यांच्या हालचालीची आणि फांद्यांच्या उसळण्याची दखल तिथे घेतली गेली नाही. माकडे असतील असे समजून दुर्लक्ष करण्यात आले. ते त्यांना फायद्यात पडले. झाडांच्या शेंड्यावर चढाई करून, ते दोघे तिथून काय मामला आहे? तो पाहू लागले.

निळ्या काचपिंडीचा तळाशी विस्तार होऊन, गोलकडी तयार झालेली होती. तिला सगळ्या बाजूंनी तीन पुरूष उंच अर्धगोलाकार कमानींनी तोललेले होते. मंदिराचे आवार अगदी छोटेखानी होते. त्याभोवती पुरूषभर उंच भिंत घालून बाजूने कोणी खाली कोसळणार नाही, याची काळजी घेण्यात आली होती. त्या भिंतीच्या बाहेरच्या बाजूला उत्तर दिशेला खालती पडव्या नी खुरट्या इमारती बांधलेल्या होत्या. मंदिराचा पुजारी महंताची आणि सेवेकऱ्यांची राहण्याची सोय करायला. त्या इमारतींची गच्ची  म्हणजे आवाराचा सज्जा होता. पूर्व दिशेला प्रांगणात प्रवेशाचे मुख्यद्वार होते. जिथे दहा बारा माणसांचा घोळका जमा

होऊन घोषणा देत होता. त्यांच्यामुळे दार आणि भक्तांची रहदारी अडलेली होती.

"महंत चरणदास...." घोळक्यातल्या चमनगोटा केलेल्या तरुणाने पुकारा केला. "हाय हाय." बाकीच्या साथीदारांनी प्रतिसाद दिला. ती सगळी तरुण विशी-तिशीतली मंडळी होती. त्यात काही तरुणीहि होत्या. सगळ्यांनी फाटलेल्या कफन्या घातलेल्या होत्या.

"सगळ्यांना कळिंग होईंग. हा महंत साधूंज वेषात डाकू होईंग." हाय हाय.

"भोळ्या भक्त नी भक्तीणींज शरीरावर डाका घालिंग. त्यांज शरीरांज फसविंग भोग घेईंग." हाय हाय.

"जे त्याला कबूल होईंग न, त्यांना धमकाविंग नी बळजोरीनं भोग घेईंग." हाय हाय.

"लहान कोवळ्या पोरांना पण सोडिंग न. मंज पाच वर्षांज पोरीवर अत्याचार करिंग." हाय हाय.

"महंत चरणदास समोर येईंग. आज तुंज खरंखोटं जगाला कळिंग होईंग. समोर येईंग. समोर येईंग." हाय हाय.

"महंत चरणदास हजर होईंग." हाय हाय.

दुसऱ्या बाजूला मंदिराच्या कमानींखाली भगव्या कफन्या घातलेले महंताचे धटिंगण चेले उभे होते. दातओठ खात

घोषणाबाजांना हातांच्या मुठी वळून दाखवत होते. "ए शरणन, जर आता ताबडतोबीनं तू नी तू जमविंग हे भाडोत्री नारेबाज काळं तोंड घेईंग चलिंग पडिंग न, तर तुमा सगळयांना कड्यावरून खाली लोटिंग देईंग. तू खोट्या कारणिंग भक्तांज खोटी नी अडथळा करिंग न. चलिंग. हटिंग." चेल्यांमधली सगळयात धटिंगण बाई गरजली.

"लुच्ची नायलअव्वा. नीट डोळे उघडिंग नी समोर बघिंग. आमी भाडोत्री असिंग न. गं, चरणदासांज कुत्री, आमांज सगळयांवर तुंज मालकानं अत्याचार करिंग असिंग. आमी त्यांज बळी असिंग." त्या नारेबाजांची म्होरकी ओरडली. "कुंठ दडिंग तो बदमाष? त्याला आमांज सामना करिंग हिंमत होईंग काईंग न?" हाय हाय.

"महंत चरणदास हजर होईंग. आज तुंज जबाब घेईंगविना मानिंग न. जाईंग न." हाय हाय.

"हविंग तितकं बोंब मारिंग. महंत येईंग न." नायलअव्वा कुत्सितपणे खिजवत बोलली. "तुंज पाखंड्यांज विश्वास कोण धरिंग न. आमी तर म्हणिंग की तू महंतांज सरळपणांज गैरफायदा घेईंग नी उलटी बोंबधमकी देईंग असिंग."

"ते काईंग ते लोकांना ठरविंग देईंग. आधी त्या बदमाषाला समोर आणिंग. सगळेईंग पुरावे आज तयार असिंग." शरणन बोलली.

"तर मंग न्यायालयात जाईंग. इंथ काईंग सवताहांज नी आमांज वेळेंज खोटी करिंग." नायलअव्वा दणदणली.

"तिंथ तुंज महंतांज पापात भागीदार नेतागण आधीच निकाल लाविंग हजर होईंग. इंथ आज लोकांनी त्यांज निकाल करिंग होईंग." शरणनने सल्ला धुडकावला.

"काईंग पुरावा होईंग तुंजपाशी?" नायलअव्वाने दुसरा मुद्दा रेटला.

"तो तुंज काईंग देईंग? महंताला हजर करिंग. त्यांज पाप त्यांज तोंडून कबुलविंग." शरणनने पुन्हा नायलअव्वाला धुडकावले. हाय हाय.

आतून महंताने काही निरोप दिला. तशी नायलअव्वा सौम्यपणे विचारती झाली. "महंत तुंज बाजू ऐकिंग तयार असिंग. तू मंदिरांज द्वार मोकळे करिंग. आत येईंग नी तुंज सांग सांगिंग."

"व्वा! तोच आरोपी नी तोच न्यायाधीश?" शरणन फार चलाख होती. "आमी आज त्यांज संग बोलाचालींज न, लोकांना

त्यांज खरंईंग सांगिंग येईंग असिंग. महंताला आधी इंथ हजर करिंग." हाय हाय.

सामोपचाराने वा धमकावणीने मोर्चेकरी हटेनात. तेव्हा महंताला सामोरे यावेच लागले. तो एक गलेलठ्ठ दुहेरी हनुवटीचा बुवा होता. महंत जसे गोपीचंदनाच्या उट्या आणि केशराच्या टिळ्यांनी सजलेले असतात तसा रंगलेला. गळ्यात आणि हातात रुद्राक्षांच्या माळांनी मढलेला. त्याचा आवाज भारदस्त होता. "हे भक्तगण हो, तुमांज तक्रार ऐकिंग नी निवारिंग हा नीलकंठेश्वरांज चरणांज दास हजर असिंग. मागे काईंग राहिंग? पुढं येईंग. बाकी भक्तांज वाट काईंग देवापासून अडविंग? मागे जे देवदर्शनासाठी अडिंग भक्त असिंग, ते जोर करिंग नी पुढं येईंग."

त्याच्या चेल्यांनी पुढे होऊन त्या सगळ्या नारेबाजांना आत ओढायला सुरूवात केली. महंताचे आव्हान होताच नारेबाजांच्या मागे असलेल्या लोकांना जोर आला. त्यांच्या मागून जोराने आणि चेल्यांच्या पुढून खेचण्याने, नारेबाज दारातून आवारात ओढले गेले. दारातली कोंडी फुटली. पुराचा लोंढा यावा तसे लोक भसाभसा आत शिरले.

महंताच्या पूर्वनियोजनानुसार चेल्यांनी त्या मोजक्या नारेबाजांच्या आरड्याओरड्याला आणि प्रतिकाराला न जुमानता,

त्यांना आवाराच्या बाहेर सज्ज्यावर खेचून नेले. नारेबाजांच्या दुप्पटीने चेल्यांची संख्या होती. सज्ज्यात उघडणारे आवाराचे दार बंद झाले. नारेबाज भिंतीपलीकडे लोकांच्या नजरेआड कैद झाले. चेल्यांनी त्यांच्या मुसक्या बांधायला सुरू केल्या. दरम्यान महंताने मोठमोठ्याने 'निलकंठेश्वरांज जय' बोंबलत, लोकांना जयजयकाराच्या गजरात गुंतवून ठेवले. लोक मग रिकाम्या मंदिरात धावले. स्वतः महंत जातीने आपले गाऱ्हाणे देवापाशी घालणार, याचे त्या भक्तांना कोण अप्रूप झाले.

यथावकाश नारेबाजांच्या गठड्या आवळून झाल्यावर चेले मोकळे झाले. त्यातल्या काहींनी मंदिरात जाऊन लोकांच्या कामांतून महंताला मोकळे केले. तो नारेबाजांची खबरबात घ्यायला सज्ज्यात पोहचला. बावळ्या आणि लाकी याचा अंदाज येऊन, कधीचे त्या बाजूच्या झाडांवर पोहोचून वाट पाहत होते. आल्या आल्या महंताने बांधून घातलेल्या सगळ्या नारेबाजांवर लाथा चालवल्या. तोंड बांधलेले असल्याने त्यांच्या आरोळ्या लोकांच्या कानांवर गेल्या नाहीत. "आता यांज काईंग करिंग? नेहमींज तळघरात टाकिंग?" नायलअव्वाने विचारले.

"न." महंताने काही विचार केला. "यांना इंथहून खाली दरीत फेकिंग. करिंग त्या पापांज पश्चाताप होईंग. तेहवा प्रायश्चित्तासाठी

नीलकंठेश्वराला समर्पण म्हणहून, भक्तानं करिंग सामूहिक आत्महत्या. कंस्स वाटिंग उदईक खबर?" हसायला लागला. "पण या शरणनला बाजूला सोडिंग. मंज मन अद्याप तिंज मखमाली शरीरात गुंतिंग असिंग." त्याने हात शरणनच्या छातीवर आधाशासारखे चाचपले.

"त्यांना बांधून कंस्स फेकिंग? मोकळे करिंग फेकिंग होईंग. तर ती आत्महत्या वाटिंग. पण मोकळे करिंग तर ते बोंब मारिंग." नायलअव्वाला हा प्रकार अडचणीचा वाटला.

"बोंब मारिंग शकिंग न. कारणिंग त्यांज डोकं आधी फुटिंग होईंग नी शुद्ध उरिंग न." असे बडबडून महंताने एक जाडजूड सोटा उचलला आणि जवळ सापडला त्या नारेबाजाच्या डोक्यात हाणून घातला. दुसऱ्याच्या डोक्यात फटका हाणणार, त्या आधी त्याच्या डोक्यावर फटका बसून तो स्वतःच ढेर झाला. ती लाकी होती. तिने झाडावरुन थेट त्याच्यावर उडी मारली होती. तिच्या हातात आता सरळ केलेला घडीचा भाला होता.

तिच्याशी लढायला तिथे होते, ते सहाहि चेले आपापले दांडके परजत सरसावले. उरलेले सगळे चेले बंद दारापलीकडे मंदिरात होते. दांडका घेतलेल्या नायलअव्वावर अचानक कठीण कवचाचे

फळ येऊन आपटले. त्या माराने ती ढेर झाली. बावळ्या बेलाच्या झाडावर होता. त्याने ते बेलफळ नेम धरून मारले होते.

चेले आता दुहेरी संकटात सापडले. त्यांचे लक्ष बावळ्यामुळे विचलित झाल्याचा फायदा घेत, लाकीने भाला खुपसत अजून एकाला जायबंदी आणि निकामी केलेहि. तसे उरलेले अधिक उशीर न करता तिच्यावर तुटून पडले. बावळ्याला आता त्या सतत हलणाऱ्या आणि बाजू पलटणाऱ्या लढाईत, शत्रूचा नेमका वेध साधणे अवघड झाले.

घात प्रतिघातात लढणाऱ्यांच्या तोंडातून अभावित आवाज उमटत होते. हत्यारांची खणाखणी चालू होती. बंद दारापलीकडील लोकांचे आणि चेल्यांचे लक्ष वेधले जाऊ लागले. लाकीने आणखी दोघांना निकामी करण्यात यश मिळवले होते. बावळ्याला चेव आला. त्याने बेलफळ मारले. त्याच क्षणी लाकीने हालचाल केली. प्रतिक्रियेत चेल्याने हालचाल केली. त्या दोघांच्या जागेची उलटपालट झाली. फळ लाकीच्या कानावर बसले. ती ढेर झाली. तसा उरलेल्या तिघा चेल्यांनी मोठ्याने जिंकल्याचा गल्ला केला. बावळ्याला वाकुल्या दाखवत चिडवले.

बावळ्याला झाडावरून आवारात पलीकडे जमलेले चेले दिसले. त्यांचा रोख सज्जाकडे होता. सज्जातले चेले लाकीला ठार

करायला सरसावलेले. स्वतःला कोसत बसायला वेळ नव्हता. त्याने लगोलग सज्ज्यात उडी घेतली आणि पटापट नारेबाजांच्या काढण्या चाकूने कापायला सुरुवात केली. त्याला रोखायला सरसावणाऱ्या त्या उरलेल्या चेल्यांवर सुटका झालेले नारेबाज रागाने झपाटले.

"काईंग होईंग तिंथ? दार खोलींग." आवारातले चेले ओरडून विचारू लागले. दारावर धडका मारू लागले. 'तुम्ही दार सांभाळा.' बावळ्याने नारेबाजांना खुणावले. तो लाकीला शुद्धीवर आणायच्या खटाटोपाला लागला. लाकीने डोळे उघडायला आणि बंद दार उघडायला एकच गाठ पडली. धडक मारणारी ती छमद होती. बावळ्या लाकीच्या कानात पुटपुटला की आम्ही महंताला तातडीच्या उपचारासाठी खाली खोलीत नेतो असं सांग. लाकीच्या डोक्यात प्रकाश पडला. तिने उठून बेशुद्ध महंताकडे धाव घेतली.

"रमेश नी सुरेश, महंतांना उचलिंग जल्दिंग. त्यांना उपचारासाठी खालती मठात नेईंग होईंग." लाकीने छमद उर्फ रमेशला आणि साथी उर्फ सुरेशला विनवले. "लोक हो, इंथ हे नारेबाज लोक नीलकंठेश्वराला समर्पणाईंग आत्महत्या करिंग होईंग. त्यांना रोखिंग नी आवरिंग होईंग, तेहवा महंतांज चेल्यांज ही अवस्था होईंग असिंग. चिंता न करिंग. सगळ्यांज सलामती होईंग.

देव नीलकंठेश्वरांज कृपा." भक्तीभावाने तिने हात जोडून वर उंचावले. नीलकंठेश्वराच्या जयजयकाराच्या घोषणा द्यायला सुरुवात केली. लोकांना अधिक विचार करण्याची संधी न देता, गुंतवून ठेवायचे हे तंत्र ती नुक्तीच महंताकडून शिकली होती.

छमदने संधी साधत महंताला उचलून, खालच्या मठात जाणाऱ्या दारातून आत घुसून, जिना उतरायला सुरुवातहि केली. आवारातून सज्ज्यात आलेल्या चेल्यांना परिस्थितीचे आकलन होईना. नारेबाज सुद्धा या अचानक कलाटणीने गोंधळलेले होते. बावळया त्यातल्या एकाच्या कानात लागला. "जीव वाचला हाय. बेस झालं. आता बाकीचं चेलं तुमाला धरतील, त्याच्या आधी तो जीव घेऊन पळ काढा की." बावळयाच्या भाषेने तो भिरभिरला. पण सुदैवाने त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. तो लगेच बाकी साथीदारांच्या कानाला लागला. आणि ते सगळे मोठमोठ्याने नीलकंठेश्वराचा जयजयकार करत निसटू लागले.

बावळया धावला. छमद आणि साथी गेले त्या दारातून आत. चेल्यांना निसटणाऱ्या नारेबाजांपेक्षा आपल्या उस्तादाची जास्त तमा होती. ते सुद्धा बावळया गेला त्या दारातून आणि जिन्यातून खाली धावले. तिथे जिन्याखालच्या दारामागे लपलेला बावळया तयारच होता. शिरला चेला आत की मार त्याच्या डोक्यावर दांडा.

की छमद त्या चेल्याचं बेशुद्ध शरीर बाजूला हलवायला तत्पर होतीच. त्या सगळ्या चेल्यांची शिकार त्यांना आयती साधता आली.

मठात होत्या त्या दोघा चेलीणींची शिकार साथीने साधली. त्यांना किंचाळायची संधी न देता. काही वेळाने लोकांना पुन्हा मंदिरात पाठवून आणि मठाचे दार मागे बंद लावून, लाकीहि त्यांना सामील झाली.

महंताला शुद्ध आणण्यात आली. बदललेला रागरंग पाहून तो हडबडून गेला. त्याच्याच मठाच्या तळघरात दुसऱ्या कोणाऐवजी त्याचाच छळ सुरू झाला. तिथे तावडीत सापडलेल्या भक्तांवर अत्याचार करायला अनेक साधने हजर होती. आता ती साधने त्याच्यावरच उलटली. छमद या कामात तरबेज होती. तिला याची आवडहि होती. महंताची बोंब या तळघरातून लोकांपर्यंत पोहोचू शकत नव्हती. त्यानेच ती खास सोय करून घेतलेली होती. परिस्थितीचा उलटलेला फासा पाहून तो मनातून खचला.

"लंगड्या मोलूंज बायकोंज तू काईंग करिंग?" साथीने त्याला दमात घेतले. महंत तोंड शिवून गप्प बसला. साथीने काही अनमान न करता सरळ त्याचा पाय कापला. दुसरा पाय कापला जायच्या धमकीने महंत हादरून गेला. फिलूला आपण राजकारणातील

धुरंधर रावजीच्या स्वाधीन केलेली. हे महंताने कबूल केले. मोलूला आपणच लंगडे केलेले. हे सुद्धा. रावजीला एकट्याला कुठे गाठता येईल? याचे उत्तर द्यायला त्याने थोडी खळखळ केली. पण छमदने त्याच्या लिंगाशी आपले खतरनाक चाळे सुरू करताच, तो पोपटासारखा सगळ्या गोष्टी बोलू लागला.

काही वेळाने टेकडीवरून बावळ्याची चौकडी पायऱ्या उतरत होती. "तो महंत पाय कापिंग होईंग, तर कितीईंग काळ जिवंत राहिंग?" बेचैन लाकीने साथीला विचारले.

"त्यानं कंधी कोणांज पाय वा गळा कापिंग, तेहवा विचार करिंग होईंग न. तू काईंग करिंग? त्यांज कोणी चेला शुद्धीत येईंग, तेहवा त्याला सोडविंग." साथीने तोंड वाकडे करत उत्तर दिले.

"पण त्यानं रझाकारांना कळविंग तर? आमी खरंईंग त्याला जीवे मारिंग होईंग." छमद चरफडली.

"नाय कळवनार. तो तितका हुषार हाय. त्यानं गुपित फोडलं हाय. हे कळलं ना, तर राखाल आधी त्याचाच जीव घेईल की. त्याला पक्कं मायती हाय. तो नी त्याचं चेलं आजपासून तोंडाला चिकटपट्टी लावून घेनार बघ." बावळ्याने तिला आश्वस्त करायचा प्रयत्न केला.

"बरोबर! मंज तोंडातलं शब्द तू बोलिंग मुकेश." साथीने बावळ्या उर्फ मुकेशला शाबासकी दिली. "जर आमी महंताला मारिंग, तर सगळ्या लोकांना कळिंग जाईंग की इंथ बंडबागींज हल्ला होईंग म्हणहून. मंग रझाकार ताबडतोबीनं इंथ चौकशीला येईंग होईंग. आमी महामहीमांज गुपितामागं असिंग. हे त्यांना कळिंग. आमाला तंस्स होईंग उपयोगी असिंग न. आता जिवंत महंत आपणच ही सगळी गोष्ट दाबिंग टाकिंग."

"आनी त्यांचं भगतांच्या संग चाळं बी काही दिस बंद पडतील." मुकेश आपण मुका असल्याचे विसरुन, बोलत असतानाच लाकीने त्याच्या कानावर एक ठो मारून दिला. तिरीमिरीतून बाहेर आल्यावर तो तिच्यावर कावला. "तुझ्यासारखं मारकुटं मैतर असंल, तर शत्रूची काय गरज हाय?"

"तेच म्हणिंग मी. तुंज सारखा बिनभरवशी नेमबाज जोडीला असिंग, तर जीव जाईंग शत्रूंज काईंग गरज?" लाकीच्या या फिरकीवर बावळ्या मोठ्याने हसला. लाकी हसायला लागली. छमद आणि साथीला त्यांचा हा विनोद न समजून, ते यांना वेड लागलेय का? विचार करु लागले.

# १०० वर्षे पुढे - प्रकरण २४

मुकेश उर्फ बावळ्या, सुरेश उर्फ साथी, रमेश उर्फ छमद आणि निताली उर्फ लाकी अशी चौकडी नुक्त्याच अंधारलेल्या आकाशाखाली शहरात दाखल झाली होती. शहराच्या त्या भागात जो वेश्या वस्तीसाठी कुप्रसिद्ध होता. संध्याकाळनंतर भरात येत होता. चंद्राच्या सांद्र मादक प्रकाशाखाली. एका अरुंद रस्त्याच्या बाजूला असलेल्या मंद दिव्यांच्या ओळीतील खांबांखाली. त्या खांबांपलीकडे असलेल्या छोट्या छोट्या तकलादू खोपटांमधून. कुजबुजत्या आवाजांनी आणि तापलेल्या श्वासांनी. गुदमरवणाऱ्या अत्तरांच्या भपकाऱ्यांनी. बांगड्यांच्या नी पैंजणांच्या किणकिणाटांनी. खांबांना टेकून असलेल्या प्रसाधनांचे थर लिंपून भडक रंगवलेल्या चेहऱ्यांनी. त्या चेहऱ्यांनी चालवलेल्या सूचक खाणाखुणांनी. त्यांनी तंगड्या फाकून त्यातून हाताची बोटे नाचवून केलेल्या आव्हानकर्त्या अदांनी. मांडलेल्या देहाच्या उत्तान प्रदर्शनाने.

तिथे सर्व वयोगटातली, समाजाच्या सर्व थरांतली व गटांतली माणसे दिसून येत होती. गिऱ्हाईकांमध्ये आणि देहविक्रेत्यांमध्ये देखील. तिथे जश्या बायका धंद्याला उभ्या होत्या,

तसे पुरूष सुद्धा पैशाबदल्यात उपलब्ध होते. हीच काय ती गोष्ट बावळ्यासाठी जरा वेगळी होती. बाकी सगळे तेच ते सुपरिचित वातावरण. शहरी वेश्याबाजाराचे. तश्याच गळयात पडणाऱ्या वेश्या. हाताला धरून खेचाखेची. गिऱ्हाईक पटवण्यावरुन चाललेली भांडणे.

मात्र ही चौकडी जरा वेगळी असल्यामुळे बाजारकरी त्यांना बिचकत होते. इतर गिऱ्हाईकांचे गट फक्त बायका वा फक्त पुरुष असे फिरणारे होते. या चौकडीत तीन पुरूष व एक बाई होती. त्यामुळे यांना नेमके कोण हवे होते? त्याचा बाजाराला अंदाज लागत नव्हता.

रस्ताला अध्येमध्ये काही बोळ येऊन मिळत होते. त्यातल्या एकातून चौकीदार शार्दुलसिंह बाहेर पडला. मुकेश, रमेश, निताली दचकले. पण चौकीदार त्यांच्या अंगावरुन कसलाही संशय न घेता, मिशांवर ताव मारत पुढे निघून गेला. त्यांचे थांबलेले निश्वास हुश्श! करत बाहेर पडले. तिथे काही राडे आणि जोरजबरदस्तीचे मामले चालू होते. ही वेळ त्याकडे लक्ष देण्याची नव्हती. लाल रंगाच्या दिव्याने उजळलेला बोळ चालताचालता रस्त्यात आला. सुरेश थबकला. मुकेश मागून त्याच्यावर आपटला. तो एका लालजर्द कपड्यातल्या बाईच्या मादक अदा बघण्यात जो दंग होता. बाईने

हे पाहून दात विचकले. त्या दातांमधले लांब सुळे दिसताच मुकेशने नजर फिरवली. सुरेशकडे लक्ष पुरवले.

"इंथ असिंग धुरंधरांज लाल हरेमखाना." सुरेशने बाकीच्यांना खबर पुरवली. "सोमवारी तो इंथ येईंग. लोक म्हणिंग की हरामखान्यांज मालकीण हमदाबाई नावापुरती असिंग. खरा मालक धुरंधरच होईंग." तो सहजपणाचा आव आणत सावधतेने पावले टाकत तिथे घुसला. मागोमाग रमेश.

बाकी दोघे निताली व मुकेश त्या बोळात न शिरता दुसरीकडे बाजूला सटकले. एका बाजूच्या अंधारलेल्या इमारतीच्या भिंतीकडे सरकले. चिकटले. मुकेशने आपल्या हातांचे तळवे एकात एक गुंतवून पुढ्यात धरले. चटदिशी त्यावर पाय देऊन त्याच्या खांद्यावर जात, तिथून निताली त्या भिंतीवरच्या छप्परावर गेली. तिने दिलेल्या दोराच्या आधाराने मागोमाग मुकेश. मग त्या दोघांचा चोरटा प्रवास बोळाच्या या इमारतीवरून त्या इमारतीच्या छप्परावर चालू झाला.

खाली लाल बोळात नशेत झिंगल्यासारखे झोके खात, काही माणसे दुसऱ्या बंद दारवाल्या टोकाकडून परतत होती. जसजसे रमेश सुरेश त्या टोकाकडे चालले होते, आसपास काही माणसे त्यांच्यावर संशयी नजर ठेवून, आपापसात खाणाखुणा करत

असलेली जाणवू लागली. त्यांच्या कपड्यांमध्ये लपवलेल्या हातांमध्ये शस्त्रांच्या मुठी धरलेल्या होत्या नक्की.

"तुमी कोण असिंग? या आधी इंथ कंधी दिसिंग न?" त्यातल्या एका छुप्या पहारेकऱ्याने ती म्हाताऱ्यांची जोडी बोळाच्या शेवटाला पोहोचली, तेव्हा अखेर पुढे येत त्यांना रोखले.

"आमी लाल हरेमांज नाव ऐकिंग तो बघिंग येईंग." सुरेशने कारण पुढे केले.

"कोण तंस्स सांगिंग? जर आमी त्याला ओळखिंग न, तर तुमाला आत प्रवेश मिळिंग न." त्या सशस्त्र माणसाने सख्त आवाजात सांगितले. "ओळखदाराला इंथ आणिंग होईंग."

सुरेश घुटमळला. पण रमेश चटकन उत्तरला. "चौकीदार शार्दुलसिंह."

तसा तो अडवणारा माणूस कुत्सित हसला. "तो? त्याला इंथ दर परवडींग न. म्हणहून त्यानं येईंग सोडींग सहा महिने होईंग. तो तुमाला काईंग इंथ पाठविंग?"

"कारणिंग आमांज जवळ तितका पैसा असिंग." रमेश चिडून बोलला. "आमी आता परत जाईंग. नी आमांज सगळ्या मित्रांज सांगिंग की इंथ कंधी जाईंग न. इंथ गिऱ्हाईकांज योग्य मान मिळिंग

न. त्यापरीस फालतू चौकशी जादा होईंग. चलिंग मित्रा." रमेशने पाठ फिरवली.

"चिडिंग काईंग?" तो माणूस जरा मऊपणे बोलला. "अनोळखी माणसांज चौकशी करिंग, आमांज काम होईंग." त्यानं दोघा म्हाताऱ्यांच्या कपड्यांवरुन हात फिरवत हत्यारांचा जुजबी तपास केला. तसे काही मिळाले नाही. मात्र त्या म्हाताऱ्यांनी अंगाला कसले विचित्र वासाचे तेल चोपडलेले. त्या वासाची त्याला शिसारी आली. "झविंग येईंग तर अंस्स वासांज तेल काईंग लाविंग?" त्याने चिडून विचारले.

"यांज मुळे तर शक्य होईंग. जोम चढिंग." सुरेशने डोळे मिचकावत सांगितले. त्या राखण्याने आपले डोके हासडले. इथे असल्याच विचित्र माणसांचा जास्त राबता असायचा. बोळाच्या शेवटाला असलेल्या त्या मार्गाएवढाल्या रुंद दरवाजातील छोटे दिंडी दार त्याने खोलले. त्या अरुंद ठेंगण्या भोकातून डोकी वाकवून टांगा उंचावून जोडी आत शिरली.

आतमध्ये फारसा ऊंची माहोल नव्हता. एक खूप मोठा कापडी मांडव होता. तिथे साधारण दर्जाची लाकडी घडीच्या खुर्च्या नी मेजांची मांडणी होती. जिथे गिऱ्हाईके बसून खाणंपिणं आस्वादत होती. लाल रंगाच्या काचांचे लंबकदिवे वातावरणावर एक पापी

लालिमा पसरत होते. मध्यभागात एक मोठाला बांबूच्या खोडांचा पिंजरा होता. त्यात नागवी देखण्या शरीरांची माणसे कोंबलेली होती. त्यांची सुंदरता हाच त्यांचा अपराध होता. ज्या कारणाने ती या हरामखान्यातली कैदी बनलेली होती. त्यात स्त्रिया, पुरूष आणि लहान कोवळी मुले सुद्धा होती.

एखादा गिऱ्हाईक त्या पिंजऱ्यापाशी जाऊन आपल्या पसंतीचे शरीर निवडत होता. मग तलवारी घेतलेले धटींगण पिंजऱ्याचे दार उघडून, धाकाने ते शरीर बाहेर काढून, त्या शरीराला गिऱ्हाईकाच्या हवाली करत. तो गिऱ्हाईक तावडीतले ते शरीर घेऊन, मांडवाच्या कडेने असलेल्या छोट्या खुराड्यांमध्ये मनमर्जी भोगायला नेत होता. तलवारधाऱ्यांची दहशत इतकी दिसत होती की कोणतेही शरीर विरोधाचा वा नाराजीचा ब्र काढत नव्हते.

रमेश आणि सुरेशने आपले सावज शरीर हेरले. तो राजकारणी नेता धुरंधर होता. एका कोपऱ्यात बसून एखाद्या राजाने दरबारात बसून मजा घ्यावा, तसा सगळ्याची मजा घेत होता. सुरेशने वरच्या ताणलेल्या कापडी छतावर नजर टाकली. यावर वावरणं नितालीला कठीण जाणार होते. मुकेश सारख्या हलक्या शरीराला फक्त ते जमले असते. ते दोघे जसजसे धुरंधराकडे सरकू लागले, तसतसे काही तलवारधारी बिथरल्याचे डोळयांच्या कोपऱ्यातून त्याला

जाणवले. तसा एकजण त्यांच्या आणि नेत्याच्या मध्ये हळूच सरकला. त्याला पार केल्याशिवाय सावजापर्यंत पोहचता येणार नव्हते. मामला थोडा पेचाचा झाला.

"राजनेते धुरंधर साहेबांज जय असिंग." ते ज्या दारातून आत आलेले तिथून नारेबाजी ऐकू येऊ लागली. उपस्थित सगळ्यांच्या माथ्यावर आठ्या उमटल्या. कैदी सोडून. धुरंधराच्या माथ्यावर सर्वात जास्तीच्या. त्याच्या एका गणंगाने दारापाशी जाऊन खबर आणली की बाहेर पंचवीस तीस जणांचा जमाव आलेला आहे. त्याला म्हणजे लोकनेत्याला भेटायला आणि निवेदन द्यायला. "ही काईंग जनतेला भेटिंग जागा असिंग? त्यांना सांगिंग मंज घरी भेटिंग." धुरंधर वैतागून म्हणाला.

तसे सगळे काही सांगून झाले होते. जमाव ऐकत नव्हता. मानत नव्हता. एवढा मोठा जमाव धुडकावून लावता येत नव्हता. आणि जितका जास्त वेळ जात होता, बघ्यांची गर्दी त्यात येऊन मिसळत वाढत चालला होता. बोळातले मोजके राखणे लोकांना रोखू शकणार नव्हते. लोक दारातून आत घुसण्याआधी त्यांना बाहेरच्या बाहेर कटवणे भाग होते. पिंजऱ्यातले कैदी नजरा आणि कान टवकारून होते. धुरंधर चरफडत लोकांच्या भेटीला बाहेर गेला. त्या पाठोपाठ रमेश आणि सुरेश निघाले. सावज बाहेर गेले तर ते इथे

मागे थांबून काय करणार होते? त्यांना तलवारधाऱ्यांनी आतच रोखले. हा भाग त्यांच्या कटाचा भाग नव्हता.

मुकेश आणि निताली बाजूच्या छप्परावर उताणे पडून बोळातल्या गोष्टी बघत होते. "ही तर ती शरणन हाय. महंताची बोंब मारत होती की ती? इथं कोनाची बोंब मारनार हाय? ह्या धुरंधराचा कारभार तर महंताच्या दसपट जुल्मी हाय." मुकेश उर्फ बावळ्याने बोळातल्या गडबडीवरची नजर काढली.

मांडवाच्या छताचा कडेवरचा कापलेला तुकडा उचलून एकवार आतल्या पिंजऱ्यावर टाकली. "मी बी असाच पिंजऱ्यामदी अडकलंला होतो. नागडा. इतर नागड्यांसंग." त्याचे अंग त्या आठवणीने शहारले. "माझी आई आनी बहीन पिंजऱ्याबायेर व्हते. वखवखलल्यांची शिकार म्हनून. गळाला ओलिस म्हनून मला धरलंला. जर आये आनी बहनीनं त्यांचं ऐकलं नाय, तर जीवं मारायला." मग काही वेळ त्याला गहीवराने बोलता आले नाही. "मला मरायचं होतं. मंग आयेला आनी बहनीला त्यांचं ऐकाया लागलं नस्तं. ती बी मोकळी झाली असती. मराया. तसलं आब्रू गमावलंल जीनं कोन कंस्स जगनार होतो?"

आठवणीत वाहलेला बावळ्या पुढे काही बोलेना. तसे लाकी उर्फ नितालीने त्याला टोचले. "बरोबर असिंग. जीव जाईंग तर

जाईंग. जर बळी प्राणपणानं प्रतिकार करिंग, तर जुल्मी जुल्म करिंगच शकिंग न."

तशी बावळ्याला परत बोलायला चावी मिळाली. "पन आये मला मरायला देईना. म्हनली, दुसऱ्याच्या पापाची शिक्शा तू कशापायी सवताच्या जीवाला देतो? तू मरून त्याला तर काय बी फरक पडायचा नाय. पन आमाला पडतो हाय. तू लोकाचा इचार करनार की आमचा? हे बी दिस जातील. आशा कंदी सोडू नगं."

"माणसांना आशेंज इतकाईंग जबरी पाश दुंजा असिंग न. काईंग तुंज आशा फळिंग?" लाकीने विचारले.

"पुढं महन्यात त्या हरामखान्याचा मालक बेवडा पिवून टेर मेला. त्याच्या मागं वारसदारांची मारामारी झाली. त्यामंदी आमी पळायचा अवसर साधला." बावळ्याने सुफळ आशा उघड केली.

"नी तुंज आब्रूंज काईंग होईंग? लोक काईंग म्हणिंग तुमाला?" लाकीने थंडपणे विचारले.

बावळ्याने सरळ म्हटले, "लोकं? ती काय बी बोलतील. ती आपली असतंतच कंदी?" त्याला काही आठवले. "तू बी रझाकाराच्या कैदंत होती ना?"

"होईंग." लाकीचा आवाज ताठरला. "तिंथ मंज सगळी आब्रू सांडिंग होईंग. काईंग तुला उष्टी होईंग बाई चलिंग न? तंस्स तर तंस्स. तुंज मर्जी. तुंज काईंग वाटिंग मंज पर्वा होईंग न."

बावळ्याला तिच्या इतक्या टोकाला जाण्याचा अर्थ कळेना. "तुला इतकं काय बा जीवाला लागलं? मी अस्सं काय म्हनलं? बऱ्या दिसाची आशा, हाच आपला तेवा आधार असतो की."

"बरे दिस? विटाळलल्यांज आयुष्यात परत कंधी बरे दिस येईंग न." लाकी कडवटली. "मी बऱ्या दिसांज आशेवर न, त्यांज सगळ्यांज सूड घेईंग इराद्यानं जीव राखिंग होईंग." बावळ्याला याउप्पर काय बोलावे कळेना. ती ज्या त्या बोलण्याचा अर्थ विपरित धरू लागली होती. धुम्मस मारून गप्पगार राहिली.

बोळात धुरंधर दाखल झाल्यामुळे त्याचा मोठा जयजयकार झाला. छप्परावरची दुक्कल आपल्या आठवणींतून पुन्हा वर्तमानात परतली. सजग झाली. "आता आमाला तू एकच न्यायांज आशा असिंग." जमावाने गलका केला.

"साहेब सरकार, तू आमांज नेता असिंग. नीलकंठेश्वरांज महंत नी त्यांज चेल्यानं आमांजवर शारीरिक अत्याचार नी जुल्म करिंग असिंग. पण त्यांज पाठराखणा राजकारणी रावजी असिंग, कारणिंग

आमांज दाद सरकार दरबारी होईंग न. साहेबसरकार तू ती दाद मिळविंग." शरणनने हात पसरुन आपले गाऱ्हाणे ऐकविले.

दाराच्या आतल्या गोष्टींचा या दाद गाऱ्हाण्याशी इतका विपर्यास होता, की मुकेशला हसण्याची उबळ रोखण्यासाठी दोन्ही हातांनी तोंड गच्च आवळून घ्यावे लागले. निताली मात्र फार गंभीर झालेली. तिने त्याला रागाने हाणले. तो अस्पष्ट कण्हला. "आता मी तुला सांगतो, तो काय काय बोलनार हाय. ऐक की?" बावळ्या राजकारणी बाईसाहेबांनी मोर्चा थारवायला काय काय सांगितले होते? ते आठवू लागला. "पैलं बोलंल की हे सीमेपलीकडच्या शत्रूचं कारस्थान हाय."

"महंतांज हवसचा सीमापार काईंग संबंध?" निताली विचारतच होती की धुरंधर तेच बडबडला.

"लोक हो, तुमी आज मंजवर इतकाईंग विश्वास दाखविंग. मंजपाशी तुमांज गाऱ्हाणं आणिंग. मी तुमांज विश्वास कंधी तोडींग न. तो नीलकंठेश्वर मंज तुमांज दाद पुरी करिंग बळ देईंग. मी उदईकच महान महामहीमांना भेटिंग तुमांज निवेदन देईंग. लक्षात घेईंग. आज आमांज सगळी शक्ती नी विश्वास त्या महान महामहीमांजपाठी होईंग जरूरी असिंग. कारणिंग शत्रू आमांज आपापसात भांडण लाविंगसाठी हे अंस्स गोष्टी पसरविंग असिंग. आमांजमंदी फूट

टाकिंग होईंग. पण काईंग या देशांज तुमांज सारखी हुशार माणसं त्याला फसिंग? तुमी बोलिंग. काईंग आमी शत्रूंज कटाला बळि पडिंग?"

धुरंधराच्या या आवाहनावर लोकांनी मोठ्याने नाहीचा गजर केला. "आता तो शत्रूनं पार मागं, मागच्या काळात काय काय जुल्म केलं ते सांगंल." मुकेशने डोळे मिचकावले.

"मी महंताला ओळखिंग न. जर त्यानं अपराध करिंग होईंग, तर त्याला जरूर शिक्षा होईंग. काईंग? या देशात कायदा सगळयांजहि वरती असिंग. नी सगळयांज वरती मायबाप न्याय करिंग कोण असिंग?" काही वेळाने उत्तर आले नाही, तसे धुरंधराने स्वतःच ते दिले. "आमांज तारणहार महान महामहीमा. जरा आठविंग. शत्रूनं आमांजवर काय काय जुल्म करिंग होईंग. आमांज मायबहिणींज अब्रू लुटिंग. आमांज देशांज धनदौलत लुटिंग. आमांज देशांज लोकांना गुलाम करिंग. कारणिंग? तेहवा महान महामहीमांज सारखी नेता आमांजपाशी होईंग न. तंस्स कोणी तेहवा होईंग, तर काईंग तेहवा आमांज आब्रू कोण लुटिंग? बोलिंग?"

धुरंधराच्या या आवाहनावर पुन्हा लोकांनी नाहीचा मोठा गजर केला. "ऐक. तो सांगतो की नाय? लोकांनो तुमच्या समद्या त्रासाला आनी गरिबीला ते सीमापारचं लोकंच जबाबदार हायती. तुमचा

कारभार हाकनारं आमी अजाबात नाय." मुकेशच्या जोडीला यावेळी नितालीच्या चेहऱ्यावर सुद्धा हास्याची बारिकशी रेषा उमटली.

"चोर, तू लोकांना हसिंग न. आमी यांज काईंग करिंग ते सांगिंग?" नितालीने त्याला हलका चिमटा काढला.

"आतमधली पिंजऱ्यातली ती कैदी मानसं नागडी हाय. तेवा तुझं मधमाशी इथं बोळातच सोड. आत नाय." सुरेशने कट थोडा बदलला. "मी या धुरंधराला मधमाश्यांपासून वाचायला घोंगडं देन्याच्या बहान्यानं त्यात गळाठतो. आनी तू इथं वरती खेचून घे. काय? मंग मी या नारेबाजांना दार खोलून आत धाडतो. जरा कळंल तरी यांना, धुरंधराची खरी वळख."

निताली तिच्या पेटीत दडवून आणलेल्या मधमाश्यांच्या जिवंत मोहोळाला काळजीपूर्वक बाहेर काढण्यात गढली. त्या दोघांनी माश्यांना परतवणारे वासमारू तेल आपल्या अंगाला चोपडले.

"लोक हो जर अंस्स सक्षम नेता, महान महामहीमा तुमांज देशांज कारभारी असिंग, तर काईंग इतकीईंग माणसं जमविंग होईंग? काईंग तुमांज या देशात न्यायावर विश्वास न. उदईक मंज घरी तुमांज पैकी चार जण येईंग. मी त्यांना महान महामहीमाला भेटविंग.

विसरिंग न, की तुमांज नी या देशांज जे जे वाईट होईंग असिंग, त्या सगळयांज कारणिंग कोण?" धुरंधराने परस्पर उत्तर देऊन टाकले. "सीमापार आमांज उत्कर्षावर जळिंग लोक असिंग. मी तुमांज विश्वास देईंग की त्यांना महान महामहीमांज नेतृत्वांज खाली, आमी अंस्स धडा शिकविंग, की पुनहा ते आमांज वाटेला कंधी येईंग न. तर बोलिंग महान महामहीमांज जय." लोकांना त्याने जयजयकारात गुंतवून टाकले.

तो जयजयकार आकाश भेदून गेला. मग आकाशातून प्रतिसाद म्हणून मधमाश्यांचे मोहोळ खाली टपकले. माश्या खवळल्या. जो सापडेल त्याला डंख मारत सुटल्या. बोळात हाहाकार उडाला. जे बघे बोळाच्या रस्त्यावरच्या टोकाशी होते, ते सुटून पळून जाऊ शकले. अरुंद बोळात लोक एकमेकांना तुडवू लागले. मुकेशने धुरंधराला घोंगडे दिले. तो शहानिशा करायच्या फंदात पडला नाही की घोंगडे कोण देतोय? त्या घोंगड्यातला फासा आवळून नितालीने राजकारणी वरती ओढून घेतला.

मुकेशने दिंडी दरवाजा खोलून घातला. तश्या काही माश्या आतहि घुसल्या. आतमध्ये गिऱ्हाईकांची धावपळ उडाली. कोण कोणाला जुमानण्याच्या स्थितीत राहिला नाही. तलवारधारी गोंधळले. सुरेशने आणि रमेशने तलवारी हिसकावल्या. रमेश

तलवारवाल्यांशी लढू लागला. तलवारधाऱ्यांना एकाच वेळी माश्या आणि वार चुकवता येईनात. त्यांचा पाडाव होत गेला. सुरेशने तलवारीच्या जोरदार तडाख्याने पिंजऱ्याचे बांबू कापले. हा कटाचा भाग नव्हता. तरीहि. "मेजाखाली दडिंग." रमेशने त्या लोकांना सूचना केली. नागव्यांनी मेजांवरची आच्छादने स्वतःला आच्छादण्यासाठी वापरली.

उघड्या दारातून एकामागून एक या जागेला अपरिचित माणसे आत घुसू लागली. तलवारधारी आणखीन गोंधळले. त्यात दाराकडचा विरोध मोडून रमेशने तो आख्खा रुंद दरवाजा उघडून घातला. मग माश्याच माश्या सगळीकडे घोंगावू लागल्या. अंगाला प्रतिरोधक फासलेले सुरेश आणि रमेश मात्र बिनधास्त त्या मधमाश्यांमध्ये वावरत होते. ते बोळात परतले. वरून मुकेशने त्यांना खुणेची शीळ घातली. बोळ आता रिकामा झाला होता. घोंगडे खाली आले. निताली आणि मुकेश सुद्धा. रमेशने ते खांद्यावर घेतले. चौकडीने तिथून अपहरण फत्ते करत पळ काढला.

काही वेळाने धुरंधराची माणसे त्याचा आणि कैद्यांचा शोध घेत वेश्याबाजार धुंडाळू लागली. त्यावेळी धुरंधराचे घोंगडे तिथू◌ून पाच कोस दूर एका बंदिस्त पायरथाच्या टपाखाली उघडले जात होते. त्याच्या तोंडावरची आवळलेली पट्टी काढली जाताच,

धुरंधराच्या तोंडातून धमक्यांचा पाऊस बरसला. प्रत्युत्तरात रमेशने त्याचे सटासट फटक्यांनी थोबाड फोडले. ही गोष्ट छमदसाठी कायम नवलाईची होती, की इतर माणसांच्या शारीरिक छळाचे हुकूम अतिशय थंड डोक्याने देणारे हे हुकूमबाज, स्वतःच्या शरीराला अल्पशी तोशीस सहन करु शकत नसत. एकाच दणक्यात मऊ पडत असत.

"महामहीमांज काईंग गुप्त कारस्थान सुरू असिंग?" सुरेशने धुरंधराचे हाताचे कोपरे चिमटले. "सांगिंग जितकं वेळ लाविंग, तितकं तुंज शरीरांज दुखापत वाढत जाईंग."

"तुमी कोण असिंग? बंडबागी?" धुरंधर अंदाज घेत होता. "तर मंग तू मंज जिवंत सोडिंग न. मी बोलिंग तरहि. बोलिंग न तरहि." भीतीच्या घेऱ्यात सुद्धा त्याची विचारशक्ती शाबूत होती.

"तंस्स तर आमी बंडबागी जुल्मबाजांना जीवे सोडिंग न." त्याच्या हनुवटीला तर्जनीवर उचलत निताली फुसकारली. "पण आज तुला सोडिंग. कारणिंग की तुला बंडबागीनं पकडिंग नी तिंज गुपित उघडिंग, हे महामहीमाला कळिंग न. तू तर जाणिंगच की जर तिला कळिंग की तू बंडबागीला तिंज गुपित सांगिंग, तर ती तुला जीवे सोडिंग न. तेहवा आज आता जे काईंग होईंग असिंग, ते तू

पण चूप्प. आमी पण चूप्प." तिच्या बोलण्याचा आशय लक्षात आल्यावर धुरंधराच्या चेहऱ्यावरचा ताण निवळला.

"तुमाला महामहीमांज कुंठ गुपित जाणिंग होईंग?" धुरंधर यातून काय चलाखी करता येईल, त्याचा विचार करू लागला. "पैशांज गुपित, लष्करांज गुपित, घरांज गुपित, प्रेमींज गुपित…"

"सगळीच गुपितं आमाला हविंग." त्याच्या हनुवटीला बोटाने दिलेला आधार नितालीने सोडून दिला. सुरेशने वरून फटका हाणल्यामुळे त्याची हनुवटी मग त्याच्या गुडघ्यावर आपटली गेली. त्याची जीभ दातात चावली गेली. 'स्स हाय!' तोंडातून निघाले.

"पहिलं गुपित सांगिंग की महामहीमा काईंग अंस्स अस्त्र बनविंग असिंग, जे ती शत्रूंज देशात बंडबागींना पुरविंग होईंग?" रमेशने आपली मागणी पुढे रेटली. "ते अस्त्र या देशांज बंडबागींना म्हणहजे आमाला पण हविंग होईंग."

"अस्त्र?" एक जास्तीचा दणका खाल्यावर धुरंधराला ते आठवले. "हां! ती अग्निअस्त्र बनविंग असिंग. जे डागिंग तर, कोसभर अंतरावरून कितीईंग मोठी इमारत बेचिराख होईंग."

"म्हनजे शेपनास्तर." मुकेश बडबडला.

"त्यांज काईंग उपयोग? निकामिकानं ते बंद पडिंग." नितालीने शंका काढली.

"ते मंज काईंग ठाविंग?" धुरंधराने खांदे उडवले.

"हा खोटं बोलतो हाय." त्याचे बारकाईने निरीक्षण करणाऱ्या मुकेशने ताबडतोब आपल्या साथीदारांना सावध केले. "त्याची हालचालच सांगते हाय. लक्शनं तसलीच हाय." तस्सं लगेच धुरंधराने आपल्या गुडघ्यांना थरथरवणे बंद केले. "ती नाय. दुसरीच. आवाजातल्या चढउताराची." मुकेश हसला.

"ए, आमांजपाशी खोटंईंग ओळखिंग कुशल तज्ञ असिंग. पुनहा जर तू काईंग खोटंईंग बोलिंग, तर तुला जिवंतच सोडिंग. पण तू तुंज हात गमाविंग होईंग." रमेशने धुरंधराला बजावले. तसा तो सुतासारखा सरळ आला. घडाघडा सगळी गुपिते ओकू लागला.

महामहीमाचा पित्त्या शास्त्रज्ञ बेरहम निकामिकांनाच निकामी करणारी तोड शोधण्यात व्यग्र होता. त्यात त्याला जवळजवळ यश मिळाले होते. मोलूची बायको फिलू ही निकामिकांची तज्ञ होती. म्हणून बेरहमला हवी झालेली. म्हणून महंताकरवी अपहृत करवली गेली होती. मात्र तिला कुठे नेली आहे? वा बेरहमचा गुप्त तळ कुठे आहे? ही माहिती धुरंधरला नव्हती. त्याचा या प्रकल्पात सहभाग मर्यादीत होता. सरकारी पातळीवरच्या इतर विभागांकडून, या प्रकल्पातून बाहेर उद्भवणाऱ्या गोष्टींची चौकशी सुरू झाली, तर ती

बंद पाडणे वा त्या गोष्टींकडे काणाडोळा करायला लावणे. एवढा आणि तेवढाच.

"तुंज बेरहम कुंठ भेटिंग?" सुरेशने पुढचे सूत्र गाठायच्या इराद्याने विचारले.

"मंज बेरहम सवताहा भेटिंग न. त्यांज खास माणूस निरोप देईंग." धुरंधराने ते सूत्र मोघम दिले. "आकाशगंगा कलामंडलात तो मंज भेटिंग. दर बुधवारांज संगीत कार्यक्रमाला. सगळ्यात पुढंईंग रांगेत दारांज डावीकडून दहाव्या आसनाशेजारी. आमांज दोघांसाठी ती आसनं कायम आरक्षित होईंग."

"कोण असिंग तो?" नितालीने धुरंधराचे बखोट ओढले. "त्यांज नाव काईंग?"

"मंज न ठाविंग." धुरंधर एका चढउतारहीन सपाट आवाजात बोलला.

"हा खोटं बोलला की." मुकेशने लगेच त्याचा उजवा हात वर धरला. "रमेश हा कापनार काय?"

"नाईंग." आपला हात सोडवून घ्यायचा व्यर्थ प्रयत्न करत धुरंधर ओरडला. "तिंज नाव धनवती. ती बडी व्यापारी असिंग. तिला सगळंईंग शहर ओळखिंग." तो मुकेशकडे भूत पाहावे तसा पाहत होता.

बावळ्याला बढाई मारण्याची ही संधी सोडवेना. धुरंधराच्या नजरेतल्या प्रश्नाला त्याने उत्तर दिले. "काय हाय ना, मानसाला बाकी कसली बी हालचाल दाबता येईल. पन डोल्याच्या बावल्यांची हालचाल रोखनार कश्शी?" धुरंधराने पराभव मान्य असल्यासारखी मान डोलावली. "म्हनजे परवा आमाला नाचगानं बघायचं हाय? व्वा! मला हे काम आवडायला लागलं हाय. काय बरीशी नाचतात ना ती?" मुकेशने उत्साहाने विचारले.

"तिंथ फक्त शहरांज उत्तमात उत्तम कलाकारांना सादर करिंग. ते कलाकार हीच आकाशगंगांज नक्षत्र होईंग." राजकारण्याने तोंड भरून आश्वासनाची संधी सोडली नाही. मुकेशचे डोळे लखलखले आणि नितालीने त्याला एक हलकी टपली मारली.

# १०० वर्षे पुढे - प्रकरण २५

आकाशगंगा मंडल कलाकारांच्या अदाकारीने लखलखण्याआधीच आकाशदिव्यांच्या चमचमाटाने लखलखत होते. ते एक मोठे खुले पटांगण होते. ज्यात मध्यभागी रंगमंच होता. त्याभोवती गोलाकार चढत्या पायऱ्यांच्या रुपात आसनांची रांगेत व्यवस्था होती. मधला मोकळा भाग चाळीस वार व्यासाचा होता. त्याभोवती गर्द जांभळ्या मखमाली आसनांच्या दहा बारा गोलाकार रांगा होत्या.

सगळ्यात शेवटच्या वा वरच्या रांगेमागून दोर आकाशात उंचावलेले होते. त्या दोरांच्या वरच्या टोकांना बांधलेले आकाशदिवे त्यांना वर खेचत होते. त्या सगळ्या आकाशदिव्यांना एकत्र बांधणारे दोराचे रिंगण आणि त्या रिंगणातली नक्षीदार दोराची जाळी छतासारखी मंचावर तरंगत होती. तिला लोंबणारे असंख्य दिवे अधांतरी टांगलेल्या झुंबराचा आभास देत होते. वा तारांगणाचा. त्यांच्या उजेडाने मंचावरच्या स्फटिक फरश्यांची रांगोळी झगझगत होती. जणू खालच्या जमिनीवरती सुद्धा नक्षत्रे पसरलेली होती.

सगळयात बाहेरच्या आसनरांगेमागे जुनी मोठ्या तामनवृक्षांची रांग होती. त्यांच्यावर फुललेला जांभळा फुलोरा त्या कलामंडलाचा दिमाख आणि वैभव वाढवत होता. तर त्यांच्यावर सोडलेल्या मोगऱ्याच्या वेलींवरच्या फुलांचा मंद दरवळ प्रसन्नता आणत होता. संध्याकाळ नंतरचे सुखद वारे अंगावरून जात होते. शहरातल्या नामी व्यक्तींची गर्दी सळसळणाऱ्या उंची कपड्यांमध्ये आजूबाजूला वावरत होती. एकमेकांना हलक्याफुलक्या नर्म विनोदांनी आणि स्तुतीसुमनांनी रिझवत होती. अत्तराचे फाये परिमळत वातावरणाला षौकिन बनवत होते. माहोल उत्साही रंगतदार होता.

कार्यक्रम सुरू होण्याची सूचना देणारी पहिली घंटा निनादली. इकडे तिकडे फिरणारे लोक दुसरीकडे कोणाकडे न जाता, आपापल्या आसनक्रमांकांकडे लगबगीने परतू लागले. रमेश आणि सुरेश जोडीने दुसऱ्या रांगेत बसलेले होते. पुढच्या पहिल्या रांगेतील आसनक्रमांक दहाच्या जितक्या जवळ जाता येईल तितके. त्या आसनाच्या बरोबर मागे असणारी सहा आसने धनवतीच्या अंगरक्षकांसाठी आरक्षित होती. मुकेश आणि निताली पहिल्या रांगेत आसन क्रमांक सोळा व सतरावर बसलेले होते. मुकेश सारखा चुळबुळत होता. "मी कंधी अस्सं पैल्या रांगेतून तमाशा पायला नाय

हाय. नाचनाऱ्यांस्नी हात बी लावता येईल इतकं जवळ वाटतंय की."

"तू मुका असिंग." निताली त्याच्या कानाला लागत खेकसली. "बोलिंग काईंग? चूप. एकदम चूप."

मुकेशने आसन क्रमांक दहाच्या पलीकडील विरूद्ध बाजूला बसलेल्या आपल्या साथीदारांकडे नजर टाकली. "मधली सुट्टी झाली की आपन वडे खायचं ना? छम..." जीभ चावली. "रमेशाला एकट्यालाच धा-बारा लागतील की."

"आम्ही वडे खाईंग मतलबाईंग न, काईंग दुंज कारणिंग इंथ असिंग." निताली चरफडली. "तू जर पुनहा बोलिंग, तर मी तुंज बाजूनं उठिंग नी दुंजा जागी जाईंग."

"पन ते धनवतीवालं कोनच कस्सं अजून आलं नाय?" मुकेशने तिची धमकी मनावर घेतली नाही. "धुरंधरानं तिला सावध केलं असंल काय?" निताली यावर त्याला काही सुनावणार असती, तोच दुसरी घंटा झाली.

"ती बाई नाय आली तरी बी आपन नाचगानं पुरतं बघायचं ना? इतकी म्हागाईची तिकटं काढली हाय की. म्हनून इचारतो हाय. वसूल करू आनी मंग जाऊया की." त्याच्या मनातली खरी धाकधूक त्याने बाहेर काढली. त्याची चुळबुळ जास्तच वाढली.

नितालीने आपल्या केसांनी झाकलेल्या कपाळावर हात मारुन घेतला.

धनवती न आल्यामुळे फक्त बंडबागींमध्येच नव्हे, तर रंगपटात देखील अस्वस्थता पसरलेली होती. मधल्या गोलाकार रंगमंचापासून थोडे दूर त्यावर कलाकारांना प्रवेश करण्यासाठी रंगपटाचे दार उघडत होते. बाकी रंगपटाचा भाग आसनरांगांच्या पायऱ्यांखाली दडलेला होता. रंगमंचाच्या पातळीखाली रंगपट असल्याने, तिथवर पोहोचायला उतरत्या पायऱ्या होत्या. रंगपटात नाटकासाठी पंधरा-सोळा रंगलेल्या आणि सजलेल्या कलाकारांमध्ये जोरदार खुसपूस चालू होती. "धनवती जर आज येईंग न, तर आमी करिंग निदर्शनांज काईंग उपयोग?"

"मालकिणबाईच जर असिंग न, तर आमांज अडचण कोणाला सांगिंग?"

"संचालकांज मनमानीला दुंज कोण आवरिंग शकिंग?"

"तो कपटी आमांज सगळा मेहनताना लुबाडिंग, सवताहांज भर करिंग असिंग. त्यांज किती तक्रारी आधी करिंग असिंग. धनवती काईंग दखल घेईंग न. तिला भली समजिंग न."

"मी तर म्हणहिंग की हा भीमडा त्या धनवतींज इशाऱ्यावर नाचिंग बाहुला होईंग. तीच त्याला सांगिंग असिंग की आमांज मेहनताना देईंग न."

"नाईंग गं. तंस्स होईंग न. मंज खात्री असिंग की या भीमडांज बदमाषी मालकिणीला माहीत असिंग न. तिला आमी सगळे मिळिंग सांगिंग तर खरंईंग कळिंग. तर तिंज खात्री होईंग की हा संचालक लुच्चा असिंग."

"धनवती भली की बुरी? पण अजून ती येईंग असिंग न. तर आमी आता काईंग करिंग? आधी ठरिंग तंस्स सगळ्या प्रेक्षकांसमोर नाटक करिंग नाकारिंग की न?" सगळ्यांमध्ये उठून दिसणाऱ्या ऋजूजानने कळीचा प्रश्न विचारला. "तिसरी घंटा होईंग आधी ठरविंग जलदीनं."

तिसऱ्या घंटेची ठणठण सगळ्यांच्या कानात वाजली. सगळे कलाकार एकमेकांकडे पाहू लागले. "चलिंग. आधी ठरिंग तंस्सच. आज नाटक होईंग न. आज संप." रत्नांगी सरसरली. पायऱ्या चढत रंगमंचावर निघाली देखील.

"होईंग. आज सोक्षमोक्ष होईंग जाईंग. आज आमांज असहकार आंदोलन होईंग." राहीलने तिला पाठबळ देण्यासाठी तिच्या मागोमाग कूच केले.

"भीमडा मुर्दाबाद." त्याच्या मागोमाग साहीमने घोषणा दिली. ते सगळे "हाय हाय" चे नारे देत पायऱ्या चढून वर प्रेक्षकांसमोर आले. ऋजूजान एकटी मागे रंगपटात उरली. मनाचा हिय्या करत शेवटी ती सुद्धा रंगमंचावर जाऊन सहकाऱ्यांसोबत उभी राहिली. प्रेक्षकांमध्ये हा वेगळाच तमाशा पाहून खळबळ माजली.

"आत्ता गं बाय?" मुका मुकेश पुन्हा एकवार मुकेपण सोडून नितालीच्या कानात खुसपुसला. "धनवती बी नाय. आनी नाच गानं बी नाय? ती कोन ती लय सुंदर नटी हाय, तिनं महान युगनायकांसारखी कापडं घातली हाय." मग त्या सौंदर्याने दिपलेले डोळे जरा निवळल्यावर त्याला इतरांचेहि तपशील दिसून आले. "तो कोन एक गडी रचनेशाची कापडं ल्यायला हाय. आनी जलग्न्यापरि बी एक हाय."

"हुं!" निताली विचारात पडली होती. "महान युगनायकांज कथा सादरिंग हा खेळ होईंग. पण आता तो होईंग वाटिंग न." ती सुद्धा अंमळ निराशेने चुटपुटली.

"नाय बा कशापायी? आमी समजावू की यांस्नी." मुकेशच्या आवाजात आत्मविश्वास होता. ते काम करायला आधीच रंगमंच व्यवस्थापक भीमडा सरसावला होता.

"काईंग तमाशा होईंग हा? तुमांज जे काईंग विषय होईंग ते मागाईंग आमी बोलिंग नी सोडविंग. आधी हा खेळ पुरा करिंग." त्याच्या स्वरात दमबाजीचा सूर होता.

"न." रत्नांगीने पाय जोरात आपटला. "गेल्याईंग खेळाला तू हेच म्हणहिंग. त्या आधीहि हेच म्हणहिंग. तुंज विश्वास याउप्पर करिंग न." ती प्रेक्षकांकडे वळली. "रसिक हो, तुमी आमा कलाकारांज मायबाप होईंग. तुमीच आमांज न्याय करिंग. गेले तीन महिन्यांज मेहनताना आमाला मिळिंग असिंग न. आमी पोट कंस्स भरिंग ते सांगिंग. आमांज मेहनताना मिळविंग देईंग. आमी लगेच खेळ सुरहू करिंग. तुमाला पुरेपूर खूश करिंग."

प्रेक्षकांमध्ये जोरदार चर्चा सुरू झाली. तो एक गलेलठ्ठ शेठ प्रेक्षकांमधून उभा राहिला. "कलाकार हो, तुमांज पैस्सं आमी प्रेक्षकांनी बुडविंग न. आमी पैस्सं पुरेपूर मोजिंग असिंग. तर आमाला काईंग अडविंग दाखविंग? आमांज काईंग दोष असिंग न. आमाला काईंग शिक्षाईंग? खेळ होईंग न, तर आमांज पैस्सं परत करिंग होईंग." नितालीने न राहवून मुकेशला माहिती दिली की हाच तो लालाजी शेठ, ज्याच्या बंगलीत त्यांनी काचबनात आश्रय घेतला होता.

"रसिक हो, तुमी पैस्सं आमाला न, या भीमडाला मोजिंग असिंग." राहिलने शेठियाला ठणकावले. "तुंज पैस्सं त्यांजकडून परत मागिंग." तसा लालाजी भीमडाला गाठायला निघाला.

बाजू आपल्या अंगावर शेकतेय दिसल्यावर संचालक जरा नरमला. "प्रेक्षक हो, खेळ जरूर होईंग. आमांज कलाकारानं तुमांज वेळ फुकाईंग दवडिंग, यांज मी माफी मागिंग." कलाकारांकडे वळला. "मी तुमाला हात जोडींग. खेळ सुरुईंग करिंग. तुमांज सगळा मेहनताना तुमाला पुरेपूर मिळिंग. मी शब्द देईंग. मालकिणबाई धनवती हिशोब करिंग इंथ होईंग न. म्हणहून देरी होईंग. त्यांजपाशी पैस्सं आणिंग तातडिईंग माणूस धाडिंग. तो येईंग. तोवर खेळ थांबविंग न. मायबाप प्रेक्षकांज खोटी करिंग न."

"तुंज शब्दांज विश्वास?" साहीमने नाटकातलं एक राखीव छद्मी हास्य हासलं. "सुर्य एक वेळिंग पश्चिमेंज उगविंग, पण हा भीमडा त्यांज शब्द पाळिंग अशक्य. अशक्य. अशक्य."

"आधी हातात पैस्सं ठेविंग. मगच खेळ सुरू होईंग." रत्नांगीने ठसक्यात मान मुरडली. बाकी सगळ्यांनी एकमताने तिची साथ दिली. संचालकावर बोट रोखून खोटारडा, लुच्चा, लबाड, बेईमान आदि शेलक्या शिव्यांचा वर्षाव केला. त्यामुळे भीमडाच्या अंगाची लाहीलाही झाली. तो रागाने पेटून उठला.

"तुमी सगळे मर्यादा पार करिंग असिंग. तुमाला आता माफी असिंग न." भीमडाने हाताच्या मुठी वळल्या. "तुमाला सगळ्यांना कामावरून काढिंग असिंग. चालू पडिंग मंज रंगमंचांज बाहेर. तुमांज जागी कामाईंग खरेईंग इमान राखिंग, दुंजे कलाकार मी आणिंग. त्यांज खेळ करिंग. तुमांजविणा मंज काईंग अडिंग न."

"तुंज तोंडी इमान शब्द शोभिंग न." राहीलने हुर्यो उडवली. "रसिक हो, हा असिंग यांज खरा चेहरा. आमी केवळिंग रंगमंचावर अभिनय करिंग कलाकार. हा रोज जीवनाईंग हर घडी हर एका संग अभिनय करिंग बनावटदार. आमांज सगळ्यांज तीन महिन्यांज कमाई सगळी हडपिंग, आणि उलटईंग आमाला चालू पडिंग सांगिंग. ए आईसझुक्या, आमांज कष्टांज वाटा घेईंगशिवाय तुला कंस्सच सोडिंग न." रंगमंचावरुन उडी मारून तो खाली आला. चवताळून भीमडावर धावून गेला.

"महान रचनेशाचं काम करायला गडी लायक हाय खरा. काय उडकी मारली हाय. व्वा!" मुकेशने शाबासकी दिली.

"त्यानं या संचालकांज मुडदा पाडिंग होईंग." नितालीने ओठ दातांमध्ये चावला. संचालकाचे चमचे सुरक्षारक्षक त्याच्याशी झटणाऱ्या राहीलला ओढून काढायला भिडले. "त्यांज आमी मदत करिंग होईंग."

"ही तेंची लढाई हाय. तेंनी सगळ्यानं मिळून लढली पायजेल." मुकेशने तिच्याशी असहमती दर्शवली. "मुडदं पाडायचं झालं तर त्येनी पाडायचं तरी आनी कोना कोनाचं?"

"तू?" नितालीच्या कपाळावर आठ्या उमटल्या. "तू बोलिंग हे? तूच मंज सांगिंग होईंग की कोणा जमिनदारानं तुमा मजूरांना कंस्स छळिंग होईंग. काईंग तू त्याला माफ करिंग होईंग? जंस्स तुंज दुख, तंस्सच सगळ्यांज."

"व्हय. त्यानं आमाला लय तरास दिला. एकदा दोन दिस खानंच काय? पिन्याला पानी बी दिलं नाय. मी तर चौदा वरसांचा पोर होतो की. बाकीच्या बाप्यांइतका कामाचा उरक मला जमायचा नाय. पन ते नुस्तं सांगायचं कारन. मी तेंच्या इतका उरक दावला असता ना, तर त्या समद्यांना कामचोर बोलता." मुकेशच्या नजरेसमोर ती दृश्ये तरळू लागली.

"उसाच्या फडात तेवा आमी वेठबिगार होतो. लय दिस जाल्लं. मालकानं मजूरांस्नी दिलल्या आधीच अपुऱ्या धानात बी मुकादम हात मारी. ते बायेर कोनास्नी इकायचा नी पैकं करायचा. ह्ये मालकास्नी समजावं, म्हनून आमी समद्यांनी एकठाव काम बंद केलं. मुकादमानं भाड्याच्या गुंडाकडनं आमाला चाबकानं फोडलं. पन आमी मानलं नाय. मालकाला जेवा कळलं, तेवा तो आला की

रमटत ताव मारुन आमच्यावर. मारानं काम होत नाय म्हनल्यावर, समद्यांचं दानापानी पुरतं बंद करून टाकलं."

"तुंज पुरान मंग ऐकिंग. चलिंग. ती माणसं त्या कलाकारांना मारिंग मारिंग त्यांज जीव घेईंग आधी." नितालीने मुकेशचा हात ओढला. लांब बसलेल्या सुरेश व रमेशला खुणावले. पण त्यांच्याकडून नकारार्थी प्रतिसाद आला. सुरेशने तिला थांबायला खुणावले. ती तोंड फुगवून परत बसती झाली.

"आधी ते कलाकारांनी तेंच्या मानसासाठी पुढं झालं पायजेल." मुकेशने नितालीला समजवायचा प्रयत्न केला. "पन ते तितकं सरळ नाय हाय. आमच्यात बी तसलं मालकाचं, मुकादमाचं चमचं होतंच. तेच्या चुळभर इतक्याश्या मेहरबानीचं मिंधं. तेंनी साथीदारांच्या डोक्यात फूट घालायचं काम इमानइतबारानं केलं. चार फुटले. तेंना पानी मिळालं. बघून अजून काही फुटलं. एकी मोडली तशी उरलल्या सगळ्यांचं मालकानं जे काय हालहाल केल्लं."

बावळ्याचे डोळे आता सुद्धा त्या आठवणीने धगधगले. "मी जाम पेटून उठलो. माझा नेम पैल्यापास्नं बिनचूक हाय. मी आयेला म्हनलं की अस्सं रोज रोज मरन किती दिस मरायचं? शेतात

दगडगोट्याची काय कमी नाय हाय. पैलं लांबून नेम धरून मालकाचं डोस्कं फोडतो. मंग मुकादमाचं. मंग चमच्यांचं."

"मंग? फोडिंग?" नितालीला आता त्याच्या कहाणीत जरासा रस वाटला.

"नाय." मुकेशने दात विचकले. "आयेनं मला इचारलं, कोना कोनाचं आनी किती जनांचं डोकं मी फोडनार? किती काळ फोडत राहू शकनार? हा मालक मेला नी समजा आमी जरी तिथनं पळून जीवानिशी सुटलो, तरी जानार कोनाकडं? दुसरीकडं तसलाच मालक असनार. तसलाच मुकादम. तसलंच चमचं."

"मंग तू काईंग उत्तरिंग?" नितालीने मुकेशच्या डोळ्यात डोळे लावत विचारले. "म्हणहजे आमी काईंगच करिंग न?"

"मी आयेला हेच इचारलं. मंग मी करायचं तरी काय?" मुकेशच्या डोळ्यात जग साकाळून भरून आलं. "आये म्हनली, ज्यानं दुसऱ्याचं वायेट केल्लं. त्याचं पुढं वायेटच होनार. तू त्याचं वायेट केल्लं तर तुझं बी पुढं वायेट होनार. तो पाप करतो हाय. त्याचं त्याला. तू कशापायी आपल्यावर वढून घेतो? तू पाप करु नको."

"पाप? अन्यायाईंग प्रतिकार करिंग, तर ते पाप होईंग?" नितालीचा आवाज चढला. तिला प्रसंगाचे भान राहिले नाही. "मी अंस्स शंभर पाप करिंग तयार अस्सिंग. त्यांज पापांज शिक्षा त्यांना

मिळिंगच, अंस्स प्रत्यक्षिंग मी कंधी बघिंग न. जर आमी त्यांना फटके देईंग न, तर त्यांज ऐष-चैन-जुल्म तंस्सच चालिंग. त्यांज पाप थांबविंग त्यांज पापांज शिक्षा आमीच देईंग लागिंग. आपोआप कंधी कोणांज मिळिंग न."

"बदल्याच्या बदल्यात बदलाच मिळनार. बदल्याची साखळी चालू राहनार. त्याच्यातून काय भलं होत नाय. जो डोस्क्यात बदल्याची धुम्मस घेतो, त्याच्या जिंदगानीची धुम्मस होवून जाते. अस्सं माझी आये म्हनायची." मुकेश हिंपुटी झाला. "हे दिस नी तरास कदी तरी संपनारच. बरे दिस येनारच, या आशेवर जगायचं."

"मंज डोक्यांज बदला घेईंगांज ताप होईंग न, ताण होईंग न, म्हणहून बदला नाईंग. हे म्हणहजे सवतांज त्यासाठींज कष्ट-त्रासातून स्वस्तात सोडविंग होईंग. कर्तव्यांज पासून दुबळयानं पळिंग होईंग. कोल्ह्यांला द्राक्ष आंबटिंग. मी अंस्स कणाहीन जिणं जगिंग न." नितालीने मुकेशला साफ धुत्कारले. "तू बसिंग इंथच. हातावर हात धरिंग बऱ्या दिसाईंग वाट बघिंग. मी जाईंग लढाईंग." उसळी घेत ती संचालकाच्या धटिंगणांपासून राहीलला सोडवायला धावली.

तिथे ऋजूजानचा आपल्या नाजूक मुठींनी त्यांना आवरायचा अपयशी प्रयत्न चालला होता. त्या प्रहारांनी फारतर त्या धटींगणांना

गुदगुल्या होत होत्या. ते फिदीफिदी हसत राहीलला झोडत होते. साहीम ऋजूजानच्या मदतीला धावला. त्याच्या पाठोपाठ मग बाकी सगळे कलाकार. रत्नांगी सगळयात शेवटी लढाईत सामील झाली. मुकेश बनलेल्या बावळयाने याची नोंद घेतली. कलाकारांची लढाई त्यांनी एकवटून लढायला सुरुवात केली होती.

तसा बावळया उठला आणि मदतीला धावला. प्रेक्षकांपैकी बऱ्याच जणांनी आता खेळ होणार नाही याची खात्री पटून, जागांवरून उठून बाहेरच्या दारांकडे मोर्चा वळवला होता. लालाजी शेठसारख्या पैसा वसूलदारांनी मात्र संचालकाला घेरा घातला होता.

"तुमा सगळयांज पैशांज पूरेपूर परतावा दोन दिसांत तुमांज घरपोच होईंग. तुमी धनवती बाईसाहेबांज पत जाणिंग नाईंग काईंग? त्यांज विश्वास होईंग न?" संचालक भीमडाने वेळ निभावून न्यायचा प्रयत्न केला.

लालाजी शेठ सोडून बाकीच्यांना हे मान्य झाले. मात्र पैसे बनवायची कोणतीहि संधी न सोडणाऱ्या वा तशी ओढून आणण्यात वाकबगार लालाजीला, तिकीटांच्या परताव्या जोडीने या खेळखंडोबा बदली भरपाई हवी झाली होती. "ते तू सवताहा बाईसाहेबांज संग बोलिंग ठरविंग. बाईसाहेब आता महान

महामहीमांज संग बैठकीत असिंग. तुला हविंग तर त्यांज संग दूरभाष जोडिंग देईंग काईंग?" संचालक कमी कावेबाज नव्हता. लालाजीला स्पष्ट न बोलता पंगा कोणाशी आहे, याची त्याने सूचक जाणीव करून दिली.

लालाजीची बोटे हवेत कशावर तरी पक्कड जमवू पाहावे तशी शिवशिवली. मग नाईलाज होऊन पक्कड सोडून दिल्यासारखी हवेतच फडफडली. जड मनाने त्याने तिथून काढता पाय घेतला. प्रेक्षागार ओस पडलेले दिसू लागले.

तसे सुरेश आणि रमेश रंगमंचाजवळ चालू असलेल्या संचालक विरोधात आणि बाजूने लढणाऱ्यांच्या घमासनात सामील झाले. लढाईचं कसलेहि तंत्र न जाणणाऱ्या कलाकारांना पिटणे धटींगणांना सोप्पे पडलेले. पण या कसलेल्या लढवय्यांचा सामना करणे त्यांना जमेना. त्यांचे बळ आणि जोर फिक्का पडत गेला. त्यातले काही घायाळ होऊन पडले. उरलेले पाठ दाखवून पळून गेले.

भीमडाचा हात राहीलने गच्च पकडून ठेवलेला. त्याला पळ काढता आला नाही. तो एकटा त्याच्या मूळ अपेक्षे विपरित स्वतःच पारध बनून बळी पडला. चारहि बाजूने कलाकारांकडून ठोकठोक ठोकला गेला. त्यांचा सगळा मुरलेला राग उफाळून आला होता.

भीमडा माराने बेशुद्ध पडायची पाळी आली. तशी सुरेशने कडक आवाजात सगळ्यांना हात आवरायची तंबी दिली. भीमडाला दमात घेतले, "ए नाडचुक्या, तुंज साहेबीण ती माजोरडी धनवती आता कुंठ सापडिंग? ते खरंखरं सांगिंग. नाईंग तर तुंज मुडदाच इंथ शिल्लक राहिंग. बोलिंग?"

"बाईसाहेब महामहीमांज संग..." भीमडाला त्याचे वाक्य पुरे करायला मिळाले नाही. त्याआधी त्याचे थोबाड जबरदस्त रमेशच्या जबरदस्त ठोश्याने फोडले गेले. त्याचे काही दात तुटून तोंडातून रक्ताची धार वाहू लागली. ऋजूजान ते बघून भोवळली. राहीलने तिला बाजूला नेले.

"आमी लालाजी नाईंग. तुंज बारसं जेविंग असिंग. खरं सांगिंग नाईंग तर तुंज श्राद्ध इंथच घालिंग." रमेश बनलेल्या छमदच्या आवाजात, थरकाप उडवणारी सच्चाई असल्याचे जाणवल्याने भीमडा थरकापला.

"बाईसाहेब आज त्यांज मद्यालयांज हिशोब घेईंग तिंथ जाईंग असिंग." त्याने चटकन तुटक्या दातांतून बोबडे उत्तर दिले.

"कुंठ असिंग तिंज मद्यालय?" सुरेश बनलेल्या साथीने भीमडावर लाथ मारत विचारले. त्या धपक्याने तो मान टाकून खाली कोसळला. त्याची हालचाल बंद झाली. साथीने खजिल

होत साथीदारांसमोर हात उडवले. "मंज काईंग माहीतिंग तो जीव सोडिंग म्हणहून?"

"मंज माहीतिंग तिंज मद्यालय कुंठ असिंग." रत्नांगी उत्साहाने म्हणाली.

"चलिंग तर." निताली बनलेल्या लाकीने दाराच्या दिशेने बोट दाखवत रत्नांगीला पुढे चलण्याची खूण केली. "ते दाखविंग."

"आमी सगळे सोबत येईंग." भानावर आलेल्या ऋजूजानने आर्जवले.

"व्वा! लय झ्याक.... सुंदरच सुंदर होईल की." मुकेशने हे बोलताच नितालीकरवी त्याच्या कुशीत इतरांना नकळत करकचून चिमटा काढला गेला. त्यामुळे त्याच्या तोंडातून अस्फुट किंचाळी निघाली.

## १०० वर्षे पुढे - प्रकरण २६

ते मदिरालय शहराच्या सीमेवर होते. भाड्याच्या पायरथांचा वापर करुन संपकरी कलाकार व त्यांना साथ देणारी लढाऊ बाण्याची दोन माणसे मदिरालयाच्या समोर पायउतार झाली. ते सगळे कलाकार त्यांच्या रंगभूषेसह तसेच निघालेले असल्याने, वाटभर शहरवासी शोभायात्रा पहावी तसे त्यांना कुतुहलाने पाहत होते.

ते मदिरालय अंड्याच्या आकाराचे नव्हते. हे बघून बावळ्याने सुटकेचा श्वास सोडला. त्या अंडाइमारतींचा भेद कसा करावा? हे कोडे त्याला सुटले नव्हते. वेषांतरित छमदने ते ओळखून त्याला कोपरखळी मारली. बावळ्याने तोंड वेंगाडले. मदिरालय म्हणजे कापडी तंबूंचे संकुल होते. पताका आणि कनातींनी सजवलेले. रंगीबेरंगी प्रकाश देणाऱ्या लंबक दिव्यांनी उजळलेले. आतल्या लोकांच्या हालचाली सावल्यांच्या रुपात त्यावर नाचत असणारे.

त्यातल्या मोठ्याश्या तंबूच्या दाराशी चार द्वारपाल उभे होते. कलाकार मंडळाने मोहरा तिथे वळवला. त्यांच्या सोबत लढाऊ मदतगारांनी. आतून वाद्यांवर वाजवले जात असलेले हलके संगीत ऐकू येत होते. आणि पेल्यांचे नाजूक किणकिणाट.

झोकांड्या खाणाऱ्या दोन झिंगलेल्या दारुड्यांना आतून दोघे तगडे सरबराईदार गचांड्या पकडून बाहेर घेऊन आले. मद्यार्काचा झिणझिणवणारा वास दरवळला. दारुड्यांना रस्त्याकडेला ढकलून दिले गेले. मातीत लोळत त्या दारूड्यांनी धनवतीला शिव्यांची लाखोली वाहिली. त्याकडे दुर्लक्ष करत ते दोघे सरबराईदार आपल्या कामाला आत परतून गेले. बाहेरचे दोघे द्वारपाल दोघा दारुड्यांना लाथा हाणायला पुढे सरसावले.

बावळ्या त्यांना रोखायला सरकत होता की छमदने त्याला कानगोष्टी करून आवरला. "साथी नी लाकी येईंग न, तोवर काईंग हालचाल नाईंग."

दारुड्यांचा आवाज प्रत्येक लाथेसरशी चढत गेला. त्याकडे दुर्लक्ष करून कलाकारांच्या सर्वात पुढे चालणारी सरसावली. "ए तू? मंज धनवती बाईसाहेबांना भेटिंग होईंग. रत्नांगी येईंग म्हणहून सांगिंग तिंज." तिने मारे टेचात पुढे होऊन दारूड्यांच्या वरचढ आवाज लावत सुतोवाच केले.

"कोण तू?" द्वारपालाने तिचा पचका केला.

"मंज ओळखिंग न?" रत्नांगीने फणकाऱ्याने विचारले. "मी आकाशगंगाज कलाकार असिंग." यावर तो द्वारपाल गोंधळात पडला.

तो काही विचारणार तोच त्याचा जोडीदार बडबडला. "ती ऋजूजान मी ओळखिंग. जी आकाशगंगाज कलाकार होईंग. नी हा साहीम होईंग. तो राहील. पण तुला न. काईंग नवीन भरती होईंग असिंग?" यावर रत्नांगीचा तिळपापड झाला.

"आमाला धनवती बाईसाहेबांना ताबडतोब भेटिंग होईंग. आज खेळ होईंग असिंग न." साहीमने संधी साधत विषय स्पष्ट केला. द्वारपाल विचारात पडला. मग जवळ असलेल्या एका टांगलेल्या थाळीवर त्याने दंडा आपटला आणि  मोठा आवाज केला. त्यासरशी आतून एक बाई लगबगीने बाहेर आली. बावळ्याने हेरले की त्या सर्व कर्मचाऱ्यांचा पोषाख सारख्या कापडाचा आणि रंगसंगतीचा होता. द्वारपालाने थोडक्यात विषय तिला समजावून निरोप आत धाडला.

इथे आतूर क्षणांचे भेडसावणारे मोहोळ उठलेले असताना, बराच वेळ दवडून ती बाई परतली. "धनवती बाईसाहेब भेटिंग राजी असिंग. पण कोण दोघांनीच आत येईंग. आत जमावांज गडबड होईंग न." यावर कलाकार मंडळात कोणी कोणी आत जावे? याची गडबड माजली. त्यांचे एकमत होईना. एवढ्यात सुरेश आणि निताली एका पायरथातून येऊन पोहोचले. रमेशने त्यांना इथल्या परिस्थितीची थोडक्यात कल्पना दिली.

"तुमांज पैकी कोणी एक, आणि त्यांज पाठबळ पुरविंग आमांज पैकी कोणी एक आत जाईंग." साथी उर्फ सुरेशने प्रस्ताव दिला.

"न. त्यांज काईंग गरज असिंग न." रत्नांगीने ताबडतोब तो धुडकावला. "तुमी आमांज साठी लढिंग. हे तुमांज उपकार. इंथ लढिंग गरज काईंग असिंग न. तेहवा...." तिच्या अनुच्चारित वाक्यात उघड 'आता टळा.' अशी सूचना होती.

"इतकी देर तुमाला कशापायी झाली?" मुकेश उर्फ बावळ्या नितालीच्या कानाला लागला. तिने त्याला हाताच्या बाहीतून हातचलाखीने गुपचुप खाली सरकवून काही गुटी दाखवल्या. पुन्हा बाहीत गायब केल्या. "या आणिंग म्हणहून." तिच्या या उत्तराने त्याला फारसा बोध झाला नाही.

"तुमी जर समजिंग की आमी तुमांजसाठी लढिंग, तर ते समजिंग चुकिंज असिंग." रमेश उर्फ छमद ती समजूत खोडून काढायला सरसावली. "धनवतींज संग वेगळा हिशोब आमांज चुकता करिंग होईंग."

"मंग तो तुमी तिंज वेगळिंग भेट मागिंग करिंग होईंग." राहीलने चट् का फट् मुद्दा स्पष्ट केला. "आमांज संग काईंग?" यावर चौकडी आणि कलाकारांमध्ये मोठीच गडबड उडून राहिली.

थोडा वेळ त्या गोंधळाची मजा घेतल्यावर, ती बाई उत्तरली की धनवतीने फक्त ऋजूजान आणि रत्नांगीला आत येण्याची परवानगी दिली आहे. हे ऐकल्यावर रत्नांगीचा चेहरा तोऱ्यात चढला. ऋजूजानचा घाबरून पडला. "मंज वाद जमिंग न. मी काईंग बोलिंग?"

तिचा हा अस्पष्ट विरोध त्या बाईने लगेच उडवून लावला. "मंग फक्त रत्नांगीच आत येईंग."

"न. न. न." बाकी सगळ्या कलाकारांनी एकसाथ गलका केला. "ऋजूजान तू आत जाईंगच होईंग." सगळ्यांच्या आग्रहाला बळी पडत ती तयार झाली.

"तिंज जल्म बळी जाईंगच होईंग, अंस्स दिसिंग." लाकी बावळ्यालाच ऐकू येईलशी त्याच्या कानात कुजबुजली. "चलिंग. आमाला आत जाईंग दुंजा रस्ता शोधिंग होईंग." तसा बावळ्या तिच्याबरोबर बाजूला सटकला.

साथीने प्रश्नार्थक नजरेने दूरुन पाहता, लाकीने नजरेनेच त्याला खुणावले. तसा त्याने छमदचा हात धरला. तेव्हा गोंधळून तिने त्याच्याकडे पाहता, नेत्रपल्लवीने साथीने छमदला बेत समजावला. दूर जात असलेल्या लाकी व बावळ्याच्या जोडगोळीकडे बघून मग

ती साथीसह विरोधी दिशेला सटकली. कलाकार आपापसात एवढे गर्क होते की त्यांच्या लक्षात चौकडीचे बाजूला होणे आले नाही.

तरी त्यांचा हा खेळ चलाख द्वारपालांच्या नजरांपासून सुटला नव्हता. त्यांनी सुद्धा एकमेकाला नजरेच्या खाणाखुणा केल्या. पण त्यांची अडचण ही होती की त्यांना दारावरचा पहारा, तो देखील दारासमोर जमाव जमलेला असताना, सोडून जाता येणार नव्हता. मुख्य द्वारपालाने पुन्हा एकवार पाचारण थाळीवर घण घुमवला. यावेळी एक कर्मचारी बुवा आतून बाहेर प्रकटला. त्याला दोन जास्तीची माणसे पुरवायचा सांगावा देऊन, परत आत धाडण्यात आले.

आधीची बाई कलाकारांच्या प्रतिनिधींना मालकिणबाईंच्या पर्यंतचा मार्ग दाखवण्यात व्यस्त होती. दारू पिण्यात व्यस्त गिऱ्हाईकांनी भरलेले दोन तंबू पार करुन गेली होती. तिथल्या छाती उघडी टाकून फिरणाऱ्या सरबराईदार बायका आणि कमरेखाली नागव्या फिरणाऱ्या सरबराईदार पुरूषांना पाहून, ऋजूजानची छाती जाम दडपून गेली होती. रत्नांगी मात्र आसुसल्या नजरांनी त्यांचे सौष्ठव पिऊन घेत होती.

आत सगळ्याभर लाल रंगाचा मंद प्रकाश म्हणण्यापेक्षा मंद काळोख पसरलेला होता. त्यात बोलभांडांचे आवाज,

कोणाकोणाचे गडगडाटी हसणे नी कोणाकोणाचे उसासणे मिसळलेले होते. वेगवेगळ्या मद्यांचे वेगवेगळे आंबूस वास फसफसत होते. गुदमरवून टाकत होते. तंबूंच्या उघड्या फटिंमधून येणाऱ्या वाऱ्याच्या थंडगार झुळुका हुडहुडवत होत्या.

अंगावर येऊन जणू कोसळू पाहणाऱ्या, झटू पाहणाऱ्या, धरू पाहणाऱ्या बेफाम दारुड्यांपासून स्वतःला वाचवताना ऋजूजानची त्रेधातिरपिट उडत होती. आणि ते बघून होणारा जळफळाट लपवण्यात रत्नांगीची. त्या दोघींची त्रेधा पाहून फुटणाऱ्या खिजवट हास्याने पोट दुखू लागल्यामुळे, ते हासू आवरण्याची धनवती दासीचीहि त्रेधा उडालेली.

तिथे तंबूंबाहेर सावजांच्या मागावर गेलेल्या शिकारी कर्मचाऱ्यांची त्रेधा, मग त्यांनाच सावजांनी घेरल्यावर उडालेली होती. त्यानंतर त्यांचा गणवेष त्यांच्या अंगावरून ओढून काढण्यात आणि मग तो आपल्या अंगावर चढवताना बावळ्याची. या काळातील कपड्यांशी त्याचं गणित अजूनहि जमत नव्हते.

लाकी आणि बावळ्याची मदिरालयात बिनबोभाट वावरायची सोय करण्यासाठी, जणू ते दोघे कर्मचारी त्यांच्या मागावर आले होते. लाकी आणि बावळ्याने त्या दोघांचे गणवेष आपल्या अंगांवर चढवले. त्या कापडी तंबूंच्या कापडी कुंपणाला टरकावून,

आत घुसखोरी करायला त्यांना अजिबात जड गेले नाही. भरीला आतला मिणमिणता उजेड त्यांच्या पथ्थ्यावर पडला. धनवती कुठे आहे? हे नेमके शोधून काढणे जरा जड होते. "तिंथ तिंज अंगरक्षकांज पहारा असिंग होईंग." लाकी बावळ्याला पुटपुटली.

ते दोघे एका मागून एकेका तंबूत शिरून अंदाज घेऊ लागले. मद्यधुंद गिऱ्हाईके आणि त्यांना मदिरा पुरवणाऱ्या सरबराईदारांमधून वाट काढताना, त्यांच्या गणवेषामुळे त्यांना कुठेहि आडकाठी होत नव्हती. तसे करता करता लाकी तिथल्या एखाद्या हुक्क्याच्या गुडगुडीत राजरोसपणे बाहीत लपवलेली एकेक गुटी टाकून देत होती.

बावळ्याला काही रुमाल लांबवायला तिने सांगितले. बावळ्यासारख्या पट्टीच्या पाकिटमारासाठी हा डाव्या हाताचा मळ होता. तसे काही रूमाल त्याने लांबवून लाकीकडे दिल्यावर, पाण्याचा पेला उचलून त्यात ते रुमाल भिजवून, तिने दोघांच्या नाकातोंडावर बांधले. "रुमाल ओला असिंग, तोवर शुद्धहर गुटींज प्रभाव तुंजवर होईंग न." खुलासा केला.

एक दिर्घ कर्णभेदी किंचाळी एकाएकी त्यांच्या कानांवर आली. "ऋजूजान." बावळ्याने ती बरोबर ओळखली.

"तिंज रुपडं नी स्वर अगदी पहिली दिसिंग, त्याच क्षणी तुंज काळजात पक्कं होईंग जाईंग. नाईंग?" लाकी धुसफुसली. पण तिने त्या किंचाळीच्या रोखाने सरकायला सुरुवात केलीहि होती. तिच्या पावलावर पाऊल ठेवत बावळ्याने. "ऋजूजान जिंथ, धनवती तिंथ." मध्ये आलेल्या एका सरबराईदार बाईला शिताफिने बाजूला ढकलित वाट काढत लाकीने तर्क केला.

अजून एका तश्याच मध्येच बावचळून उभ्या, सरबराईदार बाप्याच्या पुष्ट उघड्या ढुंगणावर चापट मारायचा मोह, न आवरलेल्या बावळ्याकडून उत्तरात, तिला फक्त 'आऊऊ!' हा आर्त उद्गार, तिऱ्हाईत तोंडातून ऐकायला मिळाला.

त्याचा विचार करत बसायला तिला वेळ नव्हता. लाकी घाईघाईने किंचाळीवाल्या तंबूपर्यंत पोहोचली. ऋजूजानच्या अंगाशी तिचे चुंबन घेण्यासाठी एक दारूडा झटत होता. धनवती दासी खुसखुसत मजा बघत उभी होती. तर रत्नांगी काही मदत न करता शुंभासारखी बाजूला उभी राहिलेली.

लाकीच्या एकाच मानेवरच्या वर्मी फटक्यानिशी लोळागोळा होऊन तो फटींग खाली कोसळला. तसा धनवतीच्या दासीच्या चेहऱ्यावर राग साकळला. तोच बाहेरच्या दारावरचा पाचारण घणघणाट जोराने झाला.

"यानं मंज पुठ्ठ्यावर चापट मारिंग. तंस्स चापट मारिंग अधिकार फक्त मालकिणबाईंज होईंग." बावळ्याने चापट लगावलेला सरबराईदार तक्रार करायला मागे धावत आलेला. बावळ्याने दातओठ करकरवले. तोंडातल्या तोंडात चार शिव्या त्याला हासडल्या. "वर मंज शिव्या देईंग असिंग. हा अधिकार सुद्धा इंथ फक्त मालकिणबाईंजच असिंग. काईंग? हा गौरहर तर खासा मालकिणबाईंज माल असिंग. तर....." त्याने मुरका मारला.

यावर ओठांवर आलेल्या शिव्या प्रयासाने ओठांतच गिळत, धनवतीच्या दासीने काही नावांचा पुकारा केला. ते कोणी धावून आले नाहीत. ती काहीशी गोंधळलेली असताना गौरहर बडबडला, "त्यांज काईंग बोलविंग? हेच तर असिंग ते." त्याने बावळ्याच्या चेहऱ्यावरचा रुमाल दूर करायची अपयशी लगट केली आणि बदल्यात दुसऱ्या कुल्ल्यावर पुन्हा एक चापट खाल्ली. "आऊऊ!" कोल्ह्याने हाळी द्यावी तसा तो ओरडला.

त्या हाळीच्या वरताण पुन्हा दारावरचा घणघणाट जोरात न थांबता वाजायला लागला. ऋजूजानच्या किंचाळिने कलाकार मंडळी अस्वस्थ झाली होती. त्यांना थारावणे द्वारपालांना कठीण झाले होते. दासीला काय करावे सुचेना.

"आमाला आधी धनवतीबाईंज कडे पोचविंग." रत्नांगीने दासीच्या वरचढपणाचे उट्टे काढत फर्मावले. दासीने जळजळीत नजर तिच्यावर टाकली. ती काही खरमरीत बोलणार, तोच रमेशच्या नेतृत्वाखाली तंबू तंबूतून मुसंडी मारत कलाकारांचा जथ्था धावत तिथे येऊन पोहोचला.

"ऋजू तू ठिक असिंग काईंग?" राहिलने धपापत्या आवाजात विचारले.

"न. हिनं आमांजवर लगटिंग दारूडे सोडिंग." रत्नांगीने पलटी खात सरळ आरोपाची राळ दासीवर उडवून दिली.

"रे? नुस्ते बघिंग काईंग? हाकलिंग या सगळयांना आधी बाहेरिंग." दासी गणवेषधारी बावळ्या व लाकीवर कडाडली.

इतके होईतो काही सरबराईदार काय प्रकार झाला तो बघायला धावून आले होते. ते सगळे कलाकारांवर चालून जाता, रमेश व सुरेशने थोडक्याच वेळात त्या सगळयांना जमिनीवर लोळवले. दासी हतबल होत रुमालाआड चेहरा दडलेल्या बावळ्या व लाकीकडे संशयाने पाहत राहिली.

"चलिंग तुंज मालकिणीपाशी." छमदने दयामाया न दाखवता दासीला हाताने जोरदार थोबाडवत हुकूम केला. ती गुमान मानहानी आणि वाहू लागलेल्या रक्ताचे घोट गिळून धनवतीच्या तंबूपाशी तो

सगळा जथ्था घेऊन गेली. सगळयात मागे बावळया व लाकी गेले. वाटेतल्या तंबूतील हुक्क्यामध्ये गुटी मिसळायची आपली तजवीज इमानदारीत पार पाडत.

मालकिणीच्या तंबूपाशी राखणीला असणाऱ्या धनवतीच्या कुशल अंगरक्षकांनी सगळा रागरंग क्षणात ओळखला. पुढे असलेल्या रमेश आणि सुरेशला त्यांनी सहा जणांनी मिळून घेरले. त्या निष्णात लढवय्यांपुढे ते संख्याबळाने कमी पडले. छमद व साथीची नांगी सहज ठेचली गेली. कलाकारांचा क्षणिक विजयोन्माद ओसरला.

दासीने कुत्सितपणे रत्नांगीवर नजर रोखली. तिने नजर चुकवत मान खाली घातली. तेव्हा त्या विजयाच्या क्षणिक उन्मादात दासीला आपल्या फुटलेल्या दोघा रक्षकगणांचा विसर पडला. जो तिला नंतर फार महागात पडणार होता. ती दोघे मागच्या मागे हातोहात पसार झाली होती. आणि त्यांच्या सोबत त्यांची तक्रार करायला थयथयत येणारा गौरहर स्वतःच्या मर्जीविरुद्ध. तोंडावर बांधला जाण्याऐवजी तोंडात रुमाल कोंबला जाऊन.

लाकीने गौरहरला धनवतीच्या तंबूची मागची बाजू दाखवायची नर्म शब्दात विनंती केली. त्याला नर्म गोष्टींचे वावडे दिसताच, बावळयाने त्याच्या खासगी मालमत्तेवर त्या राखीव पुष्ट

पुठ्ठ्यांवर छान कडक हाताची चापट दिली. तसा तो घोड्यासारखा खिंकाळला. त्याच्या दुर्दैवाने तोंडातल्या रुमालामुळे ते खिंकळणे दुसऱ्या कोणाला ऐकू जाऊ शकले नाही. मग घोड्यासारखा उधळत तो त्यांना धनवतीच्या तंबूच्या मागच्या बाजूला घेऊन गेला.

तिथल्या एकमेव राखण्याची गठडी वळायला लाकीला व बावळ्याला वेळ लागला नाही. संख्याबळाचा गैरफायदा त्यांनी घेतला. हे गौरहरला स्पष्ट दिसले. तरी तो तसे कोणाकडे बोंबलू शकला नाही. तसा त्याने राखण्याला सावध करायचा अशक्यसा प्रयत्न केलेला. आणि बदल्यात एक चापट खाल्ली होती. बरोबर तिथेच. त्याच राखीव जागी.

आतमध्ये चालू झालेल्या वार्तालापातले सहभागी जण बावळ्याला कानमात्रे अंदाजाने ठरवावे लागले. काय काय घडले, याचे तिखटमीठ लावून वर्णन करणारी ती दासी होती. तिला जरबेत प्रश्न करणारी ती धनवती होती. आपण काही अपराध न करता माफी मागणारी ती ऋजूजान होती. आणि दासीच्या कागाळ्यांना उलट्या कागाळ्यांनी शह देऊ पाहणारी ती रत्नांगी होती.

धनवती सुरूवातीला समजून घेण्याच्या सुरात बोलली. बावळ्या ती काय काय बोलणार, त्याचं धावतं समालोचन आधीच

लाकीला सुनावू लागला. "माझा शेठ हेच समदं बोललंला. तो धनदास बी हेच कामगारांच्या नेत्यास्नी बोललंला. ऐक मजा! पैलं धंदा मंदा हायचं रडगानं रडनार."

"ऋजूजान, तुमा कलाकारांना दुनियादारी काईंग माहितींग न. आमा धंदेवाल्यांना काईंग उठाठेव करिंग, कितीईंग लोकांज नी गोष्टींज मेळ जमविंग, पैसा पैसा जोडिंग सगळा कारभार करिंग लागिंग. अंस्स करिंग, आमी चार दिस आमांज कामांज अदलीबदली  करिंग. तुमी कलाकार मंज जागी सगळा धंदा चालविंग नी मी तुमांज जागी आकाशगंगात काम करिंग. मग मंज कामाईंग पैसे तुमी चुकते करिंग होईंग. काईंग बोलिंग?" धनवतीच्या या आव्हानाने ऋजूजान शरमिंदी झाली.

"चलिंग. उदईक पासून तुंज कारभार आमांज ताब्यात देईंग." रत्नांगीने सरळ आव्हान स्वीकारले. तसे धनवतीने ओठ चावले. हे ऐकलंच नसल्यासारखा सरळ विषय बदलला.

"आज काल सगळ्याईंग बाजारात मंदी असिंग. सोन्यांज धंद्यात मंज दीड कोटी रुप्पी नुकसानीत जाईंग. परदेशी जाईंग ती मंज दोन गलबतं मालासंग बुडिंग. गेल्या वर्षात मंज सगळी मिळिंग तरहि दहा लक्ष होनांज खोट होईंग. तरहि मी तुमांज तीन महिने

आधीपावतो पैसे घालिंग. घालिंग की न?" धनवतीने नजर रोखल्यावर ऋजूजानने गपगुमान मान डोलावली.

तीच नजर रत्नांगीवर लागल्यावर तिने मात्र कळीचा मुद्दा रेटला. "पण आकाशगंगा तर दर खेळांज पुरता गल्ला भरिंग. फायद्यात असिंग. तरहि आमांज गेले तीन महिन्यांज मेहनताना देईंग न. आमांज उपासमार होईंग."

धनवतीने यावर एक मोठा दीर्घ सुस्कारा सोडला. तिचे लक्ष दासीकडे गेले. "मयवती, जाईंग बाई. त्या उपाशी कलाकारांज हविंग ती मदीरा हविंग त्या खाण्यासंग देईंग."

"धंद्याचं रडगानं गाऊन नाय भागलं की आपलं रडगानं सुरु करनार. मालक जगला तर ना तुमाला जगवनार? तेवा मालकाचं खटलं पुरं होऊ देईतो कळ सोसा. असं म्हननार. ऐक की!" बावळ्या लाकीच्या कानात हसत चुटपुटला.

"तुमीच सांगिंग. एका धंद्यांज नुकसान भरिंग, मंज दुंजा धंद्यांज फायदा वापरिंग होईंग. नाईंग तर दुंजा काईंग मार्ग असिंग? मंज पत बाजारात राखिंग. तरच हा सगळाईंग इतकाईंग डोलारा चालिंग. जर मंज नाव एका धंद्यात खराब होईंग, तर दुंजा सगळ्यांज मध्ये मंग कोण मंज नावावर पैसा लाविंग? सगळेच धंदे बंद जाईंग." धनवतीचे डोळे डबडबले. ते बघून ऋजूजानचे.

"मंग आकाशगंगा पण बंद होईंग. जर आकाशगंगा नाईंग होईंग, तर तुमी कुंठ जाईंग? जर एक रंगमंच तुमी आज होईंग तरहि बंद जाईंग, तर दुंजा कोण रंगमंच तुमाला उद्या काम देईंग? आकाशगंगा असिंग तर तुमी असिंग. मी असिंग तर आकाशगंगा असिंग. मंज आज पडतीत राखा. मी तुमाला जीवनभर राखिंग. तुमांज वय सरिंग, तेहवा तुमांज पडती येईंग. तेहवा सुदहा मी तुमाला राखिंग. बोलिंग. तुमाला काईग हे हविंग न?" धनवतीने उद्याच्या आशेचे जाळे फेकले.

"बाईसाहेब, तुमांज या मेहरबानींज भारानं आमी वाकिंग नी आमांज माथी चरणांजवर झुकिंग. तुमी उपाशी होईंग तर जरूर आमी संग उपास सोसिंग. पण?" रत्नांगीने एक नाटकी उसासा सोडला. आपली नजर धनवती समोर मांडलेल्या सगळ्या पंक्ती प्रपंचावर फिरवली. तिला काय म्हणायचेय ते हुषार धनवतीला कळलेच. भोळ्या ऋजूजानला सुद्धा यथातथ्य सुस्पष्ट झाले.

"हुं!" बावळ्याने डोळे मिचकावले. "बाता मारून वेळ मारून नेता येत नाय हाय. हे दिसलं की आता ती बाई खऱ्या सौद्यावर येनार. फोडाफोडीसाठी कोन कितक्यात पटतं हाय, त्याचा हिसोब करायला लागनार."

"तू फार हुषार असिंग रत्नांगी. मंज खुशी होईंग की तुंजसारखी बाई मंजसाठी काम करिंग. तुंज या हुषारिंज काईंग खास चीज करिंग होईंग. बाकी लोकांज विचार करिंग तुमाला काईंग गरज? त्यांज लायकी ती तितकीईंगच. ऋजूजान?" धनवतीचा आवाज मधाळ झालेला.

ऋजूजान भिवया ताणून तिला काय म्हणायचेय? याचा अंदाज लावायचा प्रयत्न करु लागली. "तू आकाशगंगांज सगळ्यात खास कलाकार होईंग. लोक तुंज कला पाहिंग म्हणहूनच जणू खेळाला येईंग. होईंग ना?" ऋजूजानचा चेहरा स्तुतीने फुलला. "मी तुंज पगार दुप्पट करिंग. आता इंथच आधींज आणि उद्यांज तीन महिन्यांज तुंज पुरा पगार देईंग. कबूल?"

ऋजूजान गोंधळली. "यात कबूल करिंग काईंग होईंग न?" आपला गोंधळ तिने उघड केला.

"मंज शर्त." धनवतीच्या आवाजातला गोडवा संपला. तो कर्कश्श भासू लागला. "तुंज वाट्यांज पैसे घेईंग नी तू बाजू होईंग. बाकिच्यांज विचार करिंग न." या वाक्यांचा नेमका अर्थ कळायला ऋजूजानला थोडा वेळ लागला. तितका काळ तिथे तणावाची शांतता होती.

मग निर्धाराने ती जागेवरून उठली. तिच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून धूर्त धनवती नकार समजून चुकली होती. "तू मंज दया बघिंग असिंग. मंज राग न. मंज एका शब्दावर तुंज कारकिर्द संपिंग जाईंग. मंज संग वाकडिंग घेईंग, कोण नाटककार तुंज काम देईंग न. काईंग नीट विचार करिंग. तुला शेवटांज संधी देईंग. बोलिंग."

ऋजूजानला कठोर वागणं वा बोलणं स्वभावतः अशक्य होते. "मी मंज साथी कलाकारांज संग राहिंग. रत्नांगी चलिंग. आमी त्यांजकडे जाईंग." एवढेच माफक ती बोलू शकली.

"न. मंज बाईसाहेब बोलिंग ते पटिंग असिंग. मंज हुषारी बाकीच्यांजहून जादा असिंग. मी काईंग ती वाया दवडिंग न." ऋजूजानला नकार देऊन रत्नांगी बाईसाहेबांकडे वळली. "ऋजूजान करिंग ती मुख्य भूमिका नी तिंज जे देईंग म्हणिंग, तितकं पैसं मंज मिळिंग होईंग. तर मी कबूल असिंग."

"तू तितकी हुषार होईंग हे मंज माहित होईंग. म्हणहूनच तिंज पर्याय तुला मी इंथ बोलविंग होईंग." म्हणत धनवतीने आपली हुषारी रत्नांगीपुढे जाहीर केली. यावर त्या दोन्ही हुषार बायका एकमेकींशी एक चालबाज हसू हसल्या.

ऋजूजान किळसून तिथून बाहेर पडू लागली. तशी धनवती कडाडली. "ऋजूजान? मंज उल्लघिंग तुला तंस्स बरी मी सोडींग?"

धनवतीने टाळ्या वाजवून इशारा केला. "कोण असिंग तिंथ बाहेर? मयवती?"

"चलिंग. आमी आत जाईंग वेळ होईंग." लाकी बावळ्याला बडबडली. बावळ्याला तिने इतका वेळ धरून असलेल्या गौरहरला सोडून द्यायला खुणावले.

तसे सोडून देताच गौरहर घरंगळून खाली पडला. बावळ्याच्या चकीत नजरेला तिने शुद्धहर गुटी काढून दाखवली. जवळ राखलेल्या पेल्यातले पाणी पुन्हा दोघांच्या रुमालांवर उडवून ते ओले गच्च केले. हातातली गुटी पेटवली. तिच्यातून धुराच्या वाफा दरवळू लागल्या. धूर सोडणारी ती गुटी धनवतीच्या तंबूचा पडदा वर करून आत फेकली. काही वेळात आतून माणसे धडपडल्याचे आणि खाली आपटल्याचे आवाज आले. तशी तंबूचा तो पडदा कापून काढत दोघे आत घुसले.

बेशुद्ध ऋजूजान आणि रत्नांगी शिवाय तिथे एकच व्यक्ती होती. धनवती चाळीशीतली सौंदर्य राखून असलेली स्त्री होती. दोघांनी मिळून तिची मोट बांधली. तंबूच्या दारातून ती मोट घेऊन बाहेर पडले. तिथे अंगरक्षक आणि कलाकार मंडळी बेशुद्ध पडलेली होती. छमद आणि साथीच्या नाका-तोंडावरचे रुमाल

बाजूला करायची तत्परता कोणी दाखवलेली नसल्याने, सुदैवाने ती दोघं शुद्धीवर होती.

ते बघून बावळयाला हायसं झालं. "मी घाबरलो होतो की मला एकट्यालाच ही पाच मनभर वजनाची बाई वाहाला लागते की काय? तर आलोच!" छमदच्या अंगावर धनवतीचे ओझे ढकलून बावळया परत मागे तंबूकडे पळाला.

तो कुठे गेला? हे बघायला लाकी उत्सुकतेने त्याच्या मागे पळाली. बावळयाने आत जावून ऋजूजानच्या चेहऱ्यावर पाणी शिंपडले. तिच्या चेहऱ्यावरच्या रेषा थरथरल्या. पुन्हा स्थिर झाल्या. बावळयाने आपला नाकावरचा रुमाल किंचित किलकिला करून बघितला. मिरमिरता वास नाकात शिरुन भोवळल्यासारखे होताच, तातडीने नाकावर सारला. मग ऋजूजानच्या अंगावर शोध घेऊन सापडला नाही तेव्हा रत्नांगीच्या अंगावरचा रुमाल शोधून काढला. तो ऋजूजानच्या चेहऱ्याला बांधला आणि पाणी त्यावर ओतले. मग समाधान होऊन उठला आणि परतला.

मागे लाकी त्याचा हा सगळा कारभार पाहत उभी होती. "सगळे पुरूष सारखेईंग असिंग. सुंदर बाईसाठी पाघळिंग." नाक मुरडून ती तरातरा निघाली.

बावळ्याने चेहरा त्रासला. 'कुनावर इतकीशी किरपा बी करायची नाय काय?' त्याला राग आला. पण लाकीच्या मागे जाणे भाग होते.

साथी आणि लाकी ज्या पायरथाने तिथे पोहोचले होते, त्याच पायरथातून धनवतीचे अपहरण त्यांनी केले. दूर एकांतात गेल्यावर पाण्याच्या हबक्यांनी तिला शुद्धीत आणले. त्या धूर्त बाईने आपले अपहरण झाले आहे, हे लगेच ताडले. "काईंग असिंग तुंज मागणी." श्रीमंतीच्या तोऱ्यात विचारले.

ती इतकी सरळ विचारते आहे म्हटल्यावर, लाकीनेहि सरळच मोलूची बायको फिलूचा पत्ता विचारला. हा पैशांचा विषय नाही. धनवतीच्या लक्षात आले. ही माणसं कोण असावीत याचा ती अंदाज घेऊ लागली. "बंडबागी?" आपण इतके अंगरक्षक पोसूनहि अखेर बंडबागींच्या तावडीत सापडलो. या विचाराने ती शहारली.

"तू आमांज प्रश्नांज खरी खरी उत्तरं देईंग, तर आमी तुला जिवंत सोडिंग." लाकीला जणू तिचे विचार वाचता येत होते. "एकदा काईंग महामहीमांज गुपित तू आमाला फोडिंग, की मंग तूंच या सगळ्या गोष्टी तिंजपासून लपविंग चूप राहिंग. आमी तिंज पावते पोचिंग न, तो पावतो तू बोंब मारिंग शकिंग न. या कारणिंग आमी तुला जिवंत सोडिंग."

ही गोष्ट धनवतीला पटली. तरी तिला खात्री हवी होती. "काईंग तू महान युगनायकांज शपथ घेईंग."

"आमी तर महान युगनायकांज शपथ घेईंग. पण तू खरंईंग बोलिंग म्हणहून कोणांज शपथ घेईंग?" लाकीने धनवतीची लाज काढली. तिचा चेहरा रागाने लाल झाला. पण निरुपाय होता. "सांगिंग लागिंग गुमान."

धनवतीने सांगितले की निकामिकांना निकामी करणाऱ्या अस्त्राच्या प्रकल्पाला लागणारी साधनसामुग्री, बेरहमच्या हवाली करायची जबाबदारी तिच्यावर होती. तो मागेल ती आणि तेव्हा. त्यासाठी जो काही खर्च होईल तो स्वतःची पदरमोड करून. कारण सरकारातल्या लोकांना देखील या प्रकल्पाचा सुगावा लागू द्यायचा नव्हता. हा महामहीमाचा खाजगी प्रकल्प होता. बदल्यात अनेक सरकारी कंत्राटे धनवतीला तिच्या घश्यात घालायला मिळणार होती. राजकारणी धुरंधर माणसांना गप्प करायच्या कामी तिच्या दिमतीला देण्यात आला होता.

फिलूचे पुढे काय झाले? हे तिला माहीत नव्हते. एकाकडून फिलूचा ताबा घेऊन दुसऱ्याकडे पोहोचवली. इतकाच तिचा त्यात सहभाग होता. गुप्त प्रकल्पाच्या जागेचा तिला काही माग नव्हता. बेरहम सांगेल तसे, त्या ठिकाणी ती स्वतः माल पोहचवायची. दर

वेळी जागा बदलत असे. तिथून बेरहम स्वतः माल ताब्यात घेत असे. जर कोणाला प्रकल्पाच्या जागेची अचूक कल्पना असणार होती, तर ती फक्त सूत्रधार बेरहमलाच.

"बेरहम कुंठ मिळिंग?" लाकीच्या या प्रश्नावर धनवतीला आश्चर्य झाले. 'सरकारी कार्यालयात. त्याच्या विभागात.' सोप्पे उत्तर होते. "त्याला सहज गठाळिंगाईंगसाठी कुंठ मिळिंग?" लाकीच्या या प्रश्नाला धनवतीकडे उत्तर नव्हते. तिला त्याची इतकी माहिती जमवायचे काय काम? तिचे स्वतःचे व्याप काय कमी होते?

"ए बाई," बावळ्याने त्या चौकशीसत्रात उडी घेतली. "तुला जित्ती सोडाची कबूल केली हाय. पन पैक्यासकट म्हनून नाय. जर तू बेरहमाला गाठायची जागा सांगली नाय, तर...." तो गूढ हसला. "ही पैकंवाली बाई त्या गौरहराचं कुल्लं नेमी थापटते. म्हनून तो सांगत व्हता. रमेश तुला हिचं कुल्लं फोडायचं हाय काय?"

छमद पेटून उठली. धनवती सरळच बोलायला लागल्यामुळे असं काही करायला मिळायची संधी हुकली होती. त्याबद्दल छमद निराश होती. तिने लगेच सरसावत धनवतीला पालथी केली. तिचे कपडे टरकावून ती थापटायची जागा उघडी केली. "न. न." कळवळून थापट पडायच्या आधीच धनवती कळवळली.

"ऑ!" बावळ्या उचकला. "अजून तर थापट मारली बी नाय हाय? शानी बाय ती, चालव की जरा डोकं नी सांग की बेरहमाची कळीची जागा कुठं हाय? बघ कस्सं हाय ना की जर तू आमाला तश्शी जागा सांगली नाय, तर आमी दुसरं काय तरी करायच्या मागं लागनार. म्हनजे तू कुठं कुठं तुझं सोनं लपवून ठेवलंलं असनार. तर आमी आपलं बेरहमाचा माग नाय म्हनून रिकामी असनार. मंग ते सोनं तिथनं तिथनं लुटत बसनार. आता बेरहमाची जागा तुला मायती नसली, तरी तुझ्या सोन्याची तर मायतीच हाय. तुझ्या तोंडातून ती कोळून घ्यायला या रमेशाला काय वेळ लागनार नाय. रमेश, हान थापटी."

पडत्या फळाची आज्ञा मानत छमदने एक सणसणीत थापटी धनवतीच्या त्या गुबगुबीत गोलमटोल अंगभागावर लगावली. "आऊऊ!" धनवतीने न चुकता त्यानंतरच्या प्रत्येक थापटामागे गौरहराप्रमाणे हाळी दिली.

लाकीच्या कपाळावर आठ्या दाट झाल्या. तिला असले प्रकार आवडत नव्हते. लाकी छमदचा हात रोखायला सरसावली. तोच "ज्ञानसागररररर" धनवतीच्या तोंडून निघालेल्या या शब्दाचा अर्थ पटकन कोणाला लागला नाही. लाकीच्या ओठांचा चंबू

झाला. बावळ्याने एक विजयी नजर तिच्यावर टाकली. लाकीने नाक मुरडले.

साथीने छमदला थांबायला सांगितले. डोळ्यांतून वेदनांमुळे पाणी खळत धनवतीने उलगडा केला. "दर शनिवारी ज्ञानसागर ग्रंथालयात सांजेला बौद्धिकसभा होईंग. नवीन नवीन संशोधनांज सादरिकरण नवीन नवीन शास्त्रज्ञ त्यात करिंग होईंग. ते ऐकिंग नी त्यांज कामाला येईंग माणसं हेरिंगसाठी बेरहम खूपदा तिंथ हजर जाईंग. तिंथ त्यांज सरकारी फौजफाटा जोडीला होईंग न."

"मंज ज्ञानसागर माहीतिंग." लाकीच्या या निवेदनामुळे छमदला हात चोळत धनवतीवाली शिकार सोडून द्यावी लागली.

# १०० वर्षे पुढे - प्रकरण २७

एका मोठ्या विस्तिर्ण मैदानाच्या कडेने असणाऱ्या वडा-पिंपळाच्या सावलीत बंडबागी चौकडी विसावली होती. त्या मैदानाच्या सगळ्या बाजूंना या पारंबीवाल्या झाडांची हिरवीगार गर्दी होती. मैदानाच्या मध्यभागी पाच मोठ्या अंडा-इमारती होत्या. तेच होते ज्ञानसागर ग्रंथभांडार. थोड्या माणसांची जा-ये तिथे चालू होती. त्या इमारतींच्या जवळ एक उंच ओटा बांधलेला होता. त्यावर झोकदार शामियाना उभारलेला होता. गाद्या-गिरद्या मांडलेल्या होत्या. पण अद्याप ते व्यासपीठ रिकामे होते.

उन्हे कलू लागली होती. हिवाळ्याचे सरते दिवस असल्याने हवेत सुखद थंडावा होता. पण थेट उन्हात तापण्यापेक्षा इथे या प्रचंड झाडांच्या सावलीत बरे वाटत होते. पिकल्या उंबर-पिंपरांचा गोडुस वास पसरला होता. त्यांच्यासाठी झगडणाऱ्या खारोट्या आणि पाखरांचा कलकलाट ऐकू येत होता. सर्वदूर छान निवांत शांतता होती. ग्रंथ अभ्यासकांना आवडेलशी. हवीहवीशी.

तिथेच काही अंतरावर माडाच्या झावळ्यांचा आडोसा बांधून, त्याखाली काही माणसे अधूनमधून अंगावर येणाऱ्या माशा वारत मांड्या घालून बसलेली होती. त्या तकलादू छतावर कापडी

फलक लावलेला होता. त्यावर 'महामहीमांज निषेधांज आमरण उपोषण' असे लिहिलेले होते.

पायरथांचा एक ताफा धूळ उडवत मैदानात दाखल झाला आणि तिथली शांतता भंगली. उपोषणकर्ते सजग झाले. त्यांच्यावर नजर ठेवून असलेली बावळ्या, लाकी, साथी आणि छमदची चौकडी कंटाळा सोडून तत्पर झाली. पायरथांतून शंभरच्यावर शिपायांचा ताफा हातातले दांडके परजत पायउतार झाला. कवायत केल्यासारखा मैदानात संचालन करु लागला. "तो सगळ्यात लंबाडा असिंग तो बेरहम." लाकीने बावळ्याला माहिती पुरवली.

"इंथ तर त्यांज कार्यालयाहून जादा फौज असिंग." दातात गवताची काडी चघळत छमद निराशेने म्हणाली. "त्याला धरिंग काईंग जुगाड अशक्य असिंग."

"महामहीमांज जय" ती पुढे काही बोलण्याआधी फौजेने त्यांच्या सरकारी मालकिणीच्या केलेल्या जयजयकाराने दिशा दिशा थरारून गेल्या. फौज कोणत्या इराद्याने दाखल झालीय, हे न कळण्याइतके उपोषणकर्ते दुधखुळे नव्हते. त्यांच्यात बरीच अस्वस्थता माजल्याचे दिसत होते. बेरहमने आपला एक दूत त्यांच्याकडे पाठवला. तिथून गायब होण्याचे ते फर्मान होते.

दूताने ते एका लाल केसाच्या चाळीशीतल्या तरुणाच्या हाती दिले. तरुणाने आपल्या बाकी साथीदारांना वाचून दाखवले. सामन्याची सलामी झडली. उपोषणकर्त्यांपैकी सगळयांनीच तिथून न हटण्याचा निर्धार बोलून दाखवला. "तंस्सहि उपोषणानं आमी मरिंग. त्याआधी जर तुमी मारिंग, तर काईंग फरक होईंग न." तर आता संघर्ष होणार होता हे नक्की झाले.

त्याचा वास ग्रंथालयात असणाऱ्या माणसांना देखील लागलेला दिसला. वारूळातून भराभरा मुंग्या चवताळून बाहेर पडाव्यात, तशी माणसे त्या अंडा इमारतींमधून बाहेर पडून जमली. मैदानात लवकरच तीनशे-चारशे माणसांची गर्दी जमली. वातावरणात चांगलाच तणाव पसरला.

दूताने उत्तर पोहचवल्यावर बेरहमने काहीवेळ नजर टकटकवून विरोधी छावणीकडे पाहिले. मग आजूबाजूला जमलेल्या गर्दीकडे पाहिले. व्यासपीठावर चढून गेला. तिथे एक भाषण कोकलायला कर्णा ठेवलेला होता. त्यातून जाहीर केले. "आज बौद्धिक सभा आता सुरु होईंग असिंग. यांज पुढे फक्त सरकारांज परवानाधारकांनाच इंथ उपस्थितींज अनुमती होईंग. इतरांना विनंती की त्यांनी सभा मैदानातून बाहेर होईंग. नाईंग तर सरकारी नियमभंगांज कारवाई त्यांजवर होईंग."

जमलेल्या गर्दीत मोठी खळबळ माजली. मात्र दोघे-चौघे सोडून मैदानातून कोणी बाहेर पडले नाही. बेरहमचे पित्ते भाषणे करायला व्यासपीठावर चढून गेले. फौजेतले दहा-बारा जण व्यासपीठापाशी बेरहमला सुरक्षा पुरवायला थांबले. बाकीचे शिस्तीत मैदानात गर्दीभोवती पांगले. फौजेच्या घेऱ्यात सगळी गर्दी आवळली गेली. बंडबागींची चौकडी मैदानाबाहेर झाडीत एका बाजूला बाहेर राहिली.

"आज बौद्धिक सभेत शत्रूराष्ट्रांज घातक हेतू नी त्यांना साथ देईंग इंथ देशद्रोही या विषयावर चर्चा होईंग. सुरुवात आमांज सर्वमान्य विचारवंत राजामजन करिंग होईंग. लोक हो, त्यांज स्वागतिंग टाळया वाजविंग." बेरहमच्या या सुतोवाचावर गर्दीतल्या मोजक्या काही जणांच्या टाळया पडल्या. फौजेच्या शिपायांनी झाडून सगळयांनी एकसामाईक टाळया वाजवल्या. ते जणू टाळयांचे संचालन चालू आहे असे भासले.

"बेरहमानं त्यांज भाडोत्री वक्त्यांज भाषणाला टाळया वाजविंग म्हणहून भाडोत्री श्रोतेहि आणिंग. कितीईंग ही त्यांज दूरदृष्टी! पण ती भाषणं ऐकिंग जर लोकांसंग फौज ही झोपिंग जाईंग, तर बेरहमांज मग कोण राखिंग?" उपोषणकर्त्यांपैकी तोच तो लाल केसांचा तरुण सर्वांना ऐकू जाईल एवढ्या मोठ्याने म्हणाला. त्या

उपहासाने गर्दीत हास्याची एक लकेर उठली. अनेक जणांची दिशा त्याच्या दिशेने झाली. व्यासपीठाकडे पाठ झाली.

तिथे बोलायला उभ्या राजामजनचा चेहरा पडला. बेरहमने त्याला तुझं चालू कर खूण केली. "आज जर महान महामहीमा होईंग न, तर आमी सगळे इंथ उभे, बौद्धिक सभा ऐवजी शत्रूराष्ट्रांज नेता दिग्गीराजांज भाषण, त्यांज गुलाम बनिंग ऐकिंग होईंग." कर्ण्यातून राजामजनचा आवाज मैदानभर गरजला.

"तंस्स मोठा फरक होईंग न. दिग्गीराजांज ऐवजी आमी महामहीमांज गुलाम होईंग असिंग. काईंग त्या गुलामांज पावतो मंज आवाज पोचिंग?" लाल केसाच्या तरूणाचा आवाज कसाबसा कर्ण्याच्या मोठ्या आवाजापुढे ऐकता आला.

"गनाजाबा तू बोलिंग राहिंग. चिंता न करिंग. आमी ऐकिंग." गर्दीतून कोणी किंचाळले. मग गनाजाबा आणि राजामजन यांच्या आवाजांची लढाई मैदानात चालू झाली. बंडबागी चौकडी गनाजाबाच्या खूप जवळ असल्यामुळे त्यांना त्याचे बोलणे बरेच स्पष्टपणे ऐकता आले. कळले. कदाच बेरहम दूर व्यासपीठावर आणि कर्ण्याच्या जवळ असल्याने त्याच्या कानांपर्यंत ते पोहचत नसावे. बेरहमने नाहीतर चार-पाच वाक्ये ऐकल्यावरच फौजेला गनाजाबाचा गळा घोटायचा आदेश दिला असता.

"महामहीमांज सत्ताग्रहण हेच मुळात महान युगनायकांज दंडकांना उल्लंघून होईंग असिंग. सांगिंग मंज, काईंग या सभेत महान युगनायकांज बारा दंडक माहीत होईंग न, कोणी अंस्स असिंग? काईंग मी ते नव्याहनं सांगिंग होईंग?" गनाजाबाच्या या प्रश्नावर बावळ्याने लगेच हात उंच केला.

त्याचा हात लाकीने तसाच खाली खेचला. 'मी हाय.' हे त्याच्या तोंडातले शब्द साथीने तोंड आवळून धरल्याने बावळ्याला बोंबलता आले नाहीत. तो थोडा धडपडला. मग त्याने शरीर ढिले सोडले. तसे निश्चिंत होऊन साथीने त्याचे तोंड मोकळे सोडताच तो परत बोंबलू गेला. पण सावध लाकीने ते परत तातडीने आवळले. तसे त्याने गुदमरल्याचे नाटक केले. तेव्हा तिने ते किंचित ढिले केले.

"पन मला मायती करून घ्यायचं हाय ना, ते दंडक?" बावळ्या तोंडावरच्या पक्कडीतून कसाबसा धुसफुसला.

"खुळचुका, मी तुला ते मंग सांगिंग. इंथ बोंबलिंग लोकांज नी फौजेंज लक्ष ओढविंग न." लाकीने त्याला ताकिद दिली. आपल्याला ती मान्य असल्याचे बावळ्याने मुंडी हलवून दर्शवल्यावरच तिने त्याचे तोंड सोडले.

"कुंठहि काळात, कुंठहि देशात, कुंठहि कारणानं जेहवा केहवा माणसं एकत्र येईंग-राहिंग, तेहवा त्यांज समाज तयार होईंग. त्या समाजात जे बारहा गोष्टी आपसूक अस्तित्वाईंग येईंगच, त्यांज संबंधितच महान युगनायकांज हे बारहा दंडक होईंग." गनाजाबाच्या या खुलाश्यानं बावळ्याची चुळबुळ थोडी थारावली.

"महान युगनायकांनी सांगिग होईंग की जेहवा समाजात महत्वांज बदलांज निर्णय होईंग, तेहवा ते नेहमी एकमतानं होईंग. निव्वळ बहुमतानं होईंग न. जेहवा पावतो एकमत होईंग न, तेहवा पावतो वाट पाहिंग. नाईंग तर काळांज कसोटीवर ते निर्णय खरेईंग उतरिंग न." गनाजाबाच्या या बोलण्यात अद्याप फौजेला आक्षेपार्ह काही वाटले नव्हते. तो पुढच्याच वाक्याने फौज खवळली. "पण महामहीमांज पदग्रहण हे प्रतिनिधी मंडळांज एकमतानं नाईंग, तर केवळिंग एका जास्तींज मतानं होईंग असिंग. म्हणहजे उरलेल्या अर्ध्या समाजांज विरोध डावलिंग. उपेक्षा करिंग."

महामहीमाचा मोठा जयजयकार करून त्यात गनाजाबाचे पुढचे शब्द फौजेने विरवून टाकले. "त्यानं महान युगनायकाचा कितवा नियम सांगितला हाय? काय ऐकायलाच आलं नाय की." बावळ्याने तक्रार केली.

फौजेचा आरडाओरडा त्यांचा दम जिरल्यावर जरा उतरला. तशी गनाजाबाने पुढे सुरवात केली. "महान युगनायकांनी सांगिंग होईंग की पगारी सैन्यांज दसपट स्वयंसेवी सैन्य, ज्या समाजात स्व-संरक्षणासाठी सहजिंग गोळा होईंग, तोच समाज परचक्रांज सामन्यात यशस्वी होईंग. अंस्स लोकांज सैन्य ज्यांज एका हाकेसरशी गोळा होईंग, तोच खरा समाजांज नेता होईंग. पण महामहीमानं गेल्यहा तीन वर्षात तिंज हुकमाखाली पगारी सैन्यांत तिप्पट वाढ करिंग असिंग." सभेतून क्षीणसे 'महामहीमा हाय हाय.' आवाज ऐकू आले. तर त्यांच्या कितीतरी पटिने मोठ्या आवाजात फौजेने गनाजाबाचा निषेध केला.

"काय बा, हा गनाजाबा लोकांचा नेता अजून बनलंला वाटत नाय. त्याच्या हाकंसरशी लढायला उभं ठाकनारी लय कमी दिसतंत हाय." बावळ्याने आपली मल्लीनाथी साथीदारांना सुनावली.

फौजेचा गलबला शमल्यावर गनाजाबाने परत सुरुवात केली. "महान युगनायकांनी सांगिंग होईंग की लोकांजवर कर असिंग न. कराची सक्ती तर अजिबात असिंग न. जेहवा पावतो सरकारांज कारभार लोकांज ठाकठिक वाटिंग, तेहवा पावतो लोक खुषीनं सरकारला पैसं देईंग. सक्ती तेहवा होईंग जेहवा सरकारी कारभार बेकार होईंग. महामहीमानं सैन्यांज पगारांज बोजासाठी लोकांजवर

सत्तींज करवसूली तिप्पटीनं करिंग असिंग." यावेळी मात्र लोकांनी मनापासून तिच्या हाय-हायच्या हाळया लगावल्या. फौजेतल्या मोजक्या काही जणांचे चेहरे लाजेने लाल झाले. बाकी सगळयांचे रागाने. त्यांच्या हातातले दंडुके शिवशिवू लागले. पण अजून वरून आदेश आला नव्हता.

"महान युगनायकांनी सांगिंग होईंग की जेहवा समाजात एखादईंग गोष्टीवर बंदी वा एखादईंग गोष्टीला परवाना लागिंग, तेहवा ते एकाच नाण्यांज दोन बाजू होईंग. यांज अर्थ राज्यकर्ते लोकांना विश्वासाला अपात्र खोटेईंग मानिंग, लोक एकमेकांना विश्वासाला अपात्र खोटेईंग मानिंग, नी खरेईंग विश्वासाला अपात्र खोटे तेच राज्य करिंग होईंग." गनाजाबाच्या या वाक्यावर टाळयांचा पाऊस पडला. "आताच आमांज सरकारदारांनी सांगिंग की इंथ उभं राहिंग नी काही ऐकिंग सुद्धा परवाना लागिंग. कोण खरेईंग नी कोण खोटेईंग? तुमीच ठरविंग."

"मरनार हा. इथंच त्याला फासावर लटकावतील की. समद्यांच्या समोर लागलीच." बावळयाने आपला पूर्वानुभव सांगितला. "खोट्या मानसांच्या हातात सरकारी दांडुका असताना, खरं बोलनाऱ्याचं हेच होताना मी आजपावतो बघितलं हाय."

"महान युगनायकांनी सांगिंग होईंग की चलन स्वयंसिद्ध जाईंग. जंस्स सोन्यांज नाणं. जंस्स चांदींज नाणं. जंस्स लोहाणं." गनाजाबाच्या या यादीत भर घालायला बावळ्याने 'जस्सं अभ्रकाचं बिल्लं' ही आपली माहिती बोंबलून पुरवली. छमद, साथी, लाकी तिघांचे हात त्याचं तोंड आवळायला एकदम तुटून पडले.

"जंस्स तांब्यांज पैसा." "जंस्स स्फटिकांज मणीणं." बावळ्याच्या भरीनंतर चेकाळून इतर लोक आपापली भर घालण्यात मग्न झाले. त्यांच्याकडे लोकांचे लक्ष वेधले गेले नाही. तेव्हा सुटकेचे निश्वास टाकून बावळ्याच्या तोंडावरचे हात उघडले. त्यांच्यात न बोलता आपापसात करार झाला की थोड्या थोड्या वेळाने आलटून पालटून, त्यांच्यातला एक एक जण बावळ्याचे मुस्काट दाबेल. पहिली पाळी छमदने घेतली.

"पण आज महामहीमानं सैन्याला पगार म्हणहून कागदांज पावत्या देईंग होईंग. त्या पावत्यां बदली त्यांजवर छापिंग तितकीईंग आकड्याइतकी रुप्पींज उधारी, शिपायांना देईंग सत्ती लोकांजवर करिंग होईंग. महान युगनायकांनी सांगिग की जर चलनाला सवताहांज किंमत होईंग न, जर चलन स्वप्रमाण होईंग न, तर मूठभर माणसं बाकी सगळ्यांज धन हिराविंग. महामहीमा हा जुल्म करिंग. आमी याला झुगारिंग होईंग."

गनाजाबाच्या या प्रत्यक्ष्य कृतीच्या आवाहनावर लोक गप्प राहिले. एकमेकांकडे पाहायला लागले. "या लोकांला एकामेकावरच इश्वास नाय हाय. लोकं काय बोलायला बी तयार नाय हायत. आमचा काळ आनी हा काळ काय येगळा नाय. तसलीच सरकारातली आनी तसलीच जनतेतली की." बावळ्याचा आवाज छमदच्या जाडजूड रुंद पंज्यांमधून फुसफुसला.

"या महामहीमानं महान युगनायकांज सगळ्या सगळ्या दंडकांज उल्लंघन करिंग होईंग." गनाजाबा घाईघाईने त्यांची यादी वाचू लागला. आता कोणत्याहि क्षणी आपल्याला गठाळण्यात येईल, याची कल्पना त्याला आली होती. "महान युगनायकांनी सांगिंग की स्त्री पुरुष अंस्स पक्षपातापासून समाजात भेदाभेदांज पहिली सुरुवात होईंग. मंग इतर कितीईंग तरी भेदाभेद चालू होईंग नी त्या समाजात एकी राहिंग न. अंस्सा दुभंगिंग समाज गुलामीत जगिंग."

"दारी येईंग त्या भुकेल्यानाज अन्नदान नी तहानलेल्यांना जलदान लोक करिंग, त्या देशात कंधी दुष्काळ होईंग न."

"जर एकमेकांज राजीखुशीनं शारीरिक सुखाला काईंग नियमांज बंधन करिंग, तर तिंथपासून समाजात दंभ नी खोट्यांज जोर सुरू होईंग."

"जर उत्सव साजरा करिंग, त्यात नाचिंग-गाईंग-सजावटिंग काम करिंग माणसांज पैसे देईंग लागिंग, तर त्या उत्साहहीन समाजात शरीरांत नी मनांत रोगराई माजिंग."

"जर शिक्षक त्यांज स्वताहांज रोजच्या जगण्यात उपयोगात येईंग तेच शिकविंग, तर तो समाज स्वावलंबी लोकांज होईंग. जर शिक्षक स्वताहांज अनुभव असिंग न, अंस्स काहिईंग बिनउपयोगी शिकविंग तर तो समाज परावलंबी लोकांज होईंग. तर या महामहीमानं...."

बेरहम होता तिथे लोकांमध्ये काही खळबळ सुरु झाली. बेरहमाच्या आदेशानुसार शिपाई लोकांकडे सभेचा सरकारी परवाना आहे की नाही? याची तपासणी करायला लागले. तसा तो मोजक्याच कोणाकडे होता. लोक सरकारी कचाट्यात सापडायला भिऊ लागले. तिथून बाहेर पडायला रेटारेटी करु लागले. पण गर्दी आधीच फौजेने घेरलेली होती.

गनाजाबा अजून घाईघाईने महामहीमाच्या कृष्णकृत्यांचा पाढा वाचायला लागला. "या महामहीमानं वेश्यांज परवाना नी कर सक्ती करिंग. त्यांत स्त्री वेश्यांज पुरुष वेश्यांहून दुप्पट कर, अंस्स पक्षपातांज सुरुवात करिंग. जर कोण अन्न वा पाणी मागिंग तर त्याला भिकारी म्हणहून दंडास पात्र गुन्हेगार घोषित करिंग. महान

युगनायकांज पराक्रमलीला लोक उत्सवांत हौशी फुकट सादर करिंग. त्या बंद करिंग. आकाशगंगासारख्या व्यावसायिक रंगमंचावर ती पराक्रमलीला सादरिंग, कलाकारांना नी बघणाऱ्यांना कर आकारणी चालू करिंग. शिक्षकांना परवाना सक्ती करिंग. फक्त सरकारी प्रमाण गोष्टी शिकविंग सक्ती करिंग. जिंथ तिंथ सक्ती. सरकारी परवानगी. म्हणहजे तिंज परवानगी. तिंज मनमानी….." कोणी तो काय बोलतोय? ते ऐकायच्या मनस्थितीत नव्हते. फक्त बावळ्या सोडून.

शिपायांनी गर्दी आवरायच्या नावाखाली लोकांवर दंडुके चालवायला सुरूवात केलेली. राजामजनला कर्ण्यापासून दूर खेचून बेरहमने कर्ण्यातून कोकलायला सुरु केले. "लोक हो, परवाना तपासणी होईंग न, तो पावतो सभेतून कोणईंग बाहेर पडिंग न. ज्यांजपाशी परवाना असिंग न, त्यांना सरकारी हुकूमानं दहा होन दंड होईंग. कायदे समाजांज भल्यासाठीच असिंग. तुमी निवडिंग त्या तुमांज प्रतिनिधींनी तुमांज सुरक्षेसाठीच करिंग असिंग. तेहवा सगळ्यांनी कायदे मोडींग बेजबाबदार माणसांना शिक्षा होईंग सहकार्य करिंग."

"ते शिपाई शंभर असिंग. लोक तीनशे असिंग." लाकी हिशोब घालू लागली. "जर लोक शिपायांज दंडुके गुमान झेलिंग न, मध्ये

हातानं धरिंग काढिंग घेईंग, तर उलट शिपाईच फटके खाईंग. लोक कितीईंग खुळचुके नेभळट असिंग." सभा उधळली जात होती. लोकांचा रेटा शिपायांच्या घेऱ्यावर भारी पडू लागला. दहा होन ही खूप मोठी रक्कम होती. कितीएकांनी आजपर्यंत तितकी जन्मात कमावली नव्हती. त्यापायी लोकांना तुरुंगात सडत पडायचे नव्हते. लोकांच्या जास्तीच्या संख्येचा दबाव शेवटी शिपायांवर भारी पडला. मागच्या लोकांनी कडेच्या लोकांना रेटले. ते लोक शिपायांवर जाऊन कोसळले. तिथून घेरा खुला होता, आतले लोक वाटेत येतील त्यांना पायातळी तुडवत बाहेर धावले. शिपाई धावणाऱ्यांच्या मागे दंडुके वाटेल तसे हाणत त्यांना जायबंदी करत धावले. वातावरणात आक्रोश भरला.

"भित्यांपाठी बहरमराक्षस. जे सवताहांजसाठी लढिंग शकिंग न, त्यांजसाठी दुंजा कोण काईंग लढिंग होईंग?" छमद कडवटपणे म्हणाली. "ज्यांजपाशी हिंमत असिंग न, त्यांज गुलामींज लायकी." ती पचकन बाजूला मातीत थुंकली.

"या लोकांचा काय बी दोष नाय हाय. तू त्यांच्या सारकी बालबच्चेवाली असती ना, तर तुला भिती कशाची असती ते कळलं असतं." सावळ्या बिथरला. "माझ्या जिंदगीत असलं परसंग लय येळा आलेलं हाय."

"नी तू दर वेळेला कच खाईंग असिंग." लाकीने त्याला धुत्कारले.

"तुमच्या मायेच्या मानसांसाठी तुमाला जित्तं राहायाला लागतं. तुमी जगला तरच जी जगतील, तेंच्यासाठी जमंल तसं निभावून आनी झुकून आनी लाथा खावून बी टिकावं लागतं. जसं माझ्यासाठी माझी आये जगत राहली." बावळ्याने आता लोकांवरचा दोष नकळत स्वतःवर ओढवून घेतला.

"म्हणहजे लोकांनी कंधीच काईंग करिंग न?" साथीने भिवया ताणल्या. "मंग तर जगात कोणाला बरेपणांज जीणं कधींच जगिंग मिळिंग न. जगात कायमच बुऱ्यांज जोर असिंग. त्या विरोधात बऱ्या लोकांज लढिंग होईंगच. जर हर एक बरा माणूस म्हणहिंग की मंज पोरंबाळं राखिंग मंज जीव राखिंग, तर या जगात बुऱ्यांज संग लढिंग कोण?"

"जर आज बऱ्याची येळ असती तर लोक पळालं नसतं. गनाजाबाचं ऐकून लढाया उभं राह्यलं असतं." बावळ्याने ताजं उदाहरण समोर मांडले. "आये म्हनायची हर एक गोष्टीची जगात एक आपापली येळ असती. बुऱ्याची आनी मंग बऱ्याची बी. रातीनंतर मंग दिस. दिसानंतर परत रात. जर बऱ्याची ती येळ नसंल, तर बऱ्यानं किती बी हातपाय तानलं तरी त्याला यश येनार नाय.

बऱ्याची येळ येईस्तोपातर त्यानं सवताला टिकवून ठेवलं पायजेल."

"काईंग मिळविंग ती तंस्स जगिंग नी तुंज जगविंग? मुर्दाड मानसांज मुर्दाड जिणं. बऱ्यांज वेळेंज वाट बघिंग बघिंग नी एक दिस तंस्सच मरिंग जाईंग ती." लाकीने त्याच्या आईचा उपहास केल्यावर बावळ्या रागाने पिसाळला.

तिथे थोड्या दूर गनाजाबा उधळलेल्या सभेची पर्वा न करता बोलत जात होता. आरोप करायची देखील एक नशा असावी. तिच्यात मस्त होत, "महान युगनायकांनी सांगिंग होईंग की जितका वाहनांज वेग जादाईंग, दूरसंपर्कांज अंतर जादाईंग, हत्यारांज मारगिरी जादाईंग होईंग, तितकं त्या समाजात गुन्हेगारांज बळ जादा जादाईंग होईंग. महामहीमानं या बेरहमाला वाहनांज वेग वाढविंगसाठी इंधनयंत्र बनविंग सांगिंग. सरकारी दूरसंपर्कांज अंतर वाढविंग लोकांज खाजगी दूरसंपर्कांज लहरी तिंज ताब्यात घेईंग. घातयंत्रांना पुनहा सक्रिय करिंगसाठी लोकांज खाजगी निकामिकावर बंदी घालिंग."

घेऱ्याबाहेर पळालेले लोक आडोश्याला बाजूच्या झाडीत घुसले होते. त्यांच्या मागावर धावणारे काही शिपाई पाठलाग करता करता, बंडबागी चौकडीच्या दिशेने आले. "ए कोण असिंग तुमी?

सभेला हजरिंग परवाना दाखविंग." त्यांच्या म्होरक्याने मागणी केली.

साथीने हात उडवले. "परवाना? आमी महामहीमाला मानिंगच न. तर तिंज परवाना काईंग मानिंग? कायाईंग मायाईंग रुपांतरईंग." ही बाकीच्यांना कूटसूचना होती.

"ऑ! यांज काईंग मतलबिंग?" म्होरक्या बिथरला.

"महान महामहीमांज जय होईंग. हा तो त्यांज साथींना हल्लाईंग संकेत देईंग असिंग. मंज वाचविंग सरकार." लाकीने त्या म्होरक्याच्या पायाशी लोळण घेतली. "यानं मंजवर ही जागा दाखविंग जोरजबरी करिंग असिंग. यांज बाकी चार साथी तिंथ मागं झाडीत दडिंग असिंग. काईंग मी तुमाला ते दाखविंग, तर मंज यांज तावडीतून सोडविंग?"

"महान युगनायकांना उल्लंघून याहि पुढं जाईंग हा बेरहम, त्या निकामिकांनाच निकामी करिंग अस्त्र, महामहीमांज आदेशाबरहुकूम बनविंग होईंग." पलिकडे अजूनहि भाषणाच्या नशेत असलेल्या गनाजाबाने मोठा गौप्यस्फोट केला. तो ऐकायला सभेतले कोणी शिल्लक नव्हते. मात्र बंडबागी चौकडीचे कान तल्लख टवकारले गेले. जे रहस्य जाणायला त्यांना इतकी उरस्फोड

यातायात करावी लागली होती, ते इथे असे वाऱ्यावरची लकेर बनून सहज हवेवर उडत होते. हाय!

बेरहम नेमका यावेळी उपोषणकर्त्यांचा समाचार घ्यायला त्यांच्यापाशी पोहचत होता. किंवा तो येतोय हे पाहून गनाबाजाने त्याला त्रासायला मुद्दाम तो गौप्यस्फोट केला होता. बेरहमचा इतका जळफळाट झाला की हातात होती ती धातूची कडी त्याने गनाबाजावर फेकून मारली. त्याचा नेम तितकासा चांगला नव्हता. "त्याला ताब्यात घेईंग आधी." बेरहम आक्रंदला.

"चलिंग. बघिंगच कोण नाडचुके असिंग ते. खांडोळी करिंग त्यांज." लाकीला शिपायांच्या म्होरक्याने हाताला धरून खडसावले. तिला धरून झाडीकडे चालू लागला. "तुमी सगळे चलिंग मंज संग." त्याच्या डावीकडे उभ्या शिपायांना त्याने हुकूम दिला. "तुमी यांना इंथ राखिंग." उजवीकडच्या शिपायांना हुकूम दिला. ते चार-पाच जण होते. दहा जणांना सोबत घेऊन तो निघाला.

झाडीत शिरल्यावर पुन्हा त्यांची पांगापांग झाली. लाकीने तीन दिशांना ते लपलेले शत्रू असण्याची शक्यता व्यक्त केलेली. तिने दोघांना तिथे, आणि तिसऱ्याला त्या तिथे पुढे आणि चौथ्याला अजून कुठे लपताना पाहिले होते.

म्होरक्याला कल्पना नव्हती की त्याने एका नागीणीला सोबत घेतले होते. फक्त दोघे साथीदार त्याच्या सोबत उरल्यावर तिने आपले खरे विषाचे दात उघड केले. लाकीने त्या दोन बेसावध शिपायांना सहज लोळवले. पण म्होरक्या हातघाईत तिला आटपेना. आवाज ऐकून बाकीचे शिपाई तिथे धावून आले. तो पर्यंत लाकीचे साथीदार सुद्धा मदतीला धावून आले. म्होरक्याला याचे फार आश्चर्य झाले.

छमद आणि साथीला चार-पाच शिपायांना निष्प्रभ करायला फारसे सायास पडले नव्हते. आजूबाजूच्या इतर शिपायांना विचलित करून दूर ठेवायचे काम बावळ्याकडे होते. त्यासाठी अनेक विदूषकी लीला त्याला पार पाडाव्या लागल्या. आपापली कामे चोख बजावून ते योग्य वेळेला योग्य जागी हजर झाले होते.

कायाईंग मायाईंग रुपांतरईंग याचा अर्थ होता, यांचे रुप म्हणजे वेष आम्ही घेऊया. थोड्याच वेळात झाडीतून चार शिपाई मैदानात परतले. सरळ गनाजाबाचा व उपोषणकर्त्यांचा ताबा घेतलेल्या शिपाईदळामध्ये सामील झाले. बेरहम दुसरीकडे कुठे फौज घेऊन गुंतला होता. "बेरहम की गनाबाजा?" लाकीने साथीला हलकेच विचारले. त्यांच्या समोर दोन लक्ष्ये होती.

"गनाबाजा." साथीने लगेच निवाडा केला. "जर बेरहमांज आमी इंथ उडविंग, तर ते आमांज पाठलाग सोडिंग न." मग सोबतच्या शिपायांकडे वळून म्होरक्यासारखा आवाज लावत हुकूम दिला, "यांना आमी चौकीवर घेईंग जाईंग. महामहीमांज तंस्स पूर्वसूचना मंज होईंग. तुमी साहेब सरकार बेरहमांज साथ करिंग जाईंग." तसे ते हुकूमाचे सारे गुलाम बेरहमाच्या दिशेने चालू पडले.

तिथे बेरहमाचा गोंधळ होऊन त्याने इथे नजर टाकेपर्यंत, उपोषणकर्त्यांसह चार शिपाई झाडीतून कुठे नजरेपार गायब झालेले होते. बेरहमाने मुठीतून रक्त येईपर्यंत त्या जोराने आवळल्या. पाठलागावर कुमक रवाना केली. हाय! पळणाऱ्यांना एक वाट एक दिशा असते. पण शोधणाऱ्यांना मात्र चार दिशा दहा वाटा. हात हलवत परतलेल्या त्या शिपायांवर चरफडत बसण्यापलीकडे बेरहमाला करण्यासारखे काही उरले नाही.

## १०० वर्षे पुढे - प्रकरण २८

राजधानीच्या शहरातला राज्यकर्त्यांच्या वावराचा हा सर्वात जास्त सुरक्षा पुरवलेला भाग होता. भरपूर मोठ्या मोठ्या बगिच्यांचा आणि मुद्दाम जोपासलेल्या हिरवळींचा. मात्र त्यांचा उपभोग घेण्याइतकी रसिकता अभावानेच सरकारदारांकडे असल्याने कमी वावराचा. सपाटीवरचा मोकळा ढाकळा प्रदेश. इथल्या सगळ्याच इमारती या अंडा इमारती होत्या. "या काळात भूकंपांज प्रमाण तुंज काळाहून जादा असिंग. महिन्यातून एखाद मोठा भूकंप होईंगच होईंग. अंडाकार हा निसर्गात सगळ्यात सुरक्षित आकार असिंग. म्हणहून महत्वांज इमारतींसाठी तो वापरिंग. सरकारदारांज ते सवताहाच सगळ्यात महत्वांज वाटिंग. तेहवा सगळे सरकारी इमारती अंडाकार होईंग." गनाजाबाने मुकेशाचे सोंगधारी बावळ्याला उत्साहाने माहिती पुरवली.

"किंवा जर इमारत अंडाकार होईंग तर ती सरकारी होईंग." रमेशच्या वेषातील छमदने हसत मल्लीनाथी केली. "काईंग की बाकी लोकांना त्यांज खर्च परवडिंग न."

"खरंईंग सरकारांज पैसा म्हणहजे तो लोकांजच पैसा होईंग. पण तो कंधी लोकांज कामी येईंग न." सुरेशाचे सोंगधारी साथीनेहि

आपली टकळी वाजवली. नितालीचे सोंगधारी लाकीने संभाषणात काही भाग घेतला नाही.

"तू काय म्हनती गं?" मुकेशानं तिला विचारले. ती काहीच बोलली नाही. तिने लक्ष दुसरीकडे वळवले. जणू त्याच्याशी तिला बोलायचे नव्हते. तसा तो दुर्मुखला. त्याने देखील नजर दुसरीकडे वळवली. राग तर त्याने धरायला हवा होता. त्याच्या आईचा उपहास तिने केला होता. अनेकदा केला होता. त्याच्या आईचे सांगणे तिला मान्य नव्हते. भले तर भले. पण त्यावर 'कोल्ह्याला द्राक्ष आंबट' वगैरे हिणवणी काय म्हणून तिने करावी? आणि त्याने काय म्हणून सोसावी? "मंग बाकीचं लोक कशाची बा घरं बांधतात?" त्याने वेळ मारून न्यायला हवेला विचारले.

हवेकडून काही उत्तर आले नाही. "कापडांज तंबू नाईंग तर, बांबू नी गवतांज झोपडी. अंगावर कोसळिंग तर वजनांज हलकी." गनाजाबा माहितीला तत्पर होता.

मात्र नितालीचे बावळ्याशी काही बिनसले आहे, याचा अंदाज रमेशला आला होता. "तुमा दोघांत काईंग झगडा होईंग काईंग?" त्याचे हे उघड विचारणे आगीत तेल ओतल्यासारखे होते.

"माझ्याकडून तर काय नाय." बावळ्याने ओठ आवळत सांगितले. "तिचं तिला मायती."

"मंजकडूनहि काईंग नाईंग." नितालीने सरळ रमेशाच्या डोळ्यात डोळे लावत ठामपणे सांगितले. "तुला अंस्स काईंग वाटिंग?" उलटपक्षी विचारले. रमेशने खांदे उडवत आपल्याकडे उत्तर नसल्याचे दाखवले. "मंज विवंचना असिंग की या पहाऱ्यातून नी बंदोबस्तातून मंज ध्वंस-हत्यार दडविंग, आत तिंथपर्यंत कंस्स नेईंग? त्यांज काईंग मार्ग सुचिंग न." नितालीची नजर सुदूर एका इमारतीवर लागली होती.

बावळ्याने ती इमारत पाहिली. "काय हाय तिथं?"

गनाजाबा माहिती द्यायला उतावळा होताच. "राजरंजन. सरकारी अधिकाऱ्यांज विरंगुळा केंद्र. खेळांज नी फुकट वेळ दवडिंग सोयी. पण त्यांज मुख्य खेळ असिंग पत्त्यांज जुगार. तीन पत्ती."

"हात्तिच्या! मी तर त्यात एकदम बेस हाय." मुकेशच्या चेहऱ्यावर परत एकदा जरा रंग आला.

तो नितालीच्या कडवट बोलांमुळे लगोलग उतरला. "आमी तिंथ खेळ खेळिंग जाईंग असिंग न."

"नितालीबाई नी सुरेश भाईसंग मंज ठरिंग असिंग. आधी मी तिंथ दारावर जाऊन अभ्यागतांज कक्षात बेरहमांज भेट मांगिंग. तो

तिंथ असिंग तर ते मंज त्यांज होकार वा नकार कळविंग.  जर काईंग तो तिंथ असिंग न, तर ते मंज दुसरिकडे कुंठ जाईंग सांगिंग."

"नी जर काईंग तो तिंथ असिंग तर…" साथीच्या चेहऱ्यावर शिकारी भाव दाटले.

"तो तिंथच होईंग. त्यला जुगारांज इतकईंग दुंज काईंगच प्रिय असिंग न. मी त्याला पुरा ओळखिंग." गनाजाबाने तत्परतेने खात्री दिली. " मी त्यांज संग तेरहा वर्ष काम करिंग होईंग."

"तर मंग तोहि तुंज पुरता ओळखिंग होईंग. तिंथ तू दिसिंग तोच तुला अटक होईंग." रमेशाने गनाजाबाची हवा काढायचा प्रयत्न केला. "बेरहमांज भेट मागिंग आधीच."

"यांज विचार आमी आधीच करिंग होईंग." गनाजाबाने फुशारकीने आपल्या पाठीवरच्या थैलीतून एक नकली केसांचा टोप काढला आणि आपल्या डोक्यावर चढवला. "बघिंग हे मी घालिंग ते कपडे." त्याने तसे म्हटल्यामुळे रमेशाने गनजाबाला डोक्याच्या त्या नकली काळ्या केसांपासून पायाच्या वहाणेतून दिसणाऱ्या अंगठ्यापर्यंत आसन्नशिख पाहिला.

"काईंग यात खास?" रमेशाला प्रश्न पडला.

"मंज या आधी कंधीच कोणी अंस्स व्यवस्थित मापांज कपड्यांत नेटका बघिंग होईंग न." गनाजाबाने या कुऱ्यात केलेल्या

खुलाशावर आपापल्या उघड्या पडणाऱ्या बत्तिशी त्याच्यापासून लपविणे बाकी मंडळींना बरेच जड गेले. बावळयाच्या डोळयांपुढे त्याचे ज्ञानसागर बौद्धिक सभेत बघितलेले बावळट ध्यान उभे राहिले. "लोकांज खरेईंग नेत्याला कंधीच सवताहांज कपड्यांजकडे लक्ष देईंग वेळ होईंग न. म्हणहून."

रमेशाला असह्य होऊन त्याचे सातमजली हास्य गडगडाट करत तोंडाबाहेर फुटले. "या हिशोबानं जो सगळयात गबाळा होईंग, तो सगळयाईंग मोठा लोकनायक होईंग तर." त्या हास्याकडे विचित्र नजरेने पाहत एक पायरथवाला त्यांच्यासमोरच्या रस्त्यावरुन पसार झाला. कष्टाने हसू दाबून रमेशाने विचारले. "मंग पुढंईंग बेत काईंग?"

गनाजाबा रुसून गप्प राहिला. "गनाजाबा सोबत आमी विज्ञान मंडळांज प्रतिनिधी म्हणहून तिंथ पोचिंग. आत घुसिंग नी निताली तिंज ध्वंस-हत्यारानं इमारतींज काही भाग कोसळविंग. नकली भूकंप घडविंग. तंस्स ते सगळे भीतीनं बाहेर धाविंग. खूप गडबडिंग. गोंधळिंग. आमी त्यांज फायदा घेईंग बेरहमांज अपहरण करिंग." साथीने कावा स्पष्ट केला.

"नकली भूकंप?" रमेशचा जबडा आश्चर्याने खाली लोंबू लागला. "कंस्स?"

"सहकंपनानं." नितालीने एका शब्दात स्पष्टीकरण दिले. त्यापुढे ती काही बोलेना. बावळ्याला तो या काळात जिथे प्रगटला होता, त्या भुयाराचे तोंड तिने काही पळात कस्से दगड-माती कोसळवून बंद केले होते ते आठवले.

"मंज ते बघिंग होईंग. या वेळी मी तुंज संग राहिंग. सुरेशांज जोडीला मुकेशाला पाठविंग." रमेशने हट्ट केला. निताली नेहमी रमेशला टाळत असे. तिने आता मात्र त्याची साथ मान्य केली.

पण सुरेशने मोडता घातला. "न. न. मी, निताली नी गनाजाबांज मिळिंग एकत्र पक्का कट ठरिंग असिंग. आता तो रमेशला नी मुकेशला सांगिंग वेळ उरिंग न. तेहवा आमी तिघं एकत्र होईंग. दुसरी एकत्र जोडी रमेश नी मुकेशांज या वेळी होईंग. लोकांज लक्ष दुसरीकडे वळविंग त्यांज काम होईंग. तोवर आमी काम साधिंग."

"आमी तयार असिंग. चलिंग तुमांज कामाला लागिंग. पुढे जाईंग नी त्या समोरांज चौकीवरील सरकारदारांज ध्यान तुमांजवर गुंतविंग ठेविंग." नितालीने मुकेश व रमेशला सूचना दिली.

"काईंग?" रमेशने निषेधाचा गळा काढला. "आमाला नुक्ताच तर तुमी बेत सांगिंग. पुरता कळिंगहि न. अजून डोक्यात जाईंगहि न. काईंग आमी तिंथ समोर नाक आपटिंग होईंग?"

त्या अर्धा मैल दूर राजरंजन इमारतीपर्यंत समोरची सडक थेट जात होती. पण वाटेत तिला तीन ठिकाणी दुसऱ्या मार्गिका आडव्या छेदून जात होत्या. त्या प्रत्येक ठिकाणी वाहन अडवायचे अडथळे होते. प्रत्येक अडवलेल्या वाहनाची तिथल्या पहारेकऱ्यांकडून कसून चौकशी होत होती. परवाने तपासले जात होते. त्या शिवाय वाटेत दुतर्फा असणाऱ्या इमारतींपाशी शस्त्रसज्ज शिपाई उभे होते ते वेगळे.

"त्यात इतकईंग कठीण काईंग असिंग? जर साक्षात चोर शिरोमणी तुंज संग होईंग." नितालीच्या स्वरावरून त्यात कौतुक आहे की उपहास, याचा काही अंदाज गनाजाबाला लावता येईना.

बावळ्याला ते बोल चांगलेच झोंबले. "खरं हाय. काय बी कठीण नाय. रमेशाला झाडांच्या वरून बी पायरथ चालवता येतो की. आमी उडत जातो या झाडावरून त्या झाडावर. आमच्या मागं मागं ती सगळी बी फिरत राहतील की जमीनीवरनं. नेतो पार तिकडच्या बाजूला. की इथं तुमाला रस्ता साफ मोकळा."

"त्यांजपाशी दूरमार-तीरकाठा असिंग. नी नेम धरिंग या देशांज सर्वोत्तम मारगिर." गनाजाबाने नेहमीप्रमाणे तत्पर माहिती पुरवली. "पायरथ झाडावर पोचिंग क्षणी, ते तो मारगिरी करिंग खाली पाडिंग. नाईंग तर त्यांजपाशी चढाईंग पिसूडी होईंगच."

बावळ्याच्या नजरेसमोर राखालने मारगिरी करून डुबवलेली त्यांची पायहोडी आली. मग डोक्यात दिवा उजळला. "पिसूडी? आमी तिनंच उडूया की. काय वं लोकनायक, ते दुरमार काय ते वं, ते पिसूडी बी पाडू शकंल काय?"

"पिसूडी?" गनाजाबाचे उत्तर या वेळी तत्पर आले नाही. तो थोडा वेळ विचार करत राहिला. "ते पिसूडी कोण चालविंग होईंग नी दूरमार तीरकाठा कोण? यांजवर अवलंबून होईंग. दोघांज जादा कुशल कोण होईंग?"

बावळ्याच्या चेहऱ्यावर हसू फुलले. "या रमेशापरीस जादा कुशल सारथी कोन हाय? जमलं तर राव. द्या टाळी." त्याने हात पुढे केला. आपोआप गनाजाबाने टाळी दिली. थोडं चाचरत सुरेशने दिली. मग दात चावत नितालीने दिली. मुकेशने हात रमेशच्या पुढे केला. रमेशने आपल्या हाताची घडी घालून ते गच्च धरून ठेवले. तसा मुकेशने आपला हात वळवून रमेशाच्या मिटल्या मुठीवर आपटत जबरदस्तीची टाळी वसूल केली.

"पण आमांजपाशी पिसूडी असिंग न." रमेशाने सबब पुढे केली.

"ते काय तिथं समोर दिसतात हाय दोन उभी असलंली." मुकेशने रमेशाची नजर तिथे वेधली.

"तिंथ त्यांज जोडीला चाळीस शिपाईहि असिंग." रमेशाचे सबबी सांगणे चालूच होते.

"तुमांज काम चालूईंग करिंग." नितालीने रमेशाला सुनावले. "आमी त्या पहल्या चौकीवर पोचिंग आधी." दोन हातांनी दोन्ही बाजूला सुरेश आणि गनाजाबाचे हात धरून त्यांना ओढत ती चौकीकडे चालू पडली. सुरेश चेहऱ्यावर संभ्रमित आणि गनाजाबा भेदरलेला भाव घेऊन तिच्याबरोबर फरफटत चालते झाले.

रमेशाने ते दोन्ही भाव चेहऱ्यावर आणून मुकेशाकडे पाहिले. तसा त्याचा हात आपल्या हाताने धरून ओढत मुकेश बोलला. "चल धावाया लाग की. आपल्याला त्यांच्या परीस जादा अंतर, त्यांच्या परीस कमी येळात काटायचं हाय." डोळे गरागरा फिरवून मग छमद बावळ्यासोबत धावायला लागली.

तिला तिचे भारी धूड त्याच्या किस्पट देहाच्या तुलनेत त्या वेगाने धावडवता येत नव्हते. भरीला त्यांच्या या अतरंगी वागण्यामुळे चेकाळलेले पहारेकरी शिट्ट्या फुंकत थांबायचा इशारा करत त्यांच्या लगट धावू लागलेले.

"तुला तितकं धावायला जमलसं वाटत नाय. मी काय करतो....." मिठी मारू पाहणाऱ्या एका शिपायाला पछाड देऊन बाजूला ढकलत बावळ्या तिला समजावू लागला. ".... तुझ्यासाठी

पिसूडी घेऊनच येतो की. तू थांब इथंच...." त्याच्या आत्मविश्वासाचे तिला नवल झाले.

हाश्श हुश्श करत दम घेत ती थांबली. कमरेत वाकून गुडघ्यांवर हात ठेवत हाफू लागली. शिपायांनी तिला घेरले. हात वर करायला तिला सांगितले. एक क्षणभर तसे तिने केले. पण बरगड्यांमधून आलेली कळ असह्य झाल्याने पुन्हा हात गुडघ्यांवर नेत कोसळली. बावळ्या पिसूडी आणेपर्यंत तिला पुन्हा गमावलेला दम नीट ताळ्यावर आणायचा होता. तिचे तिलाच आश्चर्य झाले. एवढा त्याच्या कुवतीबद्दल विश्वास तिला वाटू लागला होता? जमिनीवर देह ताणून ती पडल्यापडल्या एका डोळ्याच्या कोपऱ्यातून बावळ्या कुठपर्यंत पोहोचलाय शोध घेऊ लागली.

बावळ्याच्या अंगावर सळकतीर येऊ लागलेले. ते चुकवत चुकवत तो पावला पावलाने पिसूडीच्या दिशेने अग्रेसर होत होता. त्याला काय साधायचेय? शिपायांच्या लक्षात येत नव्हते. किंचित हताशता येत होती. त्यांचे सळकतीर त्याचा वेध घ्यायला अपयशी ठरत होते. तो कधी सापासारखा जमिनीवर सरपटत जाई. कधी हवेत लांब तंगड्या फाकत हरणासारख्या उड्या मारत जाई. कधी सश्यासारखा दुगाण्या मारत उसळ्या घेई. मध्येच घोड्यासारखा भरधाव धावत सुटे. कधी जमिनीवरून मुंगीखाऊचा अंगचेंडू जसा

गडाबडा आडवा लोळत जाई. एखाद्या जनावराच्या विशिष्ट चालीवरून त्याच्या पुढच्या जागेचा अंदाज घेऊन तीर मारता येईल. पण चार-पाच जनावरांना एका तीराने कसे वेधता यावे?

त्यात त्याला धरायला त्याच्याजवळ धावणारे त्यांचेच काही शिपाई तीरांनी जायबंदी होऊ लागले. हातांनी पकडायला तो इतका निसरडा होता की जसा तेल लावून आला असावा. त्याचा मार्ग धरून अडवावा तर हूल देऊन निसटत होता. कधी सरळ चपळाईने त्यांनाच धरून पेच मारून खाली लोळवत होता. कधी त्यांच्याच अंगावरुन पालीसारखा सरसरत चढून जात डोक्यावरून उडी मारत होता. एकदा तर एका शिपायाच्या डोक्यावरून सरळ दुसऱ्या शिपायाच्या डोक्यावर पाय देत उडी मारून निसटला.

पायरथांनी त्याला पकडण्याचा प्रयास वेडाचार ठरला. पायरथाला बगल देत तो त्या पायरथावरच उडून गेला. चालकाला खाली ढकलून आपण स्वार झाला. सुदैवाने पायरथ लक्ष्य साधायला बरा मोठा असल्याने सळकतीराने फोडता आला. मग पुन्हा आधीचाच खेळ सुरू झाला.

गनाजाबा मान वाकडी करून करून मुकेशाचा हा सर्कशीतल्यापेक्षा चित्तथरारक खेळ पाहत होता. निताली जणू तिचे काही देणंघेणं नसल्यासारखी नजर पूर्णपणे फेरून, ताडताड

चौकीवर साथीदारांना ओढून नेत होती. ती चौकीवर पोहोचली तेव्हा पहारेकरीण दूरचे बावळ्याचे कौतुक मान लांब करून बघण्यात दंग होती. त्यांची नकली ओळखपत्रे फारशी खळखळ न करता मान्य करत, तिने त्यांना आत जाण्याची परवानगी देऊन टाकली. "ए, त्या पाठींज थैलीत काईंग असिंग?"

"बेरहमाला दाखविंग काईंग विज्ञान साधनं." नितालीने निरागसतेने सांगितले.

"दाखविंग." त्या पहारेकरणीने म्हटले खरे, पण नितालीने थैली खोलली, तर घाईघाईने वरच्यावर पाहिले न पाहिल्यासारखे करून 'जाईंग.' म्हणाली. तिचे सारे लक्ष पलीकडे चालू असलेल्या पाठलागाच्या कसरतींकडे लागले होते. साथीने हलकेच रोखलेला निश्वास सोडला. चला. तीन पैकी एक अडथळा पार झाला.

तावडीत सापडलेल्या छमदवर तावडीत न सापडणाऱ्या बावळ्याचा राग काढण्यात काही शिपाई व्यस्त होते. लाथांवर लाथा तिच्यावर हाणल्या जात होत्या. जर ती वेदनांनी विव्हळली नाही, तर ते अजून जोराने तडाखे लगावत राहतील. हे तिला माहीत होते. त्यामुळे खऱ्याखोट्या वेदनांनी तिचा भरपूर आरडाओरडा चालला होता. एक डोळा बावळ्याच्या हालचालींवर ठेवून. तो तिथे पिसूडीवर चढला हे तिला दिसले.

तशी वाघीण गर्जत उठावी तशी गर्जत ती उठली. जवळ सापडला त्याची मान तिने अश्शी बगलेत धरून तश्शी सरळ मोडून टाकली. एवढा वेळ तिच्यावर मारा करणारे शिपाई थरकापले. भिऊन पांगले. एक जादा शहाणा तिच्यावर पेच टाकायला अंगचटीला गेला आणि पस्तावला. त्याची जीवनातली शेवटची आरोळी आणि तिची डरकाळी एकमेकात मिसळून गहजब माजला.

तिला चुरडण्याच्या नादात इतका वेळ तिची झडती घेण्याचे महत्वाचे काम ते विसरलेले. तिच्या हातात ढाल आणि तलवार येताच त्या अक्षम्य चुकीची जाण त्यांची काळजे चरकवत आत उतरली. ते घाईघाईने तिच्यापासून अंतर सोडत दूर झाले. तिला सळकतीरांचे सहज लक्ष्य करण्यासाठी.

त्या उघडीकीचा गैरफायदा बावळ्याने घेतला. तिच्यापाशी कुशलतेने पिसूडी उतरवत. तिनेच त्याला पिसूडी चालवायचे अर्धे धडे दिले होते. साथीच्या खोपटीत असताना. तो झणी पिसूडीतून उतरला. झणी छमदने पिसूडीचा ताबा घेतला. एका वेळी एकच स्वार पिसूडीत बसू शकत होता.

पिसूडी वर उडाली. दूरमार तीरकाठ्याने तिचा वेध घेण्याआधी त्याचाच वेध घेण्यासाठी. पिसूडीचे ते कवतिक थरारून पाहणाऱ्या

दुसऱ्या चौकीवरच्या पहारेकऱ्याने सुद्धा लाकी, साथी आणि गनाजाबाला सहज पुढे चाल दिली. ती तिघे शेवटचा अडथळा पार करायला मागची गडबड मागे सोडून चालू लागली.

बावळ्या छमदसारखा कुशल लढवय्या नव्हता. सभोवती शिपायांचा घेरा होता. आता परत त्या सगळ्यांना झुकांडी देत पळत राहायला, त्याच्यापाशी पुरेसा दम शिल्लक नव्हता. ते सगळे, एक शिकार निसटली तिचा आणि आपल्या मारल्या गेलेल्या साथीदारांचा सूड उगवायला उतावळे दिसत होते. बावळ्याला स्वतःची गच्छन्ती स्पष्ट दिसत होती.

छमद त्याच्यासाठी ढाल तलवार मागे ठेवून गेली होती. त्या क्षणी करण्यासारखे तेवढेच होते. म्हणून बावळ्याने ती शस्त्रे उचलली. उगाच एक पवित्रा घेत आरोळी मारत गरगरवली. छमदचे घाव झेललेल्या आणि धसका घेतलेल्या शिपायांसाठी, हा पूर्वी कुठे न पाहिलेला एवढा तिरपागडा पवित्रा, या अनेक जनावरांच्या चालीवाल्या माणसानं घेणं, उरात धडकी भरवायला पुरेसा होता. ते मोठ्याने किंचाळले आणि जीव घेऊन पळत सुटले. बावळ्या हे आक्रित बघून दंग झाला.

एव्हाना धोक्याचा घंटारव सगळीकडे जोरजोराने घणघणू लागला होता. इथे तिथे पळापळ सुरू झालेली. काही शिपाई मागून

येऊन पुढे धावत गेले. त्यामुळे लाकीला मागची दखल घेत वळून पाहावे लागले. पिसूडी उड्या घेत मागून येत होती. तसे तेच कारण सबबीसारखे घेऊन 'वाचविंग' ची हाळी देत लाकी तिसऱ्या चौकीकडे धावू लागली. तिच्या जोडीने साथी आणि गनाजाबा.

त्यांना चौकीदाराने उदारपणे आश्रय देत, चौकीमागे दडण्याचा सल्ला दिला. जणू आपणहून चोरांच्या हाती चाव्या दिल्या. "होईंग तरी काईंग तिंथ?" चौकीदाराला उत्सुकता सतावत होती.

"ते बेरहमांज यंत्रमानव असिंग. त्यांजवरील नियंत्रण सुटिंग असिंग नी ते सैरभैर होईंग असिंग. अंदाधुंद मारगिरी करिंग असिंग." नितालीने धास्तावून धपापत्या उरांनी त्याला माहिती दिली. "पण तुंज संग मंज त्यांज भय होईंग न. तुला तर चार माणसांचं बळ होईंगसे वाटिंग. अय्या! तू कितीईंग ताकदवान असिंग!" तिची नजर त्याच्या भरीव दंडांवर गेली.

"ओह! बेरहमांज यंत्र?" चौकिदार जरा निर्धास्तला. मग त्याने मिशीवर ताव मारला. आलटून पालटून आपल्या दंडाच्या बेडक्या फुगवून त्यांच्यावर एकेक नजर टाकली. छाती दुप्पट फुगवून त्या सुंदरीपुढे काढत बडबडला. "मंज वाटिंग, काईंग बंडबागींज हल्ला तर होईंग न? तरी मंज वाटिंगच, तो कोण उडी मारिंग नी धाविंग, तो

माणूस होईंग शकिंग न." आपल्या हातातील दुर्बिणीने तो लांब तिथल्या घडामोडी पाहू लागला.

"बेरहम राजरंजनात असिंग काईंग? जलदिईंग बेरहमांज बोलाविंग होईंग. तोच काईंग करिंग शकिंग." सुंदरीने चौकिदाराकडे कळकळीने चौकशी केली.

"होईंग." दुर्बिण डोळ्यांवरून दूर न करता तो उत्तरला. "ती पिसूडी आता मध्येच थांबिंग काईंग? मागे जाईंग. हं. हं! त्या यंत्रमानवांना अक्कल होईंग न. अरे! ती पिसूडी तर त्या धावऱ्या यंत्रमानवांज भोवती काईंग उडिंग?" अशा प्रकारे काही वेळ तिथल्या घडामोडींचे धावते समालोचन केल्यावर, त्याला श्रोत्यांची प्रतिक्रिया हवी झाली. दुर्बिण डोळ्यांवरून नाईलाजाने हटवून तो अभ्यागतांकडे वळला. ते तिथे नव्हते.

त्याने मागे पाहिले. त्याला ते इमारतीपाशी पोहोचलेले दिसले. त्यांची छाननी करायचे आपले नेमलेले काम पार पाडण्यात कसूर झाल्याचे चौकिदाराच्या लक्षात आले. त्याने हात उंचावून "कोण तुमी? काईंग काम?" विचारले.

सुंदरीने खुणेनेच गळ्यातले ओळखपत्र त्याच्याकडे ठेवल्याचे सांगितले. चौकिदाराने पाहिले की त्याच्या मेजावर तिघांची ओळखपत्रे पडली होती. झटकन त्यावरून नजर फिरवता ते

वैज्ञानिक असल्याचे त्याला कळले. पुन्हा नजर उंचावून पाहता, तिथून गनाजाबा ओरडला की ते बेरहमाला बोलवताहेत. "लवकरिंग." त्यांना एक उत्तेजित सूचना देऊन, त्याने यंत्रमानवांचे पुढचे पराक्रम बघायला दुर्बिण सरसावली.

बावळ्या सळकतीर चुकवायची आपल्याकडून पराकाष्ठा करत होता. काहींना बगल देत होता. काहींना ढालीवर झेलत होता. लाकीच्या त्रिकूटाने तिसरा अडथळा पार केल्याचे दिसताच छमद मागे फिरली होती. बावळ्याच्या मदतीला आली होती. त्याच्याभोवती पिसूडीतून गरगरत शत्रूला मागे हटवत होती. दुसरी पिसूडी बावळ्याने बिघडवून ठेवलेली असल्याने तिच्या विरोधात त्यांना वापरता येत नव्हती. त्यामुळे तिचे पारडे जड होते.

अचानक बावळ्या चकवाचकवी करताना चिकट ओल्या कशावर तरी पाय पडून घसरला. खाली पडला. ते ओले चिकट रक्त ज्या मुंडक्यातून गळत होते, त्या छमदने शिरच्छेद केलेल्या मुंडक्याच्या, न मिटलेल्या डोळ्यांशी त्याचे डोळे भिडलेल्या स्थितीत. एक भयानक शिरशिरी त्याचे रक्त गोठवत त्याच्या पाठीच्या मणक्यातून डोक्यापर्यंत गेली. आणि त्या भिरभिरीने तो शुद्ध हरपला.

छमदने काही काळ इतर शिपायांना अवसान संपलेल्या बावळया जवळ येण्यापासून रोखले. पण ती फार काळ टिकाव धरू शकेल असे वाटत नव्हते. शत्रूची कुमक आणि बळ वाढत चालले होते. ती पार थकून गेली होती. लाकीने तो भूकंपाचा चमत्कार तातडीने करणे जरूरी झाले होते.

लाकी इमारतीपाशी पोहोचताच आपले ध्वंस-हत्यार थैलीतून बाहेर काढून इमारतीला भिडली होती. "अरे! मंज ओळखपत्र तिंथ चौकीतच राहिंग." गनाजाबा हळहळला. "आता मी आत जाईंग बेरहमांज चौकशी कंस्स करिंग शकिंग?"

"तुला आता चौकशी करिंग गरज काईंग? बेरहम आत असिंग. हे आमांज चौकीदारानं सांगिंग होईंग." साथीने त्याला खुळयात काढला. तसा तो लाजला.

"काईंग सगळी बंडबागी इतकिईंग जबरदस्त होईंग?" गनाजाबाच्या डोळयात पूज्यभाव दिसत होता. "ही निताली जणहू महान निअस्त्रा असिंग. तू महान रचनेश असिंग. तो रमेश, तो मुकेश...." गनाजाबा तुलनेत गोंधळला. जलज्ञ कोणाला म्हणावे?

"ए? काईंग करिंग तिंथ?" इमारतीच्या दारातून बाहेर पडणाऱ्या हिरामणीची त्यांच्यावर नजर गेली. तिला त्यांच्यात काही परिचयाचे भासले. ती त्यांच्याकडे चालून येऊ लागली.

"आवरिंग तिंज." गनाजाबाच्या कानात सुरेश कुजबुजला. तिच्या पुढ्यात ढकलले.

हिरामणीने आमनेसामने येता गनाजाबाला बरोबर ओळखले. "तू नकली केस काईंग लाविंग होईंग?" तिने ते सरळ ओढून काढले.

"मंज वाटिंग तर मी केस काळे करिंग, नाईंग तर खोटेईंग लाविंग. तू इचारिंग कोण? तुंज बापांज काईंग जाईंग?" गनाजाबातला चळवळ्या जागा झाला. "हा स्वतंत्र देश असिंग. मंज केस खोटेईंग लाविंग स्वातंत्र्य होईंग."

"ए, खबरदारिंग जर मंज बाप काढिंग. तुला तुरूंगात धाडिंग." हिरामणी हिसहिसली.

"तुरूंग काईंग तुंज बापांज असिंग?"

"पुनहा मंज बाप काढिंग? तू मरिंगच समजिंग आता."

"मरिंग तर तू आता. भूकंपानं." बाजूच्या थरथरू लागलेल्या भिंतीकडे पाहून गनाजाबा ओरडला.

"काईंग? भूकंप काईंग तुंज बापांज होईंग?" इमारतीकडे पाठ असल्याने बेसावध हिरामणीने त्याचा बाप काढला.

"मागे बघिंग. तर तुला समजिंग." असे म्हणून गनाजाबा पळत सुटला.

"थांबिंग आईसझुक्या. आता काईंग पळिंग?" म्हणत न्यायाधीशबाई त्याच्यामागे धावली. मागे खूप मोठा आवाज झाल्यामुळे तिला मागे वळून पाहावं लागले. इमारतीची भिंत ढासळून अंगावर येत होती. "भूकंपिंग." बोंब मारत ती खुल्या जागेत धावली.

इमारतीत मोठा गलका झाला. माणसं मिळेल त्या खिडकीतून, दारातून धडाधडा बाहेर उड्या मारू लागली. हिरामणीप्रमाणे खुल्या जागेत धावून भूकंपाच्या नावाने बोंब मारू लागली. त्या सर्वांत उंच व्यक्तिला ओळखून त्रिकूटाने गठाळले. त्यांच्याकडे कोणाचे लक्ष गेले नाही. इमारत कमकुवत झाल्याने तिचे अधिकाधिक भाग कोसळू लागले. जो तो तिथून धावत सुटला.

तिथे भूकंप झाला. तसा इतका वेळ त्रयस्थपणे सारी लढाई पाहत असलेला फहद एका पायरथावर स्वार होऊन बावळ्यापाशी धावला. फहदने तोंडावर रुमाल ओढून तो झाकलेला होता. आपली ओळख लपवली होती. छमद त्याला आडवी आली. त्याने ओळखीचा परवलीचा बोंबलला. तसे तिने त्याला बावळ्यापाशी पोहचू दिले. चपळाईने रुंद मजबूत फहदने बावळ्याचे किरकोळ शरीर सहज उचलून पायरथात घेतले.

त्याच वेळी दूरवर तो उंचाड्या बेरहम उचलायला लाकी आणि साथीला फार जड पडत होता. तेव्हा बिचाऱ्या बेशुद्ध झालेल्या बेरहमाला ताबडतोब एका पायरथात ठेवायला, चार माणसांचे बळ असलेल्या चौकीदाराने अगत्याने मदत केली. त्यात चढू पाहणाऱ्या दोघा सरकारदारी कर्मचाऱ्यांना बाजूला ढकलून जागा करून देत. "लवकरींग आरोग्यालयात नेईंग. सवताहांज पण काळजी घेईंग." कपाळाला खोक पडलेल्या गनाजाबाला गलबलत्या काळजाने त्याने निरोप दिला.

"आंज दिसच खराब होईंग. आधी ती यंत्रमानवांज बिघाडी." त्याने आठवण झाली म्हणून त्या दिशेला नजर टाकली. ते यंत्रमानव कुठे पसार झालेले दिसले. "मंग हा भूकंपांज झटका." त्याने पायरथाकडे नजर टाकली. पायरथहि पसार होताना दिसला. "आंज दिसच खराब रे बाबा. भूकंपानं सगळी अंडी फुटिंग." त्याने परिसरावर नजर फिरवली. राजरंजनचे सोडून बाकी सगळी अंडी धड शाबूत होती. गोंधळून तो जास्तच गलबलला.

## १०० वर्षे पुढे - प्रकरण २९

काळ्या दगडांच्या एका मोठ्या गुहेतून बंडबागी चौकडी बाहेर पडली. साथी, लाकी, बावळया, छमद. त्यांच्या अंगावर हल्ली ते वावरत होते ते दुसऱ्या व्यक्तींच्या सोंगांचे कपडे होते. गुहेच्या आजूबाजूला मोठे मोठे खडक होते. ते खडकांचे बनलेले टेकाड होते. त्याच्या आसपास हिरव्या झाडीचे जंगल माजलेले होते. वरती घारी घिरट्या घालत होत्या. त्यांचा टॅह्या असा कानात जाणारा कर्कश्श आवाज चालू होता. वाळलेल्या गवताच्या पिवळ्या काड्या वाऱ्यावर सळसळत आपला वास भिरभिरवत होत्या. त्या निर्जन परिसरात आणखीन काही तश्याच ठेंगण्या दगडी टेकड्या होत्या. गुहेबाहेर दुपारच्या तळपत्या सुर्याचा प्रखर उजेड होता. त्यामुळे गुहेच्या आतले अंधारातले दिसत नव्हते.

तिथे आत नजर टाकत साथी बोलता झाला. "बेरहम, तू सांगिंग होईंग त्या भुयारी मार्गानंच आमी तुंज गुप्त तळावर जाईंग असिंग. जर काईंग तू चुकींज वा अपुरी माहिती आमाला देईंग होईंग, तर आमी तिंथ पोहोचिंग शकिंग न. तिंथहून इंथ परतिंग शकिंग न. निदान दोन-तीन दिसांत तरी येईंग शकिंग न. आमाला जितकाईंग उशीर होईंग, तितकेईंग दिस तुला इंथ अन्न-पाण्याविना

काढिंग होईंग. तू समजिंग काईंग? जर आमी जिवंत राहिंग तरच तू जिवंत राहिंग."

गुहेच्या आतल्या भागातून उत्तरादाखल गुरगुराट ऐकू आला. साथीने लाकीला खूण केली. तशी ती आपले ध्वंस हत्यार घेऊन सरसावली. गुहेच्या मुखाच्या कडेकडेने ते हत्यार चालवून तिने वरचे दगड कोसळवले. ते मुख बंद झाले. छमद फार अप्रूपाने लाकीचा तो प्रयोग बघत होती. "काईंग मी ते चालविंग बघिंग?" तिच्या या विचारणेवर लाकी नाक फेंदारुन तिच्यापासून लांब जाऊन उभी राहिली. छमदने तोंड निराश होऊन वेडेवाकडे केले.

"गुहेमंदी हवा कश्शी जानार? तो बेरहम तिथं आतमंदी गुदमरुन ठेर होनार की." बावळ्याने शंका काढली.

"गुहा मोठी असिंग." छमदने आपले मत दिले. "दोन दिस काईंग? आठवडाभर एका माणसाईंग हवा सहज पुरिंग होईंग."

"तिंथ गुहेंज छताला बारीक फटी असिंग. त्यांज मधून हवा येईंग नी जाईंग." साथीने खुलासा केला. "बेहरमानं सांगिंग ती जागा, त्यांज प्रयोगशाळेंज भुयार बाहेर जमिनीवर उघडिंग ती नेमकी जागा, काईंग तुला माहीत होईंग? सात बहिणींज पार?" छमदला विचारले.

"सात बहिणींज पार? होईंग. फार लांब न वाघबीळापासून. जिंथ आमी पायरथ सोडिंग होईंग. फक्त चारपाच कोस दूर. चलिंग मंज मागाईंग." म्हणत छमद टेकडी उतरायला लागली. "पायरथ घेईंग न. त्या आवाजानं जर काईंग कोणी सरकारदार सावध होईंग, चौकशी करिंग तर?"

"मंज विचारानं छमद बोलिंग ते बरोबर होईंग. आमी चालईंग जाईंग होईंग." लाकीने तिला दुजोरा दिला. धावणाऱ्या छमदमागे आपण धावू लागली. यावर बावळ्याच्या क्षीण निषेधाला उडवून, साथीसुद्धा तिच्या मागे टेकडी उतरून जायला धावू लागला.

"पन मी काय म्हनतो, चालायचं ठरलं हाय ना. तर चालूया की. धावून दमायला कशाला पायजेल?" धावण्याआधीच बावळ्या दम लागल्यासारखा धापा टाकत ओरडला.

"जर काईंग तू मागं सुटिंग, तर तुला नंतर वाट मिळिंग न. तू या रानात हरविंग जाईंग." साथीने त्याला धोक्याची सूचना दिली.

"या रानात वाघ फिरिंग अंस्स बोलवा होईंग." छमदने धोका अजून वाढवला. "गेल्याईंग महिन्यात दोन माणूस खाईंग होईंग." ती टेकडीच्या तळाशी पोहोचली होती. तिथून ओरडली. मग पुढच्या झाडोऱ्यात शिरून दिसेनाशी झाली. तिच्या मागोमाग साथी

एक नजर बावळ्यावर टाकून खांदे उडवून आत दिसेनासा झाला. लाकीने बावळ्यावर नजर टाकायचे सुद्धा कष्ट घेतले नाहीत.

ते सगळे नजरेपार होताच बावळ्या घाईघाईने टेकडीच्या उतारावरून सुसाटला. "मी येतो हाय. अरे दमानं रे!" पायाखालचा दगड निसटून मग त्याच्या सोबत बावळ्या देखील गडगडत खाली गेला. कोणी मदतीला आलं नाही. "बावळ्या झकमाऱ्या तुला दुसरा कुठचाच काळ गावला नाय? ह्याच काळात यायचं झालं? मर लेका मर." तोंडातल्या तोंडात स्वतःला जालिम शिव्या पुटपुटत कपडे झाडत आपणच उभा झाला. "कुठल्या बाजूला गेला हायत? आवाज तरी द्या की." ओरडला. दूर कुठे साथीची हाळी ऐकू आली. त्या दिशेने धावत सुटला.

बावळ्या धावत राहिला. ठेचकाळत राहिला. मातीत लोळला. चिखलात घोळला. खचून बसता झाला. पुन्हा धपापून उठता झाला. श्वास फुटून मेला. मध्ये काही ठिकाणी वस्तीची चिन्हे दिसली. तिथे आश्रय घेण्याचा न आवरणारा मोह त्याने सोडला. पण साथ सोडी ना.

छमदच्या खाजगी दूरसंपर्क साधनाला एका ठिकाणी संपर्कक्षेत्र उपलब्ध होऊ शकले होते, त्यावरून फहदला तिने गुप्त तळाचा ठावठिकाणा कळवलेला. फहद वेळ पडल्यास काही ना काही मदत

त्यांना करु शकला असता. झालेच तर गुप्ततळाचा ठावठिकाणा बेरहमच्या अजून एखाद्या विरोधकाला माहीत असणे चांगले होते. यदा कदाचित ही बंडबागी चौकडी शहिद झाली तर?

त्या दूरसंपर्कासाठी छमदने जो काही वेळ घेतलेला, तितकीच फक्त उसंत बावळ्याला मिळू शकलेली. आणि तिची मासिक पाळी चालू असण्याच्या बहाण्याने अध्येमध्ये ती गायब व्हायची. तितक्या काळाची तितकीशी उसंत.

संध्याकाळ संपून रात्रीचा अंधार दाटू लागलेला. सलग चार पाच तासाची वाटचाल केल्यावर अखेर छमदचे ते चार-पाच की कितीतरी कोस संपले. अनेक प्रचंड शिळांनी भरलेला तो खडकाळ प्रदेश होता. जागोजागी त्या कातळसड्यावर तुरळक गवत उगवलेले होते. कुठे एखादी बाभळबोरी उभी होती. वारा जोरात सरसरत होता.

एका छोट्या तळीपाशी छमद उभी राहिली. मुद्दाम रचलेल्या दगडांनी बांधून काढलेली ती तळी होती. तिच्या शेजारी सात छोट्या छोट्या घुमट्या होत्या. सात बहीणी. हाक जाईल इतक्या थोड्या अंतरावर वहिवाट पडलेला रस्ता होता. त्यावर वर्दळ नव्हती. आजूबाजूला वस्ती नव्हती. प्रवाश्यांसाठी पाण्याची सोय

करण्यासाठी ती तळी बांधलेली असावी. त्या रखरखाटात तळीला पाणी भरपूर होते हे नवल. सगळेजण त्या पाण्यावर तुटून पडले.

त्या घुमट्यांच्या मागे कातळी जमिनीवर एक रेखाकृती रेखलेली होती. चांगली चार पाच वार लांबीरुंदीची. तो एक मोर असावा. त्याच्या चोचीच्या रेषेत साथी सरळ चालत निघाला. तिथे इतर अनेक कातळचित्रे रेखाटलेली होती. त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन पंचवीस पाऊले चालल्यावर, त्याला पोहणाऱ्या माशाची अवाढव्य मोठी आकृती कातळावर रेखलेली मिळाली. "बेरहमानं सांगिंग ते खुणा स्पष्ट होईंग." साथीने दम खात जाहीर केले. "मासा वळींग होईंग, त्याच दिशेने आमी वळिंग गोल वळण घेईंग होईंग. पण त्या वळणांज माप काईंग होईंग?" तो गोंधळला. असे छुल्लक बारकावे नंतर असे छळतील, हे बेरहमाच्या तोंडून खाणाखुणा समजून घेताना वाटले नव्हते.

"तो मोर..." आताशा सगळ्यांशी तुसडेपणाने वागणाऱ्या लाकीने तोंड उघडले. "त्याला वर्तुळांज मध्य मानिंग होईंग वाटिंग." तसे करुन पुढची खूण शोधायला बराच प्रयत्न करावा लागला. ती दोन डोक्याच्या गरुडाची कातळचित्राची खूण मुश्किलीने सापडली. त्याच्या उजव्या पंखाच्या दिशेने मागोवा घेत गेल्यावर, मोठाल्या शिळांमध्ये एक पुरुषभर उंचीचे अरुंद पोखार होते.

लाकीने त्या कपारफटीतून सरळ आत घुसखोरी केली. तिच्या पाठून साथी आत गेला. छमदला तिच्या आकारामुळे आत शिरायला खूप खटपट करावी लागली. बावळ्याला तिला मागून ढकलावे लागले. साथी व लाकीला पुढून ओढावे लागले. त्यामानाने सुकड्या बावळ्या हवेची झुळूक आत शिरावी तितका सहज आत शिरला.

आत अंधार होता. बाहेरच्यापेक्षा दाट. लाकी आणि साथीने त्यांचे जलदिवे चालू केले. त्या प्रकाशात बेरहमानं सांगितली होती ती ती खूणचिन्हे वा चित्रांचा शोध घेत घेत ते चालले. अनेक वर्षे वापरात नसल्याने देखभालीशिवाय ती वाट अडथळ्यांची बनलेली होती. कुठे झाडांची पाळेमुळे घुसलेली होती. कुठे पाणी ठिपकून निसरडे झालेले होते. कुठे जमिनीखालचे जीव वळवळत होते. त्या भुलभुलैय्यातील अनेक वळणं व चढउतार चालत पार केल्यावर, एका मोठ्या रुंद दगडी दालनात ते न भरकटता नेमके पोहोचले.

जमिनीवर जमलेली धूळ साथीने हातांनी मोकळी केली. "अनेक वर्षं या मार्गांज उपयोग होईंग नाईंगसे वाटिंग." तो चुटपुटला. धुळीखाली लपलेले गोल झाकण उघडे झाले. त्या झाकणावर दोन डोक्याच्या गरुडाचे आधी पाहिलेले तसेच चित्र होते. बेरहमाने सांगितलेल्या युक्तीने गरुडाचे दोन्ही पंख फिरवून

डोक्यावर नेल्यावर, आतले कुलूपी खटके उघडल्याचे आवाज आले. साथीने ते पंचधातूचे जड झाकण उचलून वर घेतले. त्याच्याखाली पोकळीत धातूची शिडी उतरत जात होती. त्यातून छमदचे जाडजूड धूड खाली घुसवणे पुन्हा फार खटाटोपाचे झाले.

शिडीने दोन पुरुष खाली उतरून येताच, त्यांना रितसर बांधून काढलेला ऐसपैस बोळ दिसला. "मंज नशीब! इंथहून पुढची वाट सोप्पी असिंग." छमद सुटकारा झाल्यासारखी बोलली. "मंज कळिंग न. गुप्ततळांज मालकांज आणीबाणीईंग सुटकेसाठी हा मार्ग तयार करिंग होईंग, ठिक? तर काईंग तो मालक अंगानं बऱ्या खाईंग-पिईंग घरांज होईंग शकिंग न? तेहवा तो कंस्स यातून सुटिंग शकिंग?" यावर कोणी काही बोलले नाही.

साथीने तिला तोंडावर बोट ठेवत 'श्शू'ची खूण करुन उगी केले. तो बोळ सरळ जाऊन तळाच्या मुख्याधिकाऱ्याच्या दालनात उघडत होता. त्या टोकाकडून हलके माणसांचे आवाज येत होते. जसजसे ते सावधपणे चालत तिथे पोहोचले, ते आवाज मोठे होत गेले.

"साहेबसरकार जाल्मिक, निकामिकांना बेकार करिंग अस्त्र, परीक्षणाईंग तयार असिंग. ते ज्यावर वापरिंग ते निकामिक सज्ज

असिंग. निकामिकांज प्रयोग साधिंग घातयंत्रहि सज्ज होईंग. प्रयोग सुरु करिंग परवानगी हविंग होईंग." एक बाई बोलताना ऐकू आली.

"काय बा?" बावळ्याला नवल केल्याशिवाय राहवले नाही. "हिचा आवाज अश्शी लाकीच्या आवाजासारखाच हाय. ही इथं बाजूला उभी नसती, तर तीच बोलती हाय समजलो असतो की." यावर साथीने बावळ्याचे तोंड गच्च आवळले. तिथल्या धातूच्या दरवाजाला कान लावून पुढचे ऐकू लागला.

"फिलू, अजून बेरहम सापडिंग न." एक पुरुषी आवाज बोलू लागला.

"ओह!" लाकीला बोलल्याशिवाय राहवले नाही. "मोलूंज वैज्ञानिक बायको." यावर छमदने लाकीचे तोंड आवळण्याची संधी साधली.

"तू नी हा बावळ्या एका माळेंज मणी असिंग. जरुरी होईंग तेहवा कंधीच तुमांज तोंड बंद राहिंग न." छमदने सुनावले.

"तुंज हे आताच काईंग बोलिंग होईंग?" साथीने छमदला सुनावले आणि त्यालाच हसू आवरले नाही. "मी पण बोलिंग." त्याने खजिल होऊन बावळ्याच्या तोंडावरचा हात काढला. "ऐकिंग सगळे नेटानं." पुन्हा दरवाजाला कान लावला.

"मी तर इंथ नाममात्र मुख्याधिकारी असिंग. तो बेरहमच सर्वेसर्वा होईंग. मंज पुरी खात्रीईंग की त्यांजशिवाय प्रयोग करिंग त्याला आवडिंग न." तो पुरुषी आवाज बोलत होता.

"काईंग मंग सगळी साधनं परत आवरिंग ठेविंग?" फिलूने विचारले.

"न. न. आमी प्रयोग करिंगच. महान महामहीमाला कळिंग होईंग की बेरहमांज शिवायहि अजून कोण हुषार या जगात असिंग." जाल्मिक आढ्यतेने म्हणता झाला. जर त्याला मिश्या असतील तर त्याने त्या पिळल्या असतील. "जाईंग नी परीक्षणशाळेत मंज वाट पाहिंग. ठरिंग त्या वेळेवर प्रयोग सुरू होईगच होईंग. महान महामहीमानं देईंग मुदत उद्या संपिंग. त्या राखालला निपटिंग मी काही पळातच येईंग."

"राखाल?" गुप्त दारापलीकडे सगळ्या बंडबागींच्या तोंडातून एकदमच उसासा व भयोद्गार अवचित निसटला. लाकी व साथीने अभावितपणे हातातले जलदिवे विझवले. बोळात काळोख दाटला.

"साहेबसरकार जाल्मिक," तो परिचित भरदार घोगरा आवाज चौघांच्या कानात चरे पाडत गेला. "मंज खात्री होईंग की बंडबागीनं बेरहमांज अपहरण या तळावर प्रवेशासाठीच करिंग असिंग." राखालने जाल्मिकाची प्रतिक्रिया आजमावली.

"या तळावर प्रवेश? इतक्याईंग कडक बंदोबस्तातून?" जाल्मिक हसायला लागला. "काईंग त्यांनी इंथ घुसिंगसाठी बेरहमाला शस्त्रांज टोकावर ओलिस धरिंग? त्यांनी तंस्स प्रयत्न करिंग बघिंगच होईंग. आमांज शुद्धहर वायू त्यांना फशी पाडिंग. पण ही वेळ आमांजवर येईंग न, जर तुंज काम तू आधी चोख पार पाडिंग होईंग. इंथ वेळ दवडिंग न. बाहेर बेरहमाला शोधिंग होईंग. नी सोडविंग होईंग."

"कडक बंदोबस्त? अं?" राखालाने सरळ जाल्मिकाच्या गळ्यावर चपळाईने चाकूचे पाते रोवले. "हा होईंग तुंज बंदोबस्त? त्यांनी तिनशे शिपायांज फौजेतून गनाजाबाला सोडविंग. हजार शस्त्रसज्ज शिपायांज पहाऱ्यातून बेरहमाला उचलिंग. त्या बहुरूपियांज तुंज गळ्याला पाते लाविंग देर लागिंग न. शुद्धहर वायू त्यांनी धनवतीला गठाळिंग वापरिंग होईंग नी त्यांज तोड त्यांना माहीतिंग."

"मी...मी काईंग.... करिंग... शकिंग यात?" जाल्मिक गळ्याची घाटी पात्याच्या धारेने खरचटणार नाही याची काळजी घेत बोलला.

"तळावर घुसिंग इतक्या शिपायांज नी यंत्रांज सामना करिंग जोखीम ते पत्करिंग न. ते तुंज परीस फार शहाणे होईंग. ते काईंग

दुंज मार्गानं आत घुसिंग प्रयत्न करिंग. जंस्स की चोररस्ता. मोजक्याईंग माणसांना माहीत होईंग अंस्सा." राखालाने नजर आजूबाजूला फिरवली. "हा जुन्या काळांज गुप्त सैनिकी तळ वाटिंग. हे सिमेंटांज बांधकाम होईंग. तेहवा अंस्स तळांज धोकाघडीला उपयोगी जाईंग, काईंग न काईंग व्यवस्था होईंगच. तुला या बाबत काईंग माहीतिंग?"

"मंज?...काईंगच न." जाल्मिकाने उपरोध केला. "मी तर शहाणा माणूस होईंग न. मंज कंधी अंस्स विचार सुचिंगच न."

राखालाने चाकूचे पाते किंचित गळ्यावर दाबून हलकी चीर पाडली. ती हळूहळू रक्ताळली. "या तळावरून आणीबाणींज बाहेर वाट कुंठ होईंग? मंज दाखविंग."

"मी तुला काईंग ते गुपित सांगिंग?" जाल्मिकाला आपल्या पदाची आठवण झाली. "महान महामहीमानं या तळांज मुख्याधिकारी म्हणहून मंज जबाबदारी सोपविंग असिंग. एक ती सवताहा सोडिंग, तर अजून कोणाला मी ही माहिति देईंग शकिंग न. तिंज संग प्रतारणा करिंग न. मंज जीव जाईंग तरीहि न."

"बेरहमांज बोलता करविंग, त्यांजकडून ही माहिति मिळविंग, बंडबागींना कंस्स नियम आड येईंग न. ती इंथ तुंजपाशी पोचिंग

आधी, मंज चोररस्तांज वाट सांगिंग. त्यांजसाठी आमाला सापळा लाविंग होईंग." धूर्त राखालने लगेच वेगळी खेळी केली.

"तर..." एक दीर्घ मौन साधून अखेर जाल्मिकाला उपरती झाली. "मी सांगिंग." तसे राखालाने त्याच्या गळयावर रोखलेले पाते मागे घेतले. त्याला मोकळा केला. "इंथहूनच उघडिंग तो मार्ग." जाल्मिकाने एक कपाट जवळच्या चाव्या लावून उघडे केले. त्याच्या फडताळाच्या फळया उचकटून बाजूला टाकल्या.

"राखाल नी जाल्मिक हे गुपित हाताखालच्या पित्त्यांज दाखविंग न. दोघेच असिंग होईंग." साथी साथीदारांच्या अगदी कानांमध्ये कुजबुजला. "तय्यार?"

राखालाने पुढे होऊन त्या कपाटाच्या मागच्या फळीवर टकटक केली. पोकळीचा आवाज आला. जाल्मिकाने मग दुसऱ्या भिंतीवर लटकावलेल्या तसबिरीची खुंटी पिळली. तसे आवाज न करता ती मागची बाजू सर्रकन बाजूला सरकली. तिच्या मागून हासभास न देता, चार बंडबागी राखाल व जाल्मिकावर चालून गेले.

मोठी हातघाई उडाली. जाल्मिकाने आरोळी ठोकून पोटात घुसलेल्या छमदच्या तलवारीला प्रतिसाद दिला. साथी व लाकी राखालवर तुटून पडले. त्याने शिताफिने पहिला वार चुकवला होता.

त्याच्या पलट वाराने लाकीची तलवार हातातून खणखणत निसटली होती.

मुख्याधिकाऱ्याच्या आरोळीने तळ सावध झालेला. राखालचे पित्ते दालनाच्या दारापाशी उजवीकडे, तर तळाचे रक्षक डावीकडे जमून दार ठोठावू लागले. दोन्ही पक्ष एकमेकांवर दगाफटक्याचा संशय खाऊन दार उघडले जायची वाट पाहू लागले. त्या दालनातून खणाखणीचे जोरदार आवाज येऊ लागले.

तसे अस्वस्थ होऊन राखालचे रझाकार दार फोडायच्या खटपटीला लागले. ते फार मजबूत दार होते. खुलेना. अचानक ते खुलले. आतून चार बंडबागींनी बाहेर मुसंडी मारली. पहिल्या अचानकतेच्या धक्क्याचा फायदा घेत डावीकडे धडक मारत धावले. काही रक्षक हल्लेखोरांच्या मागावर धावले. काही दालनात.

तिथे परीक्षणशाळेत फिलूने निकामिक बेकार अस्त्राचा प्रयोग ठरलेल्या वेळेला सुरू केला होता. तिच्या जोडीला अजून सहा माणसे परीक्षणशाळेत वावरत होती. यांत्रिक आवाज सूचना देऊ लागला. "परीक्षणशाळा आता पुढील सूचना होईंग तोवर बाकी तळापासून वेगळी होईंग असिंग. कोणहि व्यक्तींनी आतबाहेर जाईंग प्रयत्न करिंग न. ते जीवाला घातक ठरिंग. परीक्षण जोखीम पातळी

सर्वोच्च. सर्व सुरक्षा प्रणाली जागृत. प्रयोग प्रारंभ मोजणी सुरूईंग. दहा. नऊ. आठ. सात......"

राखाल नाक दाबत बंडबागींना वापरलेला शुद्धहर वायू विरायची वाट पाहत उभा होता. जाल्मिक रक्ताच्या थारोळयात शेवटचे आचके देत होता. त्याने राखालला आपल्याला एका खटक्यांच्या पटलापाशी नेण्याची खूण केली.

ते साधल्यावर जाल्मिकाने विशिष्ट खटके आणि कळी फिरवायला सुरूवात केली. तिथे असलेल्या ध्वनिक्षेपकावरून तो तळावरच्या कर्मचाऱ्यांना सूचना देऊ लागला. "या तळावर चार बंडबागींज हल्ला होईंग असिंग. सगळे दरवाजे स्वयंचलित नियंत्रणाखाली बंद करिंग असिंग. तळांज स्वयंचलित सुरक्षा प्रणाली धोका पातळी पाचवर जागृत करिंग असिंग. सावधान. सावधा...." तो बोलता बोलता घरंगळून पडला. ढेर झाला.

तो भूमिगत बंदिस्त तळ होता. विजेच्या उपकरणांनी व यंत्रांनी सुसज्ज. सगळीकडे धोक्याचा गजर वाजू लागला. लाल दिवे पेटले. यांत्रिक आवाज ध्वनिवर्धकांवरून सूचना देऊ लागले. "तुमांज सगळी शस्त्रं अंगावरुन काढिंग बाजूला ठेविंग. जिंथ असिंग तिंथच थांबिंग. काईंग हालचाल करिंग न. सुरक्षारक्षक तुमांज ओळख पटविंग जवळ येईंग, तर त्यांना सहकार्य करिंग. फिरतयंत्र ज्या

सूचना देईंग त्यांज तंतोतंत पालन करिंग. ते तुमाला ज्या मार्गानं सुरक्षित जागी नेईंग, त्यानं मार्गक्रमण करिंग. जो पावतो हिरवा संकेत मिळिंग न, तो पावतो सवताहून काईंग हालचाल करिंग न."

"बेरहमानं इंथहून तीन मजले खाली जाईंग सांगिंग होईंग." लाकीने सुचवले. "आता आमी उदवाहनांज उपयोग करिंग शकिंग न. यंत्र आमाला पकडिंग. आमी जिने उतरिंग जाईंग."

"थांब की. या बोळाच्या त्या टोकापासून उजेड कसला येतो हाय?" म्हणत बावळया तिथे धावला. तिथला दरवाजा किलकिला उघडा होता. तो ढकलून आत गेला. "अरे बघा तरी. इथं काच हाय. तीन मजलं खालचं समदं दिसतं हाय." त्याने बाकीच्यांना निमंत्रण दिले. तशी छमद तिथे धावली. मग साथी. नाईलाजाने लाकी.

तिथून सुद्धा एक पोलादी जिना गोल सर्पिल वळणे घेत खाली उतरत होता. तिथे डाव्या बाजूला खूप सारे खटके व चकत्या असलेली खोली होती. तो नियंत्रण कक्ष होता. आता रिकामा झालेला. बंडबागी चौकडी तिथे घुसली. त्या नियंत्रण कळींचा वापर कसा करावा? त्यांना कल्पना नव्हती. उजव्या बाजूला भिंतभर काच होती. तिच्यातून एक प्रचंड मोठा बंदिस्त खडकाळ अवकाश दिसत होता. दहा बारा पुरूष उंचीवर त्याचे छत होते. ते पोलादाच्या वावभर जाडजूड अर्धगोलाकार कांबींनी तोललेले होते. त्या

अवकाशात उभी यंत्रे सक्रिय झालेली त्यांना दिसत होती. "घातयंत्रं. मानसं मारायच्या कामी येनारी." बावळ्या चक्रावला.

समोरच्या त्या अवकाशात म्हणजे परीक्षणशाळेत घातयंत्रे उडत होती. एक बाई म्हणजे फिलू हातात सात नळयांची पुंगी घेऊन उभी राहिली. "ते निकामिक होईंग." लाकीला उत्सुकता दाबता येईना. ती जवळजवळ किंचाळली. साथीने तिला नजरेने दटावले. तशी ती जरा वरमली. फिलू निकामिक फुंकू लागली. तशी यंत्रे गरगरून खाली जमिनीवर आली.

तोच दुसरा एक माणूस एक वेगळया प्रकाराची पुंगी घेऊन पुढे सरसावला. त्या पुंगीला एक नळी एका मोठ्ठ्या टाकीशी जोडत होती. त्या टाकीचा नळीशी जोडलेला नळ तिसऱ्या माणसाने फिरवून चालू केला. तशी हवा त्या नळीतून सरसरून पुंगीत घुसायला लागली. त्या हवेचा बाहेर फुफाटण्याचा जोर एवढा होता की धरणाऱ्या माणसाला आवरेना. त्याच्या मदतीला अजून दोन माणसे धावली. तिघांनी मिळून ती पुंगी पेलली. जमिनीवरची यंत्रे परत गरगरू लागली. फिलू निकामिक जोराने फुंकू लागली. यंत्रे परत जमिनीवर आली. पण नळ आणखी मोकळा करून दुसऱ्या पुंगीतला हवेचा जोर वाढवला गेला, तेव्हा यंत्रे गरगरत पुन्हा हवेत उडाली. निकामिकाला न जुमानता.

"निकामिक हरिंग." छमद उत्तेजित होऊन ओरडली. बावळ्या बावचळून तिच्याकडे पाहू लागला. क्षणभरासाठीची आनंदाची लहर तिच्या चेहऱ्यावर चमकून विझली. तो दुःखी दिसू लागला. "आता शंभर वर्षं पुर्वींज काळ परत आणिंग, महामहीमाला कोण थांबविंग शकिंग न." छमद उसासली.

"न. आमी ते निकामिक बेकारिंग अस्त्र नाश करिंगच होईंग. इतिहासानं ही जबाबदारी आमांजवर सोपविंग असिंग." साथी चवताळून उठला. "चलिंग. सज्ज होईंग."

"म्हनजे काय करायचं?" बावळ्याला कळेना. साथी जोशात जाऊन त्या काचेवर धडकला. ती पोलादासारखी मजबूत होती. तो मार बसून कळवळला.

तिथे फिलू थकून हरून खाली बसली होती. निकामिक पुरे बंद पडले. यंत्रे जोरजोरात घिरटू लागली. त्यांचा वेग वाढत गेला. परीक्षणशाळा लाल रंगाच्या प्रकाशात रंगून गेली. यांत्रिक आवाजाने जाहीर केले. "घातयंत्रांज मानवी नियंत्रण गमाविंग होईंग. धोका. धोका. धोका."

दोघे प्रयोगकर्ते दरवाजांपाशी धावले. तशी घातयंत्रे त्या हालचालींची दखल घेऊन त्या माणसांच्या मागे गेली. तसे ते जास्तच घाबरून गेले. जास्त जोराने हालचाली करू लागले. यंत्रांनी

आपला अदृश्य मरणमारा त्यांच्यावर चालवला. तो बाहेर निसटायचा दरवाजा बरोबर बंडबागींच्या कक्षाखाली होता. त्यामुळे ते सुद्धा त्या मारणमाऱ्याच्या कक्षेत आले. आयुष्यात प्रथमच इतक्या घोर अंतर्बाह्य शारीरिक वेदनांचा अनुभव त्यांना आला. बावळ्या तो तिसऱ्यांदा घेत होता. ती असह्य हतबलता. ती जळजळ.

परीक्षणशाळेतल्या एकाने चलाखी करत फिलूच्या हातातले निकामिक उचलले. तीन यंत्रातल्या एकाने त्याची नोंद घेतली. ते गर्रकन वळले. त्या माणसाने निकामिक फुंकण्याआधी त्याला मारणमाऱ्याने निकामी केले. फिलू हालचाल न करता निश्चल होती. तिथे उरलेल्या दोघांनी छत पेलणाऱ्या हातभर रुंद जाड पोलादी बाकदार खांबांचा आसरा घेतला होता. त्या खांबांच्या मध्ये एक काचेची भिंत वा सरकदार होते. जे आता बंद होते. त्या दारामागे रझाकार थरारून हा प्रयोग बघत होते. "राखाल आमच्यासाठी तिथं वाट बघतो हाय." बावळ्याने तोंड कडू केले.

त्या खांबांना चिकटलेल्या माणसांना तिथून नियंत्रण कक्षातली ही माणसे दिसली. ते खुणावू लागले. 'दार उघडा.' लाकीला ते काय सुचवताहेत कळले. पण कसे साधावे कळेना. नियंत्रणकक्षाखालील दारातून निसटू पाहणाऱ्या दोघांचा बळी घेतल्यावर, घातयंत्रे त्या

दोघांच्या खाणाखुणी हालचालींनी चवताळून त्यांच्या घातावर गेली. तशी बंडबागींची शरीरे कृत्रिम लकव्यातून मोकळी झाली.

"तुला माहीत होईंग. त्या यंत्रांज नाश कंस्स करिंग." सुटल्यावर साथीने बावळ्याला गच्च धरले. "तुला पक्कं माहीत होईंग. तू सांगिंग काईंग नाईंग?" तो घळीला आला होता.

"त्यासाठी ते तेस्लावालं सुरळीखांब हवं की." बावळ्या त्या परीक्षणशाळेत एक हताश नजर टाकत बोलला. "इथं तर ते नाय हाय. त्याच्यातून लय वरच्या दाबाची वीज बनली की त्या यंत्रातली यवस्था इस्कटते. ते फुटतं."

"वरच्या दाबांज वीज?" लाकी जोर येऊन उठली. "साथी, इंथ ते पोलादी खांब असिंग. मी मंज ध्वंस हत्यारानं त्यांजमधून तंस्स मोठा वीजदाब साकारिंग शकिंग अंस्स वाटिंग." साथीचे डोळे लकाकले.

"त्यांज जरूरी उरिंग न. ती यंत्रं थांबिंग." छमदने त्यांचे लक्ष पुन्हा परीक्षणशाळेत वेधले. ती यंत्रे जमिनीवर आपणच गार होऊन बसती झाली होती. फिलू उठून त्यांच्यापाशी जाऊन त्यांचे कप्पे खोलून काही काढून घेत होती.

"त्या यंत्रांचा इज बनवनारा मसाला संपला हाय. म्हनून ती ताकद संपून उगी झाली हाय." बावळ्याने अचूक निष्कर्ष काढला.

"चलिंग तर जलदिईंग." साथी दडादड जिने उतरून खाली जाऊ लागला. "आमी ते बेकार अस्त्र ताब्यात घेईंग नाश करिंग."

"मी येईंग." छमद उत्साहाने त्याच्यामागे गेली.

"मंज त्या पोलादी खांबात वीज बनिंग काईंग ते अजमाविंग होईंग. ती घातयंत्रं पुनहा उडिंग होईंग न." म्हणत लाकी धावली.

"लाकी थांब." आताशा ते दोघे एकमेकांशी थेट बोलत नव्हते. पण बावळ्याला राहवेना. "तिथं राखाल तुझ्यासाठीच टपलंला हाय. दारं उघडी झाली की तो बी आत घुसनार. आनी पैला तुला धरनार. साथीला तितका काय घोर नाय हाय."

लाकी क्षणभर थांबली. "मंज जीव घेईंगहि येईंग नी जीव देईंगहि येईंग. पण बऱ्या येळांज वाट बघिंग जीव राखिंग जमिंग न. ते काम तू करिंग. मंज साथीला मंज गरजिंग होईंग." तिखटपणे टोमणा मारून चालती बनली.

बावळ्या तिच्यामागे जाणार असता, परीक्षणशाळेतली ती बाई त्याला काही खुणावत असलेली दिसली. तिने हाताने गोल चकतीचा व ती फिरवायचा संकेत दिला. मग तिने एका हाताचा गोल बनवून त्याच्या मागे दुसऱ्या हाताची बोटे फाकलेली दाखवली. तिला दातेरी चाक सुचवायचे असावे.

बावळ्याने पटलांवर पाहिले. तीन चाके होती. त्याने उलट टपाली खुणावले. डाव्या हाताने कपड्यांवरचा लाल रंग दर्शवला. मग पिवळा. तिला ते समजले. तिने हातातले पिवळे कडे उंचावले. ते घड्याळाच्या गतीच्या दिशेने फिरवून दाखवले. बावळ्याने ते पिवळ्या रंगाचे दातेरी चक्र फिरवले.

त्या परीक्षणशाळेतला लाल प्रकाश विझला. पिवळा उजळला. यांत्रिक आवाजाने घोषणा केली. "परीक्षणशाळा तळाशी पुनहा जोडिंग जाईंग असिंग. आतबाहेर जाईंग आता सुरक्षित असिंग." त्या जागेचे सगळे दरवाजे खुलले.

खाली बंद काचेच्या दारावर ठणाणा करणारे तिघे बंडबागी दार उघडल्याने आत कोसळले. छमद आणि साथीमध्ये जणू शर्यत लागली. बेकार अस्त्र हस्तगत करण्यासाठी. लाकी निकामिक उचलायला धावली. राखाल लाकीला पकडायला धावला.

साथीने बेकार अस्त्र छमदच्या धुडापेक्षा हलका असल्याने शर्यत जिंकत आधी उचलले. तेच लाकी आणि राखाल बाबतहि घडले. लाकी परतायला दाराकडे धावू लागली.

साथीने अस्त्र नष्ट करायला धरून जोराने जमिनीवर आपटले. ते धातूचे असल्याने अस्त्राला काही झाले नाही. छमद मात्र ते बघून चवताळली. तिने आपला लपवलेला बिचवा काढून हातावर

चढवला. त्या हाताने साथीला कुदेरून दुसऱ्या हाताने अस्त्र हिसकावले.

साथी त्या बिचव्याच्या जखमेतून शिरलेल्या विष प्रभावाने बधीरला. खाली कोसळला. त्याला तसाच सोडून छमद देखील दारापाशी निसटायला पळाली. तिथे लाकीशी तिची धडक झाली. क्षणभर लाकी गोंधळली. त्याचा गैरफायदा घेत छमदने लाकीला सुद्धा बिचव्याने बोचकारले.

ते पाहून राखालाने प्रसंगावधान राखत छमदपासून थोड्या अंतरावर स्वतःला कसेबसे वेग आवरत रोखले. कट्यार फेकली. ती तिच्या उजव्या दंडात घुसली. तरी तिने दारातून पळ काढला. राखालला तिला धरता आले नाही. कारण परीक्षणशाळेचे दरवाजे पुन्हा मिटले गेले.

छमदने त्याला वेडावून दाखवत निगरगट्टपणे दंडातली कट्यार उपसून टाकून दिली. तिला जिन्यातून वर पळताना घाईघाईत खाली येत असलेला बावळ्या धडकला. तिने त्याच्या दंडात बिचवा कडकडून घुसवला. बावळ्याचे शरीर बधीर होत तो तसाच पायरीत कोसळला.

"शंभर वर्ष मागाईंग माणसा, उडत्या कावळ्यांज पिसा मोजिंग तू सवताहांज फार हुषार समजिंग होईंग. पण तू मंज कावा शेवटापार

ओळखिंग शकिंग न. मी तुंजहून हुषार ठरिंग. तुला मात देईंग. जर काईंग तू मंज प्रेम स्विकारिंग होईंग तर... चित्र काईंग वेगळे असिंग होईंग." छमद नाटकीपणे सुस्कारली. "तू हृद्यांज रानी मानिंग. पण जी तुंज कुत्रा मानिंग, ती तर तिंथ राखालांज हाती जिंवत सापडिंग. मरिंग पण शकिंग न. त्या साथीला मात्र वाचविंग कोणच येणारींग न. तो तासाभरात इलाजाविना मरिंग जाईंग. सुटिंग बिचारा राखालांज हालातून." छमदने अट्टाहास करत बावळ्याला सुनावले. "तुमा सगळ्यानं मंज करिंग अपमानांज मंज सूड मी पुरा करिंग."

"नाय." हाताकडून वर चढत चाललेले बधीरपण झुगारायचा प्रयत्न करत बावळ्या धुसफुसला. "तुझं हे समदं नाटक या निकामिकाला बेकार करनाऱ्या असरासाठी हाय. शत्रू देशाच्या हेराचा इश्वास धरून साथी फसला. काय करनार काय तू या बेकारिकाचं?"

"ते तुंजसारख्या रस्त्यावर जगिंग किड्याला कळिंग कठीण. याला राजनीती म्हणहिंग." छमद रागाने बरळली. "आमांज देशांज घातयंत्रे आमी या देशावर सोडिंग. जेहवा ते निकामिक वापरिंग, तेहवा या बेकारिकानं त्या निकामिकाला फोल करिंग. मंग जीत

आमाईंगच. जगात दुंज कोण देश आमांज समोर मंग टिकींग शकिंग न."

"तुला देशाचं पिरेम बिरेम काय बी नाय हाय. ही नाटकं मला सांगू नगं." बावळ्याने तिच्या वर्मावर बोट ठेवले. "तू या बेकारिकाचा सौदा मांडनार हाय. जो कोन तुला जादा पैका घालंल, त्याला तू ते घालनार हाय."

"अबब!" छमदने उपहासले. "इतकंईंग समजिंग माणसानं मंग वेळेईंग त्यांज साथींना सावध काईंग करिंग न?"

"कारन त्यांनी माझा इश्वास केला नस्ता. माझ्याकडं काय पुरावा नाय होता. तू मला खोटा पाडून बाजूला केला असता. पन तू अशी सुटायची नाय. राखाल लांडगा हाय. तो तुला बेकारिक घेऊन जायला देनार नाय. पकडनार." बावळ्याने तिला शापले.

"तुला इतकाईंग वेळ काईंग होईंग? म्हणहून मी वर काळजी करिंग. तुला शोधिंग येईंग. चलिंग. इंथ फालतू माणसासंग बाता मारिंग आमाला वेळ असिंग न." बावळ्याने पाहिले की तो बोलणारा फहद होता. बावळ्याच्या डोळ्यात उठलेले आश्चर्य पाहून छमद खुशालली.

"मंज मासिक धर्मानं नाईंग, तर मंज या याराला आमांज मागे येईंग खूणा कळविंग, मी अध्येमध्ये बाजूईंग जाईंग होईंग. हुषार

माणसा तुला हे कळिंगच नाईंग? बाई!" छमदने बावळ्याला खिजवले. "राखाल वर येईंग त्या आधीच आमी आता आणीबाणींज सुटकेमार्गानं निघिंग जाईंग. राखालला भुलभुलैय्यांज चकव्यात खूणा सांगिंग कोण? जाल्मिक? म्हणहून तर मी त्याला आधीच ठार मारिंग."

"राखाल लांडगा हाय. इसरलीस? तो बरोबर तुझा वास काढत तुझा माग लावनार." बावळ्याने छमदच्या बेतातली घोर चूक उघडी केली.

"तर मंग आमांजपाशी हुकूमांज एक्का होईंग. बेरहम." छमदच्या ऐवजी फहदने उत्तर दिले. "बेरहमला परत करिंग बदल्यात महामहीमा आमांज सुटकेला सहज कबुलिंग. राखाल कोण असिंग? मात्र तिंज कुत्रा." फहद तिरस्काराने थुंकला.

"मी तुझा जीव वाचवला हाय. राखालपास्नं. त्याचं कायच नाय?" बावळ्याने अखेरचा तीर मारला.

तशी छमद उसळून त्याच्यावर आली. "सवताहांज जीव वाचविंग मदत हविंग होईंग म्हणहून." त्यापुढे बावळ्याच्या डोळ्यांपुढे अंधारी येत गेली. ती दिसेनाशी, ऐकू येईनाशी झाली.

## १०० वर्षे पुढे - प्रकरण ३०

बावळ्याने डोळे किलकिले केले. हलकेच एक मोठा श्वास घेतला. औषधी मिरमिरता वास नाकात शिरला. कुठे दूर यंत्राचा घरघराट ऐकू येत होता. खूप उकाडा होता. अंगात त्राण नसल्यासारखे होते. हळूहळू धूसरता नाहीशी होऊन त्याला साफ दिसू लागले. त्याच्यासमोर हिरव्या कपड्यात एक तरूण उभा होता. बावळ्या शुद्धीवर आलाय हे पाहता तो सजग झाला. लगबगीने खोलीतून बाहेर पळाला. त्याला ही कोणती जागा आहे विचारण्याआधी.

बावळ्या अंमळ नाराजीने त्या छोटेखानी खोलीत नजर फिरवू लागला. खडकाळ भिंती होत्या. गुप्ततळाच्या होत्या तश्या. बहुतेक तो तिथेच होता. मान फिरवता फिरवता काटकोनात आडवी वळवल्यावर, त्याला बाजूच्या खाटल्यावर लाकी झोपलेली दिसली. तिचे हातपाय खाटेला मजबूत पट्ट्यांनी बांधलेले होते. बावळ्याने आपले हातपाय हलवायचा प्रयत्न केला. त्याचे देखील घट्ट बांधून ठेवल्याचे त्याच्या लक्षात आले.

लाकी कण्हली. बावळ्याला हायसे झाले. त्याला तिची अजून फिकीर वाटत होती? त्याने तिच्यावरची नजर काढायचा

प्रयास केला. निकामी ठरला. त्याने स्वतःला चार शिव्या घातल्या. तिच्या पापण्या थरथरल्या. लगेच बावळ्याने आपल्या मिटून घेतल्या. थोड्याच वेळात एकदम उघडल्या आणि तिला त्याच्याकडे पाहताना रंगेहात पकडले. तिने लगोलग नजर फेरली. बावळ्याच्या काळजात कुठेतरी सुखाचे कारंजे थुईथुई नाचायला लागले. तिला देखील त्याची फिकिर होतीच तर...

"शंभर वर्षं आधींज माणसा, अखेर तू मंज फाश्यात आपसूक फसिंगच." राखालने त्याच्या कमरेवर हातवाल्या आवडत्या ढबीत उभ्याने ललकारले. "हा राखाल कंधी आव्हान हरिंग न. तू मरिंग होईंग. तरही तुला मंज फाश्यासाठी जिवंत करिंग होईंग." त्याने जिंकल्याचा अट्टाहास केला. त्या हास्याने बावळ्याला आपला त्राण नसलेला देह गदागदा हलल्यासारखे वाटले. तो खोलीत कधी हजर झाला हे बावळ्याला कळले नव्हते. "जाम प्रेम दिसिंग तुमा दोघांत." मग राखाल त्या हिरवे कपडेवाल्या तरुणाकडे वळला. "याला शुद्ध येईंग असिंग. हे महान महामहीमाला कळविंग. जाईंग तातडीईंग."

"मला तर इष घातललं. त्या छमदनं. मी जगलो कस्सा काय?" बावळ्याने राखालला विचारले.

"मंज हातून मरिंगसाठी." राखालने छद्मी उत्तर दिले. "दोन दिसांज वैद्यांज खटपटीनं तुमी वाचिंग. महान महामहीमा तुला जिवंत इच्छिंग कारणिंग. तू नशीबवाला असिंग. भल्याभल्यांज तिंज भेट कितीईंग मागिंग तरही मिळिंग न. ती तुला भेटिंग इच्छिंग." तो हिरवे कपडेवाला निरोप घेऊन परतला. राखालला या दोन्ही कैद्यांना सहीसलामत बरोबर घेऊन छळकोठडीत हजर होण्यास फर्मावलेले होते.

राखालचे डोळे आसुरी आनंदाने लखलखले. त्याने बोटे लाकीच्या ओठांवर खेळवली. "मंज काईंग माहीतिंग न, की तुला मंज कैदैहून मरण कितीईंग अधिक होईंग. राणी पण तुंज साथीदारणीनंच मंज काम कितीईंग सोप्पं करिंग होईंग. जे तुला विषानं पांगळी करिंग होईंग. म्हणहून मी खुशीनं तिला मोकळी सोडिंग. मंज कितीईंग घोर! जर तू आत्मघात करिंग तर?" तो चुकचुकला. "पण जगात देव असिंग. त्यानं मंजसाठी तुला राखिंग." लाकीने त्याचे ओठांवरचे बोट कडकडून चावायचा प्रयत्न केला. तसा त्याने पुन्हा एक जोराचा अट्टाहास केला. बावळयाने असह्य होऊन डोळे मिटून घेतले.

राखालने हाताने टाळी वाजवता, त्याचा रझाकार कंपू खोलीत शिरला. बावळया व लाकीला खाटेवरून मोकळे करुन, पुन्हा

यथोचित हातपाय बांधून, त्यांची मोट करून पालखी वाहण्यात आली. ते दगडी अरूंद बोळाचे मार्ग पाहून, बावळ्याची खात्री पटली की ते गुप्ततळावरच होते. एका मोठ्या दालनात त्यांना पोहचवण्यात येऊन जमिनीवर टाकण्यात आले. त्या दालनात माणसाच्या देहाचे हालहाल करण्यासाठी अनेक प्रकारची साधने ठेवलेली होती. राखालने त्यातल्या कोणत्या कोणत्या साधनाचा उपयोग त्यांच्यावर केला जाईल, त्याची आणि त्यांच्यावर काय परिणाम होईल, त्याची माहिती सहर्ष त्यांना सादर केली. त्यांच्या मनात भीती जागवायचा प्रयत्न केला. बावळ्याच्या मनात तशी जागलीहि. त्या वर्णनांत महामहीमा येईपर्यंतचा वेळ राखालने कारणी लावला.

महामहीमा ताडताड पावलं टाकत भूमी पायाखाली रोंदत दालनात आल्यावर, उपस्थित तिच्या साऱ्या चमच्यांचा सावधान पवित्रा, तिचा दरारा दाखवून देत होता. दिसायला ती क्रूर भयानक नव्हती. तिला बघून बावळ्याला तेहत्तीसाव्या मजल्यावरची ती अवपिपासा शास्त्रज्ञ बाई आठवली. रंगरूपाने तिचाच नमुना होती ही बाई. पन्नाशीच्या आसपास वयाची असावी. पांढरीफटक गोरी. गुबगुबीत अंगाची. ठेंगणीशी. तिचे कोंजे डोळे मात्र तेजाळ होते. पातळ ओठांच्या कडा निग्रही होत्या. पांढरेशुभ्र या काळातले पट्ट्यांचे कलात्मकतेने जोडलेले कपडे ती ल्याली होती. त्या

कपड्यांसारखेच पांढरे केस जोडीला बरे शोभत होते. तिच्या कपड्यांना भारी अत्तर होते. समोरच्याला ती क्षणभरासाठी समोरून गेली, तरी काही तास गुदमरवून टाकेल इतके.

ती बोलली तेव्हा तिचा आवाज भारदस्त वाटला. या आवाजाच्या जोरावर कदाचित तिने राज्य मिळवले आणि राखले असावे. "मंज इतकाईंग राग राग लोक काईंग करिंग होईंग? मी तुमांज काईंग वाईट करिंग होईंग?" तिची नजर शांतपणे लाकीवर रोखलेली होती.

"तू आमाला इंथ या असल्या जागेवर भेटिंग. यात सगळंईंग येईंग." लाकी तितक्याच शांतपणे उत्तरली.

"ए नाडचुकी." रझाकार दिनशाचे इमान उफाळले. "खबरदार जर महान महामहीमांज संग एकेरीत बोलिंग. जीभ कापिंग."

"न." महामहीमाचा आवाज चाबकासारखा फटकारला गेला. "मी बोलिंग तेहवा, दुंज कोण मध्ये आडवं बोलिंग न." तिची रोखलेली स्थिर नजर सहन न होऊन, दिनशा तिची माफी मागून दालनातून बाहेर निघून गेला. ती लाकीकडे पुन्हा वळली. "मी इंथ फार चांगलं राज्य चालविंग असिंग. या कामचुकार सरकारी माणसांवर कितीईंग उत्तम वचक ठेविंग. त्यांना कामाला लाविंग.

काईंग या आधींज राज्यकर्त्याला ते जमिंग? सांगिंग. हे खरेईंग की नाईंग?"

"सरकारी माणसांना कामी लाविंग. पण लोकांज कामी न. सवताहांज आपमतलबाईंग कारणिंग." लाकीने कडवट आरोप केला.

"मंज मतलब लोकांज मतलबाहून काईंग वेगळा होईंग न. मी इंथ लोकांज चांगली काळजी घेईंग असिंग. ज्या देशात सुशासन होईंग न, काईंग त्या देशात साहित्य, कला, संगीत उर्जिताईंग? काईंग या देशात कलाकारांज भरभराट असिंग न? हे सुशासनांज सुलक्षण असिंग न? सांगिंग." महामहीमाने आरोप खोडून काढला.

"जे तुंज भाट होईंग, त्यांज भरभराटच असिंग." लाकीने व्यंग केले. "पण काईंग ते खरेईंग कलाकार म्हणिंग लायकींज असिंग? तुंज उदोउदो करिंग निलाजरे होईंग, एवढीच कला ते साधिंग होईंग. तुंज दिखावटी राज्यात खरे ऋजूजानसारखे कलाकार उपासमारीत मरिंग होईंग."

"असमंजस मुली, तू मंज नाहक द्वेषानं आंधळी होईंग. तुला काईंग बरे, तंस्स बरे दिसिंग न. मंज द्रष्टेपण कळिंगसाठी, माणसांज आधी सवताहांज तितकीईंग पात्रता हविंग होईंग." महामहीमाचा आवाज शांत होता. त्यात कुठे चीड दिसत नव्हती. तिचा सारा आव

लहान मुलाच्या समजावणीचा होता. "शेजार शत्रूराष्ट्रांज महामहीम दिग्गीराजा, काईंग कावा करिंग नी आमांजवर चढाईंज जोर करिंग, तो मी आधीच जाणिंग होईंग. मी वेळेत सीमेवरील सैन्यात वाढ नी तैनात करिंग होईंग न, तर आज या देशांज जनता शत्रूंज लूट नी जुल्मांज बळी पडिंग होईंग. काईंग हे खरेईंग न?"

"शत्रूराष्ट्रांज महामहीम नी या राष्ट्रांज महामहीमा, एका नाण्यांज दोन बाजू असिंग. दुसऱ्यांज बागुलबोवा दाखविंग सवताहांज जनतेला भय घालिंग. मंग आपली मनमानी त्यांजवर चालविंग. तुमा दोघांज छुपी एकमेकासंग हातमिळवणी असिंग." लाकीने घणाघाती आरोप केला.

"काविळ झालेल्याला सगळंईंग जग पिवळं दिसिंग." महामहीमा उसासली. ती लाकी आणि बावळ्याभोवती रिंगण केल्यासारखी घिरटू लागली. "या देशात तुला हविंग तंस्स उलटा विचार करिंग सुदहा स्वातंत्र्य मिळिंग. काईंग तू अंस्स काही त्या शेजार देशात कोणापुढं बोलिंग शकिंग? तुंज जीभ जागेवर राहिंग?" महामहीमाच्या जोड्यांच्या टोकेरी टाचांखाली, आपली बोटे येण्यापासून वाचवायला बावळ्या वळवळला.

"तिंथ रोज रोज डाकूंज टोळ्या गावोगाव हल्ला करिंग लूटमार नी कत्तल करिंग होईंग. काईंग तंस्स इंथ होईंग? तिंथ कोणाला

जीवांज भरवसा उरिंग न. पण इंथ लोक त्यामानानं खूप बरेईंग जीणं जगिंग. काईंग हे कोणी नाकारिंग शकिंग?" महामहीमाने पुढे झुकून लाकीच्या खांद्याला स्पर्श केला. लाकीने जणू त्यामुळे अंग जळत असल्यासारखे चोरले.

"आदर्श राज्य केवळिंग एक कवीकल्पना असिंग. व्यवहारात जे जे शक्य असिंग, ते सगळे मी लोकांजसाठी करिंग असिंग. त्यात मंज कंधी चुकिंज सल्ला मिळिंग. मी चुका करिंगहि होईंग." महामहीमाची नजर लाकीशी जुळली.

लाकीने उबग वाटून आपली नजर त्यातून सोडवून घेतली. "काईंग तू मंज सल्लागार बनिंग? मी हुषार माणसांज पारखी असिंग. तू मंज सामील होईंग. मी तुला अधिकार पद देईंग. आदर्श बोलिंग सोप्पं होईंग. अंमलात आणिंग कठीण. तू सवताहा जाणिंग घेईंग की राज्य चालविंग म्हणहजे काईंग असिंग. तुला जर जमिंग तर लोकांज भलं साधिंग. मंगच मंज बोल लाविंग."

"भलं? लोकांज भलं?" लाकीने उपहास केला. "काईंग तू त्या आधी मंज एक भलं, मंज एक न्याय करिंग शकिंग?" तिने महामहीमाच्या तेज नजरेत नजर लावली. त्यातली पृच्छा समजून बोलती झाली. "काईंग मंज मायबापांज खुनी बेरहमाला तू फाशी देईंग शकिंग? बोलिंग?"

"बेरहम?" महामहीमा दुग्ध्यात पडली. "त्याला तर तू आधीच अपहरण करिंग ठार मारिंग होईंग."

"न." लाकीने रहस्यभेद केला. "तो काईंग तुंज पाठी नुक्ताईंग येईंग उभा होईंग." महामहीमाला चेहऱ्यावरचे नवल लपवता आले नाही. ती मागे वळली. खरोखर बेरहम तिथे उपस्थित झाला होता. त्याने लवून तिला अभिवादले. "जरूर त्या दुष्टेनं छमदेनं त्याला सोडविंग होईंग. आता तुंज शास्त्रज्ञ परतिंग. मंज शास्त्र ज्ञानांज गरज तुला उरिंग न. तर काईंग मंज फुसलविंग?"

लाकीला द्यायला उत्तर नसल्यामुळे वा तिला बावळ्याची आठवण झाल्यामुळे, महामहीमाचा रोख त्याच्याकडे झाला. "शंभर वर्ष आधींज काळातल्या माणसा, तू या काळात कंस्स येईंग? तो चमत्कार असिंगच. पण मी ऐकिंग की तू सवताहा सुद्धा एक चमत्कार असिंग." बावळ्याने लाजल्यासारखे दाखवले. "तुंज हुषारिंज गोष्टी या काळातल्या आया त्यांज पोरांना नीजईंग सांगिंग. त्या तुंज काळात नी मंज या काळात काईंग बदल तुला दिसिंग? आमी बरे वाटिंग काईंग?"

"बदल?" बावळ्यानं ओठांचा चंबू केला. खुशालीच्या गप्पा माराव्यात त्या सहजतेने तो सुरू झाला. "कितकं समदं हायत की. बदलच बदल हायत. गाडीच्या जागी पायरथ हाय. ती पिसूडी जाम

भारी हाय. पायहोडी नी पायडुबी बी हाय. आनी खान्यासाठी ते मन्नान्न लय बेकार हाय. ते दूरच्या मानसाशी बोलायचं पानीवालं साधन बी फालतू हाय. पन ते पान्याचं दिवं नी चूल एकदम बेस. बाकी हे कपडं येगळं हाय. अंडाघर बी नवं हाय. आनी...." तो यादीत भर घालवायला आठवू लागला.

"नी या काळांज हत्यारं? त्या काळांज बंदुका नी बॉम्ब समोर कुचकामी असिंग की नाईंग?" महामहीमाने सुचवले. ती त्याच्या पुढ्यात बसती झाली.

"होय की. पन मला ती बंदूक चालवता येत नाय होती. नी इथली ढाल-तलवार बी नाय. तो तीरकाठा वापरन्यापरीस दगड उचलून मारनं मला परवडंल." बावळ्याने तिला दुजोरा दिला. "आपलं इचार कितकं जुळतं हाय." लाडीगोडी केली.

महामहीमाच्या चेहऱ्यावर जरा निराशा उमटली. तिला हे ऐकायचे नव्हते. "काईंग तुला वाटिंग न की तो तेहवांज काळ या काळाहून चांगला होईंग? तेहवा माणसं जास्तईंग सुखी होईंग? या काळांज माणसांज दुखडी त्या काळांज माणसांना होईंग न?"

तिला त्याच्याकडून काय वदवून घ्यायचेय, हे बावळ्याला कळले. त्याला तिची मर्जी राखायची गरज वाटली नाही. "तो काळ आनी हा काळ? नाय बा. काय फरक नाय हाय. मानसाची समदी

दुकं तीच ती हायत की." महामहीमाच्या कपाळावर स्पष्ट आठ्या चढल्या. बावळ्याने लाकीवर नजर टाकली. लाकीला हा काळ जास्त चांगला आहे, हे ऐकायला आवडेल. त्याच्या लक्षात आले.

पण त्याने आपल्या मनाचे खरे बोलणे पसंत केले. "तिथं बी लोकांना बटिक करून त्यांच्याशी जबरदस्ती संग होत होता. इथं बी. लोक नशा आनी जुव्यात संसाराची आबाळ करत होते. इथं बी करतात हाय. तिथं बी बाई-बाप्यात, मानसा-मानसात कमी जादा करत होतं. इथं बी तेच. चोरीमारी, लूटमार, खून-लढाई समदी बुराई इथं हाय, तश्शीच तिथं बी होतीच की." बावळ्याने आता महामहीमाच्या चमच्यांवर नजर लावली. "तिथं बी लाचखोर हरामी सरकारदार होते. इथं बी हायत. आनी सरकारचा जुल्म तिथं बी तोच. इथं बी तोच." आता त्याने नजर सरळ महामहीमाच्या नजरेशी टकरवली. त्याला काय म्हणायचे होते, सगळ्यांच्या लक्षात आले. लाकीच्या चेहऱ्यावर स्मित फुलले.

महामहीमाला तरी शांत राहणे जमले. "ओहो! ध्यान बावळं होईंग तरही तुंज अंतरंगी नामी कळा होईंग. लोक तुला काईंग चमत्कार म्हणिंग, त्यांज कारण मंज समजिंग." ती बसती होती ती ताठ कण्याने उठती झाली. "लोक हो, कैक सवताहांज विचारवंत म्हणविंग त्या अतिशहाण्यांज न कळिंग, ते कालातीत अबाधित

सत्य या चोराईंग सहज कळिंग. महान युगनायकांनी जे सांगिंग होईंग तेच हा सांगिंग होईंग. कुंठ काळ, कुंठ देश, कुंठ समाज होईंग, तिंथ माणसांज परस्पर विषय नी त्रास तेच ते होईंग."

तिच्या या कबुलीजबाबाने उपस्थित सगळे सरकारीगण अस्वस्थ झालेले दिसले. त्यांची जागच्या जागी चुळबुळ वाढली. "काईंग महान महामहीमा युगनायकांज दंडक अवलंबिंग विचार करिंग?" बेरहमाने उपहासाने विचारले.

महामहीमाने त्याच्याकडे डावी भिवई उंचावून पाहिले. तो डगमगला नाही. बाकिच्यांचा भक्कम पाठिंबा त्याला दिसला. तिने खांदे उडवले. "सामाजिक समस्या सनातन असिंग. भ्रष्टाचार, नालायक राज्यकर्ते, ही गैरव्यवस्था नी गैरकारभार कायमांज असिंग." तिने हात दोन्ही बाजूला लांब पसरले. तिला सगळे सरकारीगण त्यातले दर्शवायचे होते. त्यांचा राग बळावला.

"ही गरिबी- श्रीमंती, ही समाजातली उतरंड नी त्यांज मधली चढाओढ-खेचाखेच, हा माणसा-माणसांत भेदाभाव नी शेजाऱ्यांज शत्रुत्व. कंधीहि संपिंग न. त्यात बदलिंग प्रयास म्हणहजे दगडावर डोई आपटिंग. हे मी म्हणिंग न. तुंज महान युगनायकांनी सांगिंग होईंग, गं नवर्तने." आपल्या खऱ्या नावाच्या उल्लेखाने लाकी चमकली. तिच्या भिवया ताणल्या गेल्या.

"मंग तू काईंग ते बदलिंग धडपडींग?" महामहीमाचा आवाज वीजेसारखा कडाडला. "ही निसर्गानंच करिंग व्यवस्था असिंग. तू काईंग त्यांज विरोधात जाईंग. काईंग त्यांज विरोधात जिंकिंग शकिंग? हरिंग ती लढाई काईंग लढिंग?" लाकी या युक्तिवादापुढे अवाक झाली. सरकारीगणांचे ताणलेले चेहरे सैल झाले. "या पतित प्रवाहा विरोधी जाईंग परीस, मंज सोबत या प्रवाहात वाहिंग. सवताहांज जीव राखिंग नी भलं साधिंग. हाच हर एक प्राणीमात्रांज खरा निसर्गधर्म होईंग."

तिथे अचानक टाळ्यांचा मोठा कडकडाट झाला. "सत्य. सत्य. सत्य." सभोवतालच्या सगळ्या सरकारदारांनी खुशीने अनुमोदले. "महान महामहीमांज जय होईंग." त्रिवार जयजयकार केला.

"जर तू मंज संग येईंग, तर या अव्यवस्थेंज त्रास जो इतरांज होईंग तो तंस्स अजिबात तुंज होईंग न. कमळ चिखलांज पासून अलिप्त राहिंग, तंस्स तू त्यांज उपसर्गापासून वेगळी राहिंग. कारणिंग त्यांज सर्वेसर्वा जी मी, तिंज अनुग्रह तू पाविंग." महामहीमा पुन्हा लाकी आणि बावळ्याभोवती घिरट्या घालू लागली.

"या समाजांज अनेक पायऱ्यांज शिडीवर, तू सगळ्यात खालून थेट सगळ्यात वरच्या पायरीवर पोहचिंग. सर्व सुविधांज आगर जो

पैसा त्यांज काईंग तोटा तुला कंधी होईंग न. नी....." इथे तिने मोठा अवकाश घेतला. उत्सुकता वाढवून बोलती झाली, "या बेरहमांज सारख्या कोणा विकृत शास्त्रज्ञांज हत्याराला, तुंज मायबापांज सारखी बळी पडिंग न. तुंज मुल तुंज सारखं अनाथ होईंग न."

"साधु. साधु. देववचन." सरकारी गर्दीने पुन्हा महामहीमाचा त्रिवार जयजयकार केला.

तशी चवताळलेल्या फणा काढून वर उठणाऱ्या नागीणीसारखी, लाकी मान ताठ वर करून सगळ्यांना म्हणती झाली. "लुच्च्यांनो तुमांज लुच्चेपणांज समर्थन गाईंग ही आईसझुकी, तुमांज सम्राज्ञी शोभिंग खरीईंग."

"हिंज जीभ छाटिंग होईंग." जमलेल्यांचा गलका झाला. "तिला अ ाणखीईंग सहन करिंग जरूरी होईंग न. महान महामहीमा परवानगी देईंग तर..." बेरहम दातओठ खात बोलला. पण महामहीमाने हात उंचावून त्या सगळ्यांना गप्प केले. लाकीला बोल म्हणून खुणावले.

"महान युगनायकांनी सांगिंग ते समाजात न बदलिंग बारहा गोष्टी तू सांगिंग. पण महान युगनायकांनी जे समाजात कायम बदलिंग बारहा गोष्टी सांगिंग होईंग, ते सांगिंग तू सोयीनं विसरिंग. त्या त्या समाजात त्या त्या काळात वापरिंग साधनांत नेहमी बदल

होईंग असिंग. म्हणहून त्या काळांज लोकांज जीणं, इतर काळांज लोकाहून वेगळं होईंग. ज्या कारणिंग आमांज काळात येईंग, या बावळ्यांज गोंधळ होईंग असिंग."

"काय हायत ती बारहा? मला नाय मायती हाय. सांग की?" बावळ्या मध्येच उतावळा बडबडला.

"वाहनं, हत्यारं, चलनं, दुरसंपर्क, भाषा नोंद, चूल, दिवा, उब, इमारत, कापडं, अन्न, उपचार ही ती बारहा साधनं होईंग." लाकीने या वेळी त्याचा अनमान केला नाही. "तू शंभर वर्ष मागाईंग येईंग. तुला कंस्स माहित होईंग? पण हे या काळांज लोक असिंग. त्यांना माहीतिंग न?" टेचात नाक उडवले. "या साधनांत काईंग तरही कमतरता नी त्रास होईंगच. ती सुधारिंग कारणिंग नवी साधनं शोधली जाईंग. नव्या साधनांज कारणानं नवं जीणं. नवा काळ. नवीन त्रास. हर एक काळांज आपापला सवताहांज खास त्रास असिंग. माणसाला पाणी निर्माण कंधी साधिंग न. पण आमी दिवा नी चूलीत त्यांज नाश करिंग होईंग. हा या काळांज त्रास होईंग. समस्या होईंग."

"काईंग आमी बौद्धिक सभेला जमिंग होईंग? अंस्स प्रवचन तिंथ चालिंग." कंटाळलेल्या बेरहमाने गळा काढला. "आमाला

महत्वांज विषय इतर कैक होईंग. महान महामहीमाला विनंती होईंग की या दोघांज निर्णय तातडीनं करिंग टाकिंग."

महामहीमाने त्याच्यावर एक जळजळीत कटाक्ष टाकला. "खुळचुक्या," तिचा संयम सुटला आणि तोंडातून शिवी सुटली. "विरोधी बाजूंज काईंग ज्ञान नी विचार होईंग, ते जर कोण जाणिंग न, तर त्यांजवर कंधीही मात करिंग शकिंग न. तू इंथहून चालताईंग होईंग." तिच्या नजरेच्या एका इशाऱ्यावर रझाकार दल बेरहमाच्या दिशेने कमरेची हत्यारे सरसावत सरकले. तो गुमान अपमान गिळून नजर झुकवून चालता बनला.

तो खेळ पाहून मान झटकून लाकीने आपले बोलणे पुढे सुरु केले. "तू सवताहाला मोठी द्रष्टी म्हणविंग. पण त्या शंभर वर्ष आधींज काळांज गोष्टी नी साधनं, पुनहा या काळात आणिंग धडपडिंग. तर त्यांज संग त्या काळांज जे सवताहांज खास त्रास नी समस्या होईंग, त्या सुदहा या काळात तू परत जागविंग होईंग. काईंग ते त्रास कितीईंग भयानक होईंग तू जाणिंग न? तुला माहीतिंग न?"

लाकीच्या या विचारणेवर महामहीमा थट्टेखोर चुकचुकली. "तू तुंज तोंडानं सांगिंग या गणांना. मंज जोडीनं ते काईंग राक्षस जागविंग होईंग, त्यांना कळिंगच होईंग. ते या काळांज शासक होईंग. या काळाईंग जबाबदार लोक होईंग."

"आज लोकांना निसर्गात मिळींग त्या पदार्थांज पलीकडे दुंज काही उपलब्ध होईंग न. पण त्या काळात जे अजैविक पदार्थ बनविंग होईंग, त्यांज विष हवा-पाणी-जमिनीत आमाला आजहि त्रासिंग. त्या विषानं मरण नी आजारपणं काईंग तुमाला परत हविंग असिंग?" लाकीच्या प्रश्नावर सरकारदार गप्प राहिले.

"त्या काळात खनिज तेल जाळिंग नी वीजेवर चालिंग उपकरणांज मोकाट शक्तींज कारणानं, व्यापाऱ्यांनी करिंग बेलगाम वापर-उपशानं निसर्गांज संतुलन बिघडिंग. त्यात कैक जीव नाश पाविंग. कैक प्राणी, वनस्पतींज जाती नी त्यांज संग करोडो वंचित माणसंहि. काईंग तू पुनहा करोडो जीव नाश करिंग इच्छिंग?" लाकीने दुसरा प्रश्न पुढे मांडला.

"सबळ तो टिकिंग. दुर्बळ तो संपिंग. हा मंज नाईंग, निसर्गांज नियम असिंग. आमी सबळ होईंग, हा आमांज दोष होईंग न." महामहीमा आढ्यतेने बोलली.

"त्या काळात कोणांज बलाबल मोठेईंग? या चढाओढीनं जी अण्वस्त्रं नी घातयंत्रं तयार होईंग, त्यांनी सगळ्या सृष्टींज नाश आरंभिग. काईंग तो अर्धा राहिंग सर्वनाश, तू पुरता साधिंग इच्छिंग?" लाकी जोरात ओरडली. "मंज मुलं अंस्स काळात मी कंधीहि जन्माला घालिंग न, जिंथ केवळ त्रासत्रास नी सर्वांज नाश

होईंग. मी मंज जन्माला येईंग मुलांना राखिंग, म्हणहूनच तुंज विरोध करिंग असिंग. मंज निसर्गधर्मच पाळींग असिंग."

लाकीच्या या सडेतोड उत्तरावर बावळ्याला टाळ्या वाजवाव्याश्या वाटल्या. हातपाय बांधलेले असल्याने त्याला ते शक्य झाले नाही. "गुनाची गं माझी बाई ती!" त्याने तोंड उघडता येणे शक्य असल्याने तसे कौतुक केले.

तशी चवताळून महामहीमा त्याच्याकडे वळली. "तिंज नकार मंज समजिंग. काईंग तुंज सुदहा नकार समजिंग? लक्षात घेईंग की तू एकांज खटाटोपानं जगात काईंग फरक पडिंग न. तुला या काळात इंथ लढाईत चिरडिंग काईंग कारण असिंग न. तू सवताहांज राखिंग नी चैनीत जगिंग."

"कबूल हाय. माझ्या एकट्याच्या करन्यानं कोनाला बी काय फरक इथं पडनार नाय. तर मी जगाची फिकीर कशापायी करू? नायच करत. पन बाई, तू तरी माझी इतकी फिकीर कशापायी करती हाय? हिच्यावर आनी हिच्यासाठी मरतो हाय, तर मरू दे की. काय तुझा जीव बी माझ्यावर आला नाय बा?"

"ए," राखाल त्याच्यावर धावून आला. "महान महामहीमा, मंज परवानगी देईंग. या मजनूंज जीव त्या लैलात असिंग. नी त्या लैलांज या मजनूत. कोण तुंज कामांज असिंग सांगिंग. त्यांज या

दुसऱ्या जीवाला छळचक्रात घालिंग की तो निमूट तुंज सगळं सांग पार पाडिंग." राखाल आळीपाळीने दोघांकडे दातओठ चावत पाहू लागला.

"न. आता ही दोघं मंज काईंग कामांज उरिंग न. सगळयाईंग पार होईंग असिंग." महामहीमाने जांभई देत कंटाळा दर्शवला. तश्या उपस्थित सगळया सरकारदारांनी जबरी जांभया काढल्या. "आता यांज एकच उपयोग असिंग. उद्या भरचौकात यांना देशद्रोही म्हणहून जाहीर मरण देईंग होईंग. सरकार विरोधात जाईंग लोकांना दारूण दहशतीईंग. यांना पोत्यात घालिंग लोकांना दगड मारिंग फर्माविंग."

"साहेब सरकार माफीईंग. तुला बदल सुचविंग." राखाल कमरेत पार झुकत म्हणाला. "लोकांत सरकार विरोधात असंतोष असिंग नी बंडबागींज साठी सहानभूती. कदाचईंग लोक अंस्स फर्मान धुडकाविंग. त्या परीस यांना जाहीर फाशी देईंग."

"न." महामहीमा आता किंचाळली. तिच्या भिवया वाकड्या झाल्या. "लोकांनी सवताहांज मनांज विरोधात दगड मारिंग, यांना ठार करिंगच होईंग. तरच या पापात भागी जाईंग कारणिंग लोकांज मनं पुरती खच्ची जाईंग. लोकांना भीती घालिंग नी हे साधिंग होईंग मी तुला नेमिंग असिंग. आणिक काईंग इतकी सरकारी फौज मी फुकट पोसिंग होईंग?"

"जंस्स हुकूम. साहेब सरकार." राखाल हिरमुसला.

"ती लाकी उद्या चौकात नेईंग पावतो तुंज होईंग." त्याला चुचकारण्यासाठी महान महामहीमा उदार झाली. "फक्त ती मरिंग न, इतकिईंग काळजी घेईंग." त्यानंतर आली तशीच ताडताड पावलं टाकत ती दालनाबाहेर रवाना झाली.

"या शंभर वर्ष आधींज माणसाला काळकोठडीत नेईंग. या लाकीला मंज कोठडीत." रझाकारांना हुकूम करताना राखालच्या चेहऱ्यावर जहरी हास्य उमटले. तो लाकीवर झुकला. "आता वेळ येईंग असिंग, तुंज महान युगनायकांज प्रती निष्ठा परीक्षिंग. तू मंज शर्त हारिंग असिंग. महान युगनायकांज जी शपथ तू तेहवा घेईंग असिंग, काईंग ती आता पाळिंग?"

लाकीचे डोळे या धर्मसंकटाने डबडबून आले. तिने अगतिकतेने बावळ्याकडे पाहिले. तो काहीच मदत करू शकत नव्हता. बावळ्याचा जीव तडफडला. त्याच्या मनात तीच हतबलता दाटून आली, जेव्हा त्याची आई वा बहीण त्याच्याकडे अशा बघायच्च्या. तेव्हा तो मरूहि शकत नसायचा. तो जन्माला आलाच का होता? आणि त्याच्यासारखी चिरडली जाणारी ती तमाम कमनशीबी माणसं?

# शंभर वर्षे पुढे - प्रकरण ३१

बावळ्याला रझाकार गुप्ततळाच्या अंधाऱ्या खोल गुहांमधल्या बोळांमागून बोळातून मोट बांधून घेऊन चालले होते. एका मजबूत दांड्याला त्याचे हात पाय एकत्र बांधून उलटे टांगून. "ए? मी काय शिकार केलंलं जनावर हाय काय? मानूस हाय की. सरळ पायावर चालवत न्या की. येतो की तसा. नाय कुठं म्हनतो का?" त्यांनी त्याच्या सतत चालणाऱ्या टकळीकडे साफ दुर्लक्ष करण्यात हुषारी मानली. एका ठिकाणी ते डावीकडे वळले. तिथून दुतर्फा जाड लोखंडी सळयांचे गज असलेल्या कोठड्या सुरू झाल्या. त्यातल्या एका कोठडीत बावळ्याची पालखी वाहणाऱ्या रझाकारांच्या जलदिव्यांचा प्रकाश जरा वेळासाठी सांडला. तिथे एक अद्वितीय सुंदरी बसलेली बावळ्याला दिसली.

त्या कोठडीपासून काही अंतरावरच्या कोठडीत बावळ्याला फेकण्यात आले. "आरं आता कोठडीत घालताय, तर मंग या हातापायात बेड्या कशापायी रं? काढा की." कोणी त्याला उत्तर द्यायच्या भरीला पडले नाही. कोठडीचे जाडजूड कुलूप लावून त्याला बंदीस्त करून रझाकार कंपू परत निघाला. "ए ठेंग्या?" बावळ्याने दिनशाला ललकारले. "काय तुझा सरदार मला इतका

भितो काय? कोठडीत डांबतो ते बी वर बेड्या घालून? नाय तर मी सुटून येल आनी त्याच्या नरडीचा घोट घेईनसं वाटतं काय?" दिनशा बोलायला उतावळा झाला होता. पण बाबूशने त्याला तोंड बंद ठेवायला खुणावले. ते गेले. त्यांच्या सोबत तिथला प्रकाश. मिट्ट काळोख आणि शांतता तिथे पसरली.

"ऋजूजान?" बावळयाने थोड्या वेळाने हाक दिली. "काय तुला बी माझ्या संग बोलायला जड झालं काय? समद्यांना मी नकोसा झालो काय? थू तुझ्या जिंदगानीवर बावळ्या. थू." बावळया गळा काढून रडायला लागला. स्वतःला शिव्या घालू लागला.

"ती लाकी मला बोलती तुझ्यात लढायचा दम नाय. रगत नुस्त बघलं की पडतो घेरी येवून. कच्च्या काळजाचा. मी म्हनलं बरोबर हाय तुझं. बोच्यात नाय गू. चालला हागायला. की ती म्हननार, तुला बोलायची समज नाय. तुझ्या संग बोलनं बी बेकार. बोलनंच टाकलं तिनं. मला वागायची रित नाय. माझ्या संग फिरलं तर तिची लाज जाती. मी काय नाय केलं तिच्यासाठी? काय नाय सोसलं तिच्यापायी? तरी बी तिनं मला टाकला. अस्सा अंगावरून झुरली झटकावी तस्सा झटकून टाकला की. मी म्हनजे तिच्यासाठी वगाच

पायात येनारं रस्त्यावरचं लूती कुत्रं हाय की." बावळ्या परत एक रडं काढून मोकळा झाला. ऋजूजान काही बोलली नाही.

"हा. हाय मी गटारचा किडा. तिथंच वाढलो हाय. नाय मायत मला तुमा लोकाच्या वागा-बोलाच्या भल्या रितीबाती. काय शिकवनार ते माझी आये? तुझ्यासाठी ती तर पार आडानी बिनअकलंची बाई. तिचाच मी पोरगा. तिच्यासारकाच फाटका की गं." पुन्हा रडायचा उमाळा येऊन बावळ्या रडला.

"ऋजूजान, ए ऋजूजान? ऐकतीस ना? बोलू नगं. पन ऐकशील गं तरी खरी? ती लाकी गं? कायच नाय बोलली ती? माझ्या पुढ्यात तिला मरायला उचलून नेली. तरी शेवट पावतो माझ्या संग एक शब्द बी नाय. नाय म्हनजी अजाबात नाय. मी काय म्हनजे कायच नाय गं करू शकलो." बावळ्याचे मुसमुसणे चालू राहिले.

"माझ्या आये-बहनीची माझ्या पुढ्यात किती येळा म्हनून सांगू आब्रू लुटली. मी तेवा बी कायच नाय करू शकलो. माझी आये माझ्या पुढ्यात जीभ हासडून तडफडून मेली. नाय तिचा इलाज, नाय तिला दोन घास कधी मी देवू शकलो. माझी जिंदगानी म्हनजे हार आनी हारच हाय." बावळ्याला पलीकडून काही प्रतिसाद मिळाला नाही.

"नगं बोलू. नगं." बावळ्या स्वतःला पटवत होता. "मी बोलतो. तू ऐक. माझा बा ते समदं बघन्याआधीच जीव देवून सुटला. मी कितका भ्याड हाय? ते बी नाय जमत. कशापायी गं जल्माला आलो हाय? आये, बहीन, मी आनी आमच्या सारकी ही समदी कमनशीबाची मानसं जगात कशापायी गं जल्माला येतात? बुऱ्यांना इतका जोर कशापायी हाय गं? देवानं जग बनवलं म्हनतात. तर त्याच्या या जगात इतकं वंगाळ कशाला हाय गं? कशापायी हाय?"

"बावळ्या!" एक मंजुळ आवाज काळोखात झंकारला. "तुला मी ते सांगितलं तर समजेल का? मी आजपर्यंत अनेक जणांना सांगितलं. पण मला ते जसं समजलंय, तसं त्यांना समजावून देऊ शकले नाही."

"तुला माझी भासा येती, माझ्या काळची?" बावळ्याला हुरूप आला.

"हो." ऋजूजानच्या हसण्याचा नाजूक आवाज आला. "मी शंभर वर्षे आधीच्या महान युगनायकांची भूमिका साकारते. मला तिथे त्याच भाषेत बोलावं लागणार. नाही का? मी शिकलेय ती. माझ्या आजोबांनी शिकवलीय ती मला. त्यांच्या लहानपणी महान युगनायकांचा प्रत्यक्ष सहवास त्यांना लाभलेला. त्यांच्याकडूनच

आजोबा शिकलेत. नाटकातलं खोटं जगणं आणि खऱ्या जगण्यातलं नाटक कसं पार पाडायचं ते." तिच्या आवाजात आजोबांचा अभिमान होता.

"काय बा समजलं नाय मला. म्हनजे नाटकातलं जगनं आनी जगन्यातलं नाटक, हे काय हाय?" बावळ्या गोंधळला. तो त्याच्या दुःखातून जरासा सावरल्यासारखा वाटला.

"म्हणजे आपलं रोजचं जगणं हे सुद्धा एक नाटक आहे. हे सगळं जग म्हणजे या नाटकाचा रंगमंच आहे. आपली मनं म्हणजे या नाटकातली पात्रं आहेत. आपली शरीरं म्हणजे या नाटकासाठी घेतलेली आपली वेशभूषा आहे. एरव्हीच्या नाटकात कधी काय प्रसंग आहे, आपण काय बोलायचं? काय करायचं? हे आपल्याला नाटककारानं सांगितलेलं असतं. तसं तसं आपण करायचं असतं. तसंच्या तसं आपण ते पात्र रंगवतो, त्या पात्राचे भाव भावना प्रेक्षकांना करून दाखवतो. त्यांच्या मनोरंजनासाठी. हो ना?"

"व्हय." बावळ्या बोलला. "पन मंग या जगाच्या नाटकाचा खेळ कोन बघतो हाय? देव?"

"नाही. या जगाच्या खेळाला वेगळा प्रेक्षकच नाही. आपणच मांडलाय हा सगळा खेळ आपल्याच मनोरंजनासाठी." ऋजूजानने सांगितले. "तू लहान मुलांचा बाहुल्यांचा खेळ बघितला आहेस

ना? लहानपणी खेळला सुद्धा असणार. त्यात ते मूलच होतं बाबांचा बाहुला हातात धरून बाबा. बाबा बनून बोलतं. मग आईची बाहुली उचलून आई बनून बोलतं. बाबूची बाहुली उचलून बाबू बनून, आपलीच भूमिका त्या लुटूपुटीच्या कुटुंबात करतं. घरात जर भूभू असेल तर या खेळात कुत्र्याचं पण एक बाहुलं असतं. ते मूल ती बाहुली उचलतं तेव्हा भूभू सुद्धा बनतं. त्यासाठी त्याला खरोखरची कुत्र्याची बाहुलीच हवी जाते असं पण नाही. एखाद्या ठोकळ्याला देखील ते लहान मूल आपल्या खेळासाठी कुत्रा बनवतं. सगळा मानून घ्यायचा कल्पनांचा खेळ. तू खेळलास कधी असा खेळ?"

"काय मायती? ल्हानपनीचं काय बा आठवायला मी लय घाबरतो. त्यात तरासवालंच जादा असतं जी." बावळ्या उसासला. "पन मी अजून बी तसला मानून घ्यायचा खेळ खेळतो की. खायाला शिळी भाकर नी आंबलंल कालवन असलं, तर त्याला पावभाजी मानून तस्सं मिटक्या मारीत घशाखाली घालतो जी. शिनेमातलं जे जगनं दाखवतात, ते समदे गोश्टी आमच्यासारक्या गरिबांना फक्त सपनातच दिसतात. पन रोजच्या अपुऱ्या जगन्याला रंगवायला आमाला ते लय कामी येतं. नायतर आमा गरिबांकडं सपनं बघायला कल्पनांची बी तूटच असती की. "

"ते खेळणारं मूल एकच असतं. पण त्याच्या नाटकातली अनेक वेगवेगळी माणसं आणि प्राणी ते बनतं. तसंच हे जगाचं मोठं नाटक आहे. मुळातला एकच कोणी, अनेक माणसं आणि प्राणी आणि झाडं आणि जगातल्या या सगळया गोष्टींचं रुप घेऊन, त्या बनून स्वताशी खेळतो आहे." ऋजूजानने उलगडा केला.

"तसं तर तसं. पन मंग या खेळात हे इतकं वंगाळ कशापायी आनायला पायजेल? तो कोनी बावळ्या बनला. तर बनला. लाकी बनला. तर बनला. ऋजूजान बनला. ते तर लय बेस झालं. राखाल नी छमद, ती महामाया महामहीमा, ती समदी वंगाळ मानसं कशापायी बनला?" बावळ्या फुरगंटला.

"ही गोष्ट मी अनेकांना सांगितली. पण त्यांना समजली नाही. कळली. पण वळली नाही. बघ तुला लक्षात येते का?" ऋजूजानने एक हलका घुटका गिळला. तरी त्या भयाण शांततेत तो बावळ्याला लांब असून स्पष्ट ऐकू आला. "ऐक. दोन नाटकं आहेत. एकात नवरा दूरदेशी धंद्याला जातो. वादळ होतं म्हणून तिथं अडकतो. मग ते थांबल्यावर परत येतो. बायको खूश होते. दुसऱ्या नाटकात नवऱ्याला परदेशात एक बाई भुलवते. तो तिच्या सोबत राहायला लागतो. वाट बघून कंटाळलेली बायको त्याला शोधत तिथं जाते. त्या दुष्ट बाईवर मात करून नवऱ्याला परत मिळवते.

त्याला नाकात वेसण घालून खुशीनं परत आणते. दोन्हीत नवरा दूर गेला. परत आला. तुला कोणतं नाटक बघायला जास्त मजा येईल?"

बावळया बोलला. "दुसऱ्या नाटकातच जादा मजा वाटतो हाय की."

"पण जर तू त्या बायकोच्या जागी असलास तर? नवरा परदेशात गेला. दोन दिवसात परत आला. बाकी काही घडण्यापेक्षा एवढंच तुला सुखाचं होणार ना?"

"नवऱ्यानं बायर लफडं केलं. तर बायकोला कसला आला हाय मजा? त्या बायकोच्या वाट्याला लय तरासच हाय की. म्हनजे जर नाटक नाय, ते तिचं खरखुरं जिनं असंल तर. तसं असंल तर नवरा दोन दिसात परत आला. हेच बेस हाय."

"खरंच? जर तुझ्या जगण्यात काही उतार-चढाव नसतील, हार-जीत नसेल, तर त्यात काही मजा उरेल का?" ऋजूजानने संयतपणे प्रश्न केला.

"तसं थोडं फार कमजादा हवं." बावळया घुटमळत बोलला. "पन माझ्या जिंदगीत हाय तितकी हार नी हारच…"

"मग दुसऱ्या कोणाचं आयुष्य जगायला तुला आवडेल? मूळ एकाचे आपण अनेक रुपात इथं वावरतो आहोत. त्यातलं कोणतंहि

पात्र तू बनू शकतोस. कोणाचं जगणं हवं तुला? माझं? लोकांची मी हवीहवीशी स्वप्नसुंदरी आहे." ती खळखळून हसली. "पण माझ्या वाट्याला काय आहे? मी धनवतीच्या कामाची उरलेली नाही. मी दुसरीकडे काम करायला सुरूवात केली, तर तिच्या आकाशगंगेला प्रेक्षक मिळणार नाही. उद्या तिला नुकसान नको. म्हणून आजच मला या जगातून गायब करण्याचा, एवढा पुढचा विचार करणारी ती हुषार बाई आहे. तुला धनवतीचं आयुष्य जगायला आवडेल का?"

"छॅ! अजाबात नाय." बावळ्याला तो विचार नकोसा झाला. "तसलं वंगाळ मानसाचं जिनं मला नगं. मला काय नरकात जायचं हाय?

"नरक? स्वर्ग?" ऋजूजान फिसकारली. "असं काहीहि नसतं." ठामपणाने  तिने नाकारले. "मी ज्या नाटकांमध्ये नटी म्हणून काम करते, त्यामध्ये कधी नायिका असते, कधी खलनायिका. कधी खून करते. कधी खुन्याला पकडून देते. कधी खून रोखते. त्याबद्दल त्या त्या प्रसंगाला प्रेक्षक माझा राग राग करतात. वाहवा करतात. शिव्या घालतात. ते सगळं तितक्यापुरतं. नाटक संपलं की मानवंदना घ्यायला आम्ही सगळे कलाकार पात्रांचा अभिनिवेश सोडून प्रेक्षकांपुढे उभे राहतो. तेव्हा त्या नाटकातल्या सुष्ट-दुष्ट प्रसंग

साकारणाऱ्या सगळ्याच कलाकारांसाठी प्रेक्षक सारख्याच टाळ्या वाजवतात." तिच्या नजरेपुढे ते कौतुक करणारे प्रेक्षक उभे राहिले.

"तसं या जगाच्या नाटकातून प्रवेश संपवून मृत्यूपलीकडे गेलं, की इथल्या पात्राचं बरं-वाईट आपण इथंच मागे सोडून जातो. त्या तिथं मृत्यूच्या पलीकडे आपण इथं अनेक बनलेल्या त्या एकातच परत आपोआप मिसळून जातो. ना कसली शिक्षा. ना कसलं बक्षिस." ऋजूजानने खुलासा केला.

"अं ॉ! जर वंगाळ केलंल्याला काय शिक्षा नसंल, तर जो तो वंगाळ करत सुटंल की? आनी भलं केलंल्याला जर काय इनाम नसंल, तर कोन माईचा लाल हाय, जो फुकटफाकट कोनाच्या कामाला येईल?" बावळ्याचा सात्विक संताप झाला.

ऋजूजानचं नाजूक हसणं घंटा मंजुळपणे किणकिणाव्यात, तसं त्या गारठाण जागेत उब आणत किणकिणले. "लोक नेहमीच ही गोष्ट मला विचारत आलेत. मी तुला उलटपावली विचारते. फाशी होणार नाही, म्हणून काय तू कोणाचा खून करशील? कोणाचा गळा त्यातली सोनसाखळी हिसकावण्यासाठी काय कापू शकशील?"

बावळ्या गप्प बसला. काही उत्तरला नाही.

ऋजूजानच पुढे बोलू लागली. "या जगाच्या रंगमंचावर प्रत्येक पात्र म्हणजे माणूस, इथं साकारायच्या आपापल्या भूमिकेचा

स्वभाव आणि त्या भूमिकेची ठरलेली जीवनकथा घेऊन अवतरला आहे. तो त्या त्या भूमिकेनुसार वागतो. बोलतो. सगळं काही त्याबरहुकूम करतो. खलनायकाची भूमिका असेल, तर इतरांना त्रासतो. नायकाची भूमिका असेल, तर इतरांना तारतो. बऱ्याचदा आपण एकाच वेळी कोणासाठी तरी नायक असतो. तर दुसऱ्या कोणासाठी खलनायक. तू बंडबागींसाठी नायक आहेस. सरकारदारांसाठी खलनायक."

"खलनायकांशी खलनायकी करनं काय वायट हाय?" बावळ्या गुरगुरला.

"त्या स्वर्ग-नरकाच्या, पाप-पुण्याच्या कल्पना हजारो वर्षांपासून धर्मगुरूंकडून आणि धर्मग्रंथांमधून सगळ्यांना सांगितल्या जात आहेत. ना त्यामुळे लुटमार, डाके, जाळपोळ, कत्तली, खून कधी थांबलेत. ना बलात्कार, जोर-जबरदस्ती, जुल्म. उलट या गोष्टी करणारेच इतरांना हा पाप-पुण्याचा उपदेश जास्ती देताना आढळतात. हा उफराटेपणा कुठून आला? या खुळ्या कल्पना हा सुद्धा या जगाच्या नाटकातलाच एक रंग आहे. वेगवेगळी पात्रं वेगवेगळ्या रंगात रंगवण्यासाठी, अशा अनेक समजूती आणि कल्पना त्या त्या पात्रांच्या मनात भरलेल्या असतात. म्हणजे आम्हा माणसांच्या मनात."

"म्हनजी वायट करनाऱ्याला रोखायचं नाय? करू द्यायचं, करतो हाय तर खुशाल काय बी?"

"तुला वाटतं आहे रोखावसं, तर रोख ना. तुझ्या वाट्याला तशी भूमिका असेल. मी दुष्टपणा करणाऱ्यांचं समर्थन नाही करत आहे. त्यांची जगात काय गरज आहे? ते सांगते आहे. मी नाटकात काम करणारी आहे. त्या अनुभवानं सांगते आहे. जर नाटकात खलनायक वा खलनायिका नसेल, तर नाटक उभंच राहत नाही. घोर प्रसंग नी संकटं पात्रांच्या वाट्याला नसतील, तर नाटक रंजक होत नाही. लोक अर्ध्यात कंटाळून उठून निघून जातात. जितका खलनायक जास्त दुष्ट, तितका नाटकातला विरोधाभास मोठा. तितकं नाटक जास्त रंगतं." ऋजूजानने पुन्हा एक घुटका गिळला.

"म्हणून तो राखाल, तुम्हाला दगा देणारी ती छमद आणि सर्व दुष्टांची राणी ती महामहीमा या जगात आहे." हे बोलायला तिला जीभ जबरदस्ती रेटावी लागली.

"तसं तर तसं." बावळ्याने नाइलाज होऊन ऋजूजानचे ते बोलणे स्वीकारले. "पन त्यांना इतकं बळ कशापायी? त्यांचीच जीत कशापायी? माझी आये बऱ्या दिसांची वाट बघत राहली. आनी तशीच मरुन बी गेली. आमच्या वाट्याला बरं दिस कंधी आलंच नाय." त्याने तक्रार राग आळवला.

"नाटकात काही पात्रांच्या वाट्याला बळी जाणं असतं. काहींच्या वाट्याला वीरमरण असतं. काहींच्या वाट्याला भेकड मरण. काहींच्या वाट्याला जीत. काहींच्या कायम हार. त्याशिवाय जिंकण्याचं महत्व कोणाला वाटणार नाही." मग ऋजूजान सौम्यपणे म्हणाली. "तुझ्या आईच्या वाट्याला हार आणि बळी जाणं आलं. याबद्दल मला वाईट वाटतं."

"माझं पात्र बी हारनारंच हाय वाटतं." बावळ्या हिरमुसला. "आज पावतो मी हर एक बाब हारतच आलो हाय."

"तू तसा विचार का करतोस? कोण उद्या हरणार, कोण जिंकणार, पुढं काय घडणार? हे या जगात ना कोणी ठरवू शकतं. ना कोणी सांगू शकतं. एरव्ही आमच्या नाटकात कोणी काय बोलायचं, काय करायचं? हे नाटककारानं आम्हाला आधीच सांगितलेलं असतं. पण या जगाच्या नाटकात!... " ऋजूजान खुलासा देऊ लागली. "आपणच ते पात्र बनून खेळत असतो. आणि आपणच प्रेक्षक असतो आपल्या या जीवनकथेची मजा बघणारे. आपल्या प्रत्येकासाठी आपले आपणच या नाट्यकथेचे कथानायक असतो. पुढं काय होणार? हे आधीच कळणं, म्हणजे तिथपर्यंत पोहोचायच्या सगळ्या प्रवासाची मजाच प्रेक्षक म्हणून गमावणं."

"वा! तर व्वा!" बावळ्या चरफडला. "म्हनजी आपनच आपली मारून ठेवलंली हाय. असं बोल की? बगायला लय मजा येती हाय म्हनून." त्यानं दातात जीभ चावली. "मला म्हनायचं हाय आपनच आपली वाट लावली हाय काय?" मनातली भावना चांगल्या शब्दात कशी व्यक्त करायची? त्याला कळेना. "मंग आपनाला हवं तशी ती कथा बदलता बी येनार काय?"

"आपण जे जे काही करत असतो, तो सगळा जगाच्या या नाटकाचा आधीच लिहीला गेलेला भाग आहे. असं करायचं की तस्सं? आपल्याला जगताना हर क्षणी पुढं जायला दोन पर्याय मिळत असतात. त्यातला कुठलाहि तू निवड. पुढं काय होणार? हे त्या त्या माणसाचं, म्हणजे या जगाच्या नाटकातल्या पात्राचं चरित्र, आधीच ठरलेलं म्हणजे नियत आहे. या जगात आपण जो सुद्धा काही विचार करतो, इच्छा करतो, कल्पना करतो, कृती करतो आहोत, ते त्या त्या पात्राचं जीवन सगळं सगळं आधीच नियत आहे." ऋजूजानचे हे वाक्य बावळ्याचा गोंधळ अजून वाढवून गेले.

"म्हनजी इथं काय बी आपल्या हातात नाय? असलं कसलं जगनं हे? कठपुतळीच्या बावल्यावानी." बावळ्या चरफडला. "कुनाच्या तरी तालावर नाचायचं?"

"हो. पण तिऱ्हाईताच्या नव्हे बरं का! आपल्याच तालावर." ऋजूजान लगेच समजावू लागली. "एरव्ही मी ज्या नाटकांमध्ये नटी म्हणून काम करते तिथल्या पात्रासारखंच. पण तिथं ते दुसऱ्या कोणी नाटककारानं लिहीलेलं असतं. या जगाच्या नाटकात मात्र ते दुसऱ्या कोणी आपल्यासाठी लिहून आपल्यावर लादलेलं नसतं. आपणच आपल्यासाठी हे सगळं आधी ठरवून, हा नाटकाचा खेळ सुरू केला आहे. तो नियतीचा ठरलेला खेळ खेळतो आहोत."

"म्हनजे आमी नुस्तं भोग भोग भोगायचं?" बावळ्याला हे आवडेना.

"हो. त्याचसाठी तर आपण या जगात आलो आहोत. या विविधरंगी भावभावनांचा आनंद घेण्यासाठी. नवरस भोगण्यासाठी. पात्र म्हणूनहि. प्रेक्षक म्हणूनहि. अजून आणखीन कशाला?" ऋजूजानने बावळ्याला प्रतिप्रश्न केला.

"नवरस?" बावळ्या बुचकळ्यात पडला. "ही काय बा भानगड हाय?"

"अरे नाटककारांनी सगळ्या मनातल्या भावना नऊ तऱ्हांमध्ये विभागल्यात. तुला त्यांची यादी सांगू का?"

"सांग बा. आनी ऐकायला हाय काय?"

"शृंगार रस म्हणजे कौतुक. सुंदरता. आवड. प्रेम. तुझी लाकी बरोबर असताना तुझ्या मनात जो सुखद भाव दाटलेला असतो तो. याच्या बरोबर उलट तो बिभत्स रस. किळस. घृणा. तिरस्कार. नावड. शत्रृत्व."

"म्हनजी ती छमद बया बघून मला जे मनात वाटतं ते? म्हनजी जिला तू रमेश समजती हाय, ती."

"अं?"

"ती बाई हाय. पन लोकांना चकवा देन्यासाठी आमी रुप पालटलं होतं ना."

"ओ...!" ऋजूजानच्या डोक्यात प्रकाश पडला. "मला पहिल्यापासून आवडली नव्हती हं त्याची?....तिची नजर. बरोबर. छमद बरोबर असताना कोणाच्याहि मनात जागेल तो बिभत्स रस."

"पुढचा रस?"

"भय. भीतीचा. पळपुटेपणाचा. आणि त्याच्या उलटा वीररस. शौर्य. धैर्य. औदार्य. चढाई-लढाईचा."

"कळला. दुश्मनासंग लढाई केली तर वीर रस. पळून गेला तर भय रस."

"छान. तुला कळताहेत तर सगळे रस सहज. या भावना लहान-थोर, हुषार-मंद सगळयांच्या मनात असतात. त्यांना सहज

समजतात. बुद्धीशी त्यांचा काही संबंध नसतो. त्या बुद्धीपलीकडच्या आणि तिच्यापेक्षा श्रेष्ठ आहेत."

"सांग की पुढचं रस?"

"एक आहे रौद्र रस. रागाच्या थयथयाटाचा. थरकापवणारा. वादळाचा. कडाडणाऱ्या वीजेचा. दुसरा त्याच्या उलटा शांतवणारा शांत रस. निववणारा. अंगाईचा."

"कळला."

"हास्य रस. विनोदाचा. आनंदाचा. खुशीचा."

"त्याच्या उलटा असनार रडारडीचा."

"एकदम बरोबर. करुण रस. विरहाचा. आणि नववा रस आहे अद्भुतता. चमत्कार. नवलाचा."

"त्याच्या इरोधी दहावा रस नाय?"

"अरे अद्भुत म्हणजे काय? जे नेहमी असतं त्याच्यापेक्षा काही वेगळं. तेव्हा अद्भुतच्या उलटं काय? सगळं रोजचं नेहमीचं. म्हणून नीरस वाटायला लागलेलं. बाकी रसांमधलं काहीबाही." ऋजूजानने समजावले.

"कळलं. नवरस कळलं. पन त्यात ते दुखाचं कडू रस आनी किळसवालं रस कशापायी हवं?"

"कारण अंधार नसेल, तर प्रकाश आहे हे वेगळं कळू शकणार नाही. एकमेकांच्या विरोधी दोन गोष्टी एकमेकांच्या जोडीनेच अस्तित्वात येऊ शकतात. वा कळू शकतात. तू विचारतोस कडू रस कशाला? तुला रोज रोज सारखी सारखी गोडगोड मिठाईच खायला घातली. तर खाऊ शकशील का? तेव्हा कळेल तुला कडूची किंमत. हो की नाही?"

"रोज फक्त मिठाईच?" बावळ्याने प्रश्न बदलायचा प्रयत्न केला. "रोज रोज भजी दिलंली चालंल की."

"असं आता म्हणतो आहेस. खरोखर तसं मिळालं की कळेल." ऋजूजान आपली बाजू सोडायला तयार होईना. "असं बघ. शरीराच्या तृप्तीसाठी कडू-गोड, खारट-तिखट, आंबट-तुरट अशा सगळ्या चवींचा मेळ आवश्यक असतो. तसा मनाच्या तृप्तीसाठी वा पूर्ण रंजनासाठी हे नऊच्या नऊ रस असणं आवश्यक असतं. तुला आवडतं ते कोणतं पण नाटक बघ. त्यात तुला हे सगळे रस मिळणारच मिळणार. तरच ते तुला आवडलेलं असणार." ऋजूजानने ठणकावले.

"बरं हाय. कबूल." बावळ्याने शरणागती पत्करली. "पन तो दुश्मनीवाला रस नाय होता, तर बरं होतं नाय?"

"जगात जे जे काही आहे, ते ते त्याची गरज आहे म्हणूनच आहे." ऋजूजानने त्याला सुनावले. "इथं माणसाचं पात्र रंगवताना मुळात तशी आपल्याला खूप कमी समज असते. ते काय? ते मी तुला नंतर सांगते. आधी हे ऐक. हे जास्त महत्वाचं आहे. आपण समजतो की प्रेमाच्या उलटं शत्रूत्व. पण ते खरं म्हणजे प्रेमाचंच एक रुप आहे."

"तू मला खुळा करते काय?"

"मी तुला सुरूवातीलाच सांगितलं होतं. मी आजपर्यंत अनेकांना या गोष्टी सांगितल्या. पण त्या मला जश्या समजल्या, तशा त्यांना समजावू शकले नाही. तू सात रंगांची भिंगरी पाहिली आहेस? ती गरागरा फिरवली की सगळे रंग मिळून एकच पांढरा रंग दिसायला लागतो."

"व्हय. मी तसली भिंगरी मोतमावलीच्या जत्रेमंदी बघितली हाय."

"जर तू ती स्वतः बघितलेली नसतीस, तर मी तुला किती जरी समजावू गेले असते की एका पांढऱ्या रंगातूनच सात रंग बनलेत. तरी तू माझा विश्वास केला नसतास. त्या रंगांप्रमाणंच एका प्रेम भावनेतून बाकी सगळ्या भावना बनल्या आहेत. कारण आपण मरण पावून या जगापलीकडं गेलो की तिथं फक्त प्रेम आणि प्रेमच

आहे. बाकी काहीच नाही. आपण तिथं आपल्या त्या मूळ एकात सामावून जातो. त्यासाठी इथं आपल्याला वेगळं काहीहि करावं लागत नाही. ना कसलं तप. ना साधना. ना जप. कारण आपण मूळ ते एकच तर आहोत. जसं की आकाशगंगेच्या रंगमंचावरून बाहेर पडले की ऋजूजान बनायला मला वेगळं काही करावं लागत नाही. आकाशगंगेच्या रंगमंचावर असेन वा बाहेर, मी खरी ऋजूजानच आहे. तशी मरणापलीकडे आणि जन्माआधी मी आपल्या सगळ्यांचं मूळ ते एक, जे प्रेम प्रेम प्रेम, ते प्रेम आहे."

"काय कळलं नाय. तू म्हनते ते मूळ एक, म्हनजे देव हाय की प्रेम हाय? प्रेम म्हनजी भावना हाय की प्रेमाला जीव हाय?"

"प्रेम म्हणजेच ती मूळ एक भावना. म्हणजेच ते मूळ एक. म्हणजेच देव. आपण समजत असतो तसा देव म्हणजे काही कोणी एक खास जीव नाही आहे. कसली शक्ती नाहीय. आपलीच ती एक स्थिती आहे. म्हणजे बघ, पाण्याचा एक थेंब सागरात असतो, तेव्हा तोच सागर असतो. जेव्हा त्याची वाफ बनते, तो ढगात जातो. तेव्हा तो थेंब ढग असतो. पाऊस बनून या धरणीवर येतो, तेव्हा पाऊस असतो. डोंगरावर पडून या जमिनीवरचं त्याचं आयुष्य म्हणजे झरा, नाला, नदी बनतो. पुन्हा जाऊन समुद्राला मिळतो. तेव्हा पुन्हा परत समुद्र बनतो. ही गोष्ट जितकी स्वाभाविकपणे घडते, तितकंच सहज

आपलं जन्म-मरण असतं. इथं या जगात आपण माणूस वा जनावर वा कोणी जीव असतो. मेल्यावर तिथं प्रेम-देव-मूळ एक असतो."

"वा वा वा! काय नामी सांगितलं हाय." बावळ्या हसायला लागला. "अस्सं असंल, तर या जगात इतकी कटकट नी तरास काढन्यापरीस सरळ मरून सुटलंल बरं की? कशापायी तरास सहन करायला पायजेल? जो तो मरूनच जाईल की?"

"तू मरणार का? केवळ मी सांगितलं आहे आणि तुला मरणानंतर मुक्तीची खात्री देते आहे म्हणून?" ऋजूजानच्या या प्रश्नावर बावळ्या हसायचा थांबला.

"हाय का बिलामत? नुस्तं तू सांगते म्हनून का खरं मानायचं?" बावळ्याच्या डोक्यात अनेक वेगवेगळ्या विचारांचे तरंग एकाच वेळी उठू लागले. "आमी सगळी एक?...म्हनजे मीच लाकी?....मीच ऋजूजान?.....मीच राखाल?.....मीच छमद बी?" या कल्पनेसरशी तो एकदम उसळला. "हे समदं जर असं हाय, तर आपल्याला कळत कसं नाय? जाणवत कसं नाय की आपन समदं एकच हाय? म्हनजे मला म्हनायचं हाय की….."

"की आपल्याला तशी खरीखुरी जाणीव, अनुभूती का होत नाही?" ऋजूजानने त्याला नेमके काय विचारायचे आहे अचूक समजून घेतले. "आपण सगळे एकच असल्याची? कारण तसं झालं

तर आपण या खेळातून बाद होणार. एकमेकांना वेगळं समजून, एकमेकांपासून वेगळं राहून हा खेळ खेळायचाय. आपण एकच आहोत ही जाण होणं, म्हणजेच मूळ एक होऊन जाणं. जगाच्या या नाटकाच्या खेळातून बाहेर होणं."

"मंग मला सांग की हे समदं असं का हाय?"

"त्याचं उत्तर तुला कोणी देऊ शकणार नाही. ज्याला खरं उत्तर माहीत असेल तो त्या मूळ एकापेक्षा वेगळा असणार नाही. म्हणजेच या जगातला असू शकणार नाही. याचं उत्तर तुला मृत्यूपलीकडे तिथंच मिळेल. पण तिथं गेल्यावर हा प्रश्नच पडणार नाही. कारण तो विचारायला वेगळा जीव वा माणूस तिथं असणार नाही."

"छॅ! काय कळंना. डोस्कं गरागरा फिरायला लागलं की." बावळ्या वैतागला. "मंग अस्सं आनी तस्संच जगायचं हाय, तर हे समदं कळून घेऊन बी उपयोग काय हाय?"

"जर तुझ्यापर्यंत नियतीनं हे ज्ञान पोहोचवलंय, तर त्याचा तुला काही उपयोग तर असणारच. तो काय कसा करायचा, ते तू ठरव. तुझ्या चष्म्यातून." ऋजूजान हसली.

"माझा चष्मा? मला कुठं हाय चश्मा?" बावळ्या खिजल्यासारखा कावला.

"तुझा चष्मा म्हणजे माणसाचं एक पात्र, म्हणजे बावळ्या म्हणून असलेली तुझी समज. तुझी जगाकडे पाहायची नजर."

"ऑ! काय माझी नजर आनी तुझी नजर येगयेगळी हाय? जे मला दिसतं हाय, ते काय तुला दिसत नाय हाय?"

"हो. प्रत्येकाला त्याच्या पात्राच्या आणि भूमिकेला कामी येणाऱ्या गोष्टीच फक्त दिसतात. तुझ्या पात्राच्या भूमिकेत खड्ड्यात पडणं असेल, तर मी किती तुला समोरचा खड्डा दाखवू गेले, तरी तुला तो दिसणार नाही. किंवा खड्डा पुढ्यात दिसला तरी तू माझा इशारा साफ दुर्लक्षून त्या खड्ड्यात पडशील." ऋजूजानने अजून एक गुगली टाकली.

"जगाचे नियम हे प्रत्येक माणसागणिक बदलतात. एखाद्याला आकाश निळं नव्हे तर हिरवं दिसत असू शकतं. त्याच्यासाठी ते पूर्ण खरं असतं. जरी बाकीच्यांचा त्याच्यावर विश्वास बसला नाही तरी. जगाचे नियम तुमच्या विश्वासानुसार असतात. तुम्हाला वाटतं माणूस पाण्यावर चालू शकत नाही. तुम्ही नाही चालू शकत. पण ज्या माणसाला मनोमन पक्की खात्री आहे की माणूस पाण्यावर चालू शकतो, तो पाण्यावर चालतो."

"म्हनजी मी म्हनलं की या गजातून मी आरपार जाऊ शकतो. तर काय खराच जानार की काय?" बावळ्याने तिची खिल्ली उडवली.

"तुझ्या प्रश्नातच इतका अविश्वास भरला आहे की तू जाऊ शकणार नाहीस."

"मंग तू धर की विश्वास. आनी जाऊन दाखव पार." बावळ्याने आव्हान दिले.

"मी नाही जाऊ शकणार. कारण लहानपणापासून मला हेच शिकवलं आहे की माणूस असा जाऊ शकत नाही. विश्वास असा वाटून घ्यायचा म्हणून वाटून घेता येत नाही. तो माणसांमध्ये अनुभवातून येतो."

"चॅक! मी म्हनलं होतं की आता मला कितकं चमत्कार करता येईल." बावळ्या निराश झाला. "या समद्याचा मला काय बी उपयोग नाय." ऋजूजान शांत राहिली. बावळ्याला स्वस्थ राहवेना. "पन काय गं, तुला तरी या समद्या ग्यानाचा काय उपयोग हाय?"

"म्हणून तर या काळकोठडीत मी शांत आहे. उद्या मला मारणार आहेत, हे माहीत असून देखील." थोडा वेळ गेला. मग ती म्हणाली, "कारण मला विश्वास आहे की माझं सगळं नेहमी छानच

होतं. तो विश्वास तसं सगळं घडवून आणतो. आजवरच्या अनुभवांनी तो विश्वास अजून पक्का झालाय."

"सगळं छान?" बावळ्यानं उपहास केला. "तू कधी न मरनाऱ्या त्या खोट्या आशेवर जगती हाय तर? माझी आये तशी जगली आनी मेली."

"आशा? नाही. आशा म्हणजे काही विश्वास नव्हे. मला तर पक्की खात्री आहे याची." ऋजूजानच्या आवाजातला निखळ प्रामाणिकपणा बावळ्याला जाणवला. "जेव्हा संपाच्या दिवशी सगळे रंगमंचावर गेले, तेव्हा माझं मन मला सांगत होतं की मी सुद्धा त्यांच्या जोडीला रंगमंचावर गेले, तर घोर संकटात सापडणार. आणि तसंच झालं. आपण कधी काय करावं? हे आपल्या स्वतःच्या मनापेक्षा अधिक जास्त चांगलं कोणी सांगत नसतं. पुढं ती रत्नांगी फिरली. तिनं मला धनवतीच्या पुढ्यात तोंडघशी पाडलं. आणि धनवतीनं मला इथं पाठवलं."

"जर तुला वाटत होतं की संकटात पडनार, तर तू संपात उतरली कशापायी? तुझ्या मनाचं ऐकलं काय बा नाय?"

"तू कशासाठी या संकटात पडला?"

"लाकीसाठी."

"मी राहीलसाठी." ऋजूजानने आपल्या प्रेमाची कबुली दिली.

"आनी आता यातून बायेर कशी पडनार हाय? मला तर काय बी रस्ता दिसत नाय. तू तेवा तुझ्या मनाचं ऐकलं नाय. लय मोठी चूक केली." बावळ्या हळहळला.

"आपण कधीच चुकत नसतो. हर क्षणी आपल्यापुढं दोन पर्याय असतात. असं की तसं? कुठलाही निर्णय घेतला तरी त्याच्यानुसार पुढचा घटनाक्रम नियतच असतो. काही ना काही नवरसातला एखादा अनुभव देणारच असतो. मग त्याला वाईट कसं म्हणायचं? चांगल्यातून वाईट निघतं. वाईटातून चांगलं." ऋजूजानने तसं दाखवायचा प्रयत्न केला. "मी इथं आले म्हणून तर तुझी भेट झाली. तुला या सगळ्या गोष्टी सांगू शकले. तुला नक्की याचा उपयोग होईल. आता याच्यातून तुझा माझा मार्ग सुद्धा आपोआपच निघेल."

"तू म्हनतेस तसं झालं तर?" बावळ्या उसासला. "पन माझं नशीब लय गांडू...." त्याने जीभ चावली. "लय खराब हाय."

"तू स्वतःला निंदत होतास ते मी ऐकलं आहे. तू स्वतःचा खूप तिरस्कार करतोस. तू जगाला वाईट मानतोस. ते तुझ्या शत्रूंनी भरलंय असं समजतोस."

"मंग?" बावळ्या धुमसला. "त्यात खोटं काय बी नाय."

"तू या सगळ्या गोष्टी चुकीच्या करतो आहेस. तू स्वतःला तुझ्या आई आणि बहिणीच्या परवडीला जबाबदार धरतोस. त्या वेळी तू करू शकत होतास, असं काहीच नव्हतं. तो नियतीचा खेळ होता. त्या दोषापासून स्वतःला मोकळा कर. स्वतःला बोल लावू नकोस." ऋजूजानचा आवाज हळूवार होता. "तू स्वतःला भेकड का मानतोस? तसा असतास तर रझाकारांच्या कैदेत येऊन पडला नसतास. त्यांच्या विरोधात कधी गेलाच नसतास."

"हुड्ड!" बावळ्याने धुडकावले स्वतःचे कौतुक. "त्याला बहादुरी नाय. अकलेची कमी म्हनायला पायजेल. आपली चामडी कश्शी वाचवायला पायजेल? हे कधी माझ्या टकुऱ्यात जेवा येळ पडती, तेवा येतच नाय. काय बी फालतूगिरी करत असतो. म्हनून तर लोक मला बावळ्या म्हनायला लागलं. किती जण सुधारू गेलं तरी कधी सुधरला नाय."

"आपलं बोलणं, वागणं, जगणं आपलं असतं. लोकांना जसं हवं तसं त्यांनी स्वतःचं काय काय ते सांभाळावं. तिऱ्हाईतानं कसं जगावं, वागावं, बोलावं ते सांगायच्या फुकाच्या पंचायती करू नयेत." ऋजूजान खमकेपणानं सांगती झाली. "तू कधी स्वतःला दुसऱ्या कोणाच्या बोलण्यावरून त्यांच्या अपेक्षांनुसार बदलायचा प्रयत्न करू नकोस. तुला स्वतःला आतून बदलावसं वाटेल तेव्हाच

बदल. तू जसा खरा आहेस तसा स्वतःला स्वीकार. असं करणं म्हणजेच स्वतःवर प्रेम करणं. आपण सगळे आतून एक आहोत. म्हणून जर तू स्वतःला नाकारलंस तर जग तुला नाकारणार. स्वीकारलंस तर जग तुला स्वीकारणार. तू जेव्हा खरा स्वतःवर प्रेम करू लागशील, तेव्हा आपोआपच जग तुझ्यावर प्रेम करू लागेल. त्या जगाचा भाग असणारी लाकी सुद्धा."

"इतकंच केलं तर खरंच ते होनार? हे तर चमत्कारच हाय. जग मला सदा हाडहाड करत आलं हाय. काय ते बी बदलनार?"

"हो." ऋजूजानने होकार दिला. "जग आपण त्याची जशी कल्पना करतो, तसं बनून आपल्याला सादर होतं. जग मित्रांनी भरलेलं मानलंस, तर तुला मित्रच मित्र भेटणार. जग शत्रूंनी भरलंय असं मानलंस, तर खूप सारे शत्रू तुझ्या वाट्याला येणार."

"मंग तू जगाला भलं मानते हाय, तरी बी तुझ्या वाट्याला धनवती आनी ती बया रत्नांगी आली कशी?"

"तो माझ्या जीवनातला बिभत्स रस आहे." खळखळून ऋजूजान एवढी मजेत हसली की बावळ्याचे मन आरश्यासारखे साफ झाले. "पण मला तू नाही का इथं सुद्धा एक मित्र भेटलास? बघच तू उद्या. माझा विश्वास काय चमत्कार घडवतो आणि आपल्याला कसा सोडवतो ते."

"तसं झालं तर बेस झालं." बावळ्याने मनापासून शुभेच्छा दिल्या.

"होणारच." ऋजूजानने आश्वासलं. "महान युगनायकांच्या जोडीला राहून माझ्या आजोबांनी तसं होताना, अगदी कठीणात कठीण परिस्थितींमधून सुद्धा सहज निभावताना कितक्या वेळा अनुभवलेलं. त्यामुळं त्यांचा सुद्धा विश्वास खूप पक्का झालेला होता. आणि आजोबांच्या संगतीत मी इतका अनुभव घेतलाय की माझा विश्वास सुद्धा तसाच पुरा पक्का झालेला आहे."

"महान युगनायक?" बावळ्या आठवायचा प्रयत्न करू लागला. "ती माझ्या काळातली हाय, असं तुमी समदी म्हनता. मंग मला कशी कंदीच ती कुठं आपटली नाय? त्यांचं कधी नाव बी ऐकलं नाय तिथं माझ्या काळात?"

"ते कुठून आले? कसे आले? हे कोणालाच माहीत नाही." ऋजूजानला त्याचं महत्व वाटलं नाही. "जेव्हा त्यांची या जगात गरज होती, तेव्हा ते अचानक अवतरले आणि त्यांनी घातयंत्रांचा नाश केला. माझे आजोबा म्हणूनच म्हणत की जगाचं पुढं काय होईल? याची काळजी करायचं आपल्याला काही काम नाही. जगाच्या समस्यांवर उपाय काय? याचा विचार करून आपलं डोकं शिणवायची काही गरज नसते. जगाच्या या नाटककथेत त्याची

काळजी आपोआप घेतली जाते. गोष्टी घडायच्या असतात, तेव्हा त्यासाठी नेमलेल्या पात्रांच्या डोक्यात आपसूक त्या प्रकटतात. त्या पात्रांना महान युगनायक बनवून त्यांच्याकडून अनायास होत जातात." मग थोडी मस्करीच्या सुरात विचारती झाली. "आजोबा नाटककार होते. ते नाटकात काय गंमत करायचे सांगू?"

"सांग की. नाय कोन म्हनतो हाय?"

"त्यांच्याकडे एक पुस्तक होतं. त्याच्यात नाटकातले एकूण सतराशे साठ प्रसंग दिलेले होते. पात्रांच्या आपापसातल्या बोलाचालीचे. आजोबा त्यातले थोडे थोडेसे घ्यायचे. रचायच्या नाटकातल्या पात्रांच्या वाट्याला याच्या त्याच्या वाट्याला थोडे थोडे द्यायचे. की झालं आजोबांचं नाटक तयार." ऋजूजानला हसू आवरेना. "या बिनमेहनतीचे पैसे मात्र ते खूप घेत. आजोबा मला म्हणायचे की जगाच्या नाटकात सुद्धा सगळे मिळून तेवढेच प्रसंग वा घटना आहेत. वेगवेगळया काळांमध्ये वा देशांमध्ये त्याच त्या गोष्टी माणसांच्या बाबतीत परत परत घडत असतात. फक्त जरा भाषा, वेष, नाटकाच्या नेपथ्थ्यात म्हणजे घरादारांच्या रचनेत काही बदल घडतो. बाकी कथानकं तीच ती. तोच तो प्रेमाचा त्रिकोण. तोच तो घरच्या लोकांच्या हत्येचा सूड. तेच ते आधी हरवलेले नी मग परत भेटणारे भाऊ-बहीणी."

"हे तर हिंदी फिलमवालं गोष्टी हाय." बावळ्या सुद्धा हसायला लागला. "सुरवातीचा पयलाच परसंग बघला की आमी पोरं धडाधडा पुढं काय काय होनार सांगायला लागू. आनी तरी बी ती फिलम बघायची लय मजा होती की."

"चला. तू मोकळेपणाने हसलास तर खरा." ऋजूजान खुशालली. "आता परत नाही ना रडणार मगासच्या सारखा?"

"ऊं!" बावळ्या विचारात पडला. "नाय. नाय. पन मला तू सांगलेलं समदं जरा बरोबर डोक्यात शिस्तीमंदी बसवायला लागंल. जरा येळ लागंल की समदं पचवायला." ती पुढची सगळी रात्र तो डोक्यातला गोंधळ निस्तारण्यात व्यग्र राहिला. ऋजूजान सांगते तो चमत्कार होणार की नाही? त्याच्या प्रतिक्षेत.

# शंभर वर्षे पुढे - प्रकरण ३२

त्या दगडी भुयारांमध्ये कधीहि सुर्याचा प्रकाश वा मोकळा वारा शिरलेला नव्हता. पूर्वीच्या काळी तिथे ठेवल्या गेलेल्या कैद्यांच्या मलमूत्राचा वास वर्षानुवर्षे तसाच रेंगाळत मागे राहिलेला होता. कुठेतरी ठिपकणाऱ्या पाण्यामुळे उबग आणणारा दमटपणा होता. शिरशिरवणाऱ्या त्या कुबट गारठ्यात बावळ्या आणि ऋजूजान मृत्यूच्या दूतांची वाट पाहत बसून होते. तिथे काळ वेळेची कल्पना करता येत नव्हती. जेव्हा ते मृत्युदूत रझाकार परतले, तेव्हा त्यांना दोन्ही कैदी गप्पगार बसल्या बसल्या निजलेले आढळले. सहसा मरणाची वाट पाहणारी माणसे अशी डाराडूर बिनघोर झोपू शकत नसतात.

"मरिंग काईंग ही?" ठेंगू दिनशाने नवल केले.

"ए! आमी तुंज बाप असिंग." चपट्या नाकाच्या हाबूशने खणखणीत आवाज लावला. "आमांज संग तुंज काईंग चालबाजी चलिंग न." बावळ्याला भीतभीत ढोसले. बावळ्या बसता होता. तो आडवा पडता झाला. तसे त्याच्या कोठडीचे दार उघडून रझाकार आत घुसले.

"पाय धरिंग त्यांज नी दांडीवर बांधिंग." दिनशाने साथीदारांना सूचना केली.

"काईंग गरज न. आमी त्यांज वजन फुकट काईंग ढोईंग? काईंग आमी त्यांज नोकर पालखीदार होईंग?" लंबू बाबूशने मुद्दा मांडला. "घालिंग एक लाथ त्याला नी उभा करिंग. त्याला त्यांज पायांनी चालविंग."

"पण राखालानं सांगिंग होईंग की त्यांज संग काईंग ढिलाई करिंग न." हाबूशने अडचण सांगितली. "त्यानं काईंग डाव लढविंग तरईंग?"

"काईंग तो आकाशातून पडिंग महान युगनायक होईंग, जो काईंग चमत्कार करिंग? काईंग त्या चिप्पाड शरीराला इतकईंग भिईंग?" बाबूशने धुडकावले. त्याने मारलेल्या जोरदार लाथेने ते चिप्पाड शरीर बावळ्या थरथरला. पेंगत त्याने मान हलवली. परत झोपी गेला. यावर बाबूशने त्याला गदागदा हलवून जागवला. "पुरे करिंग तुंज ही नाटकं." बजावले. "उभा राहिंग. चलिंग तुंज मरणाला तुंज पायांनी. नाईंग तर तुला जमिनीवर घसटिंग नेईंग." बावळ्याचे दोन्ही हात ओढून त्याला खरोखर घसटवला. बावळ्या अंग झेजरून उभा राहता झाला. हाबूश आणि दिनशाने त्याच्या काढण्या धरून त्याला कोठडीबाहेर काढला. त्याची वरात निघाली.

ऋजूजानच्या कोठडीवरून परतताना ती दिसताच बाबूश थबकला. "तिलाहि आमी आताच संग घेईंग."

"पण तिंज मरणवेळ ठरिंग न." दिनशा खुसखुसला. "तिंज संग बेरहमाला संग हविंग होईंगसं वाटिंग."

"बेरहमाला काईंग वाटिंग? त्यांज विचार करिंग आमाईंग गरज न." बाबूश गुरगुरला. "पुनहा पुनहा, इतकईंग आत खोल भुयारात चालिंग येईंग तरास, आमी काईंग घेईंग होईंग? आमी काईंग या घाणीत पुनहा पुनहा गुदमरिंग होईंग? आमांज विचार कोण करिंग होईंग न. आमीच काईंग इतकाईंग विचार करिंग होईंग?"

"बरोबर होईंग." हाबूशने बाबूशला अनुमोदले. "पुनहा इंथ इतकईंग खोल काईंग येईंग होईंग?" त्याचे डोळे चारी दिशांना गरगरले. "ही जागा काईंग बरी होईंग न. काईंग सांगिंग? इंथ प्राणवायूंज तुटीनं आमीच आधी मरिंग."

मग सगळ्यांचेच एकमत झाले की ऋजूजानला देखील आताच बरोबर घेऊन जावे. त्याप्रमाणे तिला कोठडीतून जागवून बाहेर काढण्यात आले. दिनशा अगदी लगटून अंग तिच्याशी घासत तिला घेऊन चालू लागला. तिला काढण्या वा बेड्या घालायची गरज त्यांना वाटली नाही. "मंज संग लगट करिंग न. जर मी बेरहमांज संग कबूल जाईंग, तर मंग तो मंज सांगण्याईंग तुला सहज

संपविंग शकिंग. हे ध्यानात घेईंग." तिच्या या बिनतोड धमकीने घाबरून दिनशा ताबडतोब ताळ्यावर आला. त्याने लगट थांबवली. बाबूश हलके स्वतःशी हसला.

हळूहळू तो सगळा जथ्था ते अंधारे वळणदार दगडी बोळ पार करून जिथे भरपूर उजेड होता, अशा मोठ्या कमानदार भुयारांमध्ये पोहोचला. रझाकारांनी आपले जलदिवे विझवले. गुप्ततळातून बाहेर पडण्याचा त्यांचा मार्ग त्याच अवाढव्य पोखारातून, परीक्षणशाळेच्या दालनातून जात होता. जेव्हा ते तिथे पोहोचले तेव्हा रझाकारांना त्यांच्या अपेक्षेच्या विपरित बेरहमाचा सामना करावा लागला. पूर्वी पार पडलेल्या निकामिक बेकारिक अस्त्राच्या चाचणीतून जिवंत राहिलेले तळावरचे शास्त्रज्ञ तिथे जमलेले होते. त्यात फिलू होती. बेरहमाचा त्या सगळयांवर जोरदार आरडाओरडा चालू होता.

"काईंग आमी त्या बेरहमाला कळिंग शिवाय या कैद्यांना बाहेर काढिंग शकिंग?" हाबूश बाबूशच्या कानात चुटपुटला. "त्या परीस आमी मागेच थांबिंग. बेरहमांज सव्यापसव्यास पुरे होईंग नी हे सगळे जाईंग, त्यांज नंतरच इंथहून पुढे जाईंग."

"काईंग बेरहमाला घाबरिंग होईंग?" बाबूशने ती सूचना धुडकावली. "चलिंग. होईंग पुढं. बेरहमांज सगळं लक्ष त्यांज

माणसांजवर डाफरिंग असिंग." साथीदारांना इशारा केला. तो सगळा जथ्था तसा परीक्षणशाळेच्या एका दारातून आत शिरला. समोरच्या दुसऱ्या दारातून पार होण्यासाठी लगबगीने धावू लागला.

"मी इंथ होईंग न. अंस्स असिंग तेहवा, तुमी मंज परोक्ष बेकारीकांज चाचणींज धाडस करिंगच काईंग?" बेरहम जोरजोराने ओरडत होता. "काईंग तुमी सवताहाला मंज परीस जादाईंग शहाणं समजिंग? फिलू?" त्याचा रोख आणि राग तिच्यावर सगळयात जास्त दिसत होता. "काईंग बोलिंग तू?"

"फिलू? काय बोलती तू?" बेरहमापेक्षा जास्त मोठा आवाज सगळयांनी ऐकला. आवाजाच्या दिशेने पाहिले. तो बावळया बोंबलत होता.

बाबूश नी हाबूशला बावळयाच्या हातपायांच्या जोडीने त्याच्या तोंडाचा सुद्धा बंदोबस्त न केल्याचा पश्चाताप झाला. त्यावर दिनशाने मीठ चोळले. "तरईंग मी म्हणिंग होईंग की राखालानं खबरदारी सांगिंग होईंग." त्या दोघांनी खाऊ की गिळू असे दिनशाकडे पाहिले. मग बावळयाकडे. दोघांचे हात बावळयाची मुस्कटदाबी करायला एकदमच त्याच्या तोंडाशी पोहचले. त्यामुळे एकामेकाशी जरा वेळ झगडले. तेवढा वेळ बावळयाला त्याचे आगलावू गरळ ओकायला पुरला.

"काय गं ए भवाने? तिथं तो तुझा नवरा मोलू, या बेरहमानं त्याचं पाय कापलं हाय. तरी बी तुझ्यासाठी तळमळतो हाय. आमाला तुझ्या शोधाची सुपारी देतो हाय. पन इथं येऊन बघतो तर काय?" बावळ्याने मोलूचं नाव घेता क्षणी फिलू गर्रकन फिरली होती. तिच्या डोळ्यांशी डोळे भिडवून बावळ्या ओरडला, "तू त्याच बेरहमाची साथ देती हाय. त्याच्या साठी जग बुडवती हाय. निकामिकास्नी बाद कराया बेकारिक बनवती हाय. अयाया याया याया....." बावळ्याच्या तोंडावर चार मजबूत हातांची तोवर घट्ट पक्कड बसल्यामुळे, पुढचे कितीतरी अयायाया ऐकण्यापासून फिलू वाचली. आणि बाकीचे सुद्धा.

पण आग लागायची ती लागली होती. आग ओकणाऱ्या जळजळीत नजरांनी फिलूने बेरहमाला जाळले. "तू..." ती कडाडली. "तू मंज वचन देईंग होईंग की मंज मोलूला काईंग तरास देईंग न. त्यांज सुरक्षेसाठी मी तू म्हणिंग ते कबूलिंग. पण तू लुच्चा लबाड असिंग. तू मंज धोका देईंग."

"काईंग तू इतकीईंग भोळी होईंग? मंज पूर्वेतिहास तुला खबरिंग न?" बेरहम खदाखदा राक्षसासारखा हसला. "तुंजपासून जे साधिंग होईंग, ते मी साधिंग होईंग. तू बेकारिक सिद्ध करिंग होईंग. आता तुंज काईंग गरज उरिंग न. तुला नी तुंज मोलूला आता मी

मुंगींज सारखा चिरडिंग." बेरहम साथीदारांवर ओरडला. "धरिंग तिला नी आपटिंग डोक्यावर जीव जाईंग तोवरईंग."

त्याक्षणी अपेक्षेबाहेरच्या चपळाईने तिथे हजर दोन्ही स्त्रियांनी हालचाली केल्या. फिलूने पुढे होऊन तिथे चाचणीसाठी मांडलेल्या घातयंत्रांच्या कळी चालू केल्या. ती यंत्रे घरघराट करत चालू होऊ लागली. त्या वाढत जाणाऱ्या घरघराटाबरोबर ज्यांनी ज्यांनी त्या यंत्रांचा हैदोस आधी बघितलेला होता, त्या सगळयांच्या हृदयावर भीतीचा ताण वाढत जाऊ लागला. दारापाशी होते त्यांनी बाहेर पळ काढला.

ऋजूजानमध्ये जणू ती नेहमी साकारत असे, त्या महान युगनायिका निअस्त्राचा संचार झाला. तिने दिनशाच्या खिशातून बेड्यांच्या चाव्या खेचून काढल्या. मगाशी त्याने तिच्या शरीराशी केलेल्या लगटीत तिला त्यांची जाण झालेली होती. तिने बावळयाला धरणाऱ्या हाबूश व बाबूशवर झेप घेतली. ते बेसावध होते. त्यांना बाजूला ढकलून देत तिने बावळयाच्या काढण्यांमध्ये चाव्या खुपसल्या. फिरवल्या.

बेरहम पहिल्या धक्यातून सावरत तिथे ठेवलेले निकामिक हस्तगत करायला धावला. पण त्याच्या आधी ते फिलूने पळवले.

त्याच्यापासून दूर पळाली. तो तिच्या मागावर जाणार, तोच एक यंत्र घरघरत त्याला सामोरे आले. तो जागच्या जागी सुन्न होत गोठला.

ऋजूज्ञानवर बाबूश आणि बावळयावर हाबूश झेपावू गेले. त्यांच्या त्या हालचालींनी चवताळून घातयंत्रे त्यांच्यावर चालून गेली. ऋजूजान बावळयाच्या काढण्या ओढण्यासाठी त्याच्याकडे निघाली. ते पाहून फिलू ओरडली. "अजिबात हालचाल करिंग न. नाईंग तर यंत्र तुला ठार मारिंग." तिच्या बोलण्याला साक्ष जणू अश्या बाबूशच्या आणि हाबूशच्या तडफडत्या किंचाळया ऐकू आल्या. तिथे असलेले सगळे होते त्या स्थितीत गोठले. त्या दोघांचा जीव गेला. तेव्हा त्या किंचाळया शांत झाल्या. मागे उरला यंत्रांचा दहशती घरघराट.

सगळेजण जागच्या जागी गोठून यंत्रांची उर्जा संपायची वाट पाहू लागले. बेरहम चरफडत होता की फिलू निकामिक वापरून ती यंत्रे बंद पाडत नव्हती. यंत्रांचा घरघराट उतरू लागला. त्यांच्या हालचाली क्षीण होऊ लागल्या. तसं यंत्र बंद पडण्याची खात्री वाटून एका शास्त्रज्ञाने उताविळपणे फिलूवर झेप घेतली. ती झेप तिच्यापर्यंत पोहोचण्याआधीच यंत्रात जणू अचानक पुन्हा चेतना जागी झाली. ते त्या उतावळया माणसावर चालून गेले. त्या माणसाचे हातपाय शरीर यंत्राच्या माऱ्यात सुन्न झाले. तो आचके

देत आयुष्याच्या अखेरच्या घटका मोजू लागला. सगळे जण भयाने जागच्या जागी पुन्हा गोठून गेले. त्या माणसाचे किंचाळणे थोड्या वेळात विरून गेले.

काही वेळाने यंत्रे पुन्हा मंदावू लागली. तशी फिलू अचानक बावळ्या व ऋजूजानपाशी धावली. यंत्र तिच्या दिशेने वळले. पण धावले नाही. त्या दोघांचे हात ओढत फिलू कुजबुजली. "थांबिंग न. धाविंग मंज मागाईंग." त्या तिघांना धावताना पाहून यंत्रांचा रोख त्यांच्याकडे वळला. पण यंत्रांचा धावायचा वेग आधीपेक्षा खूप कमी होता.

तसा बेरहमाला धीर झाला. तो फिलूच्या मागावर धावला. पण त्याच्या आणि तिच्यामध्ये यंत्र होते. "पकडिंग त्यांना. जाईंग देईंग न." तो जीव खाऊन ओरडला. रझाकार त्या बाजूला होते. दिनशा पळणाऱ्यांच्या मागे धावला. त्याचे पाहून बाकीचे रझाकार.

पण ते सगळे बावळ्याच्या मागोमाग दुसऱ्या दारातून बाहेर पडण्याआधी यंत्रांची सक्रियता अचानक पुन्हा वाढली. मागचा रझाकार यंत्राच्या मारगिरीच्या तडाख्यात सापडला. दोन यंत्रे पळपुट्यांच्या मागावर गेली. त्यांच्या मारगिरीच्या क्षेत्रात दोन रझाकार सापडले. त्यांचा पुरता खात्मा करेपर्यंत यंत्रे तिथेच गुंतली. फिलू व कैद्यांना त्यामुळे खूप पुढे निघून जाणे शक्य झाले.

परीक्षणशाळेतले बेरहम आणि त्याचे साथीदार तिथल्या यंत्राच्या धाकाने तिथेच अडकून राहिले.

फिलूच्या मागेमागे बावळ्या आणि ऋजूजान दगडी बोळांमधून धावत होते. त्यांच्या मागावर म्होरक्या दिनशाच्या साथीला चार रझाकार. "आमी इथं शिरलो त्या बिळातून सटकूया की." बावळ्याने अंगचटीला आलेल्या एका रझाकाराला धोबीपछाड दिला. त्या रझाकाराला धडकून बाकी मागचे पडले.

"न. राखाल नी बेरहमानं तो मार्ग बंद करिंग असिंग." फिलूने त्या सूचनेतला फोलपणा दाखवून दिला. "ज्या मार्गानं तयार होईंग अवजड शस्त्रं या तळाबाहेर जाईंग, त्या मार्गानं आमी या पोखाराबाहेर जाईंग." ते धावत होते, त्या बोळाच्या टोकाला असलेले दार तिने दाखवले. "तिंथहून वर जाईंग सरककप्पी असिंग." दिनशाने फेकून मारलेला चाकू तिच्या गालाला घासून गेला.

ते सगळे जण जीव खाऊन धावले. सुटकेसाठी सावजं आणि शिकारीसाठी पारधी. दारालगत असलेल्या कळफलकावर फिलूची बोटे सफाईने अचूक परवलीचे आकडे दाबती झाली. दार सर्रकन दुभंगले. त्या दारामागे साथीदारांसह पोहोचताच फिलूने एकदम वळून ते दार लावून टाकले. दिनशा त्यावर ढामकन धडकला.

त्याचा चरफडाट झाला. रझाकारांना तळाची फारशी माहिती नव्हती. ते दार त्यांना उघडायला जमेना.

दारापलीकडे आतमध्ये ऋजूजान सगळयात जास्त थकलेली होती. तिचा जीव सगळयात नाजूक होता. तिची छाती लोहाराच्या भात्यासारखी एकसारखी वरखाली होत होती. "धरिंग हे." म्हणत फिलूने हातातले निकामिक तिच्या थरथरत्या हातांमध्ये ठेवले. "वेळ पडिंग तर हे कंस्स वापरिंग तुला ठावकिंग?" ऋजूजानने मान डोलावली. तोंड उघडले तर त्याबरोबर जीवच फुफाटून बाहेर पडेल की काय? अशी भीती तिला वाटली.

फिलू तिथल्या नियंत्रण फलकावरच्या कळींचा अंदाज घेत होती. "तुला हे कस्सं वापरायचं माहीत नाय?" बावळयाने ताडले.

"मंज कंधी यापूर्वी इंथ येईंग संधी मिळिंग न." फिलूने आपली बाजू स्पष्ट केली. "उजवी कळ फिरविंग की डावी?" ती स्वतःशीच बोलत होती.

"डावी." ऋजूजान उत्तरली.

"काईंग?" फिलू वैतागली. "तुला काईंग ठावकिंग?"

"मला इतकं ठावूक हाय की तिचं सगळं बेसच होतं हाय." बावळया ऋजूजानकडे बघत हसत बोलला. तसे तिला सुद्धा हसू फुटले. फिलू गोंधळून दोघांकडे बघू लागली.

"हा काईंग थट्टेंज विषय असिंग न." फिलू कातावली.

"थट्टा? न. न. मंज मन कौल देईंग. डावीच कळ कामाईंग येईंग." ऋजूजानच्या या उत्तरासोबतच दारावर धडका बसू लागल्या.

ते अचानक उघडले गेले आणि त्याला पार लगटून असलेला दिनशा आत कोसळला. फिलूने चपळाई दाखवत दाराच्या कळफलकावरचे आकडे दाबले. तेव्हा दिनशाच्या मागोमाग आत घुसू पाहणारा रझाकार ते दार तसेच अचानक पुन्हा बंद झाल्यामुळे त्यात चिरडला. ते बावळ्याच्या काळातले स्वयंचलित सरकून उघडमीट होणारे दार होते. त्या दाराला उघड दिसणारे खटके वा कड्या वा मुठी नव्हत्या. त्याऐवजी एका बाजूला पट्टीवरती आकडे दाखवणारा कळफलक होता. बाहेरून उघडणुकीचा विशिष्ट आकडा रझाकारांच्या प्रयत्नात योगायोगाने दाबला गेला होता.

दारात अडकलेल्या रझाकाराच्या अर्ध्या शरीराचा क्रूरपणे सरळ चेंदामेंदा करत ते पोलादी धातूचे दार परत घट्ट बंद झाले. त्यावरून ओघळू लागलेले रक्त बघून बावळ्या व ऋजूजान दोघांना भोवळ येऊ लागली. दिनशा त्याचा फायदा घेत सज्ज होत उभा राहिला. त्याने चाकू बावळ्याच्या बरगड्यांमध्ये खुपसला.

आजवरच्या रस्त्यावरच्या जगण्यातून आणि वावरातून हाडीमांसी खिळलेले प्रशिक्षण बावळ्याच्या कामी आले. प्रतिक्षिप्त क्रियेने तो बाजूला झाला. सुरा कपडे टरकावून गेला. शरीरात घुसला नाही. बाजूला उभ्या ऋजूजानने सावध होत दिनशाच्या हातावर निकामिक मारून दिले. त्या माराने हाताला झिणझिण्या उठून दिनशाच्या हातातून सुरा सुटला. न पेक्षा तो तसाच बावळ्याचे पोट कापूनच बाहेर निघता. दिनशाने ऋजूजानच्या डोक्यावर डोके आपटून बदला घेतला. त्या माराने ती तिरमिरली.

पुढची हालचाल करायची संधी बावळ्याने दिनशाला दिली नाही. ही वेळ रक्तामांसाची बिभत्सता बघून कच खाण्याची नव्हती. फक्त त्याचेच नाही तर त्या दोघींचे प्राण त्याच्या सोबत पणाला लागले होते. बावळ्याचा वर उचललेला गुडघा जांघेतल्या नाजूक भागावर आपटताच दिनशाला ब्रम्हांड आठवले. फिलूने दिनशाच्या डोक्यावर मूठ मारली. "तू कामाला लाग. मी याला बघतो." बावळ्या फिलूवर ओरडला.

फिलूने डावी कळ फिरवली. सरकपट्टीवरून धडधडत शस्त्रे वाहून नेणारी उचलगाडी खाली खाली येऊ लागली. बावळ्या आणि दिनशामध्ये धमासान मारामारी चालू होती. दिनशा उजवा

पडत होता. तरी बावळ्या मार खा खा खाऊन चिवटपणे लढत होता.

उचलगाडीची वाट बघण्याच्या वेळेत फिलूचा ऋजूजानला भानावर आणायचा प्रयास चालू होता. उचलगाडी खाली येऊन धक्क्याला लागली. तिचा मोठा कानठळ्या फोडणारा आवाज झाला. तरी ऋजूजान शुद्धीत येताना दिसेना. रागाने फिलूने तिला एक जोरदार थोबाडात मारून दिली. तशी ती 'काईंग?' करत परत माणसांत आली.

फिलूने तिला उचलगाडीत आपल्या खांद्यावरून वर चढवले. उचलगाडी म्हणजे एक चौकोनी धातूचा पेचलेला पेटारा होता. ज्याची वरची बाजू उघडी होती. त्याच्या चारी कोपऱ्यातून वर गेलेल्या दांड्यांना वरती मजबूत कड्या जोडलेल्या होत्या. त्यांची वरची टोके मजबूत दोरखंडांना जोडलेली होती.

"फिलू तू बी वरती चढ. मी कळ फिरवतो आनी येतोच हाय." बावळ्या ओरडला. फिलू त्याप्रमाणे आपणहि ऋजूजानच्या मदतीने उचलगाडीत चढून बसली. ती आणि ऋजूजान तो आता कधी मारामारीतून मोकळा होतो आणि गाडीत येतो? याची वाट पाहू लागल्या. ती मारामारी लवकर आटपायची लक्षणे काही दिसेनात. दिनशा पूर्ण त्वेषाने लढत होता.

"बावळ्या त्यांज उजवा हात धरिंग मागं पिळिंग." ऋजूजानने अनाहूत सल्ला दिला. बावळ्याने तो हात धरायला आपला हात पुढे नेलेला होता. त्यावर दिनशाचा डाव्या हाताचा फटका बसला.

"न. त्यापरीस तू त्यांज डावी लाथ धरिंग नी पुढं ओढिंग. तो खाली आपटिंग नी शुध हरविंग." फिलूने सुधारित सल्ला दिला. बावळ्या तेच करणार होता. पण फिलूने डाव आधीच उघड केल्याने, सावध दिनशाने उजवी लाथ मारली.

"अरेरे! काईंग करिंग? त्यांज लाथ काईंग चुकविंग न?" ऋजूजानने आपले घोडे पुढे दामटले. "तू त्यांज हात पिळिंग बघिंग तरी."

"बावळ्या तू त्यांज तीच लाथ धरिंग काईंग न? मंज ऐकिंग ती लाथ फिरविंग न, तोवर तो आटपिंग न." फिलूने आपले ज्ञान पाजळले. "न. न. तो हात ओढींग न. लाथ ओढिंग."

"न. न. सोडिंग ती लाथ आधी." ऋजूजान उत्तेजनेने किंचाळली. "त्या परीस तू हातच पिळिंग."

"न लाथ." फिलू उसळली.

"न. हात." ऋजूजानने हात हवेत फिरवून दाखवला.

असे दिसू लागले की आता त्या दोघींचीच मारामारी होते की काय? बावळ्याचीच लाथ धरून त्याला खाली आपटत,

पळभरासाठी न राहवून दिनशाने विजयी मुद्रेने त्या दोघींकडे पाहिले. त्या पळभराच्या दुर्लक्षाने त्याचा अखेर घात केला. खाली पडलेल्या बावळ्याने तसाच आपला उजवा पाय जोराने दिनशाच्या पायावर मारून दिला. दिनशा तोल जावून पाठीवर मागे उपडा कळफलकावर पडला. उजवी कळ फिरली. उचलगाडी वरच्या दिशेने चालू पडली. "बावळ्या?" त्या दोघी आकांताने त्याला वर घेण्यासाठी हात खाली देत किंचाळल्या.

त्यांच्या सुदैवाने बावळ्या वेळेत हलला. त्याने जावून डावी कळ फिरवली. त्यासाठी त्याला आधी उजवी कळ मोकळी करावी लागली. त्यासाठी तिच्यावर अडकलेल्या दिनशाचे धूड बाजूला करावे लागले. उचलगाडी परत खाली येऊन धक्क्यावर आपटली. "तो तर मरिंग." ऋजूजानच्या तोंडातून अभावित शब्द बाहेर पडले. बावळ्याने धसकून त्या बाजूला केल्यावर खाली कोसळलेल्या शवाकडे पाहिले. त्याला एक क्षण भोवळले.

तोच पोलादी दार परत अचानक उघडले. रझाकार सावधपणे आत घुसले. बावळ्याकडे आपल्या पहिल्यावहिल्या हत्येचं सुतक साजरे करायला अवधी नव्हता. त्याने दिनशाचा चाकू हिसकावून त्याचा घाव मारून डावी कळ मोडली. उजवी कळ फिरवली. उचलगाडीकडे झेप घेतली. दोन सुरे त्याच्या अंगाला चाटून गेले.

त्याच्या दोघी साथीदारणींना त्याचे चिप्पाड हलके शरीर वर खेचून घ्यायला फार श्रम पडले नाहीत. "तुला काईंग वजनच नाईंग." फिलूने उचलगाडी रझाकाराच्या नजरेपार पोहचल्यावर सुस्कारत त्याला पोच दिली.

दगडी खबदाडांतून ती उचलगाडी बराच वेळ हळूहळू वरवर सरसरत जात राहिली. तिथे प्रकाश नव्हता. निर्जीव शस्त्रांना त्याची गरज पडत नसावी. सतत चालू झालेल्या त्या जीवावरच्या हातघाईतून मोकळे झाल्यावर बावळ्याचे डोके इतर विचार करायला मोकळे झाले. सर्वात पहिला विचार होता लाकीचा. तो डोक्यात येताच बावळ्या उसळला. बेफाम झाला. उचलगाडीच्या सरसरणाऱ्या दोरखंडांशी झोंबू लागला. "लाकी. ती खालीच राहली हाय. तिला बी संग घ्यायला पायजेल."

"लाकी? म्हणहजे कोण?" फिलूला प्रश्न पडला.

"माझ्या बरोबर होती ती." बावळ्याचा जीव थाऱ्यावर राहेना. "हे थांबत नाय हाय." तो किंचाळला. त्याचा आवाज त्या विवरात घुमत राहिला.

"ती? महामहीमा खास जिला भेटींजसाठी इंथ पावतो येईंग होईंग?" फिलूनं अंदाज लावला. "ती तळावर असिंग न. राखालानं

तिला त्यांज रझाकारांज मुख्यालयात नेईंग असिंग." माहिती पुरवली.

तसा थयथयणारा बावळ्या जरासा थारावला. ऋजूजानकडे वळला. "तुझ्यात समदं बेस करायची चमत्कार ताकद हाय. काय ती वापरून तू लाकीला वाचवशील? मी तुझा पुरी जिंदगानी गुलाम बनून राहंल."

"सगळं छान करायची ताकद तर तुझी तुझ्याकडे सुद्धा आहे." ऋजूजान शांतपणे म्हणती झाली. "जर तू ती असल्याचा खरा विश्वास धरशील."

"सगळंईंग छान करिंग चमत्कारी ताकद?" फिलूला कळेना.

"मंग?" बावळ्या हिरीरीने स्पष्टीकरणाला सरसावला. "काल तर आमी काळकोठडीमंदी रात घालवली. आमचं आज जाहीर मरण नक्की होतं की? कोनाला वाटलं होतं काय? मी तुला मोलूच्या नावानं ललकारीन आनी तू लगंच बंड करशील. मला बी नाय वाटलंल. मी तर फकस्त तुझी कळ काढत होतो. तर तू सरळ ती यंत्रंच छू करून सोडली की. त्या यंत्राच्या तावडीतून वाचणं बी शक्य नाय होतं. त्या रझाकारांच्या दळाला मात देणं बी शक्य नाय होतं. तरी आमी सुटलो हाय का नाय? ही ऋजूजान काल रातीच मला पैजेवर म्हनली होती, की आमी सुटनार म्हंजी सुटनारच हाय.

तसा इश्वास मनामंदी असला की आपल्याआपच समदं तस्सं तस्सं घडून येतया की."

"ओह!" फिलूला आपला अविश्वास लपवता आला नाही. "काईंग मंग मंज मोलूंज कापिंग होईंग पाय परत उगविंग?" हेटाळले.

"जर त्यांज तंस्स विश्वास पक्का होईंग." ऋजूजानने देखील ठामपणा सोडला नाही. "या मोलूला तू कंस्स कंधी पहिली भेटिंग होईंग?" झाले. यावर बायकांच्या एकमेकींच्या प्रेमपात्रांसंबधाने जिव्हाळ्याच्या गप्पांचा फड सुरू झाला. लवकरच लाकीची चौकशी सुरू झाली. बावळ्या त्यात खेचला गेला. त्या अंधारप्रवासात त्या सहप्रवाशांची मने एकमेकांकडे मोकळी होत राहिली.

कधीतरी कुईंग कुईंग आवाज करणारी उचलगाडी तिच्या वरच्या थांब्यावर थाडकन मोठा आवाज करून आपटली. पोहोचती झाली आणि गप्पांमधून त्यांना बाहेरचे काळवेळाचे भान आले. तिथल्या दिव्यांच्या उजेडाने त्यांचे डोळे दिपले. सरावल्यावर त्यांना ते खालच्या बाजूला होती तशाच खोलीत असल्याचे आढळले. एकेक करत ते उचलगाडीच्या पेटाऱ्यातून थांब्यावर उतरले. पुढच्या क्षणी तिचा दोरखंड तुटून ती धाडधाड

आवाज करत खाली कोसळत गेली. फिलूने भिवया उंचावून ऋजूजानकडे पाहिले. तिने केस झटक्याने उडवून दाराकडे मोर्चा केला.

तिथे त्यांना रोखायला कोणी नव्हते. "मंज भानच राहिंग न की इंथ आमाला पकडिंग रक्षक तयारीईंग असिंग होईंग. पण कोणच काईंग असिंग न?" फिलूच्या भिवया अजून वर उंचावल्या. मग फिलूची बोटे सराईतपणे आकड्यांच्या कळफलकावर कळी दाबत फिरली. तिने अनेक अंक दाबून पाहिले. दार दाद देईना. मग ऋजूजान पुढे सरसावली. डोळे मिटून कळफलकावर न बघताच तिने आकडे दाबले. अचूक परवलीचा जुळून सर्रकन पोलादी दार उघडले. फिलूने आपले दोन्ही हात गालांवर ठेवून मोठा आ वासत बावळ्याकडे पाहिले. त्याने हात गालांवर ठेवलेले नव्हते. पण त्याचा वासलेला आ फिलूपेक्षा जास्त मोठा होता.

दार उघडताच बाहेरची उबदार हवा अंगावर आली. तिच्या सोबत बेरहमचा कर्ण्यांवरून बोंबलणारा आवाज. "सावधान. सावधान. तळावरील कैदी सुटिंग पळिंग होईंग. तळांज सगळे दरवाजे बंद करिंग असिंग. आणीबाणींज इशारा क्रमांक पाच. सावधान. कोणहि दरवाजांज जवळ जाईंग न. सात. सहा. पाच...

बेरहमाची उलटगणती चालू होताच, ऋजूजानजवळील निकामिक फिलूने आपल्याकडे घेतले. "तुमी दोघं तो चिलखती पायरथ ताब्यात घेईंग. आमाला पळींगईंग." तिने तिथे असलेल्या वाहनतळाकडे इशारा केला. ती डोंगरात खोदलेल्या गुहेतलीच ऐसपैस जागा होती. बाहेरून आत येणाऱ्या आणि आतून बाहेर जाणाऱ्या वाहनांना उभे करण्याचा तो तळ होता. त्या जागेची एक बाजू उघडी होती. जिथून बाहेरचे मोकळे निळे स्वच्छ आकाश दिसत होते. जे आता पुन्हा एका दहा वार उंच नी रुंद दाराने त्यांच्यासाठी बंद केले जात होते.

त्या सरकत खाली खाली येत बंद होत चाललेल्या प्रचंड दाराकडे फिलू धावली. ते पाण्याच्या दाबावर उघड-बंद होणारे दार असावे. त्याच्या वरच्या बाजूला असणारे दिवे इशारावजा उघडमीट करत लुकलुकत होते. मोठ्याने धोक्याचा इशारा देणारा भोंगा वाजू लागला होता. काही गणवेषधारी माणसे त्या दाराच्या जबड्याखाली असलेली वाहने चिरडण्यापासून वाचवायला जीवाचा आटापीटा करत होती. फिलूने निकामिक फुंकले. तसा त्या आवाजाने पहिला तो भोंगा बंद पडला. मग दिवे लुकलुकेनासे झाले.

बावळ्याला अंगातून झिणझिण्या जात आहेत असे झाले. ना तसे महान युगनायकाच्या पुजाऱ्याचा निकामिक वाजवल्यावर त्याला झाले होते. ना बेकारिकाच्या चाचणी वेळी. आता मात्र काही दिव्यनाद ऐकत असल्यासारखे रोमांच त्याच्या अंगावर फुललेले. त्याने ऋजूजानकडे पाहिले. ती सुद्धा उचंबळून आलेल्या भावनेने तो नाद ऐकत होती. "मी नाटकात इतक्याईंग वेळा निकामिक वाजविंग होईंग. पण ते कंधी अंस्स वाजिंग न."

"तिला नी निकामिकाला ताब्यात घेईंग." ओळखीचा आवाज बावळ्याच्या कानावर आला. आपल्या बगलबच्च्यांसहित बेरहम एका पोलादी दाराआडून तिथे दाखल होत होता.

बावळ्याला साधायच्या असलेल्या कामगिरीचे भान आले. तो पायरथाकडे धावला. तसा तिथे उभा गणवेषधारी त्याला अडवायला आणि पकडायला सरसावला. बावळ्याने सरळ दिनशाचा चाकू पुढे हवेत उगारला. तशी त्या रक्षकाने आपली तलवार पाजळली. बावळ्या आपल्या नेहमीच्या शिताफिने तिचा वार चुकवत त्या रक्षकाच्या थेट अंगाशी जाऊन भिडला. याचा त्या रक्षकाला इतका राग आला की बेभान होऊन त्याने तलवार टाकून दिली. आपले दोन्ही हात बावळ्याच्या गळ्यात रोवले. तो घोटू

लागला. बावळ्याच्या हातातल्या चाकूचे त्याला विस्मरण झालेले. तो चाकू रक्षकाच्या पोटात घुसून फिरला.

गळा मोकळा होऊन परत एक जोराचा श्वास घेतल्यावर, बावळ्याला आपल्या या कृत्याचे नवल तर झाले. पण जणू सोकावल्यासारखा, ऋजूजानचा गळा घोटू पाहणाऱ्या रक्षकावर, तोच चाकू पाजळत तो धावून गेला. त्या रक्षकाचा मुडदा पाडून मोकळी केल्यावर, ती एक गंमतीचे हसू त्या परिस्थितीत देखील हसली. "जेहवा त्यांज गरज घटनाक्रमात होईंग, तेहवा ते गुण आपोआप त्या माणूसपात्रात प्रगटिंग."

त्या दोघांनी पायरथ ताब्यात घेतला. मुख्य दरवाजाच्या दिशेने फिरवला. "जोवर निकामिक वाजिंग असिंग आमांज हा चालविंग येईंग न. हातानं ढकलिंग फिलू जवळ नेईंग होईंग." बावळ्या आणि ऋजूजान त्या चिलखती पायरथाच्या खाली शिरून तो हाताखांद्यांवर उचलत फिलूच्या दिशेने चालू पडले.

फिलू प्राणपणाने निकामिक फुंकत होती. बेरहमाच्या माणसांच्या बंदुका निकामी ठरत होत्या. त्यांच्यातून गोळ्या उडायलाच तयार नव्हत्या. तर तो खाली येत असलेला प्रचंड दरवाजा फटफटत होता. तो कधीही कोसळून पडेलसा वाटत होता.

बेरहमानं बेकारिक सज्ज करून ते फुफाटवायला सुरूवात केली. त्याचे पाच साथीदार जीव खाऊन त्या बेकारिक अस्त्राचे दट्टे दाबत होते. हवा भरत होते. पण ते अस्त्र चालेना. बेरहमानं डोक्यावरचे केस उपटायला सुरुवात केली. "मुर्खांज बाजार होईंग तुमी सर्व. जर बेकारिकानं निकामिक बंद पाडींग होईंग, तर आधी ते चालू तरईंग जाईंग होईंग? पण निकामिक सगळी बाह्यउर्जेवर चालिंग साधनं आधीच बंद पाडिंग, तर हे तंस्सच उर्जेवर चालिंग अस्त्र मागाईंग सुरुईंग कंस्स जाईंग?"

बावळ्याने पाहिले की अनेक रक्षक तीरकाठा फिलूवर रोखून कधीचे बेरहमाच्या आदेशाची वाट पाहत तयारीत होते. "ठार करिंग तिला. ठार करिंग." बेरहम वेड लागल्यासारखा एकच वाक्य परत परत ओरडत सुटला. त्याच्या पहिल्याच वाक्यावर अनेक सळकतीर फिलूवर झेपावले होते.

"नाय मी तिला मरू देनार नाय. ती मेली तर माझं कायच बरं हाय नाय." बावळ्या ऋजूजानवर डाफरला. "ती मेली, तर मी बी जीव देनार." आणि त्याच्या नजरेला तो चमत्कार दिसला. सगळे तीर हवेतच दिशा हरवल्यासारखे इथं तिथं वेग हरवून खाली पडले. फिलूपर्यंत कोणताच तीर पोहोचला नाही.

"मी हे ऐकिंग होईंग. जो निकामिक फुंकिंग त्याला कोणच शस्त्र अस्त्र कंधी वेधूईंग शकिंग न." ऋजूजानला उचंबळून आले. "महान युगनायकांज कथा पूरेपूर खरेईंग असिंग. निकामिक सगळी अस्त्रशस्त्र निकामी करिंग शकिंग. कारण ती ्जैविक हालचाल करिंग. आमांज नाटकातल्या निकामिकाला खरं मानिंग, मी कितीईंग खुळी होईंग? हे असिंग खरं निकामिक." तिने आनंदाने टाळ्या पिटल्या.

मात्र हा विजय क्षणिक होता. "तिंज गळा घोटिंग. तिंज निकामिक जो आधी छिनाविंग त्यांज मी शंभर होन बक्षिस देईंग." बेरहमानं आपल्या रक्षकांना उत्तेजित केले. तसे ते सगळ्या दिशांनी फिलूकडे झेपावले.

बावळ्या व ऋजूजान सुद्धा वेगे वेगे पाय मारीत तिच्या दिशेने निघाले. तो लष्करी उपयोगाचा पायरथ असल्याने रणगाड्यासारखा चिलखती होता. आता पुढचा चमत्कार घडला. फिलूच्या निकामिक फुंकण्याने तिथल्या विजेच्या जुळणीतारा फुफाटू लागल्या. त्यांच्या घातजोडण्या जुळू लागल्याने, त्या ज्या ज्या यंत्रसाधनांशी जोडल्या गेलेल्या होत्या, त्या साधनांचे स्फोट होऊ लागले. गुहा हादरू लागली. तिचं छत आणि भिंतींमधून दगडी

कपच्या इतस्ततः कोसळू लागल्या. फिलूला धरायला सरसावलेल्या रक्षकांच्या डोक्यात त्या पडून ते ढेर होऊ लागले.

काहीच क्षणात बावळ्याचा पायरथ मात्र एकहि दगडी दणका न खाता फिलूपाशी पोहोचला. ऋजूजानने चिलखती खिडकी खुली करून ओळख देत फिलूला पायरथात चढवून घेतले. आता पायरथ चालवण्यासाठी त्यांना निकामिक बंद करणे भाग होते. फिलूचे निकामिक बंद पडताच अनेक दिशांनी सळकतीरांचा अचूक मारा त्या पायरथाच्या चिलखतावर येऊन आदळला. फोल झाला.

"अरे दुरमार तीरकाठा वापरिंग फोडिंग तो." बेरहम घायकुतीला येऊन ओरडला. रक्षक त्यासाठी धावले. "थांबविंग तिला. नाईंग तर ती सगळा तळ बेचिराख करिंग. थांबविंग सगळी यंत्रं जलदीईंग." काही रक्षक त्यासाठी धावले. त्यांनी ते साधायच्या आधी निकामिकाचा आवाज जहरासारखा परत एकदा त्या गुहेत गुंजू लागला. कारण पायरथ आता नैसर्गिक उताराचा फायदा घेत जमिनीवरून घसटत दाराकडे घसरत जाऊ लागला होता.

"बावळ्या ते दार कोसळींग. आमाला चिमटिंग आधी बाहेर नेईंग." ऋजूजान सुद्धा घायकुतीला येऊन ओरडली.

बावळ्या शांतपणे तिच्याकडे वळला. "माझं समदं आजपास्नं छानच होनार हाय." पुढच्या क्षणी त्यांचा पायरथ त्या दारातून बाहेर

झेपावला. मागे ते दार प्रचंड आवाज करत आणि धुरळा उडवत कोसळले. बाहेर ते डोंगराच्या उतारावर तो पायरथ घसटत दूर नेत राहिले.

तो सगळा निर्जन रानोमाळ डोंगराळ परिसर होता. धुरळ्यातून बाहेर पडल्यावर त्यांनी पाठलागावर कोणी येते आहे का? हे जोखण्यासाठी मागे नजर टाकली. तिथे एकामागोमाग स्फोटाचे धडाके चालू झालेले होते. जमिनीतून गुडूमगडाम आवाज येत होते.

"व्वा!" फिलू हर्षली. "निकामिकानं त्यांज तळांज सगळीच यंत्रणा फोडींग टाकिंग. तो पुरा तळच निकामी करिंग. जर तो बेरहम सुदहा त्यात मरिंग, तर कितीईंग छान होईंग."

"समदा तळ बेचिराख?" बावळ्याच्या चेहऱ्यावर गोंधळ दाटून आला. "मंग तू चाचणी केलंली, तेवाच ते समदं फुटलं का नाय? तेवा बी तू निकामिक फुंकलं होतंच की?"

"तेहवा मी निकामिक फुंकिंग, पण त्यांज सहापैकी एका नळींज भोक बोटानं बंद राखिंग. सगळंईंग सहा कंपनं वाजिंगच होईंग न. त्या कारणिंग." चेहऱ्यावर स्मित हास्य आणत फिलू उत्तरली. "ती सगळी चाचणीच नकली होईंग. ना ते निकामिक काम करिंग खरं होईंग. ना ते बेकारिक काम करिंग खरं होईंग."

"मंग ती यंत्र उडालंली नी परत तू निकामिक फुंकल्यावर खाली कशी काय बा आली?" बावळ्याच्या शंका संपेनात.

"मी त्या यंत्रांना उर्जा पुरविंग मसाला तंस्स बेतानं रचिंग होईंग. काही काळ ती यंत्र उडिंग होईंग. मंग ताकद कमीईंग होईंग खाली येईंग होईंग. पुनहा उडिंग होईंग." फिलू हसत सुटली. "मंज वाटिंग की बेरहम कदाच मंज चलाखी समजिंग शकिंग. म्हणहून मी तो होईंग न, तेहवाच चाचणी करिंग. मुद्दाम रझाकारांज समोर. राखालांज खात्री करविंग. ते मंग महामहीमाला खात्री देईंग. त्या पुढं जर बेकारिक काम देईंग न, तर महामहीमाला बेरहमांज नियतीवर संशय जाईंग. त्यांज दोघात फूट पडिंग होईंग. त्या कारणिंग."

"अय्याय्या!" ऋजूजानचा स्वर कौतुकानं नहालेला होता. "काईंग भारी डोकं असिंग तुंज?"

"म्हनजी छमदेनं पळिवलेलं बेकारिक काम करनार नाय? खोटं हाय?" बावळ्याच्या चेहऱ्यावर गोंधळ विरून उत्साह फसफसून आला.

"होईंग." फिलूच्या त्या एका शब्दानं बावळ्याचा आनंद गगनात मावेनासा झाला. तो परत परत शिट्ट्यांवर शिट्ट्या मारत सुटला. "सांभाळिंग." त्याच्या हाती सुकाणू असल्याने भरकटू

लागलेल्या पायरथामुळे अस्वस्थ होत फिलू बोलली. "कुंठ नेईंग तू आमाला?"

"जिथं माझी लाकी असंल तिथं." बावळ्या बोंबलला.

## शंभर वर्षे पुढे - प्रकरण ३३

"बावळ्या हे पोहचिंग होईंग आमी रझाकारांज मुख्यालयी. ती बघिंग काईंग लालजर्द रक्तरंगी इमारत?" फिलूने बोट दाखवलेल्या दिशेला बावळ्या पाहू लागला. ती दोन माडांच्या उंचीहून जास्त मोठी एक अंडा इमारत होती. तिच्या आजूबाजूला आंब्याची मोठाली झाडे होती. शिवाय ती इमारत होती त्या आवाराला पाच पुरूष उंचीचा मजबूत दगडी कोट सुद्धा होता. ज्याला एकच मोठा पोलादी दरवाजा होता. त्या दरवाजाच्या दिंडी दरवाजातून रझाकारांची जा-ये चालू होती. पहारा एखाद्या तुरूंगासारखा कडेकोट होता. कोटाच्या चारहि बाजूंना शहरी रस्ता होता. जो त्या आवाराला राजधानीच्या शहरातल्या बाकी गर्दी आणि वर्दळीपासून अलग राखत होता.

बावळ्याच्या तोंडातून शीळ बाहेर निसटली. "व्वा! जेवा पास्नं मी ही असली अंडी बगली हाय, तेवा पास्नं माझं हात निस्तं चाळवलंलं हाय. त्यामंदी घुसखोरी आनी चोरीमारी केल्याबिगर माझ्या चोरमनाला चैन ती कस्शीच पडनार नाय हाय. आपली खासियत हाय." बावळ्या छाती पुढे काढत फुशारला. "कंच्या बी इमारतीत आनी पहाऱ्यामंदी मी घुसू शकतो. आनी चोरी करुन ती

करुन, पुन्ना कोनाला बी खबर नाय लागता, बायर बी येवू शकतो. काय? कंचा बी बंदोबस्त माझ्या खिशात हाय."

"तिंथहून तुंज खिशात वस्तू घालिंग नाईंग, लाकी म्हणहजे जिवंत माणूस बाहेर आणिंग होईंग." ऋजूजानने त्याला चिडवले.

"माझं समदं आता बेसच होनार हाय ना? मंग?" बावळ्याने मान घुसळली. "ती आंब्याची झाडं बघली नव्हं त्या आवारामंदी? ती माझ्याचसाठी तर लावली आनी इतकी वरपावतो वाढवलंली हायत. याच दिवसासाठी की."

"मी काईंग त्या झाडांवर चढिंग शकिंग न. तुंज संग तंश्शी चढिंग येईंग शकिंग न." फिलूने हात वर केले.

"मंज सुदहा तंस्स काईंग जमिंग न." ऋजूजानने हात झाडले.

"ठिक हाय. तुमा बायकांस्नी आराम पायजेल हाय. तस्सं तर तस्सं. करा की इथं या खटाऱ्यात." बावळ्या थट्टेखोर बनला. "हा मी गेलो आनी हा लाकीला खिशात घेवून आलो."

"या पन्नाशेटच्या इतक्याईंग भारी पायरथाला खटारा बोलिंग?" ऋजूजानने तोच मस्तीखोर रागरंग पकडला. "त्या बापड्यानं ऐकिंग तर तो हृदयांज चौथा झटका खाईंग."

"चौथा नाईंग गं," फिलूने दुरुस्ती केली. "पाचवा. चौथा झटका तर त्यांज दुकानाबाहेर रस्त्यावर उभाईंग पायरथ चोरीला जाईंग, हे बघिंग तेहवाच त्यानं खाईंग होईंग."

"चोरी कशापायी म्हनता गं?" बावळयाने पुढची दुरुस्ती केली. "अदलाबदली म्हना की. तो ढाल चिलखती पायरथ आमी त्यालाच तर सोडला हाय की? चला चला बायांनो, येळ फुका दवडू नका. बीगी बीगी कामाला लागा. या कोटाचा एक चक्कर लगावायला पायजेल. कुठं ना कुठं ही रस्त्यावरची झाडं पार तिथं कोटाला भिडली असनार की."

त्याच्या सांगण्यानुसार दोघींनी पायरथ हाकत एक चक्कर त्या कोटाभोवती लगावली. दोन ठिकाणी तशी झाडं कोटाला जाऊन टेकलेली होती. त्यातले कोटाच्या दरवाजापासून दूरचे मागच्या बाजूचे झाड बावळयाने पसंत केले. पायरथ त्या झाडालगत नेऊन दोघींनी उभा केला. बावळयाने दार किलकिले करून सगळया दिशांना एक चोरनजर टाकली. समोरून येणारे वाहन पसार होताच, झटक्यात झाडाला जाऊन चिकटला. सरसर वर चढू लागला.

"काईंग म्हणिंग तू?" फिलूने ओठांचा चंबू करत ऋजूजानला विचारले. "काईंग तो रस्तावरईंग वा कोटावरईंग पहारेकऱ्यांना दिसिंग शिवाय आत घुसिंग शकिंग?"

"मंज पुरी खात्री होईंग." ऋजूजान बावळ्याच्या हालचाली डोळे बारीक करून निरखत म्हणाली. "हविंग तर पैज लाविंग मंज संग. मी बोलिंग की बावळ्या लाकीला नक्की परत आणिंग."

"पैज? लाविंग." फिलू लगेच तयार झाली. "तू काईंग पणाला लाविंग? बोलिंग."

"अं!" ऋजूजान विचारात पडली. "हा पायरथ तुला बक्षिस."

"मी हरिंग तर हाच पायरथ तुला बक्षिस." फिलूने हसत हसत कबूल केले. "पन्नाशेटांज पायरथावर आमांज तुळशीपत्र."

झाडाच्या रस्ता पार करत पलीकडे कोटावर पोहोचलेल्या फांदीवर, एखाद्या खारीच्या चपळाईने टणटणणाऱ्या बावळ्याला त्या कौतुकाने निरखू लागल्या. "त्यानं फांद्या इतक्याईंग जोरानं सळसळविंग होईंग न."

"लोकांना वाटिंग की माकड होईंग."

"हुं! माकडांज उच्छाद हल्लीईंग खूपच वाढिंग असिंग नाईंग."

"तर काईंग! फारच."

त्या दोघींच्या शिळोप्याच्या गप्पा चालू असता, बावळ्या शिरिषाच्या त्या जाड फांद्यांवरून कोटाच्या भिंतीवर पोहोचला देखील होता. कोटाची भिंत चांगली पुरुषभर जाडीची भरभक्कम रुंद होती. सुदैवानं तिच्यावरच्या लगतच्या टेहळणी छत्रीतल्या

पहारेकऱ्याची बावळ्याकडे पाठ होती. सुदैवाचे आभार मानत बावळ्या कोटाच्या आतल्या आंब्याच्या फांदीवर सरकला. मग हाय खाऊन फांदी सोडून त्याने लाल अंडा इमारतीच्या भिंतीवर उडी मारली.

तिथं ते बघत असणाऱ्या दोघी पैज मारणारींचे श्वास ती उडी बघून वरचे वरच राहिले. बावळ्या एखाद्या पालीसारखा त्या भिंतीवर घट्ट चिकटलेला तसाच वरच्या वर राहिला. हे जेव्हा त्या दोघींनी बघितले, तेव्हाच त्यांचा श्वास पुन्हा मोकळा सुटला. बावळ्याने त्या भिंतीमध्ये वायुवीजनासाठी जी इंचभर व्यासाची छोटी छोटी भोके ओळीने होती, त्यांच्यामध्ये बोटं रुतवून घट्ट धरलेली होती. त्या ओळी हारीने भिंतीवर आडव्या गेलेल्या होत्या.

"हुश्श! काईंग धसकिंग मंज जीव." फिलूने आपल्या छातीवर हात ठेवून वाढलेले ठोके आजमावून पाहिले. "पण इतक्याईंग त्या मोठ्या इमारतीत आत घुसिंग नी आतले सगळे पहारे चुकविंग, तो लाकीला कंस्स शोधिंग शकिंग?"

हा गहन प्रश्न तर त्या भिंतीवर पोहोचल्यावर बावळ्याला सुद्धा सतावू लागला होता. त्याच्यापासून दोन पुरुष उंचीवर त्याला काचेचे एक भिंग दिसत होते. त्या दोन हात व्यासाच्या लंबगोलाकार तावदानातून तो नक्कीच आत घुसू शकला असता.

त्या तावदानापर्यंत  पोहोचायला मात्र मध्ये आधार काही नव्हता. तो एका माडाच्या उंचीहून जास्त उंचीवर होता. अंडा इमारतीचा तो वरचा हिस्सा असल्याने ती भिंत बहिर्वक्र उताराची होती. सरळसोट नव्हती. एवढी गोष्ट जमेला धरून तो हिय्या करत भोकांवरची पकड सोडून भिंतीला अगदी चिकटून वर वर सरपटत निघाला.

"लाकी क्रमांक सातशे बाराला इंथ चौकशी कक्षात जल्दीनं घेईंग येईंग." तो चिरपरिचित हाडवैऱ्याचा खरखरित आवाज बावळ्याच्या कानात खाली सोडून आलेल्या भोकांमधून बाहेर येत शिरला. आनंद जसा त्याच्या मनात मावेनासा झाला. त्या आनंदाच्या उत्तेजनेमुळे शरीर कापायला लागून भिंतीवरची पकड निसटते की काय? अशी भीती त्याच्या मनात जागली. राखालच्या आवाजाने आणि जवळीकीने तो इतका खूष होऊ शकेल, हे बावळ्या कधी स्वप्नात देखील कल्पू शकला नसता. लाकीला कुठे शोधायचे? हे कूट क्षणात सुटले होते. बावळ्याला कुठेच आणखीन दुसरीकडे जावे लागणार नव्हते. लाकी अनायास त्या भोकातून डोकावल्यावर त्याला दिसणार होती.

"जी साहेबसरकार." रझाकार सेवकांचा आवाज आला. मग दार ढकलले गेल्याचा. खुर्चीवर कोणी धप्पकन बसल्याचा. वैतागाने हात मेजावर दणदण आपटत असल्याचा. अगदी हळूहळू

बावळ्या त्या काचेच्या भिंगापर्यंत पोहोचला. त्यात बराच वेळ गेला असावा. पण राखाल आत असताना तिथे डोकावून पाहण्याचा धोका बावळ्याने पत्करला नाही. दार पुन्हा उघडल्याचा आवाज झाला. "साहेबसरकार, लाकी क्रमांक सातशे बारा हजर असिंग." रझाकारांची घोषणा कानावर आली. बावळ्या मनाने खाल्लेली उचल रोखू शकला नाही. तो चोरून त्या तावदानातून आत डोकावला.

त्याला समोरची जी बाजू दिसत होती, तिथेच त्या चौकशीकक्षाचे दार होते. त्यात दोन रझाकारांच्या पक्कडीत मलूल लाकी जेरबंद होती. राखालची रुंद पाठ त्याच्याकडे असलेली दिसली. राखालने पहारेकऱ्यांना तिला जमिनीवर टाकण्याचा हुकूम दिला आणि जाण्यास फर्मावले. त्याप्रमाणे तिला खाली ढकलून आणि दरवाजा ओढून बंद करुन घेत ते रझाकार कक्षाबाहेर गेले. राखालने पुढे होऊन लाकीच्या पालथ्या पंज्यावर पायातला जोडा ठेवून तो चिरडला. तिच्या तोंडून 'स्स हाय!' निघाले. बावळ्याचे हात राखालचा गळा दाबायला शिवशिवले.

"तो तिंथ कितीईंग वेळ लटकिंग असिंग." फिलू कमरेवर हात टेकवत बडबडली. "काईंग त्याला ती खिडकी उघडिंग न?"

"न. तो आत काईंग पाहिंग असिंग." ऋजूजानने नजर जास्त बारीक करत अंदाज लावला.

"लाकीच तर असिंग नाईंग? तिंथल्या तिंथच सापडिंग." फिलूला ही कल्पना इतकी थट्टेखोर वाटली की तिला आपले हसू आवरेना.

"होईंग शकिंग." तिच्याकडे अंमळ नाराजीने पाहत ऋजूजान होकारली. "आमांज सगळं छानच होईंग ..."

"ओह!" हसायचं थांबवून फिलू फिस्कारली. "खरंच काईंग?" तिची नजर त्या बावळ्या धरून असलेल्या सुदूर खिडकीकडे लागली.

तिथं राखाल लाकीला दम भरत होता. "मंज तुंज हाय हाय हविंग न. बंडबागींज अड्ड्यांज पत्ता हविंग असिंग. बोलिंग लागिंग आता चटचट. मी रातभर तुंज त्या नाडचुक्या छमदांज पाठलाग करिंग वैतागिंग होईंग.  तुंज नखरेईंग सांभाळिंग मंज आता दम असिंग न. तुंज महान युगनायकांज शप्पथ निभाविंग. बोलिंग चटफटक." राखालानं लाकीला लाथ हाणली. टकटकीचा आवाज राखालच्या कानावर जायची पर्वा न करता, बावळ्या जीव तोडून तावदान खोलायच्या खटपटीला लागला.

"मंज ठाविंग न." लाकी उसासली.

"तू खोटंईंग काईंग बोलिंग? तू बंडबागींज सगळी माहिती देईंग शप्पथबद्ध असिंग. काईंग तुंज शपथ खोटी होईंग?" राखालाने तिचे केस ओढून तिची मान धुण्याचा पिळा झटकावा तश्शी झटकली.

"मी खोटंईंग बोलिंग न." लाकी क्षीण पुटपुटली. "बंडबागींज अड्डा अंस्स काईंग जागाच होईंग न."

"मंग ते सगळे कुंठ भेटिंग? नव्यानं भरती होईंग बंडबागीला कुंठ प्रशिक्षण देईंग? त्यांज संघटनेंज म्होरक्या कुंठ राहिंग? कोण होईंग?" राखाल तिच्यापाशी झुकला.

"तू तुंज सरकारदारी नजरेनं पाहिंग, तोवर बंडबागींना कंस्सच जाणिंग शकिंग न." लाकीने आता सरळ त्याच्या नजरेला नजर दिली. "बंडबागींज काईंग संघटन असिंग न. कोण जुना बंडबागी त्याला जो कोण बंडबागी होईंग योग्य वाटिंग, त्याला सवताहा एकटा लढाईंज तंत्र शिकविंग. जंस्स मंज साथी क्रमांक तेहवीसानं शिकविंग. गुरू नी शिष्य आपली लढाई आपण लढिंग."

राखाल यावर खदाखदा हसत त्याच्या आवडत्या कमरेवर हात ठेवल्या पवित्र्यात उभा झाला. "या अंस्स जोड्या जोड्या काईंग क्रांती करिंग शकिंग? सरकार उलथिंग शकिंग? म्हणहजे मंज काईंग मोठी फिकरईंगच करिंग होईंग न."

"खुळचुक्या," लाकीच्या खिजवणीने राखालचे तांबारलेले डोळे अजून लाल झाले. त्यात रक्त उतरल्यासारखे. "बंडबागींज लक्ष्य सरकार उलथिंग वा क्रांती करिंग कंधीच होईंग न. वैयक्तिक अन्यायांज उत्तर देईंग नी अन्यायकर्त्यांज पुढंईंग अन्यायापासून रोखिंग, इतकईंगच बंडबागीनं साधिंग होईंग."

"कंस्स साधिंग? खूनखराबा करिंग?" राखालने तिला उलटे खिजवले. "तुला वाटिंग त्या माणसाईंग ठार करिंग?"

"न. आमी आधी त्याला एक अवसर सुधारिंग जरूर देईंग. त्याला आधी खबरदार राहिंग सूचना देईंग होईंग." लाकीने कडवटपणे पुस्ती जोडली. "म्हणहून तर तू आजपावतो जिवंत असिंग. आधीच सावध होईंग नी आमाला तेहवा सापळ्यात घेरींग होईंग. आमी लढाईंज रित निभाविंग. पण तुंजसारख्या नपुंसकाईंग ती रित निभाविंग कंधीच जमिंग शकिंग न."

राखाल इतका चिडला की त्याने पायाच्या जोड्याने लाकीचा गळा चिरडला. बावळ्या खिडकीशी ती फोडायला झटपटू लागला. ते त्याला नुस्त्या हाताने साधेना. राखालला कशाचे तरी भान आले. त्याने लाकीच्या गळ्यावरचा जोडा हटवला. "तू नी तुंज साथी? तुमा केवळिंग दोघांना इतकईंग सगळे कुरापती साधिंग शक्य असिंग न. तुमांज मदतगार कोण कोण होईंग? सांगिग."

लाकीला इतरांना संकटात टाकायचे नव्हते. "सरकारदारांज जुल्मानं संत्रस्त कैक लोक होईंग. त्यांज पूरेपूर सहानभूती बंडबागींना होईंग. ते आपआपल्या परीनं आमांज मदत करिंग. आसरा देईंग. गरजेंज गोष्टी पुरविंग होईंग."

"तुला कोण कोण मदत करिंग? मंज त्यांज नावं सांगिंग." राखाल गरजला.

लाकी हतबलतेने रडायला लागली. "तू राखाल न, राक्षस असिंग. मंज ठार काईंग करिंग न?"

यावर राखाल कुत्सितपणाने पुन्हा गडगडाटी हसला. "तुंज त्या यारांज नादानं, तूच सवताहा महान युगनायकांज शपथ घेईंग फसिंग होईंग. आता कुंठ होईंग तो तुंज यार? मरिंगसाठी शहरचौकात?" अचानक त्याच्या डोक्यात एक विचार वीजेसारखा चमकून गेला.

त्याने हाताच्या जोरदार टाळया वाजवल्या. "लांबूश?" हाकारले. तसे दाराच्या बाहेरच उभे असणारे ते दोन रझाकार पटकन दार उघडून आत दाखल झाले. "बेरहमांज तिंथहून आणिंग होईंग कैदी कुंठ असिंग? त्यांज खबर मंज अजून पावतो काईंग देईंग न? इतकाईंग उशीर काईंग होईंग?" राखाल त्यांच्यावर ओरडला.

"साहेबसरकार, माफी देईंग. पण अजूनपावतो बेरहमांज कडून कोणहि कैदी न, कोणहि रझाकार येईंग असिंग न." सेवकाने राखालला सूचित केले.

राखालाने हातापायांचा रागाने दणदणाट केला. "त्यांना इंथ पोहचिंग दोन घटिका उशीर होईंग असिंग. तरईंग कोणी काईंग विचार करिंग न? आताच आता बेरहमांज संग दूरसंपर्क जोडींग. विचारिंग त्याला."

"जी साहेबसरकार." म्हणत सेवकांनी धावपळ केली. राखाल ते परत येईपर्यंत रागारागाने लाकीला लाथा मारत राहिला. "साहेबसरकार," सेवकाचा आवाज धास्तावलेला होता. "बेरहमांज संग तिंथ काईंग दूरसंपर्क होईंग शकिंग न. कोणहि सरकारदार खात्याला तिंथहून उत्तर मिळिंग न."

राखालाने रागाने त्या सेवकाच्या पोटात ठोसा मारून दिला. तो सेवक हातांनी पोट जोराने आवळत खाली कोसळला. दुसरा सेवक भीतीने थरथर कापू लागला. तोच तिसरा एक सेवक पळत येऊन घाईघाईने सांगू लागला. "मंडलेश्वर सेनगुप्त सवताहा त्यांज फौजताफा घेईंग खाली दाराशी येईंग असिंग. त्यांज संग बेरहमांज तळावर तातडीईंग रवाना होईंग, महान महामहीमांज तुला सक्तींज निरोप असिंग. तिंथ स्फोटाचे आवाज येईंग होईंग. अंस्स त्या जागेंज

जवळईंग सरकारदार चौकीनं कळविंग होईंग. तिंथ काईंग घोर घडिंग होईंग. तुला चौकशीईंग जाईंग महान महामहीमांज हुकूम असिंग."

राखालाने त्या सेवकाच्या पोटात सुद्धा रागाने ठोसा मारला. गरजला. "या आईसझुकीला मी परतिंग तोवर परत कोठडीत घालिंग." त्याने लाकीला एक शेवटची लाथ हाणली. "हिंज त्या यारांज काईंग ही कलागत होईंग. मंज त्यांज वास इंथ सुदहा येईंग." राखाल नाक टवकारून जोरजोराने हुंगू लागला. आजूबाजूला पाहू लागला. त्याने पाहाण्याआधी बावळ्याचे टाळके पटकन खिडकीतून गायब झाले.

"साहेबसरकार, महाम महामहीमानं दूरसंपर्क साधिंग असिंग. ती तुंज संग बोलिंग मागिंग." चौथा सेवक निरोप घेऊन आला. त्याला ठोसा मारून राखालने दारातून बाहेर धाव घेतली.

"नाडचुका." पोट दाबून विव्हळत सेवकाने राखालला शिवी घातली. तसे बावळ्याचे टाळके परत खिडकीत उगवते झाले.

"बावळ्या काईंग ती खिडकी उघडिंग शकिंग वाटिंग न." पायरथासमोरुन मंडलेश्वर खाश्यांचा फौजताफा रवाना झाल्यामुळे, फिलू व ऋजूजानने सुद्धा आपली डोकी आत दडवली होती. ती

डोकी पुन्हा पायरथाच्या खिडकीत उगवली. पुन्हा आपल्या पैजेची शिकस्त-मात जोखू लागली.

"तो काईंग? शिरिंग की आत." ऋजूजान कुजबुजली.

बावळ्याने जणू राखाल असेपर्यंत आत शिरणे योग्य नव्हते. म्हणून जसे तावदान दाद देत नव्हते. राखाल तिथून निघून जाताच खटकन उघडते झाले. त्यातून बावळ्याचे मुटकुळे आत शिरले. तिसरा व चौथा सेवक आपापली पोटे आवळत आपापल्या पुढच्या कामाला चालते पडले.

लाकीला कोठडीत टाकायचे काम सोपवलेले सेवक तसेच जरा वेळ पोट आवळत हायहुई करत बसले. बावळ्याने आपल्या कपड्यांच्या चिंध्यांचा गाठ मारून दोरा केलेला. तो आत सोडून त्याला लोंबकळत बावळ्याची स्वारी चौकशीकक्षात अधांतरी अवतीर्ण झाली. कक्षात असलेली तिन्ही माणसे भूत पाहावे तशी त्याच्याकडे पाहू लागली. बावळ्याला चोरून प्रवेश केलेल्या ठिकाणी अशा प्रतिक्रियांची सवय होती. "आरं बाबा, माणूसच हाय मी. अजून मेलो नाय हाय." म्हणत तो लाकीच्या काढण्या काढायच्या मागे लागला. त्यासाठी साधन म्हणून त्याने एका सेवकाचा कडसरीचा चाकू काढून घेतला. "जरा? मंग देतो की परत." म्हणत त्या कामात दंग झाला.

तसे ते रझाकार भानावर आले. हा आपल्या विरोधी पक्षातला आहे, अशी त्यांची खात्री झाली. पोटं आवळत ते उठले. आपापली शस्त्रे परजत बावळ्यावर धावले. मात्र धावताना बावळ्यासोबतच त्याच्या खाली  कोसळलेल्या चिंधी दोरावर त्यांचे पाय घसरले. ते घसरून एकामेकांवर आपटले आणि त्यांची उगारलेली हत्यारे एकामेकांच्या पोटात घुसली. तोंडातून हलकेच 'आह' आचका देत, ते वीर धाराशय्यी कोसळले. त्या आवाजाने बिचकून बावळ्याने नजर वर केली. त्याला हा घोर प्रसंग घडून गेलेला दिसला.

"त्या बावळ्याला काईंग लढाईंज अंग असिंग न." पायरथात बसलेली फिलू उसासली. "कंस्स काईंग तो रझाकारांज तळावर रझाकारांज मात देईंग शकिंग गं?"

"तो परतिंग तेहवा त्यालाच विचारिंग बाई." ऋजूजानचा त्याच्यावरचा विश्वास अणुमात्र कमी झाला नव्हता.

तसा विश्वास लाकीला नव्हता. "तू काईंग इंथ येईंग? राखालला बंडबागींज सगळंईंग गुपित कळिंग असिंग. मंज सांगिंग लागिंग. आता मी जगिंग काईंग उपयोग? मी मरिंग प्रायश्चित्त घेईंग होईंग."

"मरायचं हाय तर संग मरू." बावळ्याला तिच्या काढण्या उचकटण्यात यश मिळाले. "पन ही काय मरायला बरी जागा दिसत नाय. चल."

"मी तुंज नादानं शपथ घेईंग एकठाव फसिंग असिंग. पुनहा फसिंग मंज इच्छा असिंग न." लाकीने अंगातले शेवटचे बळ एकवटून मरुन पडलेल्या रझाकाराचा चाकू हिसकावला. तिने तो स्वतःला भोसकून घेण्याआधी, बावळ्याने तिच्या हातातून काढून घेतला. तिच्यात प्रतिकाराची ताकद नव्हती. "मी मरिंगच." ती जिद्दीने पुटपुटली. तिचे बोलायचे त्राण संपत आलेले.

"मला काय बा फुका मरवते? तू मेली तर मी जित्ता राहून काय करु? मी पन मरंन." बावळ्याने तिला समजवायचा प्रयत्न केला.

"तुंज तू मरिंग होईंग तर मरिंग. मंज फरक न." त्याच्या भावनिक धमकीला लाकी बधली नाही. तिने पुन्हा चाकू खेचला. तिच्या शब्दांनी बावळ्याचे काळीज फाटून गेले. त्याने तिच्या डोक्यावर फटका हाणून तिला बेशुद्ध केले. मग जावून कक्षाचे दार आतून बंद लावून टाकले. त्या मरून पडलेल्या रझाकारांच्या वाहत्या रक्ताने येत असलेली भोवळ उडवून लावली. त्यांचे कपडे टरकावले. शांतचित्ताने त्या रक्ताने भिजलेल्या चिंध्यांचा जाड दोर गोवला. चाकूला त्याचे टोक बांधून वर अचूक तावदानात फेकला.

दोर पक्का अडकल्याची खात्री करून लाकीचे ओझे पाठीवर घेऊन निघाला.

"पण मंज समजिंग न." त्यांच्या समोरून वेगात सरकत परतत असलेल्या मंडलेश्वराच्या खाश्या फौजताफ्याकडे बघत फिलू विचार करु लागली. "समजिंग की त्यानं लाकीला शोधिंग. तिंज सोडविंगहि. पण इतक्या सगळयाईंग रझाकारांज संग लढिंग, तो त्या कोटांज एकच एक दारातून तिला कंस्स बाहेर काढिंग शकिंग?"

"त्या दारानं बाहेर पडिंग गरजिंगच न." ऋजूजानने फिलूला ढोसले. "जंस्स तो आत शिरिंग होईंग, तंस्सच तिंथहून बाहेर येईंग."

"काईंग ती लाकी सुदहा त्यांज इतकीईंग भिंत उतरिंग तय्यार असिंग?" फिलूने शंका काढली.

"ते आता तू तुंज डोळयानंच पाहिंग. तो बघिंग बावळ्या. नी ती बघिंग. त्यांज संग ती लाकी बाहेर आणिंग." ऋजूजान एकदम उत्तेजित झाली. सुदैवानं मंडलेश्वराचा ताफा नजरेआड निघून गेलेला होता.

"काईंग मंज डोळे बघिंग ते सत्य?" फिलू सुद्धा हर्षभरित झाली.

बावळ्याने लाकीला तावदानातून बाहेर खेचल्यावर त्या मोकळ्या हवेवर आल्याने लाकीची शुद्ध परतली. तिने डोळे

आजूबाजूला फिरवले. त्या उंचीने तिचे डोळे पुरते फिरवले. तिने बावळ्याला घट्ट मिठी मारून दिली. तिच्या भाराने त्याने आधारासाठी धरलेली तावदानाची कड करकरु लागली. "मंज मरिंग होईंग. पम अंस्स चेंदामेंदा जाईंग मरिंग इच्छा होईंग न." बोलता बोलता तिची दातखिळ वाजू लागली.

"तर मंग ती खाली दिसती हाय, त्या आंब्याच्या फांदीवर आमी उतरायला पायजेल हाय." बावळ्या त्या मिठीने खुशालला होता. "तुला भिंतीला धरून खाली सरकायला जमंल काय?"

लाकीने पुन्हा एकवार खाली नजर टाकून भोवळून घेतली. मग त्याच्याशी मिळवली. "समजलं. मला वाटलंच होतं की नाय जमायचं. म्हनून मी त्याची सोय केलंली हाय. आपली हवाई छत्री हाय की." त्याने रझाकारांच्या गणवेषाचे रुंदावलेले फडके फडफडवले. "हे पसरलं की आपन आरामात हवेवर पतंगावानी हलकं होवून उतरत त्या फांदीवर पोचनार. काय खरं वाटंत नाय? हे बघ अस्सं."

बावळ्याने वरून सरळ उडी घेतली. ते पाहत असणाऱ्या फिलू आणि ऋजूजान दोघींच्या तोंडातून अस्फुट किंचाळी निघाली. दोघींनी बावरून एकमेकींकडे पाहिले. "आमी त्यांना वाचविंग काईंग करिंग होईंग." फिलू बोलली.

"होईंग. चलिंग. रथ चालू करिंग." ऋजूजानने सुकाणू कोटाच्या दिशेने फिरवले.

बावळ्याचा अंदाज चुकला होता. जोरदार वाऱ्याने त्यांना अचानक वर उचलले होते. मग खाली पाडले होते. आंब्याची फांदी त्यांना चुकली. कपडा त्याने दोन्ही हातांनी वर उचलला होता. लाकी तिच्या दोन्ही हातांनी त्याच्या गळ्याला घट्ट मिठी मारून धरून लटकत होती. वारा त्यांना फरफरवत होता. ते कोटाच्या बाहेर ढकलले गेले. वरती कापड फरकटू लागले. तसा त्यांचा खाली पडायचा वेग वाढत जाऊ लागला. पुढ्यात लाकी असल्याने बावळ्याला खालची काही कल्पना येत नव्हती. त्याचा श्वास थांबलेला होता. कापड टरकून उडून गेले. मरताना लाकी त्याच्या गळ्यात होती. या समाधानानिशी मरायला तो तयार झाला. पण पुढच्याच क्षणी त्याचे पाय जमिनीला टेकल्याची जाणीव त्याला झाली. ते जोडपे जमिनीवर आडवे झाले.

"ए! लाज वाटिंग न?" ऋजूजानचा आवाज बावळ्याच्या कानात शिरला. "रस्तात एकमेकांना मिठी मारिंग प्रेमांज चाळे करिंग?"

"सरकारदार तुमाला बघिंग नी पकडिंग आधी उठिंग. नी या पायरथात लपिंग. इंथ आत तुमाला हविंग ते करिंग." त्यांच्या अंगावर पायरथ घालत फिलू किंचाळली.

बावळ्याची पडल्या पडल्या उंच निळया स्वच्छ आकाशात नजर गेली. ते इतके सुंदर कधीच भासले नव्हते. "माझं समदं बेसच होतं हाय. माझा इश्वास पक्का झाला हाय."

## शंभर वर्षे पुढे - प्रकरण ३४

समुद्रावरून येणारा खारा वारा पुळणीवरील रेती उडवत होता. सकाळची कोवळी उन्हे आता वर चढून तीव्र बनलेली होती. तरी किनारा गजबजलेला होता. शहरातील सर्व थरांतील लोक तिथे जमलेले होते. खाश्यांसाठी एका बाजूला माडांच्या सावल्यांखाली कनाती उभारलेल्या होत्या. बसायला बैठका तक्के बिछायती मांडलेल्या होत्या. बाकी सामान्यजनांनी मऊ वाळूतच आसनमांड्या ठोकलेल्या होत्या. माडांच्या डोलणाऱ्या झाडांच्या रांगेत थोड्या थोड्या अंतरावर लाकडी खांबांचे टेहळणी मनोरे रचलेले होते. त्यांच्यावरुन सैनिक लोकांच्या हालचालींवर नजर ठेवून होते. तो किमान पाच हजार माणसांचा जमाव होता. अधिक त्यांना आवरायला हजार सैनिकांची भर.

मुंबईची रचना पुन्हा बेटाबेटांची बनलेली असल्याने, समुद्राच्या पाण्यापलीकडे दुसरे एक बेट दिसत होते. साध्या डोळ्यांनी तिथे वावरणाऱ्या माणसांचा अंदाज घेता यावा इतपत अंतरावर. समुद्रमार्गे होणाऱ्या लोकांच्या हालचालीवर नजर ठेवायला, पायहोड्यांमध्ये शस्त्रसज्ज सैनिक तिथे तैनात होते. सरकारी जाहीर कार्यक्रमाचा रागरंग यथास्थित रंगलेला होता.

गर्दीत लहान मुले अभावानेच दिसत होती. हा आनंदाचा जलसा नव्हता. लोकांचे चेहरे ताणलेले होते.

त्या गर्दीत प्रेक्षकांना पाणी पुरवायला आणि तोंडाला काम पुरवायला, भाजलेल्या व उकडलेल्या भुईमूगाच्या शेंगा विकणारे काही फेरिवाले वावरत होते. इथून तिथून फिरत होते. त्यातल्या तीन बायका आणि एक बाप्या एकमेकांकडे संपलेल्या व उरलेल्या पदार्थांची देवाणघेवाण करायला एकत्र आले. कुजबुजायला लागले. बावळ्या, लाकी, फिलू आणि ऋजूजान ही वेषांतरीत चौकडी होती ती.

एकाएकी गर्दीत उत्तेजनेची लहर फिरली. लोक बसत्याचे उभे होऊन पाहू लागले. पायरथांचा एक चिलखती ताफा किनाऱ्यावर उभारलेल्या उंच मंचाकडे येताना दिसला. मंचापाशी लाल कपडे नेसवलेल्या तीन कैद्यांना धक्के मारत सैनिकांनी रथांतून उतरवले. सगळ्यांना दिसतील असे मंचावर नेऊन उभे केले.

एक बडा अधिकारी त्यांच्या शेजारी उभा राहून कर्ण्यावरून कोकलू लागला. "महान महामहीमांज जय होईंग." लोकांनी रित पाळावी तसा जयजयकार केला.

"आमांज महान राष्ट्रांज जय होईंग." लोकांनी लागोपाठ तोहि जयजयकार केला.

"आमांज राष्ट्रासंग घोर विश्वासघात करिंग, ज्यांनी शत्रूंज हेरांज मदत करिंग होईंग, माहिती पुरविंग होईंग, ते तीन देशद्रोही होईंग हे. त्यांज जाहीर निवाडा करिंग, आमांज न्यायदात्री महान महामहीमांनं ही जाहीर सभा आमंत्रित करिंग होईंग. तरही या देशांज न्याय-कुशल जनता त्यांज योग्य तो न्याय निवाडा करिंग. काईंग तुमी हा निवाडा करिंग?"

लोक आपापसाकडे बघू लागले. तोच महान महामहीमाच्या गणंगांनी 'होईंग' म्हणून हाळी दिली. ताबडतोब बाकी सगळ्या लोकांना त्यांच्या सुरात सूर मिसळावा लागला. तसे अपेक्षापूर्तीच्या समाधानाने त्या अधिकाऱ्याने सगळ्याभर नजर फिरवली. "दोन दिस आधी शत्रूहेरांनी आमांज गुप्त शस्त्रतळांज स्फोट करिंग नाश करिंग होईंग. त्यात आमांज राष्ट्रांज कैक जवान नी शास्त्रज्ञ शहीद होईंग असिंग. सगळ्यांना विनंती होईंग की दोन पळांज मूक आदरांजली आमी त्यांना वाहिंग." त्या अधिकाऱ्याने इशारा करताच त्याप्रमाणे भेरी फुंकल्या गेल्या.

सर्व लोक स्तब्ध उभे राहिले. पुन्हा भेरी वाजवण्यात आल्या. तो रिवाज पार पडला. "त्या स्फोटात आमांज राष्ट्रांज शस्त्रसामर्थ्यांज मोठी हानी होईंग नी तूट होईंग असिंग. अश्या दुष्कर्मात सामील या देशघातक्यांना तुमी दंड देईंग की माफी?"

"दंड देईंग." "देहदंड देईंग." महान महामहीमाचे पित्ते ठरवल्याप्रमाणे ओरडले.

बडा अधिकारी पुन्हा बोलू लागला. "पण आधी त्यांज अपराध सिद्ध होईंग तरच. काईंग आमांज न्यायप्रिय महान महामहीमांज तंस्स सक्त आदेश होईंग. कोण निरपराध या देशात कंधी दंडित होईंग न. तर आता यांज अपराधांज साक्ष देईंग मान्यवर साक्षीदार धनवती, लालाजी नी धुरंधर यांज मी मंचावर लोकांज समोर बोलविंग."

"उंदराला मांजराची साक्श. हाय का नाय बिलामत?" बावळ्या आपल्या साथीदारणीनाच ऐकू जाईल इतक्या हळू बोलला.

"आमाला इंथ खेचिंग आणिंग त्यांनी आमांज आप्तांना आरोपी करिंग होईंग." दातओठ चावत ऋजूजान पुटपुटली. "मंज प्रिय राहिल. तो पाय असिंग न, तो नक्की फिलूंज नवरा मोलू होईंग. ती म्हातारी कोण असिंग? काईंग लाकी तुंज आई?"

"न. पण तिंजसमानच. मावशी. दिनामावशी." लाकीने जड आवंढा गिळत उत्तर दिले.

"लाकी बघ डाव्या बाजूला. समिंदराच्या कडेला तुझी आत्या आनी तिचा पोरगा आतीश उभं हायती." बावळ्याची नजर चौफेर

फिरत होती. "आनी उजव्या बाजूला तिथं लांब खालती मामा आनी मामली बी हायती. त्यांच्या अलीकडं ती ऋजूजानची कलाकार साथसांगाती हायत."

"नी मंज काळजाचा तुकडा मंज मुलगी टल्ली, मंचांज खालती मंज सासूंज संग असिंग. त्यांना मुद्दामईंग रझाकारांनी इंथ आणिंग होईंग." फिलूचा श्वास आवळलेला होता. "मंज फासिंग सापळा लाविंग कारणिंग."

"ऐकिंग गं. ती धनवती काईंग बोलिंग." ऋजूजानने त्यांचे लक्ष कण्र्यावरून कोकलणाऱ्या त्या कलापाकडे वेधायचा प्रयत्न केला.

"त्यात ऐकिंग अंस्स काईंग होईंग? सगळं खोटंईंगच." फिलू चिडली. बंडबागींनी तिच्या मदिरालयावर कसा हल्ला केला, तिला कसे पळवून नेलेले, तिथे हे तिन्ही आरोपी कसे हेरांसमवेत उपस्थित होते, त्याची कहाणी धनवतीने रंगवून सांगितली.

लालाजीने बंडबागींच्या आकाशगंगेवरील हल्ल्याच्या कहाणीला दुजोरा दिला. ऋजूजान ही सगळ्यांची आवडती नटीसुद्धा शत्रूंना सामील आहे, हे ऐकून जमावातून दुखद खेदाचे उद्गार निघाले. ऋजूजानची एकेकाळची जीवाभावाची मैत्रिण असण्याचा दावा करणाऱ्या, रत्नांगी या नटीने धनवतीच्या सांगण्याला दुजोरा देणारी साक्ष दिली.

मग पाळी आली राजकारणी धुरंधराच्या साक्षीची. भुलथापा देण्यात त्याच्यापेक्षा कोण जास्त सक्षम असू शकत होतं? त्याला सुद्धा या हेरांनी गुप्ततळाचा माग लावण्यासाठी पळवून नेले होते. कुठून ते सांगण्याचे कष्ट त्याने घेतले नाहीत. 'मी मरिंग तरही बेहत्तर, पण मंज देशाशी कंधी गद्दारी करिंग न.' असे बाणेदार उत्तर त्याने दिले होते म्हणाला. त्या बंडबागींच्या अड्ड्यावर त्याचा बराच छळ करण्यात आलेला. तो बहादुरीने त्या सगळ्याला पुरून उरला होता. तिथे हे तिन्ही आरोपी शत्रूहेरांच्या खांद्याला खांदा लावून वावरत होते. "मंजवर विश्वास होईंग न, तर या म्हातारींज नवऱ्याला विचारिंग." असे म्हणाला.

तसा मंचावर तो 'नवरा' आळंबिल साक्षीला अवतरला.

"आळंबिल? मंज मावसा सुदहा यांना सामील होईंग?" लाकी चकीत झाली. "जगात प्रेम, लगीन, संसार काईंग सगळं खोटईंगच होईंग?"

"एका मानसावरून समद्यांना मोजू नगं." बावळ्याला झोंबले.

"मंज काईंग दुख होईंग, ते मी काईंग सांगिंग?" मावश्याचा गदगदलेला आवाज खोटा वाटत नव्हता. "मंज बायको ही दिना मंज संग खोटं वागिंग. मंज पायरथ, पायडुबी बंडबागींना पळिंग जाईंग पुरविंग. त्याच बंडबागीनं मंग देश बुडविंग शत्रूहेरांज साथ

देईंग, आमांज घात करिंग होईंग. दिना तू मंज संग अंस्स काईंग करिंग? काईंग तुंज ठाविंग होईंग न, ते देशद्रोही होईंग?" असा संशयाचा फायदा देणारा प्रश्न मावश्याने उपस्थित करताच, अधिकाऱ्यानं त्याला बखोट धरून कर्ण्यापासून बाजूला ढकलला.

"कोन हाय तो टकल्या जाड्या अधिकारी?" बावळ्याने विचारले.

"मंडलेश्वर सेनगुप्त." ऋजूजानने उत्तर पुरवले. बावळ्याच्या तोंडून नकळत शिट्टी वाजली. हा आवाज त्याने ओळखायला हवा होता. याच्याशी तो दूरसंपर्काने बोलला जो होता.

मंडलेश्वर सेनगुप्ताने कर्ण्याचा ताबा पुन्हा स्वतःकडे घेऊन लोकांना आवाहन केले. "लोक हो, तुमी यांज विरोधी साक्षी ऐकिंग. तुमांज निवाडा काईंग होईंग? काईंग तुमांज वाटिंग न की या देशद्रोह्यांना मरणांज शिक्षा देईंग होईंग? तरच पुनहा कोण तंस्स दुस्साहस करिंग धजिंग न. पण यांज बाजूईंग कोणाला साक्ष देईंग होईंग, तर त्यांज मंच खुला असिंग. त्यांनी इंथ येईंग सर्व लोकांसमोर त्यांज म्हणणं सांगिंग. आमी अर्ध्या घटिकेंज मुदत त्यासाठी देईंग." त्याच्या इशाऱ्यावर अवधी सुरू करणाऱ्या भेरी वाजल्या.

"जर तंस्स कोण साक्ष पुढं येईंग न, तर या देशद्रोह्यांज आरोप खरेईंग मानिंग त्यांना मरणांज शिक्षा जाहीर करिंग. लोक हो, अंस्स

देशद्रोहाला देशांज सगळ्या लोकांनी मिळून शिक्षा देईंग होईंग. त्यासाठी यांना पोत्यात घालून ती पोती मंचावर ठेविंग जाईंग. इंथ उपस्थित हर एक माणसानं त्यांना दगड मारिंग, आपला जिवंत देशाभिमान सिद्ध करिंग होईंग. हा महान महामहीमांज आदेश होईंग."

"तुमी मंज सांगिंग होईंग की केवळिंग लाकीला पकडिंग सापळा, म्हणहून हा कार्यक्रम असिंग. दिनाला केवळिंग पैशांज दंड भरिंग सोडिंग." मावसा तिरमिरून मंचावरच विचारता झाला. "मरणांज तर काईंगच विषय होईंग न? कोण तेहवा मंज सांगिंग न? मी मंज साक्ष पुरी करिंग असिंग न. मी लोकांज खरेईंग सांगिंग." तो कण्र्याजवळ गेला.

त्याला सेनगुप्ताने पुन्हा बाजूला ढकलून दिला. त्याच्या इशाऱ्यावर दोन रझाकार मंचावर चढून मावश्याला ओढून घेऊन गेले. सेनगुप्त आता मंचावरुन कण्र्यातून शत्रूराष्ट्रात आक्रमणाची किती जोरदार तयारी चालू आहे, त्याचे बखान कोकलू लागला.

लोक फार अस्वस्थ झालेले होते. मंचामागे खाशांच्या कनातीत पन्नाशेट बसला होता. तो तिथून उठून मंचापाशी आला. "ही अंस्स क्रूर मरणदंडाची रित या देशात कंधी कोण वापरिंग न.

हविंग तर त्यांज शिरच्छेद करिंग. फाशी देईंग. पण अंस्स रानटी रित काईंग वापरिंग होईंग?" पन्नाशेठने सेनगुप्तला ललकारले.

ताबडतोब त्याच्या खांद्यावर एक जड हात पडला. वळून पाहिले तो राखाल होता. पन्नाशेटच्या जीवाचे भयाने पाणी पाणी झाले.

"महान महामहीमा जे करिंग त्याला प्रतिजाप करिंग? काईंग तू सवताहांज तिंज परीस ज्यादा हुषार समजिंग?" राखालने दरडावले. "ती शत्रूहेर छमद तेहवा तुंज आश्रयाला होईंग. काईंग म्हणहून तुंज नाव सुदहा आरोपींज नावात जोडिंग न?"

"न. मी अंस्स काईंग म्हणहींग न. तुंज काईंग गैरसमज होईंग." पन्नाशेठने थरथरत्या हातांनी राखालचा हात बाजूला करत आपली सुटका करुन घेतली. "मंज काईंग जरूरी काम आठविंग. मंज घरी जाईंग होईंग."

राखालने पन्नाशेटचा हात ओढून त्याला परत रोखले. "न. तू नीट ऐकिंग होईंग न. महान महामहीमांज आदेश होईंग की हर एक देशवासियानं दगड मारिंगच होईंग. तरच तो खरा देशभक्त होईंग."

पन्नाशेठला दरदरून घाम सुटला. त्याने आजूबाजूला पाठिंब्यासाठी नजर फिरवली. सगळ्या लोकांनी ती चुकवली. त्याला दिसले की त्याच्यासारखे जे लोक तिथून निघून जायचा

प्रयत्न करत होते, त्यांना किनाऱ्याच्या रस्त्याकडील बाजूला असणाऱ्या सैनिकांनी अडवलेले होते. परत मागे पाठवत होते. "जाईंग. तुंज जागेवर परत बसिंग. निवाडा होईंग पावतो." राखालने दम भरला. अचानक तो नाकात जोरजोरात श्वास ओढून घेत हुंगू लागला. "मंज वास येईंग. तो इंथ असिंग."

"कोण?" पन्नाशेठने घाबरुन विचारले.

"शंभर वर्षे आधींज माणूस." पन्नाशेटचा नाद सोडून राखाल घाईघाईने मंच सोडून गेला. सुटकेचा निश्वास सोडून जड पायांनी पन्नाशेट कनातीवाल्या जागेवर परतला.

"शंभर वर्षे आधींज माणूस?" बावळ्याचे हातकोपर ओढत एक अद्ययावत ढंगदार पोषाख घातलेला माणूस उत्साहाने विचारू लागला.

बावळ्या आधी भ्याला. मग खुशालला. "महामहीमाच्या इरोधात आवाज लावायची हिंमत करनारा मानूस? मी काय बा भ्यालो. इतकं सोंग रंगवून बी उगडं पडलं का काय? तुजं सोंग लय झॅक घेतलं हाय तू, गनाजाबा."

"मी तुंज आवाजाईंग तुला ओळखिंग." गनाजाबाने खुलासा केला. तशा बावळ्याच्या साथीदार बायका बावळ्याकडे भिवया वाकड्या उंच करून बघायला लागल्या.

बावळ्याने ओशाळे होत मानेवरुन हात फिरवला. "काय की," त्याने जीभ चावली. "मी इतक्या मोठ्यानं बोलतो हाय का? मी बी तुला आवाजावरून वळखला की." टाळी घ्यायला त्याने हात पुढे केला.

गनाजाबाने त्यावर टाळी मारण्याआधीच लाकीने बावळ्याचा हात रागाने खाली दाबला. "तू नेहमींज बावळट चुका करिंग, तुंज नाव सार्थ करिंग न, बावळ्या."

"तर काईंग!" फिलूने तिची रि ओढली. "रझाकार गुप्तवेशात आजूबाजूला वावरिंग असिंग. एकमेकांज नावं कंस्सच तोंडातून काढिंग न."

"ए, जाबाना?" ऋजूजानने पुकारल्यावर बावचळून गनाजाबा आसपास त्या नावाचे कोण आहे? शोधू लागला. त्याचा हात धरून तिने फटकारले. "खुळचुक्या तुंज आमी हे नाव देईंग असिंग."

"कंधी?"

"आताच. आवडिंग?"

"होईंग." ओठ मुडपत त्यावर विचार करत गनाजाबा बोलला. पण त्याच्या चेहऱ्यावरचा भाव उलटे सांगत होता.

"चलिंग. मंज मामाला भेटिंग होईंग." लाकीने बावळ्याला हात धरून खेचला. "तुमी बाकी आसपास इंथ तिंथ फिरिंग त्यांजपाशी लवकर पोचिंग. टेहळ्यांज संशय येईंग न."

"पण मंज मामा ठाविंग न." जाबाना फुरगंटला.

"मी तर ठाविंग होईंग न?" लाकी डाफरली. "मी ज्यांज जवळ होईंग, त्यांजपाशी येईंग." तरातरा बावळ्याला हक्काच्या माणसाला ओढून न्यावे तसे ओढत घेऊन गेली.

"काईंग ती त्यांज बायल होईंग?" जाबानाचे डोळे गुपित समजलेल्या माणसाप्रमाणे चकाकले. ऋजूजान आणि फिलूने एकमेकींकडे बघत त्याची किंव करत डोकी हलवली.

"अयायाईंग! जेहवा तुंज लगीन जाईंग, तेहवाच तुला ते काईंग ते समजिंग. चलिंग." ऋजूजानने जाबानाला निरोप दिला. फिलू विरुद्ध दिशेला रवाना झाली. गनाजाबा उर्फ जाबाना थोडा घुटमळला आणि बावळ्या लाकीच्या मागावर गेला.

त्यांच्या या हालचाली तितक्याश्या संशयास्पद वाटण्याजोग्या नव्हत्या. अनेक लोक एकमेकांच्या जवळिकीतील लोकांना भेटत फिरत होते. बहुतेक सगळे लोक दगड फेकून माणूस मारायच्या क्रूर आदेशाने बिथरलेले होते. एकमेकांकडे दबलेल्या आवाजात नाराजी व्यक्त करत होते. आपली सुटका तिथून कशी करून घेता

येईल? याचा एकमेकांशी उहापोह करत होते. लाकी आणि बावळ्याला मामापर्यंतच्या वाटेत त्यांच्या जवळून जाताना ती दबकी वाक्ये ऐकू येत होती.

"पण त्या दिग्गीराजांज माणसांना जरब बसिंग, अंस्स घोर करिंगच होईंग."

"त्या देशात तर आमांज माणसांज या परीस भयानक मरण देईंग असिंग."

"पण मी कंधी कुत्र्याला सुदहा दगड मारिंग होईंग न."

"जर माणूस कुत्र्याईंग हीन होईंग, तर त्यांज विचार काईंग करिंग होईंग? काईंग दिग्गीराजा आमांज इंथ राज्य हिसकाविंग, या परीस भयानक मरण देईंग न?"

"ते आमांज संग वागिंग, त्यापरीस आमी त्यांज संग वाईट वागिंगच होईंग. दिग्गीराजाला धडा शिकविंगच होईंग. ढेकळांज उत्तर दगडानं."

बावळ्याचा गर्दीत धक्का लागून एक बांड तरूण ढकलला गेला. तो रागाने बावळ्याची गचांडी धरू लागला. "आरं गब्रू? मी हाय की मुकेश?"

गब्रूच्या बारीक झालेल्या डोळ्यात ओळख पटेना. तसा गब्रूचा हात चंद्रांगीने खाली खेचला. "काईंग तू याला ओळखिंग

न? हा आमांज उपकारकर्ता असिंग. आमाला तुरूंगातून सोडविंग." बावळ्याला विचारू लागली. "मुकेश? बरोबर असिंग ना?"

"व्हय." बावळ्या सुटलेली मान चोळत उसासला.

"चंद्रांगी?" लाकीने तिला दोन्ही खांदे धरून आपल्याकडे वळवले. तिच्या डोळ्यात डोळे लावून आशेने विचारती झाली. "काईंग तू उपकारांज परतफेड करिंग शकिंग? मंज मावशीला वाचविंग? लालाजीनं तिंज विरोधात साक्ष देईंग असिंग. काईंग तू तुंज बापाला साक्ष मागेईंग घेईंग समजाविंग?"

"आमी सांगिंग तर?" गब्रू हसायला लागला. "तर लालाजी दुप्पट जोरानं तिंज विरोधात जाईंग." त्याने लाकीला वेड्यात काढले.

"मंग झालं की." बावळ्याने उतावळेपणाने सुचवले. "तुमी लालाजीला मावशीच्या इरोधात साक्ष तश्शीच तश्शी ठेवायला सांगा की?"

तसे आता गब्रू तरूणाने बावळ्याचे दोन्ही खांदे धरून त्याच्या डोळ्यात डोळे लावले. "आमांज कळिंग काईंग न? की हे सगळं खोटं असिंग? हा अन्याय असिंग? पण पाण्यात राहिंग मगरीसंग वैर कोण घेईंग?" मग त्याचे डोळे कावरेबावरे आजूबाजूला फिरले. कोणाचे त्यांच्याकडे लक्ष नाही. याची खात्री करते झाले.

"आमी तिंज नावं ठेविंग. इतकंईंग जर कोण तिंजपाशी आमांज चुगली करिंग, तर ती दुष्टा..." त्याचे डोळे परत अवतीभोवती भिरभिरले. "आमाला ठार मारिंग. नी इंथ तिंज कोण सामील चुगलखोर होईंग? ते सांगिंग कठीण. तुंज बंधू, तुंज काका, तुंज शेजारी... कोण पण असिंग शकिंग तो."

"तुझा भाऊच?" बावळ्याने त्याच्या डोळ्यातले डोळे न हटवता रोखून त्यात पाहत विचारले. तशी गब्रूची नजर शरमून खाली गेली.

"इथं कोणाला कोणांज भरवसा उरिंग न." चंद्रांगी काकुळतीने म्हणाली. "कोण कोणापाशी एकांतात सुदहा सरकार विरोध मोकळेपणानं उघड करिंग शकिंग न. आमाला तू सगळ्यांईंग समोर तंस्स करिंग सांगिंग न. आमांज जीव तुमीच तेहवा राखिंग होईंग. आता ते घेईंग न."

उत्तरात लाकीने चंद्रांगीचा हात हाताने थोपटला. निराश मनाने पण समजूतदारपणे काही न बोलता ती पुढे चालू पडली. तिच्यामागे बावळ्या. त्याच्यामागे गुपचुप पाठ फिरवून ऐकत असलेला जाबाना. त्याच्यामागे....

थोडे पुढे जाता बादामी त्यांना घासून गेला. त्याने ओळखले नाही. त्यांनी देखील त्याला ओळख दिली नाही. पण नजर फिरवून

पाहता त्याचा गुरू चूडामणी जवळ उभा दिसताच लाकी त्याच्याकडे धावली. "महान युगनायकांज पुजाऱ्याला मंज नमस्कार. मी लाकी असिंग. मीनाआत्येकडे आमांज भेट पूर्वी होईंग असिंग." आधी चूडामणीचे डोळे हे मोठे झाले. मग बारीक होऊन त्यांनी आजूबाजूला एक चोरटी नजर टाकली. कोणी बघत नाही याची खात्री केली. बावळ्यावर एकदा फिरवली.

"हा तुंज नवरा बाहुला?" अंदाज लावला. लाकीने ओठ मुडपून नाईलाजाने मानेने होकार व्यक्त केला. तसा बाहुलाचा चेहरा लख्ख उजळला. "बाई तू फार हिंमतवान असिंग, जी मंज सरळ तुंज खरी ओळख देईंग होईंग. जर मी तुला सरकारदारांज हवाली करिंग तर नक्की मंजवर ते खूप मेहरबान होईंग."

"पण तू तंस्स करिंग शकिंग न." लाकी दृढपणाने बोलली. "कारणिंग तुला न्याय-अन्यायांज खरी ओळख होईंग. तुंज देवता महान युगनायकांज शप्पथ. ते तिनहि आरोपी निर्दोष असिंग. हे तू जाणिंग. तू त्यांज बाजूनं साक्ष देईंग. त्यांना सोडविंग. मंग मंज हविंग ते करिंग. मंज सरकारदारी सोपविंग."

चूडामणीने दुखी भावनेने डोळे घट्ट मिटून घेतले. तो डोळे उघडेना. काही बोलेना. "समदी अशीच डोळ्यावर कातडं वढून आनी तोंडाला शिवन मारून गप हायती. म्हनूनच त्या महामहीमाचं

फावलं हाय. आनी चालतं हाय." बावळ्याने हिणवले. ती मात्रा लागू पडली.

चूडामणीने डोळे उघडले आणि तोंड सुद्धा, "तू मंज शिकविंग न. मी यावर खूप आधीपासून विचार करिंग असिंग. महामहीमांज सत्ताउतार करिंग, काईंग सोप्पा सहज मार्ग लोकांना देईंग होईंग. बंडबागींज लढाईंज मार्ग खूप थोड्या लोकांना जमिंग शकिंग. दुबळ्या लोकांना जमिंग अंस्स काईंग नवीन मार्ग त्यांना देईंग होईंग."

"मोर्चा नी निदर्शन?" लाकीने सुचवले.

"त्यासाठी एकत्र येईंग, त्यांना आधी एकमेकांज विश्वास तर हविंग नाईंग?" चूडामणीच्या या प्रश्नाचे उत्तर गब्रूने नुक्तेच दिले होते.

"उपोषण नी ठिय्या?"लाकीने अजून काही सुचवले.

"त्यासाठी हिंमत हविंग. ती सामान्य माणसाकडं कुंठ?" चूडामणीने उडवून लावले. "ती जर त्यांजपाशी असिंग होईंग, तर ही माणसं आत्ता इंथच उठाव करिंग नाईंग होईंग?" त्याने सभोवार सगळ्यांकडे निर्देश करत हात फिरवले.

लाकीला त्याउप्पर काही नवीन मार्ग सुचेना. ती निराश व मूक होऊन पुढे चालू पडली. तिच्यामागे बावळ्या. बावळ्यामागे जाबाना. लाकी मामाकडे पोहोचली. ती सरळ त्याच्या गळ्यात

मिठी मारून पडली. "मामा काईंग तरी करिंग. मावशीला सोडविंग."

"नवर्तना?" मामलीने आवाज ओळखला. भयाने आसपास पाहू लागली. कोणाचे लक्ष नाही. लक्षात आल्यावर तिला हायसे झाले. "तू काईंग इंथ येईंग? हा तुंज साठीच सापळा असिंग."

"म्हणहूनच मी येईंग असिंग. जर मी तिला वाचविंग शकिंग न, तर तिंज संग मरिंग तर शकिंग." लाकिने आपला निर्धार बोलून दाखवला. "पण मामा काईंग तू तिंज बाजूनं साक्षीला उभा राहिंग? मंग सरकारदार ते सिद्ध करिंग शकिंग न."

"ते त्यांना हविंग ते सिद्ध करिंग शकिंग. जर सिद्ध करिंग शकिंग न, तर धुडकाविंग." मामली वाद घालू लागली. "या आधी जितक्याईंगानं तंस्स प्रयत्न करिंग होईंग, तेहवा तेहवा सरकारदारेन तितक्याईंगांज संग तेच करिंग होईंग. तुंज आईबाबांज संग काईंग होईंग ते तू विसरिंग? जर आमाला जिंकिंग खात्री न, उलटईंग हारिंग पक्की खात्री होईंग, तर आमी ही लढाई काईंग म्हणान खेळिंग होईंग? आमांज जीव नाहक गमाविंग होईंग?"

"मामा?" असहाय्यतेने लाकीच्या डोळयातून पाणी खळू लागले. मामा तिला गळयाशी घेऊन थोपटू लागला.

"नवर्तने, तुला जर मी मंचावर जाईंग नी सरकारदारेन विरोधी बोलिंग हविंग, तर मी जाईंग. मी बोलिंग." मामा गदगदत बोलला. "मंज आता थोडेच दिस बाकी होईंग. मरणांज फिकीर असिंग न. चलिंग." मामा लाकीला बगलेत घेऊन निघू पडताच, मामली त्याच्या गळयात पडली.

"बाबा, मंज तू हविंग असिंग." मामली सुद्धा डोळयातून टिपे गाळू लागली. तिने मामाची वाट अडवली.

"लाकी, तू मावशीची फिकीर करायची काय गरज नाय हाय. पुढचं कोन सांगू शकत नाय. ती जगंल बी. मरनच असंल तर मरंल बी. तिच्या वाट्याला जे काय हाय, ते बाकी कोन थांबवू शकनार नाय हाय." बावळयाने लाकीच्या दंडाला धरून तिला आपल्याकडे खेचले.

त्यावेळी ऋजूजान आणि फिलू तिथे येऊन पोहोचल्या. शिष्टाचार पाळत लाकीने मामाला व मामलीला त्यांची ओळख करुन दिली. बावळया तिला आळवू लागला. "जगाचा इचार सोड लाकी. जग पयलं बी इतकंच वंगाळ होतं. इतकंच भलं बी होतं. शंभर वर्स आधीच्या काळात आनी आताच्या काळात मला कायच फरक दिसत नाय हाय. कुठच्याच काळात मानसांच्या जगन्यात

काय बी फरक नसतो हाय. रे जाबाना, तू ऐकलं हाय ना, मंगाशी तो महान युगनायकाचा पुजारी काय पीटपीट करत होता?"

लगत दडलेला पाठमोरा गनाजाबा आश्चर्यचकीत होऊन सर्वांना सन्मुख झाला. "तुला माहीतिंग होईंग की मी तुंज मागाईंग येईंग?" बावळ्याने मामाला त्याची व त्याला मामाची ओळख द्यायचा शिष्टाचार निभावला.

"तो महान युगनायकाचा पुजारी कितीतरी वर्स महामहीमासारख्या माजोरड्यांना हरवायचा नवा उपाय शोधतो हाय. तो त्याला कंदी बी गावायचा नाय. बऱ्या आनी वायट मानसांची ही लढाई हर एक जमान्यात अश्शीच चालू हाय. चालनार हाय. तेवा त्याचं उपाय बी तेच जुनं, तेच तस्संच असनार हाय. जे तेवा कामाला आलं तेच समदं. जाबाना, तुला तर इतिहास मायती हाय की समदा. तूच बेस सांगू शकतो की काय काय करायला पायजेल?"

"म्हणहजे, महान युगनायकांनी करिंग होईंग तेच उपाय, आमी सुदहा करिंग होईंग?" गनाजाबा विचार करू लागला.

"हां!" बावळ्याने होकार दिला. "मी काय त्यांना बघितलं नाय हाय. पन माझ्या बी आधी जुन्या काळात शिवाजी नावाच्या राजानं काय काय कस्सं कस्सं केलं? ते मला ठावं हाय. माझ्या आयेनं मला

तेच्या गोष्टी सांगितल्या हायत. माझ्या जमान्यात मला त्यातलं काय बी करायला जमलं नाय. सुचलं बी नाय. भल्या मानसांनी लढायची हिंमत केली की ते साधतं."

"मंग तू लाकीला मावशींज विचार सोडिंग, नी केवळ सवताहांज विचार करिंग काईंग सांगिंग?" मामली बुचकळ्यात पडलेली.

"तूच बोलली हाय की मंगाशी. आतापावतो महामहीमाशी बंडबागींनी आनी कुनी कुनी लढाई केली. ते समदं हारलं. आये म्हनायची की हा बऱ्याची आनी बुऱ्याची भरती ओहोटीचा खेळ हाय. जोवर बुऱ्याची भरती हाय. महामहीमाची जीत हाय. जोवर बऱ्याची भरती चालू होत नाय, तोवर आमी वाट बघली पायजेल." बावळ्याने आपल्या सगळ्या श्रोत्यांवरुन एक नजर फिरवली.

लाकी आणि मामली कंटाळलेल्या दिसल्या. कदाचित त्यांना तो काय म्हणतो आहे? लक्षात येत नव्हते. बाकी सगळे कान टवकारून ऐकत होते.

"आमी जगाची फिकीर करायची काय बी गरज नाय हाय. जग आपली काळजी आपनच घेतं की. आमी काय बी केलं आनी काय बी केलं नाय, तरी बी जग त्याच्या जागेवर असनारच हाय. तेवा आमी आपली काळजी घेतली तर तितकं पुरं झालं की." बावळ्या

लाकीकडे वळला. "म्हनून तुला सांगतो हाय. चल आमी इथनं कुठं दूर दूर जावू. मामाच्या डोंगरदरीवाल्या गावाला जावू. तिथं आमचा प्रेमाचा संसार थाटू. आमची कच्ची-बच्ची असतील. काय तू अस्सं सपान कंदी बघितलं नाय हाय?"

लाकी त्याच्या या सर्वांसमोर उघड मागणीने धक्का बसून अवाक होती. मग तिच्या डोक्यात आणि डोळ्यात प्रचंड राग साकळून आला. "मी तुला कंधी सांगिंग की मंज प्रेम तुंजवर असिंग? ते कंधी आता शक्यहि होईंग न. इतक्याईंग स्वार्थी माणसांज संग मंज कंस्सच कबूलिंग न. मंज जीव वाचविंग त्या मावशीला मरिंग सोडिंग, मी कंस्सच कोणासंग प्रेमांज कवतिकं रचिंग शकिंग न. जर तू तंस्स विचार करिंग असिंग, तर तो वाईटांज कळस असिंग. तुला सवताहांज कोण मायेंज माणूस जगात असिंग न. तू काईंग जाणिंग प्रेम नी माया काईंग होईंग? गटारात वाढिंग किडा तू... रस्त्यांज उकिरडा तू....जाईंग दूर तुला हविंग तिंथ...लवकर मंज नजरे समोरईंग दूर होईंग.. जाईंग...." बोलता बोलता लाकी उभी खाली गुडघ्यांवर कोसळली. हमसून हमसून रडायला लागली.

मामा लाकीच्या जवळ बसता झाला. तिला थोपटून शांत करू लागला. फिलू आणि ऋजूजानची नजरानजर झाली. त्या दोघींनी

एकमेकींशी खाणाखुणी केली. फिलू लाकीच्या बाजूला बसली. ऋजूजानने बावळ्याला हाताला धरून तिथून ओढून बाजूला नेले.

मामली बावळ्या गेला त्या दिशेला रागारागाने पाहत राहिली.

गनाजाबा तो सगळा तमाशा बघून बावरून गेला. आधीच मंचावर आणि सभेत होत होता, तो सगळा तमाशा काय कमी होता? माणसे आणखी प्रेमाचे तमाशे करण्यात मश्गूल होती! "तो मुकेश गेलाईंग. तर तू आता काईंग रडिंग?" जाबानाने आपला गोंधळ उघड केला. "तुंज जर प्रेम त्यांजवर असिंग न, तर तो गेल्याईंग काईंग रडिंग होईंग?"

यावर लाकीला अजून रडायचा उमाळा फुटला.

"न. मंज पोरी न." तिचे अश्रू हातांनी पुसत मामा म्हणाला. "मी तुला जन्म देईंग न. पण लहानपणाईंग मोठी वाढविंग होईंग. काईंग मी तुंज मन जाणिंग न? मंज मनाला कितीईंग आनंद असिंग की तुला प्रेम होईंग. संसारांज स्वप्न तुंज मनात जागिंग असिंग. सूडांज प्रवास सोडिंग, परत घरा-गावात माणसांत परतिंग भावना तुंज मनात जागिंग असिंग. जाईंग पोरी जाईंग त्यांज संग. तो काईंग चुकींज बोलिंग न. तुंज आयुष्य आता तर सुरूईंग होईंग असिंग. तू ते पुरेपूर भरभरून जगिंग. आमांज गावात तिंथ जंगलात तुमाला कोण शोधिंग शकिंग न. मंज नातवंडे वाढविंग."

"मामा." लाकीने मामाला घट्ट मिठी मारली. "पण मावशी?" ती पुन्हा रडू लागली.

गनाजाबाच्या चेहऱ्यावर मोठे कोडे होते. "जर तुंज त्यांजवर प्रेम होईंग, तर तू  नाकारिंग काईंग?"

"आमांज कर्तव्यांज भावना, सुखांज इच्छेईंग बलियासी होईंग. या कारणिंग." फिलूने उत्तर दिले. सरसावली, "नवर्तना, आमा सगळयांजच मनात मुला-बाळांज संग हसत खेळत इतर जणांसमान जगिंग इच्छा होईंग. ती बघिंग मंज टल्ली." फिलूचे डोळे मंचाजवळ उभ्या आपल्या मुलीला दुरून न्याहाळताना खळू लागले. तिचा आवाज जड झाला. "पण आमांज मनात अन्यायांज चीडहि होईंग. बुऱ्यांज जोडीनं त्यांजमधील एक होईंग, आमी जगिंग शकिंग न. ही बुऱ्यांज संग लढाई आमांज जीवनात तितकेईंगच महत्वांज अंग होईंग. ते नाकारिंगहि आमी जगिंग शकिंग न. आता यात आमी काईंग निवडिंग? कंस्स निवडिंग?"

गनाजाबाचा गोंधळ संपला. त्याचे डोळे सुद्धा खळायला लागले. त्याने नजर उचलून बाजूला नेलेल्या बावळयाला शोधले. बावळया व ऋजूजान दूर उभे होते.

"बावळ्या, मंज राजा तू त्या लाकीवर इतकं प्रेम का करतोस? काय कारण ते मला सांगू शकतोस का?" ऋजूजानने हलक्या आवाजात त्याला विचारले. त्याच्या काळाच्या भाषेत.

"पिरेमाला बा काय कारन असतं? बस्स! ते होतं की? जिथं व्हायला नगं, तिथंच होतं की. पिरेमाची रित लय उफराटी असती. नाय?" बावळ्याचा स्वर खूप दुखावलेला होता.

"ती सुंदर आहे म्हणून का तुला आवडते?" ऋजूजानच्या प्रश्नावर बावळ्या उगी राहिला. "मी तिच्यापेक्षा जास्त सुंदर आहे. आहे ना?"

बावळ्याने मान खाली घालून होकारार्थी हलवली.

"मग मी जास्त आवडायला हवी. आवडते का जास्त?" बावळ्या मान खाली घालूनच होता. तिने त्याची हनुवटी धरून वर आपल्या चेहऱ्याकडे वळवली. त्याच्या नजरेत थेट नजर लावली. त्याने फिरवायचा प्रयत्न केला. "अंह! नजर नको चोरूस. सांग. मी जास्त आवडते की लाकी?"

त्याच्या ओठांच्या हालचाली झाल्या. पण त्यातून आवाज उमटला नाही.

"लाकी?" त्याच्या पापण्या सूचक झुकल्या. "ती तुला जास्त आवडते. कारण तुला मनातून जे हवं आहे, त्याचसाठी ती धडपडते. जे तू स्वताशी कबूल करायला तयार नाही आहेस."

बावळ्याची नजर एकदम वर उचलली जाऊन ऋजूजानच्या नजरेत तिचा थांग शोधू लागली. "तू काय म्हनती हाय? मला काय बी समजलं नाय. मला काय हवं? लहानपनापास्नं मला सुख काय ते मायतीच नाय हाय. मी सुखाच्या संसाराचं सपान बघनं काय चूक हाय? समदी बघतात. तर ती त्याला पाप काय बा समजती? मला किडा-उकिरडा काय बा म्हनती? काय कबूल करायला पायजेल हाय मी?"

"लहानपणापासून तू अन्यायी अत्याचारी लोकांच्या जगात वाढलास. तू तुझ्यापरीने लढायचा जितका म्हणून प्रयत्न केलास, त्यात दर वेळी तुला हार मिळाली. ना तू तुझ्या बहिणीला वाचवू शकलास. ना आईला." ऋजूजान हळुवारपणे त्याला समजावत होती. "तो धक्का इतका मोठा होता की मग तू तसा प्रयत्न करायचंच सोडून दिलंस. स्वतःला चोरा-ठगांच्या जगात झोकून दिलंस. त्यांच्यातलाच एक बनून स्वतःला जिवंत ठेवायचा प्रयत्न करायला लागलास. वाईटाच्या जगात वाईट बनूनच राहता येतं. असं स्वतःशी पक्कं करून." ती उसासली. "मी बोलले ते बरोबर?"

बावळ्याने बैलासारखी मान हलवली.

"आणि मग तुला इतक्या वर्षांनं लाकी भेटली. जगातल्या अत्याचाऱ्यांवर तुटून पडणारी. हार न मानता जगातला अन्याय संपवण्यासाठी सतत झटत राहणारी. जे तुला करावसं वाटत होतं. पण शक्य होत नव्हतं. ते सगळं सगळं करणारी. वाईटांबरोबर त्यांच्यातलं एक बनून न राहता, त्यांच्याशी पंगा घेऊन जगणारी. असं पण जगता येतं? तुला हा आयुष्यात पुन्हा मोठा धक्का होता. हो ना?"

बावळ्या डोळे विस्फारून ऋजूजानकडे बघत राहिला. जे त्याचे त्याला सुद्धा माहीत नव्हते. ते त्याच्या मनाचे पदर ती त्याला उलगडून दाखवत होती.

"तुझ्या मनात इतकी वर्ष जे करायची अगदी आत खोल आस होती, ते ते लाकीच्या जोडीने तुला करता आलं. म्हणून तुला लाकीची आस आहे. तिचं इतकं अप्रूप आहे. प्रेम आहे. तू इथं अत्याचाऱ्यांचा विरोध करत लढलास. मला त्यांच्या तावडीतून सोडवलंस. फिलूला सोडवलंस. आयुष्यात पहिल्यांदा तुला बुऱ्यांच्या विरोधात यश मिळालं. असं वाईटांच्या विरोधातलं यश तू पूर्वी कधी स्वप्नात सुद्धा बघू शकत नव्हतास. ते तू लाकीच्या जोडीने प्रत्यक्ष्य जगलास." ऋजूजान बावळ्याच्या इतक्या जवळ

होती की तिच्या श्वासाचा सुगंध त्याच्या श्वासात मिसळत होता. तिच्या अंगाची मुलायमता त्याला स्पर्शत होती. तिच्या या जवळीकीमुळे, त्याच्यावरच्या विश्वासाने तो भारावून गेला होता.

ऋजूजानने शेवटचा तीर अचूक सोडला. "जर लाकी ही लढाई सोडून सरळ तुझ्या बरोबर दूर कुठं पळून जायला तयार झाली, तर तुला ते पचणार नाही आहे. मनातून पटणार नाही आहे. स्वतःच्या आत नीट बघ. तू खरंच ही भल्या नी बुऱ्याची लढाई सोडून जाऊ शकतोस का? मग ती लढाई कायम तुझ्या मनात चालू राहिल. हर क्षणी तुला आतल्या आत जाळत राहिल. त्याला तू तयार आहेस का?"

बावळ्याचे डोळे आभाळात गेले. ती लढाई आता या क्षणी सुद्धा त्याच्या डोक्यात त्याचे मन जाळत चालू होती. भल्याची साथ सोडून न लढता पळून जायचे की बुऱ्याशी लढून मरायचे?

"तेव्हा आता वेळ आली आहे, तू खरा जसा आत आहेस तसा स्वतःचा स्वीकार करायची. तुला सुद्धा लाकीइतकीच अन्यायाची चीड आहे. अत्याचाऱ्यांशी लढायची खुमखुमी आहे. तू याउप्पर स्वतःपुरतं पाहणारा एक बदमाष चोर नाही आहेस. स्वतःला ओळख बावळ्या. शंभर वर्षे मागून तुला या काळात इथं आणलं गेलं आहे. का? काय कारण?"

बावळ्या काही वेळ तसाच आकाशात नजर लावून वाळूत बसला. बाकी साऱ्या जगापासून स्वतःला तोडून. अंतर्मुख होऊन. मग उठला. तरातरा चालत लाकी होती तिकडे गेला. तिने त्याच्याकडे दुःखी अंतकरणाने पाहिले. त्याने तिला वर उठायला हात देऊ केला. "आमी ही लढाई लढू लाकी. आमी लढू बी आनी जिंकू बी. काय तू लढाईत आनी जगन्यात माझी साथ देनार?"

लाकीच्या चेहऱ्यावरचे दुखी सावट हटून आशेचे हसू उमलून आले. "होईंग." तिने त्याच्या हातात आपला हात दिला.

# शंभर वर्षे पुढे - प्रकरण ३५

समुद्रावरून एकाएकी जोरदार वाऱ्याची लाट वाळू उडवत उठली. लोक डोळे बंद मिटून हाताने चेहरा झाकून वाचवायचा प्रयत्न करू लागले. सैनिकांच्या नाकाबंदीत ढिलाई आली.

"तू काईंग बेत रचिंग? काईंग युक्ती?" फिलूने आशेने बावळ्याला विचारले. "आमी मंचावर असिंग आरोपींना घेईंग कंस्स पळिंग शकिंग?"

"पळायचं? नाय नाय. आता लढायचं हाय." बावळ्याचा आवेश एखाद्या लढवय्या सेनापतीप्रमाणे होता.

"इतक्याईंग हजारभर सैनिकांसंग आमी पाच जणांनी?" जाबाना फुरफुरला.

"आमी नाय. लोकं लढतील. इतकी लोकं एकत्र आयती जमलंली हायत. नाय तर अशी जमवायला कितकं काय काय करावं लागतं की. सैनिकांपरीस किती तरी जादा लोकं हायत. तसं बी सगळं सैनिक लढनार थोडी ना हाय? पुरं झाली, ही हाय तितकी लोकं." बावळ्या समाधानाने अ◌ाढावा घेतल्यासारखा बोलला.

"तुंज डोक्यात असिंग तरी काईंग?" जाबाना चक्रावला. "ही लोकं? मी ज्ञानसागरांज बौद्धिकसभेत इतकंईंग मुद्देसूद भाषण करिंग, सरकारांज निकम्मेपण पुरं स्पष्ट करिंग होईंग, तरी एकानं सुदहा लढाईला हात उचलिंग न. ते आता काईंग लढिंग?"

"एकानं लढनं म्हनजे आपनच मरन मागून घेनं झालं की सायबा? पन इतकी लोकं साथीला असली की कुनाला बी जोर चढंल." बावळ्याने बौद्धिकसभेत कधीहि मांडला न गेलेला मुद्दा स्पष्ट केला.

"तू लोकांना कंस्स पटविंग की सरकार बेकार असिंग, खाली खेचिंग होईंग?" गनाजाबा बौद्धिक वादासाठी सुरसुरला.

"ते लोकांना आनी येगळं सांगायला कशाला पायजेल हाय? लोकांना आधीच मायती हाय की समदं?" बावळ्याने तो वाद मुळातच उडवून लावला.

"मंग कंस्स? कंस्स?" गनाजाबा चांगलाच बुचकळ्यात पडला.

"लोकांना खात्री द्यायला पायजेल की आता इथं लढलं तर जीत आपलीच हाय. बास्स! मंग लोकं आपली लढाई आपनच लढतील." बावळ्याने चुटकी वाजवून दाखवत ते काम किती सोप्पं आहे दाखवलं.

"नी ती खात्री आमी लोकांना कंस्स देईंग?" गनाजाबा ते जाणायला आतुरला.

"आमी नाय देवू शकनार." बावळ्याने हात उडवत सहज कबुली दिली. जणू आशेचा फुगा फुगव फुगव फुगवला आणि आपणच त्याला टाचणी मारली. सगळ्यांचे चेहरे उतरले. "ते काम नियतीचं हाय. आज पावतो जेवा बी लढाई झाली हाय, मंग ती कंची बी दहा हजार लोकांच्या संग दहा लोकांची असंल, नाय तर कंची दहा लोकांच्या संग दहाच लोकांची बराबरीवाली असंल, ती जिंकून द्यायचं काम नियतीचं हाय. जी बाजू जिंकायची हाय, तिच्या इरोधी बाजूत फूट जाती. फितूर निपजतात आनी दहा लोक दहा हजारांच्या इरोधात बी जिंकतात."

"ओहोहो!" गनाजाबाला अर्धे काही कळाले. अर्धे काही कळाले नाही. "मंग आमी सरकारदार नी सैनिकांमध्ये फूट कंस्स पाडिंग? ते सुदहा आता सांगिंग टाकिंग तर?"

"तेच तर सांगितलं की? ते काम नियतीचं हाय. तिच्याकडून तसला काय बा इशारा मिळाला, खून मिळाली की समजायचं, आपलं काम होनार." बावळ्याने हात हातावर चोळले.

"काईंग होईंग ती खूण?" गनाजाबाने बावळ्याला खिजवले.

"मला काय मायती? दिसंल तेवा समद्यांस्नी आपसूक कळंलच की." बावळ्याने हातवारे केले. "काय बी असंल, पान्यात आग लागंल. ह्या माडाच्या झाडांचे नारल सैनिकांच्या टकुऱ्यावर पडतील, ती फुटतील. पायाखालची वाळू सरकंल. काय बी. हवा, पानी, माती, आग, आभाळ सगळी आमच्या बाजूची साथ देत हाय अशी दिसतील."

गनाजाबाचे तोंड वाकडे झाले. "म्हणहजे तुंज हातात करिंग अंस्स खरं काईंगच नाईंग. आमी नशिबांज भरोश्यानं चालिंग होईंग." त्याला काही हे आवडले नाही. "माणसांज मनगटातलं बळ मोठं होईंग की नशीब?"

"जोवर नशीब वाकडं जात नाय, तोवर समजनारा आपल्या मनगटाच्या बळाला मोठंच समजतो की." बावळ्याच्या बोलांवर गनाजाबाने तोंड वेंगाडले. "पन आज नशीबाचा कौल मला आपल्या बाजूचा दिसतो हाय. सरकारच्या बाजूतली फूट दिसते हाय. ते बघ तिथं समोर." बावळ्याच्या नजरेच्या रेषेत सगळ्यांच्या माना वळल्या.

"तो बघ. सरकारदार शिपाई गम्बुल त्याचा ताबेदार शार्दुलसिंहा संग भांडतो हाय. ती तिथं मोनिशा दानिशबाई संग झोंबाझोंबी करते हाय. आनी ही बघ हिरामनीची कारकून ती

कार्लजा तिच्याशी भांडते हाय. बाकी कोन कोन ताबेदारांसंग भांडतात हायत, त्यांची नावं मला ठावं नाय. मी कंदीचा त्या समद्यांच्या खेळावर नजर ठेवून हाय. त्या समद्यांनाच आज भांडायला इतका जोर चढला हाय की." बावळ्याने टाळी पिटली.

हात पुढे करताच लाकीने कौतुकाने त्याला दिली. सगळ्यांचे डोळे चकचकू लागले.

"तू बोलिंग त्यात काईंग दम असिंग खरंईंग." गनाजाबाने मान्य केले. "मी सरकारदारांना अंस्स उघड्यावर भांडिंग आधी बघिंग होईंग न."

"आता आमाला बी कामाला लागलं पायजेल हाय. आमच्यातली फितूरं हेरली पायजेल आनी साफ केली पायजेल." बावळ्याने प्रत्यक्ष्य कृतीची गोष्ट काढल्यावर सगळे त्याला खेटण्याइतके जवळ सरकले.

"तुला लय घामाचा वास येतो हाय. तू जरा लांब हो की. जरा. जरासा." गनाजाबाला विनंती केलेली. तरि त्याचा तिळपापड झालाच. "लोकांसमोर फितूरं उघडी केली की मंग उरलंली सगळी लोकं आपसूक एक यायला मोकळी. ऐका जी. कान आना जवळ. हवेवर खबर पसरायला नगं."

त्यांच्या कानगोष्टी झाल्या. ते आपापल्या कामगिरीवर पांगले. मामा व मामली तिथेच थांबले. बावळ्या आणि गनाजाबा अशा जागी निघाले, जिथून त्यांना जमलेल्या बहुतेक लोकांवर लक्ष ठेवता येणार होते. फिलू, ऋजूजान आणि लाकी तिच्या आत्येच्या दिशेने निघाले. आत्येजवळ पोहोचताच तिचे हात हातात घेऊन लाकीने एक मोठी जांभई दिली. "आत्या मी असिंग." ती कुजबुजली. लाकीने मुद्दाम डोक्यावरची उन्हे वारणारी टोपी काढून टाकली. स्वतःची ओळख खुली केली.

"तू काईंग इंथ येईंग? खुळचुकी." आतीश लाकीवर भडकला. "मरिंग?"

आत्या मात्र लाकीचे हात हातात घेऊन रडू लागली. लाकीने परत एक मोठी जांभई दिली. ऋजूजानने जांभई दिली. फिलूने जांभई दिली. त्या तिघीजणी सहज वाटावे अशा बेताने मुद्दाम जांभयांवर जांभया देत राहिल्या.

ते बघता बघता आतीशने एक जांभई काढली. "काईंग तू जांभईईईई...." तो वैतागला. "बंद करिंग?"

"न. हाच तर डाव असिंग." लाकी जांभई आवरायचा अपयशी प्रयत्न करुन म्हणाली. बाकी दोघींच्या जांभया बघून बघून तिला आता खऱ्याखुऱ्या जांभया सुरू झाल्या होत्या. "जो कोण तुमांज-

आमांजवर पाळत ठेविंग होईंग, तो सुदहा आता जांभया काढिंग लागिंग."

तिथे बावळ्याने गनाजाबाला बजावले. "समदे चेहरे बराबर ध्यानामंदी ठेव. मंचावर गेला की तुला त्या समद्यांस्नी लोकासमोर जाहीर करायचं हाय. तो बघ. तो बघ. ऋजूजानचा सांगाती कलाकार साहीम."

"हुं! नाडचुका अस्तनीतला निखारा." गनाजाबाने दातओठ चावले.

"आरं व्वा रे व्वा!" बावळ्या चकीत झालेला. "महान युगनायकाच्या पुजाऱ्याचा चेला? तो भडवा बादामी बी? तो कोन हाय रं? तो लाल पागोटंवाल्याच्या शेजारी हाय तो?"

"हाय हाय! तो तर मंज साथी यार बब्बन होईंग." गनाजाबा या शोधाने घायाळ झाला. "नी तो बघिंग? मी ओळखिंग त्याला. बारकू नी हाडकूदादा." ते पटपट नजर चौफेर फिरवून जांभया देणारे चेहरे टिपण्यात गर्क झाले.

"किती झाले रं? मोजलं?" लाकीच्या दिशेने गर्दीतून सरसरत काही व्यक्ति जात होत्या. त्या जांभईवाल्यांच्या बरोबरीने त्यांची हालचाल बावळ्याच्या डोळ्यांनी अचूक टिपली होती. "चल. इथलं काम आता संपलं हाय. मंचाकडं पोचायला पायजेल. बिगी

बिगी. लाकी सोळा रझाकारांसंग किती येळ यकटी लढनार? तू जितका आधी मंचावर पोचशील, तितका तिचा जीव वाचायला जादा अवसर मिळंल." गनाजाबाचा हात धरून त्याला ओढत, फरफटवत बावळ्या धावू लागला.

"नी मंज जीव जाईंग तितकाईंग जादा अवसर वाढिंग." गनाजाबा चुकचुकला.

मंचावरती भेरी वाजवल्या जाऊ लागल्या. सगळ्याच लोकांचे लक्ष मंचाकडे लागले. तिथे मंडलेश्वर सेनगुप्तानं अर्ध्या घटकेची दिलेली मुदत संपल्याचे जाहीर केले. पुढच्या क्षणी रझाकारांच्या दलाने आत्येसभोवती वेढा घातला. लाकी, ऋजूजान, फिलू बरोबर आतीश देखील घेरला गेला. "तरईंग मी तुंज सांगिंग होईंग की इंथ थांबिंग न." तो कळवळला.

सोळा रझाकारांनी तलवारी उपसल्या. तशा लाकीने आपल्या तलवारी दोन्ही हातात उपसल्या. लढायला सिद्ध झाली. फिलूने निकामिक बाहेर काढून फुंकायला सुरूवात केली. जमाव थरकापला त्या आवाजाने. ज्यांनी कधी आयुष्यात तो आवाज ऐकला नव्हता, अशा अनेकांच्या अंगावर रोमांच फुलले.

ऋजूजान चपळाई दाखवत रझाकारांना झुकांडी देऊन मंचावर चढून गेली. तिने वेषांतराचा डोक्यावरील केसटोप काढून फेकून

दिला. लोक तिचा हा रणरागिणी अवतार पाहून भारावले. आज ती अभिनय करत नव्हती. खरीखुरी लढाई लढत होती. काही चाहत्यांनी जोरजोरात शिट्ट्या मारल्या.

"धरिंग त्यांना. ठार मारिंग." मंडलेश्वराने सैनिकांना हुकूम फर्मावला. सैनिक मंचाकडे धावले.

त्यांच्या शिवाय आणखीन काही सात आठ जण मंचाकडे धावले. त्या सात-आठ जणांनी मंचावर चढण्यापासून सैनिकांना सशस्त्र मज्जाव केला. सैनिकांची त्यांची जुंपली. "महान युगनायकांज जय होईंग." त्या सात-आठ जणांनी मोठ्याने गजर करताच लोकांना ते बंडबागी असल्याची ओळख पटली.

"महान युगनायकांज...." मामा आणि मामलीने हाळी दिली. लोकांनी पुढचा जयजयकार पुरा केला. लोकांचा उघड पाठिंबा बंडबागींना दिसल्यावर सैनिक थोडे मंदावले. त्यांचा जोर उणावला.

"देव जर काईंग चमत्कार करिंग नी हे बंडबागी आरोपींना सोडविंग घेईंग जाईंग, तर कितीईंग बरं होईंग!" शरणन नीलकंठेश्वराच्या भक्तमेळयातल्या सोबत्याच्या कानात बडबडली.

"आमांज वर दगड मारिंग मारिंग, ती माणसं मारिंग वेळ येईंग न. तर कितईंग बरं होईंग!" आकाशगंगेच्या कलाकारातली मृणाली साहीमच्च्या कानात चुटपुटली.

"ऐकिंग बादामी. ऐकिंग हा मंगलध्वनी. आमांज निकामिक कंधीच इतकंईंग मधुर वाजिंग न. या मंगलध्वनीनं आता सगळं अमंगल दूर होईंग. तर कितीईंग बरं होईंग!" चूडामणीने हात जोडून त्या आवाजाला नमस्कार केला.

"हे कंस्स शक्य असिंग? ते निकामिक काम कंस्स देईंग?" अभावितपणे बादामीच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडले.

जीवावर उदार होऊन धावणाऱ्या बावळ्याच्या पायात मुद्दाम पाय घातला गेला. अडखळून तो तोंडघशी पडला. नाका तोंडात गरम वाळू जाऊन गुदमरला. "शंभर वर्ष आधींज माणसा, तू मंज जितकंईंग त्रासिंग असिंग, तितकईंग आजपावतो इतर कोणईंगच न." दमदार जाड आवाज बावळ्याच्या कानात शिरला. भयशंकेने तो चटकन पालथ्याचा फिरून उताणा झाला.

दुष्ट शंका खरी ठरलेली. राखाल त्याच्या आवडत्या कमरेवर हातवाल्या पवित्र्यात उभा ठाकला होता. "आज तुंज सगळा हिशोब मी चुकताईंग करींग टाकिंग." राखालच्या हातातली तलवार सपकन हवा कापत फिरली. "तुला लढिंग काईंगच हुनर असिंग न. तेहवा तुला मारिंग तितकीईंग मजा होईंग न. पण तुला सजा होईंग, त्या परीस जादा जरुरी असिंग." राखालने एकदम बावळ्यावर उडी मारून तलवार खुपसली.

त्याच्या अपेक्षेबाहेर चपळाईने बावळ्याने बाजूला होत तो वार वाचवला. "येड्या धाव पयला मंचावर." बावळ्या मूढ होऊन तिथेच उभ्या राहिलेल्या गनाजाबावर खेकसला. "मी बघतो याला." गनाजाबा ढुंगणाला पाय लावून पळाला.

"व्वा!" राखाल खदाखदा हसला. "मंज चूक होईंग तर. तुला मारिंग तर खूप मजा येणारिंग असिंग. मी मांजर. तू उंदीर." त्याने पुन्हा बावळ्यावर उडी मारली. बावळ्या बाजूला सरकला. पण सावध राखालने हवेतच बाजूला उसळून पाय बाजूला टाकला. तो बावळ्याच्या हातावर पडला. बावळ्याचे मनगट राखालच्या जोड्याखाली चिरडले. लगोलग दुसरा पाय उताण्या बावळ्याच्या दुसऱ्या मनगटावर रोवून राखालने त्याला जाम केला. स्वतःच्या भारी वजनाखाली अडकवला. दोन्ही हात दोन बाजूला अडकलेले बावळ्याचे शरीर सुटकेसाठी खूप फडफडले. वळवळले.

"आज पावतो मंज कोण हरविंग न. तू कंस्सच नाईंग." राखालने अट्टाहास करत दोन्ही हातांनी तलवार मूठ धरून डोक्यावर घेऊन, वेगात बावळ्याच्या शरीरात खुपसायला खाली आणली. ती बावळ्याच्या चेहऱ्याला चाटून जमिनीत धसली. राखालने मुद्दाम तो वार चुकवला होता. बावळ्याच्या चेहऱ्यावर क्षणाक्षणाला बदलणाऱ्या रंगाची मजा राखालला घ्यायची होती.

कमरेवर हात ठेवत त्या आवडत्या पवित्र्यात राखाल खदाखदा हसू लागला. लांबून तो प्रसंग पाहणाऱ्या मामलीने डोळे गच्च मिटून घेतलेले.

त्याचप्रमाणे रझाकाराने लाकीला खाली पाडून तिला भोसकायला उचललेली तलवार पाहून, मामाने डोळे गच्च मिटून घेतले होते. पुढच्या क्षणी बंडखोरांचा सगळा खेळ संपणार होता.

एक प्रचंड ताकदीचा झटका राखालला खालून बसला. बावळ्यात इतकी ताकद कशी आली? याचा विचार त्याच्या डोक्यात भिरभिरला असतानाच, त्या धक्क्याने डगमगून त्याचा तोल गेला. तो मागच्या बाजूला तोल जात कोसळला. मागे डोक्यावर राखाल एवढ्या जोराने आपटला की त्याची कवटी तडकली. हातातली तलवारीची मूठ निसटली. खणखणत जमिनीवर पडली. तिचा तो खणखणाट भूकंपाच्या गडगडाटी गुरगुराटापुढे कोणाच्याच कानी गेला नाही. राखाल मरताना त्याच्या त्या आवडत्या पवित्र्यात तसाच मेला.

बावळ्याचे शरीर खालून बसलेल्या धक्क्यामुळे वर फेकले गेले. पुन्हा खाली येऊन आपटले. आडव्या स्थितीतल्या त्याच्या शरीराला फारसा मार बसला नाही. बरेचसे लोक तेवढे सुदैवी

नव्हते. उभे होते. ते धक्क्याच्या लहरीबरोबर आडवे पडले. कोसळले. आपटले. ठेचकाळले. कळवळले.

मामा कसेबसे सारे अवसान एकवटून घाईघाईने धडपडत परत उभा राहिला. त्याने उताविळ होत डोळे किलकिले करून पाहिले. या धक्क्याने त्याची भाची वाचली असण्याची अंधुक आशा त्याच्या मनात जागली होती. लाकी आता त्या रझाकाराच्या उरावर चढून त्याला भोसकताना मामाला दिसली. रक्ताच्या चिळकांडीने ती माखली. मामाने परत डोळे मिटून घेतले. लाकीचे हे उग्र काली रुप त्याला दिसले नसते तर बरे होते.

बावळयाने आजूबाजूचा अदमास घेतला. माडांच्या सावल्यांखालील कनातींचे खुंट वेडेवाकडे होऊन कनाती खाली कोसळल्या होत्या. त्यांच्या खाली अडकलेल्या खाश्या लोकांची उगाच मदतीसाठी बोंबाबोंब माजली होती. कापड उसकटून त्यांचे त्यांना बाहेर पडायला कठीण नव्हते.

माडांवरचे सुके नारळ पडून काही माणसे जायबंदी झाली होती. एक दोन माड आडवे झाले होते. त्याखाली काही लोक अडकलेले होते. बोंबा ठोकत होते.

लाकडी खांबांवरचे काही टेहळणी मनोरे कोसळले होते. त्यांच्याखाली काही सैनिक चिरडले होते. उरलेल्या शाबूत

मनोऱ्यांवरचे सैनिक जीवाच्या भीतीने ते सोडून खाली उतरत होते. लोकांची नाकाबंदी करणारी सैनिक साखळी विस्कळीत झाली होती. त्याचा फायदा उचलत काही माणसे तिथून निसटून पळत होती.

या सगळ्या गोंधळाचा अचूक फायदा घेऊन गनाजाबा बिनाविरोध मंचावर चढला होता. मंडलेश्वर सेनगुप्त आणि तिथले इतर रझाकार जीव राखायला मंचावरून खाली पळाले होते.

गनाजाबाने मंचावरच्या कर्ण्याचा ताबा घेतला. तो त्यातून बोंबलू लागला. "लोक हो, आज नियतींज स्पष्ट इशारा आमाला मिळिंग असिंग. इंथ जे काईंग चालिंग होईंग, ते नियतीला मंजूर असिंग न. हा भूकंप दैवांज संकेत असिंग. त्यानं हा अत्याचार उधळिंग लाविंग. काईंग तुमी सवताहांज डोळ्यानं पाहिंग न? घोर राक्षस राखाल कंस्स मरिंग?"

भूकंपाच्या धक्क्यातून सावरणाऱ्या लोकांना हा नवा धक्का होता. बावळ्याच्या जवळच उभ्या एका तरुणाने पुढाकार घेत राखालच्याच तलवारीने राखालचे मुंडके छाटले. बावळ्याला त्याच्या हिंमतीचे आश्चर्य वाटले. तो रक्ताचा सडा पाहून बावळ्या भोवळू लागला. ते मुंडके त्या तलवारीच्या टोकावर नाचवत वर उभारून तो तरूण सगळ्यांना दाखवू लागला.

"महान युगनायकांज जय असिंग." तो तरुण बेंबीच्या देठापासून ओरडला. सामान्य लोकांच्या मनात रझाकारांची व त्यांचा सरदार राखालची प्रचंड दहशत होती. पण आता त्यांना त्यांच्या डोळ्यांसमोर त्या राक्षसांचा सहजी पार निकाल लागलेला दिसत होता. लोकांनी सहर्ष जयजयकार केला.

"ती भागूबाई महामहीमा, सरकारदारेन लोकाना पुढे करिंग, हा भयानक खेळ खेळिंग होईंग. इतक्याईंग महत्वांज घटनेला ती काईंग सवताहा हजर राहिंग न? बाकी सरकारदारांना पुढं करिंग काईंग मागे दडिंग राहिंग? म्हणहजे जर लोकांनी हे घोर कर्म नी अन्याय नाकारिंग, तर ती सगळा दोष बाकी सरकारदारांवर ढकलिंग, आपण नामानिराळी वेगळी राहिंग शकिंग. लोकांज रोषाला ते बापडे हुकूमांज गुलाम सरकारदार तेवहढे लोकांसमोर बळी जाईंग." गनाजाबा ओरडला.

"मी सरकारदारांनाच विचारिंग. तुमांजपैकी कितक्यांना आज जे मंचावर घडिंग होईंग ते मान्य होईंग? तुमांजपैकी कितकेईंग तयार असिंग, त्या आईसझुक्या महामहीमासाठी लोकांनी मारिंग फटके, आपल्या छातीवर फुकटफाकट झेलिंग? काईंग ती दुष्टा लायक असिंग तुमी तिंजसाठी जीव पाखडिंग?" गनाजाबाने फासा फेकला.

"न. मी या सरकारदारीचा त्याग करिंग असिंग. मंज हविंग न ही त्या दुष्टेंज चाकरी नी गुलामी." म्हणत गम्बुलने आपल्या डोक्यावरची गणवेशाची टोपी काढून रागारागाने फेकून दिली. त्याच्या बाजूला असलेले इतर शिपाई सुद्धा बिथरलेले दिसू लागले. मंचाजवळ बंडबागींशी झुंजणाऱ्या सैनिकांनी लढायचे थांबवले. ते कान देऊन गनाजाबाला ऐकायला लागले.

"मी शिपायांना नी सैनिकांना विचारिंग असिंग, कोणासाठी तुमी लढिंग होईंग? देशासाठी? काईंग या देशासाठी?" गनाजाबा किंचाळला.

"होईंग." काही सैनिकांनी आवाज दिला.

"पण देशासाठी काईंग?" गनाजाबाच्या या प्रश्नावर सैनिक आणि लोक गोंधळलेले दिसू लागले. एकामेकांकडे पाहू लागले.

"हा शत्रूंज हस्तक असिंग. आमांज बुद्धीभेद करिंग उभा असिंग. खेचिंग त्याला खाली." शार्दुलसिंहाने हाळी दिली.

"तू? तुंज लाचखोर तोंड बंद राखिंग. मी जर मंज तोंड तुंज पोलखोल करिंग खोलिंग, तर तुंज काईंग होईंग ते लक्षात ठेविंग. बोलिंग देईंग गनाजाबाला, तो काईंग बोलिंग ते आधी." गम्बुलने सरळ शार्दुलचे जवळ जाऊन बखोट धरले. कोणी शार्दुलच्या मदतीला हलले नाही. शार्दुल समजायचे ते समजून गप्पगार झाला.

गनाजाबा संधी साधायला तत्पर झाला. "आमी आमांज कुटुंबासाठी जगिंग. त्यांना राखिंग कोणा संग पण लढिंग तयार होईंग. मंग हीच भावना आमी जे जवळांज होईंग त्या माणसांसाठी बाळगिंग. आमांज आप्त. आमांज शेजारी. आमांज मित्र. ते आमाला राखिंग. नी बदल्यात आमी त्यांना राखिंग. हे सगळे एकत्र मिळिंग आमांज सगळा गाव होईंग. आमी या गावासाठी लढिंग. काईंग बरोबर?" गनाजाबाने परत फासा फेकला.

लोकांनी मोठ्याने होकार दिला.

"मंग आमाला सांगितलंईंग जाईंग की आमांज शेजार गावाला सुदहा आमी राखिंग होईंग. त्यांजसाठी सुदहा लढिंग होईंग. काईंग? तर ते सुदहा आमांजसाठी लढिंग होईंग. कोण मोठा शत्रू आमांज संग लढाईंला येईंग, तर मदतीईंग शेजारगाव येईंग नी आमाला राखिंग होईंग. अंस्स शेजारगाव शेजारगाव सगळे मिळिंग आमांज देश बनिंग. म्हणहून देशासाठी लढिंग होईंग. लोक हो आता मंज सांगिंग? मी बोलिंग ते काईंग चूक असिंग?" गनाजाबाने आता सभा पूरेपूर आपल्या हातात घेतली.

लोकांनी माना डोलावल्या. बहुतेक लोकांना हे पटलेले दिसले. "पण जोवर देश चालविंग होईंग नेता आमांज राखिंग. तोवरच आमी त्याला राखिंग होईंग. त्यांजसाठी लढिंग होईंग.

बरोबर काईंग चूक? तुमीच सांगिंग." गनाजाबाने खुंट हलवून पक्का केला.

लोकांनी मान्य असल्याच्या माना डोलावल्या. "ही दुष्टा, महामहीमा आमांज कुटुंबे राखिंग की नाशिंग? हे बघिंग डोळ्यासमोर," त्याने तीन कैद्यांकडे बोट दाखवले. "या तीन कुटुंबांज नाश ती करिंग होईंग. त्यांज दोष काईंग? तर ते तिंज मनमानीला विरोधिंग इतकाईंगच."

ऋजूजानने खळखळवत मंचावरील तिन्ही कैद्यांच्या काढण्या तोडल्या. राहीलला मिठी मारली. फिलूने धावत जाऊन मोलूला मिठी मारली. मावशीला मावश्याने मंचावर जाऊन मिठी मारली.

मग तो गनाजाबापाशी आला. त्याने कर्ण्यावर बोलायची इच्छा व्यक्त केली. "लोक हो, मी तुमांज सगळ्यांज नी त्यापरीस सगळ्यात जादा मंज बायकोंज अपराधी होईंग. या सेनगुप्तानं मंज खोटीईंग वचनं नी आमिषं दाखविंग, मंज बायको विरोधी साक्ष देईंग लाविंग. दिना मंज माफिंग." रडत रडत तो दिनामावशीच्या गळ्यात परत जाऊन पडला.

मंडलेश्वर स्वतःचा उल्लेख येताच सावध झाला. वारे कोणत्या दिशेला वाहू लागलेत, याचा त्याला अंदाज येऊ लागला होता. तो हळूहळू मंचाकडून दूर सरकू लागला.

"जेहवा सत्तेतले माजोर्डे सवताहांजच देश म्हणविंग होईंग, तेहवा त्यांज काईंग देश मानिंग होईंग? जर तो देश तुमांज नी तुमांज कुटुंबांज जीवावर उठिंग होईंग, तर तो काईंग राखिंग होईंग? सैनिक हो, शिपाई हो, मी तुमांज विचारिंग," गनाजाबाने मध्ये थोडा विराम घेऊन उत्सुकता ताणली.

"जेहवा तुमी इंथ त्या महामहीमांज पगार घेईंग लढिंग होईंग, काईंग तुमाला खात्री वाटिंग की तुमांज मागेईंग तुमांज कुटुंब सुरक्षित होईंग? काईंग तुमांज कोण वरचा ताबेदार त्यांना गुलाम करिंग वापरिंग न? मर्जी खप्पा जाईंग तर नाशिंग न? सांगिंग. तुमी काईंग अनुभविंग?" गनाजाबाने आवाहन केले.

"तुंज सांगणंईंग पुरेपूर खरेईंग असिंग." कार्लजा ओरडली. "मंज ताबेदारीण न्यायाधीश हिरामणी, मंज मुलांना हविंग तंस्स कामाला वापरिंग होईंग. तिंज घरगडी समजिंग. तिंज मुलानं मंज मुलीवर बळजोरी सुदहा करिंग असिंग. आज मंज त्यांज न्याय मांगिंग तू हिंमत देईंग." या कबुलीनंतर मोठी खळबळ माजली.

सरकारदारातल्या पीडीतांच्या कबुलीजबाबांची लाटच तयार झाली. समुद्रातल्या लाटांमध्ये नुक्त्याच येऊन गेलेल्या भूकंपामुळे जशी खळबळ चालू होती, लोकांमध्ये त्याहून मोठी खळबळ चालू झाली.

"लोक हो, आज पावतो आमी या सगळ्या गोष्टी डोळ्यांसमोर घडिंग तरी गप राहिंग. काईंग?" गनाजाबा आपल्याला दोष लावतो आहे असे लोकांना वाटले. ते नाराज झाले. "कारणिंग आमांज मधील फितूर. महामहीमांज सामील आमांज मधील तिंज गुप्तहेर चुगलखोर." हे ऐकल्यावर पुन्हा लोक उत्तेजित झाले. आज त्यांना गनाजाबाची एकूण एक गोष्ट पटत होती.

"मी आता एकामागोमाग त्या महामहीमांज गुप्तहेरांना उघडे पाडिंग. तुमाला विनंती की तुमी त्या हेरांना धरिंग. पळिंग जाईंग देईंग न. पहिलं नाव असिंग तो बादामी." गनाजाबाने त्याच्याकडे बोट दाखवले. "महान युगनायकांज पुजारी निर्दोष होईंग. पण त्यांज हा चेला सरकारदारांज हेर असिंग."

"हे मंजवर नाहक किटाळ असिंग." बादामी चिडीला आला. "गुरुजी, मंज खात्री यांना देईंग." त्याने चूडामणीकडे हट्ट केला.

"न. तुंज खात्री मंज उरिंग न." चूडामणीने बादामीला धिक्कारले. "इतकेईंग दिस मंज नेहमी आश्चर्य वाटिंग होईंग. आमी बनविंग ती निकामिकं, मंज आठविंग तंस्स जुन्या निकामिका सारखीईंग मधुर काईंग वाजिंग न? आज जेहवा खरे निकामिक वाजिंग, तेहवा तुंज इतकईंग आश्चर्य काईंग होईंग? वाईट काईंग वाटिंग?"

"मंज वाईट वाटिंग? न. न." बादामी नाकारू लागला.

"कारणिंग तू महान युगनायकांज चित्रात खाडाखोड करिंग ते बदलिंग होईंग. म्हणहून त्या चित्रांज वरुन आमी जी निकामिकं बनविंग होईंग, ती सगळी बिनकामांज बनिंग असिंग." चूडामणीने खुलासा केला.

"मी अंस्स काईंग कारणिंग करिंग? मंज काईंग त्यात फायदा? मंजवर खोटंईंग आरोप लाविंग न." बादामी कबूल होईना.

तसे चूडामणीने आपल्या खिशातून एक थैली काढली. "यात शंभर सोन्यांज होन होईंग. ही सकाळी तुंज खिशात मंज सापडिंग. ही तुंजपाशी कंस्स येईंग?"

"ही मंज असिंगच न. तू खोटंईंग बोलिंग." बादामीने घिसाडघाईने हा आरोप गुरूवर केला. आणि तोच उघडा पडला. लोक त्याचा विश्वास कसेच करणार नव्हते. जर ती थैली पुजाऱ्याची होती, तर ती उगाच चेल्याची असल्याचे सांगून गमावण्याचा मूर्खपणा तो करणार नसता.

"महामहिमांज दुंजा खबरी हेर असिंग आकाशगंगांज कलाकार साहीम. धनवतींज नोकर भीमडा नी सेविका . तो नीलकंठेश्वरांज महंत नी त्यांज बगलबच्चे. बारकू नी त्यांज मालक हाडकूदादा." गनाजाबाने पुढे अजून काही नावे उघड केली.

त्याच्या या रहस्यस्फोटांनी सगळा जमाव ढवळून निघाला. त्याने नावे उघड केलेल्यांना लोकांनी घेरले. ते फितूर आपल्यावरचा आरोप नाकारू लागले.

"काईंग म्हणहून या गनाजाबानं सांगिंग त्यांज विश्वासिंग होईंग? यांज बोलण्याला आधार काईंग?" भीमडा चवताळून ओरडला. "यांज वैयक्तिक हेवादावा साधिंग हा आमांज नावं घेईंग होईंग. सूड साधिंग होईंग."

"तुंज कुकर्मांज पुरावा तुला हविंग? मंग तो तुंज तेहवांज कोण साथीच तंस्सा देईंग शकिंग." गनाजाबा खमकेपणाने सांगता झाला. या हेरांज जे कोण साथी होईंग, त्यांनी पुढे येईंग नी यांज कुकर्मांज पाढा वाचिंग. माफिंज साक्षीदार बनिंग. मी महान युगनायकांज शपथेनं सांगिंग की त्यांना अभय मिळिंग." जाहीर केले.

"मी सांगिंग या भीमडांज दुष्ट कहाणी." बोलणारा गौरहर होता. "त्या धनवतीनं कितक्याईंग बाया-बाप्यांज अब्रू घेईंग होईंग. तेहि सगळं सांगिंग. त्या धुरंधरांज लाल बत्ती झवखान्यात कैद गुलाम, त्यांना कोणईंग कुंठईंग उचलिंग होईंग, कोण पुरविंग तेहि सांगिंग. मंज काळीज इतकेईंग दिस आतल्या आत हे सगळं बघिंग जळिंग होईंग. पण दाद कोणांज कडे मागिंग? तेच सगळेईंग हुकूमदार. ताबेदार. यात सामील होईंग."

गौरहर जसा जसा धनवती, धुरंधर, सेनगुप्त आणि त्यांच्या लालाजीसारख्या मदतगारांनी व भागीदारांनी केलेल्या अपराधांचा पाढा नावानिशी वाचू लागला, तारीखवार सांगू लागला, वेगळ्या पुराव्यांची गरजच उरली नाही. ढुंगणावर मारलेल्या चापट्या एवढ्या महाग पडतील, याची जर धनवतीला आधी कल्पना येती. कदाच त्या चापट्या?...

जमावातील अनेक जणांच्या बेपत्ता आप्तांचे बळी त्या खलांनी घेतलेले होते. ती नावे फुटताच ते ते लोक खवळून उठले. त्या खलांचा गळा दाबायला त्यांचे हात शिवशिवू लागले. लोक त्या खलांचा शोध घेऊ लागले. आत्ता तर इथं होते? गेले कुठे?

माडांच्या झाडांखाली गलका झाला. काही निष्ठा बांधलेल्या सैनिकांच्या मदतीने सेनगुप्त, धनवती, धुरंधर आणि इतर काही नावं उघड झालेले खल पिसूड्यांमधून पळ काढत होते. हिरामणी, शार्दूलला मात्र त्यांनी पिसूड्यांवरून खाली ढकलले. "लोकांना राग काढिंग जर समोर कोणच मिळिंग न, तर ते आमांज पाठलाग करिंग धरिंग न?" शार्दुलला लाथ घालत त्याने सुनावले होते.

"महान युगनायकांज जय होईंग." बंडबागी आता लोकांसमोर उघड मिरवू लागले. बादामी, महंत चरणदास आणि त्याचे बगलबच्चे, बारकू, हाडकूदादा, भीमडा, साहीम व बाकी सगळे

लोकांचा खा खा मार खात होते. धु धु धुतले जात होते. ऋजूजानला राहीलने आणि मोलूला फिलूने आपली मुलगी टल्लीसह मिठी मारली. बावळ्याने लाकीला शोधून काढले. मिठी मारली. तिने काही आक्षेप घेतला नाही.

आक्षेप घेतला तो महान युगनायकांच्या पुजाऱ्याने. चूडामणीने लाकीला टोचले. "ती आनंद साजरा करिंग खरीईंग वेळ दूर असिंग. महामहीमा तिंज प्रतिचाल खेळिंग, त्या आधी तिला शह-मात देईंग होईंग. जाईंग नी ते काम आधी पुरेईंग करिंग."

बावळ्या व त्याचे साथीदार विजयाच्या धुंदीतून भानावर आले. खरी लढाई अजून बाकी होती. त्या शेवटच्या लढाईसाठी जमवाजमवीच्या तयारीला ते लागले. आता त्यांना साथीदारांचा तुटवडा नव्हता. लोकांना विश्वास आला होता. गनाजाबाच्या रुपात नवा नेता सिद्ध झालेला होता. आजच्या भूकंपाने मोठा राजकिय भूकंप घडवलेला होता. त्याचे पडसाद इतर अनेक ठिकाणांतून उठत राहणार होते.

# शंभर वर्षे पुढे - प्रकरण ३६

निळया स्वच्छ आकाशाखाली तुरुंगाच्या कोटाची भरभक्कम भिंत बंडखोरांच्या जमावापासून, सरकारदारांना व त्यांची सर्वोच्च नेती महामहीमाला सुरक्षित राखून होती. त्या उंच दगडी भिंतीला लांघून आत शिरणे अशक्य वाटत होते. त्या कोटाचे पोलादी दार निखळवणे फार कठीण काम होते. जमाव कोटाच्या लगतपर्यंत निकामिकाच्या बळावर पोहोचला होता. कोटावर उभे महामहीमाचे पगारी सैनिक दूरतीर मारकाठाचे तीर बंडखोरांवर लक्ष्य साधून सज्ज होते. कधी ते निकामिक थांबते आणि कधी तो तीरांचा मारा सुरू करतो हा घात लावून. पण बंडखोरांनी आपापसात निकामिक वाजवण्याच्या पाळया लावून घेतलेल्या असल्यामुळे ते अखंड वाजत राहिले होते.

"लाकी काईंग तुंज खास अवजार ही भिंत फोडिंग शकिंग?" तंत्रज्ञान तज्ञ फिलूने विचारले.

"ते ध्वंस-अवजार वापरिंग होईंग, तर आमाला निकामिक वादन थांबविंग लागिंग. जर ते थांबविंग तर लगोलगईंग सरकारदार आमांजवर तीर चालविंग." लाकीने अडचण सांगितली.

मग बंडखोरांचे नेते लाकी, फिलू, ऋजूजान, बावळ्या, गनाजाबा आणि त्याचे साथीदार यांच्यामध्ये या तांत्रिक समस्येवर काथ्याकूट झाला. काही ना काही करणे भाग होते. चिलखती पायरथाखाली लाकीला झाकून, तिला वरुन येणाऱ्या तीरांपासून जुजबी संरक्षण पुरवून, तो रथ गनाजाबाच्या मित्रांनी उचलून धरत कोटाच्या भिंतीला नेऊन टेकवला.

"ते काईंग करिंग असिंग?" दुर्बिणीतून बंडखोरांच्या हालचालींवर, बारकाईने लक्ष ठेवून असलेल्या तुरूंगाधिकारी बब्बरने प्रश्न हवेत उडवला. त्याच्यासोबत घडामोडींवर तसेच लक्ष ठेवून असलेल्या, सरकारदार नेत्यांच्या कानात ती हवा शिरली.

"मंज अंदाज असिंग, त्या लाकींज जवळ काईंग जबरी हत्यार होईंग. त्यानं ती भिंतीला खिंडार पाडींग होईंग." राजकारणी धुरंधराने उत्तर दिले.

ते बब्बरच्या गळी उतरले नाही. तो फिसकन हसला. "काईंग ती गिरमिट चालविंग दोन पुरूष रुंदींज भिंत पाडिंग? किती वर्षं तिंज ते गिरमिट त्यासाठी चालविंग होईंग?"

"खुळचुक्या तुंज तंत्राची जाण शून्य होईंग." धनवती ओठ चावत फिसकारली. "त्या तिंज गिरमिटानंच तिनं राजधानीत

बेरहमांज मुख्यालय दोन पळात जमिनदोस्त खाली आणिंग होईंग."

"तू मंज बंदोबस्तात या कोटात आश्रयाईंग असिंग. इंथ मंज राज्य होईंग. हे विसरिंग खुळचूक पुनहा करिंग न. शब्द जपिंग वापरिंग." बब्बरने धनवतीला आढ्यतेने ताकिद दिली.

"ही वेळ आपापसात कोण मोठंईंग कोण छोटंईंग, अंस्स भांडिंग असिंग न." धुरंधर वैतागला. "त्यांना रोखिंग होईंग. अरे! ते सगळे मागेईंग काईंग सरकिंग?"

"ते आमांज तीरमाऱ्यांज बाहेर जाईंग होईंग. नक्कीईंग लाकींज हत्यार चालविंगसाठी त्यांना निकामिक थांबविंग लागिंग." मंडलेश्वर सेनगुप्तने अचूक तर्क केला.

"तर मग आमांज काम सोप्पं होईंग." म्हणत बब्बर तत्पर झाला. त्याने पहारेकरी जाखालला बोलावून, कोटाशी भिडलेल्या लाकीला हटवायला योग्य ती तजवीज अंमलात आणायला फर्मावले.

"काईंग त्यांनी मंज बंधू राखालला ठार करिंग हे खरेईंग?" जाखालने चरफडत विचारले.

"होईंग. आमी तिंथ होईंग. आमांज डोळ्यानं पाहिंग होईंग. त्या शंभर वर्षांज मागेईंग माणसानं राखालांज डोके फोडिंग." धनवतीने त्याची शंका फेडली.

"अशक्यईंग." जाखाल दोन्ही हाताच्या मूठी वळून जोरात ओरडला. धनवतीला उगाच कापरे भरल्यासारखे झाले. "राखालला कंधीच कोण लढाईत मारिंग शकिंग न."

"आज दिसाईंग आमी खूप काईंग अशक्य गोष्टी होईंग आधीच पाहिंग असिंग." धुरंधर खवचटपणे उत्तरला. "आता, ही आमी उभेईंग असिंग भिंत, दोन पळात कोसळिंग चमत्कार होईंग आधी, काईंग तू तिला रोखिंग काम पार पाडिंग शकिंग? आमांजवर मेहरबानी करिंग?"

जाखाल धुसफुसला. पण कामाला लागला. त्याने फटाफट हाताखालच्या माणसांना हुकूम सोडले. भिंतीवर वस्तू, शस्त्रे चढवायची तजवीज असलेल्या कप्पीजवळ जाऊन, खाली तयार राखलेला गरम बुधला स्वतः जातीने वर खेचू लागला.

लाकीने आपले सहकंपन मोजणारे आणि घडवणारे ध्वंस-हत्यार भिंतीला टेकवले. सहकाऱ्यांना इशारा केला. त्यांनी दूर मागे हटलेल्या गनाजाबाला खूण केली. जमाव तीरांच्या टप्प्याबाहेर

परतला होता. गनाजाबाच्या हाळीवर निकामिक वादन बंद करण्यात आले.

लगोलग कोटावरील सैनिकांनी सोडलेले तीर मधल्या मोकळ्या जागेत जाऊन पडले. "तीर फुकट घालविंग न. दूरतीर मारकाठा चालविंग." बब्बर त्याच्या सैनिकांवर ओरडला. ते अवजड दूरतीर मारकाठे चालवायच्या हालचाली तश्या सुरू झाल्या. "आधी हा पायाबुडींज चिलखती रथ फोडिंग." बब्बर किंचाळला.

लाकीची घाईघाईने कोटाच्या भिंतीचे सहकंपन ओळखायची धडपड चालू होती. एकाएकी तिच्या नाकात कढत तेलाचा वास शिरला. त्या चिलखतावर कढत तेल वरुन ओतण्यात येत होते. त्याच्या उष्णतेने तिच्या सहकाऱ्यांचे हात भाजू लागले. त्यांना पायरथ उचलून धरणे कठीण होऊन गेले. आतमध्ये त्या तेलाच्या उष्णतेने प्रचंड धग निर्माण झालेली.

बावळ्या कोटावरच्या हालचाली निरखत होता. आधी लाकीच्या चिलखती रथावर वाफारे सोडणारे काही ओतले गेले. मग जाखाल हातात पेटती चूड घेऊन सज्ज झालेला दिसताच, पुढे काय होणार? त्याचा त्याला अंदाज आला. तेलाला आग लागताच त्याखालची माणसे गुदमरून मरणार असती.

तो त्यांनी सोबत आणलेल्या दूरतीर मारकाठ्यापाशी धावला. बावळ्या पोहोचायच्या आधी, कोटावरून दूरतीर काठ्याने डागलेला सळकतीर येऊन त्यांच्या दूरतीर मारकाठ्यावर कोसळला. बावळ्याच्या मनात आग आग झाली. त्या तेलापेक्षा गरम. पण दूरतीर मारकाठा उध्वस्त होण्यापूर्वी फिलूने डागलेला सळकतीर सुटला होता. पुढच्या पळात त्याने कोटाच्या भिंतीवरील जाखालचा वेध घेतला. जाखाल चूडीसह कोटाच्या भिंतीवरून खाली कोसळला. त्याचा कपाळमोक्ष झाला.

बब्बर स्वतः रागाने कोटावरल्या उरलेल्या चूडीला आणायला धावला. ती घेऊन परत जागेवर परतायचे धैर्य त्याला झाले नाही. भिंत सहकंपनाचे पहिले आचके गचगे घेऊ लागली होती. लाकीला शिव्या हासडत सरकारदारांचे नेते तिथून बाजूला पळाले. "तीर चालविंग कसूर करिंग न." त्यांच्या पलायनाकडे नवल करत पाहणाऱ्या कोटावरील सैनिकांवर बब्बर डाफरला. "कोण बंडबागी भिंतीपाशी दिसिंग त्याला ठार मारिंग."

ते सैनिक नेत्यांचा कपटकावा ओळखण्याइतके चलाख नव्हते. त्यांनी भिंतीपाशी जे बंडबागी दिसले त्यांच्यावर तीर सोडले. काही क्षणांनी हादरे खात असलेली कोटाची भिंत प्रचंड आवाज करत कोसळली. तिच्याबरोबर ते आज्ञाधारक सैनिक.

लाकी आणि तिच्या साथीदारांनी चिलखताचा आश्रय सोडून त्याआधी मागे पळ काढला होता. त्यांच्यातल्या दोन जणांचा वरून मारलेल्या तीरांनी बळी घेतला. लाकीच्या उजव्या खांद्यात तीर शिरला होता. पण ती जिवानिशी बचावली. धावत येऊन बावळ्याच्या गळ्यात पडली.

"या पुढं तू जाशील तिथं तिथं मी बी येनार. तुला एकटी कश्शीच नाय सोडनार." तो मनातला क्षोभ आवरत हमसत म्हणाला.

कोटाच्या कोसळण्याचा आवाज कानावर येताच, आपल्या शय्येवर आरामात विसावलेली महामहीमा ताडकन सावध होत उठली. आपल्या दोन खाजगीतल्या अंगरक्षकांना तिने हुकूम दिला. "जल्दीईंग उड्डाणरथ सज्ज करिंग. धाविंग. मी इंथ काम पुरं करिंग, नी पोचिंग तिंथ लवकरच." तसे ते दोघे गच्चीवर धावले.

बाकीच्यांना तिने फर्मावले. "चलिंग. बंडबागी नी बब्बरांज पहारेदार दोघांजपासून सावध राहिंग." ती धावू लागली. त्यामुळे ते सगळे सुद्धा तिच्या आगेमागे धावू लागले. व्हरांड्याच्या टोकाला पोहचताच तिथे उभ्या दोन पहारेकऱ्यांना तिने हुकूम दिला. "ती शत्रूराष्ट्रांज हेर छमद नी तिंज साथी फहदकडे मंज नेईंग."

पहारेकऱ्यांची जरा चुळबुळ झाली. "पण मंग इंथ पहारा....." महामहीमाने डोळे वटारताच, आपल्या ताबेदाराच्या ताबेदारणीला नाही म्हणायची हिंमत त्यांच्यात उरली नाही. ते वाटेतले पहारे पार करत थोड्याच वेळात महामहीमाला घेऊन, त्या खतरनाक कैद्यांच्या कोठडीपाशी पोहोचले. त्या कोठडीचे कुलूप उघडायचा हुकूम होताच, तसे ते उघडून देण्यात आले.

छमद आणि फहद दोन वेगवेगळ्या कोठड्यांमध्ये बंद होते. त्यांना महामहीमाच्या अंगरक्षकांनी धक्के मारत तिच्यापाशी आणले. "घेईंग चलिंग यांज आमांज संग." महामहीमाच्या या अंगरक्षकांना दिलेल्या हुकूमाने पहारेकरी चक्रावले. त्यातल्या ज्या कोणी अटकाव करायचा प्रयत्न केला, त्यांना महामहीमाच्या अंगरक्षकांनी कंठस्नान घातले.

"तुला आमांज देशस्वामी दिग्गीराजांज चरणी शरण हविंग होईंग तर? आमांज मदतीनं?" छमदने कुत्सितपणे विचारले.

महामहीमा लबाडपणे डोळे मिचकावत हसली. "तुंज लाडक्या शंभर वर्ष आधींज माणसांज मेहरबानी होईंग ही. काईंग तू त्याला भेटिंग इच्छिंग? तर मी तुला इंथच सोडिंग. तो इंथ पोचिंग असिंग. बोलिंग?"

छमदने डोळे गरागरा फिरवले. ती व्याकुळपणे आकाशाकडे पाहत ओरडली. "काईंग परमेशा? काईंग त्या बावळ्याला तू इतकईंग मेहरबान होईंग?"

त्यावेळी तो शंभर वर्षांपूर्वीचा माणूस तुरूंगाच्या कोसळलेल्या कोटातून इतर बंडखोरांच्या सर्वांत पुढे बिनदिक्कत आत घुसत होता. निकामिकांचे आवाज गुंजत होते. त्या आवाजांच्या संरक्षित छत्राखाली बंडखोर बेलगाम आत घुसत होते. जो पर्यंत ते आवाज गुंजत होते, तोपर्यंत सैनिकांनी फेकलेली शस्त्रे त्यांच्यापर्यंत पोहचू शकणार नव्हती.

बावळ्याला मागून गाठून गनाजाबा त्याच्या कानाशी लागला. "या लढाईंग प्रशिक्षित सैनिकांसंग आमांज सामान्य माणसं कंस्स काईंग लढिंग शकिंग नी जिंकिंग? मंज मोठा घोर असिंग की आमांज मोठी प्राणहानी होईंग. आमी या लोकांना कंस्स वाचविंग?" त्याच्या स्वरात हताशता होती.

"ते भाड्याचं सैनिक हाय की. ते काय जीव पनाला लावून लढनार नाय हाय. पैशापरीस जीव मोठा हाय जी." बावळ्या त्याला आश्वस्त करु लागला. "आमची लोकं आपापल्या सगंसोयऱ्याच्या खूनाचा बदला घ्यायास्नी पेटलंली हाय. ती जीवावर उदार होवूनच इथं आलंली हाय. मला तर फिकीर हाय की ही भडभुंजी लढनारच

नाय. आधीच हत्यार खाली ठेवतील. लोकांची लढायची खुमखुमी भागनारच नाय."

बावळ्याचे बडबोल लवकरच खरे उतरताना दिसले. इतरांना लढायचा आदेश देऊन, स्वतः मात्र पळून जाणाऱ्या नेत्यांना ज्या सैनिकांनी पाहिले होते, त्या सैनिकांचा लढायचा जोर संपला होता. त्यांनी तीरकमान उतरवले होते. त्यांच्या तलवारी वर उंचावल्या जायच्या ऐवजी खाली लटकू लागल्या होत्या. कोटाबरोबर कोसळलेल्या सैनिकांना पाहून इतर सैनिकांचे मनोधैर्य कोसळले होते. ते पुन्हा उंचावायचे काम त्यांच्या पळपुट्या नेत्यांना खचितच साधणारे नव्हते.

लाकी आणि बावळ्या सगळ्यात पुढे धावत होते. त्यांना तुरूंगाधिकारी बब्बर हसतमुखाने चार पहारेकऱ्यांसह सामोरा आला. "आमी लढिंग काईंग होईंग? तुमांज जीत आमी कबूल करिंग होईंग. आमी आमांज शस्त्र ही बधिंग म्यान करिंग असिंग." म्हणत बब्बरने आपली तलवार म्यान केली.

त्याने आपल्या सहाय्यकाला खूण केली. तसा तो हातातला कर्णा उंचावून बोंबलू लागला. सगळ्या सैनिकांना लढायचे सोडून हत्यारे म्यान करण्याचा तुरूंगाधिकाऱ्याचा आदेश त्याने सुनावला.

"आता ही म्यान शस्त्रे केवळ तुमांज आदेशाईंगच पुनहा बाहेर येईंग नी तुमांजसाठी लढिंग होईंग." बब्बरने मानभावी प्रस्ताव दिला.

"न. आमांज तुंज साथ कबूल असिंग न." गनाजाबाने तो मैत्रीचा प्रस्ताव लगेच फेटाळला. "आजपावतो तुमी महामहीमांज हर जुल्मात तिंज साथ आपखुशीनं देईंग होईंग. खरेईंग तर हे होईंग की तुमांज गुनहाईंग तिनं कानाडोळा करिंग होईंग. हाच तिंज गुनहा होईंग. जर तुमांज साथ कबूलिंग, तर तुमांज जुल्म सुदहा कबूलिंग करिंग होईंग. हे कंस्सच शक्य होईंग न. नव्या भल्या राजवटीत जुनीच बदमाष माणसं पदावर काईंग होईंग?"

"दारू जितकीईंग मुरिंग तितकिईंग जास्ती बरी कारणिंग. नव्या बाटलीत जुनीच दारु बरी होईंग." बब्बरने तोंड वेंगाडले. "काईंग आमांज साथ नाकारिंग बळ तुमांजकडे असिंग? न. न." त्याच्या आवाजात बेरकेपणा होता. "काईंग तुंज साथीदारांना लढाईंज हुनर असिंग? न. न. काईंग तुला इतक्याईंग लोकांज मरणांज ओझं माथी घेईंग जमिंग? न. न." तो छद्मी हसला. "काईंग आमांज नव्या प्रजाहितदक्ष राजाला राज्याभिषेकालाच इतकंईंग प्रजेंज रक्त सांडिंग परवडिंग? न. न."

बावळ्याची लाकीशी नेत्रपल्लवी झाली. त्या कर्ण्याकडे त्याने तिला इशारा केला. तिने समजल्याची खूण केली. अचानक दोघांनी

हालचाल केली. बावळ्याने तंगडी फिरवून पायावर पाय मारून पाडला आणि लाकीने त्या पहारेकऱ्याच्या हातातून कर्णा हिसकावून घेतला.

"काय रं ए नाडचुक्या? तुला काय वाटतं हाय? तू हुकूम दिला. म्हनून तुझ्या मानसांनी हत्यारं म्यान केली? ती मानसं पुन्ना तू हुकूम केला बी, तर काय लढाया पुन्ना तयार होनार हाय? हाड!" बावळ्या थुंकला. "कश्शीच नाय. तुझ्यासाठी कशापायी रं ती आता सवताचा मोलाचा जीव फुकटफाकट पनाला लावनार? हाय काय तुझ्याकडं आता? ना पद. ना ताकद. ना अक्कल."

इतका वेळ बब्बरच्या चेहऱ्यावर तरळत असलेले ते छद्मी हास्य पुसले गेले. तो लाकीकडचा कर्णा हिसकावायला गेला. तिने लाथेचा पेच वापरून त्याला खाली पाडला. कर्ण्यातून बोंबलू लागली. "सैनिक हो, तुमांज हा अधिकारी काईंग लायकीचा असिंग ते तुमी जाणिंग. मंज ते सांगिंग गरजेईंग न. काईंग तुमी याला वाचविंग सवताहांज जीव धोक्यात घालिंग? काईंग तो तुमाला वाचविंग सवताहांज जीव धोक्यात घालिंग? तुमी आताच सवताहांज डोळ्यांनी बघिंग असिंग. तुमांज साथी त्यानं सवताहांज पळ काढिंग साधिंगाईंग, कोटांज भिंतीसंग मरविंग होईंग. काईंग मी बोलिंग ते बरोबर? मंज उत्तर देईंग."

सैनिकांनी एकमेकांकडे बघितले. मग एकामेकांच्या आवाजात आवाज मिसळत मोठ्याने होकार दिला. दातओठ खात चरफडत बब्बर उलटलेली बाजी पाहू लागला.

"तर मंग आमी तुमाला काही पळांज अवसर देईंग होईंग. तुमांज शस्त्रं आमांज हवाली करिंग नी इंथहून तुमांज जीव वाचविंग निघूनिंग जाईंग. जो मागे थांबिंग त्याला शत्रू समजिंग आमी ठार करिंग." तिचे शब्द पुरते विरलेहि नाहीत. त्याआधीच उताविळ झालेल्या काही सैनिकांनी आपापली शस्त्रे वरून खाली फेकून दिली. काही जण होते त्या जागेवर शस्त्रे तिथे तशीच टाकून, कोटाला पडलेल्या भगदाडाकडे धावू लागले. त्यांना कोणी रोखले नाही.

बब्बरच्या मागे काही अंतरावर त्याचे इतर साथीदार नेते उभे होते. धनवती, धुरंधर, सेनगुप्त. ते गनाजाबा व बंडखोरांच्या बाकी नेतेमंडळींना वळसा घालून कोटाच्या भगदाडाकडे निघाले. त्यांना पुढे होऊन हात मध्ये घालून लाकीने अडवले. "न. तुमाला जाईंग मिळिंग न. तुमांज न्याय होईंग विना."

"आमी तुला हुषार समजिंग होईंग. पण तू तर राजनीतींज साधे धडे जाणिंग न. शत्रूंज शस्त्रानं शत्रूला मारिंग, पराभूत करिंग होईंग. तर तुमी ते सगळे लढाईत कुशल सैन्य अंस्सच सोडिंग देईंग. तुमांज

बाजूनं होईंग तरहि? महामहीमांज बेरड अंगरक्षकांसंग आता कोण लढिंग शकिंग? या परीस मोठी खुळचूक काईंग होईंग?" मंडलेश्वर सेनगुप्ताने काही वेगळी चाल खेळली.

"शत्रूंज शस्त्रानं शत्रू मारिंग. ही शस्त्रकारांनी त्यांज शस्त्रांज धंदा चालविंग म्हणहून बनविंग एक भ्रमनीती होईंग. हा एक सापळा होईंग. या पगारी सैन्याला वापरिंग होईंग, तर मंग आमाला सुदहा त्यांना पगार घालिंग होईंग. त्यांना पगार घालिंग, तर मंग प्रजेवर करांज जोर करिंग होईंग. मंग महामहीमानं जे काईंग चुकींज नीती चालविंग, तर ते सगळे पुनहा आमी सुदहा चालविंग होईंग. न. न. न." शस्त्रतज्ञ फिलूने त्रिवार नकार दिला. "तेच चुका पुनहा करिंग, आमी तितकेईंग खुळचुके होईंग न, नाडचुक्या!"

"तर मंग आता तुमी आमांज काईंग करिंग? ठार तर करिंग शकिंग न. जर करिंग, तर आमांज नी तुमांजमध्ये फरक तो काईंग? मंग तुमी सुदहा आमांजसारखेच क्रूर जुल्मी ठरिंग." धनवतीने मोठ्या आढ्यतेने आपले शहाणपण पाजळले.

गनाजाबा हसला. त्याने हनुवटीवर बोट ठेवत विचार करत असल्याचा आव आणला. "तुंज बरोबर असिंग. काईंग वेगळा विचार करिंग होईंग. जर आमी तुमाला काळकोठडीत टाकिंग न, जर मोकळे सोडिंग, तर तुमी आमांज काईंग कामाला येईंग?"

"शठं प्रति शठं. काईंग तुमी हे कंधी पूर्वी ऐकिंग न? शेजारदेशांज महामहीम दिग्गीराजा हा आमांज महामहीमा इतकाईंगच लुटारू असिंग. त्यांज चाल जाणिंग नी प्रतिचाल खेळिंग, आमांज परीस कोण जास्ती शठं तुमाला मिळिंग शकिंग?" धुरंधराने लागलीच शेखी मिरवली.

"म्हणहजे तुमी सगळे पक्के शठं असिंग. हे सवताहांज तोंडानं कबूल करिंग असिंग?" ऋजूजानला आपले हसू आवरता आले नाही.

"मी शठांज राजा होईंग." धुरंधराने मिशीला पीळ दिला.

"नी मी शठांज राणी." धनवतीने कपाळावर आलेली बट तोऱ्यात बोटांनी वर उडवली.

"पण तुमा शठांज भरवसा आमी कंस्स काईंग करिंग शकिंग? मंज उमज पडिंग न." लाकीने खांदे उडवले.

"जंस्स या शेजारदेशांज हस्तक गनाजाबांज विश्वास तुमी करिंग शकिंग." धुरंधराने तिरपागडे उत्तर दिले. "दिग्गीराजानं याला इंथ व्यवस्था खाली खेचिंग सुपारी देईंग होईंग. इंथ अराजक माजिंग नी सैन्य विस्कळिंग जाईंग. मंग दिग्गीराजा त्यांज सैन्यानं चाल करिंग हा देश ताब्यात घेईंग मोकळा."

"काईंग पुरावा तू बोलिंग ते खरेईंग?" गनाजाबा चिडीला आला.

"तुंजपाशी तरी काईंग पुरावा की मी खोटेईंग बोलिंग?" धुरंधराने सरळ गनाजाबाच्या डोळयात डोळे लावले. "तू इंथ महामहीमांज विरोधात कितीईंग नी काईंग काईंग बोलिंग होईंग. पण तुंज कोण सरकारदारानं कंधी मारिंग काईंग न? पकडिंग काईंग न?" धुरंधराच्या बोलण्याचा रोख कोणाला समजेना.

"तू काईंग बोलिंग?" गनाजाबा वैतागला.

"दिग्गीराजांज हेर कायम तुला राखिंग होईंग. इंथ भ्रष्ट सरकारदारांना पैसे चारिंग. त्या कामात मी सवताहाच कितीईंग तरहि वेळा तुंज बाजूनं या मंडलेश्वरापाशी रदबदली करिंग होईंग. विचारिंग सेनगुप्ताला." धुरंधराने आरोप लावून धरला.

"होईंग. धुरंधरानं मंज या कामी हजार होन देईंग होईंग. मी कबूलिंग." सेनगुप्ताने ठामपणे दुजोरा दिला.

"काईंग हे खरेईंग, गनाजाबा?" त्याच्याच एका सहकाऱ्याने अविश्वासाने विचारले.

"व्वा! याला म्हनत्यात खरा शठं." बावळ्याने टाळ्या वाजवल्या.

"काईंग बावळ्या तू सुदहा?" गनाजाबा व्यथित होत म्हणाला. "हेच सगळं ऐकिंग काईंग मी आजपावतो सारी धडपड करिंग?" त्याने हात दोन बाजूंना फैलावत वर आभाळात नजर लावली.

"तुला नाय रं," बावळ्याने गनाजाबाच्या पाठीवर थोपटले. मग धुरंधराला जाऊन जोरजोरात थापटला. "या धुरंधराला शाबासकी देतो हाय की. काय जालीम शठं हाय हा? तुझ्याच साथीदाराच्या मनात तुझ्या संशयाचा किडा घुसवला की. मानला बा. मानला की."

"सगळ्या भल्याईंग माणसांना राजकारणांज बाहेर करिंग, ही आरोपांज राळ उठविंग युक्ती, हे बेईमान नेहमीईंगच वापरिंग होईंग." लाकी वतवतली.

"एक खोटीईंग गोष्ट दहा भाडोत्री तोंडातून शंभर ठिकाणाईंग हजार वेळा बोलविंग. की लोकांना ती खरीईंग वाटिंग लागिंग." फिलू वतवतली.

"काळ्यावर पांढरा ठिपका उठईंग दिसिंग. तंस्स या बेईमानांज एखादीईंग भलाई लोकांज नजरेत उठिंग. पांढऱ्यावर एखादाईंग काळा डाग उठईंग दिसिंग. तंस्स इमानदारांज एखादीईंग चूक लोकांज नजरेत खुपिंग. या जगाईंग हा उफराटा प्रकार असिंग." सगळ्या रण सोडून जाणाऱ्या सैनिकांना वाटेला लावून, बंडखोर

नेत्यांपाशी परतलेला गम्बुल बोलला. "लोक वाटिंग ते काहीईंग बोलिंग."

"तेहवा भला माणूस काळीज फाटिंग आपणच बाहेर होईंग. की या बेईमानांना हविंग ते साधिंग राज्य मोकळंईंग." ऋजूजानने ठोकताळा काढला.

"आज इंथ ही युक्ती कामाला येईंग न, शठराजा नी शठराणी? काईंग नवी साधिंग." लाकीने धुरंधराला सुनावले. "या गनाजाबावर आमांज पुरता विश्वास असिंग."

"काईंग तुमांजसारखी बाकी सगळी माणसं सुदहा हुशार नी विचार करिंग असिंग?" धुरंधराने खांदे आणि भिवया उडवल्या. "जगात भल्या नी शहाण्या माणसांज कमतरता होईंग. बुऱ्या नी मुर्खांज भर. ते आमांज सारख्या शठांना नेहमीच फसिंग. आज वा उद्याईंग त्यांना या भल्या राजाचा काचच जादा जाईंग. तेहवा तेच याला बाहेरिंग रस्ता दाखविंग. मंग आमांजच राज्य. इंथ राजकारणात केवळ आमांजसारखे निलाजरे नी निगरगट्टच टिकींग शकिंग. तुमांज हे क्षेत्र होईंग न. कळिंग तुमाला लवकरच. स्वानुभवानं."

"सवताहाईंग वरून जग ओळखिंग न. जर या जगात बुऱ्यांज संख्या भल्यांजहून जादा होईंग, तर हे जग कंधीच संपिंग जाईंग

होईंग. बुऱ्यांज काम नाशिंग. भल्यांज काम राखिंग. जर जग नाशिंग असिंग न, तर या जगाला राखिंग भल्यांज संख्या नक्की जादा होईंग." फिलूने हिशोब लावला.

"तंस्स तर तंस्स." धनवतीने मानेला तोऱ्यात झटका दिला. "तुमाला गुलामी हविंग न. स्वतंत्रता हविंग. पण काईंग तुमी त्यासाठी जबाबदारींज किंमत मोजिंग शकिंग?" धनवतीने प्रश्नार्थक भिवया ताणल्या.

"ऊंहु! कैक माणसांना तर सवताहांज साध्याईंग जबाबदारी सवताहा पार पाडिंग येईंग न. अंगबळ वा बुद्धींज बळ कमी होईंग. कैक आळशी होईंग. म्हणहून त्यांना सवताहांज जबाबदारी निभाविंग जमिंग न. कैक परिस्थितीईंग गांजावले होईंग. म्हणहून त्यांना शक्य होईंग न. मंग मंजसारख्या कोणी ती जबाबदारी सवताहांज डोक्यावर घेईंग लागिंग. नी त्या बदल्याईंग जर कोण सवताहांज काईंग फायदा करिंग घेईंग, तर त्यात वाईट काईंग असिंग?" धनवतीने नाक उडवले. "या जगात काईंग फुकट मिळिंग न. तुमाला जी लोकांज स्वतंत्रता हविंग, ती वास्तवाईंग कंधीच शक्य असिंग न. त्यासाठींज जबाबदारी पेलिंग बळ नी किंमत चुकविंग ऐपत तुमांजपाशी असिंग न."

"जगात फुकट काय पन नाय?" बावळ्या जोरजोरात हसायला लागला. "जगात समदे खरे जरूरी गोष्टी फुकटच हाय की? हा सुर्याचा परकाश फुकट हाय." बावळ्याने सभोवताली हात लांब पसरले. "चंदराचं चांदनं फुकट हाय. स्वास घेन्यासाठी हवा फुकट हाय. प्यायला पावसाचं पानी, झऱ्याचं पानी, नदीचं पानी समदं फुकट हाय. ही झाडं नी त्यांना लागनारी फळं फुकट हाय. रानात कंद नी पाला फुकट हाय. माझ्यासारखा घरदार नसलंला फुकट्या मानूस म्हनून तर जीता हाय."

"फुकट्या, इंथ फुकट नाक खुपसिंग न." धनवतीने ओठ चुथडले.

"तुझ्यासारख्या लोकांच्या जीवावर आयतखाऊ जगनाऱ्यांनीच, माझ्या त्या काळात ते समदं फुकटचं नासाडून टाकलंल होतं. मंग प्यायच्या पान्याला पैकं मोजा. खान्याला पैकं मोजा. शुद हवेला बी पैकं मोजायला लागत होतं की? तुमाला समद्या गोस्टीतून पैका कमवायचा हाय. म्हनून तुमी पसरवलेलं हे खूळ हाय. म्हनायचं की जगात फुकट काय नाय." बावळ्याने तोंड वेंगाडून दाखवले.

"बरोबर होईंग बावळ्यांज." ऋजूजानने त्याला दुजोरा दिला. "जगात सगळ्यांना जगण्याईंग पुरते सगळे गोष्टी फुकट असिंग. पण

तुमांज सारख्या शठांना ते पुरिंग न. म्हणहून इतर लोकांज तुमी एका हातानं छिनाविंग. मंग दुंजा हातानं विकिंग. नी म्हणिंग जगात फुकट काईंग न. तेहवा लोक हो, आमी विकिंग ते तुमी खरेदिंग." ती रागारागाने धनवतीकडे पाहू लागली.

"अंस्स बडबोल जे बोलिंग, ते आजपावतो कंधी काईंग भलं साधिंग शकिंग न." मंडलेश्वर सेनगुप्त ठासून सांगू लागला. "महान युगनायकांज त्या वेळांज न्यायांज राज्य हा केवळिंग एक स्वप्नविलास असिंग. तंस्स काईंग खरोखर कंधी अस्तित्वात होईंग, यांज काईंग प्रत्यक्ष्य प्रमाण असिंग न. जर काईंग ते इतकईंग चांगलं राज्य होईंग, तर मंग बुडिंग काईंग? टिकूनिंग राहिंग काईंग न?" सेनगुप्ताने सगळयांपुढे टिमक्या वाजवल्या.

"बरोब्बर!" धुरंधराला परत कंठ फुटला. "केवळ सांगोवांगी ऐकिवाईंग कथा ती. तंस्स न्यायांज राज्य आज काळात तर आमी कुंठच कंस्सच बघिंग होईंग न. बोलिंग तू? काईंग तू बघिंग?" सगळया बंडखोर नेत्यांना मूक कबूली द्यावी लागली.

"कारणिंग या चुकार माणूसजातीईंग तंस्स कंधी शक्यच असिंग न. दहा वर्षांज राज्य जेहवा तुमी पुरं करिंग, तेहवा आज तुमी जे बोलिंग त्यांज बरोबर उलटं वागणं तुमांज होईंग. सत्ता मिळिंग तेहवा साधू सुदहा भ्रष्ट होईंंग. आमांज राज्याहून तुमांज राज्य

काईंग वेगळं होईंग न. ही काळ्या दगडावरांज रेघ होईंग. मंग आमांज काईंग दूर सारिंग? त्या परीस आमांज अनुभवांज फायदा काईंग घेईंग न?" मंडलेश्वराने धूर्त प्रस्ताव मांडला.

लाकीने टाळ्या पिटल्या. "जर तुंज ही इतकीईंग हुषारी तू भल्या कामाईंग वापरिंग होईंग तर?" सुस्कारली.

"भल्यांज राज्य नी बुऱ्यांज राज्य हा या जगात भरती-ओहोटींज खेळ असिंग. आज भल्यांज बढतींज लहर चढती असिंग. हे तू जाणिंग घेईंग." ऋजूजानने ठणकावले. "काईंग काळानं कुंठच कोणाला तुमांजसारखं जुल्मी राज्य दिसिंग न. मी म्हणिंग की ही काळ्या दगडावरांज रेघ असिंग. तर काईंग त्या कोणानं म्हणिंग, की जगात बुऱ्यांज राज्य अंस्स कंधी काईंग होईंगच न?"

"जेहवा कोण भला राजा बनिंग, तेहवा तुमा बुऱ्यांज नाश नक्कीईंग. तुमांज सुटका असिंग न." गनाजाबाने खडसावले. आपल्या साथीदारांना त्या सगळ्या शठांना बांधून घालण्याचा आदेश दिला. त्यांनी खूप खळखळ केली. त्याला कोणी दाद दिली नाही.

मोनिशा, आता एक बंडखोर बनलेली पूर्वीची सरकारदार बाई, बातमी घेऊन बंडखोरांच्या एकत्रित नेत्यांपाशी आली. "आमी

तुरूगांज कोठ्या तपासिंग. पण महामहीमांज पत्ता लागिंग न. काईंग ती गुप्त भुयारानं पळ काढिंग होईंग?"

गनाजाबाने तुरूगाधिकारी बब्बरला फटकावले. तेव्हा त्याने तुरूगाला तसे काही गुप्त भुयार असल्याचे साफ नाकारले. तसे असते तर कैद्यांची आयतीच सोय झाली असती. लाकी विचार करू लागली. 'मंज हा प्रश्न सताविंग. महामहीमांज राजधानीत भक्कम राजमहाल होईंग. तरहि ती या तुरूगांज आश्रयाला काईंग येईंग होईंग?"

"काईंग आमी आता निकामिकांज वादन थांबविंग शकिंग?" गम्बुलने विनंती केली. "दरवाजे उघडिंग आमाला अजैविक हालचालींज साधने वापरिंग होईंग, या कारणिंग."

यावर बंडखोर नेत्यांमध्ये थोडी चर्चा झाली. महामहीमाच्या खाजगीतल्या सैन्याच्या हल्ल्याच्या भीतीने निकामिक वादन चालू ठेवलेले होते. पण ते सैन्य कुठे दिसतच नव्हते. त्यांना बाहेर काढायला तरी निकामिक वादन थांबवावे असे ठरले. त्याप्रमाणे गनाजाबाने साथीदारांना कळवता, निकामिक वाजायचे बंद झाले.

# शंभर वर्षे पुढे - प्रकरण ३७

त्या आधी तुरूगाच्या गच्चीवर काही गोष्टी घडत होत्या. गच्चीवर एका मोठ्या कापडी उड्डाणफुग्याच्या हौदाशेजारी महामहीमा बैचैन उभी होती. तिने अंगरक्षकांना आदेश दिला. "जलदीईंग हा फुगा फुगविंग."

"साहेबसरकार, पण निकामिक वाजिंग असिंग, तो पावतो ते शक्य होईंग न." नम्र स्वरात जरी रक्षकाने हे मालकिणीला सांगितले, तरी तिच्या रागाने हाणलेल्या थप्पडीचा धनी त्याला व्हावे लागले.

छमद आणि फहद जोडीकडे महामहीमा वळली. "मी तुमांजपाशी इंथ येईंग. यांज कारणिंग, निकामिकाला बेकारिंग अस्त्रांज प्रयोग तुमी जाणिंग हे. तेहवा आता ते बेकारिक चालविंग. तुमांज उपयोग मंज पटवूनिंग देईंग. जर तंस्स करिंग शकिंग न, तर....." महामहीमाच्या वाकड्या झालेल्या भिवईच्या इशाऱ्यावर, लगोलग एक रक्षक हातात धारदार तलवार परजून वार करायला तत्पर झाला. दुसऱ्या एकाने चाकाच्या ढकलगाडीवर ते अवजड अस्त्र तिथे ओढत आणून हजर केले.

"बेकारिक चालविंग होईंग, तर राखालानं जप्त करिंग आमांज पोतडीईंग साधनं हविंग होईंग." छमदच्या या मागणीनुसार त्यांच्या पोतड्या आणून त्यांच्या जवळ फेकण्यात आल्या.

छमदने हात उंचावून काढण्या दाखवल्या. "मंज ताकदीनं नी खास हालचालीईंग अस्त्र चालविंग होईंग. मोकळिक मिळिंग न, तर मी ते कंस्स साधिंग?" महामहीमा या मागणीने चरफडली. गच्चीवर यायच्या बंद केलेल्या दरवाजावर बंडखोरांच्या धडका ऐकू येत होत्या. तिला मागणी मान्य करण्यावाचून गत्यंतर नव्हते.

छमद आणि फहदला काढण्या तोडून मोकळे करण्यात आले. मात्र दहा कसलेले लढवय्ये रक्षक त्यांच्यावर तलवार व भाले परजून घेरून तयार राहिले. त्या दोघांनी नंतर खरोखर जीवाच्या परोपरीने ते बेकारिक चालवायचे प्रयत्न केले. अनेक खटपटी आणि लटपटी नंतर त्याच्यातून कर्कश्श आवाज उमटवण्यात त्यांना माफक यश आले. पण त्या आवाजाने साधायचे ते साधले जाईना.

महामहीमा जाणाऱ्या प्रत्येक क्षणा क्षणाला जास्त जास्त अधीर होऊ लागली. फहदने स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. "हे अस्त्र होईंग. म्हणहजे ते चालविंग आमांज इतर ऊर्जेज गरज होईंग. इंधन वा वीज."

"ती इंथ होईंग न." महामहीमा रागाने चिरकली. "पुढं बोलिंग. दुंजा काईंग पर्याय?"

"काईंग न." छमदने फहदच्या नजरेशी नजर मिळवत त्याला गूढ संदेश त्या वाक्यातून दिला. तिच्या डोक्यात आता प्रकाश पडला होता. जीव वाचवायचा तर लढून सटकायचा प्रयत्न करण्याशिवाय काही दुसरा पर्याय तिला नव्हता.

तिच्या हालचालींवर दहा जणांनी शस्त्रे उगारलेली असताना ते अशक्य होते. तिने पोतडीतून लपवून काढलेल्या विषारी सुया हळूच उजव्या हातात घेतल्या. फहदने हालचालीसाठी खुणेची नजरेला नजरेने हमी दिली. छमदने चपळ हालचाल केली. सुया उडवल्या.

पण फहदने तिची साथ न देता, तीच चपळाई दाखवत एका रक्षकाला पुढे ओढले. त्याला महामहीमाची ढाल बनवून तिला वाचवले. आपल्या वाट्याच्या सुया उडवल्याच नाहीत. छमदच्या पाच सुयांनी पाच बळी घेतले. पण फहदने जिवंत सोडलेल्या पाच घातकऱ्यांच्या शस्त्रांनी पुढच्या क्षणी तिच्या शरीराचा वेध घेतला. त्या घावांनी तिचे अंग बधिरले. आपल्याच मित्राने केलेला आपला विश्वासघात पाहायला, डोळे मात्र सजग राहिले. साथी क्रमांक तेवीसचे राहिले होते तसे.

"मी तुंज जीव राखिंग होईंग. तू मंज राखिंग. बदल्याईंग मी तुला शंभर वर्षाआधींज घातयंत्रांनी भरलेले भुयार दाखविंग." फहदने गुडघे टेकत महामहीमाची करुणा भाकली. आपली उपयुक्तता दाखवून द्यायचा प्रयास केला.

"जर खरोखरईंग तंस्स घातयंत्रं अस्तित्वात होईंग?" महामहीमाला हे घातकी हल्ले नवे नव्हते. ती चटकन त्यातून सावरली होती. "तर मी तुला जिवंत सोडिंग. तो पावतो तू मंज कैदी राहिंग." तिच्या नजरेच्या एका इशाऱ्यावर फहदचे हातपाय पुन्हा बांधले गेले. तिने संशय घेतला. "ती यंत्रं तुला कंस्स माहीतिंग?"

"बंडबागी साथी क्रमांक तेहवीसानं मंज ते भुयार दाखविंग होईंग." फहदने खरे सांगितले. ते दडवून काही फायदा नव्हता.

"बंडबागीनं तुंज विश्वास करिंग काईंग?" महामहीमाचा संशय फिटत नव्हता.

"मी त्यांज शय्यासोबतींज आशा पुरविंग म्हणहून." फहद निर्लज्जपणे उत्तरला.

"ओइइइइई! पुरूषवेडा बंडबागी." महामहीमा चित्कारली. "ती घातयंत्रं तू तुंज दिग्गीराजाला काईंग भेट देईंग न?"

"तितकीईंग सवडिंग मिळिंग न." फहदचे हे उत्तर महामहीमाला पटले नाही. तिच्या कपाळावरच्या आठ्या मिटल्या नाहीत.

"साहेबसरकार निकामिक बंद पडिंग." तोच रक्षकांनी तिला ती आनंदवार्ता सुनावली. ती फहदला विसरली.

"बंडखोर आता गच्चींज दरवाजा फोडिंग. त्या आधी फुगा फुगविंग. जल्दीईंग." ती किंचाळली.

बंडखोरांच्या नेत्यांना लवकरच तुरूंगाच्या गच्चीवर एक उड्डाणफुगा तरंगताना दिसू लागला. "निकामिक वाजविंग. जलदीईंग." महामहीमाच्याच आर्ततेने गनाजाबा किंचाळला. स्वतःच एक निकामिक उचलून वाजवू लागला. त्याच्या साथीला हळूहळू इतर अनेक निकामिक वाजू लागले. फुगा तरी वर वर सरकत गेला.

"तो उड्डाणरथ आता हवेनं उचलिंग असिंग." फिलू निराश स्वरात चरफडली. "निकामिक त्यांना थांबविंग शकिंग न."

"मी त्यांना थांबविंग." लाकी रागाने थरथर कापू लागली. जोरात धावत सुटली.

"तू करते हाय काय? जाते हाय कुठं?" बावळ्या तिच्या मागे धावू लागला.

तुरूंगाच्या आतल्या आवारात दोन पिसूड्या रिकामी पडून होत्या. त्यातल्या एकीवर मांड ठोकत लाकी ओरडली, "मी तिला कंस्सच सुटिंग जाईंग देईंग न. ती जाईंग तिंथ माग घेईंग तिला संपविंग." पुढच्या क्षणाला बावळ्याच्या डोळ्यांपुढून पिसूडी उसळी घेत वर उडाली. उड्डाणरथाच्या दिशेने उसळ्या घेत धावू लागली.

"मी तुला एकटं सोडनार नाय." बावळ्या तिला ऐकू जाण्यासाठी जोरात ओरडला. मग लगोलग दुसऱ्या पिसूडीवर चढला. त्याला तिचा कळफलक समजेना. तो पर्यंत फिलू धापा टाकत त्याच्यापाशी पोचली. "हे कस्सं चालवायचं? बिगी सांग." तो घायकुतीला आला.

"हे घेईंग. हे तुमाला त्यांज शस्त्रांपासून वाचविंग." म्हणत तिने बावळ्याच्या कमरेला आपला निकामिक जोडलेला कमरपट्टा घाईघाईत बांधला. मग फिलूने कळफलका बाबत दिलेल्या जुजबी सूचनांवर लगोलग अंमल करून, त्या पुऱ्या होण्याच्या आधीच बावळ्या घाईत सुसाटला.

त्या नंतर काही वेळ त्याच्या पिसूडीने उलट सुलट दिशांना उड्या मारत बंडखोरांचे मनोरंजन केले. मग एकदाची ती पिसूडी आधी गेलेल्या पिसूडीच्या मार्गाला लागलेली त्यांना बघायला

मिळाली. गनाजाबाने हुश्श केले. "मंज वाटिंग न की तो लाकीला गाठिंग शकिंग."

"लागिंग पैज?" ऋजूजानने हात पुढे केला. "त्यांज सगळं छानच होईंग." गनाजाबा परत एक हुश्श करून गप्प झाला.

# शंभर वर्षे पुढे - प्रकरण ३८

महामहीमाचा उड्डाणरथ आकाशातून स्वैर उडत होता. हवा गरम करून फुगवलेल्या एका प्रचंड मोठ्या फुग्याच्या खाली हौद घट्ट बसवलेला होता. त्या लटकणाऱ्या मोठ्या हौदात ती बसलेली होती. तिच्या चार अंगरक्षकांना जोरजोरात पायदट्टे मारून, त्या हौदाच्या दोन बाजूंना पसरलेल्या पंखांवरचे गरगरते पंखे फिरवावे लागत होते. त्या पंखांनी मागे सारलेल्या हवेच्या योगे तो उड्डाणरथ हळूहळू उत्तर दिशेला सरकत होता. सुकाणूची दांडी धरून राहिलेल्या पाचव्या अंगरक्षकाला फहद दिशा दिग्दर्शन करत होता.

"जल्दीईंग. बंडखोरांज दोन पिसूडी आमांज पाठलाग करिंग असिंग." फहद घरघरणाऱ्या वाऱ्याच्या वरताण आवाज लावत ओरडला.

"वारा उत्तरेंज कडून उलटा येईंग असिंग. आमांज मार्ग रोखिंग होईंग." तो सुकाणूधारी तितक्याच मोठ्याने किंचाळला. "आज दैव सगळ्याईंग बाजूनं आमांज विरोधात जाईंग होईंग." निराशेने वतवतला.

"दैव, नशीबांज गोष्टी दुर्बळ माणसांज सबबी होईंग. धैर्यवान माणूस सवताहांज कर्मांज विश्वास धरिंग, अडचणीतून मार्ग काढिंग." महामहीमाने सेवकांचे मनोबल वाढवायला म्हटले. ती जागेवरून उठून हौद्याच्या कडेवरून खाली वाकून पाहू लागली.

मोठ्या भूकंपानंतर नेहमी दाटून येतो तसा पाऊस दाटून आला होता. त्या ढगांमधून पसार होताना फुग्यातली गरम हवा थंड पावत होती. त्यामुळे ती फार हलकी होत नव्हती. उड्डाणरथ फारसा उंची गाठू शकत नव्हता. "हा रथ इतकाईंग खाली उडिंग असिंग, अंस्स वाटिंग तो बंडखोर पिसूडी थेट आमांजवर धडकविंग शकिंग." महामहिमा चरफडली. वाऱ्याच्या जोरदार झोताने तिचा तोल जाऊ लागला. भिऊन ती परत तिच्या सुखासनात जाऊन बसली.

"माणसांज हर बाब त्यांज नियंत्रणात हविंग जाईंग. पण वारा, पाऊस, ऊन जंस्स त्यांज ताब्यात होईंग न, तंस्स सवताहांज कर्म सोडिंग, दुंज काईंगच त्यांज ताब्यात होईंग न. त्या कर्मांज फळ सुदहा नाईंग." फहदने महामहीमाचा बडबोल खोडून काढायचा प्रमाद दाखवला. "माणसांज हाती खरेईंग काईंगच होईंग न. पण ते मान्य करिंग खूप माणसांना शक्य होईंग न. ज्याला सगळ्यांना काबूत करिंग ध्यास होईंग, त्याला तर कंस्सच नाईंग."

महामहीमाच्या नाकपुड्या रागानं फुलल्या. "हा उड्डाणरथ त्यांजवरील ओझं कमी जाईंग, तर जादाईंग वर नी वेगानं जाईंग. काईंग तुंज शरीरांज ओझं बाहेर फेकिंग?"

"महान दिग्गीराजांजकडे आश्रय मिळविंग तुला मंज शिफारशींज गरज होईंग. मंज होईंग तुंज गरजे परीस, तुला होईंग मंज गरज जादा होईंग." फहदने महामहीमाला सुनावले.

"आयालाव्वा, याला हौद्यातून बाहेर फेकिंग." महामहीमा तिडीकेने किंचाळली. तिला असली उद्धट प्रत्तुत्तरे ऐकायची सवय नव्हती.

"जी साहेबसरकार." म्हणत पायदट्टे मारणे थांबवून दोन अंगरक्षक तिची ती आज्ञा पुरी करण्याकामी वळले. त्यांनी फहदची गठडी वळून त्याला उचलले. त्या गारठ्यात त्याच्या कपाळावरून घामाचे थेंब जमून वाहू लागले. पायदट्टे फिरायचे थांबल्यामुळे उड्डाणरथाचे संतुलन बिघडले. तो जास्तच खाली आला. फहदला ज्या कडेवरून खाली फेकायचा प्रयत्न चाललेला त्या बाजूला कलंडला.

बावळ्याला दुरून उड्डाणरथ माडांच्या शेंड्यांना घासत जाण्याइतका खाली उतरलेला दिसला. त्याने पिसूडीची एक जोरदार उडकी घेतली. ती चिखलाच्या डबक्यात पडून घसरली.

त्यातून कसाबसा बाहेर पडून पाहतो, तो लाकीच्या पिसूडीची उडी त्या रथाखालीच पडलेली त्याला दिसली.

"न. न. मंज माफी देईंग." फहद घोर पश्चाताप करत बोंबलू लागला. "मी महान महामहीमांज गुलाम असिंग. अल्पमती असिंग. थोरामोठ्यांज संग कंस्स वागिंग-बोलिंग होईंग? ही समज मंज होईंग न. मी तुला विनाशर्त शरणिंग." दाताच्या कण्या करत तो दयेची भीक मागू लागला. "शरणागतांज अभय देईंग महान राजधर्म तू पाळिंग." महमहीमाने फहदला माफी दिल्याचे रक्षकांना ओरडून सांगितले. तिला सुद्धा तुटेपर्यंत ताणायचे नव्हते.

बावळ्याला उड्डाणरथ परत हळूहळू वर चढत जाताना दिसला. पण आता लाकीची पिसूडी त्याच्या मागावर जाताना दिसेना. गेली कुठे ती? त्याला प्रश्न पडला. उड्डाणरथाच्या मागावर जायचे की त्या माडांच्या रायीत तिला शोधायचे? संध्याकाळचा क्षीण प्रकाश पसरलेला होता. सूर्य खाली उतरलेला होता. अचानक त्या सुर्यबिंबाच्या पार्श्वभूमीवर उड्डाणरथाच्या खाली लोंबणाऱ्या दोरावर एक मानवाकृती लटकताना त्याला दिसली. लाकीने रथ गाठण्यात यश मिळवले होते तर?

"साहेबसरकार आता आमांज मागावर एकच पिसूडी असिंग." वरती उडत्या हौदातील रक्षकाने ही चांगली वार्ता मालकिणीला

दिली. तशी महामहीमा उत्सुकतेने पुन्हा एकवार उठून हौद्याच्या कडेवरून खाली डोकावू लागली.

"जो कंधी हिंमत हारिंग न, दैव नेहमी त्यांजपुढे हारिंग. नी त्यांज साथ देईंग लागिंग." महामहीमाने मान उंच करत सगळ्यांना सुनावले. फहदला एक लाथ मारली. "तुंज दिग्गीराजांज सारखे दहा दिग्गीराजा सहजिंग विकतिंग घेईंग, इतकईंग सोनं मंजपाशी राखिंग होईंग. तेहवा तो मंज कंस्स नाकारिंग शकिंग? त्यासाठी तुंज काईंग गरज होईंग? मंज कळिंग न." फहदने मान खाली घालून गप्पगुमान ते ऐकून घेतले.

"ती पिसूडी आमांज खूपईंग जवळिंग येईंग असिंग." रक्षक जरा चिंतातुरला.

"ती?" महामहीमा खाली पाहत बडबडली. "ती आमांजपाशी पोचिंग आधी समुद्रांज पाण्यात पोचिंग. त्या बेटांज सीमा आता संपिंग असिंग."

बावळ्याचा श्वास जाम फुलला होता. धपापून धपापून त्याचा छातीचा भाता आता फुटायच्या बेतात होता. उड्डाणरथ आणि त्यापेक्षा जास्त त्यावरच्या लाकीला गाठायला त्याची आटाकाटी चालू होती. माड मागे सुटून पुढ्यातला वाळूचा किनारा त्याच्या नजरेला दिसू लागलेला. समुद्रावर पिसूडी उडक्या घेऊ शकणार

नाही. त्याला माहीत होते. काही चमत्कारच त्याला त्या रथावर पोहचवू शकत होता.

तो चमत्कार एका घारीने घडवून आला. उडत्या रथाला तिची समोरून धडक बसली. त्याचा प्रचंड धक्का रथाला बसला. हौद हेलकावला. त्यातली माणसे हेलकावली. त्यांच्या जागा सुटल्या. त्यांच्या हालचाली चुकल्या. त्यांनी पुन्हा पायदट्ट्यांवर पक्कड घेत ते मारायला सुरुवात करेपर्यंतचा अवधी रथ खाली उतरला. बावळ्याची पिसूडी उडून त्याच्या दोराला लगटून मग सरळ समुद्रात जावून पडली. त्याचे शिंतोडे आकाशात लटकत्या हौद्यापर्यंत उडाले.

"साहेबसरकार, दुंज पिसूडी बुडिंग. आमांज मागेईंग आता कोण सुदहा नाईंग." हर्षातिरेकाने रक्षकाने महामहीमाला सांगितले. हौद इतका हेलकावत होता की त्याची खात्री करायला, काठाशी जाऊन खाली वाकायची हिंमत तिने केली नाही. ऐकले तितक्यावर समाधान मानले. जर ती तशी जाऊन जरा जास्त वाकली असती, तर त्या दोन्ही पिसूडीतली माणसे तिला हौदाखालच्या लंगरदोराला लटकती दिसली असती.

उत्तरेचा वारा जणू बावळ्या आणि लाकी उड्डाणरथावर कधी चढताहेत याची वाट पाहत होता. तसे ते चढता तो वारा उलट्या

दिशेने वाहू लागला. आता रथ मंदगती ऐवजी शीघ्रगतीने जाऊ लागला. मागून वारा ढकलू लागला. बावळ्या आणि लाकीच्या तोंडावर आपटणाऱ्या वाऱ्याला आपोआप मागून बसणाऱ्या वाऱ्याचा प्रतिरोध मिळाला. रिमझिम पावसाचे चुकार थेंब अंगे भिजवू लागले. मानवी हालचालींनी धावडवलेला तो उड्डाणरथ फार वेगात जाणारा नव्हता. तीस-पंचवीस कोसांच्या प्रतितास वेगाने जात होता.

मावळतीच्या प्रकाशात खालून मागे सरकणारी हिरवी बेटे आणि त्यांना वेढणारे दर्याचे सोनेरी पाणी मोठे मनोहारी दिसत होते. लटकताना हातांना लागलेली रग त्याचा आस्वाद मजेत घेऊ देत नव्हती. वरच्या फिरत्या पंख्यांचा घरघराट कान किटवत होता. कितीवेळ लटकत होते त्याचा बावळ्याला अंदाज येत नव्हता. दडून राहण्यासाठी एकमेकांशी संवाद साधता येत नव्हता. कुठे नेले जात होते, ते माहीत होत नव्हते.

जेव्हा खाली काचबनाच्या अद्भुत दृश्याचा नजराणा समोर आला, तेव्हा ते दोघे त्या चमचमाटाने हरखून गेले. थोड्या दूरवर गोराई खाडी दिसत होती. जी लाकीने कधी बावळ्याला घेऊन पार केलेली होती.

त्याच्या मनात त्या आठवणी जागल्या. सुर्य आता पिवळ्याचा प्रखर नारिंगा झाला होता. त्याला परतीचे वेध लागले. होते. हळूहळू उड्डाणरथाने काचबन मागे टाकून खाडी पार केली. आता डोंगराळ भागावरून ते जात होते. कदाचित सकाळी झालेल्या भूकंपाचा केंद्रबिंदू इथेच असावा. खाली जमिनीला मोठमोठ्या भेगा गेलेल्या दिसत होत्या. रथ त्या जागेवर वेग मंदावून घुटमळू लागला. इथे तिथे मागे पुढे सरकू लागला. बावळ्या आणि लाकीच्या मनात दुष्ट शंका जागली. काय त्यांचे वैरी घातयंत्रांच्या शोधात इथे आले होते?

"ती तिंथ सुवर्णा नामफलकांज पाटी दिसिंग." फहद उत्तेजित होत बोट दाखवत ओरडला. "भूकंपानं आमांज काम सोप्पईंग करिंग होईंग. त्या भुयारात घुसिंग प्रवेश मोकळा करिंग होईंग."

महामहीमा सावधगिरीने हौद्याच्या कठड्यावरून झुकली. तिने ती सोनेरी अक्षरांत झळझळती नावाची पाटी पाहिली. "आमांज दैव आता पूरेपूर गुलाम होईंग." तिने दर्पोक्ती केली. अंगरक्षकांना रथ खाली उतरवायचा आदेश दिला.

सगळेजण उत्तेजित झाले होते. कैद्याच्या बाबतीत काहीसे बेसावध. फहदने त्याचा पूरेपूर गैरफायदा घेतला. जीवावर उदार होत त्याने उसळी घेतली. वरच्या फुग्यातली हवा गरम करण्यासाठी

खाली पेटणाऱ्या ज्योतीवर. ज्योत आजूबाजूला फरफरली. तिच्या तडाख्यात जे काही आले ते जाळत. वरच्या फुग्याला हौद जखडणारे दोर पेटवत. त्या ओलसर दोरांनी सहज पेटणं चमत्कारिक होतं. पण ते सरसरून पेटले. हौद फुग्यापासून सुटा करण्यासाठी. वेगाने खाली कोसळवण्यासाठी. हौदातल्या माणसांसकट आणि हौदाला लटकणाऱ्या माणसांसकट.

बावळ्याला आणि लाकीला वर काय घटतेय याचा अंदाज नव्हता. वेगाने कोसळणाऱ्या हौदाबरोबर खाली येताना, त्याखाली चिरडू नये म्हणून बाजूला उड्या मारणे जेमतेम त्यांना जमले.

हौद वडाच्या मोठ्या झाडावर कोसळला. फांद्यामधून आपटत आपटत खाली जमिनीवर येऊन आदळला. त्याच्या आतली माणसे इथे तिथे फेकली गेली. बावळ्या आणि लाकी पारंब्यांच्या जंजाळात वरच्या वर अडकले गेले. त्यातून सुटायला धडपडायला लागले.

महामहीमाने हुशारी करून हौद्यातून वेळीच बाहेर उडी घेऊन हवाई छत्रीच्या साहाय्याने जमिनीवर सुखरूप उतरणी करण्यात यश मिळवले. तेवढे भाग्य तिच्या अंगरक्षकांचे नव्हते. त्यांच्यापैकी दोघांकडे फक्त हवाईछत्री होती. त्या छत्र्या त्यांच्या दुर्दैवाने फिरत्या

पंख्यांमध्ये फाटून गेल्या. उंचावरून जमिनीवर आदळून त्यांचा कपाळमोक्ष झाला. जसा इतर रक्षकांचा झाला.

ज्याने हा अपघात घडवून आणला, तो फहद त्याच्या चलाखीने वा आश्चर्यचकीत करणाऱ्या रितीने बचावला. हौदाच्या कडांना हातांच्या दोऱ्या अडकवून धरून राहून. त्यातल्या मऊ गाद्यागिरद्यांवर आपटून.

महामहीमाने स्वतःला छत्रीतून मोकळे केले. कोण कोण जिवंत राहिलेय? त्याचा ती शोध घेऊ लागली. तिचे बावळ्या आणि लाकी जोडगोळीच्या धडपडीकडे लक्ष गेले. तिचे डोळे विस्फारले. ती बावळ्या लटकत होता त्याखाली आली. "कोण असिंग तू?" तिच्या धपापत्या खोल आवाजात प्रचंड विषाद भरलेला होता. "काईंग नशीब तुंज इतकईंग मेहरबान असिंग?" तिच्यापासून चार पुरूष उंचीवर तो लटकत होता. तिने हाताच्या मुठी त्या झाडाच्या खोडावर मारल्या. त्यामुळे झाड हलून तो तिच्या तावडीत सापडणार नव्हता.

तिने नजर आजूबाजूला फिरवली. पडून गेलेल्या पावसामुळे सुटलेला मातीचा गंध किंचित रेंगाळलेला होता. संध्याकाळी फुललेल्या रानफुलांचा गंध जोडीला होता. आकाशात ढगांवर मावळून गेलेल्या सुर्याची मस्त गुलाबी आभा पसरलेली होती.

रथाच्या कोसळण्यामुळे बावरून उडालेले पक्षी आपल्या घरट्यांमध्ये पुन्हा परतले होते. त्यांची किलबिल चालू होती. त्या कशाकडेच तिने लक्ष दिले नाही.

थोड्या दूर तिच्या मरून पडलेल्या अंगरक्षकाच्या अंगावरची शस्त्रे तिला दिसली. चिखल तुडवत ती त्याच्यापाशी जाऊन तीरकाठा घेऊन बावळ्याकडे परतली. "आज तुंज नशीबांज अखेर. मंज हाताईंग." तीर जोडून तिने बावळ्यावर रोखला.

मग तिचे लक्ष फहदच्या खुडबुडीच्या आवाजाने वेधले. तो स्वतःच्या दोऱ्या घसटून मोकळ्या करायचा प्रयत्न करत होता. हौद्याच्या फळकुटांमागे असल्याने तिला दिसला नव्हता. तिला अडकलेल्या बावळ्याचा निकाल कधीहि लावता आला असता. फहद मोकळा होणे परवडले नसते.

तिने चढवलेला तीर मागे वळून फहदवर सोडला. फहद किंचाळला. त्याच्या उजव्या दंडात तीर शिरला होता. महामहीमा त्याच्याकडे गेली. वाटेत अंगरक्षकाची तलवार उचलून घेतली. तिने त्याच्यावर ती रोखली. "तू मंज जे काईंग कबूल करिंग होईंग. ते पुरे करिंग." तिच्या कठोर आवाजात उघड धमकावणी होती. "मंज ती घातयंत्रं दाखविंग."

"तुला ती दाखविंग. मंग तू मंज मारिंग. तर काईंग?" फहदने तिरसटून विचारले.

"सोप्पईंग मरण देईंग. या कारणिंग." महामहीमाने छद्मी हास्य केले. "चलिंग?"

तो चालायला लागला. सुवर्णा फलकाच्या दिशेने. मग त्यातल्या आता जमिनीच्या भेगेने उघड्या खिंडारात. तिथल्या पायऱ्या उतरू लागला. मावळतीमुळे अंधार सावल्या लांब झाल्या होत्या. त्याच्यामागून त्याच्यावर तलवार रोखून धरत महामहीमा सावधपणे सावकाश चालत होती. पायऱ्यांच्या खाली आत अंधार दाटलेला. पुढे चाललेला फहद त्यात चलाखी करून मिसळून निसटून गेला. तो यापूर्वी तिथे आला होता. त्याला आतली माहिती होती. मागे असणारी महामहीमा हताश राहिली. काही करू शकली नाही.

तिने त्याला आवाज दिला. धमकावण्या दिल्या. पण त्या काळोखात आत शिरण्याची तिला हिंमत झाली नाही. "काईंग इंथ थोडा उजेड होईंग?" ती चुटपुटली. जणू प्रत्युत्तरात आतला भाग उजळत गेला. जोरजोराने कसले खटके दाबले जात असल्याचे आवाज येऊ लागले. आत मध्ये वेगवेगळया रंगांच्या दिव्यांचे झोत पडताना दिसू लागले. मोठा कडकडाट झाला. यंत्रांचा क्षीण

घरघराट सुरू झालेला कानावर पडू लागला. तलवार कमरेला खोचून, तीर काठ्यावर सज्ज चढवून, धीर करून ती पायऱ्या उतरली. आत डोकावली.

आतमध्ये शंभरपेक्षा जास्त घातयंत्रे गुरगुरत जिवंत होत होती. "काईंग तुंज जीवांज मोबदल्यात तू तुंज सगळेईंग सोने मंज कबूलिंग?" दडलेल्या फहदचा आवाज तिच्या कानी पडला.

"तू कुंठ असिंग?" तिने त्याला आवाज दिला. "मंज सामोरा येईंग."

"न. तुंज सामोरिंग ही घातयंत्रं येईंग. तुंज फक्त दोन पळांज अवधी होईंग. मंज सोने कबूलिंग नी शस्त्रं खाली ठेविंग." फहदने तिला चेतावणी देत खबरदार केले.

"खुळचुक्या, ही यंत्रं तुला सुदहा जिवंत सोडिंग न." महामहीमाने त्याला शह दिला.

"तू तंस्सहि मंज मारिंगच. जर मी मरिंगच असिंग, तर तुंज सुदहा संग घेईंग मरिंग." फहदने तिला काटशह दिला.

तिने ते दोन पळ गमावले. यंत्रांचा गुरगुराट वाढला. अचानक फहदचे जोरजोराने किंचाळणे तिच्या कानावर आले. यंत्रांनी त्याचा बळी पहिला घेतला. ती मागे पळाली. तिला सगळ्या पायऱ्या

ओलांडता आल्या नाहीत. यंत्राने तिला त्याआधी गाठले. तिच्या किंचाळ्यांनी रान भरले.

कानावर आलेल्या किंचाळ्यांनी लाकीला सारे उमगले. "त्या मुर्खांनी घातयंत्रं चालविंग होईंग. ती यंत्रं आताहा सगळ्या जीवांना ठार करिंग." ती कळवळली.

काही पळातच घातयंत्रे त्यांच्या तळावरून बाहेर पडली. मिळेल त्या जीवाचा खात्मा करायला. बावळ्या आणि लाकी हे दोन मोठे सजीव, त्यांच्या नाश-यादीवरचे सर्वात प्राधान्यवाले मनुष्यप्राणी त्यांनी शोधून काढले. त्यांना घेरले. त्यांचा मारणमारा बावळ्या आणि लाकीवर सुरू झाला.

ते दोघे अडकलेले त्या पारंब्या सुद्धा सजीव होत्या. त्या पारंब्यांमधली शक्ती का नष्ट झाली असावी? ते बावळ्याला कधी उमजले नाही. पारंब्यांनी त्यांना सोडून दिले. दोन्ही मानवी सजीव त्या पारंब्यांमधून घरंगळत खाली आले. तिथल्या चिखली डबक्यात एकमेकांना घरंगळत येऊन आपटले.

"मरिंग तेहवा आमी साथ होईंग. यांज मंज खुशी असिंग." अंगातला मारणमाऱ्यामुळे उठणारा वेदनांचा डोंब सहन करत लाकी कण्हत पुटपुटली.

"मरायचं कशापायी? माझ्यापाशी निकामिक हाय की?" बावळ्या कण्हत पुटपुटला.

"सांगिंग कंधी? मरिंग नंतर?" लाकी चिडली.

"फुंकशील कंधी? मेल्यावर?" बावळ्या सुद्धा चिडला.

त्यानंतर त्या घातयंत्रांनी त्यांच्या माहितीसाठ्यात न साठवलेला एक वेगळाच आवाज ऐकला. ज्याच्या परिणामी त्यांचे इतके मोठे स्फोट झाले की तो आवाज दूर दूर काचबनाच्याही पार गेला. एक प्रचंड प्रकाशाचा लोळ तिथे निर्माण झाला. जणू सुर्य पृथ्वीवर अवतरला.

# शंभर वर्षे पुढे - प्रकरण ३९

तीव्र प्रकाशामुळे डोळ्यापुढे आलेली अंधेरी हळूहळू विरत गेली. त्या आधी जाणवला जळक्या धातूंचा, करपलेल्या तारांचा नाक सणसणवणारा संमिश्र उग्र वास. हवेतली कातडी भाजणारी उष्ण झळ. कानठळ्या वाजवणाऱ्या आवाजाने आलेले सुन्नपण. बधीरलेली चेतना. न भय. न सुटकेचा आनंद. न आश्चर्य. न कंप. अंगावरून फिरत असलेल्या शहाऱ्याच्या काट्याच्या उगाच फुलत आणि मिटत जाणाऱ्या लहरी. धक्क्यामुळे बंद पडलेले हृदयाचे ठोके पुन्हा चालू होतानाची ठकठक.

बावळ्या डोळे किलकिले करून पाहू लागला. यंत्रांच्या विखुरलेल्या गरम तुकड्यांच्या मधोमध तो आणि लाकी अडकलेले होते. गरम वाफांचे आणि धूराचे सभोवती दाटलेले धुरके आजूबाजूला पसरत विरळ होत गेले. तो कुठे होता? याचा विचार करायला डोके पुन्हा सक्रिय झाले.

लाकी चक्रावलेली नजर चहूकडे गरगरवत होती. "भिऊ नगं. आमी माझ्या काळात परतलो हाय." बावळ्याने आपला निष्कर्ष जाहीर केला. "हे बघ की तेस्लावालं तारांची भेंडोळीवालं खांब. सख्याच्या खोपटातलं." त्याचं लक्ष वरती स्फोटामुळे उडून वा

जळून गेलेल्या छताकडे गेले. वरती मुंबईचे कधी न काळोखणारे आकाश धूसर उजळलेले होते. "ते बघ. सख्याचं ठोकेवालं घड्याळ आजची तारीख दाखवतं हाय. ते वाचलं हाय? बिलामतच हाय!"

लाकी काही वेळ त्याच्याकडे डोळे व तोंड वासून पाहत राहिली. "अशी काय बघते हाय? काय मी भूत दिसतो हाय?" बावळ्या विचारता झाला.

तिने डाव्या भिवईवरून बोट फिरवून दाखवले.

"काय बा? बरी हाय की तुझी भिवयी." बावळ्या चौकसपणे तिला निरखत खात्री देता झाला.

लाकीने त्याच्याकडे बोट दाखवून पुन्हा भिवईवरून हात फिरवला.

तसे बावळ्याने आपल्या भिवईवरून हात फिरवून पाहिला. "स्स हाय!" केले. "जळली हाय की? काय मोठं नाय! उगवंल पुन्ना." तिला आश्वस्त केले.

तरीहि ती तसेच डोळे फाडफाडून त्याला पाहत राहिली. "आता जळलंल्या भिवयीचं इतकं बी काय?" तो वैतागला.

"महान युगनायक…" बोलू जाता लाकीला ठसका लागला. त्यातून सावरून ती सांगती झाली. "ही महान युगनायक जलझांज खूण असिंग."

आधी बावळ्याला तिला नेमके काय म्हणायचे आहे कळले नाही. मग सगळे जग गरागरा त्याच्याभोवती फिरू लागले. ऋजूजानचे वाक्य त्याला आठवले. 'तू इंथ या काळात काईंग येईंग होईंग? विचारिंग सवताहांज.' जेव्हा त्या विचारांच्या भोवळीतून तो बाहेर आला, लाकीकडे एका नव्या नजरेने पाहू लागला. तिच्या हातात निकामिक होते. महान युगनायकांच्या चित्रात दाखवलेले होते तसेच. पट्टेरी कपडे अंगावर होते. तसेच. त्याच्याहि अंगावर असणार होते. पट्टेवाले तसेच. "तू...तू...ती निअसरा हाय."

लाकीला बसलेला धक्का दुप्पट झाला.

"बावळ्या माझ्या मित्रा." एक आनंदाने मारलेली आरोळी कानावर आली. मग ती आरोळी मारणारा त्याचा सख्या शिडीवरून चढून येत, सरळ त्याच्याकडे धावला. त्याच्या गळयात पडत मिठी मारता झाला. "साल्या, तू जिंदा कसा राहिलास?"

बावळ्या त्याच्या मिठीत गुदमरला. सख्याला दूर ढकलला. "ए, बाजू हो आधी. बाजूला हो. निस्ती गटाराची घान मारते हाय की तुला."

सख्या बावळ्याच्या जोराने बाजूला कलंडला. तिथून त्याला पडल्या पडल्या लाकी दिसली. तो लाकीला डोळे आणि तोंड आ वासून पाहू लागला. मग बावळ्याकडे आणि तिच्याकडे आळीपाळीने पाहत खुणेने विचारू लागला. आधी आवाज उमटेना. उमटला तेव्हा ते शब्द होते, "ही अप्सरा काय स्वर्गातून उतरली?"

"नाय. शंभर वर्सं पुढून अवतरली हाय." बावळ्याने प्रौढी मिरवली. "माझ्यासाठी. हिचं नाव हाय लाकी. लाकी, याचं नाव हाय सख्या." ओळख करून दिली. तशी लाकी शिष्टाचार निभावायला हसली.

सख्याचे डोळे त्या दोघांना पाहत आळीमिळी गुपचिळी मिचमिचत राहिले. "तू? तू कपडे कधी बदललेस? काय आहे हे?" त्याचे लक्ष बावळ्याच्या हातातल्या शस्त्राकडे गेले.

बावळ्या काही उत्तर देणार तोच घातयंत्रांचा घरघराट पुन्हा वरून ऐकू येऊ लागला. सख्याच्या चेहऱ्यावर घोर भीती दाटली. "त्या अवपिपासेनं आणखीन धाडलीत. ती मारकयंत्रं आली." तो घाईघाईने गटारात उतरणाऱ्या भोकाकडे धावला. मग वळला. "अरे धावा. आता आपल्याकडे पुन्हा तेस्लाच्या गुंडाळ्या वापरायला वीजेचं जनित्र शिल्लक राहिलेलं नाहीय."

"काळजी नगं करू." बावळ्या उठून सज्ज उभा राहिला. त्याने लाकीला उभे करण्यासाठी हात पुढे केला. "चल गं. मला हे इथं या काळात आनायलाच तिथं धाडलेला होता की." त्याने निकामिकाकडे इशारा केला. लाकी त्याचा हात स्वीकारून तत्पर झाली.

सख्या भोकाकडे वळला. "ए पेद्रू, परत परत गटारात कशापायी घुसतो हाय? इथंच राहा आनी चमत्कार बघ की?"

लाकीने सरसावलेल्या निकामिकाकडे डोळे बारीक करून सख्याने बघितले. "हे काय परग्रहावरचं यंत्र आहे? काय करतं?"

"आता सवताच बघ की." बावळ्याने लाकीला खूण केली. घातयंत्रे खाली नजरेच्या टप्प्यात आली होती. त्यांच्या मारणमाऱ्याची जळजळ सुरू झाली. पुढच्या क्षणी त्यापूर्वी मानवजातीने कधीहि न ऐकलेल्या दिव्य नादाने आसमंत भरून गेला. पृथ्वीवर येणारी पुढची अनेक वर्षे गुंजत राहण्यासाठी.

**(संपूर्ण)**

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**

**संयम बागायतकर यांचे हे ई साहित्यवरचे दुसरे पुस्तक.**

संयम बागायतकर हे एक सखोल विचार करून लिहीणारे लेखक आहेत. त्यांची पुस्तके रंजक असतात. पण रंजनासाठी नसतात. एका विचाराचा शोध घेत त्यांचा प्रवास चालतो आणि त्या प्रवासात ते वाचकाला सामिल करून घेतात. म्हटले तर ठाम, म्हटले तर लवचिक असे त्यांचे विचार त्यांच्या साहित्यातून जाणवतात. जरी ते फ़ॅंटसी लिहीत असले तरी ती वास्तव असते. पण आपल्या वास्तवाच्या समजुतीचे ओझे वाचकावर ते लादत नाहीत; त्याला स्वतःला स्वतंत्र निष्कर्ष काढायची मोकळीकही देतात. त्यांच्या साहित्याला खरे तर एखादा जागतिक प्लॅटफ़ॉर्म मिळायला हवा. त्यावर गंभीर चर्चाही व्हायला हव्यात.

संयम बागायतकर यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२७ पुस्तके), अनील

वाकणकर (९), अनंत पावसकर(४ पुस्तके), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(५), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(२) स्वाती पाचपांडे(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।